# भारतातील बेबंदशाहीचे व्यवस्थापन

**भारतात लोकशाही का म्हणून फेल होत आहे. त्याची कारणे तसेच आपला देश जगात प्रथम क्रमांक कसा काबीज करेल यावर अंमलबजावणीयुक्त उपाय सांगणारे पुस्तक.**

लेखक
**गजेन्द्र चाचरकर**

**संघर्ष वाहिनी पब्लिकेशन्स**
**नागपूर**

**भारतातील बेबंदशाहीचे व्यवस्थापन**

२०२०

लेखक व प्रकाशक :
**गजेन्द्र दि. चाचरकर**
रा.पो. भिसी, ता. चिमूर
जि. चंद्रपूर.

मुखपृष्ठ व अक्षर जुळवणी :
रवीन्द्र कडवे
मीरा कम्प्यूटर्स, १८ ड, अजयनगर,
अंबाझरी हिलटॉप, नागपूर -४४००३३
मो. ९७६६२७५४२९
ई-मेल : meeracom33@gmail.com

मुद्रक :

**© सर्वाधिकार**

या पुस्तकाचे सर्व हक्क लेखकाकडे राखीव आहेत. या पुस्तकाचा कोणताही भाग लेखकाच्या पूर्वपरवानगी शिवाय संपूर्ण अथवा अंशतः कोणताही भाग, कोणत्याही माध्यमात - इलेक्ट्रानिक, फोटोकॉपी, ध्वनीमुद्रण, इंटरनेट किंवा तत्सम वापरु नये.

**मूल्य : १५० रुपये**

# * अर्पण *

या ब्रह्मांडाचा निसर्ग निर्माता, या सृष्टीचा घडणकर्ता, जीवसृष्टीचा जनक ज्यांच्यामुळे मला मानवी शरीर, बुद्धी आणि जन्म मिळाला आणि तद्नंतर माझे वडील, आई, भावंड, नातेवाईक, माझे शिक्षक, समाजबांधव, माझे भारतीय आणि अमेरिकन मित्रमंडळी, माझे एम्पोयर, सपोर्टर, विरोधक तसेच इतर सर्व ज्यांचेकडून कळत नकळत सारे काही शिकत आलोय, ज्ञानकण वेचीत आलो, अशा सर्व ज्ञात-अज्ञात गुरुंना... सविनय भावनेने अर्पण.

••••••

**- गजेंद्र चाचरकर**



# हे पुस्तक कशासाठी ?

- **या देशातील लोकशाही शासकीय, निमशासकीय प्रणाली व्यवस्था फिक्स करण्यासाठी...**
- **गोरगरीबांना श्रीमंताच्या बरोबरीने आर्थिक, सामाजिक, व्यापार उद्योग, नोकरी क्षेत्रात समान संधी प्रत्यक्षात मिळण्यासाठी...**
- **आपला देश जगात पहिल्या क्रमांकाचे नेतृत्वक्षम राष्ट्र बनण्यासाठी**
- **भारतातील न्यायपालिका, पोलीस यंत्रणा, ब्युरोक्रसी, लोक प्रतिनिधींमधील भ्रष्टाचार संपविण्यासाठी...**
- **भारताच्या पायाभूत संस्कृती रक्षणासाठी...**
- **शेतकऱ्यांना चांगले दिवस देण्यासाठी...**
- **भारतीय खेळ, परंपरा, आयुर्वेद, संस्कृती यांना जागतिक दर्जा मिळण्यासाठी...**

**१) वयानुसार मतदानाचा अधिकार बदलणे.**

१८ वर्षे ते ३५ वर्षे वय असलेल्या मतदाराला एका मताचा अधिकार.

३६ वर्ष ते ५४ वर्षे वय असलेल्या मतदाराला डबल मताचा अधिकार.

५५ वर्षांपेक्षा जास्त वय असलेल्यांना तिप्पट मताचा अधिकार.

**२) न्यायपालिकेचे पोलीस यंत्रणेचे विकेंद्रीकरण.**

गावागावात न्यायपंचायत म्हणजे कोर्ट असतील. गावातील निवडून आलेले ज्येष्ठ न्यायनिवाडा करतील. लगेच शिक्षा सर्वांसमक्ष.

गावातील निवडलेले न्यायाधीश मदतीसाठी गावातील निवडक प्रामाणिक तरुण पोलीसांना पर्याय म्हणून काम करतील.

विद्यमान पोलीस आणि कोर्ट दुसऱ्या स्तरावर काम करतील. गावातील न्यायपंचायतीने दिलेले पुरावे सर्वोच्च न्यायालयापर्यंत ग्रह्य धरले जातील.

**३) विद्यमान जेलची सिस्टम फेल आहे.**

जुन्या काळासारख्या भर पब्लिकमध्ये फटके मारणे, तोंडाला काळे फासणे, हात पाय तोडणे सारख्या शिक्षा अंमलंबविणे. हिंसा निसर्ग निर्मित पकडून शिक्षा करताना शिक्षेच्या तीव्रतेवर नियंत्रण ठेवण्यासाठी गावातील वैद्यकीय अधिकारी असतील.

**४) मीडिया वर नियंत्रण.**

भारतीय खेळ, संस्कृती, भारतीय संशोधन, भारतीय शिक्षण, आयुर्वेदच्या बातम्यांचा प्रोपोगंडा जास्त करणे.

**५) भारतातील कायदे, सर्वसामान्य लोकांच्या मनाप्रमाणे बनविणे.**



# मनोगत

हे पुस्तक वाचतांना मी सांगितलेल्या शंकर सुचनांपैकी तुम्हाला शंभरही पटतील  हे कठीण वाटते. मी सुचविलेल्या शंभर बदलांपैकी शंकरही तुम्हाला शक्य वाटतील हे कठीण असू शकते. पण आपणास सुचलेले करेक्शन हे चर्चेतून मात्र पक्के सोडविता येतील. सकारात्मक चर्चेतून परत भरीव कन्स्ट्रक्टीव्ह मॉडीफाईड उपाय जरूर निघतील. आपली मते व ठाम समजूती आपल्याला आलेल्या अनुभवावर आधारित असतात. कोणाला न्यायपालिकेच्या कोर्टात, जज, वकील आणि तेथील कर्मचाऱ्यांचा कसा अनुभव आला, तुम्हाला तहसील ऑफीसमध्ये तहसीलदार, पटवारी, आबू-बाबू कडून कसा अनुभव आला, कोणाला पोलीस स्टेशनमध्ये पोलीस हवलदार, इन्स्पेक्टर, तेथील अधिकाऱ्यांचा कसा अनुभव आला, यावरुन आपल्याला या लोकशाहीची पाळेमुळे तर नाही पण बाह्यरुप अनुभवता येते. कधी कधी लोकशाहीतील ही सर्व डिपार्टमेंन्टस्, पोलीस, न्यायपालिका, तहसील, कलेक्टर, पत्रकार हे सुसंघटीत, सुनियोजित, सुनियंत्रित पद्धतीने एकत्रितपणे गुन्हेगारी करीत आहे. असा पक्का अनुभव येतो. पण या सर्व शाखांमधील सर्वच लोक चोर आहेत का? या सर्व शाखांमधील एक्के दुक्के ही कर्मचारी, अधिकारी सत्याला धरून चालणारे नाहीत का? आपल्याला ही क्लिष्ट यंत्रणा स्वच्छ करणे शक्य नाही का? अशा बऱ्याच प्रश्नांची उत्तरे या अंमलबजावणीयुक्त पुस्तकामध्ये देण्यात आली आहेत.

ही क्लिष्ट कॉम्प्लीकेटेड यंत्रणा भ्रष्टाचार, कामचुकारपणाने इतकी बुरडलेली आहे की हिला सुधारणे शक्य नाही. मोठ्या मोठ्यांना जमले नाही ते आपल्याला कसे जमणार? हे मनातून काढून टाका. यावर उपाय आहेत, हे पुस्तक त्यासाठीच लिहिल्या गेले आहे.

जेव्हा मंत्री आश्वासन देतात तेव्हा ते पूर्ण का करू शकत नाहीत? त्यांना कशाच्या मर्यादा आहेत? हे नियम कायदे याचा साचा आणि चौकटी फक्त त्यांनाच अडविते का? लोकशाहीच्या या नियम कायदेपासून बनलेला साचा आणि चाकोरी वर चक्रव्यूह बांधून बसलेले कामचुकार आणि भ्रष्टाचारी अधिकारी पावलोपावली मंत्र्यांची सुद्धा अडवणूक करतात तर आपले काय? नियम कायदे याचा साचा आणि चाकोरी सुकर करणे शक्य आहे का?

लोकशाहीचे शरीर कोणत्या कोणत्या यंत्रणानी बनले आहे? एक एक यंत्रणा आपल्याला नियंत्रित करायची झाली तर कसे करणार? एका एका यंत्रणेत विविध शाखा! प्रत्येक शाखेत काम करणारे विविध अधिकारी! प्रत्येक शाखेसाठी बनलेली जबाबदाऱ्यांची, अधिकारांची नियमावली आणि कायदे! आणि या प्रत्येक शाखा आणि उपशाखेला लागला आहे कामचुकारपणा आणि भ्रष्टाचाराचा रोग! बनलेले कायदे आणि नियमावली वापरुन सर्वसामान्य जनतेला कसे अडवायचे आणि पैसे कसे लाटायचे यासाठी यांच्या डोक्यातील किडे वळवळत असतात. कोणी जर सर्वसामान्य नागरिकाने यांचे विरुद्ध खंब ठोकले तर ही यंत्रणा एकजीवपणे त्या सर्वसामान्याला टक्कर देते आणि संपवून टाकते. पण एखादा जनतेच्या भल्यासाठी मोठा काम्प्लेक्स प्रोजेक्ट करायचा असेल तर एक दुसऱ्या डिपार्टमेंट आणि अधिकाऱ्याला लाथाळी देऊन अडथळे उभे करते. या यंत्रणेला आणि अधिकाऱ्याला जनतेच्या पैशाचा कसा व्यय होतो त्याचे घेणे-देणे नसते. प्रोजेक्ट लांबला काय थांबला काय, याचे यांना घेणे-देणे नसते.

सरकार म्हणजे काय? शासन म्हणजे काय? सरकार म्हणजे फक्त मंत्रीमंडळ? शासन म्हणजे या मंत्रीमंडळाच्या हाताखाली काम करणारे शासकीय अधिकारी? काय आहे हे सरकार आणि शासन? मग शासकीय यंत्रणा म्हणजे काय? सरकारने हे नाही केले, ते नाही केले. सरकारने हे करायला पाहिजे होते, ते करायला पाहिजे होते. कोण आहे हे सरकार? सरकार म्हणजे मुख्यमंत्री का? सरकार म्हणजे पंतप्रधान का? सरकारने हे द्यायला पाहिजे, ते द्यायला पाहिजे? कोण आहे हे सरकार त्यांच्या जबाबदाऱ्या काय?

जे कोणते प्रस्थापित पक्ष आहेत, शासन आहे ते टेंपररी मलमपट्टीवाले उपाय करत आहेत. सर्वसामान्य जनतासुद्धा त्याच मानसिकतेची बनली आहे. पण प्रश्न जळामुळासहित उपटून फेकण्याची भाषा, प्रश्नाच्या मुळाशी खोलवर अभ्यासून संपविण्याची भाषा कोणी करत नाही. हे पुस्तक मुळावर घाव घालणारे आहे.

या पुस्तकातील सुचविलेले उपाय भारतमातेचा चेहरा मोहरा शरीर परिवर्तन करण्याची क्षमता ठेवते. भारतीयांचे तणावपूर्ण अस्थिर जीवनाचा कायापालट करु शकते.

भारतीय कसे जगतात, आत्महत्येचे अवडंबर, नकारात्मकता ते जाऊन नवीन आनंदी चैतन्यमय उल्हासीत संचार भारतीयत्वामध्ये उफाळू शकतो.

देश कसा असतो, देशाचे शरीर, मन, त्याची गुंफण, त्याचे अस्तित्व,



त्याच्यातील एकजिनसीपणा कसा असावा, यावर अप्रत्यक्षपणे फोकस करते.

माझा देश या जगात प्रथम क्रमांकावर कसा आगेकूच करेल, अमेरिका युरोपलाही कसा मागे टाकू शकेल या प्रश्नाचे इत्यंभूत उत्तर म्हणजे हे पुस्तक ठरावे या प्रखर आत्मविश्वासाने या पुस्तकात लिहिलेला एक एक लेख लिहिल्या गेला आहे. माझ्या मनातील विचार सर्वांच्या लक्षात येणार की नाही, माझ्या लिखाणात सुस्पष्टता आहे की नाही, हे मला स्वतःला समजणे कठीण आहे.

भारत देश म्हणून स्वतःला कसा नियंत्रित करू शकतो, या देशाची देश म्हणून दशा कशी बदलता येईल या उद्देश ठेवून हे लेख लिहिल्या गेले आहेत.

देशातील परिस्थितीची रहस्ये भेदून त्यातील सत्य स्पष्ट करणारे आणि त्यावर नियंत्रण कसे मिळवायचे यावर सांगड घालण्याचा प्रयत्न या लेखांमध्ये केला गेला आहे.

एक एकजिनसी देश म्हणून भारताचे संपूर्ण व्यक्तीमत्व कसे बदलता येईल. जगात एक अत्युत्य स्थान अढळ स्थान मिळवेल या दृष्टीकोण या लिखाणामागे आहे.

एक एकजिनसी देश आली त्याचे मानसशास्त्र याचा या पुस्तकात मागोवा घेण्याचा सुद्धा प्रयत्न केला गेला आहे. आपला देश बदलूच शकत नाही, या देशातील लोक बदलूच शकत नाहीत. या घट्ट झालेल्या मनोधारणा कशी बदलता येईल हे या पुस्तकात भेदण्याचा प्रयत्न केला गेलेला आहे.

भारतातील क्लिष्ट कायदेप्रणाली रूळलेला शासन प्रणालीचा साचा, त्या विविध यंत्रणा शाखामधील काम्पेक्सीटी याला भेदून एका नवीन इतिहासाचा पाया कसा रचता येईल. आपण भारतीय आपला देश पूर्ण जगाचे नेतृत्व कसे करेल हे दूर्दम्य लक्ष मनासमोर ठेवून या पुस्तकातील लेख लिहिल्या गेले आहेत.

पहिले पहिले पुस्तक असल्याने लेखक म्हणून होणाऱ्या त्रृटी आढळल्या, चुका आढळल्या तर तो दोष माझा. पण यात दिलेले, विचार उपाय जे पटले आणि कायदेशीर ठरले तर त्याचे श्रेय आपण सर्वांना. कारण हे विचार, हे पुस्तक तुमचे आहे. बदल आणि उपाय त्यांचे यश हे तुमच्याच हातात आहे.

**– गजेंद्र दि. चाचरकर**

# ऋणनिर्देश आणि विशेष आभार

माझे जन्मगाव, भिसी, येथील बालपणीचे मच्छीमार, शेतमजूर आणि शेतकरी वर्गातील सावंगडी, पूर्ण गाववासी, आदर्श जनता विद्यालय असो वा महात्मा गांधी विद्यालय, त्या काळातील माझे मन लावून शिकविणारे शिक्षक, आईवडील, भावंड, नातेवाईक, मित्रवर्ग ज्यांनी माझ्या आयुष्याची ज्ञानाची पायाभरणी केली.

अनेक प्रभावी व्यक्ती, त्यांचे कार्य, त्यांचे लिखाण जे माझ्या मनाला भेदून गेले.

संजय पंडित, ध्रुव मीडिया पब्लिकेशन निर्मित लिखित मनाचे व्यवस्थापन. त्यांच्या लिखाणाच्या गुणवत्तेची बरोबरी करणे मला अशक्य आहे पण माझे लेख पुस्तक स्वरूपात प्रकाशित करण्याची प्रेरणा तिथून मिळाली आणि इतरही परिवर्तनीय प्रेरणा मिळाल्या.

भगवद्‌गीता एक अजरामर ग्रंथ जो प्रत्येक वाचनानंतर मला नवीन प्रेरणा देतो, नवीन विचार आणि उपाय सुचवितो.

कृषीऋषी सुभाष पाळेकर त्यांचे कार्य, त्यांची पुस्तके, झिरो बजेट नैसर्गिक शेतीचे तंत्रज्ञान. हेमंत सिंग चव्हाण, वीरेंद्र बरबटे यांचे सहकार्य.

देवदत्त पटनायक लिखित पॉप्युलर प्रकाशनचे जय (महाभारत) महात्रया रा लिखित मंजुल पब्लिशिंग हाऊसचे न पाठविलेलं पत्र. शतपत्रेकार लोकहितवादी वामन हरी देशमुख यांचे लिखाण, लोकहितवादी समग्र वाङ्मय खंड एक आणि दोन. लेखक इंदुमती गोवर्धन पारीख.

महात्मा गांधी, त्यांचे कार्य, त्यांचे पुस्तक माझे सत्याचे प्रयोग. शिवाजी महाराज त्यांचे कार्य. त्यांच्यावर लिहिलेली विविध पुस्तके. बाबासाहेब पुरंदरे यांचे शिव छत्रपती, रणजीत देसाई यांचे श्रीमान योगी. स्वातंत्र्यवीर सावरकर लिखित भारतीय इतिहासातील सहा सोनेरी पाने.

महाराष्ट्र मधील लिडिंग वृत्तपत्र लोकमत जिथून मी निवडक बातम्या आणि लेखावर नजर ठेवून होतो,लिखाणाचे पुरावे म्हणून फोटो स्नॅप संग्रहित करीत असतो. टाइम्स ऑफ इंडिया, महाराष्ट्र टाइम्स, देशोन्नती आणि इतर ही वृत्तपत्रे.

तुकडोजी महाराज आणि ग्रामगीता ज्यांच्या विचारांनी मला आंतरिक शक्ती दिली आणि भविष्यातील भारतीयांच्या यशाची अप्रत्यक्ष ग्वाही दिली. सर्व गुरुदेव सेवा मंडळ ज्यांनी तुकडोजी महाराज यांच्या विचारांना ताकदीनिशी टिकवून ठेवले आहे. मुख्याध्यापक विनोद पिसे सर चिमूर ज्यांनी वेळोवेळी माझ्या



विषयांना सहकार्य दिले. पुरुषाधिकार संघटना, पत्नीपीडित संघटना सिफ, राजेश वखारिया आणि कार्यकर्ते.

पु. ना. ओंक लिखित जागतिक इतिहासातील खिंडारे मनुस्मृती हा ग्रंथ भाषांतरित.

वरळी मुंबई येथील तत्कालीन ग्लास्कोच्या वाजूचे वाचनालय जिथे मी स्वातंत्र्यवीर सावरकर, पंडित जवाहरलाल नेहरू, महात्मा गांधी, काँग्रेस, शिवाजी महाराज आणि इतर थोरांची पुस्तके वाचली.

सी.एस.टी. टर्मिनस मुंबईच्या जवळ, डी इन रोड फोर्ट मुंबई येथील महावीर बुक हाऊस, येथील एक अनोळखी व्यक्ती जो मला सर्वाधिक सेलिंग बुक कोणते आहेत याबद्दल माहिती द्यायचा.

श्री दीनानाथ वाघमारे, मुकुंद अडेवार, संघर्ष वाहिनीचे इतरही कार्यकर्ते ज्यांचे सोबतीने हिंमत मिळाली.

प्रभुजी चाचेरे, संतोष लक्ष्मण चाचरकर ज्यांनी पुस्तकाचे लेख कंपाईल करण्यासाठी मदत केली. टायपिंग, कंपाईलची मदत केली.

इनमिन शंभर सव्वाशे वर्ष टिकणाऱ्या मानवाने शोधून काढलेले सिद्धांत रुपी विज्ञान, ज्याचा उगम अमेरिका यूरोप मध्ये झाला, जे सांगते की निसर्गातील एकपेशीय अमिबा, आतड्या, बोक्या असलेले प्राणी, जागच्या जागी वाढणाऱ्या वनस्पती ज्यांचे आयुष्य मर्यादित आहे ते सर्व सजीव आहेत, त्यांच्यात जीव आहे, पण लाखो वर्षांपासून जगणारा आणि इतरांना जगविणारा सूर्य, पूर्ण निसर्गाला जगविणारी, संगोपन करणारी पृथ्वी मात्र निर्जीव आहे. अशा या सिद्धांतरुपी विज्ञानाचा सुद्धा मी ऋणी आहो कारण त्यातून निर्माण झालेल्या उपकरण खेळण्याच्या उपयोगातून हे पुस्तक, हे विचार लिहिणे आणि आपल्या पर्यंत पोहचविणे शक्य झाले आहे. (विद्यमान विज्ञान खोटे नाही पण पूर्णत्वाला पोहचलेले नाही, असे माझे मत आहे.)

इंटरनेटचे मायाजाल, गूगल सर्च, ई-मेल सेवानंतर आलेले व्हाट्सअप, फेसबुक ज्यांचे माध्यमातून मला इत्यंभूत माहिती मिळविण्यासाठी मदत झाली.

त्यांचा सुद्धा मी ऋणी आहो ज्यांनी मेहनतीने, अक्कल हुशारीने व्यंगचित्रे रेखाटली आणि छायाचित्रे काढली आणि इंटरनेटवर टाकली आणि मी त्यांच्या परवानगी विना या पुस्तकामध्ये पुरावेरूपी, प्रभावीरूपी छापली. आम्ही त्यांना मोडिफाय केली असली तर ती संपत्ती त्यांचीच आहे. त्यांचे ऋण आम्ही फेडू शकणार नाही.

# अनुक्रमणिका


| क्र. प्रकरण | पृष्ठ क्र. |
|---|---|
| **भाग १. शेतकऱ्यांचे प्रश्न** | |
| १. शेतकऱ्यांना आत्महत्येपासून परावृत्त करण्यासाठी उपाय भाग-१ | १७ |
| २. शेतकऱ्यांना आत्महत्येपासून परावृत्त करण्यासाठी उपाय भाग-२ | २३ |
| ३. कृषीऋषी सुभाष पाळेकर भारतीय शेतकऱ्यांचे दैवत! भाग-१ | २८ |
| ४. कृषीऋषी सुभाष पाळेकर भारतीय शेतकऱ्यांचे दैवत! भाग-२ | ३२ |
| ५. कृषीऋषी सुभाष पाळेकर भारतीय शेतकऱ्यांचे दैवत! भाग-३ | ३६ |
| ६. शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोकण्यास सरकार सक्षम आहे काय? | ४० |
| ७. शेतकऱ्यांच्या आत्महत्येला कारणीभूत कोण? | ४४ |
| ८. शेतकऱ्यांच्या आत्महत्यांपेक्षा हगणदारीचा प्रश्न महत्वाचा आहे काय? | ४८ |
| ९. भारतीय शेतकऱ्यांचे दिवस कसे बदलतील? | ५१ |
| **भाग २. न्यायपालिकेतील बदल** | |
| १. गोऱ्या ब्रिटीशांनी उभी केलेली न्यायव्यवस्था भारतासाठी सक्षम आहे काय? | ५३ |
| २. ही वेळ संविधान आणि न्यायपालिका परिवर्तनाची ! | ५८ |
| ३. जातपंचायतीचे पुनर्वसन करा! पुनर्रचना करा! | ६३ |
| ४. जेष्ठ गावकऱ्यांनो, तमुसवाले, आखाडेवाले लढाईसाठी तयार व्हा! | ६८ |
| ५. २५ पोलिसांसमोर पोलीस स्टेशनमध्ये मंत्र्याचा मर्डर आणि खूनी मोकाट?? | ७३ |
| **भाग ३. भ्रष्टाचार निर्मूलन** | |
| १. दुय्यम निबंधक कार्यालयाची एजंटाना पाच लाख रुपयांची मागणी | ७७ |
| २. भाजपा सरकार भ्रष्टाचार निमूर्लन करेल? हास्यास्पद! | ८० |
| ३. आमचे कर्मचारी आणि अमेरिकेतील कर्मचारी | ८६ |
| ४. पोलिसांचा चोरधंदा हाच त्यांच्यावरील हल्ल्यांना कारणीभूत? | ८८ |
| **भाग ४. शिक्षण पालक शाळा** | |
| १. होय, भारतातील शिक्षक अमेरिकेतील शिक्षकांपेक्षा सरस आहेत! | ९४ |
| २. बुजुर्गांना नवयुवकांपेक्षा तिप्पट मताधिकार द्या! | ९७ |
| ३. तथाकथीत अडाणी आई वडीलांची विद्यार्थी अभ्यासात मदत घेवू शकतात का? | १०२ |





| क्र. प्रकरण | पृष्ठ क्र. |
|---|---|
| ४. जेष्ठ नागरिकांना डबल मताचा अधिकार द्या! ऑनर किलींग कसे थांबविता येतील? | १०५ |
| ५. छडी लागे छमछम वर बंदी नको! | १०७ |
| ६. शिक्षणमंत्री चोंद्रू भगत ? | ११० |
| ७. भारतीय संविधानात बापाला काही किंमत आहे का? | ११३ |
| **भाग ५. प्रसारमाध्यमांची दशा आणि दिशा** | |
| १. ओबामाची भारत भेट आणि प्रसारमाध्यमांचा धांगडधिंगा! | ११८ |
| २. वा रे मीडिया ! | १२१ |
| ३. गरोदर एक आणि प्रसवकळा भलतीलाच! | १२२ |
| **भाग ६. स्वच्छतेची हगणदारी** | |
| १. गावकऱ्यांच्या हगणदारीचा प्रश्न आंतरराष्ट्रीय? | १२४ |
| २. मुख्य अधिकाऱ्यांनी मन लावून संडास साफ करावीत? | १३० |
| ३. गांधीजींच्या नावाने स्वच्छता मोहीम? | १३१ |
| ४. बघा पंतप्रधान मोदींचा स्वच्छ भारत | १३४ |
| ५. टर्रफूस्स यंत्र ज्याचे घरी! आरोग्य तेथे वास करी! भाग-१ | १३५ |
| ६. टर्रफूस्स यंत्र घरोघरी! आरोग्य तेथे वास करी! भाग-२ | १३८ |
| **भाग ७. व्यापार, उद्योग, नोकरी, अर्थव्यवस्था** | |
| १. हिंमत हारलेले सरदार! | १४३ |
| २. लठ्ठ पगाराच्या नोकऱ्या कशा मिळतात? | १४५ |
| ३. तुमची भांडी घासणारी बाई तुम्हाला ऐकते का? | १४८ |
| ४. बेरोजगार असणे म्हणजेच रोजगार? | १५० |
| ५. नोकरी करणे म्हणजे पैसे कमविण्याची कला शिकणे? | १५३ |
| ६. सोन्याच्या दागिन्यात गुंतवणूक! देशासाठी धोक्याची घंटा? | १५८ |
| **भाग ८. भारतीय ग्रामीण खेळ – शंकरपट, कोंबडा झुंज** | |
| १. कोंबड्यांच्या झुंजी कधी सुरु होतील? | १६३ |
| २. बालगोविंदावर बंदी! श्रीकृष्णच्या बालसवंगड्यांवर अन्याय? | १६५ |
| ३. शंकरपटावर बंदी ! शेतकऱ्यांवर घोर अन्याय! शेतकरी विरोधी सरकार? | १६८ |
| ४. विटीदांडूच्या आयपीएल स्पर्धा कधी होतील? | १७२ |

| क्र. | प्रकरण | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| ५. | दहीहंडीवर बंधने टाकणाऱ्या न्यायपालिकेला फिल ह्युजचा मृत्यू दिसत नाही का? | १७४ |
| ६. | दहीहंडी वरील बंधने पैदा करणार भारतात भेकडांची फौज? | १७७ |
| ७. | गारुडी दरवेशी मदारी यांना संरक्षण द्या, प्रोत्साहन द्या. | १८३ |
| **भाग ९.** | **संशोधन अंधश्रद्धांचे** | |
| १. | विज्ञानयुगाचे तथ्य, सत्य आणि अस्त! | १८४ |
| २. | आमच्या अंधश्रद्धा, अंधश्रद्धा आहेत कां? | १९१ |
| ३. | नाशिक कुंभमेळ्याचा फेरफटका! कुंभमेळा एक अंधश्रद्धा? | १९६ |
| ४. | पूजापाठ, होमहवन धार्मिक कार्याचा अभ्यासक्रम संशोधन आणि आरक्षण आवश्यक | १९९ |
| ५. | वाघ दूध पितो तर नाग का नाही? | २०० |
| ६. | विज्ञानयुगाचे अस्तित्व टिकविण्यासाठी गुरू-शिष्य परंपरा अनिवार्य | २०२ |
| ७. | अंधश्रद्धा विरोधकांनी सावधान! | २०३ |
| **भाग १०.** | **आरक्षण आणि आंबेडकरी समाज** | |
| १. | बहुजन समाज कसा एकत्र येवू शकतो का? | २०५ |
| २. | एक अनोखी कविता- माझ्या जयभिम मित्रा! | २०७ |
| ३. | दुसऱ्या बाबासाहेब आंबेडकरांची गरज | २११ |
| ४. | माझ्या जयभिम मित्रांनो ! | २१२ |
| ५. | विनम्र अभिवादन आणि संविधानाचे धिंडवडे!!! | २१४ |
| ६. | भारतीयांची गुलामगिरी कधी संपणार? जाणता राजा शिवाजी महाराजांची आजही गरज? | २१५ |
| ७. | समजा CAA सारखा कायदा श्रीलांका वा ब्रह्मदेशमध्ये लागू केला तर आंबेडकरी वर्गाने सर्पोट केला असता का? | २२० |
| ८. | समजा CAA सारखा कायदा... | २२२ |
| **भाग ११.** | **वनविभाग** | |
| १. | गावात येणाऱ्या जंगली प्राण्यांच्या शिकारीला परवानगी द्या! | २२३ |
| २. | गावकऱ्यांना माकडांचा त्रास? कधी थांबेल? | २२६ |
| **भाग १२.** | **आयुर्वेद योगा व्यायाम** | |
| १. | जवस तेलाच्या कॅप्सुल्स | २२७ |





| क्र. | प्रकरण | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| २. | वयाच्या पन्नासीत थकल्यासारखे वाटत असेल तर रामदेवबाबांची कुस्ती बघा! | २२८ |
| ३. | आमच्या बालवणी डॉक्टर घरी येत होते, आज कां येत नाही? | २२९ |
| **भाग १३.** | **गुलामगिरी जोपासणारे भारतीय** | |
| १. | भारताला स्वतःची राष्ट्रभाषा आहे की नाही? | २३१ |
| २. | अमेरिकेचे निमंत्रण मोदींनी स्विकारणे योग्य आहे काय? | २३२ |
| ३. | भारतीयांनी इंग्रजप्रणित अभ्यासक्रमाला आव्हान द्यावे | २३६ |
| ४. | नागपूर युनिव्हर्सिटीचा लोचा ! | २३८ |
| ५. | पाकिस्थानला मदत करणाऱ्या अमेरिकेचा दौरा? | २३९ |
| ६. | मेक इन इंडिया च्या निमित्ताने! इंग्रजीचा भारतातून सुफडा साफ करा! | २४१ |
| ७. | राज्यकर्त्यांनो, तुम्ही खरोखरच पुढारी आहात का? | २४४ |
| **भाग १४.** | **भारतीय पायाभूत संस्कृतींवर बलात्कार** | |
| १. | वाढत्या बलात्काराच्या घटना? स्त्रियांच्या माडर्न कपड्यांमुळे | २४८ |
| २. | भारतीयांचे दुर्दैव! नरेंद्र मोदींचा सनी लियोन कडून पराभव! | २५० |
| ३. | तिळसंक्रांत की किट्टी पार्टी ? | २५२ |
| ४. | राजकीय पुढाऱ्यांनी कौटुंबिक वा व्यक्तीगत जीवनासंबंधी कायदे बनवावे काय? | २५४ |
| ५. | नवरा-बायकोच्या भांडणात किरकोड मारहाण, शारीरिक हिंसाचार कायदेशीर? | २५७ |
| ६. | पाश्चात्य संस्कृतीचा भारतात उभा धिंगाना | २६० |
| ७. | बलात्काराच्या घटनांना जबाबदार कोण? | २६२ |
| ८. | बालविवाह पद्धतीचा घोळ | २६७ |
| ९. | देव मूर्ख असू शकतो का ? | २७० |
| १०. | चुम्मा चुम्मी इन अमेरिका! | २७६ |
| ११. | लव जिहाद? लव जिहाद म्हणजे काय? | २७८ |
| १२. | काय आहे हा स्नूपगेट? | २७९ |
| १३. | न्यायमूर्ती गांगुलीची अटक ही भारतीय पुरुषवर्गासाठी घातक! | २८० |
| १४. | महिला न्यायाधीशावर झालेल्या बलात्काराचा निषेध! | २८२ |

| क्र. | प्रकरण | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १५. | गर्भपात दरम्यान मृत्यू? आरोपी फरार ! | २८३ |
| १६. | महात्मा गांधीची घोर विटंबना! | २८६ |
| १७. | गोऱ्यांच्या संस्कृतीच्या रक्षणासाठी भाजपकडून पोलीसांचा कडेकोट बंदोबस्त | २८८ |
| १८. | स्त्रियांनी जीन्स पँट का म्हणून घालू नये? भाग-१ | २९१ |
| १९. | स्त्रियांनी जीन्स पँट का म्हणून घालू नये? भाग-२ | २९४ |
| **भाग १५. अवांतर** | | |
| १. | अम्माला जेलमध्ये टाकल्याच्या धक्क्याने चाहत्यांचा मृत्यू | २९७ |
| २. | हिंदूंनी किती पोरं पैदा करावीत? | २९९ |
| ३. | पीएमओ च्या परदेश दौऱ्यावर संघाने अंकुश घालावा! | ३०२ |
| ४. | बाळासाहेब नसल्याची दरी स्पोटात बदलेल का? | ३०५ |
| ५. | राष्ट्रीय ग्रंथ भारतीय संविधान की भगवद्गीता? | ३०८ |
| ६. | ....आणि पंतप्रधान मोदी झाले कन्फ्यूज? | ३१० |
| ७. | डॉ. शिवरकर यांची अटक ही दुर्भाग्यपूर्ण ! | ३१२ |
| ८. | देशभक्ती गीताने भारत काय साध्य करेल? | ३१७ |
| ९. | या घाटावरचे शेतकरी आत्महत्या का करतात? | ३२० |
| १०. | अमेरिकेतील अनुभव, महात्मा गांधीची काठी गायब! | ३२२ |
| ११. | श्रेष्ठ काय? महात्माजींची धोती की मोदीजींचा कोट? | ३२५ |
| १२. | भारतीय लोकशाहीचा गोंधळ | ३२८ |
| १३. | मी नाही त्यातली, कडी लावा आतली | ३३० |
| १४. | दीक्षाभूमी स्मारक जागतीक दर्जाचे आणि हेडगेवार स्मारक गल्लीच्या दर्जाचे! | ३३२ |
| १५. | ललीत मोदींना भाजपची मदत योग्यच? | ३३५ |
| १६. | चंद्रपूर जिल्ह्यातील दारुबंदी, गरीबांवर अन्याय? | ३३८ |
| **भाग – १६ बेबंदशाही मधील निवडणूका** | | |
| १. | जनता जिंकली.. हे सफशेल खोटे.. पैसा जिंकला.. हेच वास्तव खरे.. | ३४० |
| २. | वोटची अपेक्षा ठेवून मिक्सर वाटणे हा स्वातंत्र्यवीरांचा अपमान! | ३४३ |
| ३. | भाजपच्या जेष्ठ नेते चिमूर विधानसभा क्षेत्रातील मिक्सर घटनेची गंभीर नोंद घेणार का? हे तर लोकशाहीचे धिंडवडे! | ३४६ |





| क्र. | प्रकरण | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| ४. | पक्ष कार्यकर्त्यांनो तुम्ही पैशासाठी काम करता का? | ३४९ |
| ५. | ज्या झाडाच्या फांदीवर पंतप्रधान मोदी बसून आहेत ते झाड ते तोडणार का? | ३५१ |
| ६. | गजेंद्र दि. चाचरकर च्या मनातील धगधग भाग-१ भारतीय व्यवस्थेच्या नसानसात भिनलेला भ्रष्टाचार! | ३५३ |
| ७. | गजेंद्र दि. चाचरकर च्या मनातील धगधग भाग-२ कपटाला कपटानेच मारता येते का? | ३५४ |
| ८. | गजेंद्र दि. चाचरकर च्या मनातील धगधग भाग-३ देश गहाण राहिला तरी चालेल पण चोर उचक्क्या आमच्या नेत्यांनाच मतदारांनी निवडून द्यावे- कट्टर प्रस्थापित कार्यकर्ते | ३५५ |
| ९. | गजेंद्र दि. चाचरकर च्या मनातील धगधग भाग-४ मत मागायला आले तर मतदारांनी कट्टर कार्यकर्त्यांना जोड्याने का मारु नये? | ३५७ |
| १०. | चराचरात वास करणारी भ्रष्टाचाराची शक्ती ? | ३५८ |
| ११. | आठवा तुम्ही राष्ट्रसंतांना! | ३६१ |
| १२. | सांगा दादा, मी वोटिंगला का म्हणून जाऊ? | ३६२ |
| १३. | विधानसभा निवडणूक एक दृष्टिक्षेप | ३६३ |
| १४. | डोळे उघड कार्यकर्त्या डोळे उघडे! अरे हे दुसऱ्या तिसऱ्या वर्गाचे गणित आहे रे मित्रा!! | ३६४ |
| १५. | भाजपा कार्यकर्त्यांनो, काँग्रेस कार्यकर्त्यांनो, कृपया लक्षात घ्या! तुम्ही मत मागून जनतेची फसवणूक करीत आहात! | ३६५ |
| **भाग-१७ प्रॉब्लेम्स आणि उपाय** | | |
| १. | भारतीय लोकशाही मधील प्रॉब्लेम्स | ३६६ |
| २. | भारतातील लोकशाही फिक्स करण्यासाठी उपाय | ३६८ |

# १. शेतकऱ्यांना आत्महत्येपासून परावृत्त करण्यासाठी उपाय

## भाग–१




कृपया भगवद्गीतेमधील काही श्लोकांचा अर्थ आणि तात्पर्य समजून घ्या.

अध्याय ५, श्लोक १४.

अर्थ : देहरूपी नगराचा स्वामी, देहधारी जीव हा कर्माची निर्मिती करीत नाही तसेच तो लोकांना कार्य करण्यास प्रवृत्तही करीत नाही किंवा कर्म फलेही निर्माण करीत नाही हे सर्व कार्य प्राकृतिक गुणांद्वारे केले जाते.

अध्याय ६, श्लोक १४.

अर्थ : मानसिक तर्कामुळे उत्पन्न झालेल्या सर्व भौतीक कामनांचा पूर्ण त्याग करून मनाद्वारे सर्व इंद्रियांना सर्व बाजूंनी संयमीत केले पाहिजे.

मन हे चंचल, अस्थीर आणि अत्यंत बलवान आहे. व्यवहारी जगात अनेक विरोधी शक्तींचा सामना कराव्या लागणाऱ्या मनुष्याला मन संयमीत करणे अत्यंत कठीण आहे.

अध्याय ६, श्लोक ६ व इतर.

अर्थ : ज्याने मनाला जिंकले आहे, त्याच्यासाठी मन हे सर्वोत्तम मित्र आहे. परंतु जो असे करण्यासाठी अपयशी झाला आहे, त्याच्यासाठी त्याचे मन हेच परम शत्रू असतो. मनाचा मिथ्या अहंकाराशी संबंध येतो आणि हा मिथ्या अहंकारच भौतीक प्रकृतीवर प्रभुत्व गाजविण्याची इच्छा करतो. त्यामुळे मनाला अशा प्रकारे प्रशिक्षीत केले पाहिजे की, जेणेकरुन ते भौतीक प्रकृतीच्या झगमटाने मन आकर्षित होणार नाही. अशा प्रकारे बुद्धी जिवाचे रक्षण होऊ शकेल. जो मनुष्य



आपल्या मनाला संयमीत करू शकत नाही तो नेहमी सर्वात मोठ्या शत्रू बरोबरच राहत असतो.

वास्तविक योग्याभ्यास म्हणजे निसर्ग निर्मात्याच्या संतुलनाशी निसर्गातील शक्तींशी संतुलीत संबंध स्थापित करणे, त्याच्या आज्ञांचे पालन करणे. काळजीपूर्वक मनाला संयमीत केले पाहिजे. मनाने/त्याने आकांश आणि संग्रहाच्या किंवा स्वामित्वाच्या आहारी जाऊ नये.

**प्रखर स्वामीत्वाची भावना आत्महत्येचा विचारांना कारणीभूत आहे**

प्रखर स्वामीत्वाची भावना आत्महत्येचा विचारांना कारणीभूत आहे. कोणतेही कर्म, कार्य, उलाढाल करताना, आर्थिक उलाढाल करताना आपली इंद्रिये स्वभावगुणानुसार आपल्याकडून करवून घेत आहेत ही भावना लक्षात घेणे महत्वाचे आहे. या सृष्टीत आपण एक आंशिक जिवात्मा आहोत. आपण मानव जीव म्हणून मन बुद्धी आणि इंद्रिय यांचा बनलो आहोत. जेव्हा कोणी आत्महत्या करतो तेव्हा तो मनाच्या आधीन झाला असतो. आत्महत्या करणाऱ्याच्या मनाने वा बुद्धीने लढाई हारलेली असते. मनाने वा बुद्धीला अधीन झाल्याने आपले शरीर संपवितो. खरं तर आर्थिक उलाढालीची लढाई मनुष्य जीवासाठी गौण असते. आत्महत्या करताना खरं तर व्यवहारिक आर्थिक लढाई हारलेली नसते तिला पुढेही वाव असतो पण शरीर संपविल्याने व्यवहारिक लढाई आत्महत्या करणाऱ्याने अर्धवट सोडलेली असते. मन जिंकणे फार महत्वाचे असते.

वरील संदर्भ : भगवद्गीता अध्याय ५, श्लोक ५,६ अध्याय ६/श्लोक ६.

**भारताला आध्यात्मिक गुरूंची गरज...**

भगवद्गीता सांगते, मनुष्य हा सर्व परिस्थितीत सुखी असला पाहिजे. कधी कधी स्वादिष्ट रूचकर जेवण मिळेल तर कधी मिळणार नाही, कधी कंद, मुळे, पाला, पाचोळा गवताचा रस खाऊन जगावे लागेल. पण तो तृप्त असेल. कधी कधी वृक्षाखाली राहील वा कधी उघड्या आकाशाच्या छत्रछायेखाली राहील. कधी पडक्या, पाऊस आला तर गळणाऱ्या झोपडीत, तर कधी राजवाड्यासारख्या मोठ्या इमारतीत राहील. त्याला कशाचेही अती आकर्षण नसावे. कधी उन्हातान्हात माती खोदण्याचे काम करतील तर कधी एसी मध्ये थंड हवा खात आराम करतील.

योगी मनुष्य, तो आपल्या निश्चयामध्ये किंवा ज्ञानामध्ये स्थिर असतो.

असा मनुष्य हा सर्वच परिस्थितीमध्ये सुखी होतो. सदैव कुसंगापासून मुक्त असतो. मनुष्याची कधी कधी स्तुती केली जाते किंवा निंदा केली जाते, मानव समाजाचा स्वभावच तो आहे. योगी स्थितप्रज्ञ मनुष्य हा नेहमी लौकीक स्तुती निंदा सुखदुःख इत्यादिंच्या पलिकडे असतो. तो अत्यंत सहनशील असतो. प्राकृत भोगांना तुच्छ लेखतो.

## नौकरदार वर्ग आणि साधक आध्यात्मिक गुरू

स्वतः नौकरदार वर्ग पैसे कमविण्यात, नौकरी करुन पगार कधी मिळेल या चिंतेत असतो. असा सरकारी, निमसरकारी, कर्मचारी वर्ग आत्महत्येचे विचार मनात आणणाऱ्या शेतकऱ्यांना समुपदेशन मानसोपचार करणे शक्य नाही. शासनाने नियुक्त केलेले समुपदेशन मानसोपचार तज्ञ निःस्वार्थ कर्माचा सल्ला देवू शकतात? आत्महत्येचे विचार मनात आणणाऱ्या शेतकऱ्यांना निःस्वार्थ निरपेक्ष कर्माचा सल्ला द्यावा लागतो तेव्हा ते आत्महत्येपासून परावृत्त होतील. सरकारी नियुक्ती केलेल्या पगारी कर्मचारी मानसोपचारांना शेतकऱ्यांचे समुपदेशन शक्य नाही. आपण आपल्या कुटूंबीयांना योग्य सुविधा पुरवू शकत नाही, मी कोणाला कसे तोंड दाखवू असे जे शेतकऱ्यांच्या हृदयात संशय उत्पन्न होतात त्यावर आध्यात्मिक गुरूच, साधक वर्ग समूळ नष्ट करू शकतो. आध्यात्मिक गुरूंची फळी उभी करणे आवश्यक आहे.

## अमेरिकेतील कर्जबाजारी संस्कृती

गेल्या शतकात ते काही बदलाचे वारे आले त्यात कर्ज काढून धंदा करण्याच्या वृत्ती फोफावल्या. सरकारही कर्ज घेते, नागरिकही घेतात आणि आर्थिक उलाढालीतून नफा मिळविण्याचा प्रयत्न करतात.

अमेरिकेची युरोपची कर्जबाजारी संस्कृतीच बनली आहे. अमेरिकन माणसावर दरडोई ७०००० डॉलरचे कर्ज आहे. त्यांची संस्कृती कर्ज वाली आहे. कर्ज घेतले फेडू शकले नाहीत आणि कर्ज देणाऱ्याने परतफेडीचा तगादा लावला तर त्याचीच मुंडी छाटतील. भारतीय समाज तसा नाही आहे. भारतीय समाज जास्त करून श्रमजीवी आहे. कर्ज देणाऱ्याचाही पैसा अंग मेहनतीचा असतो. कर्ज घेणाऱ्याची आर्थिक उलाढाल अयशस्वी झाली तर कर्ज देणारा नगादा लावतो. वरून भारतीय संस्कृती स्वाभिमानी आहे. स्वतःच्या डोक्यावर कर्ज असणे भारतीयांना सहन होत नाही, दुसऱ्यांच्या कर्जाखाली झुकने, कोणाचा शब्द ऐकून घेणे ही आपली संस्कृती नाही. स्वतःची ऐशीतैशी करतील पण कर्जरूपी



ओझे म्हणजे त्यांना अपमान वाटतो. त्यामुळे भारतीयांनी कर्ज घेवून आर्थिक उलाढाल करण्याचे शक्यतो टाळावे. कर्ज घेणारा सुखी समाधानाने जगणे शक्य नसते. कारण कर्ज देणारा सुखी नसल्याने तो कर्ज बुडव्याला मनस्ताप देत असतो. दूविग्न करतो. आपल्या भारतीय समाजाला कर्ज घेवून बेशरमपणे जगणे शक्य नसते म्हणून शक्यतो कर्जापासून दूर राहिलेले ठीक, असेच म्हणावे लागेल.

## प्रसारमाध्यमांची भूमिका

शेतकऱ्यांच्या आत्महत्येसाठी प्रचलित प्रसारमाध्यमांची भूमिका भयंकर कारणीभूत आहे. शेतकऱ्यांनी आत्महत्या केली तर गवगवा करून इकडे तिकडे दोषारोप करीत राहतात. बऱ्याचशा पत्रकारांचा लेखकांचा अर्धवट अभ्यास असल्यामुळे असे घडत असावे. बेशिस्त आणि स्वार्थी वृत्ती प्रसारमाध्यमांमध्ये फोफावली आहे, एक दुसऱ्यांमध्ये तारतम्य नाही. खचलेल्या शेतकऱ्यांना आत्महत्येच्या विचारांपासून परावृत्त करण्यापेक्षा त्यांना भडकविण्याचे काम करतात. प्रत्यक्ष अप्रत्यक्ष वा कळत नकळत विद्यमान प्रचलीत प्रसारमाध्यमे स्वतःच्या स्वार्थासाठी शेतकऱ्यांना आत्महत्या करण्यासाठी प्रवृत्त करतात असे ठामपणे म्हणता येईल. विरोधी पक्षवाले, आताचा सत्तारूढ, कालचा विरोधी उलट पालट कसेही घेतले तरी सर्व लोक स्वतःच्या स्वार्थासाठी झगडे भांडण वाढवून पिडीतांचे बळीची संख्या वाढविण्यातच समाधान मानते.

प्रचलित प्रसारमाध्यमांचा तसेच विरोधी बाकावर बसणाऱ्या नेत्यांचा प्रप्रोगंडा ऐकून लोकही एक दुसऱ्यांला भडकविण्याचे काम करतात. दिल्ली येथे केजरीवालच्या आप पार्टीच्या सभेत एका शेतकऱ्याने केलेली आत्महत्या हे सभेत आलेल्या लोकांच्या भडकविण्यामुळे झाली हे सत्य झाकता येत नाही. विरोधी बाकावर बसणाऱ्या नेत्यांचे विचार, प्रचलीत प्रसारमाध्यमांचा उलटा गवगवा यामुळे समाजात सौहार्दाचे वातावरण गढुळ होऊन अप्रत्यक्षपणे शेजारीपाजारी आजूबाजूचे लोकच दुर्बल मनाच्या लोकांना आत्महत्येसाठी प्रवृत्त करीत आहेत असे दिसते.

## स्वतःच्या मुलाबाळावर तुमचा पूर्ण मालकी हक्क नाही???

निसर्गाने निर्मिलेल्या नर आणि मादा या काम इच्छापूर्तीसाठी एकत्र येतात? त्यांच्या मिलनातून नवीन जीवाचा जन्म होतो. या निसर्गातील जीव इच्छा पूर्तीसाठी एकत्र येत नसून अशा भौतीक क्रिया घडून येतात हे सुद्धा तितकेच खरे आहे.

ज्या बाळाला तुम्ही जन्म घातलाय हे बाळ तुमचे आहे का? त्यावर तुमचा पूर्ण अधिकार आहे का? तुमचे शुक्राणू हे तुमच्या शारीरिक क्रियांपासून झाले आहेत. या शारीरिक क्रियांचा निर्माता वा मालक हा निसर्ग निर्माता आहे. तुमच्या शुक्राणूच्या मिलनामुळे जीवाची बीज निर्मितीची सुरवात झाली, त्यामुळे भ्रूण निर्मिती झाली, गर्भात बाळ मोठे झाले.

**या शुक्राणूपासून बाळ निर्माण करण्याची क्रिया कोणी केली?**

बाळ जेव्हा वाढत जाते तेव्हा अन्न वस्त्र निवारा या सुविधा आपण बाळाला, आपल्या मुलांना उपलब्ध करून देतो. पण बाळाची शारीरिक मानसिक वाढ ही पूर्णपणे तुमच्या हातात असते का? मुलाचे शारीरिक वजन, त्यांचा अवयवांचा आकार, शारीरिक पेशींची संख्या दिवसेंदिवस कोण वाढवित असतो?

या निसर्गनिर्मित शारीरिक क्रियांचा निर्माता वा मालक कोण आहे? तुमच्या स्वतःच्या बाळावर मुलावर तुमचा पूर्ण मालकी हक्क नाही. मग आपण आपल्या मुलाला, कुटूंबियांना मनासारख्या सुखसुविधा दिल्या नाहीत म्हणून तुम्ही एकटेच जबाबदार नाही.

**कर्ज माफ करून शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबणार आहेत का?**

तुम्ही जे शेतीत बीज पेरता त्या बीजाचा निर्माता कोण आहे? त्या छोट्याशा बी पासून पाणी माती ऊन उष्णतेचा उपभोग घेवून बीजाचे अंकूर आणि अंकूराचे रोपटे घडविणाऱ्या क्रियेचा मूळ मालक कोण? ऊन वारा पाऊन पाणी याचा मूळ मालक कोण? बीज वा रोपट्याला लागणाऱ्या ऊन वारा पाऊसच्या पुरवठा प्रमाणावर तुम्ही कंट्रोल करू शकत नाही. मग तुमचे उत्पन्न १०० टक्के तुमच्या मनासारखेच झाले पाहिजे अशी अपेक्षा तुम्ही कां म्हणून ठेवावी.

तुम्ही घेतलेल्या कर्जाची परतफेड झाली नाही तर तारण ठेवलेले घर, विटा माती सहीत, तुमची जमीनीचा कब्जा कर्ज देणारी संस्था वा सावकार घेईल म्हणून तुम्हाला दुःख होत का? या विटा माती घर, जमीनीच्या भूखंडावरील मातीचा, या पृथ्वीचा मालक ओनर कोण आहे? कोणी पृथ्वी निर्मिलेली आहे? तुम्ही निर्माण केली का?

भगवद्‌गीता वा निसर्गनिर्माता हे तुम्हाला मुळीच सांगत नाही की तुम्ही तुमची लाइफस्टाईल बदलण्यासाठी प्रयत्न करू नका. तुम्ही देशासाठी, समाजासाठी, कुटूंबीयांसाठी तुमच्यासाठी भौतीक सुविधा मिळविण्यासाठी स्पर्धा करू नका,



मिळविण्यासाठी जीव ओतून प्रयत्न करू नका. तुम्ही योजीलेले कर्म वा तप जरूर करा पण पूर्णपणे अधीन होऊ नका की तुम्ही आत्महत्या करून शरीर संपवून टाकावे. या जगात जन्मलेल्या प्रत्येक प्राणीमात्राने संतुलितपणे सर्व विकारांचा उपभोग घ्यावा अशी शिकवण आध्यात्म देतो. असे मान्य करावे लागेल.

**उपाय???**

भारतीय संविधानमधील आर्टीकल २४ नुसार शाळेमध्ये धार्मिक शिक्षण देता येत नाही. १९५० आणि त्या काळात बुवाबाजी, तंत्रमंत्र, कर्मकांडाचे प्रचंड थैमान वाटल्याने धार्मिक शिक्षणाचे महत्व कोणी लक्षात घेतले नसावे. पण विद्यमान विज्ञान युगात स्पर्धा वाढल्याने दुःख आणि निराशेमध्ये मानव फेकल्या गेल्यामुळे भगवद्‌गीतेसारख्या आध्यात्मिक ग्रंथाचे शिक्षण संतुलित प्रमाणात शाळा कॉलेजात नियमित करणे फार आवश्यक आहे. भारतीय संविधानातील आर्टीकल २८ मध्ये दुरुस्तीची अत्यंत आवश्यकता आहे.

ज्या भारतीय आध्यात्मिक गुरूंनी अमेरिका युरोप सारख्या देशात यशस्वीपणे आपले प्रस्थ उभारले आहे, ज्यांचा प्रचंड शिष्यवर्ग आहे त्यांच्या मार्गदर्शनातून नवीन अभ्यासक्रमाची जुळवणी सहज करता येईल. हा अभ्यासक्रम देव, धर्म स्पेसिफीक वाटणार नाही, याची दक्षता सुद्धा घेता येईल. पण भारतातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबविण्याची साधक आध्यात्मिक गुरूंची दिशानिर्देश असलेली फळी उभारणे अती आवश्यक आहे....

( ३ मार्च २०१६, अभयराज्य )

# २. शेतकऱ्यांना आत्महत्येपासून परावृत्त करण्यासाठी उपाय

### भाग–२

**देव तुमच्या व्यक्तीगत मदतीसाठी धावून येत नाही???**



संपूर्ण भगवद्‌गीता जरी चाळली तरी भगवान श्रीकृष्ण कुठेच बोलत नाहीत की, मी कोणाची व्यक्तीगत मदत करतो वा कोणाच्या धावून जातो.

अप्रत्यक्षपणे गीता सांगते की, देव तुमच्या व्यक्तीगत मदतीसाठी धावून येत नाही. ज्याचे त्यालाच सांभाळून घ्यावयाचे असते. नाहीतर भगवान श्रीकृष्ण अर्जुनाचे मागे युद्ध करण्यासाठी कशाला लागले असते?

**कृपया भगवद्‌गीतेमधील काही श्लोकांचा अर्थ आणि तात्पर्य समजून घ्या.**

नियत कर्म करीत रहावे. नियत कर्माचे पालन केलेच पाहिजे. कर्म केल्याशिवाय शरीराचा निर्वाह होऊ शकत नाही. फलाची आसक्ती मधून आत्महत्या हे नियत कर्मामध्ये येत नाही. नियतीच्या विरूद्ध येते. अध्याय ३, श्लोक ८.

इंद्रिये मन आणि बुद्धी ही या कामाची निवासस्थाने आहेत. यांच्या द्वारे काम सुद्धा ज्ञानाला आच्छादीत करतो आणि त्याला मोहीत करतो. अध्याय ३, श्लोक ४०.

अध्यात्मीक बुद्धी, अध्यात्मीक शक्ती द्वारे मनाला स्थीर केले पाहिजे. आपण स्वतः भौतीक इंद्रिये, मन आणि बुद्धी यापेक्षा श्रेष्ठ आहोत. अतृप्त शत्रू वर विजय मिळविला पाहिजे. अध्याय ३, श्लोक ४२.



द्रव्ययज्ञापेक्षा ज्ञानयज्ञ श्रेष्ठ आहे. सर्व कर्मयज्ञाचे पर्यावसन दिव्य ज्ञानामध्ये होते. अध्याय ३, श्लोक ३३, ३४. अध्यात्मीक गुरूकडे जाऊन सेवा कर, नम्रपणे प्रश्न विचार. आत्मज्ञानकारी व्यक्ती तुला ज्ञान प्राप्त करू शकतात कारण त्यांनी तत्व जानलेले असते. कर्मफल अपेक्षीत न मिळाल्याने जीवच संपवायला निघालेले लोक, बदनामी इज्जतीला घाबरून आयुष्य संपवित आहेत.

आत्म साक्षातकारी जीवांकडून वास्तविक ज्ञानाची प्राप्ती झाल्यावर तू पुन्हा मोहीत होणार नाहीस. श्लोक ३५, अध्याय ४.

आपण सर्व प्राणीमात्र निसर्गाचे अंश आहोत. नियत कर्म करीत राहायला पाहिजे, आयुष्य जगणे हा आपला अधिकार आहे. वास्तविक ज्ञानाची प्राप्ती झाल्यावर तुमच्यावर कितीही संकटांचा डोंगर कोसळू दे, दिव्य ज्ञानरूपी नौकेमध्ये आरूढ होऊन दुःखरूपी महासागर पार करण्यास समर्थ होईल. अध्याय ४, श्लोक ३६.

ज्याप्रमाणे प्रज्वलित अग्नी सरपण भस्मसात करून टाकतो त्याप्रमाणे हे अर्जूना ज्ञानरूपी अग्नी सर्व प्राकृत कर्मबंधने भस्मसात करून टाकतो.

यज्ञ केल्याशिवाय मनुष्य या लोकांमध्ये वा जीवनामध्ये कधीच सुखप्राप्ती करू शकत नाही. कर्मफलाचा त्याग, दिव्या ज्ञानाद्वारे संशय नष्ट होते. माझे चूक की बरोबर या संशयात गुरफटला जातो. अज्ञानामुळे जे ह्रदयात संशय उत्पन्न होतात ते ज्ञानरूपी शस्त्राने छाटून टाकले पाहिजेत.

मन संयमीत करणे, मनाला जिंकणे फार महत्वाचे! भौतीक प्रकृतीच्या झगमगाटाने आकर्षित होऊन स्वतःची अधोगती होऊ शकते. मन भौतीक अस्तीत्वांमध्ये गुंतत जातो. अध्याय ५, श्लोक ५ व ६.

अविनाशी दिव्य जीवाला ब्रह्म म्हटले आहे, त्याच्या नित्य स्वभावाला आध्यात्म असे म्हणतात. जीवांच्या प्राकृत देहाच्या उत्पत्तीस कारणीभूत असणाऱ्या कार्यांना कर्म वा सकाम कर्म म्हणतात. अध्याय ८, श्लोक ३.

कर्म बंधने आणि कर्म बंधंनाच्या शुभाशुभ फलांपासून सुटका करण्यासाठी देवाला सर्व अर्पण कर. अध्याय ९, श्लोक २७/२८.

जो मिथ्या अहंकारापासून मुक्त आहे, स्वतःला स्वामी समजत नाही, जो सुख दुःखामध्ये समभाव राखतो, जो क्षमाशील, सदैव तृप्त, आत्मसंयमी आहे आणि आपले मन व बुद्धी माझ्यावर स्थीर करून जो दृढ निश्चयाने भक्तीमध्ये

संलग्न झालेला आहे तो मला अत्यंत प्रिय आहे. अध्याय १२, श्लोक १५.

ज्याच्यामुळे कोणीही उद्विग्न होत नाही आणि जो इतर कोणामुळे उद्विग्न होत नाही, जो हर्ष आणि दुःख, भय आणि चिंता यामध्ये समभाव राखतो तो मला अत्यंत प्रिय आहे. आध्यात्मीक साधनेमुळे भक्त इतका प्रगत झालेला असतो की तो कोणत्याही बाह्य उपद्रवांनी क्षुब्ध होत नाही. इतरांनी जर भक्ताला त्रास दिला, परिस्थितीने त्रास दिला तर उद्विग्न होत नाही.

असा मनुष्य सदैव निसर्ग निर्मात्याला भावनाभावित असल्याने भौतीक परिस्थितीमुळे तो विचलीत होत नाही.

**दुःखाची कारणे :**

मनुष्याला जेव्हा आपल्या शरीरासाठी इंद्रियतृप्तीसाठी म्हणजेच कुटूंबीयांसाठी काही आढळते, काही सकारात्मक घडते तेव्हा तो आनंदी होतो. परंतु आपल्याकडे नसणारी इंद्रियतृप्तीची साधने इतरांकडे पाहिल्यावर तो दुःखी होतो आणि इतरांचा द्वेष करू लागतो. द्वेष केल्यामुळे शत्रू तयार होतात. जेव्हा आपल्या शत्रूकडून प्रतिकाराची अपेक्षा असते तेव्हा तो भयभीत झालेला असतो. तेव्हा तो यशस्वीपणे काही करू शकत नाही. तेव्हा तो खिन्न होतो. मनुष्याने विकारांच्या पलिकडे असावे लागते.

मानापमान, सुख दुःख स्तुती निंदा यामध्ये समभाव राखतो. सदैव शांत काही मिळेल त्यात संतुष्ट असणे हे खूप महत्वाचे आहे. अध्याय १२, श्लोक १८,१९.

अध्याय १८, श्लोक ६,७,११. नियत कर्मांचा काधीही त्याग करू नये. सर्व कर्मे कोणत्याही प्रकारची आसक्ती वा फलाच्या अपेक्षेविना केली पाहीजेत. ही कर्मे कर्तव्यबुद्धीने केली पाहिजेत. देहधारी जीवांना सर्व कर्माचे त्याग करणे खरोखर शक्य नाही.

अध्याय १८, श्लोक १३,१४,१५. मानव कर्म करतो त्याला पाच करणे आहेत. कर्माचे स्थान (शरीर), कर्ता म्हणजे जीव, विभिन्न इंद्रिय, अनेक प्रकारचे प्रयत्न आणि शेवटी परमात्मा! शरीराने, वाणीने किंवा मनाने न्याय किंवा त्याच्या विपरीत असे काही कर्म मानव करतो.

**आत्महत्या म्हणजे शास्त्रीय, निसर्गनिर्मीत अवहेलना आहे.**

भावी बंधनांची पर्वा न करता एक हिंसा आहे ही तुमच्या कुटूंबीयांना क्लेश देण्याकरीता करीत आहात. हे कर्म शास्त्रशुद्ध कर्म नाही.



स्वतःला तुम्ही बंधनात अडकविता म्हणून तुमच्या मनात आत्महत्येचे विचार येतात, पण तो मोक्षाचा मार्ग नाही.

भ्रम आणि अंधकाराच्या प्रभावाने तुमची बुद्धी धर्माला अधर्म आणि अधर्माला धर्म समजत आहे.

आपण आपल्या जबाबदाऱ्या पूर्ण करत नाही म्हणून आत्महत्या करून शरीर संपवितो पण त्या जबाबदाऱ्या दुसऱ्यावर ढकलतो. त्यावर ज्या जबाबदाऱ्या तुम्ही तुमच्या समजता त्या खरोखर तुमच्या आहेत का?

अध्याय १८, श्लोक ४१. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शुद्र यांचे वर्गीकरण हे प्राकृतिक गुणांद्वारे उत्पन्न त्यांचा स्वभावानुसार केले आहे. आताच्या विद्यमान व्यवसाय प्रणालीनुसार कामाचे वर्गीकरण बदलू शकते. विद्यमान व्यवसाय प्रणालीनुसार आपल्या कामावर आपण फोकस करायला पाहीजे. त्या काळी उपलब्ध असलेली व्यवसाय, लोक काय करू शकतात, साधणे कोणती आहेत त्यावेळीची लोकांची मानसिकता बघून व्यवसाय वर्गीकरण विषद केले आहे.

कृषी, गौरक्षा आणि व्यापार हे वैश्यांचे स्वभावजन्य कर्म आहे. काळानुसार व्यवसायाचे स्वरूप बदलू शकते. अध्याय १८, श्लोक ४४.

आत्महत्या करणे हे सुद्ध कर्मच आहे पण हे निसर्ग निर्मात्याच्या निर्देशानुसार नाही, मार्गभ्रष्ट करणारे आहे. निसर्गनिर्मात्याचे आदेश न पाळणे म्हणजे एक अहंकारच म्हणता येईल. मोहवश होऊन निसर्ग निर्मात्याच्या आज्ञेला डावलून आपल्या शास्त्रशुद्ध कर्मापासून पळ काढून भयभीत होऊन आत्महत्या करणे म्हणजे परमधाम आणि दिव्यशांती मुकने होय.

कृषी गोरक्षा इतरही कोणत्याही शक्य असलेल्या कामाची फरफट चालू ठेवणे हेच खरे शेतकऱ्यांसाठी, तुमच्यासाठी तप आहे.

अध्याय १८, श्लोक ५८,५९. आत्महत्या न करता आपले निसर्गनिर्मित उपजत स्वभावजन्य इतरही कोणते शक्य असलेले काम करून रहाट गाडगे चालू ठेवणे प्राकृतीक गुणांद्वारे उत्पन्न आपल्या आवाक्यातील इतरही कोणते काम करून आपले व्यवहारिक युद्ध चालू ठेवणे यातच असामान्य सामर्थ्य आणि नीतीसत्य सामावलेले आहे.

**ह.प.भ. पदवी असलेले महाराज??**

काही ह.प.भ. पदवी असलेले महाराज सरकारवर टिका करून शेतकऱ्यांसाठी

अश्रू गाळत असतात, अप्रत्यक्षपणे शेतकऱ्यांना आत्महत्येसाठी प्रवृत्त करतात. यांना कोणी ह.प.भ. पदवी दिली हेच कळत नाही. त्यांनी भगवद्गीतेचा अर्थ वा तात्पर्य वाचला की नाही तेच कळत नाही. चांगल्या अभ्यासू महाराजांची गरज आहे, जे शेतकऱ्यांना आत्महत्येपासून परावृत्त करतील. जे महाराज चांगले किर्तनकार, भजन, गायक, वक्ते आहेत, लोकांना खिळवून ठेवतात, गर्दी खेचतात. अशा महाराज लोकांना एकत्र घेवून सरकारने रूपरेषा ठरविली तर चांगले होईल. खेड्यापाड्यातले प्रसिद्ध किर्तनकार हे काम हातात घेवू शकतात?

**भारतीय संविधानात**


पगार घेवून मनमर्जीने काम करणाऱ्या नौकरदार वर्गाला जरूर किंमत आहे. पण स्वतःचे संसार सोडून, स्वार्थ सोडून जो साधक वर्ग समाज जागृती वा समाजकार्य करतो त्यांना संविधानात जागा दिसत नाही. डेडीकेटेड लोकांनी टीम लोकांच्या माध्यमातून उभी केली जाऊ शकते.

( २४ मार्च २०१६, अभयराज्य )



# ३. कृषीऋषी सुभाष पाळेकर भारतीय शेतकऱ्यांचे दैवत!

## भाग–१



भिसीच्या आदर्श जनता विद्यालयात आम्ही पाचव्या वर्गात प्रवेश घेतला. विज्ञान विषय आमच्या आवडीचा! गोरे गोमटे सुंदर सुदृढ दिसणारे श्री मधुकर चौधरी सर आम्हाला शिकवायचे त्रूांनी जीवशास्त्र या विषयातील वनस्पतीशास्त्र शिकवितांना वनस्पतीचे वर्गीकरण शिकविले तर सर्व झाडांचे नावे ही आपल्याकडील, आपल्या परिसरातील नव्हती. मला प्रश्न पडला की ही आमची आंबा, चिंच, वड, करंजी, बाभूळ, चिंकू, निलगिरी अशी मोठी मोठी वृक्ष, धान, गहू, ज्वारी, सोला, दोडका, काकडी, टमाटर, वांगे अशी कामाची झाडे सोडून हे शिकवित काय आहेत? आमच्या पाहनी देखलीतली यांना झाडे शिकविता येत नाही का?

चौथा वर्गात भिसीच्या महात्मा गांधी शाळेत असताना मी शिष्यवृत्ती परीक्षेत मी जिल्ह्यातून पहिला होतो. जिल्हातून प्रथम क्रमांक याचा अर्थ जिल्ह्यातील सर्व विद्यार्थ्यांच्या तुलनेत वाचन, लिखान, अभ्यास, शैक्षणिक सबळता इतर सर्वांपेक्षा सरस होती. चौधरी सरांनी गावची झाड सोडून माहीती नसलेली, न पाहलेली भलतीच झाडांचा अभ्यासक्रमात का उल्लेख करावा हा प्रश्न त्यावेळेस साहजिकच उत्सुकतेपोटी बोचत होता.

आठव्या वर्गात असताना विज्ञान मंचच्या परीक्षेतून विशेष प्राविण्य म्हणून निवड झाल्याने आनंदवन वरोरा येथे आनंद निकेतन महाविद्यालयातील हुशार विद्यार्थ्यांसाठी असलेला शिबीर अटेंड केला. जार्जूले म्हणून महाविद्यालयात

अध्यापक होते. त्यांच्या बोलण्यातून लष्क्षात आले की, आपल्या अभ्यासक्रमाची पुस्तके पुणे येथील एक मंडळ प्रकाशित करते. प्रश्न होता की आमच्या गावाकडील झाडे सोडून ही भलतीच झाडे जीवशास्त्रात का शिकवावी? पुण्यातील काही, राज्यातील इतर तज्ञ हे पुस्तकक अभ्यासक्रमात बनवितात असे वरोऱ्यात विज्ञान मंच शिबीरच्या माध्यमातून आमच्या लक्षात आले.

काही वर्षानंतर अमेरिकेत जायचा योग आला. काही वर्षाच्या अमेरिकेतील वास्तव्यामध्ये, तेथील संशोधकांचा जवळून अभ्यास करण्याचा योग आला. त्यावेळेस आमच्या लक्षात आले की चौधरी सरांनी पाचव्या वर्गात शिकविलेली, अभ्यासक्रमात उल्लेखिलेली झाडे ही अमेरिकेतील होती. जो अभ्यासक्रम चौधरी सरांनी शिकविला तो मुळात, त्याचा उगम अमेरिकेत होता. मन सुन्न होत होते. आमच्याकडील भारतातील पुस्तक लिहिणारे तज्ञ संशोधक हे सर्व कॉपीबहाद्दर अभ्यासक्रमाचे प्रोडक्ट आहेत. आमचा स्वतःचा भारतीयांचा अभ्यासक्रमच नाही?

इंजीनियरिंग, वैद्यकीय, एमबीबीएस, व्हेटरनरी, कृषीविज्ञान आणि आर्ट, कामर्सचे सुद्धा आमच्या देशात शिकविल्या जाणाऱ्या अभ्यासक्रमाचा उगम पाश्चिमात्य देशात होतो. मग आमचे अभ्यासक्रम कधी तयार होतील? हे पाश्चिमात्य देशात लबाड लोक आम्हाला आतापर्यंत मुर्ख बनवित आले. आता आम्हाला शहाणे बनायची वेळ कधी येणार?

### सुभाष पाळेकरः स्वतः एक अग्रगण्य कृषी विद्यापीठ

या जगात आपण पाश्चिमात्याच्या संशोधकांच्या संशोधनाने इंमप्रेस्ड आहोत. आपल्यालाही आता फार मोठा सायंटीस्ट मिळाला आहे कृषीऋषी सुभाष पाळेकर हे त्या शास्त्रज्ञाचे नाव आहे. सुभाष पाळेकर हे स्वतःमध्येच एक मोठे जागतीक दर्जाचे कृषी विद्यापीठ आहे. सुभाष पाळेकर म्हणजे पाश्चिमात्य कृषी तंत्रज्ञानाला टक्कर देणारे वन मॅन शो विद्यापीठ आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर चालणारे सल्फेट, इन्सेक्टीसाईड, रसायनांच्या इंडस्ट्रीचे षड्यंत्र पाळेकरांनी आपल्या यशस्वी संशोधनातून निदर्शनास आणून दिले आहे. बहुराष्ट्रीय कंपण्या या पैसा कमवायला निघाल्या आहेत. सर्व पेपरबाजी जाहिरातीमध्ये एक्सपर्ट आहेत. सर्व शेतकऱ्यांना ते गुमराह करतात, भारतातील कॉपीबहाद्दर कृषी विद्यापीठे त्यांना साथ देतात. कारण आजापर्यंत आपले स्वतःचे संशोधनसुद्धा नव्हते ना!

ग्लोबलायसेशन आणि जागतीकीकरण हे भ्रष्टाचार आणि शोषणावर आधारित आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रचंड पैसे कमविण्याचा उद्देश ठेवून सल्फेट



इन्सेक्टीसाईडच्या कंपन्यांनी आपल्या शेतकऱ्यांना रसायनांची सवय लावली. हे विद्यमान कृषी विज्ञान नसून अज्ञान आहे. हे श्री सुभाष पाळेकरांच्या दीर्घ संशोधनातून सिद्ध होते.

जर कृषी महाविद्यालये म्हणतात की, झाडाला खताची आवश्यकता असते तर मग जंगलातील झाडे, गर्द राई वर्षानुवर्षे सबळपणे कशी उभी आहे. त्यांना सल्फेट कोण टाकते? सल्फेट पासून झाडांना कसा फायदा होतो त्याची खरोखरच आवश्यकता आहे का? जमीनीमध्ये असणारी अन्नद्रव्ये कशी कां संपलीत? याचा सखोल, दीर्घ आणि यशस्वी अभ्यास सुभाष पाळेकरांनी केला आहे. झिरो बजेट नैसर्गीक शेती हा कॉन्सेप्ट त्यांनी विकसीत केला आहे. आज जवळपास ४० लाख शेतकरी यशस्वीपणे ही नैसर्गीक शेती करीत आहेत. रसायने वापरीत नाहीत.

रासायनिक शेतीच्या उत्पन्नामध्ये अन्नधान्यामध्ये ही रसायनाचे घटक मिक्स होतात आणि आपल्याला विषारी अन्न खावे लागत आहे. रासायनिक खताचा वापर न करता पर्यायी नैसर्गिक जीवनामृतचा शोध सुभाष पाळेकरांनी विकसीत केला. रासायनिक खतांमधून जितके उत्पन्न होते त्यापेक्षाही पटीने उत्पन्न यशस्वीपणे झिरो बजेट नैसर्गीक शेतीमधून काढत आहेत. भारतात होणाऱ्या लोकसंख्येच्या फुगवट्याला हाताळण्यासाठी जो प्रचंड अन्न पुरवठा लागू शकतो ते झिरो बजेट नैसर्गीक शेतीमधून सहज शक्य आहे. भारताची लोकसंख्या २०५० मध्ये १६१ कोटी होईल असा अंदाज आहे. आज आपल्याकडे ३५ कोटी एकर जमीन आहे. इतक्या लोकसंख्येला झिरो बजेट नैसर्गीक शेती शिवाय पर्याय नाही. खरं तर औषध हा उपाय नाहीच! प्रतिकार शक्ती वाढविणे हाच खरा उपाय आहे असे पक्के मत सुभाष पाळेकरांचे आहे. जमीन पैलवान कशी बनवावी याचे यशस्वी अभ्यास आणि संशोधन पाळेकरांनी केलेले आहे.

प्रकाश सेब्लेशन क्रियेतून १ चौ.फुट पान ४.५ ग्रॅम अन्न तयार करते. संध्याकाळी वितरण करते त्यातून १.५ ग्रॅम धान्याची निर्मिती करते किंवा ३.५ ग्रॅम फळाचे किंवा उसाच्या उत्पन्नाची निर्मिती करते. अशा प्रकारचा बारीक अभ्यास माहिती सुभाष पाळेकरांच्या शिबीरातून मिळते पण आमच्या शालेय अभ्यासक्रमात याचा उल्लेख का नसावा? सूर्यप्रकाशात पानांनी प्रकाश संष्लेशन प्रक्रियेमधून बनलेली कच्ची साखर, तयार केलेली कच्ची साखर झाड मुळीद्वारे जमीनीतील जिवाणूंना देते आणि बदल्यात जिवाणू जमीनीतील कच्ची अन्नद्रव्ये

प्रोसेस करुन, शिजवून झाडाच्या मुळांना देतात. हे निसर्गामधील सहजीवन आहे. या सहजीवनाचा रासायनिक शेतीत नाश होतो.

**विद्यमान विज्ञान नसून अज्ञान !**

वनस्पतीची सहजीवनातून वाढ होते. जमीनीमध्ये अन्य द्रव्यांचा प्रचंड साठा आहे तो संपणारा नाहीच. जमीनीत असणारे सहजीवी जिवाणू हे कच्चे जमीनीतील अन्नद्रव्ये प्रोसेस करुन, शिजवून झाडांच्या मुळकेशांना पुरवितात. सल्फेट आणि किटनाशकाचा वापर केला तर हे जिवाणू, इतर सहजीवी किडे, गावठी गांढूळ मारले जातात.

सुभाष पाळेकर यांनी पैशाचा अपव्यय न करता हायस्ट क्वालीटीचे रिझल्ट कसे काढावेत याची शेतकऱ्यांना आचार संहिताच बनविली आहे. कमीत कमी पैशात बेस्ट रिझल्ट कसे काढावेत हे स्वस्थ स्वच्छ आणि नैसर्गीक उपाय शेतकऱ्यांना संशोधनासहीत पुराव्यासहित उपलब्ध करुन दिले आहेत.

मोठे मोठे नांगराचे फाळ असलेले ट्रॅक्टर वरच्या थरातील सुपीक माती खाली ढकलतात आणि खालची नापीक माती वर आणतात. त्यामुळे ट्रॅक्टरने खोल नांगरणी टाळावी असे पाळेकरांचे संशोधन सांगते. खूप खोलवर नांगरणी केली म्हणून पीकी वाढल्याचा अनुभव शेतकऱ्यांना आला आहे का? सिद्ध करून दाखवावे. कारण ९० टक्के मुळकेश वरच्या ४.५ इंचाच्या थरात असतात.

आपल्याला युरोप अमेरिकेकडे बघण्याची आवश्यकता नाही. आपण आपले स्वतःचे अभ्यासक्रम संशोधन विकसित करण्यासाठी सुभाष पाळेकर वन मॅन शो म्हणून कार्य करीत असले तरी आपण त्यांच्या संशोधनाचा फायदा उचलत त्यामध्येच पुढे यशस्वी डेव्हलपमेंट करून एक नवीन स्वतःचा शुद्ध भारतीय संशोधन अभ्यासक्रम जगाच्या माथी यशस्वीपणे मारणे आवश्यक आहे.


ज्यावेळेस आपला भारतीय शेतकरी आपले बिना सल्फेट, रसायने किटकनाशके नसलेले उत्पन्न डबल किंवा त्यापेक्षा जास्त किमतीने भारतात किंवा परदेशात, युरोप, अमेरीकेत, विकू शकतील तो दिवस भारतीयांच्या उच्चांकाचा, भारतीय शेतकऱ्यांच्या उच्चांकाचा सुवर्णकाळ असेल आणि भारतीय शेतकरी येणाऱ्या काळात ठरविले तर सहज करू शकेल. पाश्चिमात्य संशोधनाचे अनुकरण करून नाही तर आपले स्वतःचे संशोधने विकसीत करून हे शक्य आहे.

(दि. ४ जून २०१८, विमुक भटकंती)



# ४. कृषीऋषी सुभाष पाळेकर भारतीय शेतकऱ्यांचे दैवत!

## भाग–२



कृषी क्षेत्रातील सर्व रहस्यांचा मर्मभेद करणारे आणि भारत भूमीच्या सर्व समस्यांचा अंबलबजावणीयुक्त उपाय सुभाष पाळेकर यांनी यशस्वीपणे संशोधित केलेले आहेत. शेतीचे व्यवस्थापन, शेतीमधील निसर्गाच्या सहजीवनामधील गुढ रहस्थांची पूर्णतः उकल सुभाष पाळेकर यांच्या संशोधनाने केली आहे. निर्विवादपणे हे जगातील एकमेव संशोधन आहे. पूर्णतः भारतीय आणि जगाच्या कल्याणासाठी मरगळलेल्या भारतीय अर्थव्यवस्थेला, बेचिराग झालेल्या शेती व्यवसायाला नैराश्यातून बाहेर काढण्याची आणि जागतिक पातळीवर सर्वोच्च घडविण्याची क्षमता पाळेकरांच्या यशस्वी संशोधनामध्ये आहे.

कृषी विज्ञानाची सारी व्याख्या, सिद्धता नियम कुंडली सर्व बदलण्याची ताकत सुभाष पाळेकर यांच्या शिकवणीमध्ये आहे. येणारे युग भारतीय शेतकऱ्यांचे जागतिक वर्चस्व असणारे असू शकते. ज्या देशातील नव्वद टक्के बालक वर्ग शेतीच्या व्यवसायाशी जवळून निगडीत आहे. अशा देशात शेती पीक बागांच्या रहस्यांचे मर्मभेद करणारे संशोधन शालेय अभ्यासक्रमात समाविष्ट करणे अती आवश्यक आहे.

**अद्‌भूत आणि आश्चर्यकारक संशोधन**

रासायनिक खते जरी विशिष्ट अन्नद्रव्यासाठी सांगितली असली तरी ती क्षारानी भरलेली असतात. युरिया ४६% नत्र असला तरी बाकीचे ५४% क्षार असतात आणि युरिय जमिनीत गेल्यावर त्याच्याशी पाण्याचा संयोग झाल्यावर युरीयेज नावाचे बिकर युरियाचे विघटन करुन अमोनिया व कार्बनडायऑक्साईड हे विषारी वायू निर्माण करतात. हे वायू जमिनीतील जीवाणूंचा नाश करतात आणि या वायुचा जमिनीतील आद्रतेशी संपर्क आला की रासायनिक अभिक्रिया होऊन

त्यांचे क्षारात रूपांतर होते. सुपर फॉस्फेट मध्ये १६% स्फुरद असला तरी बाकीचे ८४% क्षारच असतात. पोटॅशियम सल्फेट मध्ये ४८% पोटॅश असला तरी बाकीचे ५२% क्षारच असतात. म्हणजे जेव्हा जेव्हा तुम्ही रासायनिक खते जमिनीत टाकता. तेव्हा ते जमिनीतील दोन माती कणांच्या पोकळीमध्ये सतत क्षारांचा संग्रह करीत असतात आणि जमीन क्षारपड बनवत असतात आणि जेव्हा जमिनीतील माती कणांच्या मधी पोकळ्या क्षाराने भरून जातात तेव्हा पिकांच्या वाढीसाठी अत्यंत आवश्यक असलेली व पिकांना जमिनीतील ओलाव्या सोबतच अन्नद्रव्यांचा पुरवठा सतत करणारी केशाकर्षण शत्ती बंद पडते. आपल्या जमीनी प्रचंड प्रमाणात सतत रासायनिक खतांचा वापर झाल्याने वांझ झालेल्या आहेत.

**जीवामृत, बिजामृत, आच्छादन आणि वापसा हे झिरो बजेट नैसर्गिक शेतीचे रथ**

जमीनीच्या पृष्ठभागावरील ४.५ इंच माती हाच खरा महत्वाचा थर असतो. ९५ टक्के केशमुळ्या या थरात असतात. ८८ ते ९२ टक्के जिवाणू या थरात असतात. याच थरामध्ये हयुमसची निर्मिती होते, सूक्ष्म जिवाणू आणि मुळ्यांना प्राणवायू उपलब्ध होतो यालाच वाफसा म्हणतात. जीवामृत, बिजामृत, आच्छादन आणि वापसा हे झिरो बजेट नैसर्गिक शेतीचे रथ आहेत. झिरो बजेट झिरो नैसर्गिक शेती सरकारने पॉलीसी म्हणून स्विकारली तर नव्वद टक्के पाण्याची बचत होईल. हयुमस आणि आच्छादन हवेतील पाण्याच्या महासागर खेचून घेतो आणि पिकाच्या मुळांना उपलब्ध करून देतो. याचा बारीक मुद्देसुद अभ्यास झिरो बजेट नैसर्गिक शेतीच्या शिबीरामधून आपणास सहज समजून येतो. अन्नद्रव्यांचा बारीक अभ्यास ही या शिबीरातून समजून येतो. पाश्चात्य तत्वज्ञान तपासून घेणे आवश्यक आहे. युरीया पोटॅश सारखे रसायने टाकल्याने क्षार वाढतात, खाली जमीनीत पाणी झिरपत नाही. केशाकर्षण पद्धतीने खालची खनीजे वर येत नाहीत.

**शहरी अर्थव्यवस्थेचे पोषण म्हणजेच ग्रामीण अर्थव्यवस्थेचे शोषण**

इंग्रजांनी भारतावर १५० वर्षे राज्य केले. आम्ही इतके त्याच्यापासून प्रभावित झालो की आमच्या नेत्यांचीही अक्कल चालली नाही. दिल्लीत बसलेले उच्चाधिकारी सल्लागार तज्ञ कॉफीबहाद्दर शिक्षणप्रणालीचे प्रॉडक्ट असल्याने नेहरूजींचा काळापासूनच सरकारची ध्येय धोरणे ही दिशाहीन आहेत. रासायनिक खतांचे फॅड भारतात कोणी आणले? आताचे प्लॅस्टीक बँगांचे फॅड हे ही त्यातीलच! या प्लॅस्टीक बॅगा आल्या कुठून? भारतीयांना स्वतःची बुद्धी होतीच



कुठे? हरीत क्रांतीच्या नावावर आणल्या गेले. भारतीय नेतृत्व आणि त्यांचे सल्लागार तज्ञ यांना दूरदृष्टी नसल्याने येणाऱ्या परिणामांचा थांग पत्ता नसल्याने यूरोप अमेरिकेतील अदृश्य शोषणकारी महाव्यवस्थेने हरीत क्रांतीचे बीज यशस्वीपणे भारतात रोवले. भारत सरकारच केवळ रासायनिक खतांवर २ लाख कोटीपेक्षा जास्त रुपयांची सबसीडी देते. हा पैसा जातो कुठे तर अप्रत्यक्षपणे विदेशात. भारतीय नेतृत्व सल्लागार उच्चाधिकारी तज्ञ यांना स्वतःचा आत्मविश्वास आणि ठाम मत नसल्याने असेच होणार ना? शहरी अर्थव्यवस्थेचे पोषण म्हणजेच ग्रामीण अर्थव्यवस्थेचे शोषण. हे त्यांच्या लक्षात आले नाही.

मुळात कृषी विद्यापीठांचा उगम हा ग्लोबलायझेशन, इंडस्ट्रीयलायझेशन मधून झाला. इंडस्ट्रीअलायझेशन, ग्लोबलायझेशनचा मूळ उद्देश पैसा कमविणे हा आहे. शेतीची, जमीनीची गुणवत्ता सुधारणे हा नाही. इंडस्ट्रीअलायझेशन, ग्लोबलायझेशन दूरदृष्टीन विचार करीत नाही. मोजक्या लोकांचा तात्पुरता फायदा बघितला जातो.

**हरीत क्रांतीचे दूरदृष्टीहीन दिशाहीन भूत**

हरीत क्रांतीचे यशस्वी मॉडेल म्हणून पंजाब राज्याचा उल्लेख व्हायचा. रासायनिक खतांमुळे कधीतरी एकरी तीस चाळीस क्विंटल गव्हाचे उत्पादन देणारी जमीन नंतरच्या काळात इतकी अनुत्पादक बळाली की रसायनिक खते वापरूनही गव्हाचे उत्पादन एकरी दहा बारा क्विंटलच्या वर जात नाही. म्हणजे तत्कालीन सरकारच्या ध्येय धोरणांच्या मानगुटीवर बसलेले हरीत क्रांतीचे भूत कसे दूरदृष्टीहीन दिशाहीन होते हे सिद्ध होते. हरीत क्रांतीच्या नावाखाली रासायनिक खतांना प्रोत्साहन देणे त्यासाठी दोन हजार कोटी रुपयांची तरतूद करणे म्हणजे विनाशकारी विपरीत बुद्धी झाली होती हे आता लक्षात येत आहे.

याच हरीत क्रांतीच्या नावाखाली विदेशी गाईंना प्रमोट करण्यात आले. सुभाष पाळेकर यांच्या संशोधनानुसार या मूळात गाई नााहीच आहेत. गाय या मूळ कुळ फॅमीलीच्या २१ लक्षणांपैकी एकही लक्षण या विदेशी जर्शी होलस्टीन गाईमध्ये आढळत नाही. या गाईंना रोज जंतूनाशके तसेच दुधाची मात्रा वाढावी म्हणून संसवर्धके पाजली जातात. ही जंतूनाशके आणि संवर्धके या गाईच्या शेन गोमूत्रातून शेतजमीनीत जातात. तेच घटक रोजच्या दूधातून आणि शेतीतील अन्नधान्यातून मानवी शरीरात जातात. ही जंतूनाशके मानवी शरीरात गेल्यावर शरीरातील उपयुक्त जिवाणूंचा नाश होतो आणि मानवी रोग प्रतिकार शक्ती घटते.

तसेच दूध उत्पादन वाढविणारी संवर्धके दूध प्राशन केल्यावर दूध पिणाऱ्याचे आतडीत जमा होते. हीच संवर्धके मानवी शरीरात काही पेशींची अनिर्बंध वाढ करण्यास कारणीभूत होतात आणि त्यामुळे कॅंसर हॉस्पीटलमधील रूग्णांची वाढ होताना दिसत आहे.

**कारण त्यांना दिशादर्शक मिळालाच नाही...**

भारतातील प्रत्येक खेडे हे स्वयंविकासी स्वयंपोषी आणि स्वयंपूर्ण व्यवस्था असलेले असावे असे महात्मा गांधी यांनी हेरले होते. पण ते कसे शक्य आहे त्याची अंमलबजावणी कशी होईल हे कदाचित पंडीत नेहरू वा त्याकाळातील किंवा त्यानंतरच्याही सरकारांना, शासनव्यवस्थेला माहीत नव्हते. या प्रश्नांची अंमलबजावणीयुक्त उकल उत्तरे कृषी ऋषी श्री सुभाष पाळेकर यांच्या पुस्तकात मिळतात.

कृषी ऋषी श्री सुभाष पाळेकर नेहमी कृषी विद्यापिठांना दोषी धरत आहेत. मूळात आपण सर्वच अमेरिका यूरोप मधून आयात केलेल्या अभ्यासक्रमाचे प्रॉडक्ट आहेत. या कॉफीबहाद्दर अभ्यासक्रमातून काय अपेक्षा ठेवणार आहोत? विद्यमान कृषी विद्यापीठांना दोष देणे योग्य वाटत नाही. ना शासन व्यवस्था, ना नेत्यांना आणि तज्ञांना, कारण त्यांना दिशादर्शक मिळालाच नाही.

इंग्रजांनी कॉफी असलेल्या अभ्यासक्रमाचा तंतोतंत अभ्यास करून शिक्षीत झालेले तज्ञ तरी स्वतःची बुद्धी वापरण्याची क्षमता असणे कठीणच असते मग सुभाष पाळेकर कृषी विद्यापिठांकडून का म्हणून अपेक्षा ठेवाव्या.

मनुस्मृती या ग्रंथामध्ये तैलिक समाजाचा उल्लेख आढळतो. मनुस्मृती ही ब्राह्मण समाजाने ब्राह्मणांच्या संरक्षणासाठी लिहिलेले संविधान असावे. त्याही काळात तैलीक समाज बांधव ब्राह्मणांना मनासारखी दक्षिणा देत नसावेत. तैलीक समाज बांधव प्राचीन काळापासून कंजुषीसाठी प्रख्यात असावेत. कंजुषी म्हणजे अवास्तव खर्च टाळणे. ब्राह्मणांचा तेली समाजावर राग रोष असावा. खाटीक बकरा कापतो. त्यापेक्षा तेल्याने जवसाला पिळून तेल काढणे म्हणजे बकरा कापण्यापेक्षा मोठा पाप असा मनुस्मृती या ग्रंथामध्ये उल्लेख आहे. ब्राह्मणांनी खरोखर या देशाच्या भल्यासाठी काही केले की नाही यावर आक्षेप घेतला जातो. पण आज हाच तैलीक समाजाचा माणूस सुभाष पाठेकर, त्यांचे संशोधन भारताचे भाग्य बदलणार आहे.

(दि. २ जुलै २०१८, विमुक भटकंती)



# ५. कृषीऋषी सुभाष पाळेकर भारतीय शेतकऱ्यांचे दैवत!

## भाग–३



**दूरदृष्टीहीन वांझोटा भारतीय अभ्यासक्रम**

दहावीपर्यंत तरी आमच्या अभ्यासक्रमाला जीवशास्त्र हा विषय होता. त्या काळात एक एक पॅराग्राफ वाक्य धडे यावर आमची सखोल खडान खडा बारीक लक्ष असायची. सरांनी शिकविलेली झाडांच्या पाणांची प्रकाश संश्लेशन क्रिया पक्की आठविते. पण मूळे वा मूळकेश जमीनीत राहून ही पाणी वाष्प स्वरूपात आणि सोबत ऑक्सीजन सुद्धा शोषून घेतात हे मात्र शिकविल्याचे आठवत नाही. तसेच जमीनीतील जिवाणू जमीनीतील अन्नद्रव्ये प्रोसेस करुन शिजवून मुळांना देतात. पानांची प्रकाश संश्लेशन क्रियेमधून उत्पन्न झालेली झाडांचे मुळांद्वारे कच्ची साखर जिवाणूंना दिली जाते. हे सहजीवन सुद्धा अभ्यासक्रमात असल्याचे आठवत नाही.

त्या ही वेळेस जीवशास्त्राचा अभ्यासक्रमात रासायनिक खते कोणकोणती एन.के.पी. (नायट्रोजन पोटॅशिअम पास्फेट) हे शिकविण्यात आली होती. पुढे जाऊन हीच ए.के.पी. आमच्या भारतातील जमीनी पूर्ण क्षारपट आणि वांझ बनवतील हे मात्र शिकविण्यात आले नव्हते. मग अशा अभ्यासक्रमाला

दूरदृष्टीहीन म्हणावे नाही तर काय?

झाडांचे मूळकेश जमीनीतून बाष्प स्वरूपात असलेले पाणी आणि ऑक्सीजन शोषून घेतात आणि झाडाला पोहचवून पोषण करतात. त्यामुळे जर जमीनीत पूर्ण पाण्याचा थर असल्यास मातीच्या कणांमधील हवा निघून जाते, ऑक्सीजन आणि बाष्प निघून जाते. त्यामुळे खूप ओलावा असलेल्या ठिकाणी झाडे पिवळी पडतात. हे आमच्या शालेय अभ्यासक्रमात शिकविल्या गेले नव्हते. कारण आमचा अभ्यासक्रमच वांझोटा होता हे आता लक्षात येत आहे किंवा तत्कालीन विज्ञानाचे संशोधन तिथपर्यंतच सीमित असावे.

**पाचव्या वर्गापासूनच पाळेकर कृषी विज्ञानाच्याच अभ्यासक्रमात समावेश आवश्यक**

कृषी ऋषी श्री सुभाष पाळेकर यांनी लिहिलेल्या एकूण जवळपास २१ पुस्तकांचा संच खूप सोप्या सहज भाषेत आहे. पूर्णपणे वैज्ञानिक आधारावर आहे. यातील खूप साऱ्या कृषी विज्ञानाच्या संबंधीत कन्टेन्ट्स पाचव्या वर्गापासूनच्या अभ्यासक्रमात टाकता येवू शकतात. आपल्या भारतीय देशात तर हा अभ्यासक्रम कंपलसरी असावा तेव्हाच आमच्या देशातून खूप सारे सुभाष पाळेकर जन्म घेतील आणि आमचा देश जगातील पहिल्या क्रमांकावर आगेकूच करू शकेल.

कृषी ऋषी श्री सुभाष पाळेकरांच्या पुस्तक संचातील त्यांनी उल्लेखिलेली शोषक शोषणकारी महाव्यवस्थेचे भूत शालेय विद्यार्थ्यांसाठीच अभ्यासक्रमात सुलभ वाटत नसले तरी सर्व तज्ञ वर्गाने जरूर समजून घ्यायला पाहिजे, अतीआवश्यक आहे. कृषी व्यवस्था आजही सर्वसामान्य शेतकरी जनतेचा पाठीचा कणा आहे. सुभाष पाळेकरांनी मूळावरच घाव घातला आहे. त्यांनी दिलेले इतरही सर्व उपाय अर्थव्यवस्था असो वा न्यायपालिका भारतीय समाजव्यवस्थेला तंतोतंत लागू होतात. खरं तर त्यांनी दिलेला उपायांमध्ये भारताचे भाग्य समावले आहे?

**फेकू इंग्रज ?**

आम्हांला आमच्या अभ्यासक्रमात पृथ्वीच्या गोलार्धात, गर्भात १० किलोमीटर वर काय आहे, १०० किलोमीटर अंतरावर काय आहे हे शिकवितात? काय याचा उपयोग? आपण याला खरे समजायचे? आपण स्वतः



पडताळणी केली का? पृथ्वीच्या पृष्ठभागाखाली उष्ण अग्नीचा गोळा आहे. हे बघायला हे इंग्रज गेले होते का? मस्तपैकी गोल गोल लाल लाल पृथ्वीच्या गर्भाचे चित्र दाखवून विद्यार्थ्यांना आवड निर्माण करतात. त्यापेक्षा सुभाष पाळेकर यांचे संशोधन शिकवावे आपल्या लोकांना फायदा तरी होईल.

क्कॅलीफोर्नियात सॅन फ्रान्सीस्को जवळ रेडवूड फॉरेस्ट आहे. भारत पाकिस्तान आणि इतर देशातून आलेले पर्यटक तिथे भेटी देतात. आम्ही सुद्धा उत्सुकतेपोटी भेट दिली. तर काय म्हणे तेथील झाले १०,००० वर्षे जुनी! अमेरिकेचा इतिहास हाच ४०० वर्षे जुना आहे. ४००-५०० वर्षे पूर्वी तर तिथे अँग्लो इंडीयन राहत होते किंवा निर्मनुष्य होते. १०,००० वर्षे ही झाडे जुनी आहेत आणि ते सिद्ध करण्यासाठी त्यांनी सांगितलेले पुरावे खोटे खोटेच असावेत. आमच्या भारतात ५,००० वर्षापूर्वी घडलेल्या महाभारताचे पुरावे बरोबर मिळत नाहीत आणि यांची झाडे म्हणे १०,००० वर्षे जुनी आहेत. पर्यटकांकडून पैसा कसा उकळावा अख्ख्या जगाला कशी टोपी लावावी हे इंग्रज माणसांनीच करावे.

**यशस्वी पाळेकर विरूद्ध पंतप्रधान!**

भारतात पंतप्रधान वा मुख्यमंत्र्यांपासून सर्व सामान्यांपर्यंत शासकीय यंत्रणेचे दहा एक स्तर आहेत. शासन कोणत्याही पक्षाचे येवो, कितीही ढूंगी आपटून काम करतो म्हटले तरी शासकीय यंत्रणा आणि मधले स्तर तेच असल्याने घोषणा या हवेतच विरतात. पंतप्रधान कितीही बोलले की, शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करू तरी पण प्रत्यक्षात काहीच करू शकत नाही. त्यांचे रिझल्ट आणि निकष प्रसार माध्यमापुरतेच असतात. पण जे रिझल्ट सुभाष पाळेकर काढू शकतात ते रिझल्ट भारताचे कोणतेही पंतप्रधान वा मुख्यमंत्री काढणे शक्यच नाही. सुभाष पाळेकरांसारखे आंतरराष्ट्रीय स्तरावरील प्रस्थापित महाव्यवस्थेला, जगावेगळे यशस्वी कान्सेप्ट मांडणारेच भारतात यशस्वी होणे शक्य आहे. जिथे पोलीस पैसे घेवून पुरावे बदलतात. आरोपीला सोडतात, सर्व सामान्यांना न्याय पालिकेतून न्याय मिळविता येत नाही, शासकीय योजनांच्या १०० पैशापैकी त्र्यांशी पैसे शासकी यंत्रणेचे मधले स्तर खातात, १७ पैसे सर्वसामान्यांच्या कामी पडतात. जिथे मतदार सुद्धा निवडणूकीच्या वेळेस मताच्या बदल्यात पैसे एक्पेक्ट करतात तिथे पंतप्रधान वा मुख्यमंत्री खोटारडे सिद्ध होणार! पण पाळेकरांसारखेच लोक आपल्याला रिझल्ट देवू शकतात आणि देशाला सुभाष पाळेकर सारख्या एक्स्ट्रा ऑरडीनरी, आंतरराष्ट्रीय पातळीवर एक्ससेप्शनल टॅलेन्ट असलेल्या क्रांतीकारी

देवतांचीच आवश्यकता आहे.

**झिरो बजेट नैसर्गिक शेतीच्या पुढील आव्हाने?**

हरीत क्रांतीच्या नावाखाल संकरित बियाणे, रासायनिक खते, रासायनिक किटकनाशके यांचा वापर, तसेच जर्सी गाई गेल्या काही वर्षाच्या काळात शेतकऱ्यांच्या मनामनात, नसानसात घुसलेल्या आहे. भारतीयांचे शेती व्यवस्थापन अवस्था चक्रव्यूहात अडकलेल्या अभिमन्यु सारखी झाली आहे. हा अभेद्य चक्रव्यूह भेदून आमचा शेतकरी युद्ध जिंकेल का हा मोठा गहण प्रश्न आहे. प्रसारमाध्यमांमधील काही चोर लोक स्वाभिमान हरवून, अर्धवट अभ्यासू आहेत. त्यामुळे सर्वसामान्यांना मिसलिड करतात. झिरो बजेट आध्यात्मिक शेतीच्या पुढ्यात ही फार मोठी आव्हाने आहेत. चोर प्रसारमाध्यमे कबड्डी , खोखो सारखे भारतीय खेळ सोडून टेनीस, क्रिकेटचा प्रपोगंडा करतात. कुस्ती सारखा छान सुंदर खेळ सोडून या प्रसार माध्यमांनी डब्ल्यू डब्ल्यू एफ चे भूत उभे केले आहे. बेईमान लोकांची ही फौज आपल्या संशोधनांना वर येण्यासाठी अडथळे उभे करणार आहे. सर्वांनी डोळ्यात अंजन घालून झेड बी एन एफ ला यशस्वी करणे आवश्यक आहे.

झिरो बजेट आध्यात्मिक शेतीला जागतिक प्रख्यात ब्रँड बनवायचे. त्याचाच गाजावाजा करुन नवीन पिढीच्या नसानसात भिनविणे आवश्यक आहे. या नैसर्गिक शेतीचे उत्पन्न आंतरराष्ट्रीय मानकात सम्मिलित करुन जागतिक दर्जाचे नैसर्गिक शेतीचे उत्पन्न म्हणून जगाला उपलब्ध करुन देवून निर्यातीमधून भारतासाठी प्रचंड पैसा मिळविणे, ही आव्हाने भारतीयांसमोर येवू शकतात. झिरो बजेट नैसर्गिक शेतीवर संशोधन करुन सुरू ठेवून शेतकऱ्यांसाठी नवीन झिरो बजेट नैसर्गिक शेती हेल्पलाईन बनवावी.

(दि. १५ ऑगष्ट २०१८, विमुक भटकंती)



# ६. शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यास सरकार सक्षम आहे काय?

रोज रोज शेतकऱ्यांच्या आत्महत्यांच्या बातम्या ऐकून मन सून्न होते. गावकऱ्यांना शेतीशिवाय पर्याय नाही. वरून शेती हा जुगार आहे. भारतातील लोकशाही म्हणजे तीन तिघाडा काम बिघाडा असे म्हटले तर वाचकांना राग येईल. शेतकऱ्यांच्या आत्महत्यांना स्वतःला शिक्षित विद्वान समजणाऱ्यांची इंग्रजाळलेली मानसिकता आहे. आमचे हे विचारपूर्वक आणि नम्र निवेदन समजून घ्याल अशी अपेक्षा आहे. भारताला हजारो वर्षाचा इतिहास आहे. रामायण, महाभारत, बुद्धकाल, मोगलकाळ, मराठ्यांच्या राज्यातही शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याचे आढळत नाही. भारतीय समाज संत महात्म्यांनी दिलेल्या वा सांगितलेल्या आध्यात्मिक मार्गापून दुरावल्याने आणि भौतिक जगातील सुख लोलुपताकडे आकर्षित झाल्याने शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहेत. तान तणाव, नैसर्गिक आपत्तीने झुकणारा भारतीय समाज हा कधीच नव्हता, दिसणारी आर्थिक विषमता हे कारण दुय्यम आहे. आर्थिक विषमता हे कधीच टाळता येत नाही. मानसिक कमकुवतपणा हेच खरे आत्महत्येचे कारण आहे. भौतिक व्यवहारिक जीवनात उलाढाल ही ठरलीच आहे. भारतीय अध्यात्म ज्ञान, निष्काम कर्मयोग, भौतिक लाभाची इच्छा न ठेवणे आणि जीवन चालू ठेवणे हेच आद्यकर्तव्य, हे सांगतो, सरकारने कणखरपणे वागून आध्यात्म, धार्मिक ग्रंथाच्या शिक्षणाला राजकीय आश्रय देणे अतीआवश्यक आहे तेव्हाच शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबवता येतील.

**आर्थिक समतोल शक्य आहे का?**

जगाच्या पाठीवर कुठेही गेलेत तरी आर्थिक विषमता आढळतेच. एकाच घरात चार भाऊ वाढतात. वडील सर्वांवर सारखे प्रेम करतात, सर्वांना सारख्या सुविधा उपलब्ध करून देतो. तरीही ही चार भावंडे पुढे जाऊन आर्थिक सामाजिकदृष्ट्या सारख्याच स्तरावर राहतील याची खात्री पालक देऊ शकत नाही तर मग सरकार देऊ शकतो असे कोणत्या तोंडाने म्हणता?

**अमेरिकेतील विषमता?**

आम्ही अमेरिकेत सुरवातीला तिचे स्वर्गासारखे नेटनेटके, सुंदर, स्वच्छ,

श्रीमंत रूप पाहून भांबावून गेलो. दोन–तीन महिन्यांनी सेन फ्रॅंसिस्को रेल्वे स्टेशनला भिकारी बघितला तेव्हा मात्र चक्रावून गेलो. भिकारीही हुशार, मी भारतीय दिसल्याने भारतीय भिकाऱ्यासारखा उजवा हात डोक्याला लावून, वाकून नमस्कार करून पैसे मागत होता. नंतर खूप लोक फ्लायओवर खाली, आश्रय घेवून, घर नसल्याने राहताना दिसायचे. यांना अमेरिकेत होमलेस भिकारी म्हणतात. आजही प्रत्येक अमेरिकन माणसावर दरडोई तीस हजार डॉलरचे कर्ज आहे. म्हणजे अठरा लाख रुपये. याचा अर्थ अमेरिकेतल्या प्रत्येक माणसाने चुल्लूभर पाण्यात डूबून मरायला पाहिजे? भारतीय शेतकऱ्यांनी हा मुद्दा लक्षात घ्यावा.

**सरकारने कणखर बनणे आवश्यक**

शेतकरी आत्महत्या का करतो? व्यवहारात हार जीत असतेच. जो पैसे वा कर्ज शेतकऱ्यांना देतो तो पैसे परत मागणारच. हा व्यवहाराचा भाग आहे. आलेल्या भोगाशी सांभाळून घ्यायला काही शेतकरी तयार नाहीत. मानसिकता कमकुवत झाली आहे. भारतीयांचे आध्यात्मिक, अच्यूत ज्ञान, सर्वोच्च ज्ञानच त्याला वाचवू शकते. पण राज्यकर्ते उघडपणे बोलायला घाबरतात कारण अर्धवट अभ्यास केलेली प्रसारमाध्यमे त्यांना सोडणार नाहीत. म्हणून आम्ही म्हणतो भारतातील लोकशाही म्हणजे तीन तिरपट. प्रसारमाध्यमांवर नियंत्रण येणे खूप गरजेचे आहे. मीडियाची इंग्रजाळलेली मानसिकता असल्याने नेते घाबरतात आणि राज्यकर्ते राज्यकर्ते म्हणून वागू शकत नाहीत. विरोध पक्षवाले स्वतःच्या स्वार्थासाठी फक्त विरोध करायचा म्हणून विरोध करतात.

**शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोकण्यासाठी उपाय**

१. गावागावातील मंदीर, धार्मिक स्थळे यांच्या व्यवस्थापकाशी सरकारने संपर्क साधावा, महाराज लोकांना विश्वासात घ्यावे, धार्मिक वा इतर कार्यक्रमातून आत्महत्या करण्याच्या मानसिकतेपासून लोकांना परावृत्त कसे करता येईल, याबाबत चर्चा करावी. तशी पुरक अंबलबजावी भजन किर्तन प्रवचनांच्या माध्यमातून करावी.

२. ज्या कोणत्या धार्मिक चळवळी सध्या भारतात अस्तित्वात आहेत, त्यांच्या पुढाऱ्यांबरोबर चर्चा करावी. उदाहरणार्थ – विपश्यना वाले गोयंका महाराजांचा ग्रुप, रामदेवबाबा वाला ग्रुप, आनंदमयी देवीचा ग्रुप आणि त्यांच्याबरोबर



सकारात्मक चर्चा करून आत्महत्या रोकण्यासाठी राजकीय आश्रम देऊन दिशा ठरवावी.

३. काही भारतीयांची मानसिकता इंग्रजाळल्यामुळे भारतीयांकडे उच्चकोटीचे ज्ञान असताना मानसोपचार संबंधीत गोऱ्यांचे भुक्कड भोकांड अभ्यासक्रम भारतीय चालवित आहोत. आजही भारत जगात आध्यात्मिक चळवळीचे नेतृत्व करीत आहे. दक्षिण भारतातील आनंदमयी देवीचे अमेरिकेत दर्शनासाठी पहाटेचे पाच वाचेपर्यंत वाट पाहणारे अमेरिकन लोक आम्ही अनुभवलेले आहेत. अमेरिकेतील मोठ्या कंपन्यांचे सीईओ, जपानमधील बौद्धप्रणित झेन आध्यात्मिक चळवळीला जुळले आहेत. झेन चळवळीचा अप्रत्यक्ष उगम भारतातच आहे. भारत सरकारने धार्मिक, आध्यात्मिक दिशा असलेला धर्मग्रंथाचा अभ्यास हा नवीन रूपात शास्त्रीय बेस जोडून अभ्यासक्रमात टाकावा.

४. शेतकरी आत्महत्या का म्हणून करतो, याच्या कारणमिमांसा, मूळ कारणांचा अभ्यास होणे आवश्यक आहे, त्यानुसार दिशानिर्देश ठरवावेत. कर्ज घेतल्याने बँक वा सावकाार माझे घर जमीन बळकावेल म्हणून शेतकरी घाबरतो. जमीन म्हणजे पृथ्वीचा तुकडा, जमीनीचा मूळ मालक म्हणजे देव वा निसर्गनिर्माता. घराचे दगड, विटा, माती याचाही मूळ मालक हा देव. धान्य, बीज, रोपटे यासाठी लागणारा ऊन, वारा, पाऊस याचाही मालक निसर्गच. यश वा संपत्ती दिशाहीन असून ही कधीच स्थिर नसते. एकाकडून दुसऱ्याकडे जात असते. अस्थिर, अनित्य, क्षणिक मालकी हक्कासाठी आपले लाख मोलाचे जीवन का घालवावे? आपले दोन हात, दोन पाय असलेले जन्मावेळेसचे शरीर हेच आपले खरे रूप गरीबीत राहिले. मोलमजूरी करून जगले, भौतिक पुरेशा सुविधा नव्हत्या, घालायला कपडे नव्हते. तरीही वर्गात पहिल्या नंबरनी पास झाल्याची कितीतरी उदाहरणे आहेत. घर शेती गेल्याने मी माझ्या मुलांना चांगली सुविधा व शिक्षण देऊ शकत नाही म्हणून आत्महत्या करणे म्हणजे मुलांना भ्याडपणा शिकविणे होय.

आत्महत्या करणाऱ्यांच्या मनात काय चालले असेल याचा ठाव ठिकाणा घेऊन एक प्रभावी समोपदेशन आध्यात्मिक वा कोणत्याही माध्यमातून शेतकऱ्यांपर्यंत पोहचणे आवश्यक आहे.

५. इंग्रज अमेरिकन लोक खोटी साक्ष वा पुरावे देत नाही, त्यामुळे त्यांची न्यायपालिका सक्षम आहे. शासकीय वा कोणत्याही यंत्रणेतील कर्मचाऱ्यांच्या

स्तरांची एक दुसऱ्यांमध्ये कट्टर विश्वास असल्याने त्या देशात लोकशाही प्रणाली यशस्वी चालत आहे. गोऱ्यांची प्रसारमाध्यमे अप्रयत्क्षपणे नियंत्रित आणि एकाच दिशेने चालतात; भारतात तसे होणे दिसत नाही. म्हणून पूर्ण लोकशाही प्रणालीतच भारतीय लोकांच्या मानसिकतेला सक्षमपणे हाताळण्याजोगे आमुलाग्र बदल आवश्यक असू शकतात. आता परिस्थिती इतकी चिघळते की रोज शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहेत. त्यामुळे सरकारने कणखर पावले उचलणे आवश्यक आहे.



# ७. शेतकऱ्यांच्या आत्महत्येला कारणीभूत कोण?




अन्न ही मानवी शरीराची गरज आहे. मानवाच्या शरीराला दोन हात, दोन पाय आहेत, श्रम करू शकतो. वस्त्र आणि निवारा या गरजा आणि त्याचा व्याख्या बदलत आहेत. आधी झोपडीत राहायचे आता सिमेंटचे घर स्टेटस सिम्बाल बनली आहेत. आधी राम–लक्ष्मण, भीम–अर्जुन–युधिष्ठीर पाच पांडव वनात राहून कंदमूळ खाऊन जगायचे आज लोकांना हायब्रीड, पॅकींग केलेले अन्न पाहिजे. भगवान राम–लक्ष्मण, भगवान श्रीकृष्ण पायी प्रवास करीत होते. आज गाडी, घोडे, विमान असूनही अतृप्तता आहे. तुमच्याकडे इलेक्ट्रीक बील भरायला पैसे नसतील आणि विज नसेल तर दिव्याच्या अंधारात अभ्यास करून होऊच शकत नाही, अशी मनोवृत्ती झाली. आगरकर की गोखले अशा महापुरुषांनी काजव्याच्या प्रकाशात अभ्यास करून प्राविण्य मिळविले होते. ही खोटा अहभाव असलेली, दिखावा असलेली स्टेटस सिम्बाल बनलेली मनोवृत्ती ही शेतकऱ्यांच्या आत्महत्यांना कारणीभूत आहे. गरीब गुरू द्रोणाचार्याचा मुलगा जेव्हा दुधासाठी रडत होता तेव्हा त्याला पिठाचे पाणी बनवून प्यायला देत होते. बाळ अश्वस्थामा दूध म्हणून पिठाचे पाणी पीत होते. या बदललेल्या मनोवृत्तीला, शेतकऱ्यांना आत्महत्या करण्यास प्रवृत्ती करणाऱ्या मानसिकतेला कारणीभूत कोण?

तान–तनाव, निराशा व दुःख हे प्राचीन भारतात नव्हेतच! शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याचा उल्लेख स्वतंत्रपूर्व काळात आढळतो का? जगातील सर्वोच्च आध्यात्मिक ज्ञान ज्या भारतात आहे, त्या देशात शेतकऱ्यांनी आत्महत्या कराव्यात? भगवान श्रीकृष्णाने जिथे अर्जुनाला भगवद्गीता सांगीतली तिथे बळीराजाने आत्महत्या कराव्यात? अक्षय उत्साही आणि चैतन्याने भरलेले आनंदी

यशस्वी कृतार्थ जीवन कसे जगायचे हे आमच्या देशातील प्रत्येक संतांनी सांगितले, मग त्यांचे विचार गेले कुठे? पाश्चिमात्यांचा प्रभाव असलेली, टिव्ही, इंटरनेट, फोनच्या माध्यमातून दिसलेली, अनुभवलेली बाह्य भौतिक जगातील सर्व सुख लोलुपता, मनोरंजन, मातमतरब सामान्यांच्या मनात चलबिचल अस्वस्थता निर्माण करीत आहेत!

शेती हा एक जुगार आहे. कालही होता, आजही आहे मग शेतकऱ्यांनी या काळातच का आत्महत्या कराव्या? शिवकालीन इतिहासातही महाराष्ट्रात दुष्काळ पडल्याचे पुरावे आहेत पण शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याचा उल्लेख आढळत नाही. मग आताच हे असं का व्हावे? सर्वोच्च ज्ञान असलेल्या आध्यात्माला दूर सारून एक अनित्य क्षणभंगूर व्यवहारिक भौतिक सुखासाठी, स्टेटस सिम्बालसाठी धडपड करणाऱ्या मनोवृत्तीचा, पाश्चिमात्य प्रभाव वाढल्यामुळे शेतकरी आत्महत्या करण्यासाठी धजावत आहेत.

**शेतकऱ्यांच्या आत्महत्या कशा टाळता येतील?**

तुमच्या गजानन महाराजांचा प्रगट दिन लक्षात राहतो पण त्यांचे विचार तुमच्या डोक्यात कां घुसत नाही?

<u>ध्यानयोग श्लोक २४, पेज २४१ ध्यानयोग श्लोक ५ आणि ६</u> भौतिक जीवनात मनुष्य मन आणि इंद्रियाच्या आधीन होतो. मनाचा मिथ्या अहंकाराशी संबंध येतो, मिथ्या अहंकाराच भौतिक प्रकृतीवर प्रभुत्व गाजविण्याची इच्छा करतो. भौतिक प्रकृतीच्या जगभराचे आकर्षित न होता, मानसिक तर्कामुळे उत्पन्न झालेल्या सर्व भौतिक कामानांचा पूर्ण त्याग करतात. इंद्रीय संधीमत करणे व्यवहारी जगात अनेक विरोधी शक्तीच्या सामना करावा लागतो, पण त्यासाठी मानसिकरित्या झुकण्याची आवश्यकता नाही, घर जमीनीचा त्याग करण्याची पाळी आली म्हणजे तुम्ही असे काय घालविले? भौतिक व्यवहारिक जीवनात होणाऱ्या उलाढालीमुळे मन प्रभावित करण्याची, होण्याची आवश्यकता नाही! व्यवहारिक भौतिक कर्मकांडाकडे दुर्लक्ष करणे, भौतिक यशोमार्ग कोणत्याही दिशेला स्थित नसतात, दिशा बदलत असतात, त्यासाठी झुकण्याची गरज नाही. भौतिक सुखात आसक्ती हे आत्महत्येचे कारण आहे. आपल्या जमीनी घर बद्दल अत्याधिक प्रेम, लोभ, त्या जमीनीबद्दलची माया शेतकऱ्यांना आत्महत्येसाठी बाध्य करीत आहे. आर्थिक विकासाद्वारे भौतिक सुखाचा त्याग, भौतिक कर्माचा त्याग, भौतिक यशप्राप्ती आध्यात्मात कोणतेही स्थान नाही. पैसा मालमत्ता इ. भौतिक सुख



मिळविण्यासाठी धडपड करण्यात काहीही वावगे नाही पण समजा अपयशी ठरलो तर प्राण त्यागण्याच्या इच्छा मनात आणणे हे चुकीचे आहे. भौतिक आसक्तीमुळे मानवाची बुद्धी भ्रष्ट होत आहे. मनाला भौतिक सुखभोगात रत करणे चुकीचे नाही.

निष्काम कर्मयोग म्हणजे भौतिक लाभाची इच्छा न ठेवता, नुकसानीसमोर न झुकता नेहमी व्यवहार चालू ठेवणे! जीवन चालू ठेवणे हे मानवाचे आद्य कर्तव्य आहे. तुमच्याकडे असलेली जमीन तुमची आहे का? ही देवाची आहे, निसर्गाची आहे, ज्याने पृथ्वी निर्माण केली तो त्या जागेचा मालक आहे. व्यवहारात तुम्ही तुमची जमीन एका मानवाकडून दुसऱ्याला दिली हा एक तात्पुरता व्यवहार आहे. जे घर तुम्ही तुमचे आहे का? घरासाठी जी वीट वा सिमेंट वापरता त्या वीट वा सिमेंट बनविण्यासाठी माती केमीकल वापरले ते कोणाचे, त्याचा निर्माता कोण, त्याचा मालक कोण? हे घर खरोखर तुमचे आहे का? जमीनीचा भूभाग जो तुम्ही समजला तो पृथ्वीचा एक छोटासा तुकडा आहे? तुम्ही पृथ्वीचे निर्माते आहात काय? त्या भूभागावरील माती, मातीचे कण हे तुम्ही निर्माण केले आहेत का? तुमच्या शेतीसाठी लागणारे पाणी हे तुमचे आहे काय? पाणी तुम्ही निर्माण केले आहे का? शेतीच्या वाढीसाठी लागणारी हवा आणि ऊन ही तुम्ही बनविली आहे काय? अरे इथे तुमचे काहीच नाही! कर्ज थकीत असल्याने तुमच्या जमीनीचा टेंपरवारी ताबा तुमचे हातून जात आहे, बस!

तुम्ही कितीतरी वर्ष मेहनत करून उभी केलेली पिकी अचानक आलेल्या नैसर्गिक आपत्तीमध्ये बरबाद झाली तर काय झाले? निसर्ग वा देव या मातीचा, मालक वा निर्माता आहे आणि निसर्गात तो एक अधिकारही असू शकतो.

तुमचे मालमत्तेचा खरा मालक हा देव आहे. तुमची जमीन वा घर भौतिक वा व्यवहारिक देवानघेवानीत तुमच्या पासून गेले त्यात तुम्हाला घाबरून जाण्याची काय आवश्यकता? अशी गीता सांगते.

पाश्चिमात्यांनी उभी केलेली टेंपरवारी मनोधारणा निष्पाप शेतकऱ्यांना आत्महत्या करण्यास प्रवृत्त करीत आहे. आपल्या पूर्वजांनी केलेल्या आघात्याचा अभ्यास हा शाश्वत सत्य आहे. स्वतःचे अस्तित्वाची जाणीव करून टिकून राहणे आवश्यक आहे. जगातल्या प्राकृतिक भिन्न शक्ती, पृथ्वी, पाणी, अग्नी, वायू, आकाश हे तुम्ही बनविलेले आहे का? याचा निर्माता देव आहे. अस्थिर अनित्य आणि क्षणिक मालकीसाठी प्राण त्यागण्याची आवश्यकता का? एडीसनने जर

बल्बचा शोध लावला तरी प्रकाश बल्बसाठी लागण्याची वस्तू, त्याला जुळवाजुळव करण्यासाठी, लागलेली बुद्धी याचा निर्माता खरे रूप विसरतो. आपल्या ताब्यात असलेल्या मालमत्तेचा खरा मालक कोण हे विसरून गेलो, खरे ज्ञान हे भौतिक कामनांती हरविलेले आहे. विश्वाचे वा परम सत्य निसर्गाचे खरे रूप भौतिक जगात दिसत नाही. शेतीसाठी लागणारे पाणी, वीज, रोपटे, त्याचे निर्माते मालक तुम्ही आहात का? देवाघरी जीवांना कर्माचा त्याग करणे शक्य नाही. पण कर्मफलाचा त्याग करतो तोच खरा त्यागी होय. मोक्ष संन्यास योग लोक पिक घेतांना तुम्ही फक्त कर्म करता. बीज काय तुम्ही निर्माण केले काय? पाणी तुम्ही निर्माण केले का? जमीन तुम्ही निर्माण केली का? मग कर्मफलाचा तुम्ही त्याग का करू शकत नाही? तुम्ही कर्मफलाबद्दल आसक्ती म्हणजे श्रम अंधकार आणि अज्ञान असे आपल्या पूर्वजांचा अभ्यास म्हणतो. प्राकृतिक गुण हे कर्मानुसार काळानुसार प्रयत्नानुसार बदलू शकतात. तपस्थ स्वभावजन्य कर्म पाकृत भोगांना तुच्छ लेखणे महत्वाचे.

रामायण, महाभारत, मध्ययुगीन वा प्राचीन भारतीय इतिहासात भयंकर दुष्काळ, महापूर इत्यादी संकटांचा उल्लेख आढळतो पण त्यामुळे लोकांनी आत्महत्या केल्याचे आढळत नाही. मग आताच या संकटाने खचलात तुम्ही? आणि अत्यंत गरीब आणि हलाखीच्या परिस्थितीतून भारतीय समाज कधी कधी गेल्याचे आढळतो पण त्यासाठी आत्महत्येचा उल्लेख आढळत नाही. राजा हरिशचंद्र, आपले देव, राजे सुद्धा गरीब हलाखीच्या परिस्थितीतून गेले. शांती, संतोषी तृप्तता आणि समाधानी वृत्ती नसानसात भरलेला भारतीय समाज कुठे गेला? व्यवहारिक जीवनात उतार चढाव असणारच. पण त्यामुळे हिंमत सोडणे हा मूर्खपणा नव्हे काय? अमेरिकेतील प्रत्येक नागरिकांवर अंदाजे ३०००० डॉलरचे कर्ज आहे (प्रत्येकी दरडोई अंदाजे १८ लाख रुपये) तरीही अमेरिका महासत्ता म्हणून मिरवत आहे, मग तुम्हालाच कर्जाचे टेंशन का?

(दि. २८ फेब्रुवारी २०१४, अभयराज्य)



# ८. शेतकऱ्यांच्या आत्महत्यांपेक्षा हागणदारीचा प्रश्न महत्वाचा आहे काय?




भारतीय स्वच्छता मंत्रालयाने एक नवीन संशोधन केले आणि त्याला अनुसरुन आमची एक सिनेमामधील नटी घाणीवर बसणाऱ्या माशीबरोबर संवाद साधायला लागली. जहां सोच वहां शौचालय अशी तीच तीच जाहिरात ऐकूनवैतागून सामान्य श्रोत्यांच्या तळपायाची आग मस्तकात जायला लागली. असे वाटायला लागेल की या विद्यमान अच्छे दिन वाल्या सरकारला शेतकऱ्यांचा आत्महत्यांपेक्षा उघड्यावर हगणदारीचा प्रश्न महत्वाचा वाटतो काय? मानवाचा जन्म आणि त्यांचे आयुष्य हागण्यासाठी आहे की जगण्यासाठी हा मोठा प्रश्न निर्माण झाला. हागणमुक्ती साठी एवढा पैसा जाहिरातीवर खर्च करता मग शेतकऱ्यांना आत्महत्येपासून परावृत्त करण्याची एक तरी जाहिरात का नाही करत?

सरकाने आमच्या बोलण्याचे वाईट वाटून घेवू नये. सरकार म्हणजे फक्त मंत्री आणि खसदार होत नाहीत. सरकारमधील महत्वाचा घटक म्हणजे सरकारी शासकीय यंत्रणा! मंत्री सांगतात एक आणि सरकारी यंत्रणा करते तिसरेच हे नवीन नाही. त्यामुळे मंत्र्यांनाच पूर्ण दोष देता येणार नाही. हगणदारीचा प्रश्न नवीन नाही. आधीच्या सरकारनेही हागणदारी मुक्तीसाठी खूप कार्यक्रम राबविले अनुदान दिले. संडास बांधले, त्याची काय अवस्था आहे? मंत्री बदलले पण सरकारी यंत्रणा ऑफीसर तर नाही बदलेत ना? आधीचे हगणदारी कार्यक्रम का फेल झालेत?

**शेतकऱ्यांसाठी समुपदेशक जाहीरात का नाही?**

सरकारने सर्वात आधी शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोकण्यासाठी समुपदेशनची

टोल फ्री समुपदेशन फोनलाईन चालू करावी. कर्जबाजारी, अतीगरीब, नापिकीमुळे, आजारीपणामुळे, व्यसनाधीनता, मुलीच्या लग्नाची काळजी, कौटुंबिक तानतनाव कोणत्याही कारणांमुळे आत्महत्येचे विचार डोक्यात आले तर पिडीत लोकांना शेतकरीमित्र परावृत्त करण्यासाठी जाहिराती आणि इतर धार्मिक कार्यक्रमांच्या माध्यमातून सपाटून कार्यक्रम राबवावा.

### डॉ. ए. वेल्युमनी यांचे उदाहरण

आधीच्या हागणदारी मुक्तचे कार्यक्रम सरकारी यंत्रणेकडून अयशस्वी झाले. याचे महत्वाचे कारण एक आहे मानवी संडास बद्दलची किळस! दक्षिण भारतात एक रक्त तपासणी संबंधी एक थायरोकेअर म्हणून नामांकित आंतरराष्ट्रीय कंपनी आहे. डॉ.ए. वेलुमनी हे त्या कंपनीचे मालक आणि संस्थापक! थायरोकेअरचे मालक ज्यांचा अब्जोचा बिजीनेस आहे ते महिण्यातून एकदा कंपनीतील संडास स्वतः स्वच्छ करतात. स्वतःची सोडून इतरांची शी वा शीचे शिंतोळे जरी आपल्या नजरेस पडले तरी मनात जीवघेणी किळस निर्माण होते. त्यामुळेच जास्त करून सार्वजनिक संडास कोणी वापरत नाहीत. कृपया वाईट वाटू नका पण समजा पतंप्रधानांनी एखादे सार्वजनिक संडास स्वच्छ करण्याची बातमी चित्रीकरणासहीत प्रक्षेपित केली की खूप बदल पडू शकतो. डॉ. ए. वेल्युमनीचे उदाहरण घेऊन प्रत्येक शाळेतील हेडमास्तरांनी महिण्यातून एकदा शाळेतील संडास स्वतःच्या हाताने स्वच्छ केला की चपराशी वा शिक्षकांना संडास सदनिका साफ करायला किळस किंवा लाज वाटणार नाही विद्यार्थ्यांपासून लोकांचीही मानसिकता बदलेल आणि बहुतेक ठिकाणी बंद पडलेल्या सार्वजनिक संडास सदनिका कार्यान्वित होतील!

गोऱ्यांच्या अनुकरणातून आम्ही संडास बांधलेत, गटारे, सांडपाणी वाहिण्या बांधल्या, पण संडास बाथरूम स्वच्छ करण्यासाठी वापरलेली ॲसिड आणि इतर केमीकल्स रसायने मलमूत्रात जातात. मग अशा शहरातील मलमूत्रापासून बनणारे खत हे शेतीसाठी, शरीरासाठी घातकच बनणार नाही का? साहेबांनी हे लक्षात घ्यावे.

### भारतीय कुटूंबांसाठी घातक जाहिराती बंद करा!

घरी संडास सदनिका नाही म्हणून बाईने काडीमोड घेतला, लग्न तोडले अशा जाहीराती तात्काळ शासनाने बंद कराव्या. घरी संडास नाही म्हणून नवराबायकोचे



झगडे आणि कुटुंबामध्ये तनाव वाढत आहेत. भारतीय कुटुंबव्यवस्थेला, भारतीय समाजाला बायकोने डिव्होर्स दिला म्हणून वाहवाह वाल्या जाहीराती घातक आहेत. घरी शौचालय नाही म्हणजे आत्मसन्मान! आणि घरच्या स्वयंपाकघराला लागून असणाऱ्या संडासमधून दुर्गंध येणे, टर्र फूस्स आवाज येणे तो सुद्धा आत्म सन्मानाचा की! घरातला सदस्य संडास करत असेल त्याचा दुर्गंध घाण वास स्वयंपाक घरातल्या अन्नामध्ये घूसतो तो म्हणजे आरोग्यवर्धक? घरातली बाई कुटूंबातल्या इतर मानवाईक पुरुषांसमक्ष संडासमध्ये घूसते तेव्हा कुठे असतो आत्मसन्मान?

भारतातील परिस्थिती वेगळी आहे. प्रचंड लोकसंख्या असलेल्या देशात जिथे अन्न आणि पाण्याची पुरेशी व्यवस्था शंभर टक्के शक्य नाही त्यानुसार पाऊले उचलणे ठीक आहे. गोऱ्यांचा अनुनय आणि अनुकरण करून नव्हे! भारतीयंचा हजारो वर्षाचा इतिहास नाही हा एक दीर्घकालीन सखोल अभ्यास आहे. सकाळी वा संध्याकाळी भारतीय खेड्यांमध्ये रस्त्याच्या कडेला शौचास बसलेल्या बायांचा नजारा चांगला नाही, तो जरूर बदलायला हवा. अपारदर्शी कूपन असलेल्या, खुले शेड असलेल्या लाईटची व्यवस्था असलेल्या हगण गोदरी किंवा तत्सम व्यवस्था भारतीय अतीगरीब वर्गाला तारू शकते.

### हगणदारी युक्त की हगणदारी मुक्त

आधी काळात घरी जेवण करत होते आणि बाहेर परसाकडे जात होते. आता गोऱ्यांच्या अनुनयामुळे आम्ही बाहेर जेवायला जातो आणि घरी येऊन संडास करतो.आमचा देश हगणदारी मुक्त होत आहे की हगणदारीयुक्त हेच कळत नाही आहे. भारतीयांनी अनुकरण करण्यापेक्षा जागतिक नेतृत्व करावे. गोऱ्यांची प्रणाली आम्ही वापरण्यापेक्षा आमची उघड्यावरच्या हगणदारीतून शेंद्रीय उत्पादन घेण्याची नवीन प्रणाली ते गोरे लोक कसे अनुकरण करतील याचा विचार व्हावा!

(दि. २८ मे २०१५, अभयराज्य)

# ९. भारतीय शेतकऱ्यांचे दिवस कसे बदलतील?

शिवाजी महाराजांना मोगल, आदीलशाही, निजामशाही यांना टक्कर द्यावयाची होती. महाराजांकडे सैन्य, संख्याबळ, शस्त्रसाठा पैसा मोगलांच्या मानाने खूपच कमी होता. त्यामुळे मैदानात समोरासमोर येऊन मोगलांना टक्कर देणे शक्य नव्हते आणि त्यांनी तो मार्ग त्यामुळे स्वीकारलाच नाही.सह्याद्रीच्या डोंगरकपारीत लपून बसून गनीमी काव्याने यशस्वी अटॅक करीत गेले. भारतीय शेतकरी अमेरिकन शेतकऱ्यांच्या तुलनेत पूर्ण कमकुवत आहे. मोठी मोठी शेती, अत्याधुनिक तंत्रज्ञान, मोठ्या मोठ्या मशीनरीज असल्याने पश्चिमेकडील शेतकरी भारतीय शेतकऱ्यांच्या तुलनेत एकरी कितीतरी पटीने जास्त उत्पन्न काढतो. जागतिक मार्केट खुले असल्याने भारतीयांना अपेक्षीत रेट मिळत नाही. जितका खर्च एक किलो धान्य उत्पादन करायला भारतीय शेतकऱ्यांना येतो त्यापेक्षा खूप कमी खर्च पश्चिमेकडील शेतकऱ्यांना येतो. जागतिक बाजारात पश्चिमेकडील शेतकरी कमी भावात धान्य उपलब्ध करून देतो म्हणून भारतीय शेतकऱ्यांच्या धान्याला अपेक्षीत किंमत मिळणे शक्य नाही. याचा अर्थ भारतीय शेतकऱ्यांनी आयडीया लढविण्याची गरज आहे.

**सेंद्रीय उत्पन्न घेणे हा एक हमखास उपाय**

गोऱ्यांनी नवीन नवीन सल्फेट एनकेपी युरीया इत्यादी इन्सेक्टीसाईडस् शोधून काढलेत. जास्त उत्पादन मिळते म्हणून भारतीय शेतकरी हे सर्व केमीकल्स वापरायला लागलेत. गोऱ्यांनी चाल तर सर्व बाहेर गरीब देशात लावून दिली नंतर त्यांच्या लक्षात आले की हे सर्व केमीकल्स (सल्फेट, इन्सेक्टीसाईड, संकरीत जाती) मानवी शरीरासाठी घातक आहेत. आणि आता सर्व पश्चिमेकडील लोकांची सेंद्रीय धान्ये म्हणजे विना सल्फेट, रसायन न वापरता पिकविलेले अन्न खान्याची धडपड चालू आहे. सेंद्रीय पिकांची किंमत ही रसायनिक खते वापरून घेतलेल्या उत्पन्नापेक्षा तीन चार पट आहे. विना सल्फेट विना रसायन मेहनत जास्त लागते, एकरी उत्पन्न खूप कमी मिळते त्यामुळे सेंद्रीय म्हणजेच ऑरगॅनीक उत्पन्नाला जास्त भाव द्यावाही लागतो.

**तुम्हाला मेंढ्या बसविणे माहीत आहे का?**

शेतीतून उत्पन्न जास्त मिळावे म्हणून शेतकरी उन्हाळ्यात मेंढ्या बसवितात. पोर्टेबल कंपाउंड बांधून धनगर लोक रात्रभर मेंढ्या शेतात बसवितात. शेतकरी दर



रात्रीप्रमाणे धनगराला पैसे देतात. मेंढ्या शेतातच हग मूत करतात त्यामुळे जमिनीला खत मिळते.

मनुष्यप्राणीइतर प्राण्यांपेक्षा तेल तूपवाले मसालेदार स्वादिष्ट जेवण जेवतो. मनुष्यप्राण्याची संडास ही इतर प्राण्यांच्या संडासपेक्षा अतीउत्कृष्ठ दर्जाचे खत असते. एक किलो मानवाच्या संडासाच्या खतापासून जवळपास पंचेवीस किलो दर्जेदार शेंद्रीय उत्पन्न निघते. भारतात पासष्ट टक्के लोक खेड्यात राहतात. एक हजारपेक्षा कमी लोकसंख्या असलेले खेडे महाराष्ट्रात बेचाळीस हजार आणि पूर्ण भारतात अंदाजे सहा लाख आहेत. जे लोक रस्त्यावर वा सार्वजनिक ठिकाणी उघड्यावर संडास करतात यांना पोर्टेबल कंपाउंड टाकून संडास करण्यासाठी राखीव जागा दिली तर आपल्या देशाला भरघोष सेंद्रीय उत्पन्न घेता येईल. खेड्यांमध्ये पन्नास घरांपैकी दहा घरात संडास आहेत (महाराष्ट्रात सरासरी) एका घरासाठी एक याप्रमाणे भारतभर पंधरा वीस कोटी संडास बांधणे शक्य नाही.

**सेंद्रीय उत्पन्नासाठी मार्केट**

नागपूर हे भारताच्या मध्यभागी येते. इथे सेंद्रीय उत्पन्न डिसपॅच करण्यासाठी गोडाऊन पॅकींग टेस्टींग सेंटर बनू शकते. प्रगतीशील उद्योजक संस्था पुढाकार घेऊन निर्यात केंद्र वा डिसपॅच केंद्र उभारू शकतात.

**घ्यावयाची काळजी**

भारतीय लोकांना आपल्या आपल्यातच काड्या करण्याची, एक दुसऱ्यांची बदनामी करण्याची सवय आहे. आपण मनुष्यप्राण्यांच्या संडास पासून बनलेल्या खतापासून उत्पन्न घेतो म्हणून मार्केटमध्ये तिरस्काराची लाट पैदा करू नये तसे होऊ देवू नये. गोरे लोक विविध औषधे जे आपण खातो कशापासून बनतात, घटक काय आहेत याचा आपल्याला पता लागू देत नाहीत. प्रायव्हेट गुपीत वा प्रोप्रायरी इन्फारमेशन सांगून, बिंग फूटेल म्हणून सांगतच नाहीत.

दुसरा एक महत्वाचा मुद्दा म्हणजे झिरो डिफेक्ट! आंतरराष्ट्रीय बाजारात आपल्याला उत्पन्न पाठवायचे असेल तर सेंद्रीय उत्पन्न म्हटले तर एकूण एक दाना हा सेंद्रीयच असायला पाहिजे. भारतीयांना शंभर टक्के ॲक्यूरसीची सवय नसल्यामुळे सेंद्रीय उत्पन्नामध्ये थोडेसे जरी सल्फेटपासून घेतलेले उत्पन्न मिसळले तरी पूर्ण गोडाऊनच रिजेक्ट होऊ शकतो या मुद्यांवर भारतीय शेतकऱ्यांची मानसिकता बदलणे आवश्यक आहे.

(९ सप्टेंबर २०१३, अभयराज्य)

# १. गोऱ्या ब्रिटिशांनी उभी केलेली न्यायव्यवस्था भारतासाठी सक्षम आहे काय?

**जातपंचायतींना न्यायालयीन प्रक्रियेत सामील करा!**

लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख यांचे पुस्तकातील खाली दिलेला उतारा आपल्याला शितावरुन भाताची परीक्षा देईल.

'एके बाईन हिंदुस्थानच्या माहिती गारीचे पुस्तक सन १८३३ साली लंडन शहरात इंग्रजी भाषेत छापले. त्याचे प्रथम भागात पान ८७ यात असे लिहिले आहे की, 'फौजदारी मुळदम्यात कैदीने गुन्हा केलाआहे किंवा नाही हे ठरविण्यास हिंदुस्थानात महत्प्रयास आहेत.याचे कारण कैदीस खोटी साक्ष देणारी लोक सहज मिळतात. खोटी साख देणे हे पाप किंवा अधर्म हिंदू लोकास वाटत नाहीत. या बद्दल शासन होईल हे त्यास भय नाही. परंतु लोकांमध्ये स्तुती होईल असे त्यास वाटते. मोठे पदवीचे लोक खोटी शपथ करण्यास सांगतात आणि जो खोटी शपथ करील त्यास शाबासकी देतात.त्याचे मनास काही वाईट वाटत नाही. खोटे साक्षीदार पाहिजे तितके त्या प्रकारणात एक एक आणा दिल्हा तर मिळतील अशी हिंदुस्थान देशाचे लोकांची स्थिती सर विलीयम ज्योनस् साहेब लिहितो.'

'ईस्ट इंडिया स्केच बुक बाय अ लेडी' हे इंग्रजी पुस्तकाचे नाव. या पुस्तकातील वर दिलेला उतारा आहे. सर विलीयम ज्योनस् हा कलकत्याचा जज होता व यासारखा माहितगार साहेब लोक आजपर्यंत झाला नाही. या करीता त्याचे मताची योग्यता इंग्रज लोकांना मोठी आहे.' असे लोकहितवादी यांनी नमुद केले आहे.

खोटी शपथ किंवा साक्ष ही आजही सर्रासपणे दिली जाते. खोट्या तक्रारी दाखल केल्या जातात. खरे तर खोटी साक्ष देऊन, खोटी शपथ देऊन, खोट्या तक्रारी देऊन प्रचलीत लोकशाहीत लोकच लोकांचाच घात करीत आहेत. यामध्ये लोकांचे हित नाही. वाचणाऱ्यांनी वाईट वाटून घेऊ नये पण हा आपल्यातील फार मोठा दुर्गूण आहे.या दुर्गूणाचे माणसामाणसातून समाजातून उच्चाटन केल्याशिवाय गोऱ्या चमडीच्या ब्रिटीशांनी सुरु केलेली न्यायव्यवस्था कार्यक्षम होऊच शकत नाहीत. १८०० च्या काळात जेव्हा ब्रिटीशांनी चालू केलेली कायदेकानून आणि



न्यायव्यवस्था आधीपेक्षाही खराब अवस्थेत पोहचलेली आहे. खोट्या तक्रारी करणे, खोट्या शपथा देणे हे बंद होऊ शकेल काय? याला कोण बंद करु शकतो? यावर झटपट असा उपाय मुळात नाहीच! मनुष्याच्या मनोवृत्ती, समज, विचारधारणा, विचारसरणी, स्वभाव या गोष्टी लहानपणीच निर्ढावल्या जातात.

सर्वच पालक आणि शिक्षक यांनी पक्के मनाशी ठरवून जर हा बदल करायचे ठरविले तर दोन तीन पिढ्यांच्या कालावधीत शक्य आहे. एक पक्का स्वच्छ विचारधारेचा आग्रह कमीत कमी दोन तीन पिढ्या सततपणे प्रयत्नरत राहून पालक आणि शिक्षकांनी चालविला तर बदल जरूर शक्य आहे पण आताचे काय?

आताच्या घडीला तर आपण वस्तुस्थितीला धरून चालणे आवश्यक आहे. गोऱ्या चमडीच्या ब्रिटीशांनी उभी केलेली न्यायालयीन यंत्रणा ही खरोखर कुचकामी आहे हे उघडपणे कोणीही बोलण्याची हिम्मत करीत नाहीत. खुप साऱ्या केसेस कोर्टात दाखल होतात. त्यापेक्षा किती केसेसचा सोक्षमोक्ष होतो? मला शंका आहे एक टक्का तरी होत असावा का? ज्या कोर्ट केसेसचा निकाल लागतो त्यासाठी सरासरी किती वेळ लागतो? चार रुपयाच्या १९७८ मधील चोरलेल्या चऱ्याच्या केसचा निकाल २४.११.१३ ला लागतो म्हणजे अप्रत्यक्षपणे प्रचलीत न्यायव्यवस्थेची ही उडविलेली खिल्ली नव्हे काय?

दशकानुदशके कोर्ट केसेस प्रलंबित राहतात. तारीख पे तारीखकरत करत पिढ्यांच्या पिढ्या वैकुंठात पोहचतात. या परिस्थितीत सुधार व्हायची सुतराम शक्यता नाही. मजबूरी म्हणून लोकअदालत सारखे पिल्लू बाहेर काढून थोडीसी मलमपट्टी केली जाते. बऱ्याच साऱ्या खुनांच्या आरोपींची निर्दोष सुटका होते. मग खून केला कोणी? खून झाला पण जबाबदार कोणीच नाही? आमचे पोलीस आणि न्यायालय अपयशी ठरत आहे. ही परिस्थिती खरोखर विश्वासार्ह आहे काय?

गोऱ्या चमडीच्या ब्रिटीश लोकांनी फक्त न्यायालयीन व्यवस्थाच नाही तर कायदे व्यवस्था सुद्धा आपल्या देशावर थोपविली. गोऱ्या चमडीच्या ब्रिटीशांकडून घेतलेल्या सर्वच गोष्टी चांगल्याच असतील असे नाही. पण आपण अंधानुकरण करीत आहोत. पुरोगामी म्हणून टिमकी मिळविण्यापेक्षा मूळ कारणांचा अभ्यास करणे जरूरी आहे. कुठे कुठे आम्ही पुरोगामी म्हणणाऱ्यपेक्षा अधोगामी, असते एक आणि करतो वेगळेच. मी दहा वर्षे अमेरिकेत राहून त्यांच्या विकासाचा अभ्यास केला आणि भारताबरोबर तुलना केली. पाश्चिमात्यांच्या प्रगतीचा आणि

संस्कृतीचा मूळीच संबंध नाही.

आरक्षणामुळे जातीची बांधीलकी परत मजबूत होत आहे. काल दलितांच्या वस्त्या वेगळ्या आहेत म्हणून तक्रारी होत्या, आज 'काशीरामजी नगरी' सारख्या नव्या वस्त्या पुरोगामी पद्धतीने उभ्या होत आहे. सर्वजन जातसंस्था मोकळीत निघावी म्हणून पाढे वाचतो. स्वतःच्या मुलामुलींच्या लग्नाची पाळी आली की वर वधु जातीतला हवा असतो. भारतीय बापाला मरेपर्यंत आपल्या मुलाची काळजी असते. परजातीतील अनोळखी घरात लग्न जोडून धोका पत्करण्याची तयारी कोणाचीच नसते. बोलताना गोष्टी मोठ्या मोठ्या! आंतरजातीय विवाह केले पाहिजे म्हणून मोठ्या मोठ्या गप्पा करायच्या! स्वतःच्या घरचे लग्न जोडायचे असले तर आपल्या जातीतच ओळखी साधून लग्न! आपल्या जातीतच लग्न केले तर वैवाहिक अडचणी सामंजस्याने मिटण्याची हिंमत असते. परजातीतल्याशी लग्न केले तर उद्या आलेल्या वैवाहिक अडचणी सोप्या पद्धतीने मिटविले जाऊ शकण्यासाठी कोणी मदत करेल? पाल्याच्या आयुष्यात पाल्यांचे विवाहानंतर सुख आणि आनंद ही पालकांची भारतीय प्रथम प्राथमिकता असते. आमची संस्कृती ही पाश्चिमात्यांची नाही जेथे मुले थोडी मोठी झाली की हाकलून देतात, त्यांना पाल्यांच्या येणाऱ्या भावी आयुष्यातील सुख दुःखाची चिंता नसते.

आपल्या भारतीय संस्कृतीला धरुनच जात पंचायतीची प्राचीन व्यवस्था आहे. मन स्वच्छ असले की जात आडवी येत नाही. सर्व समाज, सर्व धर्म आणि देश परिस्थिती नुसार एकत्र येवू शकते! गाव पंचायतीचा, जात पंचायतींना घटनेत सांभाळून घेवून छानबीन करुन नव्या रूपात सादर करणे आवश्यक आहे. जात पंचायतीसारख्या पारंपारिक नव्या संस्थातून समूह शक्तीचा प्रत्यय येतो. गरीबांसाठी ही पर्यायी झटपट न्याय देणारी न्यायालयीन व्यवस्था पुर्नस्थापित करणे आवश्यक आहे.

तक्रारकर्त्यांचे किंवा आरोपीने खोटे बोलणे, खोट्या शपथा घेणे, खोट्या तक्रारी करणे जातपंचायतीसमोर शक्य नसते. उलट पोलीसांसमोर, वकीलांसमोर आणि वकील न्यायाधीशासमोर सर्रासपणे खोटे बोलले जाते. जवळपास ७० टक्के ते ८० टक्के पोलीसांचा वेळ खोट्या तक्रारी सोडविण्यात जातो, असे नागपूरच्या पोलीस आयुक्तांनी बोलले होते.

जातीतून शिक्षा झाल्यावर गुन्हेगार दबावात राहून तोच गुन्हा करीत नाही. पण



आमच्या प्रचलीत न्यायव्यवस्थेने शिक्षा दिल्यावर ब्रिटीश औलादीने उभ्या केलेल्या जेलमधून किती लोक दुरुस्त झालेत? उलट जेलमध्ये काही प्रमाणात भ्रष्टाचार असल्याने फोन, चिकन बिर्यानीची व्यवस्था कैद्याची झाल्याचे ऐकण्यात येते? गोऱ्या चमडीच्या ब्रिटीश औलादीने उभ्या केलेल्या कोर्टामध्ये न्याय पिडीतांची संख्या भयंकर आहे. 'शहाण्या माणसाने कोर्टाची पायरी चढू नये' असे बोलून कितीतरी लोक गुपचूप अन्याय सहन करतात. जात पंचायतीकडून जिथे गरीबांना तडकाफडकी न्याय मिळते त्याचे एक्के दुक्के प्रकरण मीडियाने छापली तर ती जातपंचायत चुकीची? आरक्षण धोरणामुळे जात ही समूह म्हणून बळकट बनत आहे. जात पंचायत व गाव पंचायत ही नियत ६ व्यवस्था पुन्नजिवीत करणे अतिआवश्यक आहे. पण नव्या शुद्ध अवस्थेत केली तर परत छान!

'जे काही उपचार करायचे ते कायदेशीररित्या आपल्याच प्रचलीत कोर्ट नावच्या दवाखान्यातूनच करा. पण पेशंट वेळेत दुरुस्त होईल याची खात्री आम्ही देवू शकत नाही.' असे हुकूमनामा असलेले हॉस्पीटल म्हणजे हे प्रचलित गोऱ्या चमडीच्या ब्रिटीश लोकांनी उभी केलेली न्यायपालिका!

विद्यमान न्याय संस्थेत जो श्रीमंत पैसेवाला आहे तो काही अंशी बळाचा वापर करुन भ्रष्ट, खोटारड्या न्यायव्यवस्थेतील घटकांचा फायदा घेऊन आपल्या बाजूने निर्णय वळवू शकतो. जात पंचायतीत किंवा गाव पंचायतीत वार्ड पातळीवर अशी शक्यता नसल्यासारखी असते. भारतीय गावकरी समाज हा अजूनही गाव पातळीवर भांडण तंट्यासाठी सत्याला धरुन चालतो.

काही वकीलांची खोट्या तक्रारी किंवा चढवून बढवून तक्रारी दाखल करण्यासाठी अशलीलांना प्रवृत्त करण्याच्या कार्यशैली खूप हानीकारक आहे.

जात पंचायतीतून किंवा तत्सम सामोपचारातून न्याय मिळालेल्या समाधानी लोकांची संख्या जास्त आहे प्रचलीत न्याय संस्थेत वेळेत न्याय मिळून, समाधानी लोकांची संख्या खूप खूप कमी आहे. कोणी मुश्किलीनेच भेटतो जो या न्याय व्यवस्थेकडून समाधानी आहे. गोऱ्या चमडीच्या लोकांनी सुरु केलेली न्याय यंत्रणा आणि कायदेव्यवस्था चांगलीच किंवा उच्चदर्जाचीच असणार हा आग्रह भारतीयांनी करून घेतला.

'ढवळ्या सोबत बांधला पवळ्या, गुण नाही पण वान लागला' अशी परिस्थिती झाली आहे. ब्रिटीशांची सिस्टम तर स्विकारली पण आमच्यातले,

सामान्यापासून ते उच्चशिक्षीत, गल्लीपासून दिल्लीपर्यंत खोट्या तक्रारी करणे, खोटी शपथ देणे, खोट्या साक्षी देणे, खोटे बयान देणे असे दुर्गूण असल्याने उलट सर्वांनाच अतोनात मानसिक त्रास होत आहे (काही मोजके लोक सोडल्यास). एकदाची राज्यकारभार यंत्रणा ग्राम पातळीवर विस्तारित केले तर देशाच्या एकत्रित ध्येय धोरणांच्या दिशेवर फरक पडू शकतो. पण समजा न्यायदान यंत्रणा ग्राम पातळीवर व जात पातळीवर विस्तारीत केली तर आपल्या देशाच्या बहुतांशी जनतेला खूप फायदा होईल. गाव पंचायत किंवा जात पंचायत किंवा तत्सम यंत्रणा छोट्या मोठ्या खेड्यापासून, वार्ड पातळीवर असणे अति आवश्यक आणि काळाची गरज आहे. सध्याच्या मौजूदा ऱ्हास होण्याच्या परिस्थितीत असलेल्या जात पंचायतींना संजीवनी देऊन लोकांच्या परिस्थितीला अनुरुप उभे करणे आवश्यक आहे.

मी दहा वर्षे अमेरिकेत राहून पाश्चिमात्यांनी केलेल्या विकासाचा चांगल्या पद्धतीने अभ्यास केला. संस्कृती आणि विकास याचा संबंध नाही. भारताला उद्या महाशक्ती व्हायचे असेल तर आपली जुनीच संस्कृती ठेवून बदल करता येतात.

(५ डिसेंबर २०१३, अभयराज्य)






# २. ही वेळ संविधान आणि न्यायपालिका परिवर्तनाची!

### दहीहांडीवरील बंधणे हटवा!

भारत जेव्हा स्वतंत्र झाला त्या वेळेस भारतावर राज्य करणाऱ्या राज्यकर्त्यांची पीढी ही गुणवत्ता श्रेणीतील अती उच्चशिक्षीत लोकांची होती. त्या काळात शाळांमधून उत्तीर्ण होणारे क्रीमलेअरचा गुणवत्ताधारी विद्यार्थी बॅरीस्टर वकील बनायचे, पदेशात डिग्री घेऊन परत येत होते. पंडीत जवाहरलाल नेहरू, नेताजी सुभाषचंद्र बोस, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, राष्ट्रपिता महात्मा गांधी, वल्लभभाई पटेल, डॉ. राजेंद्र प्रसाद इतर सर्वही त्यांच्या काळातील टॉपच्या क्रिम लेअरवाल्या गुणवत्ताधारी विद्यार्थ्यांमधील होते! त्या काळात टॉपचे गुणवत्ताधारी विद्यार्थी वकीली शिकत होते. त्यामुळे न्यायपालिका तसेच राज्यकर्त्यांची पिढी हे अती कुशल असामान्य अतिबुद्धीमान, समाजातील सर्वोच्च विचारवंत लोकांची बनली होती.

### दहावी बारावीच्या मेरीटमधील विद्यार्थ्यांचा समतोल

पण काळाच्या ओघात हे सर्व बदलले. आज दहावी बारावी वाले टॉपचे क्रीमलेअरचे गुणवत्ताधारी विद्यार्थी हे डॉक्टर्स किंवा इंजीनियरिंगकडे वळविले जातात. त्यानंतर पहिल्या दुसऱ्या श्रेणीतील विद्यार्थी हे वकीली सारख्या अभ्यासक्रमात प्रवेश घेतात. स्वातंत्र्यपूर्व वा १९५० च्या काळात पदावर असलेली न्यायपालिका आणि आज विद्यमान स्थितीत न्यायपालिकेच्या हुद्यावर बसलेले लोक यामध्ये भरपूर फरक असण्याची शक्यता नाकारता येत नाही. गुणवत्ता श्रेणीतील टॉप क्रिम मेरीटमधील जे दहावी बारावीतच फिल्टर होतात त्यांचे विषयाचे सखोल ज्ञान मिळविण्याची क्षमता, त्यांची आकलन क्षमता, त्यांची प्रश्न सोडविण्याची क्षमता ही बहुशी तुलनात्मक असामान्य असते यावर सहसा कोणी नाही म्हणणार नाही. अशा विद्यार्थ्यांचा समतोल प्रत्येक शाखेत असणे आवश्यक आहे.

### आधुनिक लोकशाही संविधानाचा इतिहास!

विद्यमान विज्ञान युग, मशीनरीज, औद्योगीकरणचे युग हे १७६० च्या काळात युरोपात सुरू झाले. आधुनिक लोकशाहीची व्याख्या लोकांचे लोकांसाठी

असलेले पहिले संविधान १७ सप्टेंबर १७८७ ला अमेरिकेत अमलात आणल्या गेले. भारतातील विद्यमान न्यायपालिकेचा पाया इंग्रजांनी १८००च्या काळात घेतलं. ज्या देशात पैसे देवून खोटे पुरावे दिल्या जातात, वरून खोटे बोलणाऱ्यांना शाबासकी मिळते, खोटे बोलणाऱ्यांमध्ये शिक्षीत लोकांचा समावेश असतो तिथे ही ब्रिटीशांनी सुरू केलेली न्यायपालिका यशस्वी होणे कठीण आहे, हे १८२५ च्या काळातच इंग्रजांना कळून चुकले होते. तरीही २६ जानेवारी १९५० रोजी इंग्रज, अमेरिकन संविधानाचा प्रभाव असलेली राज्यघटना भारतात अमलात आणल्या गेली. १९५० च्या काळातील ब्रिलीयंट भारतीय टॉप क्लासच्या राज्यकर्त्यांना वाटले असावे आपले सर्वसामान्य लोक उशीरा का होईना मानसिकदृष्ट्या परिवर्तीत होतील आणि आपला देश महासत्ता बनेल. पण भारतीयांची पंचाहत्तर वर्षानंतरही परिस्थिती उलट बिघडतच जात आहे. जात ढिवराची आणि राजवट ब्राह्मणांची। अशी म्हण आम्हाला लहानपणी ऐकायला मिळायची. आज आम्हाला त्याचा अर्थ कळला. हजारो वर्षापासून भारतभूमीत मत्सरघात परसलेला आहे, प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष, नकळत आपलेच लोक आपल्याला अडथळे उभे करतात. इंग्रज युरोप प्रणित राज्यघटना भारतात यशस्वी होणे कठीण आहे. आपण ठरलो भारतीय आणि राजवट करण्याचा प्रयत्न करतोय पाश्चिमात्यांसारखी. ॲलोपॅथी शरीराला मानवत नाही, प्रचंड साईड इफेक्ट आणि शरीराला तीच औषध सुरू!

**योग्य ताळमेळ नसलेले प्रशासन ?**

मंत्री, प्रशासनातील अधिकारी, न्यायपालिका, राज्यशासन, प्रसारमाध्यमे वेगवेगळ्या दिशेने काम करतात, योग्य ताळमेळ नाही, समन्वय नाही. मंत्र्यापासून सर्वसामान्य लोकांपर्यंत असलेल्या दहा ते पंधरा शासकीय यंत्रणेच्या स्तरांमध्ये भ्रष्टाचार, कामचुकारपणा बोकाळला आहे. कांग्रेस सरकारनेही मान्य केले होते की राष्ट्रीय कार्यक्रमात गुंतवणूक केलेल्या एका रूपयांपैकी फक्त पंधरा पैसे सर्वसामान्यांच्या उपयोगी पडतात. याचा अर्थ भारत सरकारने आतापर्यंत दोनशे बिलीयन डॉलरचे लोन घेतले त्यापैकी तीस बिलीयन लोकांसाठी खर्च झाले? ज्या देशात एक रुपयांपैकी फक्त पंधरा सतरा पैसे सर्वसामान्यांच्या उपयोगी पडतात अशी लोकशाही यंत्रणा आपल्या कोणत्या कामाची? आपल्या घरी बाळ जन्माला येते तेव्हा त्याला डोक्यावर चाळीस हजार रुपयांचे कर्ज सरकारने घेवून ठेवले आहे हे तुम्हांला माहीत आहे का? आमचे बोलणे कृपया टिका म्हणून



समजू नये आम्ही वास्तविकता सांगतो. माफ करा पण आपल्याला सोल्यूशन पाईंट ऑफ व्यू उपाय शोधून, राज्यघटनेत, न्यायपालिकेत योग्य बदल अमलात आणणे आवश्यक असहे. न्यायपालिकेचे विकेंद्रीकरण करून वार्ड स्तरावर खेडेगाव स्तरावर न्यायपंचायतीची बांधणी आवश्यक आहे. ज्या लोकांसमोर खोटी साक्ष वा पुरावे कोणी सादर करू शकणारच नाही. निसर्ग निर्मात्याने हिंसा निर्माण केली ती कॅलक्यूलेटेड आणि कंट्रोल्ड वापरासाठी. ती अंमलबजावणी संविधानातून आवश्यक आहे. ढोबळ मानाने संविधानाच्या भाग ५ मध्ये अध्याय ४, भाग सहामध्ये अध्याय ५ आणि ६ तसेच नवीन अध्याय न्यायपंचायतींच्या रचनेसाठी जोडावा लागेल. सर्वसामान्यांना स्वतंत्रता, समता, बंधुता अशा मोठ्या मोठ्या शब्दांपेक्षा सुख शांती समाधान हे शब्द महत्वाचे आहेत हा मुद्दा लक्षात घ्यावा. इंग्रजाळलेली मानसिकता जाळून काढा!

साधा दूरदर्शनचा सरकारी चॅनल घ्या किंवा गरीब लोकांपर्यंत पोहचणारा आकाशवाणी वाला रेडीओ सर्व इंग्रजाळलेले! यांना टेनीसच्या बातम्या, इंग्रजांच्या क्रिकेट आयपीएलच्या बातम्या मुख्य बातम्यांमध्ये देता येतात. कबड्डी सारख्या भारतीय खेळाची कामेट्री द्यायला लाज वाटते काय? तुम्ही लहानपणापासून कबड्डीची कॉमेंट्री वा प्रसारण होऊ द्या, सर्व मुले कबड्डी खेळणे सुरू करतील ह्या साध्या बाबीही बुद्धीवंताच्या लक्षात येत नाही.

अगदी तशीच परिस्थिती दहीहांडी वाल्या बाळगोपाळांची झाली. ब्रिटीशांनी सुरू केलेल्या न्यायपालिकेने आदेश दिला आणि दहीहांडी खेळणाऱ्या बाळगोपाळांवर बंदी आणल्या गेली आहे. आपलेच भारतीय आपले जुने खेळ आम्ही किल करायला निघालो. वयाच्या चार–पाच वर्षापासून मुले क्रिकेट खेळतात, जख्मी होतात त्यांच्यावर बंदी का येत नाही? क्रिकेट खेळताना गोटीला चेंडू लागू नये म्हणून चड्डीत गार्ड घालायला सुचविता. मग दहीहांडी, कबड्डी खेळात होणाऱ्या इजांसाठी उपाय सुचत नाहीत का? की उपाय सुचविण्याची क्षमता आमच्या पदाधिकाऱ्यांना नाही? आम्ही या माध्यमातून योग्य अंमलबजावणीयुक्त उपाय सुचविण्याचा प्रयत्न करतो आहोत, या आधीही केला आहे. इतक्यातही एक बालवन नावाचा खेळाडू छातीवर क्रिकेटचा चेंडू आदळून इंग्लंडमध्ये मरण पावला हे इंग्रजाळलेल्यांना दिसत नाही.

**आमच्या पदाधिकाऱ्यांनी भारतीय इतिहास माहीत करावा!**

सर्वांना माहिती आहे शिवाजी महाराज यांनी औरंगजेबाच्या तावडीतून

आग्राहून सुटका केली. शिवाजी महाराज आणि नऊ वर्षाचे बाल संभाजी फळांच्या पेटाऱ्यात बसून पोलादखानाच्या कडेकोट वेढ्यातून बाहेर निघाले. नऊ वर्षाचे बाल संभाजी राजे यांनी किंचीत जरी पेटाऱ्यात असताना आवाज केला असता तरी मराठ्यांचा इतिहास बदलला असता. आवश्यकता पडते तेंव्हा आमचे बालवीरही जिवावर खेळले आहेत, युद्धात सामिल झाले आहेत. असे आम्हाला म्हणायचे आहे, कायदे बनविणाऱ्यांनी समजून घ्यायचे आहे.

इंग्रज लोक मल्टीपल लग्न करतात, कुटुंबात घरात सुख शांती नांदत नाही. एकाच आयुष्यात लहान मुलांचे दोन–चार वेळा बाप बदलतात. अपत्यांची हेळसांड होते म्हणून गोऱ्या पाश्चिमात्य लोकांनी बाल संरक्षण कायदा त्यांच्यासाठी बनविला. कैलाश सत्यार्थी सारख्या भारतीयांना नोबेल पारितोषिक देवून, पौपोगंज करून गोरे लोक आपल्या संस्कृतीचा प्रचार करतात. आमचे कायदे करणारे लोकांना काहीतरी करतोय असे दाखविण्यासाठी गोऱ्यांची कॉपी मारतात, नवीन कायदे करतात. लबाड इंग्रज स्वतः हे आपल्या स्वार्थासाठी करतात. जेव्हा माजी इराकी अध्यक्ष सद्दाम हुसेनच्या नातवाला अमेरिकन कमांडो ने मारले तो मुस्तफा १४ वर्षाचा होता. त्यावेळेस मानवाधिकार वाले, बाल संरक्षा कायदा वाले, आंतरराष्ट्रीय न्यायालयाचे न्यायाधीश झोपले होते का? तामीळी प्रभाकरनच्या बालवयीन मुलाला श्रीलंकन सरकारने मारले तेव्हाही यांचे आंतरराष्ट्रीय कायदे झोपले होते.

गोऱ्या ब्रिटीशांनी सुरू केलेली न्यायपालिका खरोखर न्याय मिळवून देते की फक्त अडथळे उभे करते असा प्रश्न निर्माण होतो. जे लोक दहीहांडीसारख्या खेळावर बंधणे मांडतात. आपल्या मनासारख्या निर्णय मिळवून घेतात अशा लोकांची भारतीय सिस्टम वापरून घेण्याची क्षमता ही गिण्याचुन्या स्वाभिमानी लोकांसमोर भारी पडत आहे, सरकारने याची नोंद घ्यावी. दहीहांडीवर बंधणे टाकणाऱ्या निर्णयात सामील असलेल्या पालकांनी आपली स्वतःची मुले पहिले सांभाळावी. मुंबईतील पालक शिक्षित हुशार आहेत. बालगोपालांचे आईवडील ओके असतील तर इतरांनीही सपोर्ट का करू नये.

**निसर्गनिर्माता देवाला काही कळत नव्हते का?**

मानवप्राणी हा जन्माआधीपासूनच लढवय्या आणि शूर आहे. गर्भधारणे आधी हजारो शुक्राणुतून बाकी शुक्राणुंना मागे टाकून निवडक एक नर शुक्राणू आणि एक मादा शुक्राणू एकत्र येतात. ती या जगात अवतरणाऱ्या जिवाची पहिली



यशस्वी लढाई असते. प्रत्येक जन या जगात येणारा जन्माआधी पासूनच शूर लढवय्या हुशार असतो. कायदेव्यवस्थेने निसग्र निर्मात्याच्याही वर जाऊन कायदे बनविण्याची आवश्यकता नाही. तर मग गर्भधारणेआधी जिंकणाऱ्या लढणाऱ्या शुक्रांणूंच्या लढाईतही कायदे बनविणाऱ्यांनी ढवळाढवळ का करू नये? निसर्गनिर्मात्याने या जगात येणाऱ्या प्रत्येकाला जीवनधारणेच्या आधीपासून सक्षम बनविले आहे. सर्व जन हुशार टॅलेंटेड आहेत.

( १६ जुलै २०१५, अभयराज्य)

# ३. जातपंचायतीचे पूनर्वसन करा! पुनर्रचना करा!

### १७७४ ची वर्णभेदी न्यायपालिका

समाजातील जुन्या प्रथा आणि परंपराचा अभ्यास छानबीन करून पुनर्बांधनी आवश्यक आहे. जात पंचायतीतील सदस्य पैसा उकळतात असा आरोप केला जातो. विद्यमान गोऱ्या वर्णाच्या ब्रिटीशांनी चालू केलेल्या न्यायपालिकेत वकीलांची फौज, पोलीस यंत्रणा, शासकीय कर्मचारी तिहेरी पैसा उकळतात त्याचे काय? जात पंचायतीच्या माध्यमातून लोकांना दिलासा तरी मिळू शकतो. विद्यमान न्यायपालिका सिस्टीममध्ये किती लोकांना दिलासा मिळतो? जात पंचायत ही कालबाह्य नसून तोच एक भारतीय लोकांसाठी पर्यायी उपाय आहे. संविधानात कायदेशीरित्या जात पंचायत नवीन रूपात समाविष्ट होणे आवश्यक आहे. विद्यमान लोकशाहीमधील ब्रिटीशांनी सुरू केलेली न्यायपालिकेची प्रणाली ही अपेक्षेनुसार रिझल्ट देत नाही. यात माननीय न्यायमूर्तीचा दोष नाही ओव्हरआल प्रणाली आणि त्यांचे सर्वच घटकांमधील ताळमेळ कारणीभूत आहेत. हे इथे आम्ही सांगू इच्छितो!

### लोकप्रतिनिधींची दुविधा

ज्या आमदारांनी जात पंचायतीला बरखास्त करण्याची मागणी केली त्यांनी स्वतः कायदा हातात घेतल्याची उदाहरणे मिळतील. कारण विद्यमान लोकशाहीमधील ब्रिटीशांनी सुरू केलेली न्यायपालिकेची प्रणाली ही अपेक्षेनुसार रिझल्ट देत नाही. १८३३ मध्येच इंग्रजानाही कळून चुकले होते की भारतात विद्यमान न्यायपालिका यशस्वीपणे चालणे कठीण आहे.

विद्यमान न्यायप्रणालीत न्याय वेळेवर आणि गुणवत्तापूर्ण मिळत नाही. त्यामुळे लोकांमधील आपआपसातील वाद वाढून दूरावे निर्माण होत आहेत. संघटनात्मक कौशल्य जोपासण्यापेक्षा लोकांमध्ये एकमेकांचे पाय ओढण्याच्या वृत्ती वाढत आहेत. अशा न्यायप्रणालीमुळे शैक्षणिक, सामाजिक, संघटीत, विकास कसा शक्य आहे. भारत देश त्यामुळे जगात प्रथम क्रमांकावर जाणे शक्य नाही.



जात पंचायत वा वार्ड पातळीपर्यंत विकेंद्रीत केलेली न्याय पंचायत व्यवस्था अंमलात आणली तरच भारतात पूरोगामी सामाजिक परिवर्तन शक्य आहे. त्यानंतरच सर्व समाज मुख्य प्रवाहात येणे शक्य आहे.

### जातपंचायतीसमोर खोटी साक्षी पुरावे देता येईल का?

खोटी साक्ष देणे, खोटे पुरावे सादर करणे, आरोपी प्रतिआरोपीचे झगडे वाढविण्याचे वकील लोकांचे काम झाले आहे. वकील लोकांचे आणि भारतीय आणि जनतेचे आचरण आणि विचार बदलणे शक्य नाही. त्यामुळे गोऱ्या वर्णाच्या लोकांनी १७७४ मध्ये सुरू केलेली न्यायपालिका भारतात यशस्वी होणे शक्य नाही.

खोटे साक्षी पुरावे देण्याची आमच्या लोकांच्या सवयीचे निर्मूलन होणे शक्यच नाही. हे जर शक्य नाही तर मग जात पंचायती सारख्या न्यायपालिकांच्या पूनर्रचनेशिवाय पर्यायच नाही.

### गरीब लोक अज्ञानी आहेत का?

आपण ज्यांना अडाणी अशिक्षित गरीब लोक समजतो ते खरोखर अडाणी आहेत का? त्यांना सुख शांती समाधान हवे असते. त्यांच्या मनातील काय भावना आहेत, ते समजूनच कायदे बनवायला हवेत! स्वतःला सुशिक्षित श्रीमंत समजणाऱ्या लोकांच्या घरी सुख समाधान शांती नांदते का? राज्यघटनेतील समता स्वातंत्र्य बंधूता असे मोठे–मोठे शब्द त्यांना नकोत, त्यांना सुख समाधान शांती असे छोटे छोटे शब्द त्यांच्या घरात जोपासायचे आहेत. त्यांच्या मुलाबाळांसाठी, नातवंडासाठी टिकवून ठेवायचे आहेत. त्यांचे मन समजून घ्यावे आणि कायदे बनवावे.

जातपंचायतीत पिडीत लोक कोणाकडे तक्रार तरी करू शकतात का? पण ब्रिटीशांनी चालू केलेल्या न्यायपालिकेत अडकलेल्या भरकटलेल्या पिडीतांची संख्या किती आहे, ते कोणाला न्याय मागू शकतात? जातपंचायतीमुळे जे लोग सुख समाधानाने राहतात हे मीडियावाल्यांना दिसत नाही. इक्के दुक्के प्रकरण न्यायपंचायत वा जातपंचायतीचे मिळाले की मीडियावाल्यांचा धिंगाना सुरू!

### चुलबूल पांडे काही नवीन नाही?

सलमान खान उर्फ चुलबूल पांडे यांनी पंधरा वर्षानंतर मिसलिडींग साक्षी पुरावे देणे सर्वांनी दूरदर्शनवर बघीतले आणि एन्जाय केले. हाशिमपूरा हत्याकांड,

४२ लोक मारल्या गेले. सर्वजन निर्दोष! असा न्यायालयाचा निकाल ! तेही २८ वर्षानंतर! ४२ लोक मारल्या गेले, पोलीसांवर कायदा हातात घ्यावयाची पाळी का यावी? यालाही ब्रिटीशांनी चालू केलेली सिस्टीम प्रणाली कारणीभूत नाही काय? खोटी चकमक करून आरोपींना ठार मारण्याची पाळी पोलीसांवर वा शासनावर का यावी?

**अनिसवाल्यांचा गोंधळ**

अनिस वाले अंधश्रद्धा निर्मूलनाच्या नावाखाली स्वतः आंधळेपणाचे सोंग घेत आहात का? जात पंचायत सारख्या तस्सम न्यायपंचायतीसमोर सलमान सारखा मिसलिडींग बोलला असता का? अख्ख्या दुनियेसमोर? सर्वांना टोपी लावू देणारी प्रणाली! अशी कित्येक उदाहरणे न्यायधीश, वकील, पोलीस या सर्व यंत्रणांचा वेळ वाया घालवत आहेत. न्यायपंचायतीत झटपट न्याय मिळतात. अनिस कोल झटपट न्यादानाची गॅरंटी देणार आहेत का? खरं तर अनिस वाल्यांनी अंधश्रद्धा निर्मूलनाचे काम करावे, न्यायपालिकेच्या कामात ढवळाढवळ करायला नको.

**संविधानात मेजर बदल**

न्यायपालिकेच्या विकेंद्रीकरणासाठी वा जात पंचायतीसारख्या न्यायपंचायती उभ्या करावयाच्या असतील तर संविधानात मेजर हे बदल करावे लागतील. जात पंचायतीची पुनर्रचना करावी. जात पंचायतींना मोडण्याचा कायदा आणण्याआधी झटपट आहे? पर्यायी व्यवस्था होईपर्यंत जुन्या न्यायपंचायती मोडण्याचा कायदा पास करू नये. अशी आम्ही नम्र विनंती करू इच्छितो. विद्यमान ब्रिटीशांनी सुरू केलेल्या न्यायपालिकेचा गरीबांजवळ पैसा नसतो हो! म्हणून गरीबांचा विचार करा.

**गुन्हेगारांना शिक्षा? गुन्हेगार खरोखर सुधारतो?**

विद्यमान न्यायपालिकेतून गुन्हेगारांना मिळणाऱ्या शिक्षांचा पुरेसा प्रभाव पडत नाही. एक तर शिक्षा बरोबर होत नाही जुन्या न्यायपालिकांचा प्रभाव तात्काळ आणि पूरक पडू शकतो. तेथील गुन्हेगार परत गुन्हा करण्याची शक्यता फारच कमी असते. सामाजिक बहिष्कार, उठबशा, भर रस्त्यात फटके मारणे, हातपाय तोडणे, या शिक्षा कामाच्या आहेत. मा. रामदास आठवले यांनीही जुन्या हातपाय तोडणाऱ्या शिक्षेस पुरस्कार केला. विद्यमान न्यायपालिका प्रणाली लोकांमुळे फेल



झाली हे चुकीचे! लोकांची विचारसरणी बदलू शकत नाही म्हणून स्वतःची व्यवस्था तयार करावी, इंग्रजांची कॉपी केलेली नाही! हीच आजची गरज आहे. खोटी साक्षी पुरावे देण्याच्या आमच्या लोकांच्या सवयीचे वकील, पोलीस यंत्रणांच्या घोळाचे निर्मूलन होणे शक्य नाही. हे जर शक्य नाही तर मग जातपंचायती सारख्या न्यायपालिकेच्या पुनर्रचनेशिवाय पर्यायच दिसत नाही.

आपल्याकडे पर्यायी व्यवस्था नाही. तर मग चुकीच्या मागण्या करायच्याच कशाला? असा व्यवहारिक विचार सर्वांनी का करू नये?

**ॲलोपॅथी बंद, आयुर्वेदिक चालू?**

भारतीय मानसिकता बनलेले भारतमातेचे शरीर गोऱ्यांनी बनविलेल्या ॲलोपॅथी औषधीला साथ देत नाही, साईड इफेक्टच जास्त होतात पण पुन्हा पुन्हा तोच तोच डोज दिला जात आहे. आता औषधी बदलण्याशिवाय पर्याय नाही. गोऱ्यांची वापरण्यापेक्षा आपल्याच जुन्या औषधीत संशोधन करून ग्रॅन्यूलेटेड मेझरमेन्ट घेऊन वापरणे आवश्यक आहे. म्हणजे जात पंचायत न मोडता त्यातच संशोधन करून न्यायपालिकेचे पूनर्रचना करणे हाच एक पर्याय दिसतो आहे. स्वातंत्र्य समता बंधूता असे मोठे मोठे शब्द वापरण्यापेक्षा सुख शांती समाधान असे नवीन शब्द वापरून संविधानाची पुनर्रचना करण्याची आवश्यकता पडू शकते. राज्यघटना लोकांच्या भल्यासाठी बनली आहे. गोऱ्या चमडीची कॉपी असलेली घटना आपल्याला भलेपणाची राहत देत नसेल तर पुनरर्चना केलेली काय वाईट?

**शासनाची दुविधा!**

कांग्रेस, भाजप अशा पक्षांवर काही समाज घटकांतर्फे मनुवादी ब्राम्हण्यवादी असा डिचवून डिचवून आरोप केला जातो. त्यामुळे कोणतेही शासन झुकून बोचकून स्वतःचे निर्णय घेऊ शकत नाहीत की काय म्हणून शंका येते. चीरपुरातन राष्ट्र का फिर से नया निर्माण हो! असे मा. संघवाले म्हणतात आणि आमचे मा. मुख्यमंत्री म्हणतात एक! अशी परिस्थिती दिसायला नको अशी सर्वसामान्यांची इच्छा आहे. नवनिर्मित केलेल्या आमच्या जुन्या रूढी परंपराच भारताला जगात प्रथम क्रमांकावर नेतील यात शंका नाही. पण होणार कसे?

**सामाजिक बहिष्कारात चुकीचे काय?**

बहिष्काराचे हत्यार महात्मा गांधीनी, लोकमान्य टिळकांनी इंग्रजाविरूद्ध

वापरले होते. इंग्रजांनी त्यांच्या बहिष्कार शस्त्राला दाद दिली होती. आमचे शासन मात्र बहिष्कारासारखे अहिंसावादी शस्त्रच किल करायला निघाले आहे हेच खर आमचे दुर्दैव आहे. सामाजिक बहिष्कार गावकऱ्यांनी का म्हणून करावा याचा विचार व्हावा. एका जोडप्याने सर्वोच्च शिखर चढला. गावात येवून जिन्स पँट घालतात. लग्न झालेल्या बाईने जिन्स पँट घालण्यामुळे घट्ट तंग कपड्यांची गावात लागन होऊन उद्या गोऱ्या लोकांसारखी लफडेल संस्कृती गावात येण्याची आणि उद्या आपल्या मुलाबाळांचे नातवाचे आयुष्यात सुख शांती समाधान हरविण्याची पक्की शाश्वती गावकऱ्यांना दिसत असेल तर त्यांनी दूर राहण्याचा का प्रयत्न करू नये? जसे आपण घरात शिस्त ठेवतो तसेच गावाच्या सुख शांतीसाठी नियम बनवितात त्या नियमांना मान मिळायलाच पाहिजे!

(२ एप्रिल २०१५, अभयराज्य)



# ४. जेष्ठ गावकऱ्यांनो, तमुसवाले, आखाडेवाले लढाईसाठी तयार व्हा!

**न्यायपालिकेचे विक्रेंद्रीकरण शिवाय पर्याय नाही :**

प्रत्येक भारतीय नागरिकावर सरासरी पन्नास हजार रुपये परदेशी कर्ज आहे. घरात बाळ जन्माला आला की, तो डोक्यावर पन्नास हजाराचे कर्ज घेवूनच मातेच्या उदराहून बाहेर येतो. हे कर्ज भारत सरकारने घेतले होते, सरकारने काय गहान ठेवले माहीत नाही? डोनेशन दिल्याशिवाय सेटींग केल्याशिवाय तुमच्या मुलांना सरकारी नोकऱ्या मिळत नाहीत. गरीब पालकांचे विद्यार्थी सरकारी नोकऱ्या मिळवू शकत नाहीत कारण डोनेशन द्यायला लाखो रुपये नसतात. बिझनेस करायचे झालेत तर सरकारी कर्मचाऱ्यांना, पॉलिटीशीअनला पैसे दिल्याशिवाय तुमची कागदपत्रांची पूर्तता होत नाही, तुम्हाला सरकारी कामाचे ठेके मिळत नाहीत.

बहुशी पोलीस यंत्रणा करप्ट झाली आहे. पोलीसांना पैसे दिले तर, आरोपीच्या पंचनाम्यातील नोंदी घटनाक्रम बदलला जातो. आरोपपत्रातील मजकूर बदलला जातो. चोराचा शाव आणि शावाचा चोर सिद्ध केला जातो. ज्याच्याकडे पैसा, जो पैसा खेळतो, जो पैसा देवून सेटिंग करतो तो निरपराध सिद्ध होतो. खरं काय खोट काय चूक काय बरोबर काय याचे कोणालाही घेणे देणे नाही. पत्रकारांना तुम्ही पैसे द्या तेव्हा तुमच्या बातम्या प्रस्थापीत वृत्तपत्रात प्रकाशित करतात, अन्यथा नाही.

कायदे वा नियमावलीचा वापर खोट्या कामासाठी कसा करायचा, गैरव्यवहारासाठी कसा करायचा याचा अभ्यास या यंत्रणेतील जवळपास सर्वच कर्मचाऱ्यांना माहीत आहे. ज्याने गुन्हा केला आहे, खोटे काम केले आहे, समाजकंटक आहे असे पक्के पुराव्यानिशी तुम्हाला माहीत असूनही समाजात त्याला झक मारुन इच्छा नसतांनाही मान सन्मान प्रतिष्ठा तुम्हाला द्यावी लागत आहे. यावर उपाय काय?

**उपाय : गावकरी बंधुंसाठी आवाहन! गावातील जेष्ठांना न्याय निवाडा करुन गुन्हेगारांना शिक्षा करण्याचे अधिकार आवश्यक**

गावकरी बंधुंनो, या सर्व लोकशाही प्रशासनात सर्वात महत्वाचा स्तर म्हणजे गावगाडा, पालक, शिक्षक, गावकरी, सध्याच्या प्रचलित गावस्तरावरील पोलीस यंत्रणेचा स्तर आणि न्यायपालिकेचा स्तर याचे खालोखाल नवीन स्तर तुम्हाला स्थानिक पातळीवर उभा करायचा आहे. तमुसवाल्यांनो, तुमच्या हातात न्यायनिवाडा आणि गुन्हेगारांना शिक्षा करण्याचे अधिकार दिले तर, तुम्ही गावखेड्यात सुबत्ता आणू शकाल का?

### गाववाल्यांनीच आपले स्वतःचे न्यायाधीश निवडावेत

गावस्तारावरील सर्व न्यायनिवाड्याचे अधिकार प्रतिष्ठित, बुजूर्ग गावात लहानपणापासून वर्षानुवर्षे राहणाऱ्या निष्कलंक लोकांनी घ्यायचे आहेत. गावातील न्यायिक अधिकाऱ्यांनी (न्यायाधीश) निवडणूक दर चार वर्षांनी असेल. सलग दोन ४ वर्षाच्या टर्म पेक्षा जास्त टर्म कोणताही न्यायिक अधिकारी घेणार नाही. न्यायनिवाडा करणाऱ्या न्यायिक अधिकाऱ्यांना शिक्षणाची अट नसावी. त्यांना फक्त योग्य न्यायनिवाडा करता यायला हवा. वय ३५ वर्षेपेक्षा जास्त असावे. गावात प्रत्येक हजार-दोन हजार लोकसंख्येसाठी एक न्यायिक (न्यायाधीश) अधिकारी असेल. स्थानिक कोणताही आरोपी वा फिर्यादी हा त्याच स्थानिक लोकांनी निवडलेल्या न्यायिक अधिकारी वा न्यायधीशांसमोर खोटी साक्ष पुरावे देणे शक्य होणार नाही हे महत्वाचे! स्थानिक पातळीवर कोणते गुन्हे घडतात, घडले? कोणती शिक्षा दिली तर गुन्हेगार दुरुस्त होईल हे ठरविण्याचे अधिकार आणि शिक्षेची अंमलबजावण करण्याचे अधिकार हे स्थानिक न्यायिक अधिकाऱ्याला असतील. प्रायमरी आणि सेकेंडरी असे दोन न्यायिक अधिकारी प्रत्येक प्रभागात असतील. एक गैरहजर असला तरी काम अडायला नको.

जसे ब्रिटिशकालीन पुल जीर्ण झाले आहेत त्यांना पुनरूथानाची जरूरत आहे. तसेच ब्रिटिशांनी जन्म घातलेल्या या न्यायपालिकेला पुर्नरचनेची आवश्यकता आहे. मोठ्या मोठ्या पुस्तकाच्या थप्प्या, गोऱ्यांच्या इंग्रजी भाषेचे कंपलशन आणि कागदी डिगऱ्या याची स्थानिक गावखेड्यातील न्यायिक अधिकाऱ्यांना जरुरत नसावी. उद्देश साध्य होणे, न्यायनिवाडे सर्वसामान्य होणे, गुन्हेगारी संपणे हे महत्वाचे.

### तरूण, अखाडेवाले कुस्ती पैलवानांची टीम

गुन्ह्याच्या इनवेस्टीगेशनसाठी, गुन्हेगाराला शिक्षा करण्यासाठी गावातील आखाडेवाले, कुस्तीवाले वा बलवान तरुणांची टिम बनविण्याचे अधिकार



स्थानिक न्यायिक अधिकाऱ्यांना असेल. आवश्यकता भासली तर न्यायिक अधिकारी, ग्रामपंचायत सदस्य वा पोलीस इतर शासकीय यंत्रणांची मदत घेवू शकतील. आरोपी वा फिर्यादी जर न्यायिक अधिकाऱ्याचे नातेवाई मित्र वा जवळचे असतील. तर न्यायनिवाडा गावातील दुसऱ्या न्यायिक अधिकाऱ्याकडे देण्यात यावा. शिक्षेची अंमलबजावणी सुद्धा न्यायिक अधिकाऱ्यांच्या समक्ष करण्यात यावी. स्थानिक पातळीवर विकेंद्रीत असलेल्या या न्यायपालिकेचा उद्देश सत्याच्या अंमलबजावणी असावा, कोणावरही अन्याय व्हायला नको, चूकीच्या लोकांना शिक्षा व्हायला नको, कोणाच्या घरचा एक दोरीचा तुकडा सुद्धा चोरी जायला नको. न्यायनिवाडे लवकर होऊन गावशांती, गावकऱ्यांचे सामंजस्य वाढविणे हा असावा.

छोट्या मोठ्या गुन्ह्यांसाठी उठबशा मारणे, तोंडाला काळे फासणे, धिंड काढणे, बहिष्कार टाकणे, तडीपार करणे, फटके मारणे हे अलाऊ करण्यात यावे. हिंसेचा कन्ट्रोल्ड आणि कॅलक्यूलेटेड वापर व्हावा. गावचे वैद्यकीय अधिकारी हिंसक शिक्षेची तीव्रता ठरवण्यासाठी मदत करतील. मोठ्या गुन्ह्यांसाठी हातपाय तोडणे, डोळे फोडणे सारख्या शिक्षा भविष्यात अमलात आणाव्या. न्यायिक अधिकारी वा त्यांच्या प्रतिनिधींकडून चुकीचा न्याय निवाडा झाला तर त्यांना तीन पटीने कडक शिक्षा होईल. मानवाधिकार सारखे अडथळे नकोत. मानवाधिकार गुन्हेगारांना वाचविण्यासाठी असेल तर, संपवावा लागेल.

**उदाहरण :**

उदाहरणार्थ ग्रामपंचायत सदस्याने पैसा खाल्ला ही केस न्यायिक अधिकाऱ्याकडे आल्यानंतर संबंधीत अधिकारी, ठेकेदार ग्रामपंचायत अधिकारी यांना समोरासमोर बसवून न्याय निवाडा करण्याचे अधिकार स्थानिक न्यायिक अधिकाऱ्याला असतील. घोटाळ्यामध्ये मोठे अधिकारी वा मंत्र्यापर्यंतचे हात आढळून आले तर, त्यांच्यावरही ॲक्शन घेण्याचे अधिकार या न्यायिक अधिकाऱ्यांना असतील. स्थानिक न्यायिक अधिकाऱ्यांसमोर दर्ज झालेले पुरावे भारतातील कोणत्याही कोर्टासमोर योग्य ग्राह्या धरले जातील. न्यायनिवाड्याची प्रक्रिया हिंसक वळण घेण्याची शक्यता असल्यास प्रचलित पोलिस संत्रणेची मदत न्यायिक अधिकारी घेवू शकतील. प्रचलित तालुका स्तरावरील कोर्ट हे दुसऱ्या टप्प्यात काम करतील. जोपर्यंत प्रचलित विद्यमान न्यायपालिका प्रकारणाचा निर्णय देत नाही, तोपर्यंत स्थानिक न्यायिक अधिकाऱ्यांनी दिलेल्या निर्णयानुसार

अंमलबजावणी करण्यात यावी. जे प्रकरणे स्थानिक न्यायिक अधिकाऱ्यांना सोडविता आली नाही, तेव्हा ती प्रकरणे प्रचलित कोर्टाने बघावी आणि नवीन यंत्रणेबराबर समन्वय साधावा.

हे न्यायपालिकेचे सुचविलेले विकेंद्रीकरण एकदम एकाच वेळेस पूर्ण भारतभर अंमलात आणता येणार नाही. एक एक तालुका जिल्हा करत टप्प्या टप्प्याने याची अंमलबजावणी करण्यात यावी. प्रत्येक महिण्यागणिक, सहा महिण्याने अंमलबजावणीची शहानिशा करण्यात यावी. त्यामुळे उणिवा फिक्स करायला किंवा प्रक्रिया उपग्रेड करायला सोपे जाईल.

**प्रचलित यंत्रणेला टक्कर देणे अशक्य**

प्रचलित यंत्रणेला टक्कर देणे अशक्य आहे. त्यांचे परिवर्तन अशक्य आहे. लोकपालासारखे कायदे थोडेथोटके इंप्रूवमेंट करू शकते. या प्रचलित विद्यमान यंत्रणेला आहे तशीच सुख समाधानी ठेवून नमुद केल्याप्रमाणे वा तत्सम यंत्रणा उभी करणे अतिआवश्यक आहे. या दिलेल्या विकेंद्रीकरणाची कायदेशीर तरतुद होणयासाठी भारतीय संविधानात काही मेजर दुरुस्ती आवश्यक आहेत. ढोबळमानाने संविधानात भाग ५ मध्ये अध्याय ४, भाग सहा मध्ये अध्याय ५ आणि ६ मध्ये बदल करावा लागेल, तसेच नवीन अध्याय न्यायपंचायती रचनेसाठी जोडावा लागेल. जे आधी घपले घोटाळे लोचे होऊन गेले ते गेले. ते सोडून द्यावे लागेल पण, परत येणाऱ्या काळात होऊ नये म्हणून, कंबरकसावी लागेल. पण तमाम गावकऱ्यांनी या नमुद केलेली न्यायपालिका गावगाडा स्तरावर न्यायनिवाडा यशस्वीपणे हातात घेण्याची तयारी दर्शविली तर, आपल्या कायदे बनविणाऱ्यांपर्यंत ही बाब पोहचविता येईल.

प्रचलित यंत्रणेमध्ये काही नॉन करप्ट लोक आहेत. पण बहुतेकांचा ओघ काळाच्या ओघात इतरांमुळे करप्शनच्या दिशेने गेल्याने त्या प्रवाहाला बदलणे अशक्य आहे. त्यामुळे आपल्याला ही इंप्रूवमेंट वा रिआर्गची जरूरी आहे. हा नमुद केलेला बदल एक दीर्घकालीन अंमलबजावणी आहे. याला एक लाँग टर्म चेंज मॅनेजमेंट प्लॅन म्हणता येईल. लोकांनी, भारतीय नागरिकांनी मजबूतपणे पाठिंबा दर्शविला तर येणाऱ्या काळात या बदलासाठी आवश्यकता पडल्यास आंदोलन उभे करता येतील. विद्यमान यंत्रणेतील करप्शनचे स्वरूप बघता भारतीयांना दुसरा पर्याय नाही.



**अशी लोकशाही काय कामाची?**

भारतीय लोकशाहीचे केंद्र सरकार, मंत्रीमंडळ, लोकसभेतील खासदार, विधानसभेतील आमदार, पोलीस यंत्रणा, न्यायपालिकेतील न्यायाधीश, वकील, मिडीया अर्थात प्रसारमाध्यमे हे प्रशासनिक यंत्रणेचे मुख्य घटक आहेत. हे सर्व घटक एकसंघपणे, एकाच दिशेने चालत नाहीत, एक दुसऱ्याचे पाय ओढतात, आपआपला स्वार्थ बघतात. त्यामुळे सुद्धा ही लोकशाही भारतात फेल होत आहे. लोकशाहीतील या सर्व घटकांच्या स्वार्थी वागण्यामुळे आपले कोणतेही प्रोजेक्ट्स कार्यक्रम शंभर टक्के यशस्वी होण्यास प्रचंड अडचणी येतात. या सर्व घटकांना मिळून बनलेल्या प्रशासनिक व्यवस्थेत वेगवेगळे दहा ते पंधरा स्तर आहेत. जसे पंतप्रधान पहिल्या स्तरावर, त्यानंतर त्यांचे मंत्री दुसऱ्या स्तरावर, त्यांचे सेक्रेटरी, संचालक तिसऱ्या स्तरावर, विभागीय अधिकारी, जिल्हा स्तरीय अधिकारी, तालुका स्तरीय अधिकारी, पंचायत समिती आणि शेवटी गावगाड्यातील अधिकारी आणि सर्वात शेवटचा आणि महत्वाचा स्तर म्हणजे पालक, शिक्षण आणि विद्यार्थी. एकदम पहिल्या क्रमांकाचा स्तर म्हणजे पंतप्रधान, मंत्रीमंडळ वा मुख्यमंत्री पासून विद्यार्थ्यांपर्यंत जे दहा ते पंधरा स्तर आहे त्यांचे समन्वय नाही, कामचुकारपणा, भ्रष्टाचार, कुप्रवृत्ती भरलेल्या आहेत. मंत्र्यांनी घेतलेल्या निर्णयाची या भारतात अंमलबजावणी योग्य दिशेने होऊच शकत नाही. उदाहरणार्थ आधी बिना हेलमेटचे समजा २०० रुपये दंड होता तो आता सरकारने १००० रुपये केला. तुम्हाला हेलमेटसाठी पोलिसांनी पकडले तर पन्नास रुपये आधी घेत असतील तर, आता दोनशे रुपयाची मागणी करतील आणि खोटारड्या पोलिसांचे खिसे भरतील. त्या दंडाचा फायदा सरकारी तिजोरीसाठी सुद्धा योग्य प्रकारे होऊ शकत नाही. असे प्रशासन व्यवस्थेत तुम्ही सुखी समाधानी आहात का? मंत्रीमंडळाने खर्च केलेल्या एक रुपयापैकी फक्त सतरा पैसे सर्वसामान्यांसाठी खर्च होतात. हे भारत सरकारने कबुल केले होते.

मला माझ्या मुलाबाळांची नातवांच्या सुकर आयुष्याची चिंता आहे. म्हणून मी अभयराज्य च्या माध्यमातून तुम्हाला सुचवित आहे. तुम्हाला तुमची, तुमच्या मुलाबाळांच्या, नातवांच्या सुकर आयुष्याची चिंता असेल तर, तुम्हाला या बदलाची जबाबदारी आपल्यावर घ्यावी लागेल आणि संघटित होऊन आपल्याला हे अधिकार मिळवता येतील.

(११ मे २०१६, अभयराज्य)

# ५. २५ पोलिसांसमोर पोलीस स्टेशनमध्ये मंत्र्याचा मर्डर आणि खूनी मोकाट??

**विकास दुबेचे १० जुलैचे हे पोलीस एन्काऊंटर नाही तर ज्यूडीशिअल फेल्यूअर! या गंभीर समस्येवरील उपाय – ग्रामविश्व संघर्ष वाहिनी**

विकास दुबेने जेव्हा ३ जुलैला आठ पोलिस अधिकाऱ्यांना ठार मारले ज्यात डी.सी.पी. देवेंद्र मिश्राचा समावेश होता. ज्यांचे कुऱ्हाडीने मुंडके छाटण्यात आले. तेव्हापासून विकास दुबे भारतातील अख्ख्या जनतेला सर्वपरिचित झाला कारण त्याच्या बातम्या पूर्ण प्रसारमाध्यमातून मुखपृष्ठावर झळकत होत्या, हेडलाइन म्हणून चमकत होत्या. त्याआधी विकास दुबे भारतीय तमाम जनतेला फारसा माहीत नव्हता. त्यानंतर दोन–चार दिवसांच्या कालावधीमध्ये तो सर्व जनतेचा अतिपरिचित झाला. विकास दुबे मध्य एम.पी.मध्ये उज्जैनच्या महाकाल मंदिरात निःशस्त्र पकडल्या गेला. त्यावेळी सुद्धा सर्व भारतीयांना मीडिया द्वारा त्याची कानोकान खबर लागली. काही महिन्यांपूर्वी आंध्र पोलीसांनी सामूहिक बलात्कार मधील आरोपींना एन्काऊंटर करुन तडकाफडकी मारले होते. गँगस्टर विकास दुबेला अटक झाल्यावर त्याचा एन्काऊंटर होणार असे बऱ्याच भारतीयांना अपेक्षित होते आणि तसेच झाले. गँगस्टर विकास दुबेने युपी पोलीसने दहा जुलैला एन्काऊंटर केले. पण एन्काऊंटर हे लोकशाहीसाठी तारक की मारक???

कोण होता हा विकास दुबे? पोलीसांनी विकास दुबेला का म्हणून ठार करावे? का म्हणून जनतेने अपेक्षा करावी की विकास दुबेचा एन्काऊंटर पोलिसांनी करावा? समाजा विकास दुबेला चकमकमध्ये उडविले नसते, त्याच्यावर न्यायालयीन प्रक्रिया केली असती, वर्षानुवर्षे चालत राहिली असती आणि विकास दुबे निर्दोष सुटला असता असे जनतेला का वाटावे? कोणाचा विश्वास आहे आपल्या भारतीय न्यायपालिकामध्ये? आपली न्यायपालिका प्रणाली फेल्युअर का आहे???

अख्ख्या भारतीय जनतेला विकास दुबेचे कारनामेच कारनामे नंतर माहीत झाले. त्याची गुन्हेगारीची सुरुवात, त्याचा इतिहास, त्याची संपत्ती, त्याचा धंदा इत्यादी इत्यादी. विकास दुबेवर ६१ पोलीस केस दर्ज होत्या, त्यापैकी ८ मर्डरच्या होत्या. कोण होता या विकास दुबेनी घडविलेल्या कारनाम्यांना जबाबदार? मग



माहीत झाले की विकास दुबेने युपी च्या भाजपच्या राज्यमंत्री संतोष शुक्ला यांचा २००१ मध्ये शिवली पोलीस स्टेशनच्यामध्ये मर्डर केला होता. त्या मर्डरचा मुख्य आरोपी विकास दुबे होता. राज्यमंत्रीचा पोलीस स्टेशनमध्ये मर्डर?? मंत्री संतोष शुक्लाचा पोलीस स्टेशनमध्ये केलेल्या मर्डरनंतर गुन्हेगारी जगात विकास दुबे ला मोठे नाव मिळाले, दरारा वाढला. शिवली पोलीस स्टेशनमध्ये मंत्री संतोष शुक्लाचा मर्डर झाला जेव्हा जवळपास २५ पोलीस तिथे प्रत्यक्षदर्शी होते. मंत्री साहेबांचा पाठलाग करुन दिवसाढवळ्या पोलिसांसमोर पोलीस स्टेशनमध्ये गोळ्या झाडून मर्डर करण्यात आला होता. त्यात त्यावेळी दोन पोलीस सुद्धा मारल्या गेले होते. मोठ्या रकमा घेऊन काही खाऊ पोलीस अधिकाऱ्यांनी केस रफा दफा केली असणार? म्हणजे साक्षीदार पलटले!! मुख्यमंत्री राजनाथ सिंह च्या मंत्रीमंडळातील राज्यमंत्रीचा असा मर्डर झाला पण गुन्हेगाराला कडक शिक्षा का म्हून झाली नाही? या गुन्ह्यात चार वर्षात विकास दुबे कसा का सुटला?? २००० मध्ये सुद्धा त्याने हाय प्रोफाइल लोकांचे मर्डर केले होते. अशा कशा त्या केस दाबण्यात येत होत्या? कोणी बदलले असतील पुरावे, साक्षीदार आणि साक्षी? कोण करतात आरोपपत्रामध्ये फेरफार? कोण साथ दिली असेल दुबेला? काही फितूर पोलिसांनीच साथ दिली असेल? २०१४ आणि २०१८ मध्ये विकास दुबेने कारागृहात बंदिस्त असताना कट रचून त्यांच्या गुंडाकरवी मर्डर केले होते. त्यावेळी सुद्धा शासकीय यंत्रणा आणि राजकारणातील मंडळींनी विकास दुबेची पाठराखण केली असणार!! जेव्हा ३ जुलैला विकास दुबेने ८ पोलिसांना ठार केले तेव्हा त्याला त्या मर्डरमध्ये मदत करणारे सुद्धा इतर फितूर देशद्रोही पोलीच होते, २४ पोलीस आणि एक अधिकार विकास दुबेच्या संपर्कात होते. क्षुल्लक पैशाच्या स्वार्थासाठी ईमान विकणारे आपले काही फितूर लोक!!! आपल्या देशासाठी, स्वातंत्र्यासाठी, सर्वस्व वेचणाऱ्या क्रांतिकारक, महापुरुष, देशभक्तांना हेच अभिप्रेत होते का? विकास दुबेचे सर्वच पक्षाच्या नेत्यांसोबत सलोख्याचे संबंध होते, त्याला सर्वपक्षीय साथ मिळत होती. काही तरुण त्याला रोल मॉडेल सुद्धा समजत होते. सुरवातीला विकास दुबे भाजपामध्ये होता. कानपूर जिल्हा ग्रामीण भाजपा अध्यक्ष. स्वसंरक्षणासाठी १९९५–९६ मध्ये बसपामध्ये गेला. जिल्हा पंचायतचा सदस्य झाला. त्याची बायको पंचायत निवडणूकीसाठी समाजवादी पार्टीकडून उभी होती. म्हणजे विकास दुबेचा सर्व पक्ष समभाव!!

**असे घडण्याला कोण दोषी आहे?**

असे घडण्याला आपण सर्व लोक, जनता दोषी आहोत!! असेच म्हणावे लागले??

इंग्रजी मूळ असलेली न्यायपालिका प्रणाली भारतात यशस्वी होणे नाही. परिस्थिती चिघळल्यावर, वैतागून, राजकीय संरक्षण मिळवून पर्याय नसल्याने असे एन्काऊंटर करावे लागत आहे. कोर्टात वर्षानुवर्षे घासत बसण्यापेक्षा एन्काऊंटर करुन गुन्हेगाराला रफादफा केले जात आहे. दुसऱ्या बाजूला असे एन्काऊंटर घडणे देशाच्या लोकशाहीसाठी खूप धोकादायक आहे. आज गुन्हेगारांना चकमकीत मारतील, उद्या निरपराध लोकांना चकमकीत मारू शकतील!

यूरोप अमेरिकेचया तुलनेत आपल्याकडे प्रामाणिकपणाची टक्केवारी फार कमी आहे. जिकडून पैसे आले तिकडून साक्षी पुरावे बदलले जातात. पोलीस आणि राजकारणाची दिशा पूर्ण बदलली आहे. न्याय, सत्य नावापुरते आहे, कुठल्या का मार्गाने पैसा कसा लुटता येईल यावर आपली लोकशाही प्रणाली आधारित झाली आहे. निवडणूक ज्या पक्ष कार्यकर्त्यांच्या आधारावर जिंकल्या जातात त्यांना पैशाची, दारू मटण पार्ट्याची चटक लागली आहे आणि हे काळे कोट आणि या काळ्या पुस्तकाच्या थप्प्या गरीब जनतेच्या तर मुळी कामाच्याच नाहीत! अन्याय झाला आणि तालुक्याच्या ठिकाणी जायला आणि वकिलाला पैसे द्यायला गरिबांकडे खरोखरच पैसे असतात काय? भारतात प्रस्थापित न्यायपालिका प्रणाली पूर्णपणे फेल ठरली आहे. याचा दोष कोणा एका वकिलाला किंवा जजला देता येत नाही.

**यावर उपाय काय ?**

यावर अंमलबजावणी युक्त उपाय म्हणजे न्यायपालिकेचे विकेंद्रीकरण/पुनर्रचना!! स्थानिक पातळीवरील न्याय जिथला तिथे!! स्थानिक पातळीवरील/गावातीलच जेष्ठ अनुभवी सत्यवादी रहिवाशांमधून न्यायाधीश निवडला जाईल. त्या जजच्या हाताखाली काम करायला गावातील तरुणांचेच पोलीस संरक्षक दल असेल!! काहीसे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी ग्रामगीतेमध्ये उल्लेखलेल्या प्रमाणे!! न्यायपालिका अशी पाहिजे की कोणाच्या घरची दोरीचा तुकडा जरी चोरीला गेला तर गुन्हेगाराला लगेच शिक्षा. शिक्षासुद्धा गावातच, सर्वांसमक्ष!! गावचा साधा गुन्हेगार असो, भ्रष्टाचारी लिपीक, कोणता चालू अधिकारी, कर्मचारी, सेक्रेटरी वा मंत्री कोणालाही गावाच्या स्थानिक कोर्टमध्ये बोलविण्याचे आणि गावातच शिक्षा ठोठावण्याचे अधिकार स्थानिक



जजला असतील. गुन्हेगार प्रवृत्ती पहिल्याच पातळीवर, वाढ व्हायच्या आधीच संपवायची! विद्यमान पोलीस यंत्रणा शंभर टक्के विश्वासार्ह राहिली नाही. विद्यमान पोलीस यंत्रणा आणि विद्यमान कोर्ट प्रणाली दुसऱ्या स्थरावर काम करतील. साक्षी, पुरावे आणि न्याय हा स्थानिक पातळीवरच पारदर्शी असतात. गावात वास्तवमध्ये काय घडले हे तालुक्याच्या जजलला कळणे शक्य नाही. स्थानिक जज आणि संरक्षक दल यांनी घेतलेले निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी प्रस्थापित सर्व यंत्रणा, पोलीस आणि कोर्ट काम करतील. हे बदल ट्रायल error आधारावर, टप्प्या टप्प्याने, पहिले एक गाव, मग तालुका, जिल्हा असे करत करत व्यापक करावा लागेल. काहीशी पुरातन न्यायपंचायत म्हणायला हरकत नाही!! पण pros आणि cons बघून संविधानाच्या माध्यमातून पुनर्रचित!!! प्रस्थापित संविधानात काही मोजके amendments करावे लागतील. स्थानिक जज हे स्थानिक लोकांनी निवडून दिलेले असतील, मोजक्या ठराविक कालावधीसाठी आणि ते बदलत राहणार!! २००० लोकसंख्येसाठी कमीत कमी त्यांच्यातील एक जज!! जजच्या स्वतःच्या घराचा विवाद असेल, फिर्यादी वा आरोपीपैकी कोणी त्यांच्या जवळचा असेल तर ती केस गावातील दुसऱ्या जजकडे द्यायची!! काहीशी अशा प्रकारची व्यवस्था असेल! जुने घडून गेलेले, प्रकरण सोडून द्यावे लागतील. कायदे सुद्धा भारतीय विचारसरणीनुसार बनवायला हरकत नसावी. एक टाइमलाईन ठरवून, दीर्घ कालावधीची टप्याटप्प्याने अंमलबजावणी करावी लागेल. याशिवाय आपल्या देशाला पर्याय नाही!!

धन्य ते जांबाज आठ पोलीस अधिकारी, विनम्र अभिवादन अशा पोलीस अधिकाऱ्यांना ज्यांनी न्याय आणि सत्यासाठी आपले बलिदान दिले!! धन्य ते डी.एस.पी./सर्कल ऑफिसर देवेंद्र मिश्रा ज्यांनी विकास दुबेच्या अटकसाठी मोहीम उघडली आणि पोलीस टीमचे नेतृत्व केले आणि धारातिर्थी पडले!! विकास दुबेसारखा पोहचलेला गुन्हेगार, राजकीय सपोर्ट असलेला, न्यायपालिकेला मनासारखे झुकविण्याची क्षमता असलेला कुप्रसिद्ध गँगस्टरच्या टक्कर देण्याची क्षमता ठेवणाऱ्या वीरांना भावपूर्ण श्रद्धांजली!!! हा देश त्यांचा कायमचा ऋणी राहील!!!

(१९ जुलै २०२०)

# १. दुय्यम निबंधक कार्यालयाची एजंटांना प्रतिमाह पाच लाख रुपयांची मागणी?




नवीन युतीचे सरकार आल्यानंतर त्यांनी आधीच्या कांग्रेस सरकारच्या काळात सुरू असलेल्या नागपूर ग्रामीण भागातील एनपी–३६ तसेच गावठाण भुखंडाच्या रजिस्ट्री बंद करयाचे आदेश दुय्यम/सहायक निबंधक कार्यालयांना दिलेत. ग्रामीण भागातील अर्थव्यवस्थेची उलाढाल याच रजिस्ट्रीवर होत असते. सरकारकडे सुद्धा भरपूर मुद्रांक शुल्क जमा होतो. आधीच प्लॉट, फ्लॅट, बिल्डर भुखंड लेआऊटचे आणि सोबत इतरही व्यवसायांचे मार्केट थंड आहे. या आदेशाने ग्रामीण अर्थव्यवहाराच्या उलाढालाला खिळ बसली आहे? डेडलॉक सिच्युएशनमध्ये गेली आहे!

**बिल्डर/लेआऊटधारक/कॉन्ट्रक्टर्स चालूगिरी का करतात?**

काही इमानदार सोडले तर भारतीय शासकीय यंत्रणा ही भ्रष्टाचार आणि कामचुकारीने पोखरलेली आहे. भुखंड लेआऊटधारकांना एनएटीपी साठी दहापेक्षा जास्त एन.ओ.सी. घ्याव्या लागतात. कारण नसतांना, सर्व काही क्लीयर असताना प्रत्येक एन.ओ.सी.ला प्रत्येक ऑफीसात पैशासाठी खिळ घातली जाते किंवा पैशासाठी ग्राहकांची अडवणुक केली जाते. कायदा आणि नियमावलीचा उपयोग अधिकारी लोक स्वतःच्या स्वार्थासाठी करतात. शासकीय यंत्रणेच्या लोकशाही नावाच्या अंधेरनगरीत साधारण लोकांना चालूगिरी केल्याशिवाय कोणतेही व्यवहार वा व्यवसाय करताच येत नाही हे सर्व सुप्रीम कोर्टाच्या न्यायाधीशापासून ते साधारण लिपीकापर्यंत सर्वांनाच माहीत आहे. पण सर्व चालवून घेत आहेत. याला कोणी एक दोषी नसून पूर्ण सिस्टीम कारणीभूत आहे.

**सहाय्यक/दुय्यम निबंधक कार्यालयातून प्रतिमाह पाच लाख रुपयांची मागणी रास्त!**

आतील गोटातून मिळालेल्या माहितीनुसार नागपूर जिल्ह्यातील सहा./दुय्यम निबंधक कार्यालयातून प्रतिमाह पाच लाखाची मागणी केली अशी चर्चा आहे. हा सरकारच्या बदनामीचा डाव असू शकतो! हे सर्वांनाच माहित आहे की सहा.



दुय्यम निबंधक कार्यालयात खरेदी विक्री किंवा कोणतेही नोंदणीचे व्यवहार पूर्ण करण्यासाठी वरचे पैसे द्यावे लागतात. प्रत्येक ऑफीसात लागलेला लाचलुचपत प्रतिबंधक वाल्यांचा सूचना बोर्ड नावापुरताच असतो. प्रत्येक रजिस्ट्रीमागे कार्यालयात कमीत कमी दोन हजार रुपये ते पाच हजार रुपये वरचे दिले जातात. एका दिवसात सरासरी पन्नास रजिस्ट्री लावल्या जातात. एका दिवसाच्या व्यवहारात जवळपास पन्नास हजार ते पाच लाखापर्यंत वरची कमाई केली जाते. म्हणजे महिण्यातून सरासरी पंचवीस दिवस कार्यालय कामकाजातून पंधरा लाख ते एक करोड इतके अवैध उत्पन्न निघत असावे असा अंदाज आहे.

**१९९५ ची पुनरावृत्ती**

या आधी १९९५ च्या काळात भाजप युतीचे सरकार महाराष्ट्रात सत्तेवर आले होते. त्यानंतर युती सरकार जे गेले तर नंतर दिसलेच नाही. जानकार शासकीय कंत्राट घेणाऱ्या ठेकेदाराने सांगीतले की काँग्रेसला लोक वेतागले म्हणून भाजपाचे सरकार आले. पाच वर्षे यांचे साठी भरपूर झाले! भाजप युती सरकारला शासकीय यंत्रणेमधील भ्रष्टाचार कालही हाताळता आला नव्हता आताही तीच परिस्थिती आहे. मंत्र्यांना वा नेत्यांच्या सगेसोयऱ्यांचे व्यवहार सुरळीत होतात कारण त्यांचे शासकीय यंत्रणेसोबत डायरेक्ट लागेबांधे आहेत. पण साधारण छोटेमोठे शासकीय निमशासकीय काम घेणारे ठेकेदार, बिल्डर, लेआऊटधारक पावलोपावली शासकीय यंत्रणेला झेलत असतो. खस्ता खात असतो.

**विद्यमान मंत्र्यांचे, नेत्यांचे स्पष्टीकरण**

एन.ए.टी.पी.चे नियम जाचक की एन.ए.टी.पी. प्रोसेस मधील कार्यालयीन अधिकारी जाचक. त्यामुळे लेआऊट धारक शार्टकट बघून मोकळे व्हायला बघतात. पण यात पिसले जातात ते लेआऊटधारक आणि प्लॉट घेणारे कस्टमर! कांग्रेसप्रणित काही वृत्तपत्रांनी विना एन.ए.टी.पी. लेआऊटधारक कस्टमरला रजिस्ट्री लाऊन देतात हा मुद्दा उचलला. कांग्रेसप्रणित वृत्तपत्रे जाणूनबुजून युती सरकार मिसलिड व्हावे म्हणून खेळी खेळू शकतात. विना एन.ए.टी.पी. भुखंड लेआऊटधारक रजिस्ट्री लावून देतात हा मुद्दा पुढे करुन काही मतदारसंघात गावठाण आणि एन.ए.टी.पी. वाल्या भुखंड रजिस्ट्री दर बंदी आणण्याचे आदेश देण्यात आले, असे नागपूरच्या नेत्यांतर्फे सांगण्यात आले.

**मेट्रोच्या नियमांचा घोळ!**

दुसरा मुद्दा मेट्रोचा! नागपूर पासून पंचेवीस किलोमीटर सीमेतील सर्व

लेआऊट एन.आय.टी.च्या देखरेखीत देण्यात आले. साधारण ग्रामीण माणसाला एन.आय.टी.ला डील करणे कितपत सोईस्कर आहे? मेट्रोच्या नियमानुसार लेआऊट विकसीत करण्यासाठी कमीत कमी शंभर रुपये प्रती स्के.फुट खर्च येतो.

साधारण लेआऊटधारक मार्केटमधून कमीत कमी वार्षिक वीस टक्के व्याजाने पैसा गुंतवणूकदारांकडून व्यवसायासाठी घेतो. शहराला वा शहर वस्तीला लगत मोजक्या पाच किलोमीटर अंतरावर प्लॉट घेणाऱ्यांची क्रयशक्ती चांगली असते. पंचेवीस किलोमीटर वर ग्रामीण भागात प्लॉट घेणाऱ्यांची क्रयशक्ती फार कमी असते. ज्या खेडे गावाजवळ लेआऊट आहे त्या गावातील नेटीव्ह ग्रामीण नागरिकही भुखंड घेऊ शकत नाहीत. अशा परिस्थितीत २५ किलोमीटरवरील लेआऊटधारक मेट्रोच्या नियमानुसार लेआऊट विकसीत करु शकत नाहीत आणि शार्टकट शोधतात. कायदे बनविणारे शिकले पिकले, भ्रष्टाचारी, कामचुकार अधिकारी हुशार समजले जातात आणि आंगठाबहाद्दर ईमानदार लेआऊटधारक फसवे समजले जातात. इथेच चूक होत आहे. बरेचदा आपले अधिकारी दूरदृष्टी ठेवून अमेरिका युरोपसारखे दीर्घकालीन प्लॅन करतात. पण गोरे लोकांचे दूरदृष्टी वाले प्लॅनींग फेल सुद्धा झाले आहेत, याचे खूप पुरावे मिळतात.

**विद्यमान सिस्टममध्ये भ्रष्टाचार हाताळणे कठीण?**

भारतीय भ्रष्टाचार हाताळणे कोणत्याही सरकारला सोपे नाही. दीर्घकालीन अंमलबजावणीत, टप्प्याटप्प्याने हे शक्य आहे. समूळ दुरुस्तीसाठी भारतीय संविधानात मेजर बदल आणि न्यायपालिकेचे वार्ड पातळीवर विकेंद्रीकरण करावे लागते. सर्वसामान्यांच्या हातात कंट्रोल्ड आणि कॅल्क्यूलेटेड हिंसक शिक्षा करण्याचे अधिकार द्यावे लागतात; हा भाग वेगळा! पण टेम्पोररी उपाय म्हणून सरकारने डायरेक्ट लेआऊटधारक, बिल्डर, ठेकेदार यांच्यासोबत नियमित मिटींग घेऊन उपाय शोधावेत आणि अंमलात आणावेत. सरकार बदलले पण सरकार यंत्रणा बदलत नाही. मंत्र्यांचा जास्त वेळ शासकीय यंत्रणेसोबत चर्चा करण्यात जातो. शासकीय यंत्रणा आपल्यावरची चोरी, भ्रष्टाचार लपवून मंत्र्यांचे कान भरत असतात. जसे लग्न झालेला पुरुष जास्त वेळ बायकोसोबत व्यतीत करतो त्यामुळे बहुतांशी पुरुषांचे वागणे बोलणे आणि निर्णय बायकोच्या विचारसरणीला फेवरेबल असतात. तसेच मंत्र्यांचे, नेत्यांचे, सरकारचे होते आणि साधारण व्यवसाईक आणि सामान्य नागरिकांची होरपळ होत आहे हे नाकारता येत नाही.

(१८ जून २०१५, अभयराज्य)



# २. भाजपा सरकार भ्रष्टाचार निर्मूलन करेल? हास्यास्पद! मराठी खासदार आमदारांना नम्र निवेदन





भारताला स्वातंत्र्य मिळाल्यापासून जवळपास सत्तर वर्षानंतर पहिल्यांदा पूर्ण बहुमताने सत्तांतर झाले. सत्तारूढ पक्ष बदलला तर भ्रष्टाचाराचे निर्मूलन होईल का? शक्य नाही? की शक्य आहे? कोणताही पक्ष म्हणजे बोलायचीच कढी बोलायचाच भात! सामान्य माणसापासून ते पंतप्रधान पर्यंत जवळपास दहा ते पंधरा सरकारी यंत्रणेचे स्तर आहे. जिथे ऑफीससमोर भ्रष्टाचार थांबवाचा बोर्ड लावला असतो, तिथे शंभर टक्के भ्रष्टाचार ठरलेला आहे. एकदम वरचा स्तर म्हणजे पक्ष बदलला तर मधल्या यंत्रणेचे काय? भूमापन, महसूल, पोलीस, एनआयटी, सहायक निबंधक रजिस्ट्रार, तहसील, जिल्हा या ठिकाणी बहुतेक वेळा काम वरचे भ्रष्टाचाराचे पैसे दिल्याशिवाय शक्य नसते. फक्त एक्के दुक्के कर्मचारी सोडले तर भ्रष्टाचार ठरलेला आहे. नागरिक बिचारे पूर्ण चेपलेले आहे. त्यांना माहीत आहे कोणतेही सरकार आले तरी भ्रष्टाचारी ऑफीसरला बदलणे शक्य नाही. निर्ढावलेले कर्मचारी, ऑफीसर, पैसे दिले नाही तर कागदपत्रातील चुका काढतील, हेलपाट्या खायला लावतील, काम करणार नाहीत किंवा काम हे अर्धवट वा दोषपूर्ण ठेवतील. सामान्य माणसांनी जायचे कुठे? सामान्यांची कीव कोणालाच येत नाही.

डॉ. हेडगेवारांनी लावलेले हे संघाचे रोपटे आज यशाच्या शिखरावर आहे. सत्ता भाजपाची आलेली आहे. विद्यमान करप्टेड सिस्टीमसाठी आम्ही उपाय सुचवित आहोत. आमचे विचार पटलेच पाहिजे असे नाही. पण विद्यमान परिस्थितीत सत्तारूढ पक्षाला खरोखरच परिस्थिती बदलायची असेल तर याशिवाय

पर्याय नाही. हे उपाय सरकारने टप्प्याटप्प्याने, आधी सुरवातीला थोड्या प्रभागात चाचणी म्हणून नंतर सुधारणा करून पूर्णपणे अमलात आणू शकतात. असे आमचे हे सर्वसामान्यांचे मनोगत आहे.

### १. न्यायिक संस्थेचे विकेंद्रीकरण

ब्रिटीशांनी भारतात चालू केलेली विद्यमान न्यायिक व्यवस्था सक्षम नाही, असे सिद्ध होते. ही न्यायिक व्यवस्था ज्या पुराव्यांवर आधारित असते ते पुरावे वा साक्षी पैसे देवून, तडजोडीने बदलल्या जातात. एकदम खालच्या स्तरावर ग्रामीण, वार्ड पातळीवर बुजूर्ग, तिऱ्हाईत, प्रतिष्ठित, प्रामाणिक, होतकरू, निष्कलंक, पंधरापेक्षा जास्त वर्षापासून त्या प्रभागात वास्तव्याला असलेले नागरिक न्यायिक मतदानातून निवडून प्रक्रियेतून डेप्युट करावेत. त्या प्रभागातील लोक अशा न्यायिक अधिकाऱ्यासमोर साक्षी पुरावे खोटे देवू शकत नाहीत. या स्तरावर घेतलेल्या निर्णयांना आणि पुराव्यांना कायदेशीररित्या यंत्रणेत सामावून घेण्यात यावे. पहिल्या टप्प्यात हे न्यायिक अधिकारी न्यायाधीश म्हणून काम करतील. विद्यमान तहसील पातळीचे न्यायालय दुसऱ्या टप्प्यात काम करतील. न्यायिक व्यवस्था अशी प्रॉम्प्ट असली पाहिजे की कोणाच्या घरुन सुताचा तुकडाही चोरी जायला नको. आजच्या घडीला भुरट्या चोऱ्या, बकरी, गुरे चोरणे, शेतीचे घराचे वाद निपटतच नाहीत. गुन्हेगार सापडलेत तर शिक्षा होत नाहीत.

### २. तरूणांना मर्यादित प्रमाणात कायदे हातात घेण्याचे अधिकार द्या

विद्यमान सिस्टीमने गुंडांना महागुंड आणि आमच्या तरूण पैलवानांना षंड बनवून ठेवले आहे. विद्यमान पोलीस यंत्रणेसमोर खोट्या तक्रारी, खोटे पुराव्यामध्ये वेळ वाया घालविला जातो. वरून आमची पोलीस यंत्रणा बऱ्याच अंशी कामचुकार वा भ्रष्टाचारी आहे. वर दिलेले न्यायिक अधिकारी विद्यमान पोलीस यंत्रणेला संगनमत करुन गावातील होतकरू प्रामाणिक तरूणांची फौज उभी करतील. हे पैलवान तरूण अप्रत्यक्षपणे पोलीसांना मदत करतील. या तरूणांना मर्यादित हिंसाचाराचे कायदेशीर अधिकार देण्यात यावे. कोणाकडून उठबशा करवून घेणे, गुन्हेगारांना ऑन द स्पॉट झोडपणे, काळे फासणे, गुन्हेगारांची धिंड काढणे, करप्टेड ऑफीसर वर रागावणे, दटावणे या गोष्टी न्यायिक अधिकाऱ्यांच्या संमतीने, त्यांच्यासमोर करण्यात याव्या. न्यायिक अधिकारी वा त्यांच्या तरूणांकडून चुकीची व्यक्तीला शिक्षा झाली तर त्यांना पाचपट कठोर



शिक्षा देण्यात यावी, त्यामुळे अधिकाराचा मिसयूज होणार नाही. याची दक्षता घेतल्या जाईल.

काम, क्रोध, माया, मोह, हिंसाचार या वृत्ती निसर्गनिर्मात्याने मानवाच्या प्राणीमात्रांच्या भल्यासाठी दिल्या आहेत. नियंत्रित उपयोग करण्यासाठी दिल्या आहेत. इंग्रजांनी बनविलेले कायद्याचे अंधानुकरण करण्यापेक्षा स्वतःची निसर्गनियमांवर आधारित सिस्टम बनवा. जेलमध्ये राहून गुन्हेगार निर्ढावलेले आहेत, आपल्या जुन्या भारतीय संस्कृतीत उल्लेखिल्याप्रमाणे हातपाय तोडणे, डोळे फोडणे, गाढवावार धिंड काढणे, जीभ कापणे या आमच्या जुन्या शिक्षेच्या पद्धती आहेत त्या अवलंबविण्यात याव्या. इंग्रजांनी बनविलेल्या शिक्षेच्या पद्धती आम्ही का म्हणून फॉलो कराव्यात?

आमच्या तरूण पैलवानाचे हात तसेही खवखव करत असतात. मर्यादित हिंसाचार करता आला तर त्यांनाही हात साफ करायला मजा येईल. एका बाजूला तरूणांचे एन्जायमेंट, दुसऱ्या बाजूला सोल्यूशन, सगळीकडे आनंदी आनंद! कुस्तीला चांगले दिवस येतील. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचया शाखेत होणाऱ्या शारीरिक स्पर्धा उपयोगात येतील आणि देशाचे भले होईल. आम्ही केलेल्या हिंसाचाराची तीव्रता मर्यादित आहे की नाही हे आमचे डॉक्टर ठरवू शकतात. भारतीय डॉक्टर हे अमेरिकन डॉक्टरांपेक्षाही सरस आहेत, न्यायिक अधिकाऱ्यांच्या जोडीने ते काम करू शकतात, मदत करू शकतात.

कधीतरी मा. बाळासाहेब ठाकरे यांनी तुरळक हिंसाचाराला प्रोत्साहन दिले होते. विद्यमान सिस्टीममध्ये येणाऱ्या अडथळ्यांनी सोल्यूशन प्रोव्हाईड करतो. त्यामुळेच खूप मोठा तरूण वर्ग बाळासाहेबांचा चाहता होता. ''पहिले लात फिर बात फार्मूला काम करू शकतो.''

### ३. वरिष्ठ नागरिकांना दुप्पट मताचा अधिकार

भारताची विद्यमान राज्यघटना ही भारताची नाही. ही राज्यघटना पाश्चिमात्य देशांच्या राज्यघटनेची कॉपी मारण्यात आली आहे. विद्यमान राज्यघटनेनुसार विद्यमान पाश्चात्य संस्कृतीला अनुसरुन मतदानाचे अधिकार दिलेले आहेत. अठरा वर्षाच्या तरूणाला जेवढा मतदानाचा अधिकार आहे आणि बुजूर्गांना सुद्धा मतदानाचा तेवढाचा अधिकार आहे, हे चुकीचे आहे.

पाश्चात्य पालक मुलांना वयाच्या १६–१८ व्या वर्षी घरातून हाकलतात. त्यांना स्वतःच्या मुलाच्या भविष्यापेक्षा आपल्या पेंशनची चिंता असते. मुलासाठी

सेविंग करीत नाहीत. पाश्चात्य स्वतःच्या मनमौजासाठी मल्टीपल लग्न करतात, मुलांचे मायबाप बदलत राहतात. त्यामुळे पाश्चात्यासाठी अठरा वर्षाचा तरूण आणि अनुभवी मुले–बाळे सांभाळणारा नागरिक सारख्याच मतदानाच्या पारड्यात आहे. भारतात १८ वर्ष ते ३५ वर्शपर्यंत एक मताचा अधिकार तर ३५ वर्ष वय ते ५५ वर्ष पर्यंत दुप्पट मताचा अधिकार आणि ५५ वर्षापेक्षा सिनीयर्सला तिप्पट मताचा अधिकार देण्यात यावा. त्यामुळे अनुभव वा तजूर्बा लोकशाही सिस्टममध्ये कामी येईल आणि आमची संस्कृती सुद्धा अबाधित राहील.

आध्यात्मिक प्रचारकांना, बौद्ध भिक्षुकांना, साधूसंतासाठी एक चांगली दिशा शासनाने ठरवून त्यांना कायदेशीर सुविधा देणे अतिआवश्यक आहे. भारत देश हा जगात आध्यात्मिक क्षेत्रात जागतिक लिडर आहे. भारतीय पूर्वजांचा हा ठेवा जगात मोठा खजीना आहे. त्याला जोपासणे अतीआवश्यक आहे. विद्यमान सरकार विकासाची कामे करून शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोकू शकत नाही. सध्याच्या स्पर्धेच्या युगात, झगमगात दिखावा असलेल्या युगात उत्पन्न झालेली कमकुवत मानसिकता शेतकऱ्यांच्या आत्महत्येला कारणीभूत आहे व्यवहारिक जगात व्यवसायात कमी जास्त होऊ शकते. लक्ष्मी स्थिर थांबत नाही, मन, पाच इंद्रिय, नव भोक असलेले शरीर मनुष्याचे जन्माच्या वेळेसचे रूप हेच त्याचे खरे रूप आहे. पिके झाली, नाही झाली कर्ज देणारी संस्था वा सावकार आपली जमीन बळकावेल म्हणून शेतकरी आत्महत्या करीत आहे. हा शेतकरी विसरुन जातो की जमीनीचा खरा मालक देव आहे. ही पृथ्वी वा जमीन निसर्गनिर्मात्याची आहे. कर्जाच्या बोझ्यात जमीन गेली म्हणून आत्महत्या करण्याची गरज नही. हलाखीचे जीवन जगायला मानवाला घाबरण्याचे कारण नाही. ही गोष्ट साधुसंत आध्यात्मिक गुरूच समजावून सांगू शकतात आणि शेतकरी आत्महत्या टाळू शकतात. सरकारने या महत्वाच्या आध्यात्मिक गुरूंना, साधुसंतांना, बौद्ध धर्मगुरूंना प्रोत्साहन देऊन त्यांना चांगले दिवस देऊन कायदेशीर तरतूद करणे आवश्यक आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्येच्या आध्यात्मिक ज्ञानच टाळू शकतो, कोणताही पक्ष नाही! विकास, मागासलेपणा, श्रीमंती, गरीबी याची व्याख्या काळानुसार बदलणाऱ्या आहेत. आवश्यक आहे. ते मानसिक परिपक्वता! कालचा सायकलवाला श्रीमंत, आजचा चारचाकीवाला श्रीमंत, उगीचच धावधाव.

### ५. विद्यमान मीडियावर नियंत्रा आवश्यक

विद्यमान सरकारने मीडियासमोर हाय लेवल मिटींग घेऊन त्यांच्या दिशा



ठरविणे आवश्यक आहे. कधी कधी मीडिया प्रश्न सोडविण्यापेक्षा चिघळविण्याचे वा आग लावण्याचे काम करतात. भारतातील मीडिया देशाला भल्यासाठी कमी पण देशाला गडखापीत टाकण्यासाठी चाल खेळतात की काय असे वाटते. काही वृत्तपत्रांच्या ऑनलाईन आवृत्या तर मादक सेक्सी फोटो वा व्हिडीओजनी भरल्या आहेत. विद्यार्थी अभ्यास सोडून चित्रच पाहात बसतात.

फक्त भावनिक आवाहन करुन समाजात बदल होत नाहीत, हे बाबासाहेब आंबेडकरांनी हेरले होते. पायाभूत कायदे बदलणे अतीआवश्यक आहे. म्हणून वर दिलेले बदल कायद्यात असणे आवश्यक आहे. कायदे बनवितांना सामान्य बहुजन समाजाच्या मनोवृत्तीचा विचार करावा, पाश्चात्य कायद्यांचे अंधानुकरण नको, विकास मागासलेपणा श्रीमंतीचा संबंध संस्कृतीशी नाही.

काही दिवसांपूर्वी वृत्तपत्रांनी बलात्काराचे प्रमाण भारतापेक्षा इंडियामध्ये जास्त आहे, असे आरएसएसच्या संचालकांनी म्हटले म्हणून प्रकाशित केले. खर तर ही वस्तुस्थिती आहे. पण कोणी एक आवाज उठवू शकत नाही कारण मीडिया या पाश्चिमात्य संस्कृतीने प्रभावित आहेत. आपले लिडर खोटे बोलतात की काय? मनातील वस्तुस्थिती व्यक्त करू नये असे आपल्या सिस्टममध्ये का व्हावे? विद्यमान लोकशाही सिस्टीममध्ये फेक एनकाउंटर करुन करुन गुन्हेगारांना मारावे लागते. कारण विद्यमान न्यायिक व्यवस्थेत कोणाला विश्वास नसल्यासारखे वाटते असे का व्हावे? गुजरात सरकारने दोन पाकिस्तानी अतिरेकी आणि इशरतला फेक एनकाउंटर मध्ये मारले होते असा आरोप केल्या गेला. बऱ्याच लोकांनी या एनकाउंटरचे समर्थन मनातल्या मनात केले आणि गुजरात सरकारने अप्रत्यक्षपणे मतांची पेरणी केली. फेक एनकाउंटर करण्याची परिस्थिती का यावी?

काही दिवसांपूर्वी महाराष्ट्रात एका लेडी कंडक्टरला एका गुंडाने मारहाण केली. कोणीही लोक त्या बाईच्या मदतीला धावले नाही. असे का व्हावे? कारण आपली लोकशाही यंत्रणा दोषपूर्ण आहे. कोणाचाही विश्वास व सिस्टीममध्ये नाही असा अर्थ निघतो. कोणी मदत करायला गेले तर आपले पोलीस शासकीय यंत्रणा, न्यायिक यंत्रणा प्रश्न विचारुन, हेलपाट्या मारवून मदत करणाऱ्यालाच अडचणीत आणते. एका बाजूला पंतप्रधान मोदी भारतीय संसदेला लोकशाहीचे मंदीर म्हणतात तर दुसऱ्या बाजूला त्यांना राजधर्माचा सल्ला वाजपेयी देतात, असे का म्हणून व्हावे.

असे नाही की विद्यमान लोकशाही यंत्रणा ही निकामी आहे, परीक्षेत नापास

आहे. पण जो स्पीड पाहिजे तो नाही. सर्वसामान्याला यशाचे शिखर गाठायला अडथळ्याचा डोंगर पार करावा लागतो. इथे एक माणूस दोषी नाही पूर्ण सिस्टीम, त्याची गुंतागुंत सर्वच दोषी आहेत.

जर कोणी या यंत्रणे विरूद्ध आवाज उठविला, दोषारोपण केले, विरोध केला तर हीच यंत्रणा विरोधकाला झटक्यात निस्तनाबूत करु शकते. ऐरवी निकम्मी वाटणारी यंत्रणा विरोधकांचा सुफडा साफ सहजपणे करू शकते. काळ्या पैशाविरूद्ध आवाज उठविणारे रामदेव बाबांचे आंदोलन मध्यरात्री चिरडून, बाबांना सलवार कुर्ता चढवून मीडिया बोलाूवन झटक्यात नालस्ती करणे हे याचे एक उत्कृष्ठ उदाहरण आहे. आपली लोकशाही सिस्टीम, ही शासकीय यंत्रणा अशी बनली आहे की लहान सहानतरी इलिगल चालू काम केल्याशिवाय पोट भरु शकत नाही. त्यामुळे आवाज उठविणारा सहज चिमटीत सापडतो. ही लोकशाही खरोखर सर्वसामान्यांसाठी आहे काय? राज्यकर्त्यांनी दूरदृष्टीने विचार करावा आणि फक्त भारतीय वा भारतीयत्वाचा करावा.

मी खेड्यातून जन्मलेला, सुरवातीचे शिक्षा खेड्यात केलेला बहुजनात येणाऱ्या, बहुजनांनी सोसलेल्या बहुजनांची जाणीव असलेला दहा वर्षे अमेरिकेत राहून अमेरिका सिस्टीम अनुभवपूर्ण अभ्यास केलेला, तिथे अत्याधुनिक तंत्रज्ञान असलेल्या कंपनीत दहा वर्ष काम केलेला एक भारतीय नागरिक आपणास उपाय करून आम्ही काही वर्षांनी पाश्चिमात्य लोकांची बरोबरी करू शकतो आणि जगात पहिल्या क्रमांकाचे राष्ट्र बनविण्यासाठी पुढची रूपरेषा आखण्यासाठी आपला मार्ग सुकर करू शकतो. ब्रिटीशांची वा पाश्चिमात्य मनोवृत्तीची नीव असलेली विद्यमान लोकशाही सिस्टीम ही पाश्चात्य देशातच यशस्वी होऊ शकते पण भारतात नाही. उलट दिवसेंदिवस भारताला गडखापीत टाकत जात आहे. या लेखात दिलेल्या तरतूदी भ्रष्टाचार, नक्षलवाद, बलात्कार निपटवू शकतात नाहीतर मग भ्रष्टाचारालाच बलात्कार आणि कामचुकारीला कायदेशीर मान्यता द्या अशी परिस्थिती आहे.

माननीय मराठी खासदार साहेबांनो, आपण खासदार लोक हेच या लोकशाही यंत्रणेत पावरफूल आहात. आमच्या खासदारबुआंना आम्ही नम्र आणि कळकळीची विनंती करतो की, त्यांनी आमही सुचविलेल्या उपायांचा विचार करावा व अंमलबजावणी करावी.



# ३. आमचे कर्मचारी आणि अमेरिकेतील कर्मचारी

श्रेया न्य धर्मा विगुणः परधर्मा त्स्वनुष्ठितात।

स्वधर्म निघनं श्रेयः परधर्मा भयावह ।।३५।।

अर्थ : इतरांच्या कर्माचे उत्तम रीतीने पालन करण्यापेक्षा स्वतःच्या नियत कर्माचे, दोषयुक्त असले तरी पालन करणे अधिक श्रेयस्कर आहे. स्वतःचे कर्म करताना जरी एखाद्याचा विनाश झाला तरी दुसऱ्याचे कर्म करण्यापेक्षा ते श्रेयस्कर आहे कारण दुसऱ्याच्या मार्गाचे अनुसरण करणे भयावह असते. भगवद्गीतेतील तिसऱ्या अध्यायातील हा पस्तीसावा श्लोक आहे.

अमेरिका वा पाश्चात्य देश बाह्य भौतिकदृष्ट्या जगातील सर्वात जास्त प्रगत देश आहेत. बाह्य भौतिक जगात म्हणजेच व्यवहारिक जगात हे लोक श्रीमंत आहेत. भौतिकदृष्ट्या हे श्रीमंत देश जगाचे नेतृत्व करीत असल्यातरी आध्यात्मिक दृष्ट्या भारत हा सर्वात श्रीमंत देश आहे. बऱ्याच आध्यात्मिक भारतीय गुरूंनी अमेरिकेत वा पाश्चात्य देशात भारताचा दबदबा तयार केला. आधीच्या शतकात स्वामी विवेकानंद, दक्षिणेमधील क्रिष्णमूर्ती, स्वामी नरेंद्र, भगवान रजनीश यांचे अमेरिकन शिष्य अजूनही जिवंत आहेत. वर्तमानात दक्षिणेतील अम्मा, श्री रवीशंकर हे जागतिक पातळीवर आध्यात्मिक नेतृत्व करणाऱ्या संतानी आपल्या भवगद्गीतेचा आधार घेतला होता. वर दिलेल्या श्लोकातील आशयाचे अनुसरण अमेरिकन लोक तंतोतंत करतात म्हणून अमेरिका भौतिकदृष्ट्या एक नंबरचा देश आहे. औद्योगिक जगात या व्यवहारिक जीवनात वरील दिलेल्या श्लोकातील आशयानुसार अनुसरण करणे हे महत्वाचे कारण अमेरिकन औद्योगिक जग जगात एक नंबर असायला कारणीभूत दिसून येते. कोणत्याही संस्थांमध्ये, संघटनेमध्ये वा कंपनीमध्ये आपआपल्या हुद्दावरील जबाबदार व्यक्तीने आपआपल्या कामाचे तंतोतंत पालन करणे, दुसऱ्याच्या कामात ढवळाढवळ न करणे अती आवश्यक असते. कोणतेही मोठे प्रोजेक्टस् मार्गी लावायचे असेल तर खूप सारा मनुष्यबळ एकत्रितपणे काम करीत असतो. काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचे छोटे छोटे ग्रुप असतात, कामात विभागणी झालेली असते, संपूर्ण यंत्रणा, कर्मचारी लेअर्स व पातळ्यांमये विभागलेली असते.

यंत्रणेच्या प्रत्येक शाखेमध्ये विविध कर्मचारी क्रमानुसार विविध पातळ्यांवर काम करीत असतात. पाश्चीमात्य देशातील शासकीय यंत्रणा सुद्धा तंतोतंत आपआपल्या जबाबदाऱ्या (कर्म) उत्तर रीतीने पालन करतात, विनाकारण दुसऱ्यांच्या कामावर किंवा इतरांच्या काम करण्याच्या पद्धतीवर कॉमेंट करीत टाईमपास करत बसत नाहीत म्हणून त्या देशातले प्रोजेक्ट, कितीही कठीण वा दीर्घकालीन असले तरी यशस्वीरित्या वेळेवर पूर्ण होतात.

कोणतीही संस्था, संघटना व्यवसाय वा कंपनी कोण्या एका ध्येय साध्य करण्यासाठी स्थापन झालेली असते. दिलेल्या वेळेत, कामाची गुणवत्ता चांगल्या प्रतीची ठेवून आपआपली कामे पूर्ण करायची असतात. आमच्या भारतातील शासकीय कर्मचारी बरेचदा आपले काम टाकून आपल्या कामाकडे लक्ष न देता, इतरांच्या कामातील दोष काढून बहुमूल्य वेळ घालवित असतात अशा मानसिकतेमुळे एका नकारार्थी वातावरण तयार होते. प्रत्येकाच्या कामाच्या गुणवत्तेवर फरक पडतो असे बऱ्याच लोकांना आढळून आले आहे. पण हा प्रकार फक्त सरकारी कर्मचाऱ्यांमध्ये असा नाही तर व्यक्तीगत पातळीवर सुद्धा असे प्रकार भारतात आढळून येतात. आजकालचे विद्यार्थी आपला अभ्यास करायचे सोडून, आपल्या अभ्यासामध्ये, आपल्या कामामध्ये लक्ष न देता बाबांनी असे करायला पाहिजे किंवा तसे करायला पाहिजे म्हणून बापालाच शिकवत असतात. बायकोसुद्धा आपल्या कामाकडे लक्ष न देता नवऱ्याने असे वागावे तसे वागावे, त्यांनी माझं ऐकले असते तर तसे झालं असते इत्यादी करत असतात. एक दुसऱ्यांच्या कामामध्ये (कर्मामध्ये) ढवळाढवळ करणे हे भीतीदायक असू शकते असे या भगवद्गीतेच्या श्लोकात सांगितले आहे. सध्याच्या विज्ञान युगात, औद्योगिक युगात प्रोफेशनल या शब्दाचा अर्थ वर दिलेल्या श्लोकात सांगितला आहे. भारतीय उद्योग जगत जर यशस्वी व्हावे असे जर आपणाला वाटत असेल तर भारतीय नोकरदाराने वरील श्लोकाचे तंतोतंत पालन करणे हे आपले आद्यकर्तव्य समजावे. आमही श्लोक तर वाचतो, आम्हांला अर्थही कळतो पण अजानतेपणे नकळतपणे अप्रयत्क्षपणे भारतीय नागरिक वा कर्मचारीचे हातून तसे घडत नाही. त्यामुळे आपला देश भौतिकदृष्ट्या बाह्य जगात अमेरिकेसारखी वा चायनासारखी महासत्ता बनणे कठीण आहे.

(२३ जानेवारी २०१४, अभयराज्य)



# ४. पोलिसांचा चोरधंदा हाच त्यांच्यावरील हल्ल्यांना कारणीभूत ?




पोलीस उन्हातान्हात काम करतात. पोलिसांवर कामांचा प्रचंड लोड असतो. त्यांना दसरा, दिवाळी, गणेशोत्सव, ईद सर्वही सणांच्या काळात सर्वसामान्यांना सुरक्षा पुरवावी लागते म्हणून प्रचंड बिझी असतात. २४ तास पहाऱ्यावर असतात. पोलिसांना स्वतःच्या मुलाबाळांकडे ही लक्ष द्यायला वेळ मिळत नाही. गुंडाबरोबर दोन हात करताना जीवावर धोका पत्करतात. चित्रविचित्र गुंड पागल मनोवृत्तीच्या लोकांबरोबर डील करताना त्यांना प्रचंड त्रास होतो. सडल्या गळल्या दुर्गधी प्रेतांची शहानिशा पंचनामा करुन प्रचंड त्रास सहन करावा लागतो. पोलिसांना राजकीय लोकांचा, पॉलिटीशीयनचा त्यांचा वरिष्ठांचा प्रचंड त्रास असतो. अशा पोलिसांचं समाजाने नेहमीच ऋणी असायला पाहिजे. सनावाराचा बंदोबस्त असो, मंत्र्यांचा बंदोबस्त असो, समाजातील आया बहीनींची काळजी हे पोलिसांकडे असते आणि पोलीसभाऊ यशस्वीपणे निभवतात. मग इतके सारे पोलीस समाजासाठी सहन करतात. मग त्यांच्यावर हल्ले व्हायलाच कशाला पाहिजे?

**पोलीस समाजाचे रक्षक की समाजकंटक गुंड चोर लोकांचे रक्षक?**

शितावरुन भाताची परीक्षा होते. मोठ्या गंजभर भात शिजला की नाही, जरी एक दोन शीत चाचपून पाहिले तरी अंदाज मिळतो. पेपरातील वा टिव्हीवर पोलिसांच्या बातम्यांचा अभ्यास करण्यापेक्षा आजूबाजूच्या नातेवाईक मित्रमंडळींनी ज्यांनी आरोपी वा फिर्यादी भूमिका बजावली यांचा अभ्यास केला तरी परिस्थिती कळते. पोलिसांची इमेज जनमाणसांमध्ये प्रचंड खालावली आहे.

काल परवा एक आमचे समाजबांधव मिळाले त्यांच्या मुलाची मोटरसायकल चोरीला गेली. मोटरसायकल मिळाली पण पोलीस परत देतच नव्हते. नियमाचे कारणे सांगून साडेतीन हजार रुपये पोलीसांनी तावलले. एका वेळेस तीन

फटफट्या एका बँकेसमोरुन चोरीला गेल्या होत्या, तिन्हीच्या तिन्ही मिळाल्या. पैसे तावलण्यासाठी पोलीसांनीच चोराला चोरी करायला सांगितले असावे अशी शंका त्यांच्या मनात आली. चोरी पकडल्यामुळे परफार्मन्ससुद्धा दिसून येतो. चोरी गेलेली फटफटी मिळाल्यावर बरेच पोलीस भिकाऱ्यासारखे उभे राहून निर्लज्जपणे पैसे मागत होते असा त्यांचा आरोप होता.

आमच्या खेडेगावात एक बीजेपीचे जूने वरिष्ठ नेत आहेत. जेव्हा भिसी खेडेगावात बीजेपी काय माहीत नव्हते, तेव्हा या नेताजींनी भिसीत बीजेपी वाढविली. त्यांनी छातीठोकपणे सांगितले, पोलीस दारू पकडतात. दारू विकणाऱ्या आरोपींकडून पैसे घेतात आणि पकडलेली दारू स्वतः डबल किमतीत विकतात. चंद्रपूर जिल्हातील दारूबंदीमुळे जे महसूलाचे नुकसान झाले तो पैसा पोलीसांच्या खिशात जात आहे. विकणारे डबल तिबल किमतीने दारू विकतात आणि शैकीनांना प्रचंड पैसा ओतावा लागतो.

यात काही शंका नाही की, पोलीस हुशार आहेत, टॅलेंटेड आहेत. गुन्हांचा छडा लावण्यात माहीर आहेत, या बाबत दूमत नाही. चोरीचा माल पकडतात, अर्धा चोरीचा माला कागदोपत्री दाखवितात आणि मिडीयाकडून, समाजाकडून वाहवा मिळवितात. बाकी माल स्वतःच हडप करतात असा त्यांच्यावर बरेच लोक आत्मविश्वासाने आरोप करतात.

काही दिवसांपूर्वी एक लांबचे मित्र मिळाले. त्यांच्या मुलाने मर्डर केला होता, असे खाजगीत सांगितले. त्यांनी अंशी हजार रुपये देवून मामला पोलीस स्टेशनमधूनच सलटवून टाकला असे सांगितले. मला आधी कळलेच नाही सलटवणे म्हणजे काय? पोलीसांनी घटनास्थळाचा पंचनामा, साक्षी पुरावे बदलून टाकले असावे. मृत घरचा गरीब होता.

**पंतप्रधान/मुख्यमंत्री काही करू शकतात का?**

असे म्हणतात की, एका परदेशी गृहस्थाने इंदिरा गांधींना शासन यंत्रणेतील होणाऱ्या भ्रष्टाचारावर प्रश्न विचारला. त्यांनी उत्तरले की, शेषनागाच्या फण्यावर पृथ्वी सांभाळून ठेवण्यासाठी शेषनागाला दूध पाजणे आवश्यक आहे. भ्रष्टाचार रुपी दूध हे भारताच्या शासन यंत्रणेची अतीआवश्यक गरज आहे, पर्याय नाही. असा अनुभव इंदिरा गांधी यांना आला. पंतप्रधान, मुख्यमंत्री लोकांना या भ्रष्टाचाराची पुरेपूर जाणीव आहे. पण यांचेकडे समूळ भ्रष्टाचार निर्मूलनाचे उपाय नाहीत. समजा शासन यंत्रणेबरोबर मंत्रीजी टक्कर घेतील तर त्यांचे काम कोण



करणार? दिल्लीचे आप पार्टीचे सरकार पोलीसांबरोबर टक्कर घेत असावेत. त्यामुळे त्यांचे आमदार एक एक करुन अडचणीत येत आहेत, असे कॉमनसेन्स वरुन लक्षात येते. भारतीय राज्यघटनेच्या विद्यमान कायद्याच्या चाकोरीतून भ्रष्टाचार समूळ निर्मूलन अशक्य आहे.

**लोकांचा पोलीसांवर रोष का आहे?**

ज्यांनी पोलीस स्टेशनची पायरी गाठली, त्यांचा पक्का मतप्रवाह बनला आहे की पोलीस पैसे घेऊनच काम करतात. होणाऱ्या लोकांवर अन्याय होतो, त्याला प्रचंड मानसिक त्रास होतो. तो पोलीस स्टेशनमध्ये मोठ्या अपेक्षेने जातो तेव्हा त्याचा अपेक्षाभंग होतो. फिर्यादीचा मानसिक त्रास एका बाजूला आणि पोलीसच आरोपीवर कारवाईच्या नावावर कधी कधी पैसे मागतात. समजा आरोपीला रंगेहाथ पकडले तरी त्यातही चालूगिरी करतात. चोरी, मर्डर, मारहाण काहीही असो काय, चूक काय, बरोबर काय, सत्य काय, असत्य याचा विचार न करता आरोपींकडून पैसे घेऊन त्याला मोकळीक देतात. अशा वेळेस अन्यायग्रस्त फिर्यादी हताश होतो. या जगात आपला कोणी वाली नाही. या येळझव्या लोकशाहीची भ्रष्टाचारी लबाड यंत्रणा आपल्याला न्याय देवू शकत नाही असा त्यांचा समज होतो. पोलिसांवरील होणारे हल्ले हा त्याचाच परिपाक आहे. गुन्हेगार चोऱ्या माऱ्या मर्डर करुन ताठ मानेने फिरत आहे, या वरुन सर्वसामान्य जनता अंदाज बांधतात.

**झक मारली आणि महात्मा गांधींनी स्वातंत्र्य मिळविले !!**

कालपर्यंत आम्हालाही वाटायचे की, पोलीसांवर कामाचा प्रचंड तान असतो, प्रत्यक्ष इन्वेस्टीगेशन पेक्षा त्यांची कागदी लिखापढीच प्रचंड त्यांच्यासाठी मनःस्ताप असतो. पण प्रत्यक्षात आरोपीच्या पिंजऱ्यात गेल्यावर कळले पोलीस रक्षकपेक्षा भक्षकचीच भूमिका जास्त बजावतात. यात काही शंका नाही की, कामाचा ताण त्यांच्यावर प्रचंड असतो पण हे लोक पैसे घेऊन कागदी पुरावे, साक्षी पार बदलून टाकतात, घटनाक्रमच बदलून टाकतात आणि हे सर्रासपणे पण गुप्त पद्धतीने चालते. त्या पोलीस स्टेशन पुढ्यामधे महात्मा गांधीच्या सत्य अहिंसा शब्द असलेली सजावट पाहून घीन आली, मनात धस्स झाले. पोलीस स्टेशनच्या पुढ्यात सत्य शब्द आणि आतमध्ये पूर्ण असत्यचा नंगा नाच! झक मारली आणि महात्मा गांधींनी स्वातंत्र्य मिळविले, आमच्यासाठी हेच चोरी लबाडीचे राज्य उपभोगण्यासाठी स्वातंत्र्य मिळविले का? असा प्रश्न पडला.

प्रत्यक्ष अनुभवल्या शिवाय पोलिसांचे खरे रूप कळतच नाही. पोलिसांच्यावर हल्ला करणाऱ्या मनात हाच, असत्याचा, राज्यात होणाऱ्या छुप्या अन्यायाचा उद्रेक आहे.

पोलीस असत्याचे प्रयोग पोलीस स्टेशन रूपी कडेकोट किल्यात रितसर पद्धतीने करतात. एक्का दुक्का पोलीस नाही तर पूर्ण यंत्रणाच एकजुटपणे समन्वय साधून काम करते. असे शहरातील पोलीस स्टेशनमधून लक्षात आले. मिडीयासुद्धा पोलीस मुख्यालयाला बांधलेली असते. आरोपी पोलीस लॉकअपमधून बाहेर निघायचा आत पोलीसांनी बनवलेली मॅनीपुलेड स्टोरी पेपरमध्ये, प्रसारमाध्यमांमध्ये आवूट केली जाते.

पैसाची चटक अशी लागली आहे की, पोलीसांच्या स्वतःच्या मुलाचा, आई-वडिलांचा मर्डर जरी झाला तरी पैसे घेऊन त्याही केसमध्ये आरोपपत्र, साक्षी, पुरावे घटनाक्रम पूर्ण मॅनिपुलेट करतील, अशी शंका येते. आज त्या गुंडाकडून, खूनी लोकांकडून हे पोलीस पैसे घेतात त्यांनी जर पोलीसांच्याच मुलाबाळाचा, आई वडिलांचा मर्डर केला तर तिथेही यांना लाचारी पत्करावी लागेल कारण यांना फक्त पैसा प्रिय दिसतो आहे. जे गुन्हेगार गोरगरीब कमजोरांवर अन्याय करतात हे उद्या पोलीसांच्या घरचे मर्डर का करू शकत नाहीत?

मुख्यमंत्र्यांनी काही दिवसापूर्वी सांगितले की तीस हजार पोलीसांची नवीन भर्ती होईल? हे कोवळे तरूण तरूणी पोलीस खात्यात जावून मेहनत जरूर करतील शंका नाही पण उद्या जाऊन यांनाही खाबूगिरीची चटक लागणार नाही याची शाश्वती हे सरकार देऊ शकते काय? सरकार जवळ त्यासाठी काही उपाय आहेत का?

### पोलीस स्टेशनमध्ये तुटकी फुटकी खुर्ची?

पोलीस स्टेशनमध्ये जा, तर तुटकी फुटकी खुर्च्या दिसतील. कुठे कुठे तर पोलीस निरीक्षकांच्या दालनामध्येही अस्वच्छतेमुळे बाजूच्या संडासचा शी, सू चा वास घुमत असेल. पण त्यांच्या खाजगी मालकीच्या मालमत्तेची सहानिशा केली तर लक्षात येईल की किती तरी प्लॉट्स, फ्लॅट्स, जमीन आणि इतरही मालमत्ता त्यांचेकडे घेऊन आहेत. वर उल्लेखलेली गोष्ट एका पोलीसाचीच नाही बहुसंख्य प्रमाणात आहेत, बिनहिशेबी मालमत्ता ह्या कदाचित प्रत्येकाकडेच असू शकतात. त्यांच्यावर कारवाईचा बडगा उभा करतो म्हटलो तर शक्यच नाही. बरखास्त



करतो म्हटलो तर अख्खी यंत्रणाच बरखास्त करावी लागेल. बरं यांची पैसे घेण्याची ही पद्धत अनोखी असते. ॲन्टी करप्शनवाल्यांपासून सुरक्षित राहण्यासाठी पोलीसांचे काही दलाल असतात. त्यांचे मार्फत व्यवहार चालतो. पैसे देणे सरसोट उपभोक्त्या संबंधीत पोलीसांकडे देणे टाळतात. समजा दलालाने दिले तर किती दलालाने खाल्ले आणि किती संबंधीत काम करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांचा हातात पडले याबद्दल शंकाच असते. व्यवहार नीट क्लीन झाला की नाही हे समजणे फार कठीण असते. पण सराईत गुन्हेगारांना किंवा गुन्हेगारी टोळ्यांना याचा प्रॉब्लेम नसावा. त्यांचे प्रत्येक पोलीस स्टेशनला बांधलेले व्यक्ती असावेत, असा अंदाज आहे.

### मिडीयाचा संशयी रोल ?

गुन्हेगारांची झिरो टालरन्सची भाषा करणारे मंत्री संत्री यांच्यात अंमलबजावणी करण्याची क्षमताच नाही? कारण आरोपपत्र साक्षी पुरावेचे कागदपत्र लिहण्याचा अधिकार इन्वेस्टीगेशनचा अधिकार पोलीसांनाच आहे. जिथे कुंपनच शेत खाते तिथे मंत्री संत्री काय पुंगी वाजविणार आहेत? गेल्या काही वर्षात गुन्हेगारीचे प्रमाण वाढायला, गुन्हेगारांना शिक्षा न व्हायला कारण इथेच दडले आहे. पोलीसांवर हल्ले खरोखरच निषेधार्ह आहेत, चुकीचा पायंडा आहेत यात शंकाच नाही. पोलीसांवर होणाऱ्या हल्ल्यांचा पो पो करणाऱ्या, पोलीस संरक्षणासाठी कायदे करण्याची भाषा करणाऱ्या, पोलीस संरक्षणासाठी कायदे करण्याची भाषा करणाऱ्या मिडीयाला सर्वसामान्यांच्या, अन्याय पिडीत वर्गाला न्याय मिळत नाही. त्यांच्या मनातील होरपळ दिसत नाही का? गुन्हेगारांना मर्डर करणाऱ्यांना संरक्षण मिळते, प्रोटेक्शन मिळते, सर्वसामान्यांच्या घरच्या लोकांचा मर्डर होतो. त्यांच्या मनातील बदल्याच्या भावना तशाच पचावाव्या लागतात हे मिडीयाला दिसत नाही का? गरीब सर्वसामान्य लोकांचा वाली कोण? घरच्या कोणाचा मर्डर झाला, त्याचा घरचा जीव गेला म्हणून बदल्याच्या वा न्यायाच्या भावनेने पोलीस स्टेशनचे, न्यायालयाचे दरवाजे ठोकण्याचा प्रयत्न करतो आणि यंत्रणेतील काही चोरवृत्ती, गुन्हेगारी वृत्तींना पैसे घेऊन मदत करतात. सर्वसामान्यांना न्याय मिळतच नाही. पोलीस स्टेशन, न्यायालयाचे हेलपाटे खाऊन तो थकून निराश होतो हे मिडीयाला दिसत नाही का? या परिस्थितीवर उपाय काय त्यांची अंमलबजावणी कशी करता येईल, त्यांच्या अभ्यासाचा प्रपोगंडा मिडीयावाले का करीत नाही? पोलीसांच्या वरील हल्ल्यांमागे त्यांची जनमाणसातील इमेज बांधील आहे, त्यांची इमेज स्वच्छ करण्यासाठी पोलिसांचे

हातून घडणारे चोरकाम बंद व्हावे हे मिडीया का उचलून धरत नाही?

असे नाही की भ्रष्टाचार फक्त पोलीस संत्रणेतच आहे. व्यवसायिक लोक डॉक्टर, इंजीनिअर, बिल्डर, व्यापारी, शासकीय यंत्रणेतील कर्मचारी, ठेकेदार, नेते, सर्व लोक कमी जास्त प्रमाणात चालूगिरी करतात. कोणीच स्वच्छ प्रतिमेचे नाहीत? स्वच्छ प्रतिमा जपून वागले तर जगणे सुद्धा मुश्कील? पण या सर्व समाजकंटक वृत्तीवर कारवाई करण्याची प्राथमिक, पहिल्या टप्प्यातील जबाबदारी ही पोलीस यंत्रणेवर येते आणि हाच आधारस्तंभ चोर उचक्के काम करीत असेल तर या देशाला कोण दुरुस्त करू शकेल? पोलीसांचे पुरावे साक्षी तपास माहीती न्यायपालिकेत महत्वाचे असते. त्यामुळे न्यायपालिका सुद्धा मीसलीड होते आणि सर्व गचाळ कारभार होत आहे.





# १. होय, भारतातील शिक्षक अमेरिकेतील शिक्षकांपेक्षा सरस आहेत!

भारतीय समाज आणि ही लोकशाहीची यंत्रणा विविध स्तरांनी बनली आहे. विद्यार्थी, पालक, शिक्षक, मुख्याध्यापक, तालुका स्तरावरील शिक्षणाधिकारी, जिल्हा शिक्षण अधिकारी, विभागीय अधिकारी, राज्यस्तरीय अधिकारी, सेक्रेटरी, सचिव, शिक्षणमंत्री, मुख्यमंत्री इत्यादी. या देशाला घडवायचे, बदल करायचे अपेक्षित असेल तर शिक्षक वा पालकच करू शकतात, असा आमचा अभ्यास आहे. आपल्या देशातील विविध स्तरातील यंत्रणेचे तारतम्य नसल्याने जरी एकदम वरच्या स्तरावरील राज्यकर्ते बदललने तरी या देशाचे भविष्य बदलणे कठीण आहे. पण खालच्या स्तरावरील पालक व शिक्षकांनी मनातून ठरविले तर बदल जरूर शक्य आहे.

अमेरिकेतील वास्तव्यात मला येथील शिक्षकांना जवळून अनुभवण्याचा योग आला! कामचुकारपणा, कामाची टाळाटाळ, विद्यार्थ्यांच्या अभ्यासाकडे दुर्लक्ष असा प्रकार अमेरिकेतील शिक्षकांकडून घडत नाही. भारतातील शिक्षक शाळेचे विद्यार्थ्यांचे शिकविणे सोडून स्वतःची कामे करत बसतील, एकमेकात झगडे करत बसतील इत्यादी अनावश्यक कामे करत बसणे यात काही वावगे नाही. पण तरीही भारतीय शिक्षकांची गुणवत्ता ही अमेरिकेतील शिक्षकांपेक्षा सरस आहे. अमेरिकेत जॉब अपारच्युनिटीज जास्त असल्याने इतर कुठे जर युवकांना जॉब मिळाला नाही तर शिक्षकी पेशाचा जॉब स्विकारला जातो. भारतात जॉब अपारच्यूनिटीज कमी असल्याने जर इंजिनीयर वा डॉक्टर पेशाचे शिक्षण मिळाले नाही तर तो शिक्षकी पेशामध्ये उतरतो. अमेरिकेतील शिक्षकांची बौद्धिक गुणवत्ता ही साहजिकच साधारण असते कारण उच्च गुणवत्तेचे युवक शिक्षकी पेशात येत नाहीत. व्यक्तीगत पातळीवर भारतीय शिक्षक अगदी कुशलतेने शिकवितात, शिकविण्याची क्षमता जबरदस्त आहे!

गुरू म्हणजे काय? त्यांचे महत्व काय? याचा वारसा भारतीय संस्कृतीला लाभला आहे. आपण आपले अस्तित्व लक्षात घेऊन भारतीय शिक्षकांनी गंभीरतेने स्वतःमध्ये बदल करणे वा जुना वारसा टिकवून ठेवणे अति आवश्यक

आहे. भारतीय शिक्षकांची बौद्धिक पातळी ही उच्च दर्जाची आहे आणि खूप चांगल्या क्वालीटीचे विद्यार्थी हे शिक्षक घडवू शकतात. आमच्या विद्यार्थीदशेत दरारा, शिस्त, प्रेम आणि प्रामाणिक प्रयत्न याचे मिश्रण शिक्षकी पेशात दिसून यायचे. आज थोडेसे उलट दिसत आहे. स्वातंत्र्य भारताची पहिली राजकीय नेत्यांची पिढी ही उच्चशिक्षीत आणि बौद्धिकदृष्ट्या उच्च दर्जाची होती. त्यानंतरच्या पिढ्यांबद्दल थोडी शंका वाटते. त्यामुळे चुकीचे निर्णय घेतले जात आहेत असे मला वाटते. 'छडी लागे छम छम विद्या येई घम घम' ही व्याख्याच यांनी बदलून टाकली! स्वतःही ढ आणि भावी विद्यार्थी सुद्धा ढ अशी परिस्थिती होणार असे वाटते. एक्क्या दुक्क्या शिक्षकांनी चूक केली आणि शिक्षा करतांना शिक्षकी पेशाचा दुरुपयोग केला तर तसा शिक्षकांना कडक शिक्षा जरूर करावी. पण म्हणे छडी लागे छम छमच बंद करुन टाकले. आजही कितीतरी नागरिक अभिमानाने सांगतात, गुरूजींनी मला झोडपले म्हणून मला चांगले वळण लागले आणि आज चांगल्या ठिकाणी आहो म्हणून!

ज्या शाळेत संडासची व्यवस्था नाही त्या शाळांवर बंदी येणार, मान्यता रद्द होणार असे पेपरात वाचले. हे विद्यार्थी शाळेत शिकायला जातात की हगायला जातात हेच कळत नाही. शाळेतल्या शिक्षकांची क्वालीटी महत्वाची की हगणेची व्यवस्था महत्वाची! आमच्या भिशीच्या जनता गांधी शाळेत संडास नव्हते. आम्ही गळू घेऊन पळसाच्या झाडीत अर्धा किलोमीटर जायचो. एकदा तर पॅन्टातच झाली होती. शाळेत संडास जरूर असावेत, स्वच्छ असावेत! पण संडासचा बोलबाला होण्यापेक्षा शैक्षणिक क्वालीटीचा का बोलबाला होत नाही? डोनेशन घेऊन शिक्षक नियुक्त करणाऱ्या शाळांमध्ये संडास तर उच्च प्रतीचे असतील पण शिक्षक उच्च प्रतीचे नसतील. काही दिवसापूर्वी जीवन विकास शाळेच्या बाकडे सरांना भेटलो. त्या शाळेत शिक्षक नियुक्त करताना डोनेशन घेत नाहीत हे ऐकून खूप अभिमान वाटला. त्या काळात बाकडे, सपाटे सरांसारखे नावाजलेले शिक्षक होते. अजूनही भारतातील शाळांमध्ये उच्च प्रतीचे शिक्षकआहेत. आपला देश मागे असायला कारणे काही वेगळी आहेत. पण भारतीय शिक्षकांची गुणवत्ता जगात सरस दर्जाची आहे यात काहीही शंका नाही. टीम म्हणून आमचे शिक्षक ठरलेला उपक्रम पूर्ण करणार नाहीत. पण आमचे शिक्षक जेव्हा वर्गात शिकवितात तेव्हा खरोखरच शिकवितात! भारतीय शिक्षकांचा अमेरिकेतही दबदबा वा बोलबाला आहे. बंगलोरमध्ये एक ट्यूटरविस्टा म्हणून कंपनी आहे. या कंपनीतील भारतीय शिक्षक अमेरिकेतील विद्यार्थ्यांचा होमवर्क



घेतात अमेरिकन शाळेतील आठव्या वर्गातील विद्यार्थ्यांचे काय उत्तर लिहले यांचे हे गणिताचे उदाहरण बघा! अशीच बरीच उदाहरणे मला देता येतील. पण आपण हुरळून जाऊ नये. क्वालीटी मेंटेन करावी वा इंम्प्रूव्ह करावी अशी आमची कळकळीची विनंती आहे.

(दि. १५ ऑक्टोबर २०१७, विमुक भटकंती)

# २. बुजुर्गांना नवयुवकांपेक्षा तिप्पट मताधिकार द्या!

पहिले आधुनिक लोकशाहीचे व्याख्या असलेले संविधान १७ सप्टेंबर १७८७ मध्ये अमलात आले. औद्योगिकरण मशीनरीजचे आधुनिक युग १७६० या काळात सुरू झाले. जगातले पहिले संविधान अमेरिकन संशोधक निष्णात विद्वानांनी लिहिली. त्यानंतर बऱ्याच घटना लिहिल्या गेल्या पण जेष्ठ अनुभवी पालकांच्या विशेषाधिकारांची कदर केली नसावी.

भारतीय पालकांची मुलांसाठी पाल्यासाठी मेहनत म्हणजे काही अपेक्षा न ठेवता केलेली निःस्वार्थ गुंतवणूक! त्यांच्या साठी मदर्स डे, फादर्स डे सेलीब्रेट करणे हे अमेरिकन ब्रिटीश लोकांना शोभतं. भारतीय पालकांनी रोज जरी फादर्स डे, मदर्स डे साजरा केला तरी आपण आई वडिलांचे उपकार फेडू शकत नाही, याला कारणे ही तशीच आहेत.

डॉक्टरने ऑपरेशनचा खर्च लाख भर सांगितला तर असू दे ऑपरेशन, हेच पैसे वाचतील तर माझ्या नातवाला होईल असे फक्त भारतीय जेष्ठच बोलू शकतात. त्यांच्या बद्दल आम्ही त्यांना संविधानिक अधिकार देणे काय चुकीचे?

भारतीय संविधानाचे सिंहावलोकन

राज्यघटनेत सिंहावलोकन केले तर खालील मुद्दे लक्षात येतात;

१. राज्यघटनेचा भाग तीन हा मूलभूत अधिकार विषद करतो. अनुच्छेद १५ मध्ये महिला व बालकांसाठी विशेष अनुबंध आहे. पण जेष्ठ बुजूर्ग नागरिकांसाठी वा जबाबदारी सांभाळलेल्या अनुभवी वयस्करांसाठी विशेष अधिकारांचा काहीही उल्लेख नाही.

२. भाग ३ मूलभूत अधिकारांमध्ये अनुच्छेद २४, १४ वर्षावरील बालक कामगार रोजगार साठी आणि अनुच्छेद २९ अलपसंख्यक वर्गाच्या हितासाठी आहे.

३. भाग ४ अनुच्छेद ४५, सहा वर्षाखालील बालकांच्या देखरेख आणि शिक्षणासंबंधी उपबंध दर्शवितो.

४. राज्यघटनेतील भाग १५ अनुच्छेद ३२६ अठरा वर्षावरील सर्व वयस्कांना लोकसभा आणि विधानसभा सदस्यांच्या निर्वाचनाचा अधिकार देते. यात



अनुच्छेदात पालकांना आणि बुजूर्ग जेष्ठांना विशेष मताधिकार देणे आवश्यक आहे.

५. पूर्ण राज्यघटनेत महिला, बालक, अप्लसंख्यांक, मागासवर्गीय सर्वांच्या हिताचा उल्लेख आढळतो. पण बाळाचे संगोपन, पालनपोषण करणारे, जबाबदारी सांभाळणाऱ्या पालकांसाठी तसेच अख्खे आयुष्य समाजासाठी, देशासाठी, कुटुंबासाठी वेचलेल्या जेष्ठांच्या हिताचा उल्लेख आढळत नाही.

**आवश्यक विशेष मताधिकार**

भारतीय पालकांचे स्वतःच्या मुलांसाठी केलेल निःस्वार्थ कांन्ट्रीब्यूशन आणि त्यांची व्यवहारिक जबाबदारीचा अनुभव बघता खालील बदल वा तत्सम संविधानात भाग १५ अनुच्छेद ३२६ मध्ये करण्यात यावे.

१. वयाच्या ५५ वर्षे वा अधिक असलेल्या नागरिकांना एक बॅलॉट वोटमध्ये तीन इलेक्टार वोटचे मूल्य असावे.

२. वयाच्या ३५ वर्षे ते ५५ वर्षे असलेल्या नागरिकांना एक बॅलाट वोटमध्ये दोन इलेक्टार वोटचे मूल्य असावे.

३. कमीत कमी १८ वर्षे वय ते ३५ वर्षापर्यंत एक बॅलाट वोटमध्ये एकच इलेक्टार वोटचे मूल्य असावे.

**अमेरिका–ब्रिटन–पाश्चात्य देशातील परिस्थिती**

वयाच्या अठराव्या वर्षानंतर अमेरिकेत पालक आपल्या मुलाला घरी ठेवत नाही. समजा चुकीने ठेवावे लागले तर त्यांना मुलांवर उपकार केल्यासारखे वाटते. भारतीय आई–वडील यांचे पालन पोषण, संगोपन, लालन पालन भावनिक संचयनावर आधारित असते. भारतीय पालक निरपेक्ष निरामय निर्लेप निष्पाप मेहनत स्वतःच्या पाल्यासाठी घेतो, तेही वयाच्या शेवटच्या श्वासापर्यंत!

भविष्यातल्या स्वतःच्या पेंशन वा भविष्य निधीची चिंता अमेरिकन पालकांना असते. आजे, नातू, मुलगा एकाच घरात राहून एक सुखी, यशस्वी, शांती, समाधानी कुटुंबाचे स्वप्न भारतीय पालक बघत असतात. माझ्या हयातीत माझी मुले, नातू सर्व एकत्र दिसावीत असे स्वप्न बघतात.

भारतीय पालकांना भूतदया आधारित फक्त कायद्याचे संरक्षण उपयोगाचे नाही, त्यांना त्यांचे हक्क मिळणे अती आवश्यक आहे. त्यांचे निर्भीड हक्क म्हणजे त्यांच्या जेष्ठतेनुार, अनुभवरूपी पात्रतेनुसार, त्यांच्या डोक्यावयन

निपटलेल्या कितीतरी उन्हाळी–पावसाळीनुसार, त्यांनी समाजासाठी कुटुंबासाठी देशासाठी केलेल्या कांन्ट्रीब्यूशन नुसार त्यांना तुलनात्मक मताधिकाराचे वेटेज मिळायला हवे.

लैंगिक–वैवाहिक सुखासाठी इंग्रजी पालक दोन–चार वर्षाआड नवीन नवीन लग्न करत राहतात. तर भारतीय आई–वडील पालक एक दुसऱ्यामध्ये तीव्र मत भिन्नता असली, वैचारिक विसंगती असली, तरी मुलाच्या भविष्यासाठी मरेपर्यंत एक दुसऱ्याला शिव्या देत एकत्रच जगतात. भारतीय पालकांचा हा खूप मोठा त्याग आहे. या त्यागाची गोऱ्यांचे अनुकरण करुन बनलेल्या संविधानात दखल घेतल्या गेली नाही, किंमत दिल्या गेली नाही.

आपले प्रथम गुरू म्हणजे आई वडील; त्यांच्या उपकाराची परतफेड फक्त भूतदयेच्या माध्यमातून त्यांना नमस्कार चमत्कार पुरती मर्यादित असावी काय? सहानुभूती आपुलकीने काम भागणे शक्य नाही.

भारतीय संस्कृती ही खाल्ल्या अन्नाला जागणारी दुसऱ्यांनी केलेले उपकार फेडणारी संस्कृती आहे. त्यामुळे दुध देणाऱ्या गाईला, जीवे गोमुत्र, शेण मानवी आयुष्यासाठी खूप गुणकारी आहे. तिला गोमाता मानून पूजा करते. अमेरिकन संस्कृती जन्म देणाऱ्या आई वडीलांना वृद्धाश्रमाचा रस्ता दाखविते. आई वडीलही मुले प्रौढावस्थेत आल्यावर बाहेरचा रस्ता दाखवतात. एक दुसऱ्याच्या उपकाराला कधी बाहेरचा रस्ता दाखवतील आणि कधी नमकहराम बनतील याची शाश्वती नसते. भारतीय कुटुंबाचे भावनिक संचायनावर आधारित असल्याने घरात सुख शांती समाधान नांदते. तर अमेरिकन कुटुंब भावनापेक्षा व्यवहारिक दृष्टीकोन असल्याने त्यांचे, कुटुंबीयांचे अंतर्गमन, अशांतता, असमाधानी, अतृप्ततेने ग्रासलेले असते.

१८ वर्षाच्या मुलांची अनुभवानुसार पात्रता बघा! समाजासाठी केलेले कुटुंबासाठी केलेल कंन्ट्रीब्यूशन बघा त्यांची. वैचारिक बौद्धीक पातहीचा विचार करा, त्यावरून ठरवा. १८ वर्षाच्या दुधमाशीवाल्या मुलांना आणि जबाबदारीचा अनुभव असलेल्या कितीतरी मानसिक कौटुंबिक तानतनाव झेलून पांढरे केस असणाऱ्या अनुभवी जेष्ठांना मतदानाच्या एकाच पारड्यात केस काय ठेवू शकता? जबाबदाऱ्या म्हणजे काय हे सांभाळल्याशिवाय तरी कळते काय?

**भारतीयांनी नेहमी गोऱ्यांच्या विचारसरणीचा अनुकरण करावे कां?**

भारतीय जन्म, त्यांच्या संस्कृतीचा जन्म हा गोऱ्या लोकांच्या अनुकरणासाठी



नाही तर जागतिक नेतृत्वासाठी झाला आहे हे लक्षात असू द्या. जगाच्या कोणत्याही संविधानात वयानुसार जेष्ठतेनुसार व्यक्तीत्वानुसार मतदानाचा अधिकार बदलला गेला नाही. म्हणून आम्ही आमच्या आवश्यकतेनुसार, पात्रतेनुसार, वयानुसार, अनुभवाने मजबूत बनणाऱ्या वैचारिक शक्तीच्या पातळीनुसार बदलला तर त्यात वावगे काय?

यात काही शंका नाही की अमेरिकन संविधान संशोधक निष्णात विद्वान होते. पण याचा अर्थ असा नाही की काळानुसार, भूमीनुसार, संस्कृतीनुसार आम्ही बदल करू नये.

नेहमी नेहमी आपण दुसऱ्यांचा अनुनय केला, कॉपी केली, अनुकरण केले तर त्याचे रूपांतर आपल्या कमजोरीत होते, स्वतःचे आपणच अवमूल्यन करतो.

या मागणी मागे रूढी, परंपरा, जात, धर्माचा संबंध नाही आहे. इथे अनुभव, पात्रता, वैचारिक पातळी, निर्णय क्षमतेची उत्कृष्ठता, योग्यता इत्यादीचे मूल्यमापन महत्वाचे आहे; जे देशासाठी, लोकांसाठी, लोकांच्या भल्यासाठी अती आवश्यक आहे.

जेष्ठांचे दीर्घ अनुभवाने येणारे शहाणपण आणि तरूणाची अपरिपक्व निर्णयक्षमतेला एकाच पारड्यात बसविणे देशाच्या हिताचे नाही. म्हातारपणात कोर्टाच्या पायऱ्या घासविण्यापर्यंत त्यांच्यात क्षमता असते काय? असेही न्यायपालिकेतून न्याय मिळण्याची परिस्थिती कशी हा भाग तर परत जीवघेणा!

जेष्ठांसाठी त्यांना अधिकार रक्षणासाठी कायदे जरूरी आहे, पण वयानुसार उपयोग करणे कठीण आहे. असेही नातु, पणतु, आजी, आई वडील आणि नातेवाईक असलेली संयुक्त आणि सुखी समाधानी शांती नांदणारी कुटुंबे भारतातून नष्ट होत आहेत. संविधानातील मतदानाचे वा बदलाने जुनी सुखी समाधानी शांती नांदणारी कुटुंबे बळकट करायला मदत होईल.

**आजच्या बदलत्या कुटुंबव्यवस्थेची गरज**

बदलत्या संस्कृतीमुळे न्युक्लीअस कुटुंबाचे लालन पालन वाढल्याने, नवरा–बायकोचे वाद वाढल्याने म्हातारपणी आपले कसे होईल हे प्रश्न निर्माण होत आहेत. जेष्ठांचे मानसिक खच्चीकरण होत आहे. संविधानात हा निर्णय वा बदल जेष्ठांना मानसिक हिंमत देईल, त्यांचे दुःख कमी होईल. खरं तर संयुक्त कुटुंब व्यवस्थेमुळे भारतीय घरातील गॅस, इलेक्ट्रीसिटी, घरखर्च, स्वयंपाकासाठी

लागणार मॅनपॉवर याची प्रचंड बचत होईल. पण भारतीय लोक गोऱ्यांच्या संस्कृतीनुसार प्रवाहात वाहून जात आहे. जेष्ठांच्या दीर्घ अनुभवाने येणाऱ्या बौद्धिक वैचारिक पातळीचा अनुभव आणि शहाणपणाचा फायदा तरूणांना होणे आवश्यक आहे. जेष्ठांना विशेष महाधिकार आपसुकच त्यांना मान सन्मान आणि आदर मिळेल. 'सौ सुनार की एक लोहार की' वाला जेष्ठांचा अनुभव आपल्या उपयोगात आणण्यास तरूण हिचकणार नाही. १८ वर्षाच्या तरूणांच्या तुलनेत एक ५५ वर्षाचा जेष्ठ नागरिक तीन वोट देतो म्हटल्यावर आपसुकच आमदार, खासदार, नगरसेवक, सदस्य जास्तीची काळजी घेतील. जाहिराती माध्यमाच्या ओघात प्रवाहात वाहून जाणारा तरूण नवयुवक वर्ग, प्रसारमाध्यमांच्या भडक जाहिरातीमध्ये वाहून जाऊन निर्णय घेणारा तरूण वर्ग कितपत सक्षम निर्णय क्षमतेचा आहे? हा तरूण वर्गाला एका मताचा अधिकार आहे तर पस्तीस वर्षावर नागरिकांना दोन मताचा; आणि पंच्चावन वर्षावरील नागरिकांना तीन मतांचा अधिकार देण्यात काय अडचण आहे?

(दि. १४ मे २०१५, अभयराज्य)



# ३. तथाकथित अडाणी आई–वडिलांची विद्यार्थी अभ्यासात मदत घेऊ शकतात?

निसर्गातील ज्या ज्या गोष्टींची मानवाला जगण्यास मदत होते, जीवन चालू असायला मदत होते, जगण्यास सहाय्यभूत ठरतात त्या प्रत्येक गोष्टींला आपल्या भारतीय संस्कृतीने महत्व दिले याच कारणामुळे इथलया संस्कृतीने आई–वडील व गुरू यांना देव मानलयं. कालप्रवाहात या संस्कृतीचे मूळ शुद्धरूप हरविले, विकृती व भेसळ शिरली, जातीपातीच्या झगड्यात मूळ शुद्ध धर्म लोप पावला. पण तरीही आपल्याला जन्म देणारे मायबाप हेच आपले प्रथम गुरू! आई–वडील गुरूंना आपली संस्कृती देवाचे स्थान देतो, पूजतो, आदर करतो आणि त्यांचे प्रती कृतज्ञता व्यक्त करतो. आपली भारतीय संस्कृती जगात सर्वश्रेष्ठ संस्कृती आहे.

अमेरिका वा पाश्चात्य देश हे भारतापेक्षा ५० ते १०० वर्षांनी अती विकसीत आहेत. अमेरिकेत गेल्यानंतर स्वर्गासारखे रूप पाहून सुरवातीला मला वाटायचे आमची संस्कृती आमच्या पिछडलेल्या विकासाला कारणीभूत असावी. पण तसे मुळीच नाही. भारत देश पाश्चात्यांपेक्षा मागासलेला असायला बरीच कारणे आहेत. पाश्चात्यांच्या अतीविकसन शीलतेला बरीच कारणे आहेत, त्यापैकी एक म्हणजे मिळून मिसळून यशस्वीपणे काम जलदपणे एक्झीक्यूट करण्याची क्षमता! आपण स्वतःही करणे आणि सोबतच इतरांकडूनही यशस्वीपणे करून घेण्याची वृत्ती! आपण विद्यार्थी दशेपासूनच या गोष्टी मनावर बिंबवू शकतो. यालाच दुसऱ्या भाषेत टिमवर्क म्हणतात. प्रत्यक्ष अप्रत्यक्ष आपण आपल्या आई–वडील, शिक्षक, नातेवाईक यांची मदत घेऊन जास्तीत जास्त अचीव्ह करण्याचा प्रयत्न करणे! खरं तर भारतीय पालकांची मदत करण्याची वृत्ती ही पाश्चात्य पालकांपेक्षाही प्रखर आहे. त्यामुळे उद्या जाऊन पाश्चात्यांच्या आपण एक पाऊल पुढे असू शकतो.

निसर्गाने जगातल्या सर्व प्राणीमात्रांना मानवाला आयुष्य जगण्याच्या मर्यादा दिलेल्या आहेत. जसे जसे वय वाढते, तसे वयोमानानुसार शरीरातील पेशींची लवचिकता कमी होते. त्यामुळे आई–वडिलांची वयाने मोठे असल्याने नवीन शिक्षण आत्मसात करण्याची क्षमता वा त्यांचे अभ्यासातील शार्पनेस कमी होत जाते. वरून आई–वडिलांच्या काळातील अभ्यासक्रम आणि आजच्या

अभ्यासक्रम वेगळा आहे. त्यामुळे आई–वडीलांना काय बोडख समजणार असे गृहीत धरून त्यांचेकडून मदत न घेणे चुकीचे आहे. त्यांना आपल्या अभ्यासक्रमाच्या विषयाचे सखोल ज्ञान नसेलही पण त्याची अचूक मार्गदर्शन करण्याची शक्यता जास्त असते. आपल्या आई–वडिलांकडून डायरेक्ट शिकविण्यात मदत मिळो वा ना मिळो, त्यांच्यासोबत ताळमेळ असणे खूप महत्वाचे असते. आपल्या कमी शिकलेल्या आई–वडीलांना वा तथाकथित (सोकॉल्ड) अडाणी पालकांना कमी समजणे हा शुद्ध मूर्खपणा! त्यांचा तर्जूबा वा अनुभवाचा कसेही करून फायदा घेणे हे विद्यार्थ्यांचे अक्कलेचे काम!

आपल्या आई–वडिलांचे वा नातेवाईकांची काहीआपआपसात कुरकुर चालू असेल तर त्यात न मिसळता आपण एक–दुसऱ्यांची मदत मिळवून जास्तीत जास्त फायदा घेणे हे अकलेचे काम! त्यांचे झगडे कुरकुर बाजूला आणि आपला अभ्यास दुसऱ्या बाजूला! नेहमी आपली सपोर्टीव वृत्ती असणे महत्वाचे! आपण जी उठापटक वा धावाधाव करतो ती त्यांनी त्यांच्या वयात केलेली असते. आपल्या आई–वडिलांना आपला पुरेपूरे अभ्यास असतो. त्यामुळे आज आपण करीत असलेली उठापटक यशस्वी होणार की नाही याचे अनुमान आपले आई–वडील इतरांपेक्षा जास्तीत जास्त ॲक्यूरेट देऊ शकतात. आई–वडिलांची अनुभवपूर्ण मार्गदर्शन त्यांच्या वयाच्या कोणत्याही काळात कामी पडू शकते. अनुभवी पालकांचे क्षुल्लक वाटणारे मार्गदर्शन 'सौ सुनार की एक लोहार की' असे ठरू शकते.

जो आपल्यावर प्रेम करतो तो कधी आपल्याला मारतो ही, जो आपल्यावर प्रेम करतो त्याला एखादे वेळेस मारण्याचाही अधिकार असतो. आपले आई–वडील आपल्याला मारतात, रागावतात तर त्यांना काय मजा वाटते काय? उलट तेच मनातल मनात हिरमुसले होतात. आपल्याला रागावल्यावर त्यांनाच रात्री झोप येत नसले. आपल्या चुकीच्या वागण्याला प्रोत्साहन देणे योग्य नव्हे म्हणून ते आपल्याला शिक्षा करतात. आपले भविष्य उज्ज्वल व्हावे ही त्यांची शिक्षा करण्यामागची भूमिका असते. आई–वडीलांची गुरूजीची मदत ही निःस्वार्थ, निरपेक्ष असते. त्यांचे आशिर्वादामागे काही स्वार्थ वा व्यवहार दडलेला नसतो म्हणून त्यांचे सोबत मिळून मिसळून समजून घेऊन ते खूप बिझी असले तरी अभ्यासात मदत घेणे महत्वाचे असते. आई–वडिलांच्यामागे दुनियाभरचे टेंशन असू शकतात, आठवड्यातून अधूनमधून जरी चर्चा झाली तरी बरे!



आपण दरवर्षी अभ्यास करतो. दरवर्षी नवीन प्लॅनिंग, नवीन वेळापत्रक बनवितो पण शेवटी वर्गातला आपला जो गुणानुक्रमांक असतो तो बदलतच नाही! आपल्या गुणवत्तेची पातळी कशी वाढवावी हा मोठा प्रश्न आहे. एक असते देवाने दिलेली वा निसर्गाने दिलेले उपजत बुद्धी! दुसरे असते आपण आई–वडील, भाऊ–बहीण, नातेवाईक, शिक्षक, शाळा यांच्या सहवासातून वा संपर्कातून आपली गुणवत्तेची पातळी उंचावू शकतो. केंब्रीज सारख्या विद्यापीठातही तेथील अभ्यासक्रमापेक्षा तेथील लोकांची संगत, इतर विद्यार्थ्यांचे नेटवर्क विद्यार्थ्यांना मदत करणे, असा अनुभव आहे. शक्यतो आपली संगत आपल्या बुद्धीमत्तेची पातळी उंचावण्याला मदत करते. त्यामुळे बुद्धीमान लोकांसोबत आपला संपर्क जास्त ठेवणे मदतीचे ठरू शकते. बुद्धीमान शिक्षक उत्कृष्ठ शिक्षक असण्याची शक्यता कमी असते, असा उल्लेख साने गुरूजींनी त्यांचे पुस्तकात केला. पुस्तकी अभ्यासात निपून असणारे लोक तापट वा हेकड स्वभावाचे असण्याची शक्यता असते असा अनुभव मला अमेरिकेतही आला. समोरचा माणूस तापट असो वा हेकड, आपले ध्येय महत्वाचे असते, आपल्या कामापुरता संपर्क ठेवण्याचा प्रयत्न जरूर करू शकतो. वर्गातले हुशार विद्यार्थी कोण हे आपण परीक्षांच्या निकालावरुन ठरवू शकतो. पण शाळेतल्या गुरूजींपैकी सर्वात हुशार कोण हे कसे समजणार? त्यांचीसुद्धा परीक्षा झाली तर जाणून घेता येईल? खरं तर तसे करायची जरूरत नाही. आपल्या शिक्षकांची गुणवत्ता जगात पहिल्या क्रमांकाची आहे, आपण त्यांच्या अभ्यासाचा पुरेपुर फायदा घेणे महत्वाचे! काही मन लावून काम करणारे शिक्षक सोडले तर बाकींकडून मॅक्झीमम आऊटपुट काढणे म्हणजे सर्कसच असली तर तेच आपल्याला यशस्वीपणे त्यांचेकडून करवून घेण्याचे कौशल्य आपण मिळविणे आवश्यक आहे.

(दि. १६ जून २०१४, अभयराज्य)

# ४. जेष्ठ नागरिकाला डबल मताचा अधिकार द्या! ऑनर किलींग कसे थांबविता येईल?

**अकिर्ती चापी भूतानी**

**कथयिष्यन्ति ते व्ययाम्**

**सम्मावितस्य चाकी**

**र्तिमरणदतिरिच्यते ।।३४।।**

**अर्थ** : लोक नेहमी तुझ्या अपयशाचे वर्णन करतील आणि सन्मान्य व्यक्तीसाठी दुष्कीर्ती ही मृत्यू पेक्षाही भयंकर आहे. हा भगवद्‌गीतेच्या सांख्य योगातील चौतिसावा श्लोक आहे. अर्जुनाचा सखा आणि तत्वोपदेशक या नात्याने अर्जुनाला त्याच्या युद्ध करण्याच्या नकाराबद्दल अंतीम निर्णय देत आहेत. प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे भगवान श्रीकृष्ण सांगत आहेत की सन्मान्य व्यक्तीने सामाजिक प्रतिष्ठा गमावू नये, त्याचे रक्षण करावे. सन्मानीय व्यक्तीसाठी दुष्कीर्ती वा सामाजिक प्रतिष्ठा गमावणे हे मृत्यूपेक्षाही भयंकर आहे. आपण जर सामाजिक प्रतिष्ठा गमावली तर आपले मित्र आपल्याला सोडून जाऊ शकतात, शत्रू आपले अपमानास्पद शब्दात वर्णन करतात, आपल्या योग्यतेचा उपहास करतात. त्यामुळे आपले जीवन खूप दुःखकर करून टाकतात. समाजातले छोटेमोठे लोक सुद्धा आपल्याला तुच्छ समजतात, ज्यावेळेस आपण सामाजिक प्रतिष्ठा घालवितो! मूळात भारतातील पालक हा खूप मेहनती आहे. भारतीय आई–बाप आयुष्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत मुलांच्या भल्यासाठी धडपडत असतात. साहजिकच जे आई–बाप स्वतःचे सांसारिक, वैयक्तिक, वैवाहिक वाद बाजूला ठेवून मुलांसाठी सर्वस्व बहाल करतात ते भारतीय (हिंदू असो, मुसलमान असो वा बौद्ध असो) आपल्या मुलांकडून जरूर अपेक्षा करू शकतात. अशा मेहनती आई–बापांच्या मनाविरूद्ध जर मुलांनी काही केले ज्यामुळे त्यांची सामाजिक प्रतिष्ठा घालविल्या जात असेल तर आई–बाप पेटनू उठू शकतात.

ज्यावेळेस बाबासाहेब आंबेडकर, डॉ. राजेंद्र प्रसाद, पंडीत जवाहरलाल नेहरू इ. अभ्यासू व्यक्तींनी भारतीय संविधान लिहिले तेव्हा अमेरिका, इंग्लंड आणि युरोपातील इतर देशांचे संविधान उपलब्ध होते. हे सर्व युरोपीय वा अमेरिकन देश



ख्रिश्चनिटीच्या (ख्रिश्चन) धर्माच्या प्रभावाखाली होते. जास्त करून त्याकाळात उपलब्ध असलेल्या संविधानाचा अभ्यास केला गेला ज्यांची संस्कृती ही भारतीयांपेक्षा वेगळी आहे. पाश्चिमात्य संस्कृतीत लग्न हा एक कॉन्ट्रक्ट असल्यासारखा असतो. पाश्चिमात्य आईबाप स्वतःच्या वैवाहिक सुखासाठी मुलांचा विचार न करता काडीमोड घेऊन नवीन नवीन लग्न करीत राहतात. युरोपीय आईवडील मुलांच्या भविष्याची चिंता न करता म्हातारपणातल्या आपल्या पेंशनची चिंता करत असतात. भारतीय संविधान लिहितांना किंवा त्यानंतर कायदे बनवितांना भारतीय आईवडीलांचा विचार केला गेलेला नाही. जेष्ठ या शब्दाला किंमत दिली गेलेली नाही. अठरा वर्षाच्या मुला–मुलींना ज्यांना अजून दुनियादारीचा अनुभव नाही, जी मुले माय–बापाच्या भरोशावर उड्या मारत असतात, ज्यांची अजून दूधमिशी वाढली नाही, त्यांना एक मताचा अधिकार देण्यात आला आणि जे बुजूर्ग आई–बाप मुले वाढविण्याचा अनुभव असलेले दुनियादारीचे खरे टेंशन ज्यांना कळले आहे. त्यांना तेवढ्याच मताचा अधिकार देण्यात आला. भारतीय संस्कृतीचा विचार करता, भारतीय माय–बापांच्या त्यागाचा विचार करता प्रत्येक पस्तीस किंवा जास्त वयाच्या व्यक्तींना दुप्पट मताचा अधिकार देणे आवश्यक आहे. याचा अर्थ अठरा ते पस्तीस या वयापर्यंतच्या उमेदवाराला एक मत देता येते तर पस्तीशी नंतर च्या व्यक्तीला दोन मते देता यायला हवी. पाश्चिमात्य वा ख्रिश्चन संस्कृतीत वयाला किंमत दिली जात नाही. पण आपले तसे नाही. आपल्याकडे वयानुसार मान सन्मान प्रतिष्ठेला महत्व आहे. जितके जास्त वय तितके उन्हाळे–पावसाळे डोक्यावरून गेले असतात, केस पांढरे पडले असतात. वयाच्या पंचावन्न वर्ष किंवा त्यापेक्षा जास्त वयाच्या लोकांना तिहेरी मताचा (तीन मत)चा अधिकार मिळाला तर त्यांचे म्हातारपणात बरोबर काळजी घेतली जाईल, त्यांच्या संरक्षणासाठी आपसुकच कायदे बनतील.

(दि. ६ फेब्रुबारी २०१४, अभयराज्य)

## ५. 'छडी लागे छमछम' वर बंदी नको!

केंद्रीय महिला व बाल कल्याण विभागाने तयार केलेला बालहक्क कायदा, इंग्रजी कायद्यांचे अंधानुकरण आहे. अशा कायद्याने भारतात एंटरटेनमेंट व्हायलाच नको! नवीन काहीतरी, नवीन कायदे काढून शिक्षकांना साधे डटावणे, रागावणे आणि वेळप्रसंगी मारण्याची सोय बंद करण्यात येत आहे. विद्यार्थ्यांना छडीने शिक्षा करता येणार नाही असे कायदे काढणे म्हणजे सरकारी यंत्रणेचे अर्धवट अभ्यासाचे लक्षण आहेत. अमेरिकेतही इमीग्रेटेड, भारतातून शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांचा दबदबा आहे. काही वर्षापूर्वी अमेरिकेचे माजी अध्यक्ष बील क्लिंटन यांनी अमेरिकेतील शिक्षणाचा दर्जा भारतातील शाळांच्या दर्जाची बरोबरी करावी असे विधान केले होते. अमेरिकेचे अध्यक्षांना का स्वप्न पडले होते का की भारतातील विद्यार्थ्यांचा, शिक्षणाचा दर्जा अमेरिकेपेक्षा चांगला आहे म्हणून? छडी लागे छमछम विद्या येई घमघम हे कधी बंद व्हायलाच नको, यातच भारताची शैक्षणिक, जागतिक प्रतिष्ठा लपलेली आहे. छडी लागे छमछम मुळे शिस्त राहते, शिक्षक विद्यार्थ्यांना वळण लावू शकतात. बंदी केल्याने शिक्षणाची ऐशी तैशी होईल. उलट मुले वर्गात बेशिस्त निर्माण करतील. सरकारने नवीन काहीतरी केले आहे, सरकारने काहीतरी केल्यासारखे वाटले पाहिजे म्हणून असले कायदे करू नये. काही शिक्षक अतिरेक करतात, त्यांच्या अधिकाराचा दुरूपयोग करतात त्यांना पाचपट शिक्षा करा! पण जे शिक्षक मन लाऊन डेडीकेशनने काम करतात त्यांच्यावर हा चाबूक आहे. अत्यंत चुकीचे हे निर्णय आहेत. एकाने गैरवर्तन केले तर दूसरे विद्यार्थीही करतील. जसा एक आंबा सडला टोपलीतला तर सर्व सडतील. तसेच इथे होणार आहे. भारतातील शिक्षक गुणवत्तेत प्रथम क्रमांकाचे आहेत. त्याच्या गुणवत्तेचा लाभ भारतीय विद्यार्थ्यांना होतो. त्यामुळे आज भारतीय विद्यार्थ्यांचा दबदबा अमेरिकेतही आहे.

**इंग्रजांची माय व्याली तर भारतीयांची सुद्धा...**

शाळेतील शिस्त इतकी खराब होईल की मुलीची छेडछाड सुद्धा वाढेल. सरकारने आपल्या मर्यादा समजून घ्याव्यात. शाळेतील शिक्षकांचे काम विद्यार्थी घडविणे आहे. त्यांना त्यांचे काम करू द्या. अशी ही भारतातील कायदे, सरकार याची इमेज चांगली नाही. शिक्षकांना तरी त्यांचे काम चांगल्या पद्धतीने करू द्या



ना! प्रत्यक्ष अप्रत्यक्ष छडीच्या धाकामुळे, घाबरून विद्यार्थी अभ्यास करतात म्हणून भारतीय विद्यार्थ्यांची, शिक्षकांची गुणवत्ता चांगली, कुठे प्रेमाने काम करून घ्यायचे, कुठे छडी वापरायची हे शिक्षकांना करू द्या. सरकारने पालकांनी फक्त अधिकाराच्या मिसयुजवर लक्ष ठेवावे, मीसयुज केल्यास कडक शिक्षा करावी.

खेड्यात राहणारा कामगार, शेतकरी वर्ग, मजूर वर्ग रोज आपल्या कामात मग्न असतो. त्यांना स्वतःचे मुलांकड लक्ष द्यायला वेळ मिळत नाही. अशा वेळेस शिक्षक मुलांना वळण लावण्याची, विद्यार्थ्यांकडून अभ्यास करवून घेण्याची जबाबदारी स्वतःवर घेतात. भारतीय शिक्षकांवर सरकारने त्याच्यात चुकीची ढवळाढवळ करू नये. शिक्षक विद्यार्थ्यांकडून अभ्यास करवून घेणार नाहीत, विद्यार्थ्यांकडून होमवर्क करवून घेवू शकणार नाहीत तर विद्यार्थी त्यांच्या विषयात सखोल ज्ञान कसे मिळवतील? सरकार वा नॅशनल कमीशन फॉर प्रोटेक्शन ऑफ राईट वाले जाऊन विद्यार्थ्यांचा अभ्यास घेणार आहेत का? इंग्रजांकडून, पाश्चात्यांच्या कोणत्या गोष्टींचे अनुकरण करावे आणि कोणत्या गोष्टींचे करू नये याचा सखोल अभ्यास सरकारच्या सल्लागारांनी करावा, काहीतरीच उठापटक करू नये.

**सरकारच्या सल्लागारांना सखोल अभ्यासाची गरज!**

इंग्रजांनी वा पाश्चात्यांनी कोणते कायदे केले व कोणते कमीशन नेमले ते वाचायचे आणि आल्याकडे कायदे करायचे म्हणजे अर्धवट अभ्यासाचे लक्षण आहे. जसा प्राडक्ट सायकल असतो तसा मानवनिर्मित युगाची सुद्धा सायकल असते. भारतीय समाज वैदिक युगाच्या सायकल मधून गेलेला आहे. विज्ञान युगाचा चक्र वा सायकल संपेल तेव्हा संपेल, हा विषय वेगळा! पण सरकारच्या सल्लागारांनी इंटरनेटवरून पाश्चात्यांचे कायदे वाचण्यापेक्षा भारतातील आपल्या पूर्वजांचा, नालंदा सारख्या किंवा ऐतिहासिक भारतीय संस्कृती, बालसंस्कार, गुरू शिष्य संस्कृतीक अभ्यास करून, आधुनिक आणि प्राचीन बुद्धकाळापासूनचा अभ्यास जोडून भारतीयांना जागतिक लिडर बनण्यासाठी आखणी करावी. भारतीय शिक्षकांची आणि डॉक्टरांची क्वालीटी अमेरिकन वा पाश्चात्य शिक्षकांपेक्षा सरस आहे. मानवाची शरीररचना काळानुसार बदलत नाही. भारतीय विद्यार्थी पाठांतरावर भर देतात. अमेरिकेत पाठांतरावर भर देत नाहीत. भारतीय विद्यार्थी हार्डवर्क करतो. डॉक्टरांच्या शिक्षणाचा अभ्यासक्रम बदलत नाही. त्यामुळे ४०–५० कोटी लोकसंख्येच्या अमेरिकेत, भारतीय जरी १ कोटी ही नसतील. पण

भारतीय मूळ असलेल्या डॉक्टरांची संख्या अमेरिकेतील डॉक्टरांच्या तुलनेत २० ते ३० टक्के आहे. इंजिनियरिंगचा अभ्यासक्रम वर्षावर्षाला बदलत असतो तसे मेडीकलचे नसते.

असो! शिक्षा केल्याने रागावल्याने (मर्यादित) मुले मानसिकदृष्ट्या मजबूत होतात. निसर्गाने निर्माण केलेली प्रत्येक गोष्ट मर्यादित वापरली तर त्याचा फायदाच असतो. कामगार, मजूर ग्रामीण वर्ग पाल्याच्या शिक्षणासाठी शिक्षकांवरच अवलंबून असतात. मुले पालकांना ऐकत नाहीत पण शिक्षकांना ऐकतात. कितीतरी विद्यार्थ्यांचे त्यामुळे भले झालेले आहे.

संस्थाचालक आणि शिक्षकांनी गंभीर असणे महत्वाचे!

काही शिक्षक विचित्र वृत्तीचे असू शकतात. कुठे बायकोबरोबर भांडण झाले, त्याचा घरगुती भांडणाचा कुदका मुलांना मारण्यात काढतात. एका शिक्षकाचे नवव्या दहाव्या वर्गातल्या एका मुलीवर प्रेम जडले. त्या गुरूजींना वर्गातल्या इतर हुशार मुलांवर कुदवा काढणे चालू केले. कधी कधी कारण नसताना विद्यार्थ्यांना शिक्षा केल्याचे मी बघीतले आहे. पण हे २०–२५ शिक्षकांमधून एखादा करतो. अशा शिक्षकांना पालक, संस्थाचालक, इतर शिक्षक आणि आपली कायदेव्यवस्था यांनी एकत्र येवून प्रामाणिकपणे वेसन खेचायला पाहिजे. पण छडी लागे छमछम वर बंदी आणू नये.

बाल हक्क आयोग, मानवाधिकार आयोग, महिला आयोग अशासारखे बुजगावने इंग्रजांनी त्यांच्या संस्कृतीची पोळी भाजण्यासाठी बनविले आहेत. त्यांच्यासाठी ते ठीक आहेत पण भारतीयांनी जे हजम होत नाही ते खाण्यासारखे आहे. आम्ही भारतीय मूळ कारणांचा अभ्यास न करता, रोगराई मूळापासून मिटविण्याचा प्रयत्न न करता वरवर औषधी घेण्याचा प्रयत्न करीत आहोत.

(दि. २६ नोव्हेंबर २०१७, विमुक भटकंती)



# ६. शिक्षणमंत्री चोंद्रू भगत ?

शिक्षण शिक्षण शिक्षण! शिक्षणाशिवाय पर्याय नाही. प्राथमिक शिक्षण कंपलसरी! १४ वर्षाखालील शाळाबाह्य दाखवा आणि बक्षिस मिळवा, असे एकावर एक शिक्षणाचे गुण गातात. पण खरं तर शाळेत खोटे खोटे शिकवितात? अभ्यासक्रमात एक लिहिले असते आणि प्रत्यक्षात काही वेगळेच असते. भारतीय लोकांसाठी लहानपणापासून शाळांमध्ये अभ्यासक्रमच चूकीचा शिकविला जातो? त्यातल्या त्यात विषय म्हणजे नागरिकशास्त्र!

### पैसे देऊन वोट खरेदी करणे ?

लोकशाहीमध्ये प्रत्येक नागरिकाला मतदानाचा अधिकार असतो. लोकच नेता निवडून देतात. पण निवडणूकीच्या वेळेस नेते लोक लपून छपून तर कधी प्रत्यक्षात पैसे वाटून मत मागतात. हा उल्लेख पुस्तकात का असू नये? विद्यार्थ्यांना खोटे खोटे का शिकवावे? पुस्तकात तसा उल्लेख का असू नये? कुठे कुठे काही ग्रामीण भागात चिवडा आणि दारू पार्टी मतदारांना देतात आणि नागरिकांची मते फोडली जातात. कुठे बकरा पार्टी तर कुठे कोंबडा पार्टी. याचा उल्लेख अभ्यासक्रमात का असू नये? नेते आणि त्यांचे चेले चपाटे तर सोडा पण मतदारही निवडणूक काळात दारू मटन चिकन पार्टी तसेच पैसे हातात पडण्याची अपेक्षा ठेवतात.

### विकासनिधीतून आपले गल्ले भरणे ?

सरपंच, आमदार, खासदार, ग्रामपंचायतच्या माध्यमातून गावक्षेत्रातील विकास कामे करतात. या विकास कामाचे ठेके आपल्याच जवळच्या वा संबंधीत लोकांना देण्याचा प्रयत्न होतो, डमी संस्था स्थापन करुन नेत्याचेच लोक ठेके मिळवितात. ५, १०, २० टक्के किंवा त्यापेक्षाही जास्त रक्कम नेते लोकांना कमीशन स्वरूपात दिली जाते. या कमीशनच्या माध्यमातून शासकीय अधिकारी, आमदार, खासदार, सरपंच आपले गल्ले भरतात हे शालेय अभ्यासक्रमांच्या पुस्तकात का लिहिले जाऊ नये? पैसेवाले किंवा चोर उचक्केच जास्त करुन निवडणूक जिंकू शकतात. कधी कधी सरपंच, आमदार, खासदार, मंत्री, अधिकारी लोक शासकीय सुविधा तसेच आपले वजन स्वतःच्या खाजगी कामासाठी वापरतात.

**कुंपणच शेत खाते ?**

पोलीसांचेही तसेच ! आधी काही वर्षांपूर्वी पोलीस कडक वागायचे, अर्वाच्य भाषेत शिव्या द्यायचे. आता फिर्यादी, आरोपी समोर गोड गोड बोलतात पण पैशांसाठी अंदरुनी मारतात. आरोपीकडून लपून छपून पैसे घेऊन साक्षी पुरावे बदलून टाकतात आणि कोर्टात जाऊनही आरोपी मोकाटच सुटतात. पुन्हा गावागावात गुन्हेगार लोकांचीच चलती फिरती राहते. अन्यायग्रस्त लोक बिचारे काही करू शकत नाहीत. गरीब लोकांना झक मारून गुंड लोकांनाच मान प्रतिष्ठा द्यावी लागते. पोलीस लोक आरोपी फिर्यादी दोन्हीकडून गोड-गोड बोलतात आणि पैसे लुटतात याचा विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमात का उल्लेख असू नये? अशा संबंधीत कथा कहाण्या त्यांच्या पाठ्यपुस्तकात का असू नये?

**काळ्या पुस्तकांच्या थप्प्यांचे ढोंग ?**

काळ्या पुस्तकांच्या थप्पीवाल्या काळ्या कोटवाल्या वकील, न्यायमूर्तीवाल्या न्यायपालिकेचेही तसेच. वकीलाकडे सल्ला घ्यायला जा, कोर्टात केस फाईल करा. वकीलच खोटे-खोटे लिहायला सांगतात. खोटे नाही लिहिले, एकाचे दोन लिहिले नाही तर न्याय मिळणार नाही, आरोपीला शिक्षा होणार नाही असे वकीलाचे पक्के मत असते. खरं बोलणाऱ्यांना इथे न्याय मिळत नाही, असे वकीलांचे पक्के मत आहे. हेच वकील पुढे जज बनतात. विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमात याचा उल्लेख का म्हणून लपविले जावे. वकीलाची फी गरीबगुऱ्द्यांना शक्य नाही. ही ब्रिटीश मूळ असलेली न्यायपालिका गरीबगुऱ्द्यांच्या कामाची नाही असा स्पष्ट उल्लेख अभ्यासक्रमात असावा. कोर्टात केस टाकूनही वर्षानुवर्षे वेळ लागतो. या देशात पैसे देवून पुरावे साक्षी बदलल्या जातात. इथे पैसेवाल्या स्मार्ट लोकांनाच न्याय मिळतो. हे वास्तव्य विद्यार्थ्यांपासून का लपविले जावे? सुप्रीम कोर्टात निकालही सत्याला धरून असतो याची शाश्वती नसते? सर्वोच्च न्यायालयात नेहमी सत्याचाच विजय होतो का?

**नोकरी मिळण्यासाठी २० लाख डोनेशन लागते ?**

आजकाल बहुतेक शासकीय नोकऱ्या मिळविण्यासाठी डोनेशन द्यावे लागते. साध्या शिक्षकाच्या आबूबाबूंच्या नोकऱ्या घ्या, पंधरा वीस लाखाचे डोनेशन लागते. गरीब मजुददार वर्ग आपल्या मुलांसाठी २० लाख जमा करू शकेल का?



तुमच्या पालकांकडे २० लाख डोनेशन द्यायला पैसे असतील तरच तुम्हाला नोकऱ्या लागतात असे शाळेत का शिकविले जाऊ नये, पुस्तकात उल्लेख का नसावा?

**पैसे खाणे हा शासकीय कर्मचाऱ्यांचा जन्मसिद्ध अधिकार ?**

शासकीय कर्मचारी पैसे खाऊ असतात. जोपर्यंत त्यांना पैसे टिकविले जात नाही तोपर्यंत ते नियमावलीतील त्रुटी दाखवित राहतात. पैसे दिले की खोटी कागदपत्र असलेत तरी काम करून देतात. वरचे पैसे देवूनही दोन-चार चक्कर मारायला लावतात. पैसे खाणे हा त्यांचा जन्मसिद्ध अधिकार आहे असे त्यांना वाटते. शालेय पुस्तकातही असेच लिहिणे आवश्यक आहे.

शिक्षण कोणासाठी आहे आणि कशासाठी आहे? विद्यार्थ्यांना महात्मा गांधीची सत्य अहिंसा शिकविल्या जाते आणि प्रत्यक्षात जेव्हा शाळा सोडून पोटापाण्याच्या मैदानात उतरतात तर सत्य अहिंसेने काम होतच नाही. शाळेत एक शिकविले जाते पण प्रत्यक्षात अनुभव वेगळाच येतो. अश शिक्षणाला महत्व काय?

(२९ जानेवारी २०१८, विमुक भटकंती)

# ७. भारतीय संविधानात बापाला काही कीमत आहे काय?

'एक बाप हा शंभर शिक्षकांच्या बरोबरीचा असतो' असे इंदिरा गांधीने म्हटले होते. भारतीय संस्कृतीत आई आणि वडील प्रथम गुरू समजले जाते. आणि नैसर्गिक आणि प्रत्यक्षात आई वडील हेच आपले प्रथम गुरू आहेत. पण आज बापाला काही किंमत उरली नसल्यासारखे वाटते आणि राज्यघटनेत जसे स्त्रियांना, दलितांना कायदेशीर अधिकार दिल्या गेले, भारतीय संविधान भाग ३, शोषण विरूद्ध अधिकार, शिक्षासंबंधी अधिकार तसे बापाला देण्यात आले की नाही हा प्रश्नच आहे. हा लेख मी बुजूर्ग लोकांसाठी लिहित आहे.

भारतीय संस्कृतीने मानवाला जगण्यास सहाय्यभूत ठरणाऱ्या प्रत्येक गोष्टीला महत्व दिले. त्यांचे आभार मानले. त्यांच्या प्रती कृतज्ञता व्यक्त केली व त्यांना देवत्व दिलेय याच कारणामुळे इथल्या संस्कृतीने आई वडील व गुरू यांना देव मानलय. ज्या गोष्टींच्या किंवा शक्तीच्या मदतीने आपण आपल्या जीवनकाल इतरांना न दुखावता, त्रास न देता सुख समाधानाने, समृद्धीने, आनंदाने व्यतीत करतो अशा गोष्टींना या संस्कृतीने देवाचे स्थान दिले आहे. देव मानलं, पूजलं, आदर व कृतज्ञता व्यक्त केली. पण कालांतराने कालप्रवाहात या संस्कृतीचे स्वरूप हरविले गेले. यात विकृती व भेसळ शिरली. मूर्तीपूजा करण्याचा, लोकसुद्धा आईवडीलांचा, धर्मगुरूंचा आदरणीय व्यक्तींचा, धर्मस्थळांचा फोटो पूजतात.

बाबासाहेब आंबेडकर, पंडीत जवाहरलाल नेहरू, डॉ. राजेंद्र प्रसाद, सरदार पटेल अशा मोठ्या उच्च विभूषित लोकांनी भारतीय राज्यघटना लिहली ही राज्यघटना लिहताना पाश्चिमात्य देशातल्या अमेरिकेच्या राज्यघटनांचा अभ्यास केला गेला. त्यांची कॉपी मारल्या गेली असावी असे वाटते. पाश्चिमात्यांनी त्यांच्या राज्यघटनेत जे नमूद केले त्याच गोष्टींना प्राथमिकता दिल्याचा भास होतो.

भारतीय संस्कृतीचे निसर्गतः स्वरूप टप्प्याटप्प्याने खराब झाल्याने जातीयवाद उफाळून आला आणि मागासवर्गीयांना खूप हाल अपेष्टात जगावे लागले. त्यामुळे संविधान लिहतांना भारतीय संस्कृतीतील चांगल्या पोषक गोष्टींचा विचारच केला



गेला नाही असे दिसते किंवा मायबापाच्या अधिकाराचा विचार करण्याची त्या वेळेस गरज भासली नसावी.

भारतीय आईबाप स्वतःच्या मुलीसाठी जीवापाड मेहनत करतो, एक दिवस नाही, एक वर्ष नाही, फक्त काही वर्ष नाही तर जिथपर्यंत जिवंत आहे तोपर्यंत! पाश्चिमात्य देशातील बाप दर दोन चार वर्षांनी बायका बदलतात आणि बायका नवरे बदलतात. जन्म झाल्यापासून अठरा वर्षाचा होईपर्यंत मुलाचे संगोपन करणारे किती बाप बदलतील यांची गॅरंटीनसते. अमेरिकन पाश्चिमात्य बाप स्वतःच्या मुलासाठी पूर्ण ताकतीशी मेहनत करू शकत नाही. अमेरिकन बापाला पोटच्या मुलाच्या संस्कार, शिक्षण, सुखाच्या प्राथमिकतेपेक्षा नवरा बायकोच्या सुखाची जास्त चिंता असते.

मुळात मानसिकताच तशी बनली आहे. भारतीय बाप मुलांसाठी जीव धोक्यात घालण्याची तयारी ठेवतो. मेहनत करणाऱ्या भारतीय बापाला नोकरीतून निवृत्त झाल्यावर किंवा म्हातारपणात आपल्या जीवनासाठी लागणाऱ्या आर्थिक तरतुदीबाबत काहीही फिकर नसते. भारतीय बाप उमेदीच्या काळात जे काही कमवितात त्यावेळेस मुलांचे शिक्षण मुलीचे लग्न मुलांचे भविष्य याच गोष्टीला प्राथमिकता देतात. भारतीय बाप स्वतःच्या आयुष्याची ऐसी तैसी करतात पण मुलांच्या आयुष्याची नोकरी पाळण्याची त्याची पहिली प्राथमिकता असते.

पाश्चिमात्य अमेरिकन बाप मुलांसाठी संगोपन करायचे म्हणून करतात. मुलांच्या आयुष्यापेक्षा त्यांना स्वतःच्या निवृत्तीची चिंता असते. १६–१८ वर्षाचीं मुले झालीत की घरापासून हाकलून देतात. पाश्चिमात्य, अमेरिकन देशात म्हाताऱ्यांसाठी वेगळ्या वसाहती आहेत.

पाश्चिमात्य देशात मुले १६–१८ वर्षाची झाली की स्वतःच अभ्यास करून स्वतःच्या पायावर उभी व्हायचा प्रयत्न करतात. आपल्या देशात आई बाबा मुलगा एकसंघ होऊन जोपर्यंत मुलामुली स्वतःच्या पायावर उभी होत नाहीत तोपर्यंत आणि नंतरही एकत्रितपणे प्रयत्न चालू ठेवतात. पाश्चिमात्य आईबाप आधीपासून निवृत्तीच्या काळात किंवा म्हातारपणात लागणाऱ्या आर्थिक तरतुदीची व्यवस्था करतात. आईबाप हे म्हातारपणात मुलांजवळ वा नातवांजवळ राहत नाहीत. फक्त फादर्स डे, मदर्स डे या नावाने वर्षातून एक–दोनदा नावापुरता दिवस साजरा करतात.

पाश्चिमात्य देशात १६–१८ वर्षाची मुले झालीत की स्वतःचे स्वतः बघून

घेईल अशी माय–बापाची भूमिका असते. लग्नाआधी गर्लफ्रेंड–बॉयफ्रेंड मुला–मुलींना शारीरिक संबंध ठेवण्याची अनुमती दोन दोन वर्षानंतर नवऱ्याचे बायको आणि बायकोने नवरा बदलणे, लग्नानंतरही एक बायको आणि मल्टिपल गर्लफ्रेंड, तर बायकोची तीच अवस्था! वरून मुलांबद्दल आईबाप म्हणून आसक्ती कमी! मुलांच्या आयुष्याची त्यांना चिंता नसते. गत हे अमेरिकन, पाश्चिमात्य लोक लग्न कशासाठी करतात. हेच कळत नाहीत? भारतीय मायबापाची गोष्टच वेगळी. एक लग्न एकच नवरा! आपली मुले म्हणजे त्यांच्या काळजाचा तुकडा, आईवडीलांच्या, गुरूजींच्या शब्दांना मान देणारी आमची संस्कृती! मुले प्रौढ होईपर्यंत आईवडील पागलासारखी मेहनत करून कितीतरी वर्षे तपस्या करतात. आमचे तर आयुष्य निघून गेले. मुलाच्या आयुष्याचे काय म्हणून चिंता असते. वर्षानुवर्षे मुले स्वतःजवळ असल्याने मुलांच्या मनोवृत्तीचा, त्यांच्या चांगल्या भल्याचा अभ्यास असतो. म्हणून प्रौढ वयानंतरही मुलांनी आपल्या आईवडिलांचा सल्ला मानणे मुलांच्या आयुष्यासाठी मोलाचा असतो. खूप वर्षे मुलांसाठी मेहनत केल्याने मुलांच्या आयुष्याचे काही कमी जास्त झाले तर सर्वात जास्त त्रास आईवडीलांना होतो. अशा भारतीय आई वडिलांच्या अधिकारासाठी कायदेशीर घटनात्मक तरतुद आहे की नाही हा मोठा प्रश्न आहे.

मुले १८ वर्षाच्या वर झालेत की त्यांना त्यांचे ठराव घेण्याचे अधिकार असतात. घटनेने त्याची तरतुद केली आहे. त्यात मुले त्यांचे आयुष्यही बरबाद करतात. आई वडील प्रौढ मुलांच्या आयुष्यात ढवळाढवळ म्हणजेच, चांगल्या गोष्टीची अंमलबजावणी करू शकत नाहीत. आई वडिलांना सोबत घेऊन जेव्हा मुले निर्णय घेतात. तेव्हा रिजल्ट काही वेगळेच असतात. आई वडील मुलगा सुन नातु एकत्रितपणे एक मोठी ताकद बनते. बुजुर्गाचा आदर करा, असे आम्ही शाळेत शिकताना प्रतिज्ञेत म्हणतो पण त्याला घटनात्मक कायदेशीर वजन येणे महत्वाचे आहे. आई वडीलांचे पांढरे झालेले केस, कितीतरी त्यांच्या डोक्यावरून गेलेले उन्हाळ्या–पावसाळ्याच्या अनुभवाची साक्ष देतात आणि अनुभवाचा त्यांच्या मुलांनी त्यांच्या कौटुंबिक, व्यक्तीगत आणि व्यवहारिक आयुष्यात फायदा घ्यायचा असतो. पण हे विरळ होताना दिसत आहे पण याचा अर्थ मुळीच नाही की आई वडिलांनी म्हातारपणात हेकड वागणे आणि मुलांना त्याचा त्रास व्हावा. एक दुसऱ्यांना समजून घेऊन एकसंघ वागणे आवश्यक आहे.

अठरा वर्षावरील मुलांनी माय–बाप यांच्या मनाविरूद्ध बंड करून कशीही मनमानी करावी आणि बुजुर्ग पालकांनी आपल्या कुटुंबाची होणारी वाताहत



निमुटपणे बघावी अशी व्यवस्था घटनेने केली नाही. लहानपणापासून काळजाचे पाणी करून संगोपन करणारे मायबाप कितीतरी वर्षापासूनची मिळवलेली प्रतिष्ठा मुले धुळीत मिळवितात. मायबापाला बोलण्याचा अधिकार निसर्गाने दिलाय. संस्कृतीने दिलाया पण घटनेने हा अधिकार काढून घेतला नाही ना!

टेलीविजन आणि इंटरनेटमुळे पाश्चिमात्य संस्कृतीचा प्रभाव भारतीय युवकांवर पडल्याने वडिलधाऱ्या व्यक्तींनाच ज्ञान वाटत असतात. चुकीच्या समजुती करून घेतल्याने आई वडिलांचे ज्ञान आणि अनुभव मुलांना तोडका वाटतो. तारूण्यात विशेषतः कॉलेज वयात ही होरपड जास्तच होताना दिसते. या वयात अपरिपक्वपणा असतो, अज्ञान असते. तारूण्यामुळे बंडखोरपणा असतो. फारसा विचार न करता जे आवडते त्यात बेधडक झोकून देण्याची वृत्ती असते. अनुभवाने शहाणपणा येण्याच्या अगोदरच काही जणांच्या आयुष्याची माती होण्याची शक्यता असते. युवक चुकीचे ग्रह, मनोधारणा, समज, समजुती करून घेतल्याने चुकीचे निर्णय घेतले जाऊ शकतात. बुजुर्ग या शब्दाला काही किंमत उरली नसल्याने आई वडिलांचे काही चालत नाही. उद्या जाऊन आपल्या मुलाचे आयुष्य निराशेने काळवंडून जाणार आहे असे माहीत असताना आई वडील काही करू शकत नाहीत. ही परिस्थिती बदलण्यासाठी घटनात्मक दुरुस्ती आवश्यक आहे.

अमेरिका किंवा पाश्चिमात्य देश हे आमच्यापेक्षा बलवान आहेत विकसीत आहेत. पाश्चिमात्य देशात आणि त्याला आमची संस्कृती कारणीभूत आहे हे मुळीच नाही. अमेरिका किंवा पाश्चिमात्य देशातील कामगार, विद्यार्थी, शिक्षक, शासकीय, निमशासकीय संस्थेचे अधिकारी, मंत्री, राज्यकर्ते, खाजगी काम करणारे, व्यापारी प्रत्येक नागरिक हा एकसंघ, प्रामाणिकपणे एकनिष्ठ, एकदिलाने एक दुसऱ्याला अडथळे उभे न करता, स्वतःच्या एकट्याचा स्वार्थ न बघता, एकोप्याने, एक दुसऱ्याच्या कामात ढवळाढवळ न करता, आपले अधिकार आणि आपले कर्तव्याचे पालन करतात म्हणून बलवत्तर आहेत. प्रत्येकाने कागदाचा चिटोराही उघड्यावर फेकला नाही तर आपला देश इतर देशांपेक्षा सुंदर दिसेल. कोणी जर खोटी साक्ष दिली नाही आणि खोटे आरोप केले नाहीत तर गुन्हेगारांना लवकर शिक्षा होईल. पीडितांना न्याय मिळेल आणि कायदेव्यवस्था एक नंबर होईल. छोट्या शेतकऱ्यांनी एकत्र येऊन सांघिकपणे एकत्रित शेती करण्याइतपत एकमेकांमध्ये विश्वास तयार झाला की एक मजबूत बुनियाद तयार होईल. गल्लीतली व्यवस्था ऑटोमेटीक आपल्याने बदलून जाईल. भारतीय संस्कृती

आणि देशाचा विकास प्रगती याचा संबंध नाही. अमेरिकन पाश्चिमात्य देशांचा एकसांधिकपणा आणि भारतातील जुन्या संस्कृतीचे स्वरूप यांचा मिलाप झाला की भारत हा जगातला अमेरिका, चीनपेक्षा मोठा बनेल. आणि हे जर सर्वसामान्यांनी मनावर घेतले तर सहज शक्य आहे.

(दि. २४ ऑक्टोबर २०१३, अभयराज्य)





# १. ओबामांची भारत भेट आणि प्रसार माध्यमांचा धांगडधिंगा!



२६ जानेवारी भारत नावाच्या मातृभूमीचा प्रजासत्ताक दिन! या भारतभूमीच्या प्रजासत्ताक सोहळ्याला विशेष अतिथी म्हणून पहिल्यांदाच बलाढ्य अमेरिकेचे अध्यक्ष हजर राहणार आहेत. आतापर्यंत भूतकाळात कोणताही अमेरिकन राष्ट्रपती भारत भेटीवर पदावर असताना आला नव्हता. पंतप्रधान मोदींजींपासून सर्व भारतीय यंत्रणा जय्यत तयारीला लागून जातीने निगरानी करत आहेत. मेक इन इंडियाची भूमिका बाजूला ठेवून सरकार ही भारतभेट फक्त प्रोपोगंडा म्हणून ऐतिहासिक सिद्ध करणार का म्हणून विरोधकांनी निगरानी चालू असणार आहे.

**मीडियावाले, प्रसार माध्यमांची तयारी**

टिव्ही वाले, लिडींग न्यूजपेपर फ्रंटपेजवर काय लिहायचे काय छापायचे म्हणून तयारीला लागले असतील. या अमेरिकन राष्ट्राध्यक्षांच्या भेटीच्या वेळेस पूर्ण वातावरण ओबामामय करून टाकतील. बराक ओबामांनी कोणता पदार्थ खाल्ला, काय बोलले, कसे हसले, किती वेळी हात धुतले, कोणते शूज घातेल, कोणत्या रंगाचे घातले, किती वेळा बाथरूममध्ये गेले, किती वेळा संडासमध्ये गेले एकदम सर्व डिटेल मध्ये! आवश्यकतेपेक्षा जास्तच फालतूच्या गोष्टी छापतील. रिजल्ट ओरिएंटेड वा सकारात्मक वृत्त तर सोडा लोकांची दिशाभूल करणाऱ्या गोष्टी यांचेकडून घडतील. जसे काही बराक ओबामा प्रसार माध्यमवाल्यांना पैसे वाटणार आहेत, या आविर्भावात!

**अमेरिकेचे खरे रूप**

अमेरिकेचे मूळ रूप म्हणजे ब्रिटीश व्यापारी मानसिकता ब्रिटीश लोक भारतात आले व्यापारी म्हणून सतराशेच्या काळात राज्यकर्ते बनले!

काही ब्रिटीश लोक व्यापार करायला अमेरिकेत गेले आणि मूळ आदिवासींना हुसकावून स्वतंत्र अमेरिका राष्ट्र निर्माण केले. हे लोक म्हणजे स्वार्थी वृत्तीचे, व्यापारी मानसिकतेचे लबाड लोक! अमेरिका बलाढ्य राष्ट्र आहे. प्रगत आहे. शंकाच नाही. अमेरिकन वस्तूंची भारतात निर्यात कशी वाढेल, अमेरिकन पेटंट वा ट्रेडमार्क असलेल्या वस्तूंची, कोल्ड्रींकची, साबनांची, फोनची, हार्डवेअरची, साफ्टवेअरची, त्यांच्या कंपन्यांची लोकप्रियता कशी वाढेल. त्यांच्या मागणीला प्रोत्साहन कसे मिळेल, डॉलरचा रेट कसा वाढेल यावर अप्रत्यक्षपणे भर दिला जाईल. अमेरिका नावाचे संघराज्य म्हणजे एक बुद्धीमान व्यापारी आणि आवश्यकतेनुसार आपली गुंडागिरी वापरून जगात नेतृत्व करणारा देश! जसा काही गावातील दादागिरी करणारा गुंड पण गावातील वंस्तूंचे बाजारभाव अप्रयत्क्षपणे आपल्या स्वार्थासाठी कंट्रोल करणारा! अमेरिका म्हणजे निःस्वार्थ मनोमिलनाच्या लायकीचा नाही, दीर्घकालीन मैत्रीच्या लायकीचा नाही, संकटकाळी मदत केली तरी स्वतःचा स्वार्थ साधणारा असा अमेरिकेचा इतिहास सांगतो.

**राज्यकर्त्यांचे हम भी इंग्रजी बोल सकते है।**

आमचे भारतीय प्रशासकीय अधिकारी, राज्यकर्ते इंग्रजी या फिरंग्यांच्या भाषेत भाषा कसे जोरदार द्यायचे म्हणून तयारी करत असतील. आमची स्वतःची मातृभाषा वा राष्ट्रभाषा नसल्यासारखे, इंग्रजीत पालूपट धोकण्याची तयारी सुरू असेल. पंतप्रधान मोदी जेव्हा अमेरिकेत गेले होते तेव्हा अमेरिकेतल्या एका तरी राज्यकर्त्याने वा प्रशासकीय अधिकाऱ्याने हिंदीत वा भारतीय भाषेत भाषण केले होते का? इंग्रजनिर्मित शिक्षण प्रणालीत कमी यशस्वी ठरलेले राज्यकर्ते हम भी इंग्रजी बोल सकते हैं। म्हणून इंग्रजी भाषेत भाषण टोकून डिंग मारतील. इंग्रजीत भाषण ठोकून आम्ही आमच्या स्वतःच्या राष्ट्रभाषा वा मातृभाषेचा स्वाभिमान कसा गहाण ठेवतो याचे प्रात्यक्षिक करतील.

**राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची भूमिका?**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघवाले राष्ट्रीय स्वाभिमानाचा, हिंदुत्वाच्या स्वाभिमानाचा पुरस्कार करतात. इंग्रजांच्या राष्ट्रध्वजाच्या मानवंदनाचा पेढा भिरकावून देणाऱ्या नागपूर नगरीत जन्मलेल्या डॉ. बळीराम हेडगेवारांचा स्वाभिमान जगता प्रथम क्रमांकावर नेण्याची जबाबदारी संघावर आहे. त्या दृष्टीने खरोखर सर्व स्तरांवर पावले उचलली जात आहेत का? ज्या भाजप आणि




संघावर अमेरिका जासूसी करत होता, निगरानी ठेवून होता त्यांना तुम्ही डोक्यावर घेवून नाचणार आहात का? एडवर्ड स्नोडेन नावाच्या अमेरिकन विभीषा ने सांगितलेली माहिती आपण विसरून गेलो आहोत का? भारतीय लोक, प्रशासन जे इंटरनेट, इमेल वापरतात त्यातून जाणारा मजकूर अमेरिका चेक करते हे विसरून गेलो का? यावर उपाय शोधला का?

**भारत पहिल्या नंबरचे राष्ट्र कसे बनेल?**

भारत प्रथम क्रमांकाचे राष्ट्र बनून जागतिक नेतृत्व करू शकतो. आज आमची मातृभाषा ही मृतभाषा बनण्याच्या मार्गावर आहे. सर्व अत्याधुनिक तंत्रज्ञानाची, वैद्यकीय संशोधनाची इंग्रजी पुस्तके भाषांतरित होऊन मराठीत खेड्यापाड्यांच्या शाळेत पोहचणे आवश्यक आहे. कंप्यूटर, फोनसाठी लागणारे हार्डवेअर म्हणजे इलेक्ट्रानिक कंपोनट्स, सॉफ्टवेअर प्रोग्रॅमस् प्रादेशिक भाषेत रूपांतरित करून खेड्यापाड्यातील विद्यार्थ्यांपर्यंत पोहचणे आवश्यक आहे. आमच्या विद्यार्थ्यांची बुद्धी इंग्रजी शिकण्यात घालविण्यापेक्षा त्यांच्यापर्यंत बालपणातच तंत्रज्ञान संशोधन मातृभाषेत मिळतील तर आमची मुले उद्या जाऊन आंतरराष्ट्रीय स्तरावर नेतृत्व करणारे, जगाचे राहणीमान बदलणारे, नवीन प्राडक्टस् जागतिक बाजारपेठेत आणू शकतात. कालांतराने उद्या जाऊन गोरे इंग्रजी लोक त्यांच्या देशात आमचे राज्यकर्ते गेल्यावर आमच्यासमोर मराठीत भाषण ठोकतील आणि परिस्थिती बदलू शकते.

(८ जानेवारी २०१५, अभयराज्य)

# २. वा रे मीडिया?




भारतीय प्रसारमाध्यमाची परिस्थिती मोठी विचित्र आहे. वर दिलेल्या छायाचित्रासारखी! प्रत्यक्षात कोण मारतोय आणि कोण पळतोय? पण कॅमेरामध्ये काय चित्रित होते ते बघा. मूळ कारणांचा शोध न घेता चुकीचे दाखवून लोकांची दिशाभूल करणे असा मीडियावाल्यांचा उद्योग असतो का? कळत-नकळत,प्रत्यक्ष अप्रत्यक्ष मीडिया पाश्चिमात्य संस्कृतीच्या प्रभावाखाली आहे. भारतीय लोकांमध्ये फूट पाडण्याचे काम, एक दुसऱ्यांचे पाय ओढण्यात मदत करण्याचे काम लिडींग मीडियावाले करतात असा त्यांचेवर आरोप आहे.



# ३. गरोदर एक आणि प्रसवकळा भलतीलाच !



आपला भारत देश म्हणजे अजीबोगरीब देश आहे. भारतीय प्रसारमाध्मे काही विचित्रच वागतात. गोऱ्या प्रसारमाध्यमांची हाजी हाजी, उचलेगिरी वा कॉपी करण्यातच भारतीय प्रसारमाध्यमांचा वेळ जातो. याच प्रसारमाध्यमांचा उलट्या दिशेचा प्रवाह बघून पंतप्रधानचे राष्ट्रपती आणि शासनकर्ते घाबरून चुकीचा टुनका वाजविता.

टेनीस हा भारतीय खेळ नाही. इतक्यात टेनीस या क्रिडाप्रकाराच्या बातम्या भरभरून भारतीय प्रसारमाध्यमातून वाहत होत्या. भारतीय टेनीसपटू जिंको वा नको, कोणतीही टेनीस स्पर्धा असो दूरदर्शन, वृत्तपत्रे आकाशवाणीचे सरकारी चॅनल सर्व टेनीसमय होऊन जातात. भारतातील एकशे पंचेवीस करोड लोकांपैकी किती लोकांनी टेनीसची बॅट हातात पकडली आहे? प्रत्यक्षात बॅट डोळ्याने जवळून बघीतली आहेत? किती भारतीयांनी टेनीसच्या बॅटची किंमत माहीत आहे? साधारणतः टेनीसची बॅट कीमत कमी पंधरा डॉलर पासून शंभर दिडशे डॉलरपर्यंत मिळते? टेनीस साध्या ग्राउंडवर खेळता येतो का? मुळीच नाही! टेनीस खेळाची ग्राउंड भारतील तालुका स्तरांवरील शाळांमध्ये तरी आहेत का? गरीब भारतीयांची सोडा पण मध्यमवर्गीय भारतीय लोक तरी टेनीस खेळू शकतात का? आपल्या देशात खेळू शकतात का? आपल्या देशात गरीबांची कोणालाही चिंता नाही. भारतीयत्वाचा दुराभिमान असलेली प्रसारमाध्यमे तरी गोऱ्या लोकांची संस्कृती, त्यांचे खेळ, त्यांची श्रीमंती याचाच गवगवा करत असतात. भारतीय

प्रसारमाध्यमांमधील कर्त्या पत्रकार, बातमी देणाऱ्यांची अक्कल कमी आहे की भारतीयत्वाचा अभ्यास अर्धवट आहे तेच कळत नाही. आपले भारतीय खेळ सोडून परदेशी खेळांचे आकर्षण भारतीय लोकांमध्ये निर्माण करतात.

एकूण भारतीय कुटुंबांपैकी १ टक्के तरी नागरिकांनी टेनीस ग्राउंडमध्ये पाय ठेवला का? गरीब लोकांचे खेळ, खरे भारतीय खेळ कुठे गेलेत? भारतातील कबड्डीपटू, खोखो पटू, कोणालाच माहीत नसतील. पण मार्टीना हिंगीस, नवरातीलोव्हा, बोरीस बेकर, आगासी हेच आम्ही लहानपणापासून वृत्तपत्र, रेडीओ, टीव्ही मधून ऐकून आलो. आमची प्रसारमाध्यमे स्वाभिमानी की दुराभिमानी? या प्रश्नाचे उत्तर जनतेनेच शोधावे.

भारतीय प्रसारमाध्यमांनी, शासनाने, पंतप्रधान, राष्ट्रपतींनी सर्वांनी विचारांची दिशा बदलण्याचा प्रयत्न करावा, तेव्हाच भारतातून जागतिक नेतृत्वाचा प्रवाह सुरू होईल. भारतात टेनीस नावाचा क्रिडाप्रकार म्हणजे श्रीमंताची चोचलेबाजी, भपकेबाजी, मटकेबाजीच म्हणावी लागेल. या भारतात गरीबांची कुणाला किंमत नाही. जे आपण सर्वसाधारण गरीबांपर्यंत पोचवू शकत नाही, त्याचा भारतीयांनी विचारच करायला नको. टेनीस बिनीसच्या मोठ्या मोठ्या गोष्टी प्रसारमाध्मांनी ठळक किंवा मोठ्या छापूच नये.

साधारण भारतीयांना आपली मानसिक मेमोरी विनाकारण टेनीसच्या गोष्टी लक्षात ठेचण्यात का म्हणून घालवावी? टेनीस ग्राउंडसाठी जागा खूप लागते. एका वेळेस दोनच खेळाडू किंवा जास्तीत जास्त चारच खेळू शकतात. मेंटेनन्सचा खर्च ही खूप येतो. हे भारतासारख्या देशात गरीब शाळांमध्ये तरी शक्य नाही. इंग्लंड अमेरिकेत प्रत्येक शाळेत, प्रत्येक कम्यूनिटीत, वार्डात टेनीसचे ग्राउंड आहेत. त्या गोऱ्या लोकांसाठी टेनीसचा गवगवा ठीक आहे.

आमच्या बोलण्याचा, लेखाच्या हेडींगच राग मानू नये. पण ज्याचे घरी बाळ होणार आहे, त्याचे घरी आनंद ठीक आहे. अमेरिकेत इंग्लंडच्या प्रसारमाध्यमांचे ठीक आहे, टेनीस त्यांचा खेळ आहे. गरोदर एक आणि दुसऱ्या प्रसवकळा भलतीलाच अशी भारतीय प्रसारमाध्यमांची, भारतीय पत्रकार लोकांची परिस्थिती आहे. आपल्याच भारतीय खेळांचा प्रपोगंडा करण्याची भारतीय प्रसारमाध्यमांना का लाज वाटावी हा मोठा प्रश्नच आहे.

(दि. २४ सप्टेंबर २०१५, अभयराज्य)





# १. गावकऱ्यांच्या हागणदारीचा प्रश्न आंतरराष्ट्रीय?



मित्रांनों, गेल्या दोन लेखांमधून संडास बांधण्याच्या महत्वाची योजनेची स्वच्छता मोहीमेची खिल्ली उडवित आहो असे आपणाला वाटेल, आमच्यावर टिकाही होईल. आमचा उद्देश कोणतेही मोठे कार्यक्रम राबवितांना दूरदृष्टी असावी, करायला जाऊ एक आणि झाले भलतेच असे व्हायला नको हा प्रयत्न आहे.

**मूळ प्रश्न : उघड्ययावर हगणदारी**

रस्त्यावर, रोडवर, सार्वजनिक ठिकाणी, रस्त्याचे बाजूला, पायवाटेवर, ओढ्याच्या बाजूला, नदीच्या बाजूला, तलावाचे पाळीवर बाजूला उघड्यावर शी नजरेस पडणे, कोणी शी करताना अर्धनग्न बसून दिसणे, हगणाऱ्या नंगूबाबाचे दर्शन घडणे, परिसरात दुर्गंध घूमणे, आयाबायींना उघड्यावर हगायला बसावे लागणे, आयाबायांना अंधारात, सापाविंचवात लपून चोरून संडासाची जागा शोधावी लागणे, रस्त्यावर संडाससाठी बसलेले अर्धनग्न लोक बघून महिला लज्जित होणे.

**प्रश्नाचे पर्यायी उत्तर : गावकरी, ग्रामपंचायत**

अपारदर्शी कंपाउंड वॉल असलेली, लाईट सुविधा असलेली हगदूळी, हगदूळीसाठी गावाबाहेर राखीव जागा, तलाव, नदीच्या बाजूला, शेतीत हगदूळीसाठी राखीव जागा. हगदूळीची जागा दोन कप्प्यात विभागणे, सात दिवस एक कप्प्यात संडास करतील, सात दिवसानंतर दुसऱ्या कप्प्यात दर सात

दिवसानंतर कप्पा बदलत राहील. तात्पुरत्या खाली ओसाड जागाही वापरता येतील. ज्याच्या घरी संडास नाही, त्याचे साठी ग्रामपंचायत हे हगदुळ्यांसाठी राखीव जागा द्यावी आणि रस्त्यावर संडाससाठी पूर्णपणे बंदी टाकावी. स्त्रियांसाठी आणि पुरूषांसाठी हगदूळी वेगळी राहील.

**कसे करता येईल?**

१. ग्रामपंचायत वार्डातील लोकांनी निर्णय घ्यावा. जिल्हा परिषद सदस्य, ग्रामपंचायत सदस्य सोईनुसार सुपरविजन करणे.

२. आमदार खासदार यांनी आपल्या निर्वाचन क्षेत्रातील प्रत्येक खेड्यात, अंबलबजावणी झाली की नाही हे खात्री करणे, राज्य वा केंद्र शासनाकडून तसा कडक आदेश काढणे.

३. पंतप्रधानांनी सरपंच/ग्रामपंचायत सदस्यांशी डायरेक्ट संवाद साधणे.

**आधीची पार्श्वभूमी : सार्वजनिक संडास आधी का अयशस्वी**

यापूर्वी गावोगावी असे सार्वजनिक संडास बांधून पडून आहेत, याआधी सरकारने संडास बांधलेत आणि आपला भरपूर पैसा संडाससारखाच वेस्ट गेला. संडास शीटवर आधीच जर इक्के दुक्के शितडे जरी पडून असले तरी त्या संडासात बसण्याची इच्छा होत नाही. आधी जो संडासाच्या शीटवर बसला तो नंतर येणाऱ्याचा विचार करीत नाही, इक्के दुकके शिंतोडे वा अख्खी संडास भरलेले सोडूनच तो निघून जातो. त्यामुळे सार्वजनिक संडास तसेच पडून राहतात. पाण्याची सुविधा असेलच असे नाही, असले तर लोक दुरूपयोग करतात, वाया घालवितात. सर्व गरीबांसाठी संडास बांधून देणे शक्यच नाही. तिथे गरीबांना झोपायला जागा नाही, सोईचे घर नाही अशा खेडेगावात सर्व कुटूंबासाठी संडास बांधून देणे शक्यच नाही. जे आपण करू शत नाही, त्या ठिकाणी वस्तुस्थिती गृहीत धरा. जे आपण या घडीला देवू शकते, ते आपण नाही देवू शकत. आज आपल्या मर्यादा, वस्तुस्थिती लक्षात घ्या.

**पंतप्रधानांनी १५ ऑगष्टच्या भाषणात दखल घ्यावी?**

आपल्या पंतप्रधानांनी स्वातंत्र्यदिनी लाल किल्ल्यावरून भाषणात संडासचा उल्लेख करावा हे आपले दुर्दैव नाही का? आमचे गावकरी पंतप्रधानांना देशाच्या पोटापाण्याची प्रगतीची इतर संरक्षणाची विकास कामे करू देण्यापेक्षा गावकऱ्यांच्या संडासची व्यवस्था करण्यात गुंतवितात म्हणजे हा गावकऱ्यांचा दोष



नाही का? ग्रामपंचायत गावकऱ्यांनी आपल्या संडासाची व्यवस्था पंतप्रधानांकडे सोपवावी या पेक्षा वाईट आपल्या देशाचे दुर्दैव काय? प्रत्येक ग्रामपंचायत गाव आणि गावातले लोक हे त्याच्या पातळीवर प्रश्न सहज सोडवू शकतात. आपली शी आपल्याने सांभाळणे होत नाही. कुठे करायची याची उचित व्यवस्था गरीबाजवळ नसल्याने उघड्यावर करतात? आपल्यासाठी, आपल्या मुलाबाळांसाठी आणि नातवांसाठी आरोग्यवर्धक पर्यावरण झाले तर आपलाच फायदा!

**गावकरीदादा काय करू शकतात?**

गावकरीदादांनो, तुम्ही पंतप्रधानांना ठणकावून सांगा, तुम्हांला आपल्या संडासची काळजी करण्याची आवश्यकता नाही आम्हीच गावकरी अशी सुव्यवस्था करतो की तुम्हाला दखल घेण्याची जरूरत पडणार नाही. राखीव जागेत हगदूळ्या बांधू किंवा संडास बांधू, पण आमच्या आयाबाया, म्हातारे कोतारे, तरूण जवान, चिल्लू पिल्लू उघड्यावर रस्त्यावर शी करतांना तुम्हाला दिसणार नाहीत. कोणाला, शेजारी पाजारी, सकाळी मार्निंग वाकला जाणाऱ्यांच्या, गावाला भेट देणाऱ्या पाहुण्यांच्या, टूरिस्ट लोकांच्या पर्यटकांना नजरेला कोणीच शी वा त्याचा वास जानवणार नाही तशी आम्ही तक्रार येवू देणार नाही. सुरक्षित आरोग्यवर्धक हगदूळ्या वा इतर पर्यायी व्यवस्था करू. त्यांचे शी पासून उच्च दर्जाचे खत बनवून त्यापासून शेंद्रीय, बिना रासायनिक सल्फेटचे शेतमालाचे उत्पन्न घेवू. तुम्ही आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत लक्ष घालून तेच उत्पन्न पाच पट किमतीने निर्यात करावे. माननीय पंतप्रधान आपण आंतरराष्ट्रीय पातळीवर, राष्ट्रीय पातळीवर लक्ष घालावे, खोऱ्याने भारतात पैसा कसा येईल याची चिंता करावी.

**गावकरी ते पंतप्रधान न करी !**

गावकरी ते पंतप्रधान न करी! समजा पंतप्रधानांनी तुमच्या गावी संडास बांधले तरी ते वापरायचे की नाही, तोडून फेकायचे, की ठेवायचे तुम्हाला काय वाटते ते तुम्ही करू शकता. पण गावकऱ्यांनी संडासची सुविधा केली तर दिल्लीकडून पंतप्रधान येवून ते काही खराब करणार नाहीत. म्हणजे बलशाही कोण तुम्ही की पंतप्रधान? गेल्या आठवड्यात पंतप्रधानांनी मायक्रोसाफ्ट कंपनीच्या बील गेट्स बरोबर भारतात संडास योजनेची चर्चा केली. मा. ग्रामविकास मंत्री श्री नितीनजी गडकरी यांनी अमेरिकेच्या बील गेट्स यांच्याशी

चर्चा केली. संडासाला जातील तर बिल गेट्स तुम्हाला उचलून दुसऱ्या ठिकाणी बसविणार नाही. पंतप्रधानांनी जरी ठरविले तरी पंतप्रधानांच्या योजनेचा फज्जा गावकरी करू शकतात पण गावकऱ्यांनी ठरविलेल्या योजनेचा फज्जा पंतप्रधानही करू शकत नाही हे भारतातील सत्य आहे.

**संडासची कारणमिमांसा**

कोणती शी संडास आपल्याला अचानकपणे पुढ्यात दिसली की किळस येते, जीव नकोसा होतो, अंगावर शहारे येतात, मेंदूला हार्ट अटॅक आल्यासारखे वाटते. हगणाऱ्याला, ग्रामपंचायतला, लोकांना शासनाला आपण शिव्याशाप देतो. रस्त्याने चालताना चुकीने कोणाच्या शी संडासवर लात पडली तर पुन्हा मोठे संकट आल्यासारखे वाटते, काय करू नी काय नको असे होते. कोणत्या मसनी या रस्त्याने आलो, कोणता अशुभ दिवस निघाला असे वाटते. पूर्ण दिवसच खराब जातो. त्या दिवशी वा त्यानंतर दोन तीन दिवस जेवण करण्याचीही इच्छा होत नाही. डोक्यात उठून सुटून संडासचे पाय भरल्याची आणि त्या संडासचीच आठवण येते. यात दोन गोष्टी महत्वाच्या आहेत. कोणाची संडास नजरेस पडणे म्हणजे किळस, कोणी रस्त्यावर संडासाला बसून दिसणे म्हणजे किळस, संडासाचा वास, दुर्गंध पूर्ण आजूबाजूच्या परिसरात घुमणे म्हणजे किळस.

**आम्ही सुचविलेला उपाय?**

गावात हगदूळीसाठी राखीव जागा दिल्यानंतर लोक तिथे जातीलच असे नाही, कारण एक दुसऱ्याची शी कोणालाही बघायला आवडत नाही. हागणाऱ्याने सोबत दोन डबे न्यावयाचे. एका डब्यात पाणी आणि दुसऱ्या डब्यात भूरकी माती राहील. हगणाऱ्याने शी झाल्यानंतर, ढुंगी धुतल्यानंतर दुसऱ्या डब्यातली माती शीवर टाकून शी आच्छादून टाकावी. त्यामुळे नंतर येणाऱ्या हगणाऱ्याला दुसऱ्यांच्या शीचे दर्शन होणार नाही. हा मी सुचविलेला व्यक्तीगत उपाय आहे. आमचे लहानपण खेड्यात उघड्यावर शी करण्यात गेले, दहा वर्षे अमेरिकेत कागदाने ढुंगी पुसण्यात गेले, अमेरिकेतील शासकीय यंत्रणा भारतातील शासकीय यंत्रणा यातील फरक आम्ही अभ्यासला आणि हा उपाय सुचवित आहोत. तुम्ही तुमच्या पद्धतीने यापेक्षा सरस उपाय करू शकता.

दुसऱ्यांच्या शीचे पिवळे झत्र रूप नजरेस पडल्यास आपल्या शरीरात झटका निर्माण होतो. जसे जसे काही तासानंतर ताज्या शीचे रूप मातीच्या रंगात मिसळत जाते तसतशी किळस येण्याची तीव्रता कमी होत जाते. शी केल्यानंतर मातीच्या



भुकटीने झाकने हा एक सोपा उपाय आहे. पाण्याचा तुटवडा पडू शकतो पण मातीच्या भुकटीचा तुटवडा पडत नाही.

या हगदूळ्यांमधून निघणाऱ्या खताची किंमत, दर्जा उत्कृष्ट असेल. त्यामुळे गावाभोवताल आपल्या मालकीची जागा असलेली गावकरी मंडळी स्वतःहूनच द्यायला तयार होईल. उलट खताचे महत्व पटेल, किंमत आली तर हगदूळीसाठी जागा देणारे ग्रामपंचायतला मोबदला द्यायला तयार होतील. गावाकडील गावकरी या बाबतीत खूप हुशार आहे. ग्रामपंचायतच्या पातळीवर हे प्रश्न सहज सोडविले जाऊ शकतात. उलट राज्यशासन वा केंद्रशासनाची यंत्रणा हागणदारीचा प्रश्न सोडविणे फार कठीण आहे.

**बोलो राष्ट्रसंत तुकडोजी महाराज की जय!**

पृथ्वीला आम्ही भूमाता म्हणतो. आम्ही पृथ्वीला पुजतो. जसे मानवी शरीर आहे तसे भूमातेचे शरीर आहे. जसे मानवाच्या अंगावरच्या कातडीतून रक्त संवेदना, नर्व्हस, वाहतात तसेच पृथ्वीच्या पहिल्या शरीरातून पाणी, खनिज, क्षार, झऱ्यांच्या रूपात वाहतात. पृथ्वीच्या बाह्य थरांमध्ये गड्डे खोदणे आणि त्यात मानवाने शी आणि पाण्याचे मिश्रण ओतणे म्हणजे जीवनवाहिनीत विष ओतल्यासारखे आहे. जसे मानवी शरीरात घाणीचे मिश्रणचे इंजेक्शन द्यावे त्याचप्रमाणे आम्ही पृथ्वीचे शरीर खराब करीत आहोत याची दखल घ्या?

राष्ट्रसंत तुकडाजी महाराजांच्या अड्याळ टेकडीला पाणी ऐवजी मातीचा वापर असलेल्या संडास सदनीका होत्या. महाराजांच्या काळात त्यांनी सखोल विचारांनी बनविल्या होत्या प्रचलित संडासाच्या बांधणीसाठी जमिनीत गड्डा करतो आणि संडास, पाणी पृथ्वीच्या शरीरात झिरपते हे भविष्यात धोकादायक ठरू शकते.

सरकारने पुढाकार घेऊन नवीन संशोधन करून अड्याळ टेकडीला असलेले मॉडेल, त्यात असलेल्या त्रुटी निवारण करून नवीन संडासचे मॉडल बनवून कंपलसरी मॅडेटरी करावेत किंवा उद्योजकांनी पुढे यावे. नवीन प्रकारचे कमोड बाजारात आणावे आणि त्याला सरकारने प्रोत्साहन द्यावे.

**पर्यावरणाच्या संतुलनासाठी**

पर्यावरणाच्या संतुलनासाठी मानवाच्या शीचा निचरा नद्या तलावात शेतीत होणे आवश्यक असू शकते. अपारदर्श कंपाउंड वॉल असलेली, लाई सुविधा

असलेली हगदूळी या तलावाला लागून, नदीला लागून असण्याची जरूरत वा दाट शक्यता असू शकते. निसर्गाचे संतुलन बिघडू नये म्हणून या गोष्टी आवश्यक असू शकतात. उघड्यावर असलेली शी दोन दिवसात मातीत मिसळते त्यात किळस, वास याचा गंधही उरत नाही याची नोंद घेवून पुढे जाणे आवश्यक ठरते.

**आपली भ्रष्टाचारी यंत्रणा दहा हजार करोड खावून पचवेल?**

एक करोड संडास सदनिका म्हणजे कमीत कमी दहा हजार कोटी रुपयांचा खर्च! बांधण्यासाठी जो खर्च येईल तो अर्धाअधिक शासकीय यंत्रणेच्या घशात जाईल. उघड्यावर केलेल्या संडासमधील चिवडून चिवडून जशा अगुऱ्या कोंबड्या किडे खातात तसे सरकारी यंत्रणेतील काही भ्रष्टाचारी अधिकारी टिपून टिपून पैसे खातील, जाणून बुजून डिले करतील, ज्याचे घरी संडास आहे, ज्यांना जरूरत नाही त्यांना हिस्सा देतील. याचा अनुभव तुम्हालाही आहे. गोऱ्यांच्या देशात लोकशाहीतील शासकीय वा खाजगी यंत्रणा प्रामाणिकपणे एकसंघपणे काम करतात. हे भारतात सध्या तरी शक्य नाही.

**उघड्यावर हगणदारीचे तोटे : दुरिझम व्यवसायावर खूप असर**

रस्त्यावरच्या हगणदारीचा टुरिझम, पर्यटन व्यवसायावर प्रचंड असर पडतो. परदेशी पाहुणे आपल्या देशात यावयाला धजत नाहीत. भारताला खूप सुंदर निसर्ग लाभलेला आहे. अमेरिकेतील क्षुल्लक निसर्गसौंदर्य लाभलेली टुरिस्ट प्लेसेसचा, अमेरिकन लोक मोठे गाजावाजा करतात आणि टुरिस्ट लोक पर्यटकांना भूरळ घालतात, टुरिस्ट तेथे मोठ्या प्रमाणात भेट देतात आणि अमेरिकेला पर्यटनामधून प्रचंड फायदा होतो. समाज जर भारतात रस्त्यावर किंवा पब्लीक प्लेसेस, म्हणजे सार्वजनिक ठिकाणी उघड्यावर केल्याने पूर्ण पर्यटनाचा, टुरिस्ट प्लेसेस, धार्मिक स्थळाचा यात्रेचा पचका होतो. कुठे महादेवाच्या सुंदर टेकड्या असो, नागद्वारची यात्रा असो, रस्त्यावर पडलेली शी दिसली की चारधामयात्रा, नरकयात्रा मध्ये बदलून जाते. हे सर्व उघड्यावर संडासचे प्रश्न स्थानिक पातळीवर गावकरी सहज सोडवू शकतात!

(दि. २५ सप्टेंबर २०१४, अभयराज्य)



# २. मुख्य अधिकाऱ्यांनी मन लावून संडास स्वच्छ करावीत?

हा बघा डॉ. ए. वेल्यूमनी यांचे छायाचित्र! एकदम साधी राहणी पण अब्जावधी उलाढाल, टर्नओव्हर असलेल्या कंपनीचे मालक! थायरोकेयर टेक्नालॉजी लिमीटेड ही रक्त तपासणीची प्रयोगशाळा असलेली कंपनी फक्त भारतातच नाही तर बांग्लादेश आणि इतरही देशात शाखा आहेत.

टॉय संस्थेतर्फे ऑरगनाइज केलेल्या परिषदेत बोलताना श्री डॉ. ए. वेल्यूमनी यांनी सांगितले की ते महिण्यातून एकदा ऑफीस मधील संडास सदनिका स्वतःच्या हाताने स्वच्छ करतात. त्यांच्या कंपनीत काम करणारा नोकर वर्ग टिकून रहावा, कंपनीत पूर्णपणे मनापासून मिसळावा, मन लावून काम करावा, आपलासा व्हावा हा त्यांचा उद्देश आहे. प्रत्येक जण आपल्या वरिष्ठ अधिकाऱ्याचे अनुकरण करण्याचा प्रयत्न करतो. समजा वरिष्ठाने मर्सिडीज कार घेतली तर त्याच्या हाताखालील एम्प्लाई मर्सिडीज कारचेच स्वप्न बघतात. पण ऑफीसमध्ये वरिष्ठ अधिकाऱ्याने मन लावून संडास साफ करण्याचे काम केले तर कनिष्ठ वर्गाला संडास साफ ठेवणे हीन दर्जाचे वाटणार नाही.

पण डॉ. ए. वेल्यूमनी यांच्या या उदाहरणामागे भारत देशातील हगनदारीच्या प्रश्नाचे आंशिक उत्तर आम्हाला लपून दिसले. भारताचे पंतप्रधान माननीय नरेंद्र मोदीजींनी १५ ऑगस्टच्या भाषणात दिल्लीच्या लाल किल्ल्यावरून हगनदारीचा प्रश्न उचलला. पंतप्रधान मोदींनी महिण्या दोन महिण्यातून एकदा सार्वजनिक ठिकाणी असलेला अस्वच्छ संडास सदनिका स्वतःच्या हस्ते स्वच्छ करावी. टिव्ही चॅनल वर प्रसारित करावी त्यामुळे सर्वसामान्य जनतेच्या मनात असलेली संडास स्वच्छतेमागे दडलेली किलस आणि लाज कमी होईल.

या उदाहरणाची राष्ट्रीय पातळीवर अंबलबजावणी करून प्रत्येक शाळेतील मुख्याध्यापक, मुख्य अधिकारी, प्राचार्य, कार्यालयातील मुख्य अधिकारी, सर्वांनी आपआपल्या संस्थेमधील संडास सदनिका दोन महिण्यातून एकदा स्वच्छ कराव्यात. त्यामुळे सर्वसामान्य जनता, विद्यार्थी, चपराशी स्वतःहून मनापासून स्वच्छतेसाठी पुढाकार घेतील.

(दि. ११ जून २०१५, अभयराज्य)

# गांधीजींच्या नावाने स्वच्छता मोहीम?




गांधी जयंती निमित्त खूप ठिकाणी स्वच्छता मोहीम राबविल्या जातात! नावापुरती आठवण म्हणून किंवा टिव्हीवर किंवा वृत्तपत्रात बातमी यावी म्हणून! महात्मा गांधींनी अस्पृश्यतेची कारणमिमांसा करताना जाणविले की मागासवर्गीय लोक अस्वच्छ राहतात. त्या काळात मागासवर्गीयांच्या वस्त्या ह्या सुवर्ण लोकांच्या वस्त्यापेक्षा घाणेरड्या आणि अस्वच्छ असाव्यात. म्हणून सुवर्ण लोक हे मागासवर्गीयांच्या वस्तीपासून दूर राहत असावे. सर्व वर्गीयांनी आपल्या आपल्या वस्त्यामध्ये स्वच्छता आणि निटनेटकेपणा नियमीत ठेवणे आवश्यक आहे. त्याचा परिणाम म्हणून अस्पृश्यता निर्मूलनासाठी मदत होईल. असा अंदाज गांधीजींचा असावा. जेव्हा बाबासाहेब आंबेडकरांनी मागासवर्गीयांसाठी राखीव मतदार संघांची मागणी केली आणि गांधीजीच्या चळवळीची अडवणूक केली त्यानंतर काँग्रेसच्या जाहीरनाम्यात स्वच्छता मोहीमेचा उल्लेख दर्शनीय आहे.

आताच्या काळात बसणाऱ्या वस्त्या ह्या जातीभेदावर आधारित नसून श्रीमंत, गरीब, आर्थिक क्षमता या आधारावर बांधल्या जात आहेत, वस्त्यांचा विस्तार होत आहे.

नागपूर शहरामध्ये मटन चिकनच्या दुकानांजवळ भन्नाट दुर्गंधी पसरलेली असते. मटन चिकन मच्छीवाले दुकानदार मटन मच्छी स्वच्छ केल्यानंतर जे रक्त, आतडीबोका, केस, पिसे, चाचळे, पोटतली घान तिथेच फेकतात आणि नीट स्वच्छ करीत नाहीत आणि ती घाण सडल्यानंतर परिसरात दुर्गंधी पसरते.



अस्वच्छतेची सुरवात ही आमच्या पासून होते. त्याला प्रत्येक जण जबाबदार आहे. घुटका खाणारे घुटक्याचे प्लास्टीक रस्त्यावर फेकतात. चॉकलेट खाणारे चॉकलेट, गोळ्याचे आवरण रस्त्यावर किंवा उघड्यावर फेकतात. गृहीणी शिळे किंवा खराब झालेले अन्न रस्त्यावर फेकतात. कोणीही आपले काम झाल्यावर जी घाण उरते ती तिथेच टाकून मोकळे होतात. आम्ही आमच्या घराचा कचरा उघड्यावर टाकतो. फक्त आपण स्वतःच्या घराची तेवढी काळजी घेतो.

घाण करणारे आम्हीच आणि बोंबा मारणारे आम्हीच! घाण केली म्हणून तक्रार करणारे आम्हीच!

यावर उपाय काय? प्रत्येकाने आपली जबाबदारी पार पाडली तरी पूरे! लहापणापासून लहान मुलांना सवय लावा की कचरा कुंडीतच टाकावा आणि आपण सुद्धा! घुटका खाणाऱ्याने प्लास्टीक, तुकडे रस्त्यावर टाकू नये, घुटका खावून थुंकू नये. चॉकलेट खाणाऱ्याने कवर रस्त्यावर फेकू नये. फळ खाणाऱ्याने टरफल कचरा कुंडीत टाकावे! फळ विक्रेत्याने कचराकुंडी आपल्या दुकानात ठेवणे आवश्यक आहे. प्रत्येक दुकानदाराने दुकान बंद करताना आपण केलेला कचरा किंवा त्याच्या दुकानात झालेला कचरा पूर्णपणे स्वच्छ करावा. मटन, चिकन, मच्छी विक्रेत्याने माल विकून झाल्यावर दुकान बंद करायच्या आधी दुकान आणि परिसर पूर्ण स्वच्छ करावा.

प्रत्येक भारतीयाला ही गोष्ट अशक्य वाटते? स्वच्छता राखणे, त्यात सातत्य ठेवणे (एक दिवस करायची आणि वर्षभर अंधार!) ही एक सांघिक जबाबदारी आहे. आपण ठरविले जर जरूर करू शकतो, अशक्य बिलकुल नाही.

युरोपियन देश किंवा अमेरिका देशातून ही गोष्ट शिकण्यालायक आहे. त्याच्यातील सांघीक वृत्ती, मनात बिंबलेली प्रखर व्यक्तीगत जबाबदारी त्यामुळे या देशातला परिसर हा स्वर्गासारखा वाटतो. जिवंतपणी स्वर्ग अवतरल्यासारखा स्वच्छता, निटनेटकेपणा आणि देखणेपणा याची अनुभूती येते, ती सामान्य लोकांच्या, प्रत्येक जबाबदार नागरिकांच्या शिस्तबद्ध आणि सांधिक प्रभावामुळे! प्रत्येक दुकानदार कचरापेट्या दुकानात मेन्टेंन करतो. प्रत्येक ऑफीसमध्ये कचरापेट्या असतात. कचरा फेकणारे कचरा पेटीतच फेकतात आणि कचरा नेणारे कचरा जबाबदारीने फेकतात. कागदाचा तुकडासुद्धा नावाला रस्त्यावर, ऑफीस, गार्डन, शाळेत किंवा परिसरात दिसत नाहीत. भारतात तशी बरीच प्रगती झाली. प्रयत्न करणारे करतात पण प्रखरपणे कृती न करण्याची सर्वसामान्यपासून

कर्मचाऱ्यांपासूनची मानसिकता आपल्या स्वच्छतेच्या प्रगतीला आड येत आहे. पश्चिमात्य प्रगत देशात हे शक्य आहे, मग आपल्या देशात का नाही?

काही दिवसांपूर्वी नाग नदी स्वच्छता मोहीम एका वृत्तपत्राने हातात घेतली. नागपूरच्या महापौरांपासून इतर सर्वांनी खूप गाजावाजा केला. स्वच्छता मोहीम राबविल्यासुद्धा गेली. पण भारतात मेन्टेंन करायला कठीन आहे विद्यार्थीदशेपासून कागदाचा तुकडा सुद्धा आपण उघड्यावर फेकायला नको, कुठे बेवारस सोडायला नको, ही सवय जुडणे आवश्यक आहे. सवय लागणे महत्वाचे आहे. विद्यार्थी, शिक्षक, पालक हे घडवू शकतात. शास्त्रीयदृष्ट्या या बदलाला तीन पिढ्यांचा काळ लागतो. जर प्रत्येक पिढीने मनावर घेतले आणि कृती केली तर.

पॅरीस, लंडन, इतर बऱ्याच अमेरिकेतल्या शहरातून नद्या गेलेल्या आहेत. या नद्या भोवताल स्वच्छता, निटनेटकेपणा, सौंदर्य निर्माण करून त्या नदीच्या तटावर हॉटेल, रेस्टारेन्ट, बोटींग सुविधा उपलब्ध करून व्यवसायिकांची प्रचंड आर्थिक उलाढाल होते. पर्यटक सुद्धा प्रचंड प्रमाणात भेटे देवून मौजमजा करतात. नागपूरसुद्धा एक भाग्यवान शहर आहे कारण नागनदी शहरातून गेलेली आहे. नागनदीचे सिव्हील लाईन भागात काही ठिकाणी जंगल आणि झुळझुळ वाहणारे पाणी, हळूवार होणारा पाण्याचा खळखळाट असे नैसर्गिक सौंदर्य पाहिले की वाटते नागपूर उद्या जाऊन लंडन, पॅरीस, सॅन अॅटनीओ सारख्या शहरांना झक मारू शकेल. पण याची सुरवात हे सामान्य लोकांपासूनच होते. थोडासा सुद्धा कागदाचा तुकडा असो, प्लास्टीक बॅगचा तुकडा आमच्या हातून बाहेर बेवारस पडायला नको!

मी एक नदी ऑस्टीन टेक्सास जवळून बघीतली. नागनदीसारखे पावसाळा सोडून खूप कमी प्रमाणात पाणी वाहत असते. त्या नदीवर बऱ्याच ठिकाणी शहरात बंधारे बांधून पाणी अडविले आहे. पूर्ण वर्षभर पाणी राहावे म्हणून! कुठे बोटींग व्यवस्था, कुठे कमर्शियल कॉप्लेक्स नदीच्या बाजूला घर विकत घ्यावे म्हणून लोकांची धडपड असते. यात अशक्य काही नाही. नागपूरकर सुद्धा करू शकतात. आधी आपण कचरा करायचा आणि नंतर म्हणायचे महानगर पालिकाकडे, ग्रामपंचायतवाले स्वच्छ करत नाहीत. त्यापेक्षा आपण सर्वसामान्यांनी कचरा होऊ द्यायचा नाही. म्हणजे सर्व प्रश्नांची उत्तरे इथेच आहे.

(दि. १० ऑक्टोबर २०१३, अभयराज्य)




# ४. बघा, पंतप्रधान मोदीजींचा स्वच्छ भारत!



नागपूरातले चित्र प्रत्येक रस्त्यावर उरूसच्या संदलच्या दिवशी दिसत होते. हिंदू असो वा मुस्लीम सन, हे चित्र काही नवीन नाही. संयोजक जशी प्रसाद वाटण्यासाठी व्यवस्था करतात तशी केराच्या टोपल्याची व्यवस्था करून भक्त लोकांना प्लेट, ग्लास डायरेक्ट कचरापेटीत टाकायला लावले तर कचरा पडून दिसणारही नाही आणि कचरा साफ करायची पाळीही येणार नाही. प्रत्येक पानठेलेवाला दुकानदार, भाजीपालेवाला, मच्छी विकणारा, कोंबडी विकणारा यांनी त्यांच्या ग्राहकांनी केलेला कचरा जमा करण्यासाठी कचरापेटी ठेवली आणि दुकान बंद करताना स्वच्छ करून कचऱ्याची विल्हेवाट लावली, कचरा रस्त्यावर पडून दिसणार नाही, दुर्गंध येणार नाही याची दक्षता घेतली तर अस्वच्छता दिसणार नाही. सुरवातीला त्रास होईल पण काही दिवसानंतर महानगरपालिकेने एकतर स्वच्छता मेंटेन करणाऱ्या दुकानदारांना बक्षीस देऊन किंवा बेजबाबदार दुकानदारांना शिक्षा करून स्वच्छता मोहीम राबवू शकतात. जय रामजी की!

# ५. टर्रफूस्स यंत्र ज्याचे घरी, आरोग्य तेथे वास करी! पंतप्रधानांचा नवीन नारा



पंधरा ऑगस्ट २१२१ रोजी हिंदुस्थानची राजधानी नागपूर, स्वातंत्र्यदिनी बर्डीच्या किल्ल्यावरून हिंदुस्थानचे पंतप्रधान मिस्टर मोदी यांनी तडाखेबाज भाषण केले. सर्वे हिंदुस्थानी जनतेच्या घरोघरी टर्रफूस्स यंत्र असणे आवश्यक आहे हीच या सरकारची प्राथमिकता आहे असे ठासून सांगितले. गेल्या एक वर्षापासून इंटरनॅशनल मार्केटमध्ये टर्रफूस्स यंत्र उपलब्ध झाले होते, जाहीराती झळकत होत्या. सरकारला आणि जनतेला गटारे, संडास, मलवाहिण्या बांधण्याची आवश्यकता पडणार नव्हती. संडास बाथरूमसाठी अलटरनेटिव्ह म्हणून विलक्षण शोध होता, एक मोठा अविष्कार होता. टर्रफूस्स यंत्र हाताळायला सोपे, छोटेसे पोर्टेबल होते. संडास लागली की टर्रफूस्स यंत्रामध्ये करा! टर्रफूस्स यंत्र लगेच विष्टा, शी सू प्रोसेस करून तीस सेकंदाच्या आतमध्ये भसभूसीत खत आणि स्वच्छ निर्मळ निर्रजंतुक पाणी उपलब्ध करून देत होता. ना वास, ना दुर्गंध, ना किळस! देशभरातले नवीन कॅलक्यूलेशन प्रेझेंट केले गेले. विद्यमान संडासमध्ये भरपूर पाणी वेस्ट केले जात होते. या यंत्राच्या वापराने त्यात १००० बिलीयन डॉलर पाण्याची बचत होणार होती. गटारे संडास बांधण्यासाठी येणाऱ्या ५०,००० बिलीयन डॉलरच्या खर्चाची बचत होणार होती. टर्रफूस्स यंत्रामधून पौष्टीक खत आणि निर्मळ पाणी लगेच मिळत होते. त्या खताची किंमत नेशनवाईज काढली तर ५०,००० बिलीयन डॉलर इतकी होत होती. हिंदुस्थानची लोकसंख्या जगात प्रथम क्रमांकावर असल्याने सर्वात जास्त खत निर्मिती हिंदुस्थानात होणार होती. हिंदुस्थानची लोकसंख्या तीनशे कोटी असल्याने खत निर्मिती आणि निर्मितीमध्ये



देशाला प्रचंड वाव होता. एक नागरिक दिवसातून किती वेळा हगतो, सरासरी टेन्टेटीव्ह संडास लेंडीचे वजन किती, गुणीला वर्षाचे तिनशे पासष्ट दिवस, गुणीला तीनशे कोटी भारताची लोकसंख्या असे कॅलक्यूलेशन करण्यात प्रसारमाध्यमे गुंतली होती. पूर्ण देशभरातून आलेला माल नागपूरतून विमानाने पाठवावा वा मुंबईहून जहाजाने म्हणून भारत सरकारचे स्पेशल मंत्रालय अभ्यास करीत होते. भारतात कुठे कुठे खतांचे कलेक्शन सेंटर उघडायचे, मॅनपॉवर किती लागेल, अतिरिक्त खर्च किती, दळणवळणच्या सुविधेचा खर्च किती याचे सुद्धा मोजमाप हे स्पेशल मंत्रालय करत होती.

**विकासाचे मोजमाप**

ओव्हरआल भारताची परिस्थितच तशी झाली होती. १५ ऑगस्ट २०१४ ला भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिल्लीच्या लाल किल्ल्यावरून केलेल्या भाषणाला शंभर वर्षापेक्षा जास्त काळ लोटला होता. प्रत्येक नवीन पिढीचे जन्मणारे विचारवंत नवीन नवीन विचारात गुंतले जात होते. १९०० च्या काळात इंग्रजांचे राज्य होते. इंग्रज म्हणजे गोरेच! रोड, स्वास्थ्य, शिक्षण म्हणजे विकास वा तरक्की असे इंग्रजांच्या काळात बोलले जात होते. २०१४ मध्ये पंतप्रधान बोलले घरोघरी संडास असणे अती आवश्यक! संडास म्हणजे प्रगतीचे प्रतिक! पाश्चात्य मानसिकतेचे लोक गरीबी आणि विकासची व्याख्या बनवित होते आणि भारतीय शासन व लोक त्याचे अनुकरण करीत होते. पाश्चात्य लोक संडास केल्यानंतर कागदाने ढुंगी पुसतात, पाणी वापरत नाही. २०५१ मध्ये भारताचे पंतप्रधान बोलले की कागदाने ढुंगी पुसणे म्हणजे तरक्की. गोरे लोक चाल चाले आणि भारतातील मीडिया, मंत्री यांची दाढी हाले! आताही २१२१ मध्ये तसेच झाले होते. टर्रफूस्स यंत्र घरोघरी म्हणजे हिंदुस्थानचे विकास वा तरक्कीची पातळी मोजण्याचे यंत्र बनले होते. आला रे आला टर्रफूस्स आला! टर्रफूस्स यंत्र ज्याचे घरी, आरोग्य तेथे वास करी! अशा घोषणा, रस्त्या रस्त्यावर, घरोघरी, गावोगावी भिंतीवर, प्रत्येक (अल्ट्रास्मार्ट) फोनवर, टिव्हीवर प्रत्येक ठिकाणी प्रसारित केल्या जात होत्या. टर्रफूस्स यंत्र घरी नसेल तर बायकांनी नवऱ्यांना तलाक द्यावा अशा जाहीराती रेडीओवरून ऐकविण्यात येत होत्या. तलाक एक क्षुल्लक गोष्ट झाली होती, मुलांच्या अपत्यांच्या संगोपनाला काही किंमत राहिली नव्हती.

**सर्वसामान्यांचा गोंधळ**

सर्वसामान्य माणूस मात्र गोंधवून गेला होता. काय खावे, काय प्यावे, काय

वापरावे हेच त्याला कळेना! पाश्चात्य गोरे लोक पैसे कमविण्यासाठी नवीन नवीन युक्त्या वा चाली काढत होते आणि भारताची प्रसारमाध्यमे, शासकीय यंत्रणा, उद्योगपती त्याच तालावर नाचत होती. नवीन नवीन संशोधनाचा बिनचूक वापर न करता स्वतःच्या स्वार्थासाठी मिसयुज करीत होते. रोज सकाळी दूध पिताना शंका येत होती की हे दूध पाश्चरायझेशन करताना जे केमीकल मिसळले त्यामुळे माझे शरीर खोकले तर नाही होणार? गावाकडील गाईचे म्हशीचे कोठे चांगले दूध असावे! गावाकडे गेले तर पाळूया! पण ज्या कोणत्या गाई विकत मिळत होत्या, त्या संकरीत होत्या! गावठी गाय मिळतच नव्हती. जोपर्यंत हायब्रीडायझेशन, इनसेक्टीसाईड, केमीकल औषधे, तुरंत आराम देणारे इंजेक्शन, पाश्चात्यांनी संशोधित केलेले सल्फेट याचे दुष्परिणाम लोकांच्या लक्षात यावे तोपर्यंत गावठी कोंबड्या, बकऱ्या, ओरीजीनल फळ फळावले त्यांचा मूळ शेंद्रीय गुणसत्वे सृष्टीतून हद्दपार झाली होती? एखाद्या चालू लिडरसारखे गोरे लोक, हिंदुस्थानातील लोकांना आधुनिकतेच्या नावाखाली नवीन नवीन चाली लावून देत होते. स्वतः मात्र पुरातन चालीरीती, पुरातन पद्धतीकडे वळले होते. आरगॅनिक, शेंद्रीय अन्न कसे बनवायचे म्हणून भारतीयांच्या पूर्वजांच्या जुन्या शेती करण्याच्या पद्धती नवीन रूपात हिंदुस्थानी लोकांना नवीन अभ्यासक्रमात टाकण्यासाठी प्रवृत्त करीत होते, त्याचेही अप्रत्यक्षपणे पैसे मिळवीत होते. आमचे भारतीय स्वतःच्या जन्म देणाऱ्या मायला किंमत देत नव्हते. गलंग समाज होते पण दुसऱ्यांची माय प्यारी झाल्याने ही परिस्थिती ओढविली होती.

(दि. ११ सप्टेंबर २०१४, अभयराज्य)



# ६. टर्फूस्स यंत्र घरोघरी! आरोग्य तेथे वास करी! पंतप्रधानांचा नारा

गेल्या शंभर वर्षात इतके बदल झाले होते की त्याचा लेखाजोखा मांडणे कठीण होते. काही देशात पिण्याच्या पाण्याच्या जलवाहिण्या जमीनीखालून वा जमीनीवरून गेल्या होत्या, पूर्ण गावाला पाणी पुरवठा होत होता. अतिरेक्यांनी जलवाहिण्यांचा अभ्यास केला आणि विषारी इंजेक्टर शोधून काढले होते. संयोगवश समाजातील अपप्रवृत्तींना नवीन अभिनव मौका पदरात आला होता. ठराविक प्रभागात जाणाऱ्या छोट्या जलवाहिण्यांमध्ये इंजेक्शन सारखे इंजेक्टर्स वापरून पूर्ण प्रभागाचे विषारी पाणी करून टाकले आणि खूप लोक मृत्यूमुखी पडले! मग परत लोकांनी स्वतःच्या विहिरी खोदणे चालू केले. पण सांडपाण्याच्या वाहिण्या गटारे, छोटे मोठे पाईप, छोटेमोठे संडासचे झिरपणारे पाणी त्यामुळे झऱ्यांचे पाणी सुद्धा दूषित झाले होते. गरीबी हटाव, तरक्की राहली एका बाजूला, जीव कसा वाचवावा यासाठी धावपळ सुरू होती, सर्वसामान्य सृष्टीचक्रात सापडले होते. पूर्ण गटारे बंद करण्याचा, जलवाहिण्या बंद करण्याचा सरकारी आदेश फतवा काढण्यात आला पण तोपर्यंत वेळ निघून गेली होती. मानवी शरीराला जसा रक्तवाहिण्या, नसा त्वचेखाली पूर्ण शरीरावर असतात तसेच झरे, काही अदृश्य संवेदक वाहिका पाण्याचे नैसर्गिक प्रवाह पृथ्वीतलाच्या पहिल्या थरामध्ये होत्या.

### निसर्गाचा प्रकोप

त्या पृथ्वीतलाच्या प्राथमिक थराखालील जलवाहिण्या, जीवनवाहिण्या, संवेदक वाहीका, सांडपाण्यामुळे, संडासच्या पाण्यामुळे दुषीत झाल्या होत्या. साधू सनातन लोक त्याला निसर्गाचा प्रकोप म्हणत होते पण प्रत्यक्षात शास्त्रीय कारण वेगळेच होते. आधुनिक संडासप्रणालीमुळे पाणी आणि संडास (विष्ठा) याचे दुषित मिश्रण पुरेशी हवा न मिळाल्याने कोंडल्यामुळे परत जास्तच दुषीत झाले होते. ते अतीदुषित पाणी जमीनीच्या पहिल्या थरामध्ये झिरपल्यामुळे पृथ्वीनिर्मितीच्या काळापासून सुप्तावस्थेत असलेल्या टेऱ्याबॅक्टोरियम नावाचे विषाणू ॲक्टीव झाले होते. हे टेऱ्याबॅक्टीरियम नावाचे विषाणू उद्भुत होऊन झिरपणाऱ्या झऱ्यांमधून विहिरीच्या पाण्यात येत होते आणि त्यामुळे दोन–चार

प्रकारचे नवीन रोगांची उत्पत्ती आणि प्रसार होता. रोगाच्या मूळ कारणांचा कितीतरी वर्षे सुगावाच नव्हता, एकेका कुटुंबातले कधी कधी एकाच दिवशी दोन–दोन, चार–चार लोक मरत होते. निसर्गप्रेमी निसर्गाचे संतुलन बिघडण्याने असे झाले म्हणत होते तर सनातन लोक निसर्गाचा प्रकोप म्हणून नाव देत होते. आमचे पूर्वज का मूर्ख होते का? हजारो वर्षाच्या इतिहासात त्यांनी अशा संडासाची निर्मिती का नाही केली? त्याही वेळेस घरे होती, मुबलक लाकूड होता, दगडी होती. तुम्ही पाणी मिश्रीत संडास बांधण्यापेक्षा मातीमिश्रीत संडास का नाही बांधलेत? विष्ठेचे मातीत रूपांतर व्हायला नैसर्गिकरित्या फक्त दोन दिवस तर लागतात. मग एवढे मोठे मोठे गटारे बांधण्याची का आवश्यकता होती? कोणी राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या अड्याळ टेकडीवरील पाण्याच्या ऐवजी मातीचा वापर केल्या जाणाऱ्या संडास सदनिकांचे वर पद्धतीचे संडास उदाहरण देवून गोऱ्या लोकांना, गोऱ्या लोकांनी काढलेल्या चालीसमोर झुकून कॉपी मारणाऱ्या राजकर्त्यांना शिव्या देत होते. गोरे लोक तर शिस्तीचे चांगले आहेत. त्यांची गटारे पूर्ण लिकेजप्रुफ आहेत, आपली लोकशाही शासकीय यंत्रणा लिकेजप्रुफ गटारे बांधू शकत नाही असे माहीत असताना आमच्या राज्यकर्त्यांनी हे उद्व्याप करायचेच कशाला म्हणून काही लोक शिव्याशाप देत होते.

### अमेरिकेतही हगदुळ्या?

अमेरिकेतील परिस्थिती वेगळी होती. त्यांच्या लक्षात आले होते की जुन्या काळात भारतात हगदुळ्यांची व्यवस्था होती. उघड्यावर हवेत संडास केल्याने आवश्यक ते पोषक जीवनसत्वे जोपासले जातात. ते पावसाळ्याच्या वाहणाऱ्या पाण्याद्वारे नदीत जातात, तिथून समुद्रात जातात. नवीन तलावात समुद्रात, शेतीत, शेतीसाठी लागणारे पोषक जीवनसत्व निसर्गातील जीवजंतूना पुरविले जातात. विद्यमान सर्व संडास मधून कोडलेल्या अवस्थेत पाणी मिश्रीत असल्याने, वरून संडास साफ करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या केमीकल्समुळे रूपांतरित खत आवश्यक दर्जाचे मिळत नाही. समुद्र आणि नदीतील माशांसाठी लागणाऱ्या अन्नामध्ये टेट्रोमायक्टोटीन नावाचे पोषक जीवनसत्वे कमतरता पडत आहे. त्यामुळे माशांना एक नवीन रोग झाला होता आणि त्यामुळे मानवी शरीरांमध्ये नवीन रोगाचा प्रादूर्भाव झाला होता. त्यामुळे अमेरिकन सरकारने काही ठराविक ठिकाणी हगदुळ्यांची व्यवस्था करून नवीन प्रयोग चालू केला होता. पण कोण उघड्यावर संडास करायला तयारच नव्हते. अमेरिकेत शी (संडास) ला पूपू म्हणतात! अरे आपली पूपू म्हणजे आपल्या शरीरातच बनते, आपण खाल्लेल्या अन्नापासून बनते



एवढा का तुम्हांला विटाळ व्हावा? याची किळस तुम्हाला का यावी? असे म्हणून हगणाऱ्यांना समजाविले जात होते. आपली शी सू असो वा दुसऱ्यांची, आपण खाल्लेल्या रूचकर टेस्टी खमंग अन्नाचे रासायनिक प्रक्रिया झालेले बदलले रूप आहे तुम्ही तिलाच अस्पृश्य का समजावे? प्रेमभावना ठेवून दुसऱ्यांच्या शी सू चा गंध आणि रूप न्याहाळायला काय प्राब्लेम? असे समजविण्याचे डोज अमेरिकन लोक आपल्या मुलाबाळांना देत होते. पा त्यांच्या मुलाबाळांची शी सू हगदूळीत गेले की उतरतच नव्हती. आपण खाल्लेल्या अन्नाला जागायला पाहिजे याचा अर्थ वेगळाच निघत होता.

### टर्रफूस्स यंत्राची जागतिक बाजारपेठ

२१२१ चे पंतप्रधान डॉ. मोनी यांनी सांगितल्याप्रमाणे टर्रफूस्स यंत्राचे परिक्षण करण्यात येत होते. या यंत्रामध्ये वेगवेगळे मॉडेल होते. फ्रांसने ठूसठूस नावाचे यंत्र काढले, ते म्हाताऱ्यांसाठी चांगले होते. शी सू बाहेर निघायला त्रास होत असेल तर व्याकूम क्रिएट करून संडास ओढून घेत होते. फूसफूस नावाचे संडास खेचणारे यंत्र महागडे असले तरी जोरदार होते. हे फूसफूस मॉडेल शी सू लगेच प्रोसेस करून, त्याचे परिक्षण करून हगणाऱ्याने काय काय खाल्ले त्या घटकांचे परिक्षण करून पोषक आहारासाठी काय बदल करायला पाहिजे याचा रिपोर्ट हॅट्सअप फोन अप्लीकेशन मधून, अल्ट्रा स्मार्ट फोनद्वारा अर्ध्यातासात डॉक्टरांकडून वेरीफाय करून सत्यापित करून हगणाऱ्या पेशंटला मिळत होता!

### जुन्या रूढी परंपरांची, पूर्वजांची आठवण?

लोकांना काय करावे काय नाही सुचतच नव्हते. आधी काळात पोलीओ व्हायचा, आता नवीन चकाचक दिसणाऱ्या टाइल लावलेल्या घरांमध्ये मानवनिर्मित पोलीओ रोग होत होता. कुत्रा मांजरांचे पाठचे पाय फेंगळे का झालेत याचा अभ्यास केल्यानंतर लक्षात आले की चकाचौंध दिसणाऱ्या टाईल हिवाळ्यात फार थंडी होते. या टाईल्सचे फ्लोरिंग तळपायांवर डायरेक्टली आणि मानवी शरीरावर अप्रत्यक्षपणे असर करीत आहे आणि वाताचे प्रकार वाढत आहेत असे निदर्शनास आले होते. आधी आम्ही घरच्या चुलीतल्या कोळशाने तोंड घासत होतो, कोळसा हा अती उष्णतेने लाकूड जळून बनला होता. त्यामुळे निर्जंतूक होता पण विकत घेतलेले दंतमंजन, टूथपेस्ट निर्जंतूक असेल याची गॅरन्टी नव्हती. चुलीतली राखळ जळणातून बनली असल्याने निर्जंतूक असल्याचे खात्री होती पण पॅकेटमधील फूड आणि ब्रेडची काही गॅरंटी नव्हती! टूथपेस्ट पेक्षा

निमकाडी, थंड फरशी टाईलपेक्षा साधी माती वा लाकूड, भांडे घासण्यासाठी राखड, महाराजने दिलेली विभूती राख, शाम्पूपेक्षा गावची चिकन माती! आमच्या पूर्वजांनी पुजलेले सर्व टाईपचे देव लोकांना आठवायला लागले होते! ॲसबेस्टास टाईलच्या जागी गवताची छप्पर असलेली घरे केमीकल मिश्रीत प्लास्टीक पेंटपेक्षा मातीचे पोतारे, मायक्रोवेव्हवर बंदी इत्यादी भरपूर स्थितंतरे होऊन गेली होती.

**सिझरींग आपरेशनचे सिझरींग ऑपरेशन**

एक हद्द तर विचारूच नका! बाळाच्या जन्मासाठी सिझरींगचे ऑपरेशनवर काही गोऱ्या देशांनी बंदीच आणली होती! सिझरींगमुळे होणारे महिलेच्या शरीरावर दुरगामी परिणाम पहिलेच्या शरीराची होणारी चिरफाड, पूर्ण आयुष्यात वापरले जाणारे अल्पाधिक ॲटीबायोटीक्स, सुंधी अनुस्थेशीया आणि वापरले जाणारे इतर मेडीसिन्स एकंदरीत त्याचे परिणाम याचे परम्यूटेशन, कांबीनेशन करून काढलेले ओव्हरऑल इफेक्ट सिद्ध करीत होते की कमीत कमी पाच वर्षांनी महिलेचे आयुष्य प्रभावित होते. १९५० आसपास लागलेला अँटीबायटीक्सचा शोध, सुंधी अनेस्थेशीयाचा शोध आधुनिक इक्वीपमेंटमुळे १९८० च्या आसपास नंतरपासून सिझरींग ऑपरेशन एक फॅड बनले होते. नार्मल प्रसूती करायला डॉक्टर तयार नव्हते कारण पैसा खोऱ्याने उभा करायचा होता. गोऱ्या पाश्चिमात्यांनी सिझरींग टेक्नीक, अँटीबायटीक, आधुनिक इक्वीपमेंट पासून पैसा उकळण्यासाठी जबरदस्त मार्केटींग करून भारतीयांना चुकीचे वळण लावून दिले होते. आयुर्वेद हा निसर्गोपचारावर आधारित आहे. जन्मणाऱ्या बाळाला टाळूवर छिद्र देवाने, बाळंतपण कठीण प्रक्रिया कठीण झाली तर बाळाला मारून बाळंतीनीचा जीव वाचवावा म्हणून दिले होते. आधीच्या काळी एल आकाराचा आकोडा वापरून (पर्याय नसलाच तर) बाळाला मारून काढून बाळंतीनीचा जीव वाचविण्याची पद्धती होती. पण गोऱ्यांनी आपला सिझरींगचा धंदा जगभर चालावा व आपल्याला इक्वीटी, रॉयल्टी मिळावी म्हणून तीन महिण्यापेक्षा मोठ्या गर्भाला मारणे म्हणजे मर्डर असा कायदा करुन टाकला! जगभर प्रसारमाध्यमांमधून प्रप्रोगंडा करून आमचेच बरोबर अशी मानसिकता पूर्ण जगात बनवून टाकली होती. लहानपणापासूनच गोऱ्यांचा अभ्यासक्रम शिकविल्याने अप्रत्यक्षपणे गोऱ्यांचे सिद्धांत म्हणजे आपलेच सिद्धांत वाटत होते. जर देव म्हणतो जोपर्यंत बाळ आईच्या उदरातून बाहेर येत नाही तोपर्यंत तुमचा नाही! मग हे गोरे नवीन नियम बनविणारे कोण? आधुनिक उपचारांनी मानवाचे आयुष्य काय दोन–चार वर्षांनी वाढविले, आम्ही अमरत्वाचा उपाय शोधून



काढला आणि आम्हीच देव! असा अप्रत्यक्ष अविर्भाव गोऱ्यांनी आणला होता. आमचे भारतीय त्याला प्रखर साथ देत होते. आता मात्र पाश्चात्यांनीच सिझरींगवर बंदी आणली होती. पण भारतीयांना बायकांची, बाळंतीणीची काळजी नव्हती! काय पोटाची चिरफाड होते होऊ दे, पॉवरफूल स्ट्राँग फिक्स जनरेशन अँटीबायटीकमुळे तिचा रोग प्रतिकारक शक्तीचे वाटोळे होऊ दे पण सिझरींग करून बाळाला काढ! आणि डॉक्टरही आपल्याला सर्जरीमधून पैसा मिळतो म्हणून पती लोकांनाच साथ देत होते.

(दि. १८ सप्टेंबर २०१४, अभयराज्य)

# १. हिंमत हारलेले सरदार?



अमेरिकेचे अध्यक्ष बराक ओबामा यांच्यासोबत चर्चेसाठी भारतातील सर्वोच्च धनाढ्य उद्योगपतींनी, सिईओ, चेअरमन हे एका रांगेत लागून भेटायला गेले. स्वतःची वा आपल्या कुटूंबीयांची टिचभर खळगी भरण्यासाठी पैसा मिळविणे भारतात काहिसे सोपे आहे. पण स्वतः उद्योग उभारुन, संस्था उभारुन स्वतःसाठी आणि कितीतरी इतर भारतीय तरूणांसाठी रोजगार उत्पन्न करणे भारतात खूप कठीण काम आहे. काहीशा भ्रष्टाचारी ऑफीसर लोकांना पैशाचे पाकीट देऊन परवाने मिळविणे, अनप्रोफेशनल एम्प्लॉयी वर्गाला सांभाळून घेणे, त्यांचेकडून काम करवून घेणे, पदोपदी आपल्याच लोकांकडून येणारे अडथळे, नोकरदारांच्या वंडाळ्या वृत्ती या सर्वांना घेऊन चालणे म्हणजे उद्योजक वर्गासाठी एक अग्नीदिव्य असते. एकदाचे अमेरिकेत उद्योग उभारणे सोपे पण भारतात महाकठीण! अशा अतिहुशार भारतीयांनी अमेरिकी अध्यक्षांसमोर लाईन लावावी म्हणजे हिंमत हारलेले सरदार, राजे जयसिंगाचे किंवा मानसिंगाचे वारसदारच म्हणावे लागेल. अमेरिकेतील उद्योगपतीही असे कधी करणार नाहीत पण भारतीय उद्योगपतींनी असे करावे म्हणजे चिंतनीय म्हणावे लागेल.

**भारत जगाचे नेतृत्व करू शकतच नाही?**

भारतीय लोक कधी एकत्र येऊ शकत नाहीत, भारतीय यंत्रणेत न्यायपालिका, प्रशासन, शासन, मीडिया, पोलीस यंत्रणेत पुरेसा समन्वय अशक्य आहे. कामचुकार वृत्ती, भ्रष्टाचारी वृत्ती, पाय ओढण्याच्या वृत्ती, भारतातून समूळ नष्ट



होऊ शकत नसल्याने भारत प्रथम क्रमांकाचा बलाढ्य देश बनू शकत नाही असा ठाम विश्वास असल्याने हे सर्व लोक बलाढ्य अमेरिकेच्या अध्यक्षांसमोर घालीन लोटांगण करीत आहेत. आपला भारत देश प्रथम क्रमांकाचा बलाढ्य देश होऊ शकत नाही ही भावना फक्त उद्योगपतीमध्ये सोडा, राज्यकर्त्यांमध्येही आहे अशी शंका येते. अमेरिकेचे अध्यक्ष भारतात आले तेव्हा भारताचे पंतप्रधान नरेंद्रजी मोदी बराक ओबामा यांना व्यक्तीगत स्वतः घ्यायला गेले. पण भारताचे पंतप्रधानांचे विमान अमेरिकेत लँड झाले तेव्हा अमेरिकेचे अध्यक्ष घ्यायला आले होते का? तेराशे, पंधराशे शतकाच्या काळात अशीच भूमिका हिंदू सरदारांची बनली होती. हिंदू संघटीत होऊच शकत नाही असे माहीत असल्याने राजे राजपूत जयसिंग सारखे लोक निमूटपणे मोगलांच्या अधिपत्याखाली काम करीत होते. पुढचा इतिहास न सांगितलेले ठीक?

**हिंमत हारलेले सरदार?**

भारतातील सर्वोच्च धनाढ्य उद्योगपती एका रांगेत उभे राहण्याचा दुर्मिळ योग! टाटा ग्रुपचे रतन टाटा, रिलायन्स इंडस्ट्रीचे मुकेश अंबानी, भारती इंडस्ट्रीजचे सुनिल मित्तल, अडानी ग्रुपचे गौतम अडानी, महिंद्राचे आनंद महिंद्रा, टॉरेंट फर्माचे सुधीर मेहता, इन्फोसीस आणि इतर सर्व मोठ्या कंपन्याचे चेअरमन आणि सीईओ इत्यादी.

(दि. ५ फेब्रुवारी २०१५, अभयराज्य)

# २. लठ्ठ पगाराच्या नोकऱ्या कशा मिळतात?

प्रत्येकाला वाटत मला लाख रुपये महिण्याचा पगार मिळायला पाहिजे. आपल्याला पुढे जाऊन खूप मोठा पगार मिळावा म्हणून आपण उच्च शिक्षण घेतो खूप मेहनत करतो. खूप शिक्षण झाले म्हणजेच लठ्ठ पगाराच्या नोकऱ्या मिळतातच असे नाही. लठ्ठ पगाराच्या नोकऱ्या कशा मिळतात हा प्रश्न खूप महत्वाचा आहे आणि समजून घेणे आवश्यक आहे.

या प्रश्नाचे उत्तर मी जेव्हा अमेरिकेत २–३ वर्षे नोकरीचे पूर्ण केलेत आणि लक्षात आले. आमच्या घरी शेती होती आणि आहे. शेतकरी जसा रोजची मजूरी देऊन आपले काम करवून घेतो अगदी तसेच अमेरिकन उद्योजक/निवेशक आमच्याकडून काम करवून घेत होते जसा शेतकरी आपल्या गावी मजूर मिळाला नाही तर बाजूच्या खेडेगावावरुन आणतो. अगदी तसेच अमेरिकन उद्योजक/निवेशक अमेरिकन स्वस्त आणि पात्र असलेले मजूर मिळत नव्हते म्हणून भारत आणि इतर देशातून अमेरिकेत आणत असतात. सुरवातीचा माझा अमेरिकेतला पगार अंदाजे महिना २ लाख रुपये होता. भारतातल्या पगाराला तुलना केली तर खूप जास्त तर अमेरिकेतल्या नोकरदारांसाठी सामान्य होता. आता जास्त पगार मिळविण्यासाठी आपल्याला कशी तयारी करावी लागेल याचे उत्तर मी तुम्हाला शेतीचे तुलनात्मक उदाहरण देवून सांगतो.

१. सहसा आपल्याला पगार किती मिळते हे उद्योग क्षेत्रात आपल्या पात्रतेसाठी प्रचलित त्या भागात त्या वेळेस पगार किती मिळतो, यावरून ठरविले जाते. जसा निंदन करायची रोजची मजूरी १०० रू. खोदणीची १२५ रू. तसेच त्यावेळेस त्या भागात Linus Sys Admin चा ५०० रू. रेट असेल, सहसा Sys Admin ला तोच रेट मिळतो.

याला अनुसरुन आपल्याला हे बघायचे असते की IT Industry मध्ये कोणते पात्रता (Skill Set) आहेत आणि त्या प्रत्येक जागेसाठी वार्षिक पगार किंवा तासाचा रेट (Hourly Rate) किती आहे? आणि आपण त्या पात्रतेसाठी उपयुक्त होऊ शकतो का?

२. आपल्याला प्रचलीत Hot Skill कोणत्या आहेत आणि त्याची पुढे जाऊन मागणी वाढणार आहे. अशा Skill Set मध्येच हात टाकणे आवश्यक असते



कोणतीही पोस्ट किंवा जागा ज्यांची जास्त मागणी आहे. ती ठरविल्यानंतर त्यांच्या सबपोस्ट (Specific types in that post) आणि नंतर त्यांच्या मधील Highly Demanding Skills याबाबतीत निक्षून अभ्यास करावा लागतो.

प्रचलीत आणि प्रसिद्ध उद्योजक कंपन्या त्यांचे आणि त्याला अनुसरुन कोणत्या सेवांना जास्त पगारी रुपात मोबदला मिळतो हे बघून आपल्याला त्यानुसार तयारी करायची असते.

खरं तर ही माहिती कुठे मिळेल? ती तुम्ही इंटरनेट मधून शोधू शकता किंवा वृत्तपत्रातून सुद्धा जास्त करुन कोणत्या जागांसाठी तुम्हाला जाहिराती दिसतात आणि त्यातले बारकावे (Specific Skills) यावरुन! उदाहरणार्थ– प्रसिद्ध आय.टी. कंपन्या IMB, Microsoft, Oracle, Cisco, Yahoo, google.

**३. सर्वात महत्वाचा Issue म्हणजे आपली मानसिकता.**

कधीही जॉब नोकरी शोधताना तुम्हाला उद्योजक किंवा नोकरी देणाऱ्याच्या मानसिकतेचा त्यांच्या खुर्चीत बसून imagine करुन पावले टाकायची असतात. शेती करतांना urgent गरजेनुसार आपण जास्त पैसे देऊन मजूर मागवतो. शेतीमध्ये सहसा उलाढाल ही १ वर्षाची असते. १ वर्ष पर्यंत ठरलेल्या cycle नुसार जमीनीची मशागत, पेरणी, पिकाचे पोषण, काळजी, पाणी, सल्फेट, जंतुनाशक इ. पिक काढणे विकणे मोठ्या उद्योगांमध्ये हा cycle ५ वर्षाचा असू शकतो.

शेतकरी जसा वर्षाअखेरीस येणाऱ्या नफ्याचा अंदाज बांधतो, आवश्यकतेनुसार जेव्हा मजूर लागतात, तेव्हा पैसे देवून मजूरदार लावतो. वर्षाच्या शेवटी आपल्याला काही नफा मिळले हा महत्वाचा उद्देश मनात ठेवून मजूरांसाठी पैसा खर्च करतो. अगदी तसेच उद्योजक/निवेशक उत्पन्नाच्या उलाढालीचा अंदाज घेऊन नोकरदारांना पगार देतो. उद्योगजगतात पगाराला मर्यादा नसते. समजा तुमच्या एकट्यापासून त्याला वार्षिक १ कोटीचा फायदा होत असेल तर तो तुम्हाला सहजगत्या १० लाख ते ३० लाख पर्यंत वार्षिक पगार देऊ शकतो.

त्यामुळे नोकरी मिळविण्यासाठी प्रयत्न करतांना या गोष्टीचे भान असणे खूप आवश्यक आहे. तुमची पात्रता अव्वल दर्जाची कशी राहील आणि तुम्ही नोकरशाहला किती उत्पन्न मिळवून देऊ शकतात हे पटवून सांगायचे असते आणि करून दाखविण्याची पात्रता तुमच्यात असावी लागते. तुम्ही खूप शिकलेले आहात पण त्याला तुम्ही उत्पन्न मिळवून देऊ शकत नसाल तर तो तुम्हाला

घेणारच नाही. इंटरव्यू देतांना सुद्धा तुम्ही किती हुशार आहात, होते, तुमचे शिक्षण किती? त्यापेक्षा/त्या व्यतिरिक्त तुम्ही त्याला किती उपयोगी आहात ते समजून सांगायचे असते आणि त्यांच्या मानसिकतेत मिसळायचे असते.

**४. कालावधी किंवा Phase चे महत्व!**

शेतकरी रोवण्याच्या वेळेस नेहमीपेक्षा जास्त मजूरी देतो. कारण ती त्या काळाची गरज असते. पाऊस पडलेला असतो, धानाचा परा तयार असतो. उशीर झाला तर पाणी आटून जाईल आणि चिखल करता येणार नाही. रोवण्यासाठी चिखल आवश्यक आहे. उद्योग जगतात नोकरी करतांना तसेच शोधताना अशा ठिकाणी अलर्ट असावे लागते. नोकरशहाला त्यांच्या ग्राहकांची कामे ठरलेल्या वेळेत पूर्ण करुन द्यावयाची असतात. जेव्हा नोकरशहांना करोडो बजेटची कामे ठरलेल्या वेळेत पूर्ण करायची असतात. त्यावेळेस बाकी प्रचलीत रेटपेक्षा जास्त पगार देऊन आपल्याला नोकरी देऊ शकतात. अशासाठी नोकरशहा आणि नोकरदार या दोघांनाही आवश्यकतेपेक्षा जास्त मेहनत घ्यावयाची असते.

**५. सल्ला किंवा मार्गदर्शन कोणाचा घ्यावा?**

आपण करेक्ट दिशेने चाललो हे कसे ओळखायचे? प्रत्येकाला वाटते मी हुशार आहो आणि प्रत्येकजन हुशार आहे. आपल्याला तुलनात्मक स्वतःचे आत्मपरिक्षण करायचे असते. समजा तुम्हाला नेहमी अपयश येत असेल, आज नोकरी मिळेल किंवा उद्या मिळेल, करत तुम्ही २ ते ३ महिने किंवा २ ते ३ वर्ष किंवा जास्त कालावधी घालवतच आहात तर तुम्ही कायमचे सुद्धा भरकटू शकता. अशा वेळेस अनुभवी लोकांच्या मार्गदर्शनाखाली काम करणे आवश्यक असते. फक्त सल्ला घेऊन चालत नाही. ज्या लोकांनी नोकरी क्षेत्रात यशस्वीरित्या लठ्ठ पगारावर वर्षानुवर्षे काम केले आहे. ज्यांनी शून्यपासून सुरवात करून स्वतःला सर्व अडथळ्यातून पार तुलनात्मक उच्च पगारावरती काम केले आहे, अशा लोकांच्या मार्गदर्शनाखाली त्याच्यावर विश्वास ठेवून आराखडा तयार करून त्यावर मेहनत करून पुढे जायचे असते. माझ्या अनुभवावरुन खेड्यापाड्यातल्या विद्यार्थ्यांची कार्पोरेट जगता नोकरी मिळण्यासाठी दमछाक होते कारण मानसिकताच मूळी यशस्वीरित्या नोकरी करण्यासाठी पोषक नसते. आपल्या क्षेत्रातील यशस्वी आणि अनुभवी लोकांच्या मार्गदर्शनाखाली मेहनत केली तर पुढच्या पायऱ्या सोप्या होण्यास खूप मदत होते.

(दि. २२ डिसेंबर २०११, अभयराज्य)



# ३. तुमची भांडी घासणारी बाई तुम्हाला ऐकते का ?

तुम्हाला रोजगार काही अन्ना हजारे, अरविंद केजरीवाल का कोणतेही शासन यंत्रणा प्रचंड प्रमाणात उपलब्ध करू देवू शकत नाही. उद्योजक उद्योगपती म्हणजेच एन्टप्रिनीयर लोक हे फार महत्वाचे आहेत. आज दिसणारा टाटा, बिरला, अंबानी इत्यादी सर्व शून्यापासून निघाले आहेत. ते सुद्धा किंवा त्याचे पूर्वज आपल्यासारखेच बेरोजगार होते. त्यांच्याकडे कोणते कौशल्य होत आणि आहे? आपल्याला तर आपली भांडेवाली मोलकरीन ऐकत नाहीत. तिच्याकडून आपण आपल्या मनासारखे काम करवून घेऊ शकत नाही. शेतकऱ्याला त्याचे दोन चार मजुराकडून काम करवून घ्यायला किती त्रास घ्यावा लागतो त्याचे त्यांना माहीत असते. आणि एन्टरप्रिनीअर वा उद्योजकाला मोठ्या मोठ्या टीम हाताळाव्या लागतात. सतरा टाईपचे वेगवेगळे डोके त्यांचेकडून यशस्वीपणे काम करवून घ्यावे लागते.

प्रत्येकाच्या डोक्यात एकशे एक उत्तम आयडीया येतात आणि आहेत. पण आपल्याला आपला जवळचाही मित्र वा नातेवाईक ऐकून घेत नाही, पैसा उभा करण्यास मदत करीत नाही. मग उद्योजक वा एन्टरप्रिनीअरचा विचार करा, त्याला कसा त्रास होत असेल?

प्रत्येकाला वाटते पैसा मिळावा, आपले उद्योजक चांगले, आंतरराष्ट्रीय प्रतीचे प्रॉडक्ट बनवतील आणि परदेशात विकतील, तेव्हाच आपल्या देशाला पैसा मिळेल ना? आपल्यात तर उद्योग उभारण्याचे, आणि यशस्वीपणे उद्योगातील प्रॉडक्ट विकून, नोकरी करणाऱ्यांना पगार देण्याचे कौशल्य नाही, मग कमीत कमी आपल्या उद्योगपतींच्या व्यवसाईकांच्या, उद्योजकांच्या पाठीशी तर ठामपणे उभे राहणे अती आवश्यक आहे.

**आपला तो येळ्या... दुसऱ्याचा तो जीनीयस?**

कोणी परदेशातला उद्योगपती आला तर गाजावाजा करता! परदेशातल्या उद्योगपतीने एक नंबरच्या आयडीया चोऱ्या करून, त्यांनी परदेशात पैसा उभा केला असेल, कोणाला फसवून केला असेल तर तुम्हाला काय माहीत? परदेशातील उद्योगपतींना आपली जनता डोक्यावर घेऊन नाचते आणि भारतातील

उद्योगपतींना शिव्या देते, तुच्छ समजते हेच भारतीयांचे दुर्दैव आहे. भारतातील एन्टरप्रिनीअर किंवा उद्योजक वर्ग जगातील इतर देशातील उद्योजक वर्गापेक्षा अती हुशार आणि कुशल आहे. या वर्गाला अप्रोफेशनल रोजगार मजूर वर्ग आणि भ्रष्टाचारी, कामचुकार शासकीय यंत्रणा आणि चुका काढणारे मिळवून न घेणारे ग्राहक यांना तिहेरी तोंड द्यावे लागते.

युरोप अमेरिकेत तर प्रोफेशन रोजगार वर्ग उपलब्ध आहे. वाईट मानू नका जरी वाटत असेल, दिसत असेल तरी आपल्याकडील तरूण वर्ग जास्त करून हेकड स्वभावाचा अर्ध्या हहकुंडात पिवळा होणारा, संघटीत वृत्तीने न चालणारा, औद्योगिक आयडीयाच्या दिशेला धरून न चालणारा छोटे मोठे गैरसमज करून उद्योगात अडथळे, अप्रत्यक्ष प्रत्यक्ष झगडे करणारा, लावणारा आहे. अशा परिस्थितीत आपले कोणकोणते उद्योजक यशस्वीपणे चालत आहेत हेच त्यांचे खूप दिव्य आहे. आपल्या देशातील छोट्या मोठ्या उद्योगपती, उद्योजक एन्टरप्रिनीअरला आदर द्या, विश्वास द्या. भारतातील बनणारे प्रॉडक्ट आंतरराष्ट्रीय प्रतीचे कसे बनतील, विकतील यासाठी अप्रत्यक्ष मदत करा. त्यातच आपल्या देशाचे यश आहे. जेव्हा चांगला प्रोफेशनल तरूण रोजगार वर्ग भारतात तयार होईल तेव्हाच आपल्यातील शून्यावर खेळणारे तरूण उद्या जाऊन यशस्वी उद्योजक वा एन्टरप्रिनीअर बनू शकतात.

**तुम्ही गावचे पाटील का?**

आपण छोट्या गावाचे उदाहरण घेऊ. गावातील अर्थव्यवस्था बघा! गावातील अर्थव्यवस्था गावातील गिनेचुने, इतरांपेक्षा यशस्वी दुकानदार, व्यापारी, मोठ्या पोस्टवालया निवडक पाच टक्के ते दहा टक्के लोकांच्या हातात असते. गावातल्या सर्वात श्रीमंत पाच ते दहा टक्के लोकांकडील असलेली मालमत्ता उरलेल्या नव्वद पंच्यानऊ लोकांच्या मालमत्तेच्या किमतीइतकी असते. हेच सत्य सर्व जगभर लागू आहे, त्रिकाल सत्य आहे. पण या पाच दहा टक्के श्रीमंत वर्गामध्ये आज ते आहेत, उद्या तुम्ही किंवा तुमच्या मुलाची वा नातवाची पाळी असू शकते हे सुत्रा त्रिकालसत्यच आहे. धीर धरून हुशारी आत्मविश्वासाने पुढची खेळी खेळणे आवश्यक आहे. दुसऱ्यांना अडथळे उभारून नाही!

(दि. ७ मे २०१५, अभयराज्य)



## ४. बेरोजगार असणे म्हणजेच रोजगार?




नोकरी.. नोकरी.. नोकरी? मला नोकरी मिळाली पाहिजे म्हणून प्रत्येक तरूणांची धडपड असते? नोकरी कोण देणार? किती सरकारी नोकरी असू शकतात? सरकार देऊन किती सरकारी नोकऱ्या देणार? नोकरी देणारे उद्योजक किती? त्या उद्योजकांकडे वा व्यवसाईकांकडे नौकऱ्या किती? तरूणांना नोकरी देण्यासाठी व्यावसाईक वा उद्योजक पैदा तरी होऊ देता का? नोकरी देणारे लोकच नाही तर तुम्हाला नोकऱ्या कोण देणार? नोकरी देणारे उद्योजक वा व्यवसाईक कुठून येतात? हे नोकऱ्या देणारे काय आकाशातून टपकतात का? तुम्ही उद्योजक यशस्वीपणे पैदा होऊ देणार नाहीत तर नोकऱ्या काय आकाशतून टपकणार काय? उद्योजकाला जे कौशल्य लागते ते आपल्याकडे आहे का? आपली आयडीय इनवेस्टर लोकांना पटवून सांगणे, बँकेला पटवून सांगणे त्यातून पैसा उभा करणे कामासाठी आवश्यक कुशल नोकरदार शोधणे, नोकरदाराकडून कुशलतेने काम करवून घेणे, आवश्यक इन्फ्रास्ट्रक्चर बांधणे, यशस्वीपणे उद्योग चालविणे, गुंतवणूकदारांच्या एका रुपयाचे दोन रुपये करणे, स्पर्धेत टिकून राहणे, आपण हे करू शकता का? नाही करू शकत! मग दुसऱ्यांना तरी करू देता का? फक्त स्वतःसाठी रोजगार निर्माण करणे सोपे असते पण व्यवसाईक वा उद्योजकाने शेकडो लोकांसाठी रोजगार निर्माण करणे सोपे असते का? शेकडो लोकांसाठी रोजगार निर्माण करणे प्रत्येकालाच शक्य नसते.

**स्वतःची टिचभर खळगी भरणारे रोजगार निर्माण करतील का?**

तुमची कल्पना तुमच्या कुटुंबीयांची टिचभर पोटाची खडगी भरेल की हजारो लोकांची भूक भागवेल? रोजगार उपलब्ध करून देणे असो वा रोजगार मिळविणे,

प्रत्येकाला उद्योजक वा इन्टरप्रिनीअरची भूमिका, त्यांच्या समस्या, त्यांची गरज समजून घेणे आवश्यक असते. रोजगार प्रचंड प्रमाणात निर्माण करण्यासाठी उद्योजक, व्यवसाईक, इन्टरप्रिनीअर आणि काम करणार नोकरीदार वर्ग यांच्या भूमिका महत्वाच्या असतात. सरकार किंवा शासनाचा उपयोग हा क्षपणक सारखा असतो. वाईट मानून घेऊ नका पण भारतात शासनाची भूमिका ही पाहिजे तितकी इफेक्टीव होऊ शकत नाही कारण विरोधक, मीडिया आणि कामचुकार शासकीय स्तरातील यंत्रणांचा पुरेसा ताळमेळ नाही, मुख्य भूमिका ही उद्योगपती वा उद्योजकांचीच आहे. आणि साधारा रोजगार वर्ग, मीडिया आणि सर्वसाधारण जनता उद्योगपतींची भूमिका, समस्या समजून घेत नाही. वरून मीडिया आणि सर्वसाधारण जनता उद्योगपतींची भूमिका, समस्या समजून घेत नाही आणि मीडिया आणि विरोध वर्ग तरूणांना मिसगाईड करीत असतो.

**भारतीय प्रॉडक्ट्सची मागणी परदेशात कशी होईल?**

अमेरिकेतील बील गेट्स इतरांच्या आयडीया चोरून जलदपणे मायक्रोसाफ्ट कंपनी उभारुन, आंतरराष्ट्रीय प्रतीचे कंप्यूटरवर चालणारी विंडोज ऑपरेटींग सिस्टीम बनवितो! आपल्या स्वतःकडे ते कौशल्य कमी असले वा नसले तर कमीत कमी आपल्या भारतीय उद्योजकातील वर्गाच्या पाठीमागे उभे राहून त्याच प्रतीचे जगात नाव कमविणारे मराठीत वा भारतीय भाषेत डेव्हलप केलेली ऑपरेटींग सिस्टीम वा तत्सम प्रॉडक्ट बनविण्यास सर्व भारतीयांनी मदत केली आणि ते प्रॉडक्ट्स वापरले तर आपल्या देशात भरपूर पैसा येईल, डॉलरचाही रेट कमी होईल आणि भारतातून इंग्रजीचाही सुफडा साफ होईल.

आपला देश वा आपले उद्योजक जो पर्यंत आपल्या देशात बनलेल्या वस्तू जगाचया पाठीवर इतरत्र विकू शकणार नाहीत तोपर्यंत आपल्या देशात पैसा कसा येईल? परदेशातील पैसा जेव्हा आपल्या देशात भरपूर येईल त्याच वेळेस आपले उद्योजक भारतात प्रचंड रोजगार निर्माण करू शकतील. आपल्या शासनाने तर पदेशातून कर्ज घेऊन भ्रष्टाचाऱ्यांची घरे भरलेली आहेत आणि कर्ज वाढवीतच आहेत. आपण सर्वांनी देशाचा विचार प्राधान्याने करणे आवश्यक आहे.

**मोर्चे आंदोलने करून रोजगार निर्माण होतो का?**

मोठी मोठी आंदोलन करून प्रचंड रोजगार निर्माण होणार आहेत का? भारतीय शासन व्यवस्थेचा रोल क्षपणक कमी आणि अडथळे जास्त वाली आहे की काय असे वाटते. शासन व्यवस्थेतील विविध स्तरामध्ये राबणारी यंत्रणा नियम



कायद्याच्या नावाखाली भ्रष्टाचार आणि कामचुकारपणाचा कळस गाठून अदृश्यपणे अडथळे उभे करण्याचे काम करते. नवीन मुख्यमंत्री असो, शासन, प्रधानमंत्री असो, उच्चस्तरीय शासन यंत्रणा ही जास्त करून कागदी घोडेच नाचवू शकतात. अशा परिस्थितीत तरूणांची, रोजगार शोधणाऱ्यांनी आपली भूमिका उद्योगपती, उद्योजक वर्गाशी सपोर्टीव्ह ठवणे अती आवश्यक आहे. भारतातील उद्योगपती, उद्योजक धोका पत्करून यशस्वीपणे उद्योग चालविणे अग्नीदिव्य आहे. ते आज पैसा कमवतील तरी तो आपल्या देशाचाच आहे. उद्या आपणही उद्योजक बनून यशस्वीपणे उद्योग उभारू ही भूमिका ठेवावे लागेल. व्यवहारात कमी जास्त होणारच! आज त्यांची पाळी, उद्या तुमची पाळी पण विश्वास खूप महत्वाचा आहे.

भारतातही एकशेएक टॅलेंटेड लोक आहेत पण हेकड वागतात, टिममध्ये मिसळायला, यशस्वी संघटन कौशलय कमी असल्याने आपला देश मागे आहे. कोणतेही यशस्वी आंतरराष्ट्रीय प्रतीचे प्रॉडक्ट्स बनविण्यासाठी टॅलेंटेड लोकांचे सांघिक कौशल्य असल्याशिवाय शक्य नाही त्यामुळे मागे आहोत.

नोकरी मिळण्यासाठी नोकरी देणाऱ्या व्यवसाईक उद्योजकांचे प्रश्न समजता आले पाहिजे, सोडवता आले पाहिजे.

आपण सर्वांनी सपोर्टीव्ह वृत्ती, सांघिक वृत्ती जागविल्या, एकमेकांना अडथळे उभे करण्याच्या वृत्ती मारल्या तरच येणाऱ्या काळात भारत देश जगात प्रथम क्रमांकावर जाण्यास मदत होईल यात शंका नाही.

(दि. ७ मे २०१५, अभयराज्य)

# ५. नोकरी करणे म्हणजे पैसे कमवण्याची कला शिकणे ?

प्रत्येकाला वाटते मला चांगली नोकरी मिळावी. नोकरी ही स्वतःच्या पायावर उभी होण्याची पहिली पायरी समजल्या जाते. शिक्षणानंतर जवळपास प्रत्येक जण नोकरीच्या शोधात असतो. दोन चार वर्ष जर नोकरी मिळाली नाही तर माणूस निराशेच्या गर्तेत फेकला जाऊ शकतो. चांगली नोकरी प्रत्येकालाच हवी असते. प्रत्येक जण आपआपल्या परीने प्रयत्न करतो. पण फारच थोड्यांना सर्व काही मिळत नाही. योग्य प्रयत्न करून सुद्धा किमान यशाच मान पदरात पडत नाही. मी जवळपास पंधरा वर्ष खाजगी कंपण्यामध्ये नोकरी केली मला बऱ्याच लोकांनी स्वतःला नोकरी मिळण्यासाठी मदत केली. बऱ्याच लोकांना नोकरी मिळवून देण्याचा मी प्रयत्न केला. काही लोकांना मी नोकरी मिळवून दिली.

वर–वर पाहता नोकरी शोधणाऱ्यांमध्ये करणाऱ्यांमध्ये दोन ग्रुप आहेत. पहिला ज्यांना प्रचंड आत्मविश्वास आहे की मला कुठेही काम मिळू शकते. उद्योजक किंवा कंपनयाचे मालक त्यांना सोडायला बघत नाहीत आणि चांगल्या पगारावर काम करीत आहेत. आणि एक दुसरा वर्ग जो फक्त नोकरीच्या शोधात असतो आणि त्याला कोणी नोकरी द्यायला तयार नसतो. नोकरी मिळाली तरी असमाधानी असतो. या गोष्टींचा मी शास्त्रीय पद्धतीने मूळ कारण शोधून सांगण्याचा प्रयत्न करीत आहो. आपल्याला पैसा मिळविता आला की बाकी साऱ्या गोष्टी आपोआप मागोमाग येणार असतात. प्रतिष्ठा, सामाजिक ताकत, सुख, आनंद इत्यादी.

नोकरी करणे म्हणजे प्रत्यक्षपणे पैसा कसा कमवायचा याची कला शिकणे असे माझे मत आहे आणि माझा अनुभव आहे. आणि हा अभ्यास समजायला कठीण आहे. पण विश्वास ठेवून सुरवातीची नोकरी केली तर बेरोजगार वर्ग या अभ्यासात यशस्वी होऊ शकतो. सुरवातीच्या काळातली खाजगी नोकरी हा एक सराव समजावा. आपल्याला काय मोबदला मिळतो त्याकडे बघू नये, हा सराव आपल्याला पुढे आयुष्यात टप्प्या टप्प्याने येणाऱ्या आव्हानांसाठी तयार करीत असतो. एखाद्या सामांन्य खेळाडूला गावस्तरीय, तालुका स्तरीय, जिल्हा स्तरीय आणि पुढे राज्य स्तरीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरचा सामान्यासारखा



टूर्नामेंटसाठी मानसिक शारीरिक तयारीसाठी पाया तयार करतो. समजा तुम्हाला तुमच्या मनासारखी किंवा तुमच्या शिक्षण किंवा नसेल तर जी मिळते ती स्वीकारा, यावेळेस जास्त अपेक्षा न ठेवलेले बरे. तुमच्या डिग्री, डिप्लोमा संबंधीत विषयात काम करणाऱ्या ९५ टक्के कंपन्यांमध्ये/उद्योगात तुम्हाला जे काम मिळते, त्यामध्ये ९५ टक्के वेळ हा जनरल/कॉमन/नियमीत भानगडीतच जातो. उदा. समजा मी आयटी सिक्युरिटी एक्सपर्ट आहो तर प्रख्यात आयटी कंपनीत आयटी सिक्युरिटीमध्ये जरी काम मिळाले तरी फक्त ५ वेळच तुम्हाला त्या तुमच्या तज्ञ विषयात द्यावा लागतो. बरेच लोक आहेत ज्यांनी काही वर्ष/काळ नोकरी केल्यानंतर स्वतःचे उद्योगधंदे काढलेत. बेरोजगार वर्गातल्या माणसाची ही हिंमत होत नाही किंवा मोठ्या मुश्किलीने केले तरी अपयशाचे प्रमाण जास्त आहे. मी पैसा कुठून आणू? म्हणून पहिल्याच पायरीवर लटकू शकतो. निष्णात लोकांच्या म्हणण्यानुसार जो कर्मचारी यशस्वीपणे नोकरी करतो आणि आदर्श कर्मचारी बनतो, तो उद्या यशस्वी उद्योजक बनतो. कंपनी म्हणजे काय आणि कामाचा अनुभव म्हणजे काय?

**आत्मविश्वास कसा येतो?**

आत्मविश्वास ही दिसणारी गोष्ट नाही. ही आपल्या मनातली अदृश्य शक्ती असते. पहेलवान रोज व्यायाम करतो, वजनी ढदूके किंवा डंबेल्य उचलतो. एका बाजूला पृथ्वीचे गुरूत्वाकर्षण आणि त्याविरूद्ध दिशेने पहेलवानाचे विरूद्ध दिशेने वजनदार डंबेल्स उचलणे! आखाड्यातले वजनी मुदगल शरीराभोवताल फिरवीत असतो. पहेलवान रोज नियमीतपणे रोज असा सराव करतो. पहेलवानाची शारीरिक ताकद त्यामुळे वाढते तो शारीरिकदृष्ट्या बलवान बनतो तसेच आत्मविश्वास ही एक मानसिक ताकद आहे. मानसिक वैचारिक उद्योगधंदा कंपनीमध्ये कोण्या एका ध्येयाने उद्देशाने सर्व लोक काम करत असतात. प्रत्येकाला होमवर्क आणि त्यांचे टारगेट ठरवून दिलेले असतात. हे काम आपल्याला दिलेल्या प्रोसिजर नुसार करायचे असतात. समजा काम कसे पूर्ण करायचे याचे मार्गदर्शन सल्ले, तुम्हाला बॉसने सांगितले नसतील तर आपल्या मालकाच्या परवानगीने तुम्हाला तुमच्या पद्धतीने पूर्ण करायचे असतात. मन झोकून देणे म्हणजे काय? सहसा आपण शांतपणे जरी एका ठिकाणी बसलो असलोतरी आपल्या मनात सतराशे साठ विचार चालू असतात. कधी मन इथे तर कधी दुसऱ्या गावी. कधी स्वतःचा विचार तर कधी येणाऱ्या होणाऱ्या प्रेयसीचा बायकोचा विचार! तर कधी अख्ख्या दुनियेचा विचार! विचार करा एक मोठा

हादसा झाला. तुमच्या एखाद्या, तुमच्यावर जीव ओतणाऱ्या शेजारी असलेल्या, रोज भेटणाऱ्या तरूण मित्राचा अपघात झाला आणि तो मरण पावला. तुम्हाला अचानक ही बातमी कानावर आढळली काय होईल तुम्हाला? तुम्ही सून्न व्हाल, तुमचे पूर्ण पाचही इंद्रीय, पूर्ण तुमच्या शरीरातल्या पेशी तुमच्या मेंदू, मेंदूतल्या एकूण एक पेशी एकाच विचाराने सून्न होतील? तुमच्या डोक्यातले आधी चालू असलेले सतराशे साठ विचार गायब होतील? तुमच्या श्वासाचा वेग बदलेल आणि मित्राचे विचार तुमच्या डोक्यात घूसतील. या ठिकाणी मी उदाहरण चूकीचे दिले पण 'मन झोकून देणे' याचे ढोबळ मानाने पुष्टी करण्याचा प्रयत्न करीत आहे. तुम्ही एखादे काम मन झोकून ठेऊन काम करता म्हणजे त्या कामाव्यतीरिक्त तुम्हांला दुसरे काहीही दिसत नाही. तुमचे सर्व शरीर, पेशी, मेंदू, त्या दिशेने काम करीत असतात. कंपनीत काम करतांना आपल्याला समोर दिलेले काम मन लाऊन करणे पूर्ण कामावर मन केंद्रीत करणे खूप आवश्यक असते. अशी भरपूर कामे, कामे छोटी असो की मोठी आपल्याला स्वतःहून पुढाकार घेऊन, जसे मालकाला/मॅनेजरला पाहिजे तसे करून देण्याचा पूर्ण प्रयत्न करायचा. मी आधी पहेलवानाची गोष्टी सांगितली. जसे पहेलवान गुरूत्वाकर्षणाच्या विरूद्ध जाऊन व्यायाम करतो; तसे आपले बाकी स्वतःचे विचार अडचणी बाजूला ठेऊन स्वतःच्या विचाराविरूद्ध जाऊन ताकद ओतून काम करायचे. असे एकदा होईल, दोनदा होईल, रोज रोज होईल आणि आपण मानसिकरित्या रोज ताकदवर होतो आणि त्याची परिणिती काही वर्षानंतर प्रचंड आत्मविश्वासात होते! ही एक शिस्तबद्ध आणि न दिसणारी प्रक्रिया आहे हा पोकळ भावनात्मक आत्मविश्वास नाही, जो रोज सकाळी बनतो आणि संध्याकाळपर्यंत किंवा काही दिवसात गूल होतो!

मी पंधरा वर्षेपेक्षा जास्त काम केले, खाजगी कंपनीत दुसऱ्यांच्या हाताखाली. त्यापैकी १० वर्षे अमेरिकेत काम केले. त्या दहा वर्षांपैकी ७ वर्षे ऑरॅकल सारख्या मोठ्या आयटी कंपनीत काम केले. कामाचे स्वरूप, त्यातील छोट्या प्रोजेक्ट्स मधील विभागणी, त्या प्रोजेक्ट्स मधील छोट्या–छोट्या कामासाठी होणारी लहान लहान सूक्ष्म कृतीमध्ये विभागणी, काम हे प्रत्येक ठिकाणी सारखे असते, तसे म्हटले तर तुम्ही हसाल. पितळ म्हणा किंवा सोने तुम्ही सूक्ष्म रूपात बघायला गेले तर तो अणूचा बनला असतो, अणूमध्ये इलेक्ट्रान, पोट्रान, न्युट्रान भरलेले असतात. तसेच काम छोटे असो की मोठे, अमेरिकेत नावाजलेल्या कंपनीत असो की लहानशा स्टार्टअप कंपनीत, लहान प्रोजेक्ट असो की मोठा



प्रोजेक्ट, खूप पगार असलेला असो किंवा क्षुल्लक पगार असो, कामाचे स्वरूप अणूचा पातळीवर सारखेच असते. प्रत्येक मोठी नावाजलेले कंपनी सुरवातीला स्टार्टअप असते, एकाच माणसाने सुरू केलेली असते. जगात प्रत्येकास दोन हात, दोन पाय आणि एक मेंदू आहे, सर्वजन सारखेच! हे सर्व वस्तुस्थिती लक्षात घेऊन कामाबद्दल मन ओतने आवश्यक आहे. मला असेच काम मिळाले, तसेच मिळाले म्हणून कुरकूर नको!

बऱ्याच ठिकाणी दोन वर्षाचा कमीत कमी कामाचा अनुभव मागतात. जसे आधी सांगितल्याप्रमाणे कामाचे स्वरूप अणू स्वरूपात किंवा सूक्ष्म रूपात बघितले असता प्रत्येक ठिकाणी, प्रत्येक कंपनीत सारखेच असते. कामाचा अनुभव आल्यानंतर सर्वात मोठी गोष्ट म्हणजे बदलली असते मानसिकता, आत्मविश्वास! मुलाखत घेताना किंवा देताना पहिल्या टप्प्यात बघितली जाते ती काम करण्याची क्षमता! जो वर्ग यशस्वीपणे नोकरी करीत आहे, ज्या नोकरदार वर्गामध्ये प्रचंड आत्मविश्वास असतो त्यांना मॅनेजर कंपनीचे मालक उलट घाबरत असतात, त्यांना कंपनीत चिकटून ठेवण्याचा प्रयत्न करतात. अश्या नोकरदारांना मनाचाही पगाार मिळत असतो. कंपनी या इंग्रजी शब्दाचा अर्थ आहे, सहवास. माणूस जन्म झाल्यानंतर एक तर उपजत हुशार असतो, किंवा सहवासातून हुशार बनतो. आपला मुलगा चांगल्या संगतीत म्हणजेच सहवासात असावा म्हणून प्रत्येक पालक प्रयत्न करतो. चांगल्या संगतीत म्हणजे हुशार मित्र, चांगले हुशार शिक्षक वर्ग, त्यात चांगले हुशार पालक म्हणजे आई–वडील हे सुद्धा सर्वात जास्त महत्वाचे! आई–वडील चांगले हुशार शिकलेले विद्वान असतील आणि त्यांच्या व्यक्तीगत मार्ग दर्शनाखाली वाढले असाल तर गोष्टी वेगळीच! वरून तुमच्या वडीलांचा स्वतःचा मोठा उद्योगधंदा असेल आणि तो उद्योगधंदा तुम्ही जवळून अनुभवला असेल तर सोने पे सुहागा! अशा भाग्यवान माणसाला नोकरी म्हणजे काय हे कळलेले असते. संगतीतून/सहवासातून आपण कसे शिकतो? जो नोकरी देतो, जो आपल्याला पगार देऊ शकतो तो आपल्यापेक्षा प्रत्यक्ष अप्रत्यक्ष आपल्यापेक्षा तुलनात्मक सध्याच्या घडीला चांगला हुशार आहे, ही गोष्ट नेहमी लक्षात घ्यावी. तो माणूस वयाचे लहान असेल त्यांचे शालेय शिक्षण तुमच्या पेक्षा कमी असेल हे गौण मुद्दे आहेत. समोरचा व्यक्ती मोठ्या पदावर आहे तितके पूरे! त्यांच्या संगतीचा सहवासाचा तुम्हाला फायदा घ्यायचा असतो. संगतीतून आपण प्रत्यक्ष अप्रत्यक्ष कसा शिकतो हे समजणे महत्वाचे असते. तुम्ही हसाल पण साध्या शब्दात सांगायचे म्हणजे आपल्याला अशा मालक/मॅनेजरवर पूर्ण विश्वास

टाकायचा असतो. जसा आपल्या आवडत्या देवाचे आपण आदर्श भक्त बनतो, त्याची पूजा अर्चा करतो, पूर्ण मन ओतून विलीन व्हायचा प्रयत्न करतो तसेच आपण आपल्या मालक मॅनेजरमध्ये पूर्ण विश्वास टाकायचा असतो, त्यांनी सांगितलेली प्रत्येक गोष्ट काटेकोरपणे करायचा प्रयत्न करायचा. तेव्हा आपण प्रत्यक्ष अप्रत्यक्ष त्यांच्याकडे असलेल्या काम करण्याची धाडसी वृत्ती, त्यांची अडचणी सोडविण्याच्या पद्धती, त्यांची इंतरांकडून, कस्टमर कडून, ज्यांचा तो कस्टमर आहे, त्याचेकडून काम करवून घेण्याचा, करण्याच्या पद्धती, त्यांची काम करण्यासाठी लागणाऱ्या बोलण्याची पद्धती, त्यांचेकडे असलेले ज्ञान, अडचणी सोडविण्याच्या पद्धती, निर्णय घेण्याची क्षमता, काम उरकविण्याची क्षमता, त्यांचे प्लानिंगची वृत्ती, त्यांची तडजोड करण्याचा क्षमता, संघटीतपणे काम करण्याची वृत्ती, काम यशस्वीपणे पूर्ण करण्याची क्षमता, काम पूर्ण तडीस नेण्यासाठी लागणाऱ्या युक्त्या असे यशाकडे नेणारे मार्ग आत्मसात होतात. फक्त एका माणसाकडून नाही तर पूर्ण टिममधून आपा भरपूर प्रत्यक्ष अप्रत्यक्ष शिकतो. मालकाची क्षुल्लक किंवा व्यक्तीगत कामे असतील तरी मन लाऊन करायचे.

(दि. २६ सप्टेंबर २०१३, अभयराज्य)



# ६. सोन्याच्या दागिण्यात गुंतवणूक! देशासाठी धोक्याची घंटा?




सोन्याचा रेट भरमसाट वाढतोय. भारतीय लोकांना २४ कॅरेट सोन्याचे वेड आहे. असेच वेड जगभर आहे असे नाही. पैसा बँकेत ठेवण्यापेक्षा सोन्याचे दागिने घेऊन गुंतवणूक करणे भारतीयांना व्यवहार्य वाटते. पुरातन काळापासून सुवर्णमुद्राचा उल्लेख रामायण महाभारत दंतकथेमध्ये आढळतो. सर्व जगभर सोने मौल्यवान धातू म्हणून ओळखली जाते. ज्यांच्याकडे सोन्याचे दागिने असतात अशा गृहीणी माझ्याकडे इतके सोने आहे तितके सोने, म्हणून मिरवत असतात. अमेरिका किंवा पाश्चिमात्य देशात भारतीय लोकांइतके २२ किंवा २४ कॅरेट सोन्यावर नक्षीदार कलाकृती करता येतात. शुद्ध स्वरूपातील सोने मऊ असते. त्यात कठीण प्रकारचे धातू मिसळून १२–१४ कॅरेटचे सोने बनविले जाते. जास्त करून अमेरिकन दुकानांमध्ये १२–१४ कॅरेटचे दागीने आढळतात. स्त्रिया या दागीन्यांना अलंकार म्हणून वापरतात. पण या दागीन्यांना रिसेल व्यालू मिळत नाही. हे सोन्याचे अलंकार गुंतवणूक म्हणून समजण्यात येत नाही.

ब्रिटेन अमेरिकासारखे देश हे व्यापार करण्यात हुशार आहेत. व्यापारासाठी आलेल्या इंग्रजांनी पुढे जाऊन भारतातवर राज्य केले ही बाब अजूनही ताजी आहे. अमेरिकेची अर्थव्यवस्था कर्जावर आधारित आहे अमेरिकेतील प्रत्येक नागरिकावर अंदाजे साठ हजार डॉलर कर्ज आहे. प्रत्येक कुटुंबाची मिळकत चौपन हजार डॉलर आणि दरडोई कर्ज साठ हजार डॉलर! डॉलरचा रेट साठ रुपये पकडला तर ३६ लक्ष रुपये! वरून अमेरिका आपण या जगात दादा आहोत हे दाखवून देतो. कधी इतरावर हल्ला, कधी कोरियात हस्तक्षेप, कधी

व्हिएतनाममध्ये! गावातला एखादा गुंड आपली दादागिरी करून गावातल्या फौजदारी आणि आर्थिक व्यवहारात हस्तक्षेप करावा तसे! काही वर्षापूर्वी पाकिस्तानात घुसून त्यांनी बिन लादेनचा खात्मा केला. एक देश म्हणून सर्व नागरिक, त्याची शासकीय यंत्रणा, त्यांचे राजकारणी एकरूप होऊन कोणतेही काम एक्झीक्यूट करतात. सामान्य लोकांपासून व्हीआयपी पर्यंत सर्व स्तरांमध्ये समरसता सामंजस्य असल्याने अमेरिका खरोखरच बलवान आहे.अमेरिका नावाचा बुद्धीमान गुंड स्वतःच्या स्वार्थासाठी काय लबाडी करेल याचा नेम नाही. अमेरिकन नागरिकांचे मूळ हे ब्रिटनमध्ये आहे. ब्रिटीशांचे पूर्वज अमेरिकेत गेलेत त्यांनी तिथे वसाहती बनविल्यात आणि पुढे जाऊन या वसाहती ब्रिटीशांपासून अलग झाल्यात आणि त्यातून आजच्या माडर्न अमेरिकेचा जन्म झाला.

सोन्याचे जगातले सर्वात मोठे उत्पादक देश क्रमवारीने २०१२ च्या गुणवत्तेनुसार चीन ३७० मे.टन, ऑस्ट्रेलिया २५० मे.टन, अमेरिका २३० मे.टन, रशिया २०५ मे.टन, साउथ आफ्रिका १७० मे.टन! भारताचा क्रम ५०वा वगैरे असतो. सरासरी अडीच मे.टन सोन्याची दरवर्षी निर्मिती होते.

| क्र. | देश | सोने उत्पादन मे. टन |
|---|---|---|
| १ | चीन | ३७० |
| २ | ऑस्ट्रेलिया | २५० |
| ३ | युनाईटेड स्टेट | २३० |
| ४ | रशिया | २०५ |
| ५ | साऊथ आफ्रिका | १७० |
| ६ | पेरू | १६५ |
| ७ | कॅनडा | १०२ |

भारतातील छोट्या मोठ्या सर्व कुटुंबांमध्ये कमी अधिक प्रमाणात सोने किंवा सोन्याचे दागीने आहेत. सोन्याच्या स्वरूपात घराघरात संपत्ती जमा करून ठेवली जाते. कोणी बाहेर उघडपणे सांगतात तर कोणी बाहेर पता लागू देत नाही. हे सर्व सोने एकत्र केले तर भारतही खूप श्रीमंत देश असण्याची शक्यता आहे.

भारतीय लोक देऊळ, धार्मिक कार्यक्रमात एकत्र येतात. त्यात त्यांचा सांघिकपणा जबरदस्त असतो. प्रत्येक जा स्वतःहून आपली जबाबदारी हिरहिरीने



पार पाडतो आणि धार्मिक कार्यक्रम यशस्वी करतात. हेच भारतीय लोक आर्थिक उलाढाल असलेल्या प्रोजेक्टसाठी, उद्योगधंद्यासाठी एकत्र येत नाहीत. उद्योगधंदा यशस्वी होईल याची शाश्वती नसल्याने सोन्याच्या स्वरूपात आपली मिळकत जमा करून ठेवतात. या भारतीय मनोवृत्ती आणि परिस्थितीचा फायदा पाश्चिमात्य आणि अमेरिकेतील देश घेऊ शकतात.

मोठ्या बाजारपेठेतले काही निवडक मोठे व्यापारी बाजारपेठेत आलेल्या मालाचे रेट ठरवितात पण ते सामान्य व्यापाऱ्याचे किंवा लोकांच्या लक्षात येत नाही. छोट्या गावात कोणत्या व्यापाऱ्याने आपल्याकडे साठा करून ठेवला आणि त्या धान्याचा रेट वाढविला हे सामान्य माणसांना लक्षात येते. जागतिक बाजारपेठेत जिथे आर्थिक समीकरण अॅनॅलिसीस सामान्य लोकांच्या समजण्यापलीकडे असते. तिथे अमेरिकन किंवा पाश्चिमात्य देश किंवा चीन आपली पोळी सहज भाजू शकतात. छोट्या मार्केटात मालाचे भाव कमी किंवा जासत करणे हे कळत नकळत प्रत्यक्ष अप्रत्यक्ष काही मोठ्या ठराविक व्यापाऱ्याच्या हाती असते. तसेच जगातले श्रीमंत देश ज्यात अमेरिका वा पाश्चिमात्य देशांचा समावेश आहेत, ते सोन्याच्या भावाचे व्यवस्थापन करू शकतात.

आज जगातल्या सर्व देशातले चलनाचे, पैशाचे दर हे सोन्याच्या दराला अनुसरुन कमी आणि जास्त होतात. उद्या हे मोठे व्यापारी देश चलनाचे दर आणि सोन्याचा भाव विभक्त करू शकतात. आज प्रत्येक देशाचे चलनाचे दर सोन्याच्या भावावरून ठरतात. किंवा सोन्याचे भाव चलनाच्या रेटवरून ठरतात. उद्याही असेच राहील असे नाही.

अमेरिका असा देश आहे जर एखाद्या खेळाचा सामना आपण हारताना दिसत असून तर खेळाचे नियम बदलून स्वतःचा तोटा होऊ देणार नाही. दुसरा डूबला तरी चालेल.

सोन्याची मागणी भारतात जास्त आहे. भारतीयांना सोन्याचे वेड आहे. हे या पाश्चिमात्य देशांना माहीत आहे. त्यांच्याकडील सोने सुद्धा आपल्याकडे पाठवतील आणि उद्या सोन्याचे रेट कमी करून टाकतील. भारतीय राज्यकर्त्यांची दिशाभूल करण्यात हे मोठे व्यापारी देश वस्ताद आहेत.

परत वरून दाखविण्याचे दात या लोकांचे वेगळे! जीडीपी, इंडेक्स, प्राबेलीटी, डिमांड, सप्लाय, अॅनॅलिसीस, सीपीआय, स्टॉक असे मोठमोठ्या

गणिताच्या स्टेप्स लिहून दाखवित आणि सांगतील हे असं होत म्हणून ते तसं झालं. आणि त्यात फसतील आमचे भारतीय. जे घराघरात सोन्याच्या स्वरूपात आपली संपत्ती लपवून ठेवतात. चीन हा सोन्याच्या दागिण्यांचा मोठा उपभोक्ता दिसतो पण ते बहुतेक दागीने हे निर्यातीकरिता करीत असावा. तसेच चीनमध्ये सोन्याचे उत्पादन पहिल्या क्रमांकाचे असल्याने चीनला फरक पडणार नाही. चीन स्वतःची प्रत्येक वस्तू जगभरात विकत आहे. त्यामागे सुवर्णअलंकार सुद्धा येतात. भारत जगातील सुवर्णअलंकार उपभोक्त्यापैकी १/३ भाग उपभोगत आहे. हे धोकादायक आहे. दिलेल्या तक्त्यामध्ये आकडे हे अधिकृत आहेत पण भारतात यापेक्षाही कितीतरी जास्त सोने वापरात येत असावे. गल्लीपासून दिल्लीपर्यंतच्या प्रत्येक भारतीय नागरिकाला आपल्या स्वतःच्या कामाचे, मानसिकतेचे आपआपसातील वागणूकीचे, मेहनतीचे सांघिक वृत्तीचे, काम करण्याच्या वृत्तीचे, जबाबदारीचे हुशारीचे व्यवस्थापन करणे अती आवश्यक आहे. गृहीणींनी विनाकारण सोन्याचे अलंकार विकत घेण्याचा पिच्छा पुरवू नये आणि बुवांनीसुद्धा मागणी मान्य करू नये आणि स्वतःही घेऊ नये तेव्हाच उद्या भाकीत असलेली नामुष्की टाळण्यात मदत होईल! १९२५ पर्यंत सोन्याच्या भावाबद्दल पुरेशी माहिती मिळत नाही. पण आतापर्यंत जे दर दिसतात ते नियमीत बाजारभावाने दिसतात. तक्ता दिला आहे.

**सर्वात जास्त सोने वापरणारे ग्राहक देश**

| क्र. | देश | २००९ | २०१० | २०११ | २०१२ |
|---|---|---|---|---|---|
| १ | भारत | ४४२.३७ | ७४५.७० | ९८६.३ | ८६४.० |
| २ | चीन | ३७६.९६ | ४२८.०० | ९२१.५ | ८१७.५ |
| ३ | युनाईटेड स्टेट | १५०.२८ | १२८.६१ | १९९.५ | १६१.० |
| ४ | टुरकी | ७५.१६ | ७४.०७ | १४३ | ११८.० |
| ५ | सौदी अरेबिया | ७७.७५ | ७२.९५ | ६९.१ | ५८.५ |
| ६ | रशिया | ६०.१२ | ६७.५० | ७६.७ | ८१.९ |
| ७ | युनाईटेड अरब इमिरेट | ६७.६० | ६३.३७ | ६०.९ | ५८.१ |
| | एकूण (जगात) | १७६०.३ | २०५९.६ | ३४८७.५ | ३१६३.६ |



Gold Prices in India from 1925 - 2011 (per 10 gm)

| Year | Price | Year | Price | Year | Price | Year | Price | Year | Price |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1925 | 18.75 | 1943 | 51.05 | 1961 | 119.35 | 1979 | 937 | 1997 | 4725 |
| 1926 | 18.43 | 1944 | 52.93 | 1962 | 119.75 | 1980 | 1330 | 1998 | 4045 |
| 1927 | 18.37 | 1945 | 62 | 1963 | 97 | 1981 | 1800 | 1999 | 4234 |
| 1928 | 18.37 | 1946 | 83.87 | 1964 | 63.25 | 1982 | 1645 | 2000 | 4400 |
| 1929 | 18.43 | 1947 | 88.62 | 1965 | 71.75 | 1983 | 1800 | 2001 | 4300 |
| 1930 | 18.05 | 1948 | 95.87 | 1966 | 83.75 | 1984 | 1970 | 2002 | 4990 |
| 1931 | 18.18 | 1949 | 94.17 | 1967 | 102.5 | 1985 | 2130 | 2003 | 5600 |
| 1932 | 23.06 | 1950 | 99.18 | 1968 | 162 | 1986 | 2140 | 2004 | 5850 |
| 1933 | 24.05 | 1951 | 98.05 | 1969 | 176 | 1987 | 2570 | 2005 | 7000 |
| 1934 | 28.81 | 1952 | 76.81 | 1970 | 184.5 | 1988 | 3130 | 2006 | 8400 |
| 1935 | 30.81 | 1953 | 73.06 | 1971 | 193 | 1989 | 3140 | 2007 | 10800 |
| 1936 | 29.81 | 1954 | 77.75 | 1972 | 202 | 1990 | 3200 | 2008 | 12500 |
| 1937 | 30.18 | 1955 | 79.18 | 1973 | 278.5 | 1991 | 3466 | 2009 | 14500 |
| 1938 | 19.93 | 1956 | 90.81 | 1974 | 506 | 1992 | 4334 | 2010 | 18500 |
| 1939 | 31.74 | 1957 | 90.62 | 1975 | 540 | 1993 | 4140 | 2011 | 26400 |
| 1940 | 36.04 | 1958 | 95.38 | 1976 | 432 | 1994 | 4598 | jagoinvestor.com | |
| 1941 | 37.43 | 1959 | 102.56 | 1977 | 486 | 1995 | 4680 | | |
| 1942 | 33.05 | 1960 | 111.87 | 1978 | 685 | 1996 | 5160 | | |

(दि. १७ ऑक्टोबर २०१३, अभयराज्य)

# १. कोंबड्यांच्या झुंजी कधी सुरु होतील?

भारतातील भारतीय कायदे बनविणाऱ्यांना स्वतःची अक्कल आहे की नाही हा मोठा प्रश्न आहे. ग्रामीण जनतेचा विचार त्यांच्या आवडी निवडी, त्यांचे शौक कसे किल होतील यासाठीच हे प्रयत्नरत असावेत. दोन चार वर्ग शिकले कागदी डिगऱ्या नाचविल्या, स्वतःला अधिकार पद मिळाले आणि ग्रामीण जनतेची गळचेपी करणे चालू केले. भारतीय शासन व्यवस्थेला स्वतःचे निर्णय घेण्याची क्षमता आहे की नाही, हा ही प्रश्न अनुत्तरितच राहतो. आपण काहीतरी करतोय हे दाखविणाऱ्यासाठी इंग्रजी कायद्यांची मानसिकतेची कॉपी करणे हा धंदा शासकीय सल्लागारांनी, मीडियावाल्यांनी उचललेला आहे.

**जिद्दी कोंबडा**

कोंबडा हा अतिशय जिद्दी पक्षी आहे. देवाने नैसर्गिकरित्याच, उपजतच जिद्द त्याच्या घडणीत टाकलेली आहे. एकदा का झगडण्याचे आव्हान घेतले की बाकी जग विसरुन जातो. कोंबड्यापासून शिकण्यासारखे खूप काही आहे. झगडण्याला सुरवात झाली, झगडून विरोधी कोंबड्याला हरविणे हेच त्याचे ध्येय. एकदम मन लावून एकाग्रतेने लढाई करणे हा स्वभाव एखाद्या हुशार विद्यार्थ्याला लाजवून सोडतो. हातपाय तुटले, जखमी झाला, मुंडीही तुटली तरी शत्रूवर जाऊन पडायचे आणि जिंकण्यासाठी प्रयत्न करायचे ही त्याची युद्धाची कला. सीमेवर लढून वीरचक्र मिळविणारे सैनिकही कोंबड्याच्या जिद्दी समोर फिके पडायचे.

भारतीयांनी कोंबड्याचा गॉड गिफ्टेड जिद्दी स्वभाव बघून कोंबडा शर्यतीसारखे ग्रामीण मनोरंजनाचे खेळ चालू केले. चांगल्या नसलचे कोंबडे विकत घ्यायचे, पाळायचे, छान काळजी घ्यायची आणि कोंबड्याच्या शर्यतीत भाग घ्यावयाचा कोंबड्या पाळण्याचा व्यवसायही त्या काळात ग्रामीण जनतेत फोफावला होता. लहानपणी विद्यार्थ्यांनाही खूप खूप उत्सुकता असायची, वर्गात चर्चा रंगायच्या, कोंबडा शर्यतीची मजा काही औरच असायची. इंग्रजांनी भारतावर जो दिडशे वर्ष वैचारिक बलत्कार केला त्यात स्वातंत्र्यानंतरही पिढीही इंग्रजमय होऊन गेली. कागदी डिग्री नाचविणाऱ्यांना ग्रामीण जनतेचे मनोरंजनाची साधणे, बैलांच्या शर्यती, कोंबड्यांच्या शर्यती रानटी वाटायला लागल्या. या



इंग्रजमय झालेल्या, कायदे बनविणाऱ्या, अधिकाऱ्यांना, राज्यकर्त्यांच्या मुलांना, उचकविणाऱ्या मीडियावाल्यांना कसले घानेरडे शौक आहेत विचारू नका. पंतप्रधान मोदींनी तर अख्ख्या एक मन की बात कार्यक्रम चरस गांजा मादक द्रव्य पिण्यापासून परावृत्त करण्यासाठी ठेवावा लागला. याचा अर्थ पंतप्रधान मोदी यांच्या अवती भोवती जो अधिकारी, इतर मोठे मोठे प्रतिष्ठित उठाबैठक करतात, त्यांच्या मुलांना चरस, गांजा सारख्या मादक द्रव्य खाण्यापिण्याचा शौक आहे. पण हेच लोक जे कायदे बनविण्यात सहभागी आहेत, ग्रामीण जनतेचे मनोरंजनाचे खेळ बैलांच्या शर्यती, कोंबड्याच्या शर्यतीवर बंदी आणतात. ग्रामीण लोकांना त्यांचे आयुष्य जगू द्यायला या राज्यकर्त्यांना त्रास होत असावा.

**शर्यतीतील कोंबड्यांना मिळते वीर मरण**

जे कोंबडे शर्यतीत मरण पावतात त्यांना वीर मरण येते असे म्हणायला हरकत नाही. जे प्राणीप्रेमी आहेत त्यांनी उगाच बाऊ करु नये. जेव्हा चिकनच्या दुकानात जातात तेव्हा कोंबडा कसा फडफडतो हे प्राणीप्रेमी लोकांना दिसत नाही. पण शर्यतीत कोंबड्यांना येणारे मरण हे क्रौर्य वाटते. जे बिचारे कोंबडे चिकन वाल्याच्या दुकानात तडफडून फडफडून मरतात ते म्हणजे भ्याड मरण. श्रीमंत शहरी लोकांना शेअर मार्केटचा शौक आहे. लाखो करोडो हारतात जिंकतात मग ग्रामीण जनतेने थोडासा जुगार कोंबडा शर्यतीवर खेळला तर कोणाला काय फरक पडतो? या भारतात ग्रामीण जनतेचा कोणी विचार करतच नाही. उलट सरकारने कोंबडा शर्यतींना प्रोत्साहन द्यायला पाहिजे. शहरी लोक, श्रीमंत पैसावाल्यांनी स्वतःचा पैसा गुंतवून कोंबडा शर्यतीचे व्यवसायीकरण, व्यापारीकरण करायला पाहिजे. मग ग्रामीण जनतेलाही गावठी कोंबडे पाळण्यास प्रोत्साहन मिळेल. दोन पैसे त्यांनाही मिळतील. आपण इंग्रजी खेळ शौक खेळण्यापेक्षा, भारतीय खेळांचा शौक गोऱ्या लोकांना कसा लागेल असा उलट्या प्रवाहाचा विचार व्हायला पाहिजे.

# २. बालगोविंदावर बंदी!
# श्रीकृष्णाच्या बालसवंगड्यावर अन्याय?

आपला देश भारत आहे, आपण भारतात राहतो हे सांगण्याची पाळी भारतीयांना यावी असे आपल्या भारतात घडत आहे. मुंबईमध्ये दहीहांडी उत्सव साजरा केला जातो, गोविंदाची पथके थरावरती थर रचून दहीहांडी फोडतात. हा दहीहांडी उत्सव भारतात का साजरा केला जातो? हा काही परदेशातला खेळ आहे का? हा दहीहांडी खेळ परदेशातून आपल्या देशात आला आहे की बालहक्क संरक्षण आयोगाची संकल्पना पदेशातून भारतात आली आहे? भगवान श्रीकृष्ण भारतात होऊन गेलेत, ते पदेशातून आले नव्हते, ते भारतातच जन्मले, कर्मभूमिही भारतच! दहीहांडीची आयडीया भारतातच जन्मली. बालहक्क संरक्षण आयोगाच्या आयडीयाचा जन्म हा परदेशात झाला. आमच्या सरकारच्या सल्लागारांना कामधाम नसल्यामुळे बाल हक्क संरक्षण आयोग व त्याची संकल्पना परदेशातून चोरून भारतात आणली.

**पहिले क्रिकेटवर बंदी आणा!**

क्रिकेट हा इंग्रजांचा खेळ. या खेळात जो चेंडू वापरला जातो तो चांगलाच जड असतो. क्रिकेटचा चेंडू जेव्हा शरीराच्या भागावर आपटतो तेव्हा तीव्र वेदना होतात. चेंडूचा आकार २२५ मिमी. आणि वजन १६० ग्रॅम! आठवा तुम्ही, कसा जबरदस्त मुका मार बसतो या क्रिकेटच्या चेंडूमुळे! फक्त रक्त तेवढा बाहेर येत नाही! कितीतरी उदाहरण तुम्हाला मिळतील. लहानपणी आम्ही क्रिकेट खेळतांना एकदा बॉल खूप उंच उडाला तो एका मुलाच्या जो मैदानाबाहेर होता, त्याच्या डोक्यावर पडला. त्यावेळेस त्या मुलाला काही झाले नाही पण दहा वर्षानंतर तो मुलगा मरण पावला. क्रिकेट खेळतांना फ्रॅक्चर होतात, उतरत्या वयात वा म्हातारपणात त्याचे अप्रत्यक्षपणे प्राणांतिक परिणाम भोगावे लागतात. मग या बाल संरक्षण आयोगाला, सरकारच्या सल्लागारांना, सरकारच्या क्रिकेट आणि क्रिकेटचा चेंडू मोठा प्यारा कारण तो इंग्रजांचा खेळ आहे म्हणून! कधी मुंबईच्या शिवाजी पार्कमधून आरपार मैदानातून शार्टकट मार्गाने जातो म्हटले तर भीतीच वाटते. इतके लोक क्रिकेट खेळतात तर भीतीच की कुठून चेंडू येईल आणि



टाळक्यावर आपटेल याचा नेमच नसतो. आमच्यातलीच ही मनोवृत्ती आहे, बाळासाहेबांना जिथे दिला ती दोन बाय सहा फुटाची जागा सोडता आली नाही. पण इंग्रजांच्या क्रिकेटचा नंगा नाच चालवायला अख्ख मैदान देवून टाकले. परदेशी मनोवृत्तीचा उदो उदो आणि भारतात भारतीय मनोवृत्तीचे काही अस्तित्वच नाही!

भारताच्या इतिहासात जेव्हा कधी आवश्यकता पडली तेव्हा बाळगोपाळही पुढे सरसावले आहेत. हे बाळगोपाळ, बालगोविंद भगवान श्रीकृष्णाचे बालपणीचे सवंगडी आहेत. देवा श्रीकृष्णा, हे तुझ्या बालसवंगड्याचे ऐकून घेतले जात नाही? समाज जर पालक, जे मुलांना सांभाळ करतात, पोटतिडकीने स्वतःच्या मुलांसाठी जगतात त्यांना काही अडचण नसेल तर आयोगवाल्यांना चुकीचे आदेश काढण्याची गरज काय? बालगोविंदाचे आईवडील, गोविंदाचे पथक यांना पहिले विश्वासात घ्या! पाश्चीमात्य पालक स्वतःच्या ऐशीसाठी नवीन नवीन लग्न करतात, मुलांकडे दुर्लक्ष होते. त्यामुळे बालसुरक्षा कायदा त्यांचेसाठी आहे. भारतीय पालक मुलाबाळांचा अभिन्न अंग बनतो. स्वतःच कमी पण मुलाबाळांची जास्त चिंता असते त्यामुळे पहिले पालकांना विश्वासात घेणे आवश्यक आहे.

**आयोगाच्या संकल्पना, पाश्चात्यांचे अंधानुकरण!**

पाश्चीमात्य लोकांनी त्यांच्या देशात काही युक्ती काढली की सरकारचे सल्लागार लोकही त्यांच्या युक्त्या भारतात थोडासा बदल करून भारतात अमलात आणतात. आमचे भारतीयांचे भारतीयत्वाचे काही अस्तित्व नसल्यासारखे! त्यांचे कायदे त्यांच्यासाठी ठीक आहेत! भारत देशात त्यांची सिस्टम काम देवू शकत नाही! हा विषय वेगळा! पण सखोल, ग्रॅम्यूलर, डिटेल अभ्यास करुन त्याची रुपरेषा ठरविता येईल. इतके लोक रोडवर अपघाताने मरतात, साप डसून शेतकरी मरतात, वाघ बिबट गरीब शेतकऱ्यांना मारतात, तिथे हे आयोगवाले काय करतात? आपली लोकशाही यंत्रणा कितपत यशस्वी आहे? याचा अर्थ मुळीच नाही की नागरिकांची वा बालगोविंदाची काळजी घेतली जाऊ नये!

**उपाय**

कोणाला वाटते की गोविंदा जखमी व्हावेत, कोणता पालक याला परवानगी देईल? कोणत्या पथकाला वाटते की अपघात व्हावेत आणि जिवीतहानी व्हावी म्हणून? सहसा थरावर थर उभे करुन मनोरा उभा केला जातो. तेव्हा तो मनोरा

खचतो तेव्हा वरच्या थरांवरील गोविंदा घसरुन जमीनीवर आपटून जखमी होतात. एकदम खालच्या थराला उभ्या असलेल्या गोंविदा सभोवती दूरपर्यंत जाड शॉकप्रुफ, हवा भरलेले रबरी कारपेट चटाया अंथरल्याने मदत होऊ शकेल का? हेल्मेट रबरी चिलखत जॅकेट घातल्याने कितपत मदत होईल इत्यादी विविध उपायांवर चर्चा करून नियमावली पॉझिटीवली ठरविता येते. पण रस्त्यावर अपघात होतो म्हणून रस्त्यावर वाहन चालविणे बंद करा असा निर्णय कितपत योग्य?

बारा वर्षाखालील बालगोविंदाना दहीहांडीच्या थरावर चढविल्यास दहीहांडी उत्सव मंडळावर बालहक्क समितीने कायदेशीर करवाई करण्याचे निर्देश पोलीसांना दिले आहेत. हा एकतर्फी आणि चुकीचा निर्णय आहे.

(दि. ३१ जुलै २०१४, अभयराज्य)



# ३. शंकरपटावर बंदी! शेतकऱ्यांवर घोर अन्याय! शेतकरी विरोधी सरकार? अमेरिकेतील काऊबॉयचा रोडिओ

बालपणी खेडेगावात शेतीचा सिजन संपून उन्हाळा लागला की बैलांच्या स्पर्धा व्हायच्या. त्याला आम्ही गावठी भाषेत पट म्हणायचो. शुद्ध भाषेत त्याला शंकरपट म्हणतात म्हणून नंतर माहीत झाले. कालांतराने अमेरिकेत गेल्यावर शंकरपट वा जत्रा सारखे काही प्रकार तिथे असावेत म्हणून शोध घेतला. टेक्सासमध्ये असताना एक रोडीओ म्हणून प्रकार ऐकला गुराख्यांना अमेरिकेत कॉऊबॉय म्हणतात. रोडीओ स्पर्धेत धष्टपुष्ट सांडांना भूजाळवितात, घाबरवितात जो गुराखी एक हाताने दोर पकडून जास्त वेळ सांडाच्या पाठीवर टिकून राहील तो अव्वल. पाठीवर बसलेल्या गुराख्याला म्हणजे कॉऊबॉयला खाली पाडण्यासाठी जलद गतीने सांड बैल पाठच्या पायावर उभा होतो. जोरात घुमतो, लाथाडतो, तर पुढच्या पायावर उभा राहून ढूंगी पाठचे पाय हवेत फेकतो, मान शरीराचा झटक्याने आटापिता करून स्वतःला सोडविण्याचा प्रयत्न करतो. दुसऱ्या एका गुराख्याच्या स्पर्धेत घोड्यावर स्वार झालेला गुराखी दोराने बनविलेला फास पळत्या ढोराच्या गळ्यात पायात वा सिंगात टाकतो. पळपुट्या ढोराला घोड्यावर बसून दोराचा फास फेकून खाली पाडणे वा पकडणे. अमेरिकन लोक तसे हुशार, शौकीन खूप, आपल्या परंपरा ऐतिहासिक खेळ जोपासणारे एक नेवेडा राज्यात लॉस वेगास म्हणून शहर आहे, जगातले सर्वात सुंदर शहर, अमेरिकन श्रीमंतीचा अप्रतिम झगमगाट असलेले! आजूबाजूला पूर्ण वाळवंट, शेती वगैरे काही होत नाही. अशा लॉस वेगासमये जुगाराचे अड्डे चालतात. त्यावर त्यांची अर्थव्यवस्था चालते. दिसतं एक आणि असते एक. हुशारीने आपले काम करून घेण्यात पटाईत! त्यांनी सुरू केलेल्या लोकशाहीचा आम्ही भारतात ढिंढोरा पिटत असतो.

**ढोरांचे मटन खाणाऱ्यांनी बनवावे कायदे !**

आपला भारत देश दिवसेंदिवस अंधेर नगरी बनत चालला आहे, असे वाटते. पुरातन काळापासून सुरू असलेल्या ऐतिहासिक शंकरपटावर बंदी टाकल्याची बाब ाक्का देणारी आहे. खेड्यातील शेतकऱ्यांसाठी, विद्यार्थ्यांसाठी शंकरपट म्हणजे

करमणूकीचे साधन! खेड्यापाड्यातील नैराश्य संपविणारे! आमची मिडीया, लोकशाही प्रणाली इंग्रजी खेळांना प्रोत्साहन देते आणि आमचे पुरातन खेळ संपवायला वस्ताद निघाली आहे. गाईबैलांसाठी गरीब शेतकरी मानसिक आर्थिक त्रास सहन करतो. घरातल्या कुटुंबीयांसारखा काळजी घेतो. घरची गाय बैल मरण पावली तर घरावर सूतक कोसळल्यासारखे वाटते. आयबहीणी रडतात. ढोराचे मास खाणे म्हणजे आम्ही आमच्या नातेवाईकांना कापून त्यांचे मटण खातो असे वाटते. त्यामुळे ढोराचे मटण खाणे हे आमच्या कल्पनेच्या बाहेरचे आहे.

इंग्रजाळलेल्या मानसिकतेमुळे भारतात दुसरा वर्ग तयार झाला आहे. इंग्रजी विलायती नसलचे कुत्रे मांजरे पाळून त्यांच्यासाठी स्पेशल बेड, जेवणची व्यवस्था करुन लाखो रुपये खर्च करणारी. त्यापेक्षा एखादा गाय बैल पाळून त्याच्यावर खर्च करायला लाज वाटते. आमच्या गावठी गाई ज्यांना अनन्य साधारण महत्व आहे, जे आम्ही रासायनिक औषधी आणि सल्फेटच्या युगात विसरलो, त्यांची वंशावळ संपवून इतिहासजमा करण्याच्या मार्गावर आहोत. अप्रयत्क्षपणे आम्ही स्वतःच्याच जिवावर उठतो आहोत. ज्यांनी कोणी शंकरपटावर बंदी घालण्यासाठी याचिका दायर केली, त्यांची पार्श्वभूमी ढोराचे मटण खाणारी असावी याची दाट शक्यता आहे.

**राजकारण्यांनो, तुम्ही कुठे आहात ?**

महाराष्ट्र प्राणी कल्याण कायदा संनियंत्रण समितीने दिलेल्या जाहिरातीनुार घोडा बैल इत्यादी प्राण्यांच्या शर्यंतीमध्ये मुक्या प्राण्यांवर भयंकर अत्याचार होत आहेत. राजकारणी लोक या क्रूरतेला प्रोत्साहन देत आहेत. असा उल्लेख केलेला आहे. राजकारणी लोक म्हणजे आमदार, खासदार आणि तुमचे आमचे कार्यकर्ते! अर्धवट अभ्यास असलेल्या कधी शेण पोयटा उचलला नसेल, शेणाची किळस वाटते. अशा लोकांनी ज्यांनी शेती म्हणजे काय हे माहीत नसेल अशा लोकांनी बैल, गाय, घोडे, कोंबडे यांच्यावर अत्याचार म्हणजे काय हे शिकवावे? तळागळातील राजकारणी लोक म्हणजे शेतकरी आहेत हे राज्यकर्ते कसे विसरुन गेले? माननीय आमदार, खासदारांनो तुम्हाला तुमचे स्वतःचे निर्णय घेता येत नाही काय? या देशात जो मानसन्मान, पूजापाठ गाई बैलांना मिळतो तो कोणत्याही देशात मिळत नाही. पुज्यनीय शेतकरी बैलांचा छळ नाही तर प्रेम करतो याचे पुरावे द्यावे लागण्याची नामुस्की भारतीयांवर ओढवावी हे खरे भारताचे दुर्दैव आहे.



**देशद्रोही फितूर मानसिकता संपवा**

आपला बैल स्पर्धेत उतरण्याकरिता शेतकरी नवीन गोऱ्हांना दूध, लोण्याचे गोळे, बदाम, अंडी, कणकीचे उंडे खाऊ घालतो, योग्य निगा राखतो. वेळीच औषधोपचार, राहण्याच्या स्वच्छतेची उत्तम व्यवस्था करुन काळजी घेतो. शेतकऱ्यांना संशयाच्या कटघऱ्यात ठेवणारी मानसिकता कायमची संपवूनच टाकायला पाहिजे. भारताचा इतिहासच संपवायला निघालेली देशद्रोही, फितूर नमकहराम मानसिकता ठेचून काढणे अतीआवश्यक झाले आहे. गोरे लोक गुराख्यांच्या म्हणजे कॉऊबॉयच्या रोडीओ सारख्या शर्यतींना ज्यामध्ये गुरांवर अनन्वीत अत्याचार होतो; त्याला प्रोत्साहन देतात. घोड्यावर बसून पळत्या वासरांना फास टाकायच्या शर्यती घेतात. रोजच्या जेवणात ढोर कापून मटन एन्जॉय करणाऱ्या लोकांच्या छुप्या मानसिकतेने भारतीयांना अहिंसेचे धडे देण्याचा प्रकार आपल्या भारतभूमीत घडत आहे.

**शेतकऱ्यांच्या भावना समजून घ्या! शंकरपटाचे आयपीएल!**

अमरावतीजवळील तळेगाव दशासर येथील प्रसिद्ध शंकरपट विदर्भात विविध ठिकाणी होणारे प्रसिद्ध शंकरपट, पुणे–आळंदी रोडवरील वाघेश्वर देवस्थान जवळील शर्यती खूप ठिकाणी नैराश्याची छाया पसरली आहे. प्रशासनाने पुढे येऊन प्रोत्साहन द्यावे. मीडियाचा फायदा घेऊन वा शर्यतीचे आंतरराष्ट्रीय स्थरावर मार्केटींग करून नवीन व्यवसाय उभे राहून शेतकऱ्यांमये नवीन चैतन्य जागृत करणे आवश्यक आहे. शहरातील पैसेवाले सहकुटूंब जरी शंकरपट बघायला आले तरी खेड्यातील छोट्या मोठ्या धंदेवाल्यांना दोन पैसे मिळतील आणि शहरातील मुलेही खूप एन्जॉय करतील. उत्तम बैलजोड्या विकत घेऊन शहरातील इनव्हेस्टर उद्योजकही या क्षेत्रात उतरुन क्रिकेटसारखा आयपीएल भरवू शकतात. इंग्रजांच्या खेळाचा उदोउदो आणि दहीहांडी, शंकरपट, कोंबड्यांच्या झुंजीवर बंदी!

**अतीपरिश्रम करणे म्हणजे छळ नाही का ?**

प्राण्यांच्या छळ प्रतिबंधक कायद्याखाली भारतीय शेतकरी बैलांचा छळ करतात, क्रूर वागणूक देतात असा आरोप करून शंकरपटावर बंदी टाकण्यात आली? बरेच नेते, आमदार, खासदार कठोर परिश्रम घेतात, लोकांच्या समस्यांसाठी रात्री बेरात्री झोपेतून उठून जातात, स्वतःच्या कुटुंबाकडे लक्ष देऊ शकत नाही, अशा लोकांवर कां बंदी आणत नाही? स्पर्धेच्या नावाखाली

विद्यार्थ्यांना बालवयातच शाळा गृहपाठाच्या चक्रात कोंबता, अमेरिकेतील सातव्या वर्गाचा अभ्यासक्रम इथे पाचव्या वर्गातच शिकवून होमवर्क अभ्यास असा तगादा लावता हा छळ नाही का? लोकसभेच्या निवडणूकीत पंतप्रधान मोदींनी स्वतःला अत्याधिक परिश्रमात झोकून दिले, प्रयत्नांची पराकाष्टा केली, हा सुद्धा छळ वा क्रूरताच म्हणावी लागेल. ओलिंपीकमध्ये रेकार्ड ब्रेक करण्यासाठी पराकोटीला जाऊन स्वतःचा शारीरिक छळ करतात, त्यांच्यावरही बंदी आणा. पंतप्रधान मोदी, पाल्यांच्या पाठीवर असलेले पालक, पाल्यांची आत्यंतिक मेहनत, होमवर्क, ऑलिंपीक वा इतर खेळासाठी अत्यंतिक मेहनत घेणारे, कठीण परिश्रम करणारे राजकारणी सर्व लोकांवर मानवता मानव छळ प्रतिबंधक कायद्याखाली बंदी टाका?

**भारतातील कोर्टाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह?**

पुणे–आळंदी रोडवर आंदोलनकर्त्यांनी विद्यमान न्यायपालिकेला दोष न देता याचिकाकर्त्यांना आणि सरकारला दोष दिला. तोंड दाबून बुक्क्यांचा मार म्हणावा किंवा ताकाला जाऊन भांड लपविण्यासारखे! विद्यमान न्यायपालिका ब्रिटीशांनी १७७४ मध्ये सुरू केली. १८१८ च्या काळातच ब्रिटीशांच्या लक्षात आले की ब्रिटीशांनी चालू केलेली न्यायपालिका भारतात यशस्वी होणे कठीण आहे. कारण पैसे देऊन येथे साक्षी पुरावे बदलले जातात, खोटी साखी देणाऱ्यांना शाबासकी मान सन्मान मिळतो. अशा परिस्थितीत न्यायाधीशांची भरती वाढवून लोकन्यायालये वाढवून युद्धपातळीवर काम करुनही मिळणाऱ्या न्यायाची गुणवत्ता वाढणे कसे शक्य आहे? इथे व्यक्तीगत न्यायाधीशांचा दोष नाही. पूर्ण प्रणालीच दोषी आहे. न्यायपालिका कोर्ट खोट्या बोलणाऱ्या वकीलांची फौज, काहीशी भ्रष्टाचारी पोलीस यंत्रणा आणि प्रशासन यंत्रणेवर अवलंबून आहे. मर्डर करणारा पोलीसांच्या गाडीत संरक्षणासहीत कोर्टात येणार, जेलमध्येही खाऊन पिऊन तंग, मात्र न्याय मागणारे मृताचे नातेवाई करतात तारीख पे तारीख! ज्यांना न्याय हवा असतो त्याच अन्यायग्रस्तांना शिक्षा! नाही का? कृपया कोणी राग मानू नये. १७७४ मध्ये ब्रिटीशांनी सुरू केलेल्या न्यायपालिकेची फेररचना आवश्यक आहे. माननीय न्यायपालिकेने शेतकऱ्यांचे चैतन्य त्यांचा विरंगूळा त्यांचे करमणूकीचे साधन शंकरपटाच्या माध्यमातून छिनून घेऊ नये आणि समजून घ्यावे.

( दि. ७ जानेवारी २०१९, विमुक भटकंती)



# ४. विटी दांडूच्या आयपीएल स्पर्धा कधी होतील?

आय.पी.एल.च्या स्पर्धा संपल्यात! कोणी म्हणे वीर झारा तर कोणी म्हणे शाहरुख खान आणि प्रिती झिंटाची लढाई! सर्व चौकाचौकात खेड्यापाड्यात खूप उत्सुकता! कशाची तर इंग्रजांनी भारतात आणलेल्या क्रिकेटची? क्रिकेट कोणाचा खेळ? इतर इंग्रज लोकांचा! भारतीयांचे स्वतःचे खेळ नव्हते काय? आपले सोडून दुसऱ्यांचा खेळाचा उदो उदो!

ब्रिटीशांनी भारतावर दिडशे वर्षे राज्य केले! एखाद्या बलदंड बलात्काऱ्याने दुर्बल पिडीतेवर जबरदस्ती करावे तसे! हा बलात्कार हिंदूस्थानी मनावर इतका भिनला की स्वातंत्र्यानंतर सत्तर वर्षे झालीत पण त्या बलात्काराचा नशा अजून उतरला नाही! तुम्हाला नाही वाटत आपण कुठेतरी चुकतो? आपले ध्येय काय असावे असे आपणाला वाटते? असे नाही वाटत आपला गिल्ली दांडू जगप्रसिद्ध व्हावा! आपण क्रिकेटच्या गप्पा मारण्यापेक्षा इंग्रजांनी आपल्या विटी दांडूच्या स्पर्धा घ्याव्यात आणि इंग्रज लोक त्यांच्या देशात चौकाचौकात, घरोघरी गिल्ली दांडू वा विटी दांडू खेळाच्या, स्कोरच्या, खेळाडूंच्या उत्सुकतेने चर्चा व्हाव्यात?

कां नाही होऊ शकत? पण भावनिक जोशाने विचार करण्यापेक्षा प्लॅनिंग करण्याचा विचार करा! क्रिकेटला डोक्यावर घेऊन विटी दांडूला मृतप्राय करण्याला कारणीभूत कोण? आम्ही स्वतः नागरिक? आमचे नेते? की आमची सरकारी यंत्रणा? याला दोषी आम्ही सर्वच आहोत. आम्ही आमची गिल्ली दांडू सोडून क्रिकेट खेळल्याने आमच्या देशात खूप विकास होणार आहे का? आम्ही क्रिकेट खेळल्याने आमचा देश आणि आमची जनता श्रीमंत होणार आहे का? मुळीच नाही! आम्ही सर्वानी एकसंघ होऊन पक्के ठरवून त्या दिशेने प्रयत्न सुरू करावे हे महत्वाचे!

बहुतेक करून महाभारतयुगीन काळात विटी दांडूचा खेळ असावा. विटी दांडू खूप पुरातन खेळ आहे. जिथे जिथे भारतीय गेले, बौद्ध वा हिंदू धर्माचा प्रसार झाला त्या सर्व देशात चीन, जपान, ब्रह्मदेश मलेशिया, सिंगापूर, थायलंड, पाकिस्तान, अफगानिस्तान, श्रीलंका, नेपाळ इत्यादी देशात विटी दांडू थोड्या फार बदलेल्या स्थितीत आढळल्याची पक्की शक्यता आहे. विटी दांडू खेळाचा सहजपणे ऑलीपिंकमध्ये समावेश होऊ शकतो.

थोड्याशा मेहनतीची जरूरत आहे. आपण सर्वांना विटी दांडूला प्रोत्साहन देणे आवश्यक आहेत. विविध संघटनांनी, कार्यकर्त्यांनी विटी दांडूच्या स्पर्धा भरवायच्या! मोठे मोठे बक्षिस गावतल्या श्रीमंतांनी पुढाकार घेऊन वितरीत करायचे! टिव्ही, रेडीओ, इंटरनेट सारखी प्रसारमाध्यमांचा वापर करून विटी दांडूच्या खेळाचा पोपो करायचा. जाहिरातींमधून विटी दांडू खेळाचे चांगले गुण गायचे आणि हळूहळू विटी दांडू वा गिल्ली दांडू प्रत्येकाच्या डोक्यात वा नसानसात भिनावा, अशी पॉलीसी ठेवायची, अमलात आणायची.

एकदा खेळ राष्ट्रीय पातळीवर पापुलर झाला की नंतर असते इंटरनेशनल मार्केटींग. एकदा टिव्ही सारख्या माध्यमांमधून विटी दांडूचा गजर चालू झाला, लोकप्रिय होईल, स्पर्धेला बघ्यांची गर्दी होईल आणि नंतर प्रिती झिंटा वा शाहरुख खान सारख्या लोकांना विटी दांडू मध्ये पैसा ओतण्याची इच्छा होईल. विटी दांडूसाठी मोठे मोठे स्टेडीअम मोठ्या मोठ्या शहरात बांधले जातील! आम्ही दुसऱ्यांच्या खेळांना फॉलो करण्यापेक्षा आमच्या विटी दांडूला इतर देश फॉलो करतील.

आपण भारतीयांनी एकसंघपणे काम करणे आवश्यक आहे. काही वर्षापूर्वी याच आय.पी.एल. स्पर्धा पापुलर नव्हत्या. लोकप्रिय नसल्याने कोणी त्या मॅचेस पाहत नव्हते वा टिव्ही वाले प्रसारित करीत नव्हते. ललित मोदी नावाच्या व्यक्तीकडे अधिकार देण्यात आले. ललित मोदींनी कार्यक्षम मार्केटींगची अंमलबजावणी करून एखादी चांगली वस्तू बाजारात आणावी तसे आय.पी.एल. स्पर्धेला प्रेझेंट केले आणि आय.पी.एल.चे दिवस बदलले, आय.पी.एल मध्ये खूप पैसा खेळायला लागला. एवढा किमयागार असल्याने वा सिद्ध झाल्याने सहजिकच मोदी यांनी स्वतःसाठी आगावूच्या सुविधा घेतल्या असाव्यात, लक्झरी कार इ. खरं तर अशा लोकांना प्रोत्साहित करण्यापेक्षा त्यांच्या मागे फटाके लावावेत अशा वृत्तीच्या भारतात, जळणाऱ्या वा द्वेष करणाऱ्या लोकांची कमी नाही. कर्तबगार हुशार लोकांना योग्य मुआवजा न देता उलट बरबाद करण्याच्या घातक वृत्ती आपल्या देशात ठेचून काढणे अतीआवश्यक आहेत आणि अशा नीच वृत्ती मुळेच आम्ही आमचा गिल्ली दांडूसारखा सुंदर खेळ सोडून इंग्रजांचा खेळ एन्जॉय करीत आहोत. ललित मोदींसारख्या लोकांना विटी दांडूला लोकप्रिय करण्याची जबाबदारी देण्यापेक्षा आम्ही अशा लोकांना हाकलून देतो हे आमचे दुर्दैव आहे.

(दि. ५ जून २०१४, अभयराज्य)



# ५. दहीहांडीवर बंधने टाकणाऱ्या न्यायपालिकेला फिल ह्यूजचा मृत्यू दिसत नाही का?



शेफिल्ड शिल्ड सामन्यादरम्यान बाऊन्सर डोक्याला आदळून फिल ह्यूज या आस्ट्रेलियन फलंदाजाचा मृत्यू झाला. याआधी रमन लांबा या भारतीय क्रिकेटपटूचा फिल्डींग करताना बॉल लागल्याने मृत्यू झाला होता. इस्त्रायल क्रिकेट संघाचे माजी कर्णधार आणि अंपायर हिल्लेल आवस्कर चा बॉल लागल्याने मृत्यू झाला. क्रिकेट हा इंग्रजी खेळ किती धोकादायक असतो! एकशे सत्तर ग्रॅमचा हा बॉल म्हणून बंदूकीची गोळीच असते. फलंदाजांवर तर नेहमी टांगती तलावरच असते. प्रसिद्ध फलंदाज ब्रायन लारा, शोएब अखतरच्या बाउंसरवर रक्तबंबाळ झाला होता. बरेचदा षटकाराचा चेंडू प्रेक्षकांवर पडून रक्तबंबाळही होतात. नाक, तोंड फुटतात कितीतरी नामांकित फलंदाज आयुष्यातून उठले. पेपरमध्ये छापले तर पत्ता लागतो. असे कितीतरी मुले जख्मी होतात आणि खेळणे सोडून देतात. एकाही वृत्तापत्राने प्रसारमाध्मांनी हा फिरंग्यांचा खेळ किती खालच्या दर्जाचा आहे हे लिहले नाही. पण क्रिकेटच्या साहित्याचा दर्जा बदलला पाहिजे, ॲडव्हान्स वर्शन वापरला पाहिजे याची मात्र चर्चा होते. इंग्रजी मनोवृत्ती जोपासणारी वृत्तपत्रे दहीहांडी सारख्या भगवान श्रीकृष्णाच्या काळापासून चालणाऱ्या अस्स्ल भारतीय खेळावर बंधने कसे आणता येतील म्हणून प्रयत्नरत असतात.

**आमची न्यायपालिका कुठे आहे?**

आमची न्यायपालिका ही वकीलांची फौज, पोलीस यंत्रणेने दिलेले पुरावे,

आरोपी प्रतिआरोपींनी दिलेल्या पुराव्यांवर आधारित असते. न्यायाधीश लोक जरी प्रामाणिक असले तरी आधार स्तंभ बहुंशी खोटारडे असल्याने न्यायनिवाडा काही बरोबर होत नाही. कोट्यावधी प्रकरणे प्रलंबीत आहेत. वकीलाचा धंदा खोटा धंदा असल्याने महात्मा गांधींनी वकीली सोडून दिली होती. काही कारायचेही झाले तर आपल्याच भारतीय खेळांवर बंधने घालावीत. मर्यादा टाकणाऱ्या न्यायपालिकेला फिल ह्यूजचा मृत्यू दिसत नाही का? जसे बालगोविंदावर मर्यादा टाकता तसे शोएब अख्तरच्या बाउन्सरच्या स्पीडवर बंदी का टाकत नाही? चौदा वर्षाखालील क्रिकेट खेळणाऱ्या मुलांवर का बंदी टाकत नाही? खेडेगावात हेल्मेट, गार्ड घ्यायला पैसे नसतात, कितीतरी मुलांना मुका मार लागतो, हात–पाय फ्रॅक्चर होतात, गंभीर अपघात होतात हे लोकांना का दिसत नाही.

**गोविंदा जीव महत्वाचा...**

आपल्या प्रत्येक गोविंदाचा जीव महत्वाचा आहे. क्रिकेटमध्ये जसे अॅडव्हास वर्झनचे हेल्मेट, पँटाच्या खाली चड्डीमध्ये अबडॉमीनल गार्उच्या दर्जावर चर्चा करून उपाय काढले जातात तसेच दहीहांडीमध्ये होणारे अपघात निरासनासाठी उपाय जरूर मिळू शकतात. फक्त आपल्या लोकांची, लोकशाही प्रणालीची इच्छाशक्ती कमी पडत आहे. हवा भरलेलया गाद्या, ट्रॅम्पोलीन, इन्फेटेबल बॅग्ज कशा परफेक्टली वापरल्या जातील याचा विचार व्हावा.

दहीहांडी हा अप्रतिम संघटनात्मक कौशल्य असलेला, मंडळानी शिस्तबद्ध आखणी करताना सर्कशीत जसे नेट वा जाळ्या वारल्या जातात, त्या पद्धतीची पर्यायी व्यवस्था शोधून अमलात आणावी कितीतरी लाखाची बक्षिसे असतात मग एक लाख झुलत्या नेटसाठी खर्च केले तर काय वाईट?

**आमचे खेळ म्हणजे रानटी, त्यांचे खेळ साहसी?**

अमेरिका युरोपमध्ये थ्रील राईडच्या नावाखाली रानटी अनुभवांचा आनंद लुटतात. सिक्स फ्लॅग, डिझलीलँड सारखे कितीतरी अमेरिकेत पार्क आहेत. मुलांना स्पीडमध्ये जोरात खाली पाडण्याचा, खाली पडल्याचा अनुभव घाबरवून सोडणारा असतो. अमेरिकेतील सॅन फ्रान्सीस्को जवळ असलेल्या ग्रेट अमेरिका थीम पार्क मधी ड्रॉप टॉवरचे आहे. या टॉवरवरून, बावीस माळे उंचावरून गुरूत्वाकर्षणाच्या वेगाने खाली सोडले जाते, चार सेकंदात माणूस मुले खाली येतात. बहुतेक भारतीय तर या थ्रील राईडवर जाण्याची हिंमतच करत नाही.



बालगोविंदावर बंदी आणणाऱ्यांनी या थ्रील राईड्सचा अभ्यास करावा. गोरे लोक रानटी कलाकारी करतात. त्याला साहसी म्हणता आणि आमचे लोक साहसी कलाकृती करतात तर त्याला रानटी म्हणता? जेव्हा इंग्रजी फिरंग्याचे खेळांची पाळी येते, तेव्हा मुलांच्या आवडी निवडी दिसतात, त्यांच्या साहसी वृत्तीला प्रोत्साहन दिसते. जेव्हा भारतीय खेळांचा प्रश्न येतो तेव्हा भारतीय मुलांची, पालकांची आणि खेळाची रानटी वृत्ती दिसते? भारतीय खेळांच्यावर मर्यादा टाकणारे, गोऱ्यांच्या खेळांमध्ये असलेल्या त्रुटी निसतारण्यासाठी उपाय सूचवून, त्यांच्या खेळांना प्रोत्साहन देणारे आमचे लोक भारतात जन्मले की परदेशात हाच प्रश्न पडतो.

मुंबईचे पालक सुशिक्षित आहेत, हुशार आहेत, दक्ष आहेत. मुंबईच्या पालकांना त्यांच्याच पाल्यांची काळजी आहे, पालक आणि पाल्यांना त्यांचे ठरवू द्या. ज्या लोकांना बालगोविंदावर बंधन टाकाविशी वाटतात त्यांनी त्यांचे पाल्य सांभाळावीत.

फिल ह्यूजचा मृत्यू खरोखर दुर्दैवी आहे, क्रिकेट जगतात खूप हळहळ व्यक्त झाली. या दुःखातून जग कसा सावरला जाईल आणि क्रिकेट कसा पूर्ववत होईल म्हणून या फिरंगी खेळाची सर्वांना चिंता आहे, सर्वजन एकमेकाना हिंमत देत आहेत. पण आम्हा भारतीयांना दहीहांडी सारखा भारतीय खेळ कसा निस्तनाबूत होईल म्हणून चिंता आहे? एकशे अँशी ग्रॅमचा वजनी चेंडू गोलंदाज चिडून फलंदाजाला घाबरविण्यासाठी टाकतो. हे न्यायपालिकेला कसे दिसत नाही? क्रिकेटमध्ये कोणी मरण पावला तर शहीद आणि भारतीय खेळात कोणी मरण पावला तर ती हत्या अशी भारतीय मनोवृत्ती का व्हावी? एकशे अंशी ग्रॅमच्या चेंडूच्या जागी पाच दहा ग्रॅमचा वगैरे हलका फुलका चेंडू न्यायपालिकेने क्रिकेटसाठी का म्हणून सुचवू नये? फिल ह्यूचे बलिदान भारतीयांचा स्वाभिमान का जागवू नये?

(दि. ११ डिसेंबर २०१४, अभयराज्य)

# ६. दहीहांडीवरील बंधने पैदा करणार भारतात भेकडांची फौज ?



दहीहंडी हा प्रकार भगवान श्रीकृष्णाच्या काळात अस्तित्वात होता. सवंगड्याच्या पाठीवर उभे राहून बाळगोपाळ श्रीकृष्ण दहीहंडी फोडायचे. याच प्रकाराने मुंबईत फार छान रुप धारण केले. तो जल्लोष, तो उत्साह, ते धाडस, गोविंदाचे ते टिमवर्क, गोविंदाचा तो एकोपा, गोविंदाची ती धाडसी वृत्ती, त्यांच्यातील तो शिस्तबद्ध समन्वय आणि तो थरथराट, परत काय काय म्हणावे!

अमेरिकन युरोपियन लोकांचे रानटी खेळ आम्ही टिव्हीवर बघतो आणि काय त्यांची स्तूती करतो. क्रिकेटचा १८० ग्रॅमचा बंदूकीच्या गोळीसारखा वेगवान गोलंदाजाने फेकलेला चेंडू फलंदाजाच्या आंडगोटीवर लागायलो नको म्हणून आम्ही चड्डीच्या आतमध्ये लिंगावर कठीण कवटी घालण्याचे संरक्षक उपाय आम्हाला बरोबर सुचतात. पण दहीहंडी खेळामधील आमचे बालगोविंदाला मार लागायला नको म्हणून काही उपाय सुचतच नाही हे आमचे दुर्दैव आहे. १८० ग्रॅमचा क्रिकेटचा सिजन बॉल खेळणाऱ्या आमच्या विद्वानांची मानसिकता इंग्रजाळलेली असल्याने असे घडत असावे. फिल ह्यूज मेला, रमन लांबा मेला, कितीतरी लोकांचे आजपर्यंत डोळे फुटलेत, क्रिकेटमुळे हातपाय तुटले, कायमचे जायबंदी झाले, होताहेत हे या लोकांना मिडीयाला दिसतच नाही.

**न्यायपालिकेची गुणवत्ता ?**

टेक्सास अमेरिकेमध्ये सत्ताधारी राजकीय पक्षाच्या विचारसरणी आधारित न्यायाधीशांची निवडणूक नियमित केली जाते. पारटीसन इलेक्टेड जजचे पद




बदलत असते. त्यामुळे शासनाने घेतलेला निर्णय आणि कोर्टाचा निर्णय हा समतोलीत असतो. शासन म्हणते एक आणि न्यायालय म्हणजे एक असे होण्याची शक्यता कमी होते. भारतात राज्यशासन एक निर्णय घेते आणि न्यायालय त्याला अडथळे उभे करते असे दहीहांडीच्या निर्णयामध्ये होत आहे.


भारतात एक तर खोटे पुरावे साक्षी दिल्या जातात. वकील वा पोलिसांनी लिहलेले लंबे लंबे कागदाचे फर्रे वाचून निर्णय दिल्या जातो. त्यातही ८० टक्के मजकूर हा खोटारडा वा चढवून बढवून लिहिलेला असतो. न्यायमूर्तींना प्रचंड वाचन आणि अभ्यास करावा लागतो. दहींहडी वर बंधणे घालण्याचा निर्णय एका न्यायमूर्तीने दिला. हेच प्रकरण दुसऱ्या न्यायमूर्तीकडे गेले तर निर्णय काही वेगळा लागू शकतो. गोऱ्या ब्रिटीशांनी निर्मिलेली न्यायपालिका भारतात फेल ठरत आहे. भारतातील ओव्हरऑल परिस्थिती त्याला कारणीभूत आहे, एका वा ठराविक लोकांचा दोष नाही.

ढोबळमानाने दहावी बारावीच्या परीक्षेतील गुणवत्ता श्रेणीतील सुरवातीचे दहा हजार विद्यार्थी, सध्याचे दहावीमधील पंच्यांन्नव टक्के पेक्षा जास्त मार्क्स मिळविलेले हे विद्यार्थी सायन्स, आयआयटी व सरकारी कॉलेजेसमध्ये एमबीबीएस वा इंजीनियरिंग करतात, रेप्यूटेड नावाजलेल्या कॉलेजेसमध्ये प्रवेशतात. गुणवत्ता श्रेणीच्या दुसऱ्या टप्प्यातील विद्यार्थी हे इंजीनियरिंग डिप्लोमाच्या इतर शाखेत वा डॉक्टरांच्या इतर शाखेत प्रवेश घेतात. गुणवत्ता श्रेणीतील तिसऱ्या टप्प्यातील विद्यार्थी सहसा वकीलीच्या कोर्सला (एलएलबी) प्रवेश घेतात आणि पुढे जाऊन न्यायाधीश बनतात. दहावी बारावीच्या मार्क्सनुसार तुलनात्मक वाचन, लेखन, अनॅलाईझींग अभ्यास वृत्तीचे आकलन राज्यस्तरीय वा राष्ट्रीय पातळीवर करता येते. राज्यातून उत्तीर्ण होणाऱ्या गुणवत्ता श्रेणीतील सुरवातीच्या अंदाजे वीस हजार विद्यार्थ्यांचा कल न्यायिक अधिकारी बनण्याकडे असावा यासाठी सरकारने प्रयत्न करावे.

ब्राह्मण, क्षत्रीय इत्यादी ढोबळमानाने मानवाच्या वृत्तीचे, मानसिकतेचे वर्गीकरण आहे. त्यापैकी धाडीस, डेरर शारीरिक मानसिक धोका पत्करण्याची क्षमता ठेवणारी वृत्ती म्हणजे क्षत्रीय वृत्ती! ही क्षत्रीय वृत्ती प्रत्येक मानवामध्ये कमी जास्त प्रमाणात असते. दहींहडी सारख्या खेळांवर बंदी टाकणे म्हणजे क्षत्रीय वृत्तीला ठेचून काढणे! उलट क्षत्रीय वृत्तीची समाजाला, देशला नेहमीच गरज असते.





**उपाय :**

प्रशासनाला, भारतातील विद्वानांना खरोखर जिद्द असेल, भारतीय खेळांची चिंता असेल तर दहीहंडीमध्ये होणाऱ्या अपघातांना आळा घालण्यासाठी उपाय जरूर सापडतील. दहीहंडी मधील अपघातांचा रूट कॉज ॲनॉलिसीस, कारणमिमांसा करुन संरक्षक उपाय ठरविता येवू शकतात. सर्कशीत खूप उंचीवर काम करणाऱ्या कलाकारांना उंच खांबाच्या आधाराने पाठीला हुक लटकविलेले असतात. कसरत करणारा उंचीवरुन पडला तरी स्प्रिंग हुकमुळे मदत मिळते आणि पडणारा जमिनीवर कमी वेगाने पडतो. हँगर एरियल स्ट्रॅप वापरता येतात. तसेच सर्कशीत जशी हवेत जाळी लटकविलेली असते म्हणजे उंचावर खेळ करणारे कलाकार पडलेत तर जाळीवर पडतात तशी कस्टमाईज्ड जाळी लावता येवू शकते.

सहसा चवथा, पाचवा, सहावा वा त्यापेक्षाही वरच्या थरावरील गोविंदा खाली पडला तर तो खाली उभ्या असलेल्या गोविंदाच्या ही बाहेर फेकला जावू शकतो आणि अपघात उद्‌भवतात. तेव्हा पंधरा फुट वा तिसऱ्या थरावर पोकळी असलेली सर्कशीत लावतात तशी नेट लावता येवू शकतो. गोलाकार एअरनेटला मध्यभागी गोलाकार पोकळी असेल ज्यातून वरच्या थरातील गोविंदाचा मनोरा वर जाईल, गोविंदाना जाळीला स्पर्श करता येणार नाही. गोविंदाचा मनोरा उभा करताना नेटचा आधार बिलकुल घेता येणार नाही.

इंग्रजी क्रिकेटची आधी पाच दिवसांची कसोटी खेळली जायची. जेव्हा एक दिवसीय क्रिकेट वर्शन निघाले तर ते लोकांना आवडणार नाही असे वाटले. नंतर २०-२० चे जलद वर्शन निघाले तेव्हा ही क्रिकेटप्रेमींना वाटले की काय हा २०-२० क्रिकेट!



दहीहंडीसाठी संरक्षक उपाय म्हणून चवथ्या थरापेक्षा वरच्या थरातील लोकांना सेफ्टी हुक हँगर लावले वा पोकळी असलेला नेट लावला तर खेळाची मजाच जाईल असे वाटत असेल तर चुकीचे आहे.

प्रत्येक छोट्या मोठ्या गोविंदांचा जीव फार महत्वाचा आहे. अपघात, जीवहानी व्हायलाच नको. भित्र्या भेकूड वृत्तीपेक्षा धाडसी डेरर वर्ग भारतात टिकणे आवश्यक आहे. म्हणून प्रत्येक गोविंदाची शारीरिक सुरक्षा काळजी घेणे फार जरुरीचे आहे.

पिरॅमीड सारखे वा त्रिकोण चित्ती जुडणाऱ्या, सहसा जोडता येणाऱ्या लोखंडी फ्रेमचे चैकोनी वा त्रिकोणी स्ट्रक्चर उभे करायला जास्तीत जास्त पाच दहा मिनीटे लागतील. समजा पोर्टेबल बनविले तर! नाहीतर ज्यांची दहीहंडी वीस फुटाच्या वर बांधलेली असते, त्यांनी फ्रेम स्ट्रक्चरची व्यवस्था आधीच करुन ठेवावी. जिथे हँगींग स्प्रिंग हुक्स बांधता येतील किंवा कस्टमाईज्ड सर्कशीतल्या जाळीसारखी हवेत जाळी, एअरीअल नेट्स बांधता येईल. जाळी वा हँगींग स्प्रिंग हुक्सचे नार्मस्, मापदंड मानांकन पद्धतीने शासन व क्रिडा विभाग सुद्धा ठरवू शकतो. फॉल प्रोटेक्शन इक्विपमेंट दहीहंडी मंडळ, क्रिडा विभाग समन्वय साधून बनवू शकतात. परदेशी तज्ञांची सल्ला घ्यायची गरज नाही. शासनाच्या क्रिडा विभागाकडे आज जवळपास एक वर्ष बाकी आहे. सेफ्टी इक्वीपमेंट्सचे स्टँर्डड फायनल करु शकतात.

**ऑलिंपीक वर नजर**

अमेरिकेच्या मायकेल फेल्सने रिओ ऑलिम्पीक मध्ये पाच सुवर्ण आणि एक रजत पदक मिळविले. आतापर्यंत त्यांनी ऑलिम्पीक मध्ये २८ पदक मिळविले. भारतात असे खेळाडू पैदा होऊ शकत नाही का? रिओ ऑलिम्पीक मध्ये एकूण ४२ क्रिडा प्रकार एकूण २०५ देशांचे खेळाडूंनी भाग घेतला होता. भारतातल्या लोकांना हे ४२ क्रिडा प्रकार तरी माहीत आहेत का? या सर्व क्रिडा प्रकारांचे नार्मस्, नियम कोणी बनविलेत? पंचेचाळीस कोटी लोकसंख्येच्या अमेरिकेने १२५ पदक मिळविलेत, आणि सव्वाशे कोटी लोकसंख्येवाल्या भारताने फक्त दोन पदक मिळवले. म्हणून बावचळून जायची आवश्यकता नाही. भारतीय शासकीय निमशासकीय प्रशासन यंत्रणा, भ्रष्टाचार, कामचुकारपणामुळे ग्रासले असल्याने भारत मागे आहे. प्रचलित न्यायपालिका ही इंग्रजांनी निर्मिलेली भारतात यशस्वी होणे शक्य दिसत नाही. हे जर आपण बदलले तर उद्या जाऊन

भारत हा एक लंबी रेस का घोडा बनून जगाचे नेतृत्व करण्याचे स्वप्न बघू शकतो. भारतीयांना प्रशासनात का यंत्रणेत कोणते बदल करावे लागतील हे आम्ही अभयराज्यच्या माध्यमातून आधी बरेचदा सुचविले आहे. (साप्ताहिक अभयराज्य, ११ ऑगस्ट २०१६, न्यायपालिकेचे विकेंद्रीकरण).

**दहीहंडीमधील जख्मी अपघाताचे गणित**

प्रत्येक एकदिवसीय क्रिकेटमध्ये निरीक्षण करा. एक दोन खेळाआड एक दोन क्रिकेटपटू जखमी होतात. कमीत कमी मुका मार तरी लागतो. क्रिकेटमध्ये एकाच वेळेस तेरा खेळाडू मैदानात असतात. ढोबळमानाने दहीहंडीच्या दिवशी मुंबई परिसरात जवळपास २०० मंडळ दहीहंडीत भाग घेत असतील. एका मंडळामध्ये कमीत कमी १३० तरी गोविंदा भाग घेतात. म्हणजे एकूण कमीत कमी २६०० गोविंदा एकाच दिवशी मैदानात उतरतात. म्हणजे क्रिकेटमधील खेळाडू संख्येच्या तुलनेत जवळपास दोन हजार एकदिवसीय क्रिकेट सामने एकाच दिवशी खेळले तर किती खेळाडू जखमी व्हायला पाहिजे? पाचशे तरी होतील. क्रिकेटमध्ये कितीतरी खेळाडू खेड्यापाड्यापासून ते शहरात जखमी होतात, हात पाय तुटतात, डोळे फुटतात पण अचानकपणे मोठा आकडा नसल्याने दिसत नाही. क्रिकेटमध्ये लागलेल्या मुका माराचा इम्पॅक्ट हा उतरत्या वयात प्रचंड होतो पण त्याकडे मिडीयाचे लक्ष नसते. कोणाला उतारवयात बहिरेपणा, दृष्टीतील कमजोरपणा, गुडघ्याच, पाठीचे दुखणे याची तीव्रता प्रचंड वाढते कारण तरुणपणातील क्रिकेटच्या बॉलचा मार त्याला कारणीभूत असतो. दहीहंडीत एकाच दिवशी हजारो गोविंदा मैदानात उतरतात. त्यामुळे आकडा मोठा दिसणारच! असा प्रश्न मिडीयावाले का उचलून धरत नाहीत?

**आमच्या उद्योगपतींना आयपीएल स्पॉन्सर करता येते दहीहंडी नाही?**

गोविंदाच्या मंडळांना फक्त आमदार खासदार वा राजकीय पक्षाने मदत करण्यापेक्षा अंबानी, टाटा, बिरला सारख्या उद्योगपतींनी स्पॉन्सर करायला पाहिजे. इंग्रजी क्रिकेटच्या आयपीएलच्या टीम स्पॉन्सर करणारे, दहीहंडीचे गोविंदाचे मंडळ का स्पॉन्सर करू शकत नाहीत आणि भारतीय खेळांना का प्रोत्साहन देवू शकत नाहीत? उद्योगपतींनी आयपीएल सारखे भारतीय खेळांना प्रायोजीत केले तर भारतीय खेळ अव्वल बनतील, मोठे मोठे जीमखाने उभे राहतील. आज आम्ही इंग्रजी खेळांना पार डोक्यावर घेवून नाचतो, उद्या परदेशी लोक आमच्या भारतीय खेळांना डोक्यावर घेवून नाचतील. मुंबईतील पालक वर्ग



शिक्षित आहे. हिंमती साहसी डॅशींग वृत्तीचे पालक आपल्या मुलांना दहीहंडीमध्ये भाग घेण्याची परवानगी देत असतील तर सरकारने त्यात ढवळाढवळ करू नये. भारतातील लोकशाही यंत्रणा अमेरीका यूरोप सारखी सक्षम नाही. काम चुकार भ्रष्टाचार वृत्तीने बोकाळलेली आहे. त्यामुळे पालक पाल्य त्यांना त्यांचे ठरवू द्या. त्यांना स्वतःची काळजी घेता येते.

## ७. गारूडी, दरवेशी, मदारी यांना संरक्षण द्या, प्रोत्साहन द्या



नागपंचमी आली की आम्हाला नागाची आठवण झाली. आमच्या लहानपणी झिंगोभोई, गोपाळाचा खेळ दाखविणारे, दरवेशी लोक नागाचा पेटारा घेवून यायचे आणि डोलणारा नाग दाखवायचे, दुतोंड्या साप दाखवायचे, नाग–मुंगूसाची लढाई दाखवायचे, आज या लोकांना हुडकून काढून सरकारने प्रोत्साहन देणे, संरक्षण देणे खूप आवश्यक आहे. पिढ्यान पिढ्या आज्या बापापासून चालत आलेले हे गारूडी, गोपाळाचा खेळ करणारे दरवेशी त्यांचेकडील असलेली कला, कसब, कौशल्य आज नवीन युगाप्रमाणे कार्पोरेट जगाच्या मागणीनुसार नवीन रूपात जगासमोर आणणे आवश्यक आहे.

अमेरिकेत सिक्स फ्लॅग, डिजनी लँड, एस्सेल वर्ल्ड, सी वर्ल्ड या मोठ्या कार्पोरेट मनोरंजन जगात प्राण्यांचे खेळ दाखविले जातात. शार्क, डॉल्फीन, सी लॉयन इत्यादी प्राण्यांना, माशांना प्रशिक्षण देणारे प्रशिक्षक पूर्ण वेळ, वर्षानुवर्षे प्राण्यांना ट्रेन करतो आणि प्रेक्षकांना कसब दाखविण्यासाठी तयार करतो. भारतीय लोक, शासनकर्ते, सरकारचे सल्लागार पाश्चिमात्य लोकांचे अनुकरण करता भारतीयत्वाचे अस्तित्वच विसरून गेले. शिक्षण म्हणजे काय, शिक्षणाचा उपयोग काय, पुस्तकी अभ्यासक्रमाच्या मागे लागून पोरांना डबल ग्रॅज्यूएट, पोस्ट ग्रॅज्यूएट, पीएचडी डॉक्टरेट करा म्हणून मागे लागतात आणि पुस्तकी ज्ञान असलेले पीएचडी, इंजीनिअर माशा मारीत बसावेत अशी परिस्थिती झाली आहे.

**पीएचडी डॉक्टरेट म्हणजे कोण?**

जे गारूडी, गोपाळ, दरवेशी सापाला स्वतःच्या मुलाप्रमाणे सांभाळतात, त्यांच्यासाठी वर्षानुवर्षे घालवितात, साप मुंगूस प्राण्याच्या आवडी निवडी बघून त्यांना आपलेसे बनवून, युक्त्या करून त्यांचे कडून खेळ करवून घेतात ते खरे पीएचडी डॉक्टरेट!

आवश्यकता आहे ती फक्त गारूडी, गोपाळ, दरवेशी इत्यादी पारंपारिक कलाकार यांना संरक्षण देऊन, प्रोत्साहन देऊन, टिकवून ठेवून त्यांना डिझनीलँड, सिक्स फ्लॅग, सी वर्ल्ड सारख्या तत्सम कार्पोरेट मनोरंजन आडंबरातून त्यांच्या कलेला, कौशल्याला वाव देण्याची आणि पैसा कमविण्याची!

(दि. १४ जुलै २०१६, अभयराज्य)





## १. विज्ञानयुगाचे तथ्य, सत्य आणि अस्त !

लहानपणी आम्ही वाचले जेम्स बॅट नावाच्या स्काटीश माणसाने अठराव्या शतकात बघितले की, भांड्यात पाणी गरम होताना उष्णतेने पाणी गरम होते आणि पाण्याची वाफ होते. त्या वाफेमुळे झाकणी वर फेकल्या जात होती. गरम वाफेमुळे वर उडणाऱ्या झाकणीच्या अभ्यासातून पुढे जाऊन वाफेवर चालणाऱ्या आगगाडीचा शोध लागला. रूळावरून धावणाऱ्या आगगाडीचे मूळ हे त्या चुलीवरच्या भांड्यांवरून गरम वाफेमुळे उडणाऱ्या झाकणीत होते? वाफेने उडणारी झाकणी म्हणजे एक क्षुल्लक गोष्ट! आमची स्वयंपाक करणारी आई, बाई रोजच बघते. ही गरम वाफेने उडणारी झाकणी म्हणजेच अप्रयत्क्षपणे आगगाडी! म्हणजे आमची स्वयंपाक करणारी आई, ताई रोजच आगगाड्या उडवीत राहते याच्यात नवीन काय? झाकणी हवेत उडण्यापासून ते आगगाडीच्या इंजीनच्या पुर्ज्यांची जुळवाजुळव, पुर्ज्यांची गुंतागुंत, आगगाडीच्या पार्टसचे मॅन्यूफॅक्चरींग, त्या पार्टसची बांधणी, त्या पार्टचे समरूप रूप होऊन संघटीतपणे संचलन हे म्हणजे विज्ञानयुग! गरम वाफेने उडणाऱ्या झाकणीपासून ते आगगाडीच्या बांधणीपर्यंत टप्प्याटप्प्याने जे तंत्रज्ञान विकसीत केल्या गेले, प्रत्येक पार्ट वा अवयवाची रचना विकसीत केल्या गेली, त्या सर्व पार्टसला मॅन्यूफॅक्चर करवून जुळवाजुळव केल्या गेली आणि त्या पार्टसचे एकत्रितपणे यशस्वी संचलन केल्या गेले ते म्हणजे विज्ञानयुग!

**अभ्यासक्रमांची धावपळ...**

आम्ही दहावीपर्यंत जीवशास्त्र, रसायनशास्त्र, भौतिकशास्त्र हे विषय विज्ञानाचे म्हणून शिकतो. गणितात भूमिती आणि बीजगणित शिकतो. या अभ्यासक्रमाचा उगम पदेशात झाला. दिवसेंदिवस अभ्यासक्रम बदलत आहे. ज्या गोष्टी आधी दहाव्या वर्गात शिकविल्या जात होत्या त्या पाचव्याच वर्गात शिकविण्याचा प्रयत्न केला जात आहे. आधी याच्या नवव्या दहाव्या वर्षी पहिल्या वर्गात जात होते. आमच्या लहानपणी सत्तरच्या काळात वयाच्या पाचव्या सहाव्या वर्षी आम्ही शाळा जाणे सुरू करीत होतो. आता वयाच्या

दुसऱ्या तिसऱ्या वर्षात मुलांना आम्ही शाळेत पाठविण्याचा प्रयत्न करीत आहोत. आणि ही आजच्या काळाची गरज आहे? तुम्ही खोलवर जाऊन अभ्यासण्याचा प्रयत्न केला की असे का व्हावे?

आधी ग्रॅज्यूएशनसाठी इंजिनीयरिंगच्या मेकॅनिकल, केमीकल, टेक्सटाईल, सिवील अशा मोजक्या शाखा होत्या नंतर इलेक्ट्रानिक्स, कंप्यूटर सायन्स, आयटी प्रॉडक्शन, टेलीकम्यूनिकेशन अशा जुळल्या! आधी आम्ही एकाच डॉक्टरकडे जायचो! आता हाडाचा वेगळा, हार्टचा वेगळा, त्वचेचा वेगळा, लहान मुलांचा वेगळा, दातांचा वेगळा, स्त्रीरोगवाला वेगळा, गुप्तरोगवाला वेगळा, कान नाक घसा वाला वेगळा, डिलीव्हरी वाला वेगळा, सर्जन वेगळे आणि औषधी लिहून देणारे वेगळे! आमची या चक्रात पळापळ चालू आहे. दिवसेंदिवस काहीतरी नवीन निघत आहे आणि आम्ही त्याचेमागे धावत आहोत.

### आधुनिक विज्ञानयुगाची सुरवात कधी झाली?

आधुनिक विज्ञान युगाची सुरवात पाश्चात्य देशात झाली. लहानपणापासून जे विषय शिकतो सर्व नावे, व्याख्या, संज्ञा, मुद्दे या इंग्रजी मूळ असलेल्या. खूप उत्सूकता असते अमेरिका वा इतर प्रगत देशांत जाण्याची अभ्यासण्याची! खूप सारे आधुनिक विज्ञानाचे संशोधन अमेरिकेत यशस्वीपणे केले गेले म्हणून! सुरवातीला अमेरिकेत गेल्यानंतर आपणही भारावून जातो. पाश्चात्यांनी केलेली भौतिक प्रगती ही भारतीयांपेक्षा पन्नास शंभर वर्षांनी पुढे आहे. त्यांचा देश म्हणजे जणू स्वर्गच! बाहेरून वाटते ी पाश्चात्य नागरिकांना देवाने आपल्यापेक्षा जास्त बुद्धी दिली असावी. अमेरिकेत गेल्यावर सुरवातीला आपण हुरहून जातो. खरोखर अमेरिकन वा पाश्चात्य लोकांना देवाने वेगळा मेंदू दिला का? बॉयलॉजीकली बिलकुल नाही! आज मोबाईल फोनची रेलपेल आहे. लहान मोठे सर्वच वयाचे, गरीब श्रीमंत सर्वांजवळ मोबाईल फोन! आपण सुलभ गतीने खूप दूरवर असणाऱ्या आपल्या संवगड्या बरोबर झटक्यात बोलू शकतो. शंभर वर्षाआधी कोणी लोकांना सांगितले असते की मोबाईल फोन अस्तित्वात येईल आणि आपल्याला शेकडो किलोमीटर अंतरावर असलेल्या मित्राबरोबर बोलता येईल तर कोणाचा विश्वासच बसला नसता! कोणीही त्याला थोतांड किंवा अंधविश्वासच संबोधला असता.

### विज्ञानाची गुंतागुंत

आधुनिक विज्ञान युगाची सुरवात ही अठराव्या शतकात झाल्यासारखी



दिसते. जवळपास नऊ–दहा पिढ्याआधी पाश्चात्य देशात आधुनिक विज्ञान युगाचे वारे वाहू लागले. पहिल्या पिढीने काही संशोधन केले ते संशोधन दुसऱ्या पिढीला, दुसऱ्या पिढीने तिसऱ्या पिढीला हस्तांतरित केले! असे करीत करीत वेगवेगळ्या विषयांचा अभ्यास केला गेला. गणित, भौतीकशास्त्र, रसायनशास्त्र यातूनच ॲटोमोबाईल, तारयंत्रणा, आगगाड्या, इलेक्ट्रीसिटी, टेलीफोन, कार, मोठे कंप्यूटर, टेलीकम्यूनिकेशन, कंप्यूटर्स, मायक्रोचीप, इंटरनेट टेलीकम्यूनिकोन आणि आता ऑनलाईन अप्लीकेशन, ज्याला सॉफ्टवेअर म्हणतात. साधे व्हाटस्‌अप अप्लीकेशन घ्या, आपल्याला साधे सोपे दिसणारे पण या व्हाटस्‌अपच्या मुळाशी या आधुनिक विज्ञानाच्या बारिकसारीक, काही दृष्य काही अदृष्य, सूक्ष्म विषय शाचांची गुंतागुंत दडलेली आहे. तुमचा फोन म्हणजे एक छोटा कंप्यूटर, त्याचा तुमच्या हातात दिसणारा सांगाडा, त्याची टच सेंसिटीव्ह स्क्रीन, त्याचा इल्यूमिनेटींग लाईट, त्याची अँड्राईड ऑपरेटींग सिस्टम, त्याच्यात डाऊनलोड केलेल विविध सॉफ्टवेअर अप्लीकेशन्स, त्याच्या डेटाच्या संचलनासाठी वापरले जाणारे, कंप्यूटर नेटवर्क, अेलीकम्यूनिकेशन नेटवर्क, मोबाईल नेटवर्क सांभाळणाऱ्या विविध कंपन्या, अँड्राइड वापरून सॉफ्टवेअर अप्लीकेशन लिहिणाऱ्या विविध कंपन्या, टच सेंसीटीव्ह स्क्रीन बनविणाऱ्या कंपन्या, फोनचा सांगाडा बनविणाऱ्या खूप साऱ्या कंपन्या, त्या कंपन्यातील लोक आणि त्या सर्वांची जुळवाजुळव! एक गोष्टीवर दुसरी गोष्ट आधारित आहे. पहिल्या पिढीच्या अभ्यासावर दुसऱ्या पिढीचे संशोधन आहे. याचे मूळ अणूमध्ये असणाऱ्या न्यूट्रान भोवती फिरणाऱ्या इलेक्ट्रानमध्ये आहे? दिवसेंदिवस होणाऱ्या विविध संशोधनामुळे ॲटोमेशन वाढत आहे. नवीन येणाऱ्या पिढ्यांना अठराव्या शतकात झालेल्या मूळ संकल्पनांचा अभ्यास करायला वेळ मिळणे शक्य नाही? दिवसेंदिवस कॉम्प्लीकेटेड होणारा विद्यार्थ्याचा अभ्यासक्रम सिल्याबस हे त्याचेच लक्षण आहे. कालचे दीर्घकालीन संशोधन नवीन पिढीकडे पास होऊन त्याचा सखोल अभ्यास अशक्य आहे. उद्या जाऊन अभ्यासात गॅप्स राहण्याची दाट शक्यता आहे.

### बदलते विज्ञान....

गरम वाफेने उडणाऱ्या झाकणीच्या युक्तीला आगगाडीचे रूप देण्यासाठी काही प्रोफेशनल लोकांना एकत्रित आणून (त्यांचे वेगवेगळे गट बनवून त्यांचेकडून वेगवेगळ्या गटाकडून वेगवेगळी कामाची विभागणी करून, त्या सर्व टिम वा

ग्रुपची सांगड घालून, वेगवेगळे पार्टस बनवून घेऊन, त्यांची टेस्टींग करून, ते पार्ट्स जुळवून एकत्रित टेस्टींग करून ढोबळ मानाने आगगाडी आकाराला येते. सुरवातीला वाफेवर चालणारी आगगाडीचे संचालनाचे मूळ जरी अभ्यासले तरी विज्ञानाचे गांभीर्य लक्षात येते. कालची आगगाडी वाफेवर होती. आज इलेक्ट्रीसिटी वापरल्या जाते. येणाऱ्या स्टेशनची माहिती जीपीएस ने दिल्या जाते. खूप सारे इलेक्ट्रानिक बेस्ड ॲटोमेशन आहे. म्हणजे आजची आगगाडी इलेक्ट्रीकल, मेकॅनिकल, इलेक्ट्रानिक्स, कंप्यूटर टेलीकम्यूनिकेशन शाखांची गुंतागुंत आहे.

**निसर्गाने नेमलेल्या मर्यादा**

निसर्गाने या सृष्टीतल्या सर्वांना मर्यादा दिलेल्या आहेत. मानवाचे आयुष्य उनेपूरे १०० वर्षे, मानवाच्या शरीरातील पेशीसमूह, अवयव, शरीरातील अविरत चालणाऱ्या क्रिया प्रक्रिया वाढत्या वयाने थकत जातात. उतरत्या वयात हलकाई कमी होते, शारीरिक त्रास वाढत जातात आणि मृत्यू ठरलेला आहे! मानवाचे आयुष्य आणि क्षमता हे निसर्गाने ठरवून दिलेले आहे. थर्ड जनरेशन ॲटीबॉयटीक दवा, नवीन आधुनिक औषधे द्या, माणूस वृद्ध होऊन वर जाणारच! मानवाने निर्माण केलेल्या कोणत्याही प्राडक्ट्स, मानवाने निर्माण केलेल्या कृत्रिम वस्तू, हे चिरकाल टिकण्याची शक्यता नाही. प्रत्येक मअेरिअल अणूंचा बनला असे आधुनिक विज्ञान म्हणतो, सिद्ध करतो. अणूंमध्ये न्यूट्रान भोवती इलेक्ट्रान फिरतात. या अस्तित्वात असलेल्या सूर्यमालेतही सूर्याभोवताल ग्रह फिरत असतात. जसे मानवी शरीर जिवंत असते तसे सूर्यमाला भूमंडल जिवंत असण्याची दाट शक्यता आहे. जसे मानवी शरीर दिवसेंदिवस क्षीण होत जाते, तसे या सूर्यमालेचे होणार आहे; ठरलेले आहे. या सूर्यमालेचे रिकशन परिवर्तन, पृथ्वीचे रोटेशन, पृथ्वीवरील सर्व मटेरिअल, मटेरिअल मधील अणू हे गुरूत्वाकर्षण वा तत्सम शक्तींनी जुळलेले आहेत. अणूमधील न्युक्लीअस भोवती फिरणाऱ्या इलेक्ट्रानच्या वेगात थोडास जरी फरक पडला तरी या विज्ञानयुगातील प्रत्येक प्राडक्टवर त्याचा फरक पडणार आहे. निसर्गाच्या नियमानुसार हा नियम भूमंडळाला लागू होतो. अणू संरचनेमधील फिरणाऱ्या इलेक्ट्रानवरून विद्युतधारेची (करंट) संकल्पना अस्तित्वात आली ाहे. हीच विद्युतधारा नियंत्रित करून, प्रमाणित करून आजच्या युगात अस्तित्वात आलेल्या प्रत्येक ऑटोमेटेड इक्वीपमेंटमध्ये वापरण्यात आली आहे. आज अस्तित्वात आलेली हजारो



किलोमीटर अंतरावर असलेल्या लक्ष्यावर अचूक मारा करणारी इंटरकाँटीनेंटल (आंतरखंडीय) मिसाईल इलेक्ट्रानच्या वेगाच्या सूक्ष्म किंचीतशा बदलाने लक्ष्याचा मारा चुकणार आहे! कारण सायंटीफिक समीकरणात मोठी तफावत येईल. त्यानंतर श्रद्धा, अंधश्रद्धा, अंधविश्वासाचे युग चालू हाईल.

अठराव्या शतकात चालू झालेले संशोधन, पिढयान पिढ्या चालत आहे. संशोधन नवीन असले की गवगवा होतो. सर्व लोक त्याचा अभ्यास करतात, मूळ समजून घेतात. त्यावर आधारित इक्वीपमेंट बनतात. स्पर्धेच्या युगात नवीन नवीन युक्त्या नवीन संशोधनाकडे धावपळ सुरू असते. कालांतराने जुने संशोधन रटाळ होतात. जुन्या संशोधनातून बनलेले इक्वीपमेंटचे पार्ट्स जसे आहे तसे वापरले जातात. कालांतराने जुने संशोधनावर आधारलेले प्राडक्ट्स रूढी आधारित बनून विश्वासाच्या परंपरेत जोडल्या जात आहेत. काल बनलेली ऑपरेटींग सिस्टम जशी आहे तशीच घेऊन त्यावर आधारित अप्लीकेशन साफ्टवेअर बनवित आहोत. इंग्रजांनी बनविलेली इंग्रजी ऑपरेटींग सिस्टम दुसऱ्या कोणत्या भाषेत लिहणे दिवसेंदिवस कठीण काम बनणार आहे.

तुम्हाला काय वाटते अमेरिकन वा पाश्चात्य देश या युगाला वाचवू शकतील? आम्हाला सुद्धा वाटायचे अमेरिकन विद्यार्थ्यांना देवाने काही वेगळा ब्रेन दिला असेल म्हणून! दहा वर्षाच्या अत्याधुनिक तंत्रज्ञान असलेल्या कंपनीत अमेरिकन तंत्रज्ञान असलेल्या कंपनीत अमेरिकन लोकांसोबत काम करून वस्तूस्थिती लक्षात आली. नवीन निर्माण होणाऱ्या प्रॉडक्सवर कालांतराने स्ट्रॅगेशन वा सॅच्युरेशन येईल. ७०–८० हजार एम्प्लाई असलेल्या कंपनीत कितीतरी शाखा, डिपार्टमेंट यांच्यातील गुंतागुंत, एक दुसऱ्याच्या कामातील गुंतागुंत ही त्या एम्प्लाईच्या त्या कंपनीतील लाईफटाईम सोबतच जुळलेली असते. आज एम्प्लाई या कंपनीत आहे, उद्या दुसऱ्या कंपनीत! एक अशक्य दिसणारी असेलली गुंतागंत असलेला प्राडक्ट कोणी बनविला की तो उद्या इतिहास बनून जातो. एम्प्लाईचे मायग्रेशन बंदन करणे अशक्य असल्याने पाश्चात्य कंपन्यांना आज मेहनतीने, दीर्घकाल मेहनत करून पेचिदा जटील समस्यांचा अभ्यास करून बनविलेला प्राडक्ट टिकविण्यासाठी देश जरी पुढे आला तरी नवीन पिढी कितपत कायम ठेवू शकेल हा मोठा गहन प्रश्न आहे.

**बील क्लींटनच्या भारत वाऱ्या...**

अमेरिकेचे माजी अध्यक्ष महाशय बील क्लींटन हे सर्वात जास्त भारत वाऱ्या

करणारे अमेरिकन प्रेसिडेंट! आमचा अंदाज आहे की हा प्रतिभाशाली माणूस भारतात जासूसी करत असावा. या प्रेसिडेंटला आम्ही प्रेमाने बिल्लूभय्या म्हणतो. आम्ही लेख लिहतो तेव्हा आमचया लेखांचा नायक (सिफचे) म्हणजे बील क्लींटन! अमेरिकेच्या प्रेसिडेंट पदावर असताना बिल्लूजींचे मोनिका लेव्हेन्सी नावाच्या असिस्टंट बरोबर सूत जुळले. चाळीस चाळीस मिनीटे प्रेसिडेंट मोनिका बरोबर फोनवर गुटरगू गप्पा मारत असायचे! बाकी ऑफीसमध्ये वेळ देत असतील तो वेगळा, शारीरिक पण ओरल दोघांची कामक्रिडा चालायची! आमच्या आमदारांना भेटायला जा तर एका मिनीटात बोलणे संपवावे लागते. पण बिल्लूभैय्यांकडे लफड्यांसाठी वेळच वेळ! पण हे प्रेसीडेंट खरोखर हुशार! जबरदस्त दूरदृष्टीचा! बील क्लींटन यांनी आखाती देशांना सुद्धा दूरदृष्टी ठेवून, समजा जर पृथ्वीतलावरील तेलसाठा संपला तर पर्यायी उपायांचे संशोधन करून, पर्याय उपलब्ध करून, आपली श्रीमंतीची पत कायम ठेवण्यासाठी उपाय सुचविले. बील साहेबांचा गाढा अभ्यास आहे. त्यांना बहुतेक आधुनिक विज्ञानयुगाच्या मर्यादा लक्षात आलेल्या आहेत, त्यावरील उपाय शोधण्यासाठी बील साहेब भारतात चकरा मारीत असावेत! श्वास वा ध्यान ही क्षुल्लक गोष्ट वाटते. पण याच गोष्टीवर खूप वैदिक युगात अभ्यास होऊन दिव्यदृष्टी, दिव्य अस्त्र, अंतर्यामी होणे, शरीराच्या पेशी वा अवयव डिके(पतन, क्षय न होणे) न होण्याच्या प्रोसेस वा विद्या डेव्हलप(उन्नत) झाल्या होत्या. काळाच्या ओघात या विद्या वाचविण्याकरिता मोठी मोठी पुस्तक पोथी पुराण वेद लिहिल्या गेली, गुरू शिष्य परंपरा उभ्या केल्या गेल्या, पण या विद्या पुस्तकातच जीर्ण झाल्या आणि अंधविश्वास वा अंधश्रद्धा बनल्या! (आयुर्वेदाचा अभ्यास बाहेर देशात चोरला जात आहे) भारत देश तंत्रज्ञानाच्या अती उच्च शिखरावर जाऊन वैदिक पूर्वकाळात पतझड झाल्याची दाट शक्यता आहे. अमेरिकेत डेव्हलप होणारे तंत्रज्ञान काळाच्या ओघात कोल्याप्स होईल ही पूर्वकल्पना आल्याने बीलसाहेब उपाय शोधण्यासाठी चक्कर मारत असावेत असा आमचा स्वतःचा अंदाज आहे. बिल्लूभैय्या अमेरिकन प्रेसिडेंट पदावर राहून कितीतरी वेळ गुटरगू करण्यात घालवितात आणि आमचे नासामध्ये ३५ टक्के असलेले भारतीय मूळाचे शास्त्रज्ञ घाण्याच्या बैलाला जुंपल्यासारखे मेहनत करतात, यातच अमेरिकन लोकांची व्याख्या दडलेली आहे, त्यांची संकल्पना दडलेली आहे.

दिवसेंदिवस काम्प्लीकेटेड होणारा, काम्प्लेक्स होणारा अभ्यासक्रम ही



विज्ञानयुगाच्या अस्ताची साक्ष देत आहे. मनुष्याचे वय शंभर, जन्माच्या आधीच तर आम्ही मुलांना शाळेत पाठवू शकत नाही? मुलगा दोन वर्षाचा होवो ना होवो त्याला काही व्यवहारिक अनुभव येवो ना येवो, अर्थशास्त्र, गणित, समाजशास्त्र, इतिहास, विज्ञान, भूगोल शिकविणे चालू! येणाऱ्या काळात परत काय बदल करायचे भगवाने जाणे!

**आमच्या विज्ञानयुगावर आधारित लांबलचक लेख लिहिण्याचा उद्देश काय?**

एवढे लांबलचक व्याख्यान लिहिण्यामागे आपल्या देशाने प्रगतीची दिशा आखताना दूरदृष्टी ठेवणे आवश्यक आहे, हे ठासून मांडणे, समजविणे हा आमचा उद्देश आहे. आपल्याला जगात प्रथम क्रमांकावर जायचे असेल तर फालोअर बणण्यापेक्ष्ज्ञा जागतिक लिडर बनणे आवश्यक आहे. आपण स्पर्धेत राहण्यासाठी विद्यमान युगाचा जरूर अभ्यास करावा पण विकसीत पुढारलेले देश येणाऱ्या काळात भविष्यात कोणत्या टप्प्यात पाय ठेवतील, त्यापेक्षाही पुढचा टप्पा आपल्याला गाठता येईल अशी अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.

(दि. १५ ऑगष्ट २०१४, अभयराज्य)

# २. आमच्या अंधश्रद्धा, अंधश्रद्धा आहेत का?

१९९१ च्या काळात पुण्याच्या काही भारतीय शास्त्रज्ञांनी परम नावाच्या सुपरकंप्यूटरची बांधणी केली. आम्ही त्यावेळेस एम.ई. इलेक्ट्रानिक्स करत होतो. एका सरांच्या, मॅडमच्या कृपेने आम्हाला भाभा अनुसंशोधन केंद्र, बी.ए.आर.सी. मुंबईमध्ये सुपर कंप्यूटरवर काम करण्याची संधी मिळाली. बी.ए.आर.सी. वाल्या शास्त्रज्ञांनी अनुपम नावाचा सुपर कंप्यूटर बिल्ड केला होता. रमेश राजेश नावाचे शास्त्रज्ञांच्या संगतीने आम्ही सूपर कंप्यूअरवर आमचे प्रोग्रॅम्स रन करून बघितले. सुपर कंप्यूटर, त्यांची बांधणी त्या मागील तंत्रज्ञान, त्यांची गरज याचा अभ्यास करण्याची आम्हाला संधी मिळाली. त्यानंतर काही वर्षानी आम्ही अमेरिकेत अतीउच्च तंत्रज्ञान असलेल्या कमर्शीयल कंपन्यामध्ये काम केले. जाण्यापूर्वी अमेरिकन लोकांनी डेव्हलप कलेले तंत्रज्ञान बघून भारावून गेलो होतो. अमेरिकेत असतांना उच्चतंत्रज्ञान असलेले मार्डर्न वेबसाईट्स सोशीअल मीडिया, व्हाट्सअप इत्यादी कसे काम करते, बॅकग्राउंडमध्ये कोणती टेक्नॉलाजी कशी वर्क करते याचा अनुभव घेतला. गॅलीलीओ, आर्कीमीडीज, न्यूटन, एडीसन असे विविध शास्त्रज्ञ गेल्या सात आठ पिढ्या टप्प्या टप्प्याने काम करीत आहेत. पहिल्या पिढीने केलेल्या संशोधनावर दूसरी पिढी श्रद्धा ठेऊन काम करती गेली. आज जग व्हाट्सअप पर्यंत पोहचले आहे. वरून दिसायला एकदम झकपक मार्डर्न बॅड न्यू टेक्नॉलाजी पण बॅकग्राउंडमध्ये खूप कॉम्प्लीकेटेड अवस्थेत हे तंत्रज्ञान पोहचले आहे. साध्या मोबाईल फोनमध्ये असलेल्या पूर्जा, हार्डवेअर, सॉफ्टवेअर प्रोग्राम, त्याला टॉवरला कनेक्ट करणारी टेक्नॉलाजी विविध प्रकारचे डाटा नेटवर्क वेगवेगळ्या देशात बनतात आणि सर्वांच्या मदतीने चालणारी ही जुगलबंदी आहे.

**नक्षत्रमालेत होणारे बदल**

जसे मानवाच्या शरीराच्या पेशी कालानुरूप वृद्ध होता आणि मृत्यू ठरलेला असतो. तसेच या आधुनिक विज्ञान युगाचे होणार आहे. कालपरत्वे पूर्ण ब्रह्मांडचेही आयुष्य आहे असे हे विज्ञान मान्य करतो. कालपरत्वे जसा न्युट्रानभोवती फिरणाऱ्या इलेक्ट्रॉनचा स्पीडमध्ये बदल होत आहे. आतापर्यंत बऱ्याच पिढ्यांमधील शास्त्रज्ञांनी केलेल्या संशोधनातील निष्कर्ष सूक्ष्म अंतराने बदल होतील तेव्हा येणाऱ्या नवीन पिढ्यांना जुना अभ्यास करणे खूप कठीण



जाईल. आज आधुनिक विज्ञानाचे इक्वीपमेंट नव्वद टक्क्यांच्यावर ॲक्यूरसी देतात. कालांतराने ही ॲक्यूरसी कमी होत जाईल.

आपल्या पूर्वजांनी जुन्या अतीप्राचीन काळात चौदा विद्या आणि चौषष्ट कला विकसीत केल्या होत्या. त्यामधील तंत्र मंत्र जादू टोण पुजा अर्चा देव धर्म इत्यादी गोष्टींना आम्ही कमी जास्त प्रमाणात अंधश्रद्धा समजतो. रामायण महाभारतात उल्लेखिलेले अस्त्र शस्त्र योगविद्या खरोखर होत्या की नव्हत्या, म्हणून आम्हालाच शंका आहे. रामायण महाभारत घडलेत की नाही म्हणून आमची पूर्वजांनी सांगितलेल्या ज्ञानावर आम्हीच बोट ठेवतो. हास्यास्पद आहे! भारतीय पालक, आई बाप चुकीचे ज्ञान आपल्या मुलाबाळांना शिकविणे, संस्कार करणे शक्य नाही. मानव प्राणी स्वतःचे काही घेऊन जन्माला येत नाही, आला नाही. निसर्गात अस्तित्वात असलेल्या शक्तींचा, पंचमहाभूतांवर अभ्यास करून, ट्रायल एरॉर, परम्युटेशन कांबीनेशन करून काहीतरी नवीन शोधण्याचा प्रयत्न करतो. गॅलीलीओ, आर्कीमीडीज, न्यूटन यांनी तसेच केले. पहिल्या पिढीच्या शास्त्रज्ञांनी कितीतरी वर्षाच्या परिश्रमातून केलेले संशोधन दूसरी नंतरची पिढी जसे आहे तसे स्वीकारते ही झाली श्रद्धा. जुने संशोधन नवीन पीढीने नाही स्वीकारले तर नव्याने शोधण्यात पूर्ण आयुष्य जावयाचे. श्रद्धा म्हणजे विश्वास. आंधळेपणाने विश्वास ठेवणे म्हणजे अंधश्रद्धा. इलेक्ट्रानला कोणी बघितले नाही हा एक सिद्ध केलेला विश्वास आहे. चालत आहे प्रुव्ह होत आहे तोपर्यंत ती श्रद्धा असे म्हणायला हरकत नाही. उद्या जाऊन कालांतराने अंतराळात, ब्रह्मांडात, सूक्ष्म इलेक्ट्रॉनच्या पातळीवर बदल झाल्याने आजच्या निष्कर्षामध्ये जिथे आम्ही विश्वास ठेवत आहोत, तिथे संथगतीने सूक्ष्म प्रमाणात बदल होत जातील. अस्त्र शस्त्र वेदर रिपोर्ट हळूहळू आजच्या श्रद्धा अंधश्रद्धा बनत जातील. अद्यावत विद्यमान विज्ञानाचा ज्यांनी खोलवर अभ्यास केला, अशा अमेरिकन लोकांच्याही लक्षात ही गोष्ट आलेली आहे.

**अंधश्रद्धा समूळ नष्ट का झाल्या नाहीत?**

आमच्या जुन्या श्रद्धा, अंधश्रद्धांवर, कर्मकांडावर भगवान गौतम बुद्धांच्या काळापासून प्रहार होत आहेत. काय खरं काय खोटं या अवडंबरामध्ये गोलगोल फिरतोय पण अंधश्रद्धा समूळ नष्ट झाल्या नाहीत? वैदिक युगात विकसीत झालेल्या विद्या तंत्रविद्या खरोखर अस्तित्वात होत्या. काळाच्या ओघात ब्रह्मांडामधील बदलांमुळे मूळ उगम टप्प्या टप्प्याने विकसीत झालेले, प्रुव्ह झालेल्या योगसाधनेचा अभ्यास हरविला किंवा बदलला. आणि या वैदिक युगीन

योगविद्यांची ॲक्युरसी दहा टक्क्यांपेक्षा खाली आली. तंत्रमंत्र जादूटोण्यातून दहापैकी एकाला फायदा होतो म्हणून. नऊ जण अंधश्रद्धा म्हणून हिनवितात. उरलेला एक, नऊ जणांना भारी पडतो. त्यामुळे या अंधश्रद्धा समूळ नष्ट झाल्याच नाहीत. माझा ज्या गोष्टीवर विश्वास ती श्रद्धा पण मी जिथे विश्वास ठेवत नाही पण दुसरा विश्वास ठेवतो ती अंधश्रद्धा. ही झाली आधुनिक व्याख्या! भगवान बुद्ध, संत कबीर, संत तुकाराम यांचा काळ वेगळा होता. आज गोऱ्या लोकांनी सुरू केलेला विज्ञानयुग तारूण्यवयात पोहचलेला आहे. व्हाट्सअप सारख्या तंत्रज्ञानाची गरूडझेप ही एक पिढीच्या अभ्यासातून शक्य नाही, पिढ्या पिढ्यांचा जबरदस्त ताळमेळ असलेला एकाच दिशेने जाणारा अभ्यास लागतो आणि ग्रुप ग्रुप बनवून सांघिक कामातून टप्प्याटप्प्याने पुढे चालत जावे लागते आणि बॅकग्राऊंडमध्ये इतकी काम्प्लेक्सीटी आहे की आता उतारवय चालू होण्याच्या जवळ आहे. रामायण महाभारतातील ज्या ज्या गोष्टी फेक वाटतात, तिथपर्यंत आधुनिक विज्ञान युगाची झेप राहील. जसे हत्तीचे मुंडके गणपतीच्या मानवी शरीराला लावून गणपतीला जिवंत केले तसेच आधुनिक विज्ञानाची एकाचे मुंडके दुसऱ्याला यशस्वीपणे लावण्यापर्यंत मजल जाऊ शकते, त्यापुढे नाही. पण मानवी शरीराच्या पेशी कधी वृद्ध होणार नाहीत आणि माणूस मरणार नाही इथेपर्यंत विज्ञान जाणे शक्यच नाही.

**मानवाचा मेंदू आणि कंप्यूटर हार्डडिस्क**

कंप्यूटर हार्डडिस्कमध्ये डाटा ठेवला जातो. एखाद्या हार्डडिस्कमधील डाटा रीड करायचा असेल तर डाटा ठेवताना वापरली तीच असावी लागते. ऑपरेटींग सिस्टम प्रकारानुसार काही गिनचुने प्रकार मार्केटमध्ये आढळतात. निसर्गनिर्मित प्रत्येक मानवाचे हार्डवेअर आणि सॉफ्टवेअर युनीक आहे. मानवाच्या मेंदूमध्ये डाटा ठेवला जातो सध्याचे मानवनिर्मित सीटी स्कॅन वा एम.आर.आय. मानवाचा मेंदू खराब झाला का म्हणून आकलन देऊ शकतात पण मेंदूमध्ये काय डाटा आहे हे सांगू शकत नाही. पण एका मानवाच्या मेंदूमध्ये काय डाटा आहे हा दुसरा त्याचा प्रकारचा मेंदू असलेला कॉमपॅटीबल शरीररचना असलेला मानव रीड करण्याची शक्यता नाकारता येत नाही. समोरच्या व्यक्तीचे मन म्हणजे मेंदूतील डाटा रीड करण्याची विद्या वैदिक काळात अवगत झाली असावी पण हे कॉम्पॅटीबल मस्तिष्कांमध्ये शक्य होत असावे. डोळ्यात डोळे टाकून, नजर मिळवून वा हातात हात घेऊन, नाडी परिक्षण डाटा कम्युनीकेट करण्याच्या पद्धती असू शकतात. मानवाच्या डोक्यातील मेंदूमध्ये साठविलेला डाटा हा मानवरूपी



दुसरा कंप्यूटरच रीड करू शकतो. विज्ञानामधील संशोधन, तंत्रज्ञान आणि त्यांची जुळवाजुळव ही सॅच्यूरेशन स्थितीमध्ये पोहचली आहे. अमेरिकेत किंवा भारतातील संशोधन केंद्रात ज्यांनी नवीन नवीन तंत्रज्ञानामागील काम करणाऱ्या मूळ संकल्पनांचा, प्रोसेसचा, प्रोजेक्ट्स खोलवर वर्षानुवर्षे अभ्यास केला ते लोक ही बाब मान्य करतील.

**लिंबू मिरची मागील रहस्य काय? उपाय?**

तंत्र मंत्र जादू टोणा पूजा अर्चा देव धर्म इत्यादी या गोष्टींना आम्ही कमी जास्त प्रमाणात अंधश्रद्धाच समजतो, ज्यांना अनुभव आला, मदत झाली ते पक्का विश्वास ठेवतात. किंवा इतरांना शास्त्रीय पुरावे तरी द्यावे लागतात. जोपर्यंत सिद्ध करीत नाही तोपर्यंत आमच्या वैदिक युगातील विद्या म्हणजे थोतांड! पण आज वेळ आलेली आहे. एका नवीन युगाची सुरवात करण्याची वा विद्यमान विज्ञानयुगाला कलाटनी देण्याची! आमचे पूर्वज म्हणजे आमचे जन्म देणारे बाप. त्यांच्या प्राचीन विद्या आमचे भाग्य उजळू शकतात. ज्याला आम्ही अंधश्रद्धा म्हणून स्वतःवर हसता त्या अंधश्रद्धाचा, आधुनिक तंत्रज्ञान वापरून आणि नवीन तंत्रज्ञान डेव्हलप करून आम्ही परत जागतिक नेतृत्व करू शकतो. ढोबळ मानाने सुरवात करण्यासाठी आम्ही काही मुद्दे देत आहोत.

१. मानवप्राणी हा लाखो पेशींचा बनला असतो. पंचमहाभूताने बनलेले हे शरीर, जन्म झाल्यापासून निसर्गातील विविध शक्तींनी संस्कारित केले जाते. जेव्हा मनुष्य शेवटचा श्वास सोडतो तेव्हा त्याच्या शरीरातील पेशींमध्ये रासायनिक आणि भौतिक बदल होतात. शरीरातील पेशी सिकुडत जातात, शरीर टाईट होत जाते. अधिक शक्यता आहे की या लाखो पेशींमधून प्रचंड एनर्जी रिलीज होत असावी. ती एनर्जी त्या ठिकाणी भिंतीत जमीनीत आजूबाजूच्या आसमंतात भारून टाकीत असावी आणि त्या एनर्जीचे अस्तित्व वर्षानुवर्षे राहत असावे. या एनर्जीचे अस्तित्व कसे पकडता येईल वा शोधता येईल? या एनर्जी अतीसूक्ष्म रूपात त्या मृत मानवाचे अस्तित्व टिकवून ठेवू शकतात.

२. कोणते कोणते व्याधीग्रस्त मानव जेव्हा कोणाच्या समाधीचे दर्शन घेतात तेव्हा त्यांच्या मानसिक स्थितीत बदल होतो. असे प्रत्येकाच्या बाबतीत घडत नाही. समाधीतून निघणाऱ्या एनर्जी कॉम्पॅटीबल स्पेसिफीक लोकांच्या मेंदूवर प्रभावी ठरत असाव्यात. मानवाच्या मानसिकतेचे मेंदूचे प्रकार वेगळे करता येतात का?

३. ज्या ज्या महाराजांना काही सिद्धी अवगत झाल्या आहेत. त्यांच्याच भक्तगणांना झालेल्या फायद्यांची, त्यांनी अनुभवलेल्या सकारात्मक, नकारात्मक

उपचाराची माहिती एकत्रित करणे आणि सकारात्मक शहनिशा करणे. मूळ कारणांचा उपचारांचा सखोल अभ्यास करणे.

४. योगिक विद्या साधना, तपश्चर्या करण्याआधी नंतर आणि मधल्या नियमीत तासाला, महिण्यात अत्याधुनिक तंत्रज्ञान असलेली ईसीजी, ईईजी, सीटी स्कॅन, एमआरआय वापरुन शरीराच्या विविध भागात झालेल्या बदलांचा, स्पंदनांचा अभ्यास करणे.

५. ज्या महाराजांकडून व योगी लोकांकडून खूप लोकांना प्रचंड फायदा झाला आहे त्यांचेकडून अभ्यासक्रम बनविणे आणि निवडक हुशार गुणवत्ताधारी विद्यार्थ्यांना संशोधनात आर.एन.डी.साठी प्रशिक्षण देणे. पाश्चात्य लोक आर.एन.डी.करीता भरपूर पैसा घालवितात. आपणही गुणवत्ताधारी विद्यार्थी, अभ्यासू लोकांकडून तप तपश्चर्या साधनांचा शोध घेणे.

**कॉपी बहाद्दर भारत**

भारताची आतापर्यंतची इमेज ही कॉपी बहाद्दर समजली जाते. गोरे लोक संशोधन करतात, अभ्यासक्रम बनवितात, आम्ही कॉपी करतो! संविधानाचे ही तसेच! आठाकाठावर पास होणारेच विद्यार्थी कॉपी करतात, प्रथम क्रमांकवाले हुशार विद्यार्थी कॉपी करत नाहीत. आमच्या अंधश्रद्धांचा अभ्यास हा आम्हाला जगात पहिल्या नंबरवर नेऊ शकतो. आमच्या भारतीयांच्या अंधश्रद्धाचा सखोल अभ्यास नव्याने करणे आवश्यक आहे. एक नवीन तंत्रज्ञान आणि एक नवीन युगाची दिशा या अभ्यासातून येणाऱ्या दहा वीस पन्नास वर्षात आखली जाऊ शकते. 'डॉक्टर तुम्ही सुद्धा' ऐवजी 'तुम्हीच बरोबर होते' अशी नाटके लिहिल्या जातील, ते दिवस दूर नाहीत!

(दि. २३ एप्रिल २०१५, अभयराज्य)



# ३. नाशिक कुंभमेळाव्याचा फेरफटका!

## कुंभमेळा एक अंधश्रद्धा?




कुंभमेळा आम्ही लहापणापासून ऐकत आलो. आम्ही जनता विद्यालयात पाचव्या-सहाव्या वर्गात असताना शाळेतील कर्मचारी रामुची बानकर यांचे कुटुंब कुंभमेळ्याला गेले होते. रामूभाऊची मुलगी आठ-दहा दिवस वर्गात गैरहजर होती. आमचे वडील शिक्षक, कडक शिस्तीचे! कुंभमेळ्यासाठी विद्यार्थ्यांनी गैरहजर राहावे हे त्यांना आवडत नव्हते. त्यावेळेस पासून कुंभमेळा हा आमचा उत्सुकतेचा विषय होता.

वर्तमान स्थितीत दोन प्रकारची प्रसारमाध्यमे आहेत. एक आहे कुंभमेळा म्हणजे अंधश्रद्धा असा अविर्भाव आणणारा तर दुसरा प्रवाह म्हणतो की कुंभमेळा म्हणजे आस्था किंवा श्रद्धा असे मानणारा. चार वर्षापूर्वी आम्ही प्रयाग येथील कुंभमेळा अटेंड केला. अखाडे म्हणजे काय असतात हे शोधण्याचा आम्ही प्रयत्न करीत होतो. या कुंभमेळाचे सर्वसामान्यांसाठी, मध्यमवर्गीयांसाठी, साधू संतांसाठी, श्रीमंतासाठी, राज्यकर्ते लोकांसाठी, विविध स्तरावर काय फायदे तोटे असू शकतात हे शोधण्याचा प्रयत्न आम्ही करत असतो. खरोखर कुंभमेळ्यातून काय निष्पण्ण होऊ शकते? आधुनिक विज्ञानाला आणि कुंभमेळ्याला कसे जोडता येईल? त्यातून भारतीयांना, जगाला कसा फायदा होऊ शकतो असे अनेक प्रश्नांची उत्तरे शोधणे हा आमचा कार्यक्रम.

यावेळेस नाशिक येथील कुंभमेळ्यात आम्ही भलत्याच गोष्टीने प्रभावित झालो. शाही स्नानाच्या ठिकाणी, रामकुंडाजवळ आणि इतरही ठिकाणी सर्व परिसरात हिंदू जनजागृती समितीचे मराठीत लिहलेले बॅनर होते. धर्माभिमान्यांचे हार्दिक स्वागत असे तिथे लिहिले होते. हिंदू जनजागृती समितीचे लावलेले बॅनर हे विचार करायला लावणारे होते. जे लोक शाहीस्नानासाठी आलेत तेच खरे धर्माभिमानी का? हा प्रश्न विचार करायला लावणारा होता. जे लोक कुंभमेळाला

आले ते खरे धर्माभिमानी! जे नाही आले ते धर्माभिमानी नाही असा त्याचा अर्थ होतो का? कुंभमेळाच्या ठिकाणी धर्माभिमान्यांचे हार्दिक स्वागत असे माहितीपत्रक लावणे म्हणजे न येणाऱ्यांना बुचकाळ्यात टाकण्यासारखे होते.

काही दिवसांपूर्वी अशाच एका दुसऱ्या कोणत्या संघटनेने सरकारला दिलेल्या निवेदनाची कॉपी आम्हाला जयभिमवाल्या आंबेडकरी चळवळीच्या व्हाट्सअप ग्रुपमध्ये मिळाली. हे निवेदन मन विषण्ण करणारे होते. सर्व प्रसारमाध्यमांना अंधश्रद्धांचा प्रचार करायला लावावा, टीव्ही सिरीयल अंधश्रद्धांना प्रमोट करणाऱ्या बनवाव्या असेही त्या निवेदनात लिहिले होते. ते विचार वैचारिक पातळी म्हणजे बिनबुडाचीच म्हणता येईल.

जे लोक श्रद्धांना अंधश्रद्धा म्हणतात ते म्हणजे अर्धवट अभ्यासवाले वा श्रद्धांवर अभ्यास करण्याची क्षमता नसणारेच म्हणावे लागेल. भगवान गौतम बुद्धांच्या काळापासून अंधश्रद्धा निर्मूलन वर भर दिला जात आहे.

भगवान गौतम बुद्धांचा जन्म अंदाजे इ.स.पूर्व ५०० वर्षापूर्वीचा. २५ वर्षाची एक पिढी पकडली तर जवळपास शंभर पिढ्या पूर्ण झाल्या आहेत. तथाकथित अंधश्रद्धा असत्या तर कधीच्याच संपून गेल्या असत्या. या श्रद्धांचा कोणाला ना कोणाला फायदा होतो म्हणून त्या गेल्या शंभर पिढ्या टिकून आहेत. काही कर्मठ लोकांनी, जाणीवपूर्वक भक्तांनी टिकवून ठेवल्या म्हणजेच. अंधश्रद्धा टिकतील अशातील भागच नाही.

**कुंभमेळ्यात कुस्ती?**

बालपणी आम्हाला कुस्तीचा आखाडा माहीत होता. कुंभमेळ्यातील आखाडा काही वेगळा असतो. संत लोकांच्या आखाड्यात बौद्धिक, मानसिक, काहीसी शारीरिक कसरत केली जाते. आपल्या शरीरातील मानसिक बौद्धिक शक्ती कंझर्व्ह संग्रहित करुन नवीन सिद्धी शक्ती मिळविण्याचा प्रयत्न केला जात असावा. या संत साधूंनी ज्यांनी कठोर साधना केली त्यांना काही सिद्धी मिळू शकतात. त्या सिद्धीमधून एखाद्याला फायदा झाला की त्या महाराजांचे जमले. तो म्हणजे झाला मोठा महाराज! एका उत्तरभारतातील महाराजांजवळ एक मोठे मंत्री बसून दिसले. मंत्रीबुआंना महाराजांच्या सिद्धीचा फायदा झाला असावा. विनाकारण साधू महाराजांच्या भोवती फिरायला कोणाला वेळ नसतो. अमेरिकेतील आस्टीन जवळ टेक्सास प्रांतामधील बरसाना धाम मंदिरातील स्वामी प्रकाशानंद सरस्वती महाराजांपासून एका अमेरिकन व्यापाऱ्याला फायदा झाला आणि तो अमेरिकन नागरिक त्या महाराजांचा निस्सीम भक्त झाला. पिटर



स्पायमल हे त्याचे नाव.

**बॉयोमेडीकलचे सखोल संशोधन आवश्यक**

शास्त्रज्ञ जेव्हा नवीन काही शोधण्याचा प्रयत्न करतो तेव्हा त्याला खूप लोक हसत असतात. लोक विश्वास ठेवत नाहीत. आतापर्यंत विज्ञान युगाच्या गेल्या तीनशे चारशे वर्षाच्या संशोधनात पाश्चिमात्य शास्त्रज्ञ यशस्वी झालेत. आता मात्र भारतीयांचा क्रमांक आवश्यक आहे. टॅलेंटेड भारतीयांनी, ज्यांनी विज्ञानाचा सखोल अभ्यास केला असे बायोमेडीकल, इंस्ट्रूमेंटेशन, इलेक्ट्रॉनिक्स, इंजिनिअर्स, निष्णात मेडीकल डॉक्टर्स, सायकोलॉजिस्ट यांनी अंधश्रद्धेच्या क्षेत्रात उडी घ्यावी आणि नव्याने संशोधन करावे. जे साधू महाराज छोट्या मोठ्या प्रमाणात यशस्वी सिद्धी प्राप्त आहेत ते हेकड तापट स्वभावाचे वाटतात. तरी ही त्यांना सोबत मिळवून घेणे आवश्यक ठरते. ते एकत्र येतील संघटीत होऊन आधुनिक संशोधकांना मदत करतील हे फार कठीण वाटते. जे कोणते यशस्वी सिद्धी वाले महाराज आहेत त्यांच्या सिद्धी अनुरुप, योग्य परिस्थितीत, योग्य वेळेस, स्पेसिफीक कॉम्पॅटिबल मानसिकतेच्या लोकांसाठीच वर्क होतात. या गोष्टींवर सखोल संशोधन कसे करता येईल ही अभ्यासक्रमाची, संशोधनाची दिशा असावी. या जगात येणारा प्रत्येक जन हा बुद्धीमान हुशार आहे. जे भक्तगण महाराजांना मानतात ते अंधश्रद्धाळू आहेत असे म्हणणे म्हणजे अर्धवट अभ्यासाचे लक्षण वाटते. भारतीय आध्यात्मिक चळवळीतील बरेच महाराज गोऱ्यांच्या देशात यशस्वीपणे त्यांच्या विचारांमधून राज्य करीत आहेत. त्यात या आध्यात्मिक, योग सिद्धीच्या चळवळीशी खूप पाश्चिमात्य लोक जुळले आहेत. उद्या जाऊन हेच पाश्चात्य संशोधक आपल्याच पूर्वजांचे संशोधन नवीन रूपात जगासमोर आणतील आणि पैसा कमवतील. आपण भारतीय मात्र अंधश्रद्धाच्या नावाने धिंडोरा पिटत राहू अशी परिस्थिती भारतीयांची होऊ शकते.

असो, १८ सप्टेंबरला नाशिकात शाही स्नानाचे दिवशी खूप पाऊस होता. तरी ही पावसात रामकुंडात शाही स्नानकरुन, दोन चार आखाड्यांमधील साधू महाराजांची धावती भेट घेतलीच. महाराष्ट्र शासनाच्या जलप्रदाय यांत्रिकी विभागातील श्री चंद्रशेखर मडामे, त्यांचे सहकारी सतीश आणि मुकेश यांनी आम्हाला वेळेवर रेल्वे आरक्षण, गाडी व्यवस्था केली. आमच्यासाठी यांत्रिकी आखाड्यातील हेच सिद्धपुरुष महाराज म्हणता येईल.

(दि. १ ऑक्टोबर २०१५, अभयराज्य)

# ४. पूजापाठ होमहवन धार्मिक कार्याचा अभ्यासक्रम संशोधन आणि आरक्षण आवश्यक

सध्या नाशिक येथे कुंभमेळा सुरू आहे. यात परदेशातील नागरिक सुद्धा भेटी देतात. भारतीय महाराज लोकांचे अमेरिका, इंग्लंड, युरोप इत्यादी देशातही प्रभावी प्रस्थ आहे. पूजाअर्चा, होमहवन धार्मिक कार्यामध्ये काही दम आहे की नाही म्हणून भारतीयांचा भारतात गोंधळात गोंधळ चालू आहे. प्रसारमाध्यमे एका बाजूला कुंभमेळाच्या बातम्या देतात तर काही प्रसारमाध्यमे अंधश्रद्धा म्हणून टिका करतात. ज्या पिडीताला एखाद्या महाराजांचा सल्ला वा सान्निध्याने फायदा होतो तो त्याचा निस्सीम भक्त बनतो. इतर महाराज त्या भक्ताला खोटे वाटतात. आपण विश्वास ठेवतो ती श्रद्धा. इतर विश्वास ठेवतात ती अंधश्रद्धा अशी झाली व्याख्या!

हजारो वर्षाच्या इतिहासात एका पिढीने दुसऱ्या पिढीसाठी पुस्तक लिहितांना, कॉपी करताना त्या ओघात मूळ भारतीय ज्ञानाची पाळेमुळे भारतीय लोक घालवून बसले. आमच्या पूर्वजांनी संशोधन केलेल्या पूजाअर्चा, धार्मिक होमहवन इत्यादी सर्व कार्याची उत्कृष्ठता त्यापासून होणारे फायदे हे नगण्य स्वरूपाचे झाले आहेत. त्यामुळे हे या सर्व प्रचलित धार्मिक कार्ये अंधश्रद्धांमध्ये रूपांतरित होत आहेत. कंप्यूटर वा तत्सम इक्वीपमेंटची ओएस वा आपरेटींग सिस्टमची आयडीया मूळात मानवी शरीराहून कॉपी करण्यात आली. कंप्यूटर वा फोनमध्ये विन्डोज, लिनक्स, युनिक्स, अॅड्राईड अशा बऱ्याच ओएस सध्या प्रचलित आहेत. ज्या हार्डवेअरसाठी ओएस बनविली तीच तिथे चालते. वरून प्रत्येक ऑपरेटींग सिस्टमचे बरेच दर्शन आहेत आणि त्यातही छोटे छोटे प्रोग्रॅम्स, मानवी शरीर तर त्यापेक्षाही खूप कॉम्प्लेक्स आहे. प्रत्येक महाराजांचा भक्तगण वर्ग महाराजांवर निस्सीम विश्वास ठेवतो कारण त्यांना काहीना काही फायदा झाला असतो. अप्रत्यक्षपणे ढोबळ मानाने त्या महाराजांची ऑपरेटींग सिस्टम त्याच्या भक्तगणांना कॉम्पेटीबल आहे. प्रत्येक मानवी शरीर हे कंप्यूटरच आहे. कंप्यूटरची आयडीयाच मूळी मानवी शरीराहून घेतली आहे.



# ५. वाघ दूध पितो तर नाग का नाही?

लहानपणापासून जेव्हा आम्ही शाळेत जाणे सुरु करतो तेव्हापासून आम्ही जो अभ्यासक्रम शिकतो त्याचे मूळ इंग्लड–अमेरिकेतील आहे. यात काही शंका नाही की गोरे लोकांनी केलेले संशोधन, पुरावे हे वास्तविकतेवर आधारित आहेत. पण त्यांनी सांगितलेल्या शंभर पैकी शंभर ही गोष्टी सत्य असतील कशावरुन? असे कधी होईल की आम्ही भारतीयांनी संशोधन करावे आणि इतर जगातील देशांनी आमचे संशोधन अभ्यासक्रमाचे अनुकरण करावे? त्यांनी केलेल्या संशोधनांना आम्ही भारतीय का आव्हान देऊ शकत नाही? गोरे पाश्चिमात्य आपली पोळी भाजण्यात हुशार आहेत. स्वतःच्या स्वार्थासाठी काय काय उलटे सिद्ध करतील सांगता येत नाही.

आम्ही अमेरिकेत गेल्यानंतर खूप इम्प्रेस होतो. माझा जो अमेरिकन बॉस होता त्यांना मी विचारले, तुम्ही लेबर डे ठेवता, इतर सन साजरे करता मग सायंटिस्ट डे का ठेवत नाही?

या जगात जन्मलेला प्रत्येक जन सायंटिस्ट असतो. जो माणूस प्रभावीपणे वास्तविकतेला धरुन, उपलब्ध प्रचलीत संशोधनाला धरुन आपल्या शोधाचे जगासमोर मार्केटींग करतो तो शास्त्रज्ञ जगात हुडकून काढतो पण लोकांसमोर, मीडियात प्रभावीपणे मांडून समाजात अंबलबजावणी करु शकत नाही म्हणून त्याचे नाव होत नाही. जगात सर्वात श्रीमंत असलेला बील गेट्स मायक्रोसॉफ्ट सीईओ यांनी दुसऱ्या लोकांची ग्राफीकल ऑपरेटींग सिस्टीमची आयडीया चोरली. फरक इतकाच की त्यांनी जलद गतीने पैसा उभा केला. प्रोग्रॅमर्स असा सिमीलर प्रॉडक्ट मार्केटमध्ये आणायच्या आत विन्डोज ऑपरेटींग सिस्टम रिलीज केली. जबरदस्त मार्केटींग केले आणि पहिला नंबर मिळविला. त्यानंतर त्यांनी त्या प्रॉडक्टमधील अडचणी, युजर लोकांना आलेले अडथळे दूर केले आणि प्रॉडक्ट टिकवून ठेवला. शालेय वा महाविद्यालयीन कागदी मोठ्या मोठ्या डिगऱ्या तिथे पूर्णपणे कामी पडतील असे होत नाही.

**विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांना नम्र निवेदन**

भारतीय लोकशाही काही कारणांमुळे प्रभावी नाही. विद्यार्थी, पालक आणि

शिक्षक हेच भारतातील प्रभावशाली आधारस्तंभ आहेत. इंग्रज प्रणित अभ्यासक्रमानुसार आपल्याला शिकविल्या जाते. नाग दूध पीत नाही मग आपण निमूटपणे का मान्य करावे? नाग सरपटणारा मौसमी हवामान पट्ट्यातील प्राणी आहे. पाणी जरूर पीत असेल मग दूध का पिऊ शकत नाही? काही बौद्ध आचार्यांनी सिंह वाघाला दूधावरती जगविले याचे पुरावे आहेत आणि घडत आहे. झिंगाभोई वा गारोडीच्या पुंगीने नाग डोलू शकत नाही किंवा येऊ शकत नाही असे इंग्रजप्रणित अभ्यासक्रमात शिकवले जाते. पण गारूड्याने पुंगी वाजविल्यावर नाग डोलतो, संमोहित होतो वा आकर्षित होतो, असा अनुभव बऱ्याच लोकांना आला. नागाला वा सापाला कान नसतात ऐकू जात नाही असे इंग्रजप्रणित विज्ञान म्हणतो. पण निसर्गात अशाही काही स्पंदने, फ्रिक्वेन्सी असतील, असू शकतात ज्या पुंगीच्या आवाजातून जनरेट होतात आणि जमीन वा हवा वा इतर अदृश्य माध्यमातून सापापर्यंत पोहचतात. सापाला कान नसून इतरही काही भागावर वा त्वचेवर रिसीव्हर असू शकतात.

आता इंग्रजांनी अभ्यासक्रमात मांडलेल्या गोष्टींचा खोलवर अभ्यास करुन, अद्यावत तंत्रज्ञान वापरुन त्यांच्या संशोधनाला आव्हान देण्याची वेळ आहे. आज विज्ञानयुग व्हाट्सअप, फेसबुक, ट्विटर, इंटरनेट पर्यंत पोहचले आहे. आतापर्यंत आपण गोऱ्यांच्या अभ्यासक्रमाचे आदर्श शिष्याप्रमाणे अनुकरण करीत आलो. पण आपण संशोधनात नेतृत्व कधी करणार? गोरे लोक हुशार आणि आपण काय आंडूपांडूच राहणार काय? आज आपल्याला भावनात्मक भूतकाळातील बढाया मारण्यापेक्षा अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करुन इंग्रजप्रणित अभ्यासक्रमाला आव्हान देण्याची वेळ आलेली आहे आणि हे काम विद्यार्थी, पालक, शिक्षक यांच्या समन्वयातूनच शक्य आहे.

(दि. ३ सप्टेंबर २०१५, अभयराज्य)




# ६. विज्ञानयुगाच अस्तीत्व टिकविण्यासाठी गुरू शिष्य परंपरा अनिवार्य

प्राचीन पुस्तक रेफर केली तर गुरूला फारच महत्व होते असे दिसते. आज कालच्या शिक्षणात बालवाडीपासून, पाचवी, आठवी, दहावी, बारावी आणि पुढेही प्रत्येक विषयाचे शिक्षक वेगवेगळे असतात. गुरू म्हणजे शिक्षक असे म्हटले तर गुरूंची उर्फ शिक्षकांची संख्या आजच्या अभ्यासक्रमात प्रचंड होते आणि पुरातन काळात गुरूला एवढे प्रचंड महत्व का होते म्हणून प्रश्न पडतो.

खरे शिक्षण तर पुस्तकी अभ्यासक्रम पूर्ण झाल्यानंतर जेव्हा चालू होते असे म्हणावे लागेल. वेगवेगळे प्राडक्ट बनवून विकणारे, सेवा विकणारे व्यवसायिक संस्थान असो वा शैक्षणिक इंस्टीट्यूशन आपले सिनीअर वा आपले मॅनेजर हे आपल्या गुरूच्या भूमिकेत येतात. मोठ्या मोठ्या कंपण्या आपले प्राडक्टस् स्पर्धेत टिकविण्यासाठी आर.एन.डी. वा संशोधनावर प्रचंड पैसा खर्च करतात. या कंपण्यांमध्ये काम करणारे एम्प्लाई म्हणजे अप्रयत्क्षपणे विद्यार्थी असतात. जोपर्यंत पैसा पगार चांगला मिळतो, काम आवडते तोपर्यंत त्या कंपनीमध्ये एम्प्लाई कार्यरत राहतात. दहा वर्षे, वीस वर्षे वा पूर्ण आयुष्यभर एकाच कंपनीत काम करतात. आपण केलेल्या कामाचे डाक्यूमेंटेशन, नवीन आलेल्या एम्प्लाईला आपण केलेल्या संशोधनाचे ट्रेनिंग ज्ञान पास केले जाते. वर्षानुवर्षे केलेले संशोधन, अनुभव नवीन येणाऱ्या पिढीला, कमी अनुभव वाल्यांना पास करताना त्यात त्रुटी जरूर राहतात, हे जाणकारांच्या लक्षात आले असेल. विज्ञानयुगात सध्या अस्तित्वात असलेल्या प्रत्येक आटोमेटेड प्राडक्ट्स आणि सर्वीसेसची काम्पेक्सीटी प्रचंड वाढली आहे. एकदम वरच्या लेवलवर दिसण्याच्या झकपक व्हाट्सअप मागे, त्यांच्या पुर्जा पुर्जामध्ये, बरीक सारीक प्रोग्राममध्ये प्रचंड तंत्रज्ञान खोलपर्यंत लपलेले आहे. हे तंत्रज्ञान नवीन पिढीला आत्मसात व्हावे, येणारे प्राडक्ट्स टिकून रहावे म्हणून दिवसेंदिवस अभ्यासक्रमाचा सिल्याबस पहिल्या वर्गापासूनच घणदाट करण्यात आहे आणि विद्यार्थ्यांना रेसचा घोडा बनविला जात आहे.काही वर्षानंतर हे अतीउच्च स्थराला पोहचलेले तंत्रज्ञान, त्यामागील वेगवेगळे विषय, त्या टॉपिक सबटॉपिकचा ताळमेळ टिकविणे, व्यवसाईक कंपण्यांना भारी पडेल. पगारावर काम करणाऱ्या एम्प्लाईपेक्षा त्यांना साधक विद्यार्थ्यांची आवश्यकता आहे, जे पूर्ण आयुष्य अर्पण करतील. हे फक्त गुरू शिष्य परंपरेतच शक्य आहे. त्यामुळे येणाऱ्या काळात विज्ञानयुग आपसूकच गुरू शिष्य परंपरेकडे वळणार आहे.

# ७. अंधश्रद्धा विरोधकांनो सावधान!

## नरेंद्र दाभोळकर, गोविंद पानसरे यांचे नंतर कोणाचा नंबर



नरेंद्र दाभोळकर आणि गोविंद पानसरे यांचे मारेकरी का पकडल्या गेले नाहीत म्हणून मीडियामधून टिका टिप्पणी प्रसारित होत असतात. भोंदूगीरी, अंधश्रद्धा, तंत्रमंत्रला साथ देणाऱ्या लोकांनीच यांना मारले असावे असा आव आणला जातो. असतीलही, हा भाग वेगळा! अंधश्रद्धा धागेदोरे ताईतवाले एवढे शक्तीशाली आहेत का की शक्तीशाली पोलीस यंत्रणेच्या पकड आवाक्याबाहेर असू शकतात?

मूळात इंग्रज युरोपीयन गोरे लोक लबाड आहेत असा अनुभव भारतीयांना आधीपासूनच आहे. दाभोळकर आणि पानसरे यांना मारण्याचे प्लॅनींग उच्चस्तरावर इंग्रजांनी केले असावे अशी शंका येते. याला कारणेही तशीच दिसतात. जरा पुढे वाचा!

दाभोळकर वा पानसरे यांना मृत्यूआधी विदर्भातील फार कमी लोक ओळखत होते. दाभोळकर वा पानसरे यांच्यावर हल्ला झाल्यावर सिस्टीमॅटीक पद्धतीने दूरदर्शन, रेडिओ, व्हाटस्अप, फेसबुक सर्व प्रकारच्या प्रसारमाध्यमांद्वारा ही बातमी प्रसारित करण्यात आली. एकदम सुनियोजीत पद्धतीने!

नागपूरकर सहसा शाम मानव यांना जाणतात. मीडिया इतकी शक्तीशाली आहे की एका दिवसात एखाद्या झिरोला ही हिरो बनवू शकते. कृपया आमच्या बोलण्याचा चुकीचा अर्थ काढू नये. दाभोळकर आणि पानसरे यांच्या मृत्यूची बातमी सर्वही प्रसार माध्यमांत पोहचविण्याचे सुनियोजीत प्लॅनींग एकाच समाजघटकाकडून झालेले असल्याची शंका येते.

गृहमंत्रालयाने संशयाची सुई उलट्या दिशेने फिरविली की मारेकरी शोधणे अगदी सोपे होऊ शकते. अंधश्रद्धा निर्मूलन वर काम करणाऱ्यांना मारायचे म्हणजे



शासन अंधश्रद्धा निर्मूलनवर, अंधश्रद्धा निर्मूलनासाठी कायदे बनवील आणि त्यावर भर देऊन प्राचीन योगविद्या सुफडासाफ करणे हा या समाजकंटकांचा उद्देश असू शकतो.

**इंग्रजांनी दाभोळकर पानसरेंना का मारावे?**

अमेरिकन युरोपीयन इंग्रज बाजारपेठ जागतिक नेतृत्व करीत आहे. आयटी आणि सर्वच्या सर्वही तंत्रज्ञानात खूप प्रगती झाली आहे पण तळपातळीवर खूप कॉपेक्सीटी अतीभयंकर वाढली आहे. सात–आठ–दहा पिढ्यांच्या सरळ रेषेतील संशोधनानंतर व्हाटस्अप रोबोट इत्यादीपर्यंत पोहचलेले तंत्रज्ञान पुढची पिढी मेंटेन करणे फारच कठीण आहे आणि युरोप अमेरिकनला नेहमीची जागतिक नेतृत्वाची सवय आहे. आज अमेरिकेचे इमीग्रेशनचा डाटा असलेले सर्वर पंधरा दिवसासाठी बंद पडलेत. उद्या कायमचेच बंद पडतील अशी पक्की शंका इंग्रजांना आली आहे. कारण हे अत्याधुनिक अति उच्चस्तरावरील तंत्रज्ञान टिकवून ठेवणे दिवसेंदिवस फार कठीण होत आहे.

कधीतरी प्राचीन भारतात विज्ञानयुगासारख्या इतरही दुसऱ्या युगाची निर्मिती आणि अस्त झाला होता हे त्यांना कळून चुकले आहे. आज हे काही तंत्र, मंत्र, जादू टोणा, आयुर्वेद, योग विद्या थोड्या थोडक्या निग्लीजीबल प्रमाणात टिकून आहेत ते समूळ नष्ट व्हावे हा इंग्रजांचा उद्देश असू शकतो.

भारतातील विद्या रामायण काळापासून, महाभारत काळापर्यंत टिकल्या तरी होत्या कारण त्यांनी गुरू शिष्य परंपरा वापरली होती. पण आताच्या नासा व तत्सम इंस्टीटयूट मध्ये आयुष्यभर संशोधन करणारे लोक एका कंपनीतून दुसऱ्या कंपनीत जातात आणि नवीन येणाऱ्या एम्प्लाईला ते संशोधन सखोल अभ्यासासहित टिकवून ठेवणे अशक्य आहे. ही अति अत्याधुनिक तंत्रज्ञानाची गुंतागुंत कधी कोलॅप्स होत जाईल हे सांगता येत नाही.

भारतीयांना तंत्र, मंत्र, जादू टोणा, योग विद्या ला संशोधनात्मक वृत्तीने बघून टॅलेंटेड विद्यार्थ्यांचा भरणा तिकडे कसा होईल हे करणे अती आवश्यक आहे. आज आमचा आयुर्वेदचे पुरातन संशोधन चोरुन गोरे संशोधक लोक हर्बल मेडीसीन म्हणून बाजारपेठ निर्माण करुन जागतिक नेतृत्व करीत आहेत. भारत शासनाने भारतीयांची जुनी धार्मिक इतरही आऊटडेटेड वाटणारी पुस्तके अभ्यासक्रमात पुरस्कृत करणे अती आवश्यक आहे. धार्मिक पुस्तकांचा शैक्षणिक अभ्यासक्रमात सहभाग न व्हावा म्हणून राज्यघटनेत उल्लेखिलेले कलम बदल करण्याची वेळ जवळ आली आहे असे मानायला हरकत नाही.

(दि. ६ ऑगष्ट २०१५, अभयराज्य)

# १. बहुजन समाज एकत्र येऊ शकतो का ?

आंबेडकरी समाज आणि इतर बहुजन समाज एकत्र येणे सोपे नाही. जे कोणते याआधी प्रयत्न झाले. त्यात मेळावे मोर्चे प्रचंड संख्येने झाले, टाकळी प्रचंड प्रमाणात एकत्र झालेली दिसली पण टाळक्यातील मेंदू मात्र एकविचारी झाले नाहीत. फक्त स्टेजवर गोष्टी मोठ्या मोठ्या होतात, एकत्र आले तर असे होईल, तसे होईल, वंचित बहुजनाची सत्ता येईल इत्यादी इत्यादी. आंबेडकरी समाज आणि इतर बहुजन मनाने एकत्र यायला काही कारणे आहेत.

खरोखर जर आंबेडकरी समाजवर्गला इतर सर्वांना जुळून राहायचे असेल तर देव/हिंदू धर्मवर टीका टाळणे फार आवश्यक आहे. बाबासाहेबांनी धर्मांतरची घोषणा येवला नाशिक येथे १९३५ मध्ये केली. प्रत्यक्ष धर्मांतर १९५६ मध्ये केले. त्यांना धर्मांतरचा निर्णय घ्यायला २१ वर्षे लावले आणि कट्टर आंबेडकरी वर्ग इतर हिंदूधर्मीय लोकांच्या भावना दुखवायला मागेपुढे पाहत नाही. कट्टर आंबेडकरी बहुजनांच्या भावना दुखावल्या तर बहुजन तुम्हाला कसे जुळतील आणि जी आघाडी तुम्ही बनवायला चालले ती कशी बनेल???

जर गावातल्या एका नागरिकाने मागणी केली आणि ग्रामपंचायतने मान्य करुन अमलात आणली तर श्रेय कोणाला जाते? सरपंचाला की मागणी करण्याला नागरिकाला? दोघांनाही! बाळ आईच्या पोटी जन्माला आला तर श्रेय फक्त आईलाच जाते का? बाबासाहेब आंबेडकरबद्दल आपण सर्वांना प्रचंड आदर आहे पण एकतर्फी विचारांच्या पोस्ट, एक दुसऱ्यामध्ये तिटकारा निर्माण करतात, मागासवर्गीय समाजाची विभागणी करतात आणि ब्राह्मणवादी लोकांचा फायदा होतो.

बाबासाहेबांनी मागासवर्गीयांसाठी आरक्षणाची नीव घातली. त्यामुळे बहुजनांना प्रचंड फायदा झाला. याची पुरेपूर कल्पना बिगरआंबेडकरी बहुजनांना आहे. संविधान लिहिणे असो वा आरक्षण, बाबासाहेबांनी जी कामे केली ते खरं तर संघटन कार्य होते. फक्त एकट्याचे काम नसून टीमवर्क होते. जर आरक्षणाची मागणी बाबासाहेब यांनी लावून धरली तरी आरक्षण मान्य करणारे, टिकवून धरणारे सत्ताधारी महात्मा गांधीच्या काँग्रेसचे शासन होते. पण कट्टर आंबेडकरी



समाजबांधव सर्वच काही बाबासाहेबांनी केले असे ठासून सांगतात आणि तेच तेच परत परत सांगतात. बरेचदा एकतर्फी विचारांची लय असते. तेच तेच ठासून सातत्याने सांगितल्याने बिगरआंबेडकरी समाजबांधवांच्या मनात तिटकारा निर्माण करतात. त्यातून नकारात्मक प्रतिसाद तयार होतात. इतर मागासवर्गीयाच्या मनात नकारात्मक अभिप्राय निर्माण होतात. याच नकारात्मक रिफ्लेक्शन मधून बिगर आंबेडकरी वर्गाच्या मनात अनावश्यक तिटकारा बाबासाहेबांबद्दल तयार होतो. एकदुसऱ्याचे मन कलुषित होते आणि त्यामुळेच आंबेडकरी आणि बिगर आंबेडकरी बहुजन मनाने एकत्र येण्यास अडथळे येत आहेत. उलट आपसी फाटाफूट जास्त होत आहे. बोलताना मर्यादा ठेवणे आणि संघटनचे भान ठेवणे हे सर्वशाखीय बहुजन आणि एकदुसऱ्यांना फार आवश्यक आहे. जेव्हा सर्वांच्या टाळक्यातला अहंकार व मीपणाचा नाश होईल त्या वेळेस हे संघटन शक्य होईल. प्रस्थापित पक्षवाल्यांना वंचित समाजाचे प्रश्न कळत नाहीत.

# २. एक अनोखी कविता
# माझ्या जयभिम मित्रा !

जयभिम मित्रा !

सतराशेच्या काळात औद्योगिक क्रांती झाली. नवीन नवीन प्रकारचे शोध लागले. भौतीकशास्त्र, रसायनशास्त्र, यांत्रिकीशास्त्र इत्यादी हे आधुनिक विज्ञान विषय उभे राहिलेत, औद्योगिकरणामुळे नवीन प्रकारचे व्यवसाय निर्माण झाले. व्यावसायिक शिक्षणाची नवीन प्रणाली अस्तित्वात आली. त्या आधी भारतातील शिक्षण म्हणजे पोथी पुराण, पूजा पाठ, प्रवचणे या पलिकडे नव्हतेच. मेलेली ढोर ओढणारे आमचे पूर्वज कष्टाने मिळवून खातो म्हणून स्वाभिमानी होते. ब्राह्मणांसारखे पूजापाठ करुन भिक मागणे इतरांना आवडतच नव्हते. त्यामुळे पोथीपुराणवाल्या शिक्षणात इतर कोणीही इंटरेस्टच घेत नव्हते. ना दलितांना होता, ना बहुजनांना इंटरेस्ट होता, ना बायकांना त्या पौराणिक शिक्षणात! स्त्री-शिक्षण, मागासवर्गीयांना शिक्षणाच्या चळवळी त्यानंतरच उभ्या झाल्या १८२५ च्या काळानंतर. मग आमच्या पूर्वजांनी आम्हाला शिक्षणापासून वंचित ठेवले कसे म्हणता? पोथीपुराणावाचून, पूजाअर्चा करुन भिक मागून जगणाऱ्या ऐतखाऊ आळशी दिसणाऱ्या ब्राह्मणांपेक्षा आम्ही मेलेले ढोर ओढून कष्ट कमवून जगणारे श्रेष्ठ! म्हणून आमच्या पूर्वजांनी पुरातन पोथीपुराणवाल्या, पंचागवाल्या शिक्षणात इंटरेस्ट घेतलाच नाही हे आम्ही कसे विसरलो?

माझ्या आंबेडकरी मित्रा,

ज्या महात्मा गांधींनी राज्याराज्यात विखुरलेल्या लोकांची मन एकत्र आणली. भारताला स्वातंत्र्य मिळविण्यात महत्वाचा हातभार लावला, दलितांना एकत्र घेवून चालण्याचा प्रयत्न केला, त्यांचेवरही तुम्ही आगपाखड करता? महात्मा गांधीमुळे स्वातंत्र्य मिळण्यास मदत झाली. त्यामुळेच बाबासाहेबांना संविधान लिहिता आले, हे जगजाहीर आहे. असे असूनही तेच तेच घोटून बहुजनांच्या मनात ओकारी येईपर्यंत तिटकारा निर्माण करता. महात्मा गांधींनीही दलित उद्धारासाठी प्रयत्न केले असे बाबासाहेबही मानतात पण तुम्ही चुकीची पूंगी वाजविता. ज्या महात्मा गांधींचा राजकीय दबदबा एवढा होता की त्यांचे नाव वापरुन चालणाऱ्या काँग्रेसला सत्तर वर्षे कोणी हटवू शकले नाही. त्या



पावरफूल माणसाला तुच्छ लेखून स्वतःचे वेगळेपण का दाखविता? आम्हाला राज्यकर्ती जात बनवायची आहे, असे बाबासाहेबांनी भिंतीवर लिहून ठेवायला सांगितले. प्रत्यक्षात अंमलात आणायला सांगितले नाही का? तुम्ही जर दुसऱ्याच्या भावना दुखवाल तर तुम्हाला कोणी बहुजन मत देणार का? आणि तुम्ही निवडून येणार का? बाबासाहेबांनी बनविलेल्या संविधानानुसार बहुमताने निवडून यावे लागते. बहुजनांच्या भावना दुखावून तुम्ही निवडून येणार नाही आणि बाबासाहेबांचे वाक्य भिंतीचे भिंतीवरच राहील.

माझ्या दलित मित्रा,

जे देव कितीतरी शतके वर्षेपासून आमच्या मनात, घरात, देव्हाऱ्यात असतात. त्यांच्यावर तुम्ही सर्रास टिका करता. पिढ्यानपिढ्या गेल्या, आमचे देव कोणी हटवू शकले नाहीत. तर तुम्ही अनाप-शनाप बकण्याचे काम करता. कोणाच्या बापाची हिंमत आहे आमचे देव हटविण्याची? मग तुम्ही देव हटण्याची भाषा करता? अशा दुसऱ्याच्या भावना दुखावून तुम्ही बहुजनांशी जुळवून घेणे शक्यच नाही. या जगात बहुजनांनाही पुस्तक वाचता येतात, तेही हुशार आहेत. हे का विसरता? त्यांच्यावर आपलेच विचार आणि ज्ञान थोपविण्याचा प्रयत्न करता, माझेच बरोबर माझेच बरोबर असा आव आणून बहुजनांच्या मनात तुमच्याबद्दल तुम्हीच तिटकारा निर्माण करता. बहुजनांच्या मनात वेध घेवून त्यांच्या विचारसरणीचा अभ्यास करुन त्यांना तुम्ही तुमच्यात मिळवून घ्याल तेव्हाच दलितसमाजाचे लिडर बहुमताने निवडून येतील आणि आपली जात एक राज्यकर्ती जात म्हणून उदयास येईल की नाही?

माझ्या प्रिय दलित मित्रा,

साहेबांचे साहेब बाबासाहेबांबद्दल आम्हालाही खूप आदर आहे. आम्ही त्यांचे ऋणी आहोत. अख्खे भारतवासी त्यांना सलाम करतात. आम्हालाही मान्य आहे की दलित पिडीत बहुजन समाजाची बाजू त्यांनी राज्यकर्त्यासमोर प्रखरपणे मांडली. आरक्षणाची मुहूर्तमेठ त्यांनीच रोवली पण काँग्रेसच्या राज्यकर्त्यांनी त्यांचे मागणीला साथही दिली हे आपण विसरावे का? मागणी करुन काम भागत नाही, सत्ताधारी यांनी ती मान्य करुन अंमलबजावणी करावी लागते, हे खरं आहे ना? महात्मा गांधीचे चेले, काँग्रेसवाल्यांच्या हातात शासन इतके वर्षे होतेना, त्यांनी सुद्धा आरक्षण लावून धरले हे तितकेच खरे आहे ना? मग एकतर्फी बोलण्यापेक्षा सर्वांगाने बोलबाला झाला तरच बहुजन समाज आपल्या सोबतीला येईल ना!

माझ्या आंबेडकरी प्रिय भाऊ,

तुझ्या माझ्या समस्या एकच आहेत. या भारत वर्षात कधीतरी जाती कर्मावरुन पडत होत्या म्हणजे आपण एकाच मायबापाला जन्मलो होतो. भाऊ म्हणून एकाच परिवारात वाढलो होतो आपण एकाच कुळामधले. आपण एकाच रक्तातले! फक्त धर्मांतर केले म्हणून आपली भाऊ बंदकी तुटली नाही ना! चल आपण एकच मूळ बांधू. एकत्रित राज्य करू आणि आपल्या भारतमातेला जगात बलवान बनवू! आपण आपला देश जगात प्रथम क्रमांकाचे बलाढ्य बनवून जागतिक नेतृत्व करण्याची शपथ घेवू.

माझ्या प्रिय जयभिम मित्रा,

या भारतवर्षात कधीतरी तुम्हा आम्हावर अस्पृश्यतेच्या नावाखाली अन्याय झाला. तुम्हा आम्हा बहुजनांच्या वस्त्या वेगळ्या होत्या. सवर्ण दलितांच्या वस्तीत जात नव्हते, दलित सवर्णांच्या वस्तीत जात नव्हते. आमची मंदिरे वेगळी वेगळी होती. वर्षानुवर्षे आमच्यावर आपल्यावर अन्याय झाला भेदाभेद झाला. पण असे का व्हावे? आमच्या वस्त्या का वेगळ्या व्हाव्या? आमचे बोलणे चुकीचे होते का? आमचे राहणे गलिच्छ होते का? आम्ही शिव्या देवूनच जगत होतो का? आमच्या पूर्वजांनी हे सर्व का चालवून घ्यावे? पण तरीही गुण्यागोविंदाने वर्षानुवर्षे आपण एकत्र कसे नांदलोत? तरीही मध्ययुगीन काळात एक दुसऱ्याची साथ ठेवून बाहेरच्या आक्रमकांविरूद्ध का झगडलेत? स्पृश्यापृश्य हा भेदाभेद सर्वमान्य झाला होता का? म्हणजेच हा भेदाभेद आणि अस्पृश्यतेला समाजातला कोणताही फक्त एक घटक कारणीभूत नव्हता. चुका आम्हा सर्व घटकांच्या, जमातींच्या जातीच्या सर्वांच्याच असाव्यात ना! कोणत्याही एका घटकालाच दोष का म्हणून द्यावा? आणि नवीन भेदभाव का म्हणून वाढवावा? आमच्यात परत फाटाफूटीला थारा का म्हणून मिळावा?

माझ्या प्रिय बंधु,

ब्राह्मण समाज अजूनही उच्चवर्णीयच आहे. अमेरिकेत ब्रिटनमध्येच संघाच्या शाखा नियमित होतात, तेथेही दुसऱ्या देशात विना रिझर्वेशन अमेरिकेतही ते पदावर आहेत. तिथेही इतकी धास्ती निर्माण केली. अमेरिकन यंत्रणा घाबरुन भाजप संघाची जासूसी करतो. इंग्रजांचा काळ असो, मोगलांचा असो, मराठ्यांचा असो, अप्रत्यक्षपणे ब्राह्मणच का राज्य करीत आहे? जरी ते डेशिंग दिसत नसले शारीरिक ताकदवर डेरिंग नसली तरी त्यांचे उत्तम संवाद कौशल्य, त्यांच्या शब्दातला गोडवा, स्तुती करुन काम करवून घेणे, तोंडावर टिका न करण्याच्या



त्यांच्या वृत्ती, त्यांची उलटे उत्तर न देण्याची वृत्ती, त्यांच्यातील पेशन्स, प्रत्यक्षपणे दुसऱ्यांचे मन न दुखावणे, सकारात्मक विचाराने प्रश्न सोडविणे, संघटन कौशल्याला पुरक वृत्ती या त्यांचेकडे आहेत. यामुळे ते जागतिक नेतृत्व करीत आहेत. आपल्याला उच्चवर्णीय बनायचे असेल तर आपणही तसेच करावे लागेल. फक्त डेशिंग असून चालणार नाही त्यांच्यातील वृत्ती आम्हाला घ्याव्या लागतील. आमच्या नकारात्मक वागण्याने उतरुन बोलण्याच्या सवयीने उलट आमचेही आम्हाला साथ ना देई. कारण हा रिझर्वेशनचा टेकू हा शतकानुशकतके पुरुन उरणारा नव्हे...

– तुझाच, बहुजन मितुर.

## ३. दुसऱ्या बाबासाहेब आंबेडकरांची गरज



आरक्षण मागास समाजातील पिडीत, गरीबांना, वंचित लोकांना, खरोखरच मिळते आहे? की मागासवर्गीयांमधील श्रीमंत लोकांची मुले तेवढी आरक्षण एंजॉय करीत आहेत? हा प्रश्न तितकेच महत्वाचा....? मागासवर्गीय लोकांपैकी खरोखरच गरीब पिडीतांसाठी दुसऱ्या बाबासाहेब आंबेडकर यांी गरज वाटते आहे का? असा प्रश्न आम्ही व्हाट्सअप ग्रुपमधील आरक्षणाचा लाभ घेतलेल्या आमच्या बांधवांना केला.

बाबासाहेबांचे नाव घेऊन आम्ही खूप मोठ्या गोष्टी सांगतो. आपल्या मुलाच्या मुलीच्या नोकरीची वा शैक्षणिक प्रवेशाची वेळ आली की श्रीमंत असूनही आरक्षणाचा लाभ घेतो. आपण बाबासाहेबांच्या विचारांना खरोखरच धरुन चालतो आहोत का? प्रश्न मागासवर्गीयांमधील उच्चवर्णीयांना आणि श्रीमंतांनी करावा. मागासवर्गातील वंचित पिडीतांचा हे मध्यमवर्गीय वा श्रीमंत विचार करीत नाही आहेत?

यात काहीच शंका नाही की अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती तसेच भोई भटक्यांसाठी आरक्षण असायला पाहिजेत. उच्चवर्णीयांनी आरक्षणावर टिकेची झोड उठविण्यापेक्षा अजूनही गरीब हलाखीत जगणाऱ्या भोई भटक्या, अनुसूचित जाती जमातींचा विचार करावा.

भोई भटक्या, अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीमध्ये मोठ्या प्रमाणात अजूनही मागासलेपणा आहे. भाजपा शासनाने भोई भटक्या आणि इतर मागासवर्गीय जाती जमातींचा आरक्षणाची वस्तूस्थिती समजून घ्यावी. मागसलेपणा, आर्थिक दुर्बलता, सामाजिक अलिप्तता, अज्ञान, अनभिज्ञता, बुजरेपणा असे बॅकग्राउंड असलेल्या भारतीय विद्यार्थ्यांना आरक्षणाची नितांत आवश्यकता आहे. आरक्षण हे काही दीर्घकालीन सोल्यूशन नाही हेही तितकेच खरे. उच्चवर्णीयांमधील समाजातील दोन–चार गरीब मागासलेल्या कुटूंबीयांचे उदाहरण देऊन उच्चवर्णीयांनी आरक्षणाचा विरोध करु नये.



## ४. माझ्या जयभीम मित्रांनो !

संविधान हे भारतीयांचे आहे, भारतीयांसाठीच आहे. सर्वांनी संविधानाचा respect करायला पाहिजे. जो respect करत नाही तो भारतीय नाही. हे एकदम बरोबर आहे. कोणीतरी एका माणसाने संविधान विरोधी घोषणा दिल्या, संविधानच्या प्रति जाळल्या म्हणून संविधानाला काही होणार नाही. त्यामुळे जास्तच भावनिक, क्रोधीत होऊन आपल्यातील काही सवर्ण व उच्चवर्णीय नेत्यांना शिवीगाळ करता हे सुद्धा योग्य नव्हे. त्यामुळे बहुजन वर्गामध्ये फाटाफूट होऊ शकते आणि इतरांना फायदा होऊ शकते. हेतुपुरस्सरपणे कोणी असे करू नये.

संविधानामुळे फक्त बहुजनांना आरक्षण मिळाले, त्यामुळे आमच्या मुलांचा scope कमी झाला, आमचा मुलगा एकाच वर्गात असून मागासवर्गीय मुलापेक्षा जास्त मार्कस् मिळूनही त्याला पापूलर अभ्यासक्रमाला मुकावे लागते. त्यामुळे त्या द्वेषभावनेतून उच्चवर्णीय आंदोलन करतात हे खरे आहे. एकाच ऑफिसमध्ये आमच्यापेक्षा कमी मार्क्स मिळालेले, कमी शिकलेले लोक आरक्षणामुळे, नोकरीला लागले, आमचे मॅनेजर आहेत, त्यांचे हाताखाली आम्हाला काम करावे लागते ही भावना काही उच्चवर्णीयांमध्ये तयार झाली हे सुद्धा खरे आहे. पण आधीच्या काळात हजारो वर्षे पूर्वीपासून उच्चवर्णीय लोक, मागासवर्गीय लोकांचे शोषण करीत होते, आता तसे करता येत नाही. त्यामुळे संविधानाला oppose होतोय हे पूर्ण खरे नाही.

पण माझ्या मते आमचे सुद्धा काहीतरी चुकतेय. आम्ही बाबासाहेब आणि संविधानचा इतका गवगवा करतो की पुढचा माणून विटून जातोय. याचे सुद्धा भान आम्ही ठेवायला पाहिजे. संविधान आणि बाबासाहेबांबद्दल सर्वांनाच आदर आहे. पण आम्ही कळत नकळत इतकी स्तुती करतोय, इतकी करतोय की तटस्थ विचाराचे लोक सुद्धा मग एका क्षणापासून तिरस्कार नोंदवायला लागतात. याचे भान ठेवणे फार आवश्यक आहे.

संविधानात काळानुसार बदल करण्यासाठी तदतुदी सुद्धा दिल्या आहेत. तुम्ही वाईट वाटू नका पण भारतीयांच्या मानसिकतेनुसार, भारतातील लोकशाही सक्षम

होण्यासाठी काही बदल जरूर पाहिजेत. पोलीस यंत्रणा पैसे घेऊन पुरावे बदलते, गुन्हेगार सुटतात, भ्रष्टाचार प्रचंड बोकाळलाय. ऑफीसर लोकांना भ्रष्टाचार हा हक्क वाटतो. नेते निवडणूकीत मत मिळण्यासाठी पैसे वाटतात. मग संवैधानिक निवडणूकीचा अर्थच काय उरला? overall ही लोकशाही गरिबांसाठी नाहीच असे वाटत आहे. कर्मचारी लोकांच्या माध्यमातून मंत्री पैसे जमा करतात असा पक्का आरोप आहे. हे प्रश्न सोडविण्यासाठी पोलीस आणि न्यायपालिकेचे विकेंद्रीकरण करुन वार्ड पातळीवर न्यायपालिकेचे अधिकार, पोलिसांचे अधिकार controlled आणि calculated way नी गावकऱ्यांच्या हातात द्यावे लागतील. खोटारड्या लोकांना पुरावे, साक्षी बदलण्याची संधी मिळायलाच नको. संविधानात तसे बदल करावे लागतात. मी माझ्या लेखातून, साप्ताहिक मधून सरकार पर्यंत पोहचविण्याचा प्रयत्न केला. शून्यातून का होईना ही बाब लोकांपर्यंत पोहचविण्याचा प्रयत्न करीत आहो. सहज माहितीकरिता सांगत आहो. आपण सर्वांची साथ आली तर हा प्रश्न सुटू शकतो.

मला म्हणायचे हे आहे की, माझ्यासारख्या बहुजनाने संविधानात छोट्या मोठ्या दुरुस्तीची मागणी घातली तर त्याचा चुकीचा अर्थ करू नका. आरक्षणाची नीव बाबासाहेबांनी घातली, मी सुद्धा एक बहुजन आहे. आरक्षणचा फायदा मिळाल्यामुळे मला इलेक्ट्रॉनिक्स Engineer होता आले. त्यामुळेच मला अमेरिकेत दहा वर्षे नोकरी करण्याची संधी मिळाली. अमेरिकन लोकांच्या मानसिकतेचा जवळून अभ्यास केल्यानंतर मला आपल्या संविधानात बदल करण्याची आवश्यकता आहे हे माझे पक्के मत आहे, कृपया गैरसमज करुन घेऊ नये.

(दि. १३ ऑगष्ट २०१८, विमुक भटकंती)



# ५. विनम्र अभिवादन आणि संविधानाचे धिंडवडे!!!

६ डिसेंबर २०१९ संविधान मसुदा समितीचे अध्यक्ष म्हणजे भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची पुण्यतिथी!! बाबासाहेब यांना विनम्र अभिवादन!!!

याच दिवशी हैदराबाद पोलिसांनी गँगरेप आणि मर्डर केस मधील आरोपींचे एन्काऊंटर केले. त्या निमित्ताने संविधानातील मूलतत्त्वांचे धिंडवडे उडविण्यात आले आहेत.

कायदेकानून व्यवस्था अकार्यक्षम ठरत आहे. जनता कंटाळलेली आहे म्हणून पोलिसांनी आपल्या हातात कायदा घ्यायचा आणि लोकांची वाहवा मिळवायची हे कितपत योग्य आहे? हेच पोलीस, यांच्यातील काही पैसे घेऊन पुरावे बदलतात आणि कायदेव्यवस्था फेल करतात, गुन्हेगारांना संरक्षण देतात. आजपर्यंत या पोलिसांच्याच भाऊबंद पोलिसांनी जिकडून पैसे मिळाले त्यांना साथ देऊन गरीब निरपराध लोकांवरील अन्याय अत्याचारच्या केस दाबल्या आणि धनदांडग्यांना साथ दिली आहे. गुन्हेगारी फोफावण्यास मदत केली आहे. उद्याही तसेच करणार नाहीत कशावरुन ?

६ डिसेंबर ला घडलेले एन्काऊंटर योग्य की अयोग्य? या वादविवाद पेक्षा ही सिस्टिम, लोकशाही व्यवस्था कशी फिक्स होईल, करता येईल अशा घटना घडविण्याची पाळीच यायला नको, यावर आपल्या सर्वांची विचारांची दिशा आणि कृती अपेक्षित आहे.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या ग्रामगीता ग्रंथ मधील ग्रामव्यवस्थेमध्ये दिलेल्या गाईडलाईननुसार भारतीय संविधानात दुरुस्ती केली आणि टप्प्या टप्प्यात जर पावलोपावली खात्री करीत अंमलबजावणी केली तर भारतीय लोकशाही आणि न्यायपालिका फिक्स करणे शक्य आहे.

(दि. ६ डिसेंबर २०१९, विमुक भटकंती)

# ६. भारतीयांची गुलामगिरी कधी संपणार? जाणता राजा शिवाजी महाराजांची आजही गरज?

या जागात जन्मलेला प्रत्येक जण हुशार टॅलेन्टेड असतो. प्रत्येक जणाला वाटातो आपण हुशार आहोत. प्रत्ये जण हुशारही आहे. शिवाजी महाराज कोणाला माहित नाही. शालेय अभ्यासक्रमातील पाठ्यपुस्तकात त्यांचा इतिहास शिकवला जातो आणि खुप सारी पुस्तकही त्यांच्यावर लिहिल्या गेली. या जगात जन्मणारा प्रत्येक मानव हुशार असला, तरी प्रत्येकाचे आकलन, त्यांचे विचार, दृष्टीकोण, प्रत्येकाचे अंडरस्टँडिंगमध्ये फार विविधता आहे. एक दोन वाक्यात शिवाजी महाराजांच्या कर्तृत्व वा अचिव्हमेंट विषद करा असे सांगितले तर काय सांगता येईल, कोणत्याही असामान्य महापुरुषांचे यश आणि कर्तृत्व त्यावेळेसची लोकांची परिस्थिती, तो काळ, न्याय, अन्याय, लोकांमधील आपआपसातील भेदभाव लोकांच्या मनातील घुसमट यावर आधारीत दिसून येते.

### लाचार हिंदूंचा पूर्वइतिहास

इ.स. ६०० च्या काळात मुस्लीम धर्म अरब स्थानात उदयाला आला. एका हातात कुराण दुसऱ्या हातात तलवार घेवून धर्मप्रसाराने झपाटलेला कट्टर मुस्लीम अनुयायी इ.स. ९०० च्या काळात भारतात दाखल झाले. त्यांनी भारतात येवून दिल्लीचा पाडाव केला. पृथ्वीराज चव्हाणचा (इ.स. ११९२) पाडाव केला. रामदेवरायांचा (इ.स. १३१२) पाडाव केला. दक्षिणेतील कृष्णदेवरायाचा (इ.स. १५३०) पाडाव केला. सर्व हिंदू राज्यकर्त्यांचा पाडाव झाला आणि या कट्टरांनी विरोध करणाऱ्या भारतीय हिंदूंना पाहिजे तसे कापून काढले. जबरदस्ती हिंदूंचे धर्मांतरे करण्यात आली. हिंदू मुलींवर बायकांवर बलात्कार केले. पळवून नेल्यात. मुस्लीम सैनिक म्हणजे शूर, लढवय्या, आक्रमक, चपळ, धाडसी, विश्वासघातकी, फसवा आणि हिंदू सैनिक म्हणजे भेकूड, भित्रा, सत्यवादी पण त्यांचा कोणी पाठिराखा नाही, अशी परिस्थिती बनली होती. ज्या कोणी हिंदू सरदारांनी बंड करुन स्वतंत्र राज्य स्थापन करण्याचा प्रयत्न केला, त्यांना लगेच कठोरपणे कापून क्रूरपणे संपविण्यात आले. नागपूर इलाक्याचे गोंड राजे आणि इतरही अनेक हिंदू राजांनी आपले राज्रू मुस्लीम राज्यकर्ते हिसकावून टाकतील म्हणून, धर्मांतरे केली. सर्व हिंदूंची मानसिकता बनली होती की, आपला कोणी



वाली नाही. प्रत्येक स्वाभिमानी मनात मुस्लीम राज्यकर्ते, मुस्लिमांच्या विरोधात अन्यायाची आग घुसमत होती, पण कोणी काही करु शकत नव्हते. हिंदूंनी स्वाभिमानाचा आवाज उठवणे म्हणजे आत्महत्याच करण्यासारखेच होते. संख्येने बहुसंख्य असलेला हिंदू लाचार होऊन बसला होता. त्यांचे पाच काय, दोन तरी सैनिक असले तरी, दहा हिंदू सैनिक उठून पळत होते. जे कोणते शूर लढवय्ये हिंदू राजे मुस्लीम राज्यकर्त्यांच्या हाताखाली काम करीत होते, त्यांना ब्राह्मणांच्या शेंड्या पकडता येत होत्या पण, मुसलमानांच्या दाढ्या नाही.

### महाराजांनी केले हिंदूंच्या मनोदशेचे परिवर्तन

शिवाजी महाराजांवरची बरीच नवीन, जुनी, मराठी, इंग्रजी, हिंदी बरीच पुस्तके मल्टीपल टाईम्स वाचल्यानंतर एक महत्वाचा सार आमच्या लक्षात आला. शिवाजी महाराजांना मुस्लीम राज्यकर्त्रे मुस्लीम सैनिकांचे रहस्य लक्षात आले होते. शिवाजी महाराजांनी मराठी हिंदू सैनिकांचा लोकांचा मर्मभेद करुन नवीन आत्मविश्वास, धाडस त्यांच्यामध्ये नवीन जोश निर्माण केला. आधी पाच मुस्लीम सैनिकांसमोर असलेले दहा हिंदू सैनिक उठून पळायचे. महाराजांनी समीकरण बदलले शिवाजी महाराजांचे मरहट्टे इतके जिवट बनले होते की, पाच मराठा हिंदू सैनिकांसमोर असलेले दहा मुस्लीम सैनिक उठून पळायला लागले होते. ढोबळ मानाने मुस्लीम सैनिक म्हणजे मुस्लीम राज्यकर्त्याचे अखत्यारीतील सैनिक. ढोबळ मानाने हिंदू सैनिक म्हणजे हिंदू राज्यकर्त्याचे अखत्यातील सैनिक. मोगल सैनिकांना त्यांच्या घोड्यांना पाणी पितांना पाण्यातही संताजी, धनाजी दिसायला लागले होते. अशक्यचे शक्य मध्ये रूपांतर झाले होते. पार महाराजांनी परिस्थिती बदलून टाकली होती. हेच खरे महाराजांचे अचिव्हमेंट होते. आपण हिंदू कधी मुसलमानांना जिंकूच शकत नाही, ही मानसिकता पुसून संपवून टाकली. हिंदू सर्रासपणे मुस्लिमांवर भारी पडायला लागले. हिंदू तेच, जागाही तीच, शस्त्रेही तीच, परिस्थितीही तीच पण महाराजांनी हिंदूंच्या मनोदशेचे पूर्ण परिवर्तनच करुन टाकले. महाराजांनी जिंकलेले साल्हेरचे युद्ध टर्निंग पाईंट ठरले. (इ.स. १६७१) महाराजांनी मैदानातील पहिले मोठे युद्ध औरंगजेबाच्या मोगल फौजेविरुद्ध जिंकले. रामदास स्वामी सारखे गोसावी जे आधी हेरगीरी करायचे, साल्हेर युद्धानंतर समाधान पावून, हिंमत येवून महाराजांना येवून मिळाले होते. महाराजांनी त्यांना सज्जनगडावर संरक्षण दिले. शूर जयसिंग राजपूत सारखे लोक दाढीवाल्यांना घाबरत होते तर, गोसावी लोकांचे काय?

## आजची गरज? आमची गुलामगिरी कधी संपणार?

आजच्या परिस्थितीत झगडा हिंदू आणि मुस्लिम यांचा नाही. पाश्चिमात्य आणि भारतीय यांचा आहे. भारतीय लोक अप्रत्यक्षपणे कळत नकळत गुलामगिरीत जगत आहेत. आजची भारतीय माणसाची परिस्थिती स्वाभिमान हरविल्यासारखीच आहे. परिस्थिती अशी चिघळली आहे की, आज सुद्धा आपल्याला शिवाजी महाराजांची आवश्यकता आहे. आम्ही आमची संस्कृती, धर्म, आन, बान, शान पायदळी तुळवून ब्रिटिश, अमेरीकन, युरोपीयन, पाश्चिमात्य लोकांसमोर अदृश्यपणे शरणागती पत्करली आहे.

### १) आपली भाषा

प्रत्येकाला आज इंग्रजी भाषेचा चष्का लागला आहे. आम्हाला स्वतःची भाषा नाही का? साधा रिक्शावालाही आपल्या मुलाला इंग्रजी शाळेत पाठवितो. भारतातील समाजातील लिडींग सुशिक्षित लोक आत्मविश्वास गमावून बसले आहेत. श्रीमंत सुशिक्षितांना वाटते इंग्रजी हीच भाषा आपल्याला तारू शकते आणि बाकी इतर समाजबांधव त्यांचे अनुकरण करीत आहे. इंग्रजी ही भाषा आहे, एक संवादाचे मध्यम आहे, ज्ञान नाही! इंग्रजी शिकले तर जॉब अपॉरच्यूनिटीज जास्त आहेत, पण परिस्थिती कशी बदलू शकते? परिस्थिती का बदलू शकत नाही?

भारतीय उद्योजकांनी, बिझीनेसमननी प्राडक्स उच्च प्रतिचे गुणवत्तापूर्ण पण प्रादेशिक भाषेत मॅन्यूफॅक्चर केले तर, ही परिस्थिती बदलता येते. फोन, कंप्युटर, उच्च तंत्रज्ञान असलेले इक्विपमेंट्सचे लो लेवल प्रोग्रॅम्स प्रादेशिक भाषेत लिहिणे फार आवश्यक आहे. भारतीय संशोधक तंत्रज्ञ उद्योजक यांचा रोल महत्वाचा आहे, शिक्षक आणि विद्यार्थ्यांचाही!

### २) शाळेचा पोषाक

भारतीयांची मानसिकता पार इंग्रजाळलेली आहे. साध्या पब्लीक स्कूल मध्येही लहान मुलांना पाठवा. टाय, शूज, बेल्ट, मोजे म्हणजे डोक्याला ताप! कोणाचा पोषाक आहे हा? भारतीयांचा? कशासाठी पाहिजे विनाकारण लहान मुलांना मानसिक त्रास? पालकांना मानसिक त्रास? तुम्ही यामधून काय अचीव्ह करणार आहात? इंग्रज जसे कोट घालतात तसे तुम्ही घातले म्हणजे काय अक्कल वाढते काय?



### ३) खेळ : क्रिकेट म्हणजे गुलामगिरीचे लक्षण

भारतीयांना भारतीयांचे खेळ आहेतच नाही. कुस्ती, कबड्डी, दहीहंडी इत्यादी भारतीय म्हणजे रानटी खेळ? त्यांचे इंग्रजाचे डब्ल्यू.डब्ल्यू.एफ., रग्बी, क्रिकेट म्हणजे साहसी खेळ! हा शुद्ध मुर्खपणा आहे. आमच्या मिडीयाला दूरदर्शन, टिव्ही वृत्तपत्रांना कबड्डी, खोखोच्या बातम्या प्रसारित करायला लाज वाटते. इंग्रजांचा खेळ क्रिकेट आम्ही अभिमानाने खेळतो. क्रिकेटचा १८० ग्रॅमचा फास्ट बोलरने फेकलेला वेगवान चेंडू बॅटमॅनच्या आंडगोटीला नको लागायला म्हणून, चड्डीच्या खाली कडक कवटीचा गार्ड घालता येतो. पण कुस्ती, दहीहंडी मध्ये संरक्षणासाठी आम्हाला काही संरक्षक उपाय सुचतच नाही. आमचे पारंपारिक खेळ बैलांच्या धावण्याच्या शर्यती, कोंबड्यांच्या झगडण्याच्या स्पर्धा कसे बंद होतील म्हणून आमचीच यंत्रणा नकळतपणे अज्ञानीपणे आमच्यावरच कोपली आहे. आमची बुद्धीच गेल्या दोन तीन पिढ्यांपासून नासवून टाकली आहे. मानसिकता इंग्रजाळलेली असल्याने काय उचित आणि काय चुकीचे हे सुद्धा लक्षात येत नाही आहे. आमच्या सरकारच्या सल्लागारांना कसीनो (जुगार अड्डे) चालतात, पण कोंबड्यांच्या शर्यती, बैलांच्या शर्यती मधला गरीबांनी खेळलेला जुगार चालत नाही. बैलांच्या शर्यती कोंबड्यांच्या झगडण्याच्या शर्यतीमुळे खेळेगावातील लोकांना नवीन उद्योग मिळेल. या पारंपारिक खेळांना कायदेशीर मान्यता देवून पर्यटकांना, शहरी गुंतवणूकदारांना आकर्षित करणे अतिआवश्यक आहे.

### ४) सल्फेट, इन्सेक्टीसाईड, केमीकलचे प्रचलन

आमच्या डॉक्टरांचा शैक्षणिक एमबीबीएस चा अभ्यासक्रम हा परदेशातून आला आहे. सर्व संशोधनही त्यांचेच, पुस्तकही त्यांनीच इंग्रजीत लिहलेली! आमची स्वतःची संशोधने आणि आमची स्वतःची आमच्या लेखकांनी लिहलेली पुस्तके कधी अती उच्च गुणवत्तेची बनतील! आम्ही आधी जवस तेल स्वयंपाकात वापरायचो. विलायती सोयाबीनचा तेल आमच्या स्वयंपाक घरात कसा आला आम्हांला कळलेच नाही. कॅलोस्ट्रालची थेरी दोषपूर्ण होती, जवस तेल ह्रदयासाठी चांगले आहे, गावठी गाईच्या तुपामधील कॅलोस्ट्रोल हानीकारक नसतो, हे आता लक्षात यायला लागले आहे. आधी आम्ही लहानपणी वर्षा दोन वर्षातून बीमार पडायचो, आता लहान मुलांची बीमार पडण्याची फ्रिक्वेन्सी प्रचंड वाढली. शेतात वापरली जाणारी सल्फेट, केमीकल, इन्सेक्टीसाईड्स मानवी

शरीरासाठी कसे घातक आहेत, हे आता उमजायला लागले आहे. आमच्या भारतीय डॉक्टरांनी, मेडीकल इंडस्ट्रीने समन्वय साधून स्वतःचे तंत्रज्ञान, आयुवेर्दिक, ॲलोपॅथिक, वनस्पती मिश्ररुपाची स्वतःचे संशोधन उच्च प्रतीचे विकसीत करुन जागतीक नेतृत्वासाठी पुढाकार घेणे अतिआवश्यक आहे.

**५) भारतीय संविधान**

इंग्रजी अमेरिकन लोक खोटे पुरावे साक्षी उलटेपुलटे दोषारोपण करीत नाहीत आणि बदलणेही शक्य नाही. त्यामुळे इंग्रजी मूळ असलेली न्यायपालिका फेल होत आहे. त्यामुळे पाश्चिमात्य संविधानावर आधारित राज्य घटना भारतात यशस्वी होणे शक्य नाही. मेजर बदल आवश्यक आहेत. सर्वसामान्य भारतीयांच्या सुख, शांती, समाधान, स्वच्छ प्रामाणिक प्रशासन या प्राथमिक गरजा आहेत. इंग्रज अमेरिकनच्या जनमाणसावरील प्रभावामुळे आम्ही सुख, शांती, समाधान सोडून पैसाच्या मागे धावत आहोत. आपल्या आयुष्याचा उद्देश काय हेच हरवून बसलो आहोत.

**लढाई आतली आणि बाहेरची**

शिवाजी महाराजांसमोर खूप खूप अशक्यप्राय आव्हान होते. लोक तेच, देश तोच, परिस्थिती तीच पण पाच मुसलमानांना पाहून दहा हिंदू उठून पळत होते, पण महाराजांना, मराठ्यांना बघून दहा मुसलमान उठून पळत होते. आजही भारतीयांना फक्त मानसिकताच बदलायची आहे. भारतीयांना दोन लढाया लढायच्या आहेत, अंतर्गत प्रणाली विरुद्ध एक लढाई भ्रष्टाचाराची आणि दुसरी जागतीक नेतृत्वासाठी. आर्थिक, व्यवहारिक, व्यक्तीगत, कौटुंबिक, सांस्कृतिक या सर्व प्रवाहामध्ये भारतीयांसाठी स्वतःचे जागतिक नेतृत्वासाठी दुसरी लढाई!



## ७. समजा CAA सारखा कायदा श्रीलंका वा ब्रह्मदेश मध्ये लागू केला तर आंबेडकरी वर्गाने सपोर्ट केला असता का?

इतक्यात श्रीलंकेत मुस्लिम अतिरेक्यांनी हल्ले केले हे तुम्ही विसरले का? श्रीलंका हा बौद्धधर्मीय बहुल असलेला देश आहे ना? काय दोष होता श्रीलंकेमधील जनतेचा? ब्रह्मदेश सुद्धा बौद्धधर्मीय बहुल देश आहे, हे लक्षात घ्या आणि सांगा. ब्रह्मदेशला काही मुस्लिमधर्मीय रोहिनग्या अतिरेकी वृत्तीचा त्रास होत आहे, हे मुद्दे लक्षात घ्या.

काही मुस्लिमधर्मीय लोकांच्या अतिरेकी वृत्तीचा त्रास हजारो वर्षापासून आणि आजही अख्ख्या जगाला होत आहे. इतक्यातला अमेरिकेला शेकवणारा बिन लादेन असो, १००० वर्षापूर्वीपासून भारताला त्रास देणारे इस्लामिक अतिक्रमक! उअअ या कायद्याद्वारे भारतातील मुस्लिम समाजाला त्रास होणार नाही पण बाहेर देशातून इथे येणारे मुस्लिम immigrant थांबविण्याचा हा प्रकार आहे. हे क्लिअर आहे. हे सरळ सरळ दिसत आहे.

भारतातील मुस्लिम लोक याला oppose करीत आहे. कारण या कायद्यामुळे अफगानिस्तान, पाकिस्तान आणि बांग्लादेश मधील मुस्लिम भारतात सहज येऊन येथे वास्तव्य करू शकणार नाहीत. त्या देशातील इतर धर्मीय मात्र कायदेशीरपणे येऊ शकतील. भाजपचे राजकीय विरोधक पक्ष, जाणून बुजून मुस्लिम समाजाचे supporter म्हणून आव आणून oppose करीत आहेत.

मी कायद्याचा मुख्य आणि छुपा हेतू काय हे सांगण्याचा प्रयत्न करीत आहो. धर्माच्या नावावर भेदभाव का म्हणून केला गेला हे सांगितले. जे सरळ सरळ दिसत आहे.

भारतात भाजप, काँग्रेस कोणाचेही राज्य असो, कारभार तीन तीरपट आहे. ऑफीसर यंत्रणा corrupt आहे. कितीही कायदे केले तरी अतिरेकी आपला व्हिसा बनवतील. संबंधीत अधिकारी पैसे घेऊन त्यांना मदत करतील. जे खरे गरजू आणि प्रामाणिक असतील त्या लोकांना भारतातील पैसेखाऊ अधिकारी नियमांचा गैरवापर करुन त्रास देतील.

आमचा विमुक्त भटक्या समाज ज्यांचे कागदपत्र आजही रेडी नाही, अशांची

तर परत छळवणूक होईल. कायद्याचा, नियमांचा उद्देश कितीही चांगला असला तरी ही यंत्रणा corrupt असल्याने त्याचा दुरुपयोगच जास्त होण्याची शक्यता आहे, हे सुद्धा सत्य आहे.

या कायद्यामुळे ब्राह्मण वर्गाला फायदा होणार आहे का? स्थलांतर करणारे जास्त करुन बहुजन भटके दलित असतील. ब्राह्मण असेही व्हिसा सहज मिळवून टाकतील, कायदे कसेही असो. म्हणजे ब्राह्मण वर्गाला या कायद्याचा प्रत्यक्ष फायदा नाही.

कट्टर आंबेडकरी वर्ग (कालचा दलित बहुजन, आजचा बौद्ध आणि हिंदू धर्मावर रूढी परंपरावर प्रचंड आगपाखड करणारा) भारताचे भले चाहत नाही. हा त्यांच्यावर स्पष्ट आरोप करावासा वाटतो. हा वर्ग स्वतःला बौद्ध, हिंदूपासून वेगळा आणि हिंदू विरोधक समजतो. श्रीलंका आणि ब्रह्मदेशमध्ये (हे देश बौद्धधर्माशी निगडित आहेत हे धरुन) झालेले मुस्लिम अतिरेकी हल्ले गृहीत धरुन, त्यांनी जर हाच कायदा किंवा सारखा उद्देश असलेला कायदा केला असता किंवा केला असेल तर तुम्ही लोकांनी (धर्मांतर झालेले बौद्ध, मूळचे दलित आणि बहुजन) १०० टक्के सपोर्ट केला असता?

बाबासाहेब यांनी बरीच पुस्तके लिहिली. भारताच्या इतिहासाविषयी लिहिलेले बरीच पुस्तके आहेत. त्यांनी मुस्लिम आक्रमक, धर्माच्या प्रसारासाठी तलवारीचा वापर या देशातील बिगरमुस्लिम लोकांवर वर्षानुवर्षे झालेले अत्याचार आणि याचा अप्रत्यक्ष उल्लेख केलेला आहे आणि त्यांना जाणीव दिसून येते. त्यामुळे ते स्वतः असते तर आजच्या CAA ला त्यांनी बाहेरुन जरुर support केला असता. बाबासाहेब यांनी प्राधान्य नेहमी हिंदू मागासवर्गीय उद्धारासाठी दिले त्यामुळे स्वतःहून CAA सारख्या कायद्यासाठी support साठी जरूर पुढे आले नसते.

कृपया माझ्या पोस्टमधील श्रीलंका, ब्रह्मदेशबद्दल विचारलेल्या प्रश्नांची पूर्वाश्रमीच्या दलित बहुजन आणि आजच्या बौद्धधर्मीय बांधवांनी उत्तरे द्यावी.

सहज लक्षात येणारे बाब आहे. मुस्लिम समाजात काही मोजके लोक खरोखरच आगाऊ आहेत. त्यामुळे मुस्लिम समाजाची कौम जगात बदनाम झाली आहे. अमेरिका असो इंग्लंड, रशिया असो वा चीन!! त्यामुळे काळजी म्हणून हे या सरकारने उचलेले पाऊल आहे.

(दि. २१ डिसेंबर २०१९, विमुक भटकंती)



# ८. समजा CAA सारखा कायदा...

## भाग–२

काही जहाल मुस्लिमधर्मीय लोकांच्या वृत्तीचा त्रास अख्ख्या जगाला होत आहे. इतक्यात २००४ चा अमेरिकेला शेकवणारा बिन लादेन असो वा १००० वर्षापूर्वी पासून भारताला त्रास देणारे इस्लामिक आक्रमक!! श्रीलंकेमधील इतक्यात झालेला अतिरेकी हल्ला हे सुद्धा त्याचेच उदाहरण!!!

या कायद्याद्वारे भारतातील वास्तव्य असलेल्या मुस्लिम समाजाला त्रास होणार नाही पण मुस्लिम immigrant (निर्वासित) थांबविण्याचा हा प्रकार आहे. हे सरळ सरळ दिसत आहे. या कायद्यामुळे पाकिस्तान, अफगानिस्तान, बंग्लादेश मधील मुस्लिम घुसखोर भारतात बिनधोक येऊ शकणार नाहीत. हिंदू, बौद्ध, ख्रिस्ती, शीख, जैन मात्र येऊ शकतील.

मुस्लिम बांधव भावनिक मुद्दा म्हणून या कायद्याला जरुर oppose करीत आहे. पण भारतातील मुस्लिम बांधवांना घाबरण्याचे कारण नाही आणि त्यांनी समजून सुद्धा घ्यायला हवे.

भाजपचे राजकीय विरोधक पक्ष, जाणून बुजून मुस्लिम समाजाचे supporter म्हणून आव आणून या बिलाला oppose करीत आहेत.

हे बिल रास्त आहे, भारतीय इतिहासातील महत्वाचा टप्पा असे माझे मत आहे.

काही जहाल मुस्लिम अतिरेक्यांकडून भविष्यात भारतात होणारे हल्ले काही प्रमाणात थांबविण्यासाठी मदत जरूर होईल.

कदाचित बाबासाहेब आंबेडकरांनी सुद्धा या बिलाला विरोध केला नसता.

(दि. १९ जानेवारी २०२०)

भाग ११. वनविभाग

# १. गावात येणाऱ्या जंगली प्राण्यांच्या शिकारीला परवानगी द्या!



जंगली प्राण्यांच्या हैदोसामुळे खेड्यातील नागरिक जख्मी होणे, ठार मारल्या जाणे नित्याचेच झाले आहे. बंदरांचा गावात हैदोस अन्नधान्याची नुकसान, फळभाज्यांचे नुकसान, डुकरांकडून आणि रोह्यांकडून शेतमालाची प्रचंड नासधुस ही रोज नित्याचीच बाब आहे. वाघाने धनगराला ठार मारले, अस्वलीच्या हल्ल्यात युवक ठार, विठोबाच्या प्रेताचे लचके तोडत असताना वनविभाग, पोलीस विभागाने बघ्याची भूमिका घेतली आणि गावकऱ्यांनी विठोबाच्या डाव्या पायावरच अंत्यसंस्कार केले अशा विविध बातम्या नेहमीच ऐकायला मिळतात. नागरिकांना सकाळी फिरायला जाणे कठीण आहे, शेतमाल बघायला जायला घाबरत आहेत. बुजगावो, भुजाडणे, फटाक्यांचे आवाज, सुतळीबाम्बला प्राणी आजकल बिल्कूल घाबरत नाहीत.

**अंधेर नगरी चौपट राजा!**

भारतातील लोकशाही म्हणजे अंधेर नगरी चौपट राजा अशी झाली आहे. इंग्रज तर भारत सोडून गेले पण गुलामगिरीची मानसिकता सुटल्या सोडवत नाही. ही लोकशाही, प्रशासन, वनविभाग लोकांच्या भल्यासाठी आहे की, या कायद्याच्या नियमावलीसाठी सर्वसामान्य लोक बनली आहेत हा प्रश्नच आहे. आमचे आमदार खासदार इंग्रज निर्मित शिक्षण प्रणालीनुसार जास्त शिकले नसल्याने शिकल्या पिकल्या प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या सल्ल्यानुसार कायदे बनतात. आमच्या प्रशासकीय वा कायदे बनविणाऱ्या काही लोकांची मानसिकता इंग्रजांच्या गुलामगिरीची असल्याने स्वतःची अक्कल वापरतात की नाही ही शंका येते. मंत्र्यांच्या किंवा प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या मुलाला जर रानटी प्राण्याने



मारले म्हणजे त्यांना कळेल की दुःख काय चीज आहे. गरीब बिचारे मेलेत काय यांची कोणाला फिकीर नाही. वन्य प्राण्यांचा धुमाकूळ असह्य झाला आहे.

**प्राण्यांना अक्कल नसते का?**

डुकर, रोही, बंदर हे कळपाने येतात, शेतमालाची पार नासधूस करून जातात. खेडेगावात असे एकही घर नसेल की, कोणाची तक्रार नाही. आमचे प्रशासन मंत्रालयाच्या खूर्चीत (एसीत) बसून निर्णय घेतात. प्राणी एकदम लाडावून गेले आहेत. या भारतात माणसं मेली तर चालतात, प्राणी मेलेली, मारलेली चालत नाहीत. दैवी महाशक्तीने प्रत्येक प्राणीमात्राला, किड्या मुंग्यांना अक्कल दिली आहे. लाड म्हणजे काय आणि धाक म्हणजे काय, प्रत्येकालाच कळते. लहान बाळालाही कळते, भीती म्हणजे काय? फक्त वनप्रशासन, वनविभागाचे अधिकारी कायद्याच्या चाकोरीतून वन्यप्राण्यांपासून होणारा त्रास, शेतीचे प्रचंड नुकसान थांबवूच शकत नाहीत. नागरिकांना मर्यादित अधिकार देणे आवश्यक आहे.

**भारतात गरीबाच्या जीवाला किंमत आहे काय?**

अमेरिकेतील ओहायो या राज्यात टेरी थॉमसन नावाच्या शेतकऱ्याने वन्य प्राण्यांसाठी झू बनविला. पन्नास एक जंगली प्राणी त्याने संग्रहीत ठेवले होते. त्या शेतकऱ्याला मानसिक झटका आला, त्याने सर्व प्राणी मोकाट सोडले आणि स्वतः गोळी घालून आत्महत्या केली. त्यानंतर अमेरिकन पोलीसांनी सर्वच हिंस्त्र प्राण्यांची हत्या केली, त्यात सतरा सिंह आणि अठरा दुर्मीळ बंगाली वाघांचा समावेश होता. आक्टोंबर २०११ मध्ये हे भीषण कृत्य अमेरिकेने केले. आपल्या एकाही अमेरिकन माणसाचा जीव जायला नको, जख्मी व्हायला नको म्हणून निरपराध प्राण्यांची बीनबोभाट हत्या केली. भारताच्या अडीच पट क्षेत्रफळ असलेल्या अमेरिकेत एकही विषारी जातीचे साप आढळत नाहीत. कारण त्यांनी गपचुपपणे विषारी सापांचा सुफडा साफ केला? आपल्या देशाला स्वतःचे सर्वसामान्यांच्या भल्यासाठी कणखर निर्णय घेण्याची क्षमता कधी येईल?

**लातों के भूत बातों से नहीं मानते! उपाय योजना!**

'लातों के भूत बातों से नहीं मानते' हे आमच्या आमदार खासदारांना चांगले माहीत आहे. त्यामुळे कधीतरी आमदारकी खासदारकीच्या प्रवासात त्यांनी कायदा हातात घेतल्याने बहुतेकांवर दोन-चार तरी गुन्हांची नोंद आहे. माजलेल्या

लाडावलेल्या प्राण्यांना सरळ करण्यासाठी काय उपाय करावे लागतील हे आमच्या पुढारी लोकांना माहीत नसावे असे शक्य नाही. गावात येणाऱ्या रानटी प्राण्यांच्या शिकारीला परवानगी देणे आवश्यक आहे. शेतकऱ्यांना, पारध्यांना बंदूकीचा, तलावार, भाले चालविण्याचा परवाना देवून त्यांना शेतीत आलेल्या, त्यांच्या हद्दीत आलेल्या प्राण्यांची शिकार करायला परवानगी द्यावी. रोही, डुकर यांची संख्या खूप वाढली आहे. मारल्यावर मटन खाण्याची आणि विकण्याचीही परवानगी द्यावी. नियमाचे उल्लंघन व्हायला नको शिकारीच्या परवानगीचा दुरुपयोग व्हायला नको म्हणून पोलीस पाटील, ग्रामपंचायत सदस्य यांचेकडून शहानिशा करण्याची व्यवस्था करावी. दोन चार रोही, डुक्कर, बंदर मेलेत तर काही दुखवट्याची बाब नाही पण भारताच्या गरीब नागरिकांची हानी होऊ नये असा रवय्या प्रशासनाचा असावा. प्राणीप्रेमींनी काही मर्यादा समजून घ्याव्यात. शिकारीच्या परवानगीचा दुरुपयोग झाला तर प्राणीप्रेमी लक्ष देवू शकतात. दोन–चार प्राणी गावात, शेतात मारले गेलेत की प्राणी स्वतःहून जंगलाच्या सीमा ओलांडणार नाहीत. सीमेवर कुंपन टाकून चालणार नाही, चोर कुंपन चोरून नेतील आणि वनविभाग कुंपन मेंटेन करू शकणार नाही, हे ठरलेले आहे. त्यापेक्षा मोजकेच राखीव जंगले वन्यप्राण्यांसाठी ठेवा जिथे कडेकोट बंदोबस्त असावा आणि वनविभागात सहज हाताळता येतील.

शेतीच्या नुकसानी वा प्राणहानीच्या मोबदल्यात आर्थिक मदत देऊन काम भागत नाही. उलट आपली शासकीय यंत्रणा काही अंशी कामचुकार आणि भ्रष्टाचारी असल्याने गरीब पिडीतांना पटवारी, वनअधिकारी वा तत्सम अधिकाऱ्यांकडे दहा चकरा घालावे लागतात. घर कुटुंब शेती सांभाळून आर्थिक मदत मिळण्यासाठी दहा चकरा घालणे कठीण जाते म्हणून शासनाच्या आर्थिक मदतही बिचारे गरीब घेण्याचे टाळतात.

(दि. १ जानेवारी २०१५, अभयराज्य)



# २. गावकऱ्यांना माकडांचा त्रास कधी थांबेल



पर्यावरण समतोल या नावाखाली प्राण्यांचे आवश्यकतेपेक्षा जास्त लाड पुरविले जात आहे. मंत्रालयाच्या खूर्चीत बसून ठराव घेणाऱ्या मंत्र्यांना व ऑफीसर लोकांना गावकऱ्यांच्या त्रासाची कल्पना असणे शक्य नाही. कायद्यानुसार माकड व इतर प्राण्यांना मारता येत नसल्याने प्राणी शेफारुन गेले आहेत. गावात घुसून फळझाडांची नासधूस, भाजीपाल्यांची नासधूस, वाळत टाकलेल्या धान्याची नासधूस नित्याचेच झाले आहे. आमच्या लहानपणी तरूण मुले गावात घुसलेल्या माकडांचा पिच्छा करून जखमी होईपर्यंत दगड काड्यांनी झोडपत होतो, त्यामुळे माकडांवर धाक होता. एक दोन माकडांना पिंजऱ्यात पकडून वा असेही चांगले झोडपून काढले की सर्व माकडे चव्हाट्यावर येऊ शकतात. एक–दोन माकडांना गावात पिंजऱ्यात दोन–चार दिवस अडकवून ठेवले तरी माकडांना अक्कल येईल. लहान मुलांनाही समजते रागावले की रडायचे, लाड पुरविले नाहीत तर विनाकारण रडणे थांबवितात.

वनखाते, सरकार, न्यायपालिका यांची गुंतागुंतच अशी आहे की लोक परेशान आहेत. चुकीची नियमावली बनवून गावकऱ्यांचा ताप वाढवित आहेत. गावकऱ्यांच्या हातात मोजके, मर्यादित कायदे सोपविले तर ते तरी उपाय काढू शकतील.

## १. जवस तेलाच्या कॅप्सूल्स




रोजच्या जेवणात जवस तेलाचा वापर करणे हितकारक आहे. जवस चटणी, जवस तेल हृदयविकारांना दूर ठेवतो. हृदयविकार आणि कोलेस्ट्रोल संबंधी विकारांकरिता ओमेगा ३ ची मानवी शरीरास गरज असते. फिश तेल मध्ये ओमेगा ३ असते पण रासायनिक प्रदूषित पाण्यामुळे फिश खाणे सहसा टाळल्या जात आहे. जवसमध्ये ओमेगा ३ भरपूर प्रमाणात असते आणि जवस आपल्या परिसरात भरपूर पिकतो. विना रासायनिक जवसाचे उत्पन्न आपण घेऊन आर्गेनिक जवस तेल देश–विदेशात आपण विकू शकतो. तमिळनाडू आणि केरळमध्ये जवस तेल माहिती नाही. अमेरिका आणि कॅनडामध्ये जवस तेलाचे संशोधन सुरू आहे. वर्धा येथे आर्गेनिक जवस तेलाची कंपनी आहे. आपण सहकारी जवस तेलाची कंपनी सुरु केली तर परिसरात नवीन रोजगार आणि राष्ट्रीय–अंतरराष्ट्रीय व्यवसाय करू शकतो.

जवस तेलाच्या तीनशे कॅप्सूल अमेरिकेत नऊशे रुपयाला विकल्या जातात. भारतीयांनी प्रवाहात वाहून जाण्यापेक्षा आपल्या जुन्या संशोधनांचा अभ्यास करणे आवश्यक आहे. प्राचीन भारतात जेवणात होणारा जवस तेलाचा नियमित वापर हा दीर्घकालीन अभ्यासपूर्ण संशोधनातून ठरला गेला होता.

(दि. ७ मे २०१५, अभयराज्य)



## २. वयाच्या पन्नाशीत थकल्यासारखे वाटत असेल तर रामदेवबाबांची कुस्ती बघा!

रामदेवबाबांचा जन्म ११ जानेवारी १९६५ सालचा. तब्बल पन्नास वर्षे वयाची पूर्ण. बरेच लोक अजूनही पन्नासीही गाठली नाही तरी विविध व्याधींनी त्रस्त आहेत. सर्व जेष्ठ नागरिकांसाठी ही खूप आनंदाची बाब आहे, हिंमत देणारी बाब आहे की रामदेवबाबांनी ६५ किलो वजनी ग्रुपमधील नामवंत मल्लाला लोळविले. हा विडीओ जेष्ठांनी आवर्जून पहावा. रामदेवबाबांची चमकोगीरीवाला बाबा म्हणून टर्र उडविली जाते. ही दुर्भाग्याची बाब आहे. रामदेवबाबांनी आमच्या पूर्वजांचे योगविद्येवरील अभ्यास खेड्यापाड्यापर्यंत पोहचविला, त्यामुळे लोकांना त्याचा भरभरून फायदा होत आहे. इथे त्यांचे यश मर्यादित नाही. गोऱ्या लोकांनी भारतीय लोकांना लावलेली ॲलोपॅथीची, केमीकल औषधांची, सल्फेटची चटक भारतीयांना त्यांच्या शरीराला गडखापीत ढकलत आहे. पण स्वामी रामदेवबाबांचे आयुर्वेदावरील संशोधन वखाणण्याजोगे आहे. खरं तर सरकारने सर्व जडीबुटीवाल्यांना, योगवाल्यांना प्रोत्साहन देवून त्यांच्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञान उपलब्ध करून देण्यास मदत करावी. एमबीबीएस ॲलोपॅथी, संशोधनाची पुस्तके प्रादेशिक भाषात भाषांतरीत करून गावठी औषधी वाल्यांपर्यंत तसेच खेड्यातील विद्यार्थ्यांपर्यंत पोहचणे आवश्यक आहे. त्यातूनच उद्या जाऊन आमचे भावी भारतीय नागरिक आंतरराष्ट्रीय प्रतीची, स्पर्धेत टिकणारी भारताला जगात प्रथम क्रमांकावर नेणारी संशोधने जगात आणतील.

# ३. आमच्या बालपणी डॉक्टर घरी येत होते आज का येत नाही ?

## गावठी औषधे, आयुर्वेदाला प्रोत्साहन द्या, संरक्षण द्या




आमच्या लहानपणी आमच्या घरचे कोणीही आजारी पडले तर डॉक्टर घरी येत होते. आज का येत नाहीत? आधी डॉक्टरांकडे गर्दी कमी राहत होती की गावातील डॉक्टरांची संख्या जास्त होती? खर तर आधीपेक्षा गावातील डाक्टरांची संख्या चांगलीच वाढली पण रोग्यांची संख्या सुद्धा त्या मानाने जास्तच वाढली आहे. डॉक्टरांच्या सरासरी प्रमाणात होणाऱ्या वाढीपेक्षा रोग्यांची संख्या वाढायला इंग्रजी ॲलोपॅथी औषधी कारणीभूत आहेत. आयुर्वेदिक औषधीने जो खोकला कंट्रोल व्हायला आठ दिवस लागत होते. तिथे दोन दिवसात खोकला दुरुस्त झाला म्हणून अभिमानाने सांगतो, पण ही इंग्रजी औषधी मानवी शरीर सपाट्याने खोकली करीत आहे हे आपणाला माहीत नाही. प्रतिजैविक वा अँटीबायटीक औषधे ही कॉमन झाली आहेत, ही औषधे मानवी शरीरातील रोगनिवारक प्रतिकारक शक्तींना दिवसेंदिवस प्रत्येक अँटीबायोटीक डोजमुळे कमजोर करून मारत आहे. रासायनिक खताचा वापर केल्यानंतर शेत जमीनीचा कस उतरुन जातो अगदी तसेच या ॲलोपॅथी औषधी मानवी शरीरातील संरक्षक पेशींना दुर्बल करीत आहेत. या लेखाचा अर्थ असा नाही की ॲलोपॅथिक औषधे पूर्णपणे बंद करावीत. आयुर्वेदिक थेरेपीला प्रोत्साहन देवून, नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून, आयुर्वेदिक औषधातील घटकांचा नव्याने अभ्यास करुन, ट्रायल एरर वा इतर पद्धतीने संशोधन करून, ढोबळ मानाने औषध देण्यापेक्षा मायक्रोपातळीवर औषध गोळ्यांचे प्रमाण ठरवून त्यातील अक्यूरसी जागतिक दर्जाची बनविणे अशक्य नाही. गोऱ्यांच्या थेरेपीचे अनुकरण करण्यापेक्षा काळाच्या ओघात स्पर्धात्मक



दर्जा हरविलेल्या आयुर्वेदाला पूनर्जिवीत करुन आपला देश सहजपणे जागतिक नेतृत्व करू शकतो. उद्या जाऊन अमेरिकन लोक आयुर्वेद चोरून उच्च तंत्रज्ञानाचा वापर करून, आयुर्वेदिक ओषधे नवीन रूपात जगात विकून प्रचंड पैसा कमविण्यापेक्षा सरकारने, सरकारच्या सल्लागारांनी शक्य तितक्या लवकर पुढाकार घेणे आवश्यक आहे.

**भारत प्रथम क्रमांकाचे राष्ट्र कसे बनेल?**

भारताच्या इतिहासात काही कारणांमुळे धर्मांतरीत झालेले हिंदू, मुसलमान बनल्यानंतर मूळ मुस्लीमांपेक्षा जास्त घातक ठरत होते. गोऱ्यांच्या ॲलोपॅथीमुळे एमबीबीएस मय झालेले काही डॉक्टर समूळ नष्ट करू इच्छीत आहेत की काय असे वाटते. भारताने गोऱ्यांचे अनुकरण सोडून जागतिक नेतृत्व करायचे असेल तर खाली दिलेल्या गोष्टी प्रचंड प्रमाणात मदत करू शकतात.

१. एमबीबीएस आणि बीएएमएस चा अभ्यासक्रम एकत्रित करुन नवीन अभ्यासक्रमाची रचना करणे.

२. एमबीबीएस वा तत्सम ॲलोपॅथी थेरपीची पुस्तके प्रादेशिक भारतीय भाषामध्ये भाषांतरित करून सर्वसामान्यांना गावठी वैद्यांना उपलब्ध करून देणे.

३. आयुर्वेदिक औषधे, गावठी औषधे सर्वांचे अभ्यास संकलन करून, नवीन तंत्रज्ञान वापरुन सूक्ष्म पातळीवर अभ्यासासाठी पुढाकार घेणे, घटकांचे मायक्रो पातळीवर अभ्यास करून नव्याने विकसीत करुन औषणांची उत्कृष्ठतेची पातळी जागतिक दर्जाची बनविणे.

**भारतीयांनो जागे व्हा!**

भारताचा चार–पाच हजार वर्षाचा इतिहास नाही तर तो आपल्या पूर्वजांनी केलेला सखोल अभ्यास आहे. आधी आम्ही फोळणीला जवस तेल वापरत होतो. आज कॅमोला सफोला वापरतो. आम्ही स्वयंपाकात अद्रक आणि लसूनची इत्यादीची फोडणी वा तडका देतो. आता वर्गर, पिझाचे अनुकरण करीत आहोत. अंधानुकरण करीत आहोत. कॅलोस्ट्रॉल कमी करण्यासाठी जे औषध फ्लेक्स सिड टॅबलेट अमेरिकेत उपलब्ध आहेत त्या जवसापासून बनल्या आहेत. हृदयातील रक्त वाहिण्यांचे ब्लाकेज टाळण्यासाठी अद्रक लसून कामी पडते आणि उद्या जाऊन महागडा ॲंजीओप्लास्टी, बायपास सर्जरी टाळण्यासाठी मदत होते. भारतीयांनो जागे व्हा, गोऱ्यांचे अनुकरण करण्यापेक्षा जागतिक नेतृत्व करण्यासाठी संगठीत व्हा.

# १. भारताला स्वत:ची राष्ट्रभाषा आहे की नाही ?



इंग्रज भारत सोडून सत्तर वर्षे झालीत पण इंग्रजाळलेली मानसिकता अजूनही आपला पिच्छा सोडत नाही. एका बाजूला स्वदेशी वा नारा ठोकायचा, मेक इन इंडिया म्हणायचे आणि दुसऱ्या बाजूला मानसिकता इंगजाळलेलीच! भारतीयांच्या चलनी नोटा, चलनाची नाणी भारतीयांची आहेत की इंग्रजांची हा मोठा प्रश्न पडतो. सर्व नोटा आणि नाण्यांवर ठळक अक्षरात लिहिलेले आकडे हे इंग्रजी भाषेत आहेत हे हिंदीतच असायला पाहिजे. सरकारने रिजर्व बैंक ऑफ इंडियाच्या संबंधीत शाखेने कृपया याची नोंद घ्यावी.

दिल्लीत नवीन सरकार आले आहे. या आधीहीकांग्रेसची सरकारे होती. सर्वच सरकारमध्ये चांगली मनोवृत्तीचे पुढारी अतात. पण भारतात दिल्ली सरकार, राज्य सरकार, न्यायपालिका, सांसद, मीडिया, पोलीस यंत्रणेची गुंतागूंत अशी आहे की वरचा स्तर बदलून खूप काही करता येत नाही. कमीत कमी भारताच्या चलनाच्या नोटेवरची आणि नाण्यांवरची आकडे तर राष्ट्रभाषेत करू शकतात. एवढं तरी करा! ब्रिटीशांच्या चलनी नोटा वा नाण्यांवर हिंदीमध्ये काही लिहून आहे का? मग आपण इंग्रजीचा, इंग्रजांचा नामोनिशान भारतातून दूर करायला काय अडचण आहे?

दि. २० नोव्हेंबर २०१४, अभयराज्य)



# २. अमेरिकेचे निमंत्रण मोदीनी स्विकारणे योग्य आहे काय?

आम्ही लहानपणापासून भारताचा इतिहास वाचतो. नेहमी वाटायचे नागपूरात जन्मलेला कोणीच महापुरूष भारताच्या इतिहासात झाला नाही का? आज नागपूरचा अभिमान असणाऱ्या नागरिकांचे हृदय उचंबळून आले आहे. डॉ. केशवराव हेडगेवार यांचे नाव थोर पुरूषांच्या चोटीच्या लिस्टमध्ये नसायचे. आज डॉ. केशव हेडगेवार यांचे नाव थोर पुरूषांच्या यादीत एकदम प्रथम क्रमांकाला टक्कर देत आहे. भारताच्या मध्यभागी असलेल्या नागपूरनगरीत डॉ. हेडगेवार यांचा जन्म गुडीपाडव्याला १८८९ ला झाला होता. डॉ. हेडगेवार यांच्या बालपणात बर्डीच्या किल्ल्यावरील इंग्रजांच्या कार्यक्रमात वाटलेला पेढा डॉ. हेडगेवारांनी भिरकावून दिला होता. काय तो देशाचा अभिमान? डॉ. हेडगेवारांचा तोच स्वाभिमान आज भारताच्या उच्चपदावर विराजमान झाला आहे. डॉ. हेडगेवारांनी संस्थापित रा.स्व. संघाचे प्रणित भारतीय जनता पार्टीची बिनतोड मुहूर्तमेढ झाली आहे. डॉ. हेडगेवारांचा स्वाभिमान जगात प्रथम क्रमांकावर नेण्याची जबाबदारी विद्यमान सरकारवर आहे.

काल श्री नरेंद्रजी मोदी गुजरातचे सी.एम. होते. जगात प्रथम क्रमांकाचे राष्ट्र म्हणून मिरविणाऱ्या अमेरिकेने आणि त्यांचे हितचिंतक इंग्लंडने मोदीजींना विजा नाकारला होता. अख्ख्या जगात आपले मोठेपण दाखविण्यासाठी आणि मोदीजींना कमी दाखवून, अविश्वास दाखवून पूर्ण जगात अपकिर्ती केली होती. अप्रत्यक्षपणे अमेरिकेने, इंग्लंडने अवहेलना केली होती, उपेक्षा केली होती, मानभंग केला होता. आपण म्हणजे उच्च दर्जाचे, उच्च विचाराचे, सुशिक्षित आणि गुजरातचे मुख्यमंत्री म्हणजे अशिक्षीत, असा अविर्भाव आणला होता. कालची गोष्ट वेगळी होती, मोदीजी गुजरातचे सी.एम. होते, आज मोदीजी या भारतभूमीचे पी.एम. आहेत. आज मोदीजी आपल्या देशाचे अग्रणी नेते आहेत. भारताची मान मर्यादा, प्रतिष्ठा, आत्मसन्मान म्हणजे भारताचे पंतप्रधान श्री नरेंद्रजी मोदी! ज्या अमेरिकेने काल मोदीजींना विजा नाकारला, त्यांचे अमेरिका भेटीचे निमंत्रण मोदीजींनी स्विकारणे योग्य राहील काय? एखाद्या चालू स्वार्थी मित्राने एकेकाळी दुसऱ्या गरीब, कमजोर मित्राचा दुर्बलता बघून खिल्ली उडवावी

आणि मित्र पॉवरमध्ये आल्यावर त्याला नमस्कार चमत्कार करून मैत्रीसाठी हात पुढे करावा, अशातला हा प्रकार नाही का? डॉ. हेडगेवारांना बर्डीच्या किल्ल्यावर इंग्रजांच्या भिरकावलेल्या पेढ्यातील स्वाभिमान, आपली हिंदू संस्कृती, रा.स्व. संघाचे सिद्धांत यावर काय भूमिका घेतील हा प्रश्नच आहे. जो व्यक्ती आपली दुर्बलता बघून, दुर्बल समजून तिरस्कार करतो, टिंगल करतो आणि सबळ झाल्यावर आमंत्रण देतो तो सच्चा मित्र असू शकतो का? असा चालू व्यक्ती आपल्या पदारात काही देईल, आपल्याला काही मदत करेल याची शाश्वती काय? परिस्थिती पाहून रंग बदलणारा मित्र संकटकाळी मदत करेल का? दीर्घकालीन मैत्रीसाठी योग्य आहे का? मैत्रीच्या कसोटीत उतरणारा असेल का?

**आर.एस.एस. वर हेरगिरी करणारा अमेरिका मैत्रीस योग्य?**

काही महिण्यांपूर्वी एडवर्ड स्नोडेन नावाच्या अमेरिकन विभीषणने सर्व जगाचे डोळे उघडले. अमेरिका भारतीय लोकांच्या, इतरही देशाच्या लोकांच्या डेटावर (इंटरनेट नेटवर्कमधून ट्रान्सफर होणाऱ्या माहितीवर देखरेख ठेवतो व जासूसी करतो असे स्नोडेन) ने जगाच्या निदर्शनास आणून दिले. जे सर्व भारतीय फेसबुक, गुगल, ट्वीटर, व्हाट्सअप, जी मेल, याहू मेल इ. वापरतात, त्यांच्या सर्वांचा प्रायव्हेट खाजगी डाटा अमेरिकेच्या कंट्रोलमध्ये आहे. विश्वास ठेवून तिथे ठेवलेल्या डाटावर स्नूपींग करणे म्हणजे एक प्रकारची चोरीच की! पण भरीस भर परत एक उलगडा काही आठवड्यापूर्वी झाला. म्हणे अमेरिका भारतीय जनता पार्टी ॲक्टीव्हीटीवर नजर ठेवून होता, बीजेपीच्या चालू घडामोडींवर हेरगिरी करत होता. कन्फर्म न्यूज अशी की अमेरिकन न्यायव्यवस्थेने हेरगिरी करण्यासाठी परवानगी दिली होती. दुसऱ्यांच्या देशात त्यांच्या अंतर्गत घडामोडींची हेरगिरी करण्याची परवानगी देणारी अमेरिकेची न्यायव्यवस्था ही जगात पहिल्या नंबरची म्हणून मिरविते? अमेरिकेसारखा देश खरोखरच कोणाचा होऊ शकतो का? स्नोडेनने जगाचे डोळे उघडले, आमचे कधी उघडणार? खरं तर अमेरिका बीजेपी वर नाही तर आर.एस.एस. वर हेरगिरी करती होता असे अप्रत्यक्षपणे म्हणता येते.

**मोदीजींची अमेरिका भेट, डॉलरचा रेट वाढण्यास मदत करेल!**

ठीक आहे. आपण भावनिक विचार न करता एक राजनैतिक विचार करूया! अमेरिका देश मजबूत एकसंघ देश आहे, अती विकसीत आहे पण तसाच एक चालू लिडर, मुसद्दी पॉलीटीशियन आहे. अमेरिका कोणाचाच नाही पण स्वतःच्या फायद्याचा विचार करतो. डॉलरचा रेट स्वातंत्र्यानंतर एक रुपयाला एक असा



होता. आज अमेरिकन चलन डॉलरची किमत साठ रुपये आहे. गावाच्या रुपया आहे, गावाच्या बाजारपेठेतला एखादा मोठा व्यापारी (गुंड दादा) हुशारीने सुमडीत जसे धान्याचे भाव ठरवितो, कंट्रोल करतो व आपला फायदा करून घेतो. अगदी तसाच डॉलरचा रेट कंट्रोल होत असतो. इंग्रज जसे अमेरिकेत जाऊन बसले, शेवटी एक चतूर व्यापारी बुद्धीमत्ता! आमचा भारत देश अमेरिकेसारखा एकसंघ कसा होईल हा भाग वेगळा! पण मोदीजी अमेरिकेत जाण्याने डॉलरची मागणी वाढेल. मोदीजी सोबत मोठा ताफा जाईल, खूप डॉलर विकत घ्यावे लागतील, मग मागणी वाढल्याने किंमत वाढेल आणि अमेरिकावाले साठ रुपयाचा डॉलर सत्तर पंचाहत्तर करतील! मोदीजी सध्या हिरो आहेत. त्यांची कुर्त्याची स्टाईल जगभर प्रसिद्ध आहे. मोदीजी बँडबाज्याने गेल्याने, मोठा प्रपोगंडा होईल, अमेरिकेच्या टुरिझम व्यवसायाची फ्रीमध्ये ॲडव्हरटाईज होईल. गुजरात टुरिझमची ॲडव्हरटाईज करण्याचे पैसे अमिताभ बच्चनजी घेत असतात आणि आपण फ्रीमध्ये अमेरिका टुरिझमची ॲडव्हरटाईज करू. हे गुजराती कुशल व्यापारी डोक्याला पटण्यासारखे वाटत नाही! तसे गुजराती लोक हुशार आहेत. अमेरिकेत खूप सारे पेट्रोल पंप, मॉटेल्स, हॉटेल्सचे मालक गुजराती भारतीय आहेत. पण अमेरिकावाले, गुजराती लोकांना आजकाल विजा देत नाही, कारण तिथे जाऊन व्यापार करतात म्हणून! अमेरिका फक्त आपल्या स्वार्थासाठी टॅलेंटेड, वेल स्किल्ड, ब्रेनी लोकांनाच, जे त्यांच्या अर्थव्यवस्थेला मदत करू शकतात त्यांना विजा देतो. मग आपण आपला फायदा का बघू नये?

**मोदीजींचा अमेरिका भेटीने विरोधकांना कोलीत?**

मोदीजी अमेरिकेत गेल्यास त्यांच्या विरोधकांना आयते कोलीत मिळेल. काँग्रेस वा इतर विरोधक म्हणतील ज्यांनी विजा नाकारून अपमान केला, बेइज्जत केले, निंदा केली, मानमर्यादा भंग केली, जगभर बदनाम केले, त्यांनाच 'वंदीन चरण घालीन लोटांगण' करायला गेले. कालपर्यंत आम्हाला घालीन लोटांगण वाले म्हणत होते, आता यांचा स्वाभिमान कुठे गेला? मोदींना घालीन लोटांगण तळवे चाटणे चा संदेश जगाला दिला म्हणून राजकीय विरोधक इश्यू करतील. असाही कधीकाळी मीडियावाले, राजकीय विधेयक जेव्हा अमेरिकेने, इंग्लंडने विजा नाकारला तेव्हा! बातमीत तथ्य असो वा नसो फ्रंट पेजवर बातमी छापायचे.

**अमेरिकेने माफी मागावी, नंतर अमेरिकावारी?**

मोदीजी भारतमातेला रिप्रेझेंट करतात. भारताचा आत्मसन्मान म्हणजे भारताचे

पंतप्रधान! आपणही अमेरिकेच्या वागण्याला साजेशे तोडीस तोड उत्तर द्यायला पाहिजे. पहिले अमेरिकेच्या अध्यक्षांना भारतवारी करायला सांगावे वा त्यांना माफी मागायला सांगावी. नाहीतर सध्यातरी प्रेमपूर्वक नकार द्यावा, काहीतरी कारण सांगितले तर चालेल, कलटी मारावी. नाहीतर अमीतजी शाह सारखा आपला प्रतिनिधी पाठवावा. असे काहीतरी करावे की आपली चाल ही बाणेदार उत्तर वाटावे! आपण समजा आताच अमेरिकेला गेलो नाहीतर भारताचे काही बिघडणार असेल, भारताचे नुकसान होणार असेल तर जरूर जावे.

**पुढचे प्लॅनिंग...**

भारतीय लोक एकसंघ होऊन काम करतील आणि जगात प्रथम क्रमांकावर जाणे, कठीण काम जरूर आहे. अमेरिकेत भारतीयांची लोकसंख्या दिड टक्का असली तरी नासामध्ये अडतीस टक्के शास्त्रज्ञ, सर्व वैद्यकीय व इतर डॉक्टर पस्तीस टक्के, उच्च तंत्रज्ञान वाल्या कंपन्यांमध्ये नोकरदार सरासरी वीस टक्के संख्या आहे. भारतीय संस्कृती उच्च दर्जाची असल्याने गुरू शिष्य परंपरा असलेली संस्कृती शिक्षकांची गुणवत्ता उच्च दर्जाची असल्याने अमेरिकेला स्वतःच्या स्वार्थासाठी अभ्यासात हुशार ब्रेनी लोकांना मजबूरीने ठेवून घ्यावे लागत आहे. भारतात तळागळातील लोकांपासून वरच्या स्तरापर्यंत छोट-छोट्या बलाची अंमलबजावणी करून, भारताला एकसंघ बनवून, भारतातील टूलेंटला एकत्र आणून, दीर्घकालीन प्लॅनींग करून जगात भारताला, भारतीय संस्कृतीला पहिल्या क्रमांकाचे स्थान मिळवून देणे डॉ. केशवरावजी हेडगेवार यांच्या स्वाभिमानाला साजेशी कृती राहील, असे विद्यमान सरकारच्या हातून होवो!

(दि. २० नोव्हेंबर २०१४, अभयराज्य)



# ३. भारतीयांनी इंग्रजप्रणीत अभ्यासक्रमाला आव्हान द्यावे

भारतीय आध्यात्मिक चळवळीतील काही महाराज युरोप अमेरिका इतरही देशात यशस्वीपणे त्यांच्या आध्यात्म ज्ञानाचा, योग शिक्षेचा प्रभाव पाडून गेले, पाडत आहेत. काही परदेशी गोरे लोक या चळवळीला जुळून भारतीय योग विद्येचा अभ्यास करीत आहेत. अमेरिकेतील युनिर्व्हसिटी ऑफ कॅलिफोर्निया, लॉस एजिल्सचा इतिहास विषयाचा पदवीधर असणारा हा तरूण ख्रिस बेकर अनुभूतीसाठी अमेरिकातून नाशिकमधील कुंभासाठी आला! प्रश्न हा आहे की आपल्या पुरातन विद्यांवर परदेशी लोक संशोधन करून तेच संशोधन नवीन रूपात, व्यवसाईक रूपात जगासमोर आणतील आणि नाव पैसा कमवतील आणि आम्ही भारतीय इंग्रजीप्रणीत अभ्यासक्रमाचे अनुकरण करीत आयुष्य घालविणार आहोत. या इंग्रजीप्रणीत अभ्यासक्रमाचे पिढ्यान पिढ्या चेलेच बनून राहणार आहोत का?

बहुजन समाजाने पुढाकार घेणे आवश्यक दिसत आहे. नवीन जे अत्याधुनिक विज्ञान पाश्चिमात्य देशात विकसीत झाले त्याचे उपयोग करून प्राचीन भारतीय पूजापाठ, होमहवन इत्यादी धार्मिक कार्यावर संशोधन करणे, टॅलेंटेड गुणवत्ताधारी विद्यार्थ्यांचा त्या क्षेत्रात भरणा करणे अती आवश्यक आहे.

धार्मिक पूजापाठांच्या जागा बहुजनांसाठी आरक्षित?

भारतीय संविधानानुसार धार्मिक पुस्तक वा तत्सम अभ्यासक्रम शालेय अभ्यासक्रमात समावेश करण्यास बंदी आहे. त्यामुळे धार्मिक कार्याची मक्तेदारी जास्त करून उच्चवर्णीयांकडेच राहिली. धार्मिक, कार्ये, पूजा, अर्चा, प्राचीन योग विद्या यांच्यावरील संशोधन पूर्णपणे दुलर्क्षित झाले कारण शासन कायदेशीररित्या त्यासाठी अंमलबजावणी करू शकत नसावे. पुरोगामी इंग्रजप्रणीत शिक्षण हे महत्वाचे हे सिद्ध झाले पण भारतीय पूर्वजांनी विकसीत केलेल्या योगविद्या या आउटडेटेड होऊन अंधश्रद्धा दिसायला लागल्या. काही भोंदू बाबांनी परत कहर केल्याने उलट भारतीय योगविद्यांच्या संशोधनावरच बंदी आणल्या जात आहे. असो पण कालची परिस्थिती वेगळी होती. पण आज जे प्रचंड महाकाय

टेक्नॉलाजीकल इस्टाब्लीशमेंट झालेले आहे ते टिकवून ठेवणे भविष्यात कठीण जाईल हे पाश्चात्य लोकांच्या लक्षात आले आहे. त्यामुळे प्राचीन भारतीय योगविद्या अस्तित्वात होत्या याची पक्की जाणीव उच्च तंत्रज्ञान क्षेत्रातील पाश्चात्य लोकांना लक्षात आली आहे. भारतीयांनी धार्मिक कार्ये वा पुस्तक, योगविद्या याचा अभ्यासक्रम प्रायमरीपासून भारतीय शिक्षण प्रणालीत लिगली समावेश करणे अती आवश्यक आहे. या अभ्यासक्रमाला आ.एन.डी. म्हणून संशोधनपर, ट्रायल बेसीसवर प्रोत्साहित करण्यात यावे. मंदिरातील धार्मिक कार्ये, पूजा अर्चाची मक्तेदारी आरक्षित करून बहुजनांना धार्मिक कार्यामध्ये वाव देण्यात यावा. या आधी जाती जन्मावरून पडत होत्या, आता अभ्यासक्रमातील प्राविण्यावरून धार्मिक कार्यामध्ये बहुजन समाजातील वर्गासाठी पोस्ट निर्माण करण्यात याव्या.

(दि. १७ जुलै २०१४, अभयराज्य)



# ४. नागपूर युनिवर्सिटीचा लोचा!

भारतीयांना आपली मातृभाषा सोडून इंग्रजीचाच जास्त चष्का चढला आहे. इंग्रजी येत नसली तर आपण श्वासही घेणे मुस्कील होईल असे काही भारतीयांना वाटते. इंग्रजीचा सुफडा साफ करायचे उपाय अंमलबजावणी करण्यापेक्षा इंग्रजीलाच नाचवित आहेत.

नागपूर विद्यापीठ हे सुंदर नाव मराठीत असताना युनिवर्सिटी हे नाव लिहायला गेले आणि लोचा करून ठेवला. इंग्रजांनी बनविलेला कंप्यूटर कीबोर्ड आपण वापरतो. कीबोर्डवर बी आणि व्ही लागून आहेत. टाईप करणाऱ्याने व्ही च्या जागी बी लेटर टाईप केले आणि युनिवर्सिटी चे युनिबर्सिटी करून ठेवले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या १०९व्या दिक्षांत समारोह मोठ्या उत्साहात पार पडला. विद्यापीठातर्फे लिंकन फॉट मुळे ही समस्या झाली असे सांगण्यात आले. डिप्लोमाच्या मुख्य हेडींगमध्येच ही चूक झाली. बाहेरचे लोक म्हणायचे युनिव्हर्सिटीची स्पेलींग ही लिहता येत नाही आणि चालले डिग्री द्यायला. ही झंझटच कशाला ठेवावी हे कळत नाही. भारतीयांनी हा मुद्दा लक्षात घ्यावा. विद्यार्थी, शिक्षक, पालक यांनी कंप्यूटर, कंप्यूटरची ऑपरेटींग सिस्टम, त्यावरचे सॉफ्टवेअर, कीबोर्ड, फॉन्ट्स आपल्या प्रादेशिक भाषेत कसे विकसीत होतील यावर भर देणे आवश्यक आहे. इंग्रजांनी सुरू केलेल्या व्यवसाईक शिक्षणप्रणालीची दिशा बदलण्याची शपथ भारतीयांनी घ्यावी. हे इंग्रजी फाँट, कीबोर्ड, त्याला संबंधीत प्रोग्रॅम्स, हार्डवेअर मूळापासूनच प्रादेशिक भाषेत विकसीत करण्यावर विद्यापीठातून निघणाऱ्या विद्यार्थ्यांनी आणि शिक्षकांनी भर द्यावा. सनमानित डिग्रीधारकांच्या डिप्लोमाच्या मुख्य हेडींग मध्ये झालेली स्पेलिंग मिस्टेक राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे नाव असलेल्या विद्यापीठाला अप्रत्यक्षपणे राष्ट्रभक्तीचे दिशानिर्देश करीत आहे. जर नागपूरकरांनी पुढाकार घेऊन कंप्यूटर, त्याची ओएस, फाँट्स सॉफ्टवेअर, हार्डवेअरच मुळी मराठी विकसीत करण्याचा चंग बांधला आणि तसे इंग्रजापेक्षा उत्कृष्ठ प्राडक्ट बनविले तर तेच खरे राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे नाव भारतीयांना शोभून दिसेल.

# ५. पाकिस्तानला मदत करणाऱ्या अमेरिकेचा दौरा ?



इतक्यात पंतप्रधान मोदीजी जेव्हा अमेरिकेच्या दौऱ्यावर गेले तेव्हा मीडियामध्ये १९६५च्या भारत–पाक युद्धाला ५० वर्षे पूर्ण झाल्याच्याही बातम्या प्रसारीत होत होत्या. ५० वर्षापूर्वी भारत आणि पाकिस्तान दरम्यान युद्ध झाले, अंदाजे ३००० भारतीय सेनिकांनी बलिदान दिले. ५० वर्षापूर्वी झालेल्या या भारत–पाक युद्धात अमेरिकेने पाकिस्तानला एफ–८६ लडाऊ विमाने, एम–४७ पॅटर्न रणगाडे पुरविले होते. जे भारतीयांच्या सैनिकांच्या बलिदानात सहकार्य करीत होते.

**भारताला स्वतःचे वजूद येणार की नाही?**

१९६५ च्या भारत–पाक युद्धात पाकिस्तानला अमेरिकेने मदत केली होती तर भारताला रशिया मदत करीत होता. अमेरिका आणि रशिया दोन्ही ख्रिश्चन देश! भारत पाकिस्तान देश कोबड्याच्या शर्यंतीसारखे झगडतात आणि अमेरिका रशिया कोंबड्याच्या पायांना कात्या (शस्त्र) बांधण्याचे काम करतात. भारतीय सैनिकांनी पराक्रमाची शर्थ केली युद्ध जिंकले हा भाग वेगळा पण भारतीय सैनिकांच्या मृत्यूस अमेरिका सुद्धा कारणीभूत होता. न्यायाधीश प्रत्यक्ष हत्या करणारा आणि अप्रत्यक्षपणे हत्येस मदत करणारा यांनाही दोषी पकडतात. भारतीय हुतात्मा सैनिकांच्या बलिदानात अमेरिका दोषी आहे हे शेंबड्या माणूसही समजू शकतो. गरीबीमुळे भारतीयांची मेमरी तर कमजोर होत नाही!



भारतीयांनी स्वतःचा वजूद निर्माण करणे अती आवश्यक आहे. आपण मुस्लीम समाजाचे सपोर्टर भासविण्यासाठी अमेरिकेने नरेंद्र मोदी यांना भूतकाळात विजा नाकारला होता. पंतप्रधान मोदी सत्तेत आल्यापासून दुसऱ्यांदा अमेरिकेला भेटीसाठी गेले. काँग्रेसचे राहुल गांधी, सोनिया गांधी आणि इतरही सर्वसामान्य जनता अमेरिका वारीसाठी उत्सुक असते. भारतीय सर्वसामान्यांपासून टॉपच्या लिडरनी सुद्धा कणखर मानसिकता बनवावी, भारत जगात बलवान बलाढ्य कसा बनेल या दिशेने पुढची रुपरेषा आखण्यास हातभार लावणे अती आवश्यक आहे. भ्रष्टाचार बंद करून, एक दुसऱ्यांचे पाय ओढण्याचे सोडून एकसंघ भारताची निर्मिती अनिवार्य आहे.

एका बाजूला १९६५ च्या भारत–पाक युद्धात पन्नास वर्षापूर्वी मृत झालेल्या भारतीयांना श्रद्धांजली प्रसारमाध्यमांनी, जनतेने अर्पण करावी आणि दुसऱ्या चॅनलवर भारतीय सैनिकांच्या श्रद्धांजलीस अप्रत्यक्ष प्रत्यक्षपणे कारणीभूत असलेल्या देशाची आमच्या जनतेने नेत्यांनी हाजी हाजी करावी अशी परिस्थिती दुर्दैवी नव्हे का?

(दि. ८ ऑक्टोबर २०१५, अभयराज्य)

# ६. मेक इन इंडियाच्या निमित्ताने! इंग्रजीचा भारतातून सुफडा साफ करा!

इंग्रजांनी भारतावर दोनशे दिडशे वर्षे राज्य केले. इंग्रज तर निघून गेलेत पण इंग्रजीला इथे सोडून गेले. एखाद्या पिडीतेवर बलवत्तर नराधमाने दिडशे वर्षे बलात्कार करावा आणि पिडीतेने त्या नराधमाचीच फिरुन आठवण करावी अशी कशी सुशिक्षीत भारतीयांची स्थिती झाली आहे. कोणी इंम्प्रेशन मारण्यासाठी इंग्रजीत डॉयलाग मारतो तर कोणी मी किती हुशार आहो म्हणून दाखविण्यासाठी इंग्रजी झाडतो. जिथे तिथे इंग्रजी! १७७४ मध्ये गोऱ्या इंग्रजांनी सुरू केलेली न्यायपालिकेची पुस्तके इंग्रजीमध्ये, ऑफीस, बँका, शासकीय, खाजगी सर्व ठिकाणी इंग्रजीचा बोलबाला! मात्र आता वेळ बदलली आहे. भारतातून इंग्रजीचा सुफडा साफ करायलावेळ लागणार नाही. सध्याचे आधुनिक तंत्रज्ञान कंप्यूटरवर आधारित आहे. या कंप्यूटरवरची चालणारी ऑपरेटींग सिस्टमर प्रोगॅम्स इंग्रजीत लिहिलेले आहेत. विंडोज, अँड्राईड, लिनक्स सारख्या समरूप ऑपरेटींग सिस्टम ओ.एस. जर भारतीयांनी बी.ए.आर.सी., डि.आर.डि.ओ. किंवा कोणत्याही भारतीय संशोधन केंद्रात हिंदी भाषेत वा प्रादेशिक भाषेत डेव्हलप केल्या तर इंग्रजीचा नामोनिशान भारतातून मिटवायला वेळ लागणार नाही. मायक्रोसॉफ्ट ऑफीस सारखे प्राडक्ट्स फोनवर चालणारी अँड्राईड सारखी ऑपरेटींग सिस्टम जर भारतीयांनी हिंदी भाषेत बनविली त्याला अनुरूप हार्डवेअर भारताने आपल्या देशात असेंबल केले तर इंग्रजी इथून संपलीच समजा!

कसे करता येईल? कसे शक्य आहे? आजकाल कंप्यूटर शिवाय काही होत नाही. ही टेक्नालॉजी ऑलरेडी डेव्हलप झाली आहे. कंप्यूटरसाठी लागणारे मायक्रोचिप्स तैवान मध्ये बनतात.

एंटेल पेंटीअम सारखे मायक्रोप्रोसेसर अमेरिकेत बनतात. मायक्रोप्रोसेसर वर रन होणारा ओ.एस. प्रोग्रॅम अमेरिकेत वा इतरही बनतो. या ओ.एस.च्यावर चालणारे अप्लीकेशन्स भारतीय आयटी कंपन्या बनवितात. कंप्यूटरसाठी लागणारा हार्डवेअर साफ्टवेअरची डिटेल्ड अभ्यास भारतीय आयटी प्रोफेशनल्सनी केलेला आहे. बी.ए.आर.सी. मुंबई, डि.आर.डि.ओ. बंगलोर, आय.आय.टी. किंवा भारतातील इतर संशोधन संस्था तैवान जपान सारख्या देशांबरोबर कोल्याबरेट



संलग्न करून कंप्यूटर्सचा सांगाडा म्हणजे हार्डवेअर आणि लागणारे असेंबली प्राग्रॅम्स, कंपायलर्स ओ.एस. आणि इतर साफ्टवेअर अप्लीकेशन हिंदीमध्ये डेव्हलप करू शकतात.

**आमच्या क्षमता आहे का?**

अॅलोपॅथी या वैद्यक शास्त्राचे यशस्वी इंग्रजीचा संशोधन अमेरिकेत झाले. अमेरिकन शास्त्रज्ञांच्या इन्होवेटीव्ह आयडीया यशस्वी झाल्यात. पण भारतीय विद्यार्थी अभ्यासात गंभीर, हार्डवर्कींग, शिस्तबद्ध, डेडीकेटेड असल्याने अमेरिकेतही भारतीय एम.बी.बी.एस. डॉक्टरांचा वरचष्मा आहे. अमेरिकेतील पूर्ण डॉक्टरांपैकी तीस–चाळीस टक्के डॉक्टर्स भारतीय आहेत. अशीच परिस्थिती अमेरिकेत भारतीय आयटी प्रोफेशनल्सची आहे.

विंडोज ऑपरेटींग सिस्टम डेव्हलप करणाऱ्या बिल गेट्सच्या मायक्रोसाफ्ट कंपनीत ३०–४० टक्के भारतीय प्रोफेशनल्स आहेत. जर भारतीय लोक मंगल मोहीम सरसपणे यशस्वी करू शकतात म्हणजे आपण आपले हार्डवेअर आणि ओ.एस. प्रोग्रॅम हिंदी भाषेत बनवू शकतो. या जगात सर्वात भरोसेवाली रग्ड सोल्यारीस आपरेटींग सिस्टम लिहणाऱ्या सन मायक्रोसिस्टम कंपनीचा जनक भारतीयच होता.

**स्वदेशीचा बोलबाला करावा लागत नाही, रक्तातच असावे लागते!**

अमेरिकन वा पाश्चिमात्य देशात स्वदेशी त्यांच्या रक्तातच घुसली असते. त्यांना भारतीयांसारखा स्वदेशीचा वेगळा प्रपोगंडा करावा लागत नाही. त्यांच्या देशात बनलेले प्राडक्स ते स्वतःच वापरतात. त्यांच्या स्वदेश प्राडक्समध्ये त्रूटी असतील तर दहा लोकांना तक्रार करण्यापेक्षा, बदनाम करण्यापेक्षा बनविणाऱ्या संबंधीत लोकांना वा कंपनीला संपर्क करून त्रूटी कमी करण्यासाठी स्वतःचे कॉन्ट्रीब्यूशन करतात.

वापरणाऱ्यांनी आणि बनविणाऱ्यांनी एक दुसऱ्यांमध्ये विश्वास ठेवावा लागतो. मोदीजींचा मेक इन इंडिया तेव्हाच यशस्वी होऊ शकतो. साफ्टवेअर बनविल्यानंतर त्याच संस्थेत सर्वांनी वापरायचा, रिंगरस टेस्टींग करायचे, प्रॉडक्ट कंपनीतून बाहेर पडण्याआधी अर्धाअधिक (८० टक्के) यशस्वी तिथेच होतो. आज आम्ही हार्डवेअर, ओ.एस. साफ्टवेअर, राऊटर्स अमेरिकन कंपन्यांचे वापरतो. त्यांनी काही जासूसी वा गुप्तचर प्रोग्रॅम टाकले असतील तर सांगता येत

नाही. अमेरिका विश्वास ठेवण्यालायक देश नाही.

**सरकारी ऑफीसेस मध्ये हिंदी प्रॉडक्ट्स**

आज आपण भारतात जे कंप्यूटर्स शासकीय, निमशासकीय, प्राव्हेट कंपन्यांमध्ये वापरतो त्यांचे पार्टस् अमेरिकेतून येतात. जी ओ.एस. सॉफ्टवेअर, मायक्रोसॉफ्ट ऑफीस वापरतो त्याचे पैसे अमेरिकन कंपन्यांना जातात. भारतीय आयटी प्रोफेशनल्स हे सहज बनवू शकतात आणि भारतातील आयात कमी होऊ शकते. आपले प्रॉडक्ट्स बनवून सर्व सरकारी ऑफीसेसमध्ये कंपलसरी जरी केलेत तरी भारतातून इंग्रजीचे अस्तित्व संपवायला जास्त वेळ लागणार नाही. डॉलर रेट कमी होऊन भारत श्रीमंत व्हायला मदत होईल, हा भाग वेगळा.

**इंग्रजीमुळे होणारे तोटे**

आम्ही घरी मराठी बोलतो, आजूबाजूचे लोक मराठी बोलतात. मुलगा कंप्यूटर वर वा फोनवर इंग्रजी भाषेत कमांड लिहितो. त्यामुळे मुलांची पूर्णची पूर्ण गुणवत्ता बुद्धी (डिव्हाईड) विभागली जाते. पालक मराठीत मदत करू शकतात, इंग्रजीत नाही. त्यामुळे आमच्या मुलांकडून जागतिक दर्जाचे प्रॉडक्ट्स घडण्यासाठी डबल मेहनत घ्यावी लागते. एकदा का फोनवरील वा कंप्यूटरवरील ओ.एस. ऑपरेटींग सिस्टम प्रादेशिक भाषा वा हिंदीत लिहिल्या गेली, आमच्या विद्यार्थ्यांपर्यंत पोहचली की भारताचे जागतिक पिक्चर बदलायला वेळ लागणार नाही!

(दि. २३ ऑक्टोबर २०१४, अभयराज्य)



# ७. राज्यकर्त्यांनो, तुम्ही खरोखरच पुढारी आहात का?

श्रेष्ठ विद्वान व्यक्तीचे कोणीही कौतुक करतात आणि त्यांचे अनुकरण करतात. इंग्लंड अमेरिकासारखे पाश्चात्य देश आपल्या देशातील राज्यकर्त्यांना श्रेष्ठ वाटले आणि त्यांचे अनुकरण करीत आहेत. पण इंग्लंड अमेरिकासारखे पाश्चात्य देश खरोखरच श्रेष्ठ आहेत का? काही वर्षापूर्वी सर्व्हे करण्यात आला, त्यामध्ये भारतातले लोक ८० टक्के सुखी समाधानी आढळले. भौतिक वा बाह्य दिसणारी प्रगती ही नेहमी बदलत असते. काल मातीचे घर होते, आज विटीफाईड टाईल्स लावत आहे. या विटीफाईड टाईल्समुळे पायांना विकार होत आहेत. घसरून पडून कंबरडे तुटत आहेत. अमेरिका पाश्चिमात्य देश श्रीमंत असले तरी बहुतांशी लोकांची मानसिकता अतृप्त आत्मासारखी आहे.

सूर्यादयापूर्वी उठून शेतात जाणारा शेतकरी, हिरव्या गार शेतात फिरणारा शेतकरी बघीतला की स्पर्धेच्या युगात जगणारा, भौतिक प्रगती केलेला श्रीमंत उद्योजक शेतकऱ्याच्या सुखी समाधानी नैसर्गिक जीवनाकडे बघून द्वेष करायला लागतो.

लिडर लोक जसे वैचारिक आग लावतात, लोकांमध्ये एक वैचारिक वादळ उठून नवीन काहीतरी अप्रत्यक्षपणे लोकांना अनुसरायला बाधित करतात, तसाच अमेरिका आणि पाश्चात्य देश भारतीयांना करायला भाग पाडीत आहेत.

**अमेरिका खरोखर लिडर आहे?**

अमेरिका खरोखरच लिडर आहे पण चालू लिडर आहे. भारतासारख्या देशाला एक नवीन वळण लावून देतो आणि आपण बाजूला होतो. आम्ही लोक सापांना वाचवितो. नाग सारख्या विषारी सापाच्या दंशामुळे बरेच लोक मृत्यूमुखी पडतात. जंगलातले मोकाट वाघ बिबटे खेड्यातल्या लोकांचा जीव घेतात आणि आम्ही भारतीय वन्यप्राणी जीवांना आपल्या उदार होऊन पोसतो. कधीतर मी पुस्तकात की इंटरनेटवर वाचले होते की जुन्या काळी अमेरिकेत विषारी साप होते. पण अमेरिकेत औषधी वगैरे वापरून संपूर्ण विषारी सापाच्या जाती समूळ नष्ट केल्या. आता एक्केदुक्के बिनविषारी साप त्यांच्या जंगलात आढळतात. टेरी थॉमसन नावच्या अमेरिकन शेतकऱ्याने काही वाघ आणि अन्य प्राणी त्यांच्याकडे

झू मध्ये प्राणी संग्रहालयात (ॲनीमल फार्म) मध्ये ठेवले होते. त्या झू च्या मालकाला (टेरी थॉमसन) मानसिक झटका आला, त्याने पूर्ण वन्यप्राणी मोकाट सोडून दिले आणि स्वतः आत्महत्या केली. अमेरिकन पोलीसांनी त्या पूर्ण वन्य प्राण्यांना गोळ्या घालून मारले. ऑक्टोबर २०११, अमेरिकेतील ओहायो राज्यात पन्नास जंगली प्राणी अमेरिकन सरकारने मारले होते त्यात सतरा सिंह आणि अठरा दुर्मिळ बंगाली वाघांचा समावेश होता. टेरी थॉमसनने त्याच्या (ॲनीमल फार्ममधील) पिंजऱ्यात ठेवलेले जंगली प्राणी सोडून दिले आणि बंदूकीची गोळी घालून आत्महत्या केली होती, त्यानंतर हे भीषण कृत्य अमेरिकेने केले होते. एकही अमेरिकन व्यकतीचा जीव जायला नको म्हणून त्या निरपराध प्राण्यांचे अमेरिकन सरकारने हत्या केली. पर्यावरण संतुलनाचे धडे देणारा अमेरिका किती चालू लिडर आहे हे ह्या उदाहरणावरून लक्षात येईल.

आपल्या देशातील एकही नागरिक मरायला नको म्हणून निरपराध प्राण्यांची हत्या करणारा अमेरिका! आणि आमचे सरकार बघा. गरीब खेडूत लोकांना वाघ खातात, बिबटे मारतात पण आमच्या राज्यकर्त्यांना प्राण्यांचा जास्तीचाच पुळका! स्वतःच्या घराच्या स्वतःच्या मुलाला वाघाने मारले तर त्यांना! अमेरिकन राज्यकर्त्यांना सर्वसामान्यांचे गरीबांचे दुःख समजते, अमेरिका इतर देशांच्या तुलनेत पुढे असायला हे एक महत्वाचे कारण आहे.

**संस्कृतीचे अंधानुकरण**

पाश्चात्य देशात १२–१४ वर्षापासून मुलांचे गुटरगू चालू होऊन जाते. त्या वयापासून मुले मुली लैंगिक संबंध ठेवणे चालू करतात. अन्न आणि झोप ही जशी मानवी शरीराची गरज आहे तशी मैथून सुद्धा मानवी शरीराची गरज आहे. त्यातूनच आधी मुले मुली आकर्षित होतात आणि प्रेमात रूपांतर होते.

आपल्या पूर्वजांनी ही गोष्ट हेरली होती. आधी बालविवाह पद्धत होती. महात्मा गांधीजीचे लग्न, बाबासाहेब आंबेडकरांचे लग्न जुन्या प्रथेनुसार अठरा वर्षाच्या आधीच झाले होते.

अमेरिकन मुलाला माहीत असते आपली बहीण आज एका मुलाबरोबर उद्या दुसऱ्या बरोबर झोपते. अमेरिकन मुलाला हे ही माहीत असते आपली आई नवरा सोडून इतर कितीरी पुरूषांसोबत भूतकाळात झोपली आहे, झोपू शकते. भारतीय पूर्वजांना ही संस्कृती मान्य नव्हती. एक नवरा एक बायको आणि मुले! दहा नवरे नाही आणि दहा बायका नाही! उद्या जाऊन तुम्ही जर वाटत असेल की आपल्या



मुलाच्या, नातवांच्या, पडनातवांच्या बहीणी किंवा आई आपला नवरा सोडून इतरही पुरूषांसोबत झोपाव्या तर आपल्याला पाश्चिमात्य संस्कृतीचे अंधानुकरण थांबविलेच पाहिजे!

मुलाला नोकरी नाही म्हणून लग्न करायचे नाही असा समज स्वातंत्र्यानंतर दृढ झाल्याने आज तीस पस्तीस वय ओलांडूनही मुले अशीच लोंबकळत आहेत. बऱ्याच घरच्या कुमारिका मुली विना लग्नाच्या पडून आहे. वाढलेल्या वयामुळे मुलींच्या चेहऱ्याचे तेज मावळले आहे. आधीच्या काळात जसे बालविवाह होत होते तसे झाले असते तर हे प्रश्न उद्‌भवले नसते. लहानपणी लग्न करणे काय वाईट? मुलाचे वडील येणाऱ्या सुनेला मूलीसारखे वागवतील, जबाबदारीने वाढवतील, मुलगा मुलगी नोकरी लागो वा ना लागो दोघेही त्यांच्या भविष्याला जिम्मेदार असतील! मुलांचे लग्नाचे वय अठरा ठेवावे हे कोणी सांगितले? महात्मा गांधीजींची आत्मकथा वाचा. गांधीजी १७ वर्षाचे असताना, वडील मृत्यूची घटका मोजत असताना त्यांच्या हातून असे काय घडले ज्यामुळे ते स्वतःला माफ करू शकले नाही? पाश्चिमात्यांनी त्यांच्याकडे लग्नाचे वय १८ वर्षापासूनच चालू होते. लग्नाचे वय व्हायच्या आधी कुमारिका माताची संख्या एकूण कुमारिकांच्या १५ टक्के आहे. कुमारिका मुलींची माता बनण्याची संख्या एकूण कुमारिकांच्या १५ टक्के आहे.

काही दिवसांपूर्वी व्हीएनआईटी चे दोन विद्यार्थी, मुलगा आणि मुलगी पहाटेला होस्टेलला परत येताना पोलीसांच्या तावडीत सापडले. ती गोष्ट वृत्तपत्रामध्ये प्रकाशित झाली. आई वडिलांपासून लपून चोरून न सांगता हे मुलगा मुलगी विद्यार्थी हनीमूनला की कुठे गेले होते. समजा जर लहानपणी लग्न झाले असते तर अशा गोष्टी उद्‌भवल्याच नसत्या. भारतीय संस्कृती ही एक नंबर आहे. देशाची संस्कृती आणि देशाच्या विकासाचा संबंध नाही. आपल्या देशाची संस्कृती ही व्यक्तीगत (पर्सनल) किंवा कौटुंबिक जीवनाची आचारसंहिता ठरविते. देशाचा विकास हा नागरिकांच्या व्यवहारिक (प्रोफेशनल) जीवनाशी निगडीत असतो. प्रत्येकाचे व्यवहारिक आणि व्यक्तीगत जीवन हे वेगळे आहेत.

अमेरिका किंवा पाश्चिमात्य देशात व्यक्तीगत किंवा कौटुंबिक जीवन आणि व्यवहारिक जीवन हे वेगवेगळे अंग समजले जातात. अमेरिकन लोक व्यवहारिक जीवन तंतोतंत पाळतात. सांघिक वृत्तीने कामे करतात. एकसंघ एकरूप होऊन मोठे मोठे प्रोजेक्ट एकजुटीने करतात. भ्रष्टाचार नसलेली, एकमेकांना अडथळे

उभी न करणारी त्यांची सवय त्यांना महासत्ता बनवून गेली. व्यक्तीगत किंवा कौटुंबिक आयुष्याचा विचार केला तर भारतीय लोक त्यांच्यापेक्षा खूप सुखी आणि समाधानी होते, अजूनही आहेत. पण पाश्चिमात्यांचे कायदे, त्यांची संस्कृती आम्ही अंधानुकरण करायला निघालोत. त्यामुळे काडीमोडाचे प्रकार वाढलेत, बलात्काराचे प्रमाणही वाढले आणि भारतीय कौटुंबिक न्यायव्यवस्था पूर्णपणे मोकळीस येत आहे आणि सामान्य जनतेने डोळे उघडणे अती आवश्यक आहे.

दहा वर्षाच्या अमेरिकेतील वास्तव्यानंतर मी भारतात आलो. २००९ मध्ये मी बोरीवली मुंबईच्या झोपडपट्टीमधून फेरफटका मारीत होतो. एका लग्नाचे रिसेप्शन चालूहो. जोरात डिजे बँडबाजा चालू होता. झोपडपट्टीतली मुले इतकी बेधुंद नाचत होती की मी अमेरिकेतील श्रीमंताच्या सोज्वळ स्वच्छ निटनेटक्या चालणाऱ्या पार्ट्या विसरून गेलो. झोपडपट्टीतील जागा अस्वच्छ असो, गल्ली कंजेस्टेड असो, राहायला जागा अपूरी असो, पण रिसेप्शनमध्ये बेधुंद नाचणाऱ्या, डान्स करणाऱ्या मुलांनी मन एकदम थक्क करून टाकले! भौतिक गरज प्रत्येकाकडे कमी जास्त असतीलच, पण आनंदाने बेधुंद होऊन लाईफ इन्जाय करणे ते भारतीयांनीच! अमेरिकन लोक श्रीमंत असल्याने, सुविधा मुबलक असल्याने २–३ वर्षे जास्त जगू शकतात पण राम नाव सत्य तर टाळू शकत नाहीत! जीवनाचा सार भगवद्गीतेत लिहिला आहे. आमच्या पूर्वजांना तो चांगला कळला होता. त्यामुळे आमच्या देशातील आध्यात्मिक गुरू कालही इंग्रज अमेरिकन लोकांवर राज्य करीत होते, आजही करीत आहेत. पण आमचे राज्यकर्ते पुढारी नसून प्रवाशासारखे गाडी चालवित आहेत!

(दि. २ जानेवारी २०१४, अभयराज्य)





## १. वाढत्या बलात्काराच्या घटना? स्त्रियांच्या मॉडर्न कपड्यांमुळे

देवाने किंवा निसर्गाने मानवाची निर्मिती केली आणि झोप ही मानवाची जगण्यासाठी रोजची गरज आहे. मैथून ही सुद्धा एक निसर्गनिर्मित गरज आहे. मैथून या गरजेची तीव्रता ही मानवाच्या वयानुसार बदलत असते. वयाच्या कालावधी ५ ते १५ वर्ष, १५ ते २५ वर्ष, २५ ते ३५ वर्ष, ३५ ते ४५ वर्ष, ४५ ते ५५ वर्ष, ६६ ते ६५ वर्ष, ६५ ते ७५ वर्ष, ७५ ते ८५ वर्ष इ. असे वेगवेगळे गट तयार करता येतील. स्त्री आणि पुरुष या विजातीय व्यक्तींच्या प्रत्येक वयोमानात वेगवेगळ्या तऱ्हेने शारीरिक आणि मानसिक आकर्षण, भावना, कामवासना आणि संवेदना बदलत असतात. माणूस वेडा असेल, मतीमंद असेल, अपंग असेल, लंगडा लुला, बहिरा, आंधळा कसाही असो बाकी काही कळत नसेल पण मैथून म्हणजे काय आणि करायचे कसे? हे बरोबर कळते. अशी ही एक नैसर्गिक, निसर्गनिर्मित, उपजत, देवाने निर्माण केलेली मानवाची घडण आहे.

पुरुषांच्या पेहरावात फारशी विविधता नसते. शर्ट पॅन्ट बस स्त्रियांच्या पेहरावात खूप विविधता आहे. पण कुठेतरी गडबड आहे. बहुतेक भारतीय स्त्रिया समजदार आहेत. चांगल्या संस्कारमय आहेत आम्ही त्यांचे मनापासून आभारी आहोत. भारतीयसंस्कृतीला जपून नीट शरीर झाकलेले असते. भारत स्वतंत्र झाला. देश स्वतंत्र आहे. देशाला संविधान आहे. आम्ही आमच्या मनाने कसे ही कपडे घालू शकतो. कोणाचे स्वातंत्र्य म्हणजे इतर दुसऱ्यांच्या भावना दुषित करणे आणि भडकाविणे नव्हे.

पुरुषांनी आपली मानसिकता बदलली पाहिजे असा सूर आवळल्या जातो. स्त्रियांनी अर्धनग्न कपडे जरी घातले तरी पुरुषांनी दुर्लक्ष करावे आणि हळूहळू सवय करुन घ्यावी हे शक्य आहे काय? बहुतेक पुरुष सौज्जळपणाचा आव आणून गप्प बसत आहेत. मैथून ही निसर्ग निर्मित एक मूलभूत गरज आहे. कामवासनेची निर्मिती या गरजेतून होते कामवासना ही एका अग्नीसारखी असते. अग्नीत खूप खूप लाकडे टाकलीत तर अग्नीला सवय होईल आणि ती तृप्त होईल असे शक्य नाही. उलट जेवढी लाकडे टाकू तेवढी ती भयंकर रूप धारण करते.

अमेरिका आणि इतर पाश्चात्य देशात वातावरण तापमान थंड आहे. कानात

वारा घुसलेल्या, पिसाळलेल्या बैलांना गुराख्याने तलावाच्या, नदीच्या थंड पाण्यात हाकलले की ते शांत होतात. भारतात तापमान गरम आहे. वरुन भारतातल्या लोकांना मसाल्याचे आणि तिखट खाल्ल्याशिवाय होत नाही. अप्रत्यक्ष किंवा काही छुप्या कारणांमुळे त्या पाश्चात्य देशात स्त्रिया अर्धनग्न उघड्यावर जरी फिरल्या तरी फरक पडत नसावा.

भारत हा अमेरिका आणि इतर पाश्चात्य देशात योगा आणि कामसूत्र या दोन गोष्टींसाठी प्रसिद्ध आहे. आपल्या पूर्वजांनी कामसूत्रावर गाढा अभ्यास केला होता. भारतीय कामसूत्र मधील काही मैथून स्थिती मुद्रा तर अजूनही पाश्चात्य देशातील लोकांच्या कल्पनेबाहेर आहेत. पण भारतीय संस्कृती काम विषयाशी जुडलेल्या कामुक दृश्यांना, कामुक वागण्याला, कामुक वेशभूषेला बेडरुममध्ये किंवा बंद खोलीत मान्यता देते, उघड्यावर सार्वजनिक खुलेआम ठिकाणी नाही. जशी हाताची पाचही बोटे सारखी नसतात तशी प्रत्येक मानवात मैथून या भावनेची तीव्रता कमी जास्त प्रमाणात असते. इथे सर्व लोक काही रजोगुणी नाहीत! काही पुरुषांमध्ये कामवासनेच्या संवेदना जास्त प्रमाणात असतात. काही स्त्रियांचे शरीराला चिपकलेले कपडे, आतल्या अवयवांचा स्पष्ट आकार दिसणारे कपडे, उतरल्या गळ्याचे शर्ट जिथून स्त्री झुकल्यावर आतील अवयवांची झलक दिसते. उघड्या भूजा असलेले कपडे आणि अशा कपड्यातील स्त्रिया बघून पुरुषांच्या मनात मैथून या भावनेची घालमेल होऊन कामवासनेची तीव्रता वाढते. जास्त करुन उच्चभ्रू समाजातील स्त्रिया असे कामवासनेत आग ओकणारे कपडे घालत असतात. त्यात मादक जाहिराती, दूरदर्शन आणि इंटरनेटीची भर. साधारण पुरुषांमध्ये कामवासनेच्या कमी असलेल्या संवेदना, अशा अर्थनग्न, विभत्स्य, भावना भडकाविणाऱ्या कपड्यांमुळे जास्त प्रमाणात वाढण्यास मदत होते. कालांतराने कामवासनेचे सतत चिंतन करीत मनस्थिती बिघडू शकते. दिवसेंदिवस कामवासनेची तीव्रता वाढत असते. नीतीनियमांच ते उल्लंघन करायला ते मागे पुढे बघणार नाहीत अशी मनस्थिती होते. कामांध अवस्थेत गेलेले पुरुष आपली भडास तमोगुणी पुरुष कोणत्या स्त्रीवर आक्रमण करतील याचा नेम राहत नाही. यात कधी दुर्बल, कधी मतीमंद, कधी गरीब, कधी अल्पवयीन मुली बळी पडतात. बलात्कार करणाऱ्याची आक्रमक वृत्ती ही अचानक बनत नाही. वाढलेल्या बलात्कारांच्या विविध कारणांपैकी सध्याचे स्त्रियांच्या कपड्ययांचे आधुनिकीकरण हे एक महत्वाचे कारण आहे.

(दि. ४ मे २०१८, अभयराज्य)



## २. भारतीयांचे दुर्दैव : नरेंद्र मोदींचा सनी लिओनकडून पराभव



भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदीजींचा कोणी पराभव करावा ही आश्चर्यचकित करणारी घटना आहे. वरून सोज्वळपणाचा आव आणणारे, इंटरनेट कम्प्यूटरचा वापर करणारे गरीब भारतात सुशिक्षीत म्हणवून घेणारे लोक किती चालू आहेत हे पुराव्यानिशी सिद्ध झाले आहे. २०१४ या सालात भारतामध्ये गुगल सर्चवर सर्वाधिक कोण शोधले गेले तर त्यात ब्लू फिल्मची नायिका सनी लिओन पहिली आणि लोकप्रिय समजल्या जाणाऱ्या नरेंद्र मोदींचा नंबर दुसरा आला!

भारतीय चित्रपआत प्रसिद्ध झालेली सनी लिओन मूळची ब्लू फिल्मस्ची नायिका आहे. सनी लिओनच्या नंग्यापुंग्या व्हीडिओ क्लीप्स आणि छायाचित्रे सर्रासपणे इंटरनेट महाजालावर फ्रीमध्ये आढळतात. इंटरनेट सर्फ करणारे भारतीय लोक पूर्ण कपडे काढून आणि पूर्ण कपडे घालून सनी लिओन कशी दिसते म्हणून दहा वेळा परिक्षण करुन शरीराचा चप्पा चप्पा झूम करून पहात अभ्यासत असतील म्हणून तिचा नंबर पहिला आला असावा. सलमान खान, कॅथरिना कैफ, दिपीका पादूकोन अनुक्रमे तिसरा, चौथा आणि पाचव्या क्रमांकावर आहेत.

**भाजपाची प्रचार यंत्रणा कमी पडली!**

भाजपाच्या ऑनलाईन प्रचारासाठी असलेली कार्यक्षम सुसंघटित समन्वय असलेली प्रचार यंत्रणा, जिकडे तिकडे इंटरनेटवर मोदी दिसण्यासाठी बीजेपी आणि संघाचे, इंग्लंड अमेरिकेतील इतर सर्व देशातील गुजराती आणि हिंदुत्वाचा पुरस्कार करणारे चाहते, सर्व लोक कामाला जुंपले तरी २०१४ सालात सर्वात यशस्वी आणि ताकतवर ठरलेले पंतप्रधान मोदी सनी लिओनला मागे टाकू शकले नाहीत. सनी लिओनमुळे अश्लीलतेचा प्रचार होईल म्हणून आखाती मुस्लीम

देशात सनी लिओनला जाण्यासाठी विसा नाकरल्या गेला. आमच्या भारत देशात सनी लिओनवर तशीच बंदी आणली असती तर आमच्या पंतप्रधानांवर पराभवाची नामुष्की ओढविली नसती.

**बलात्काराचा चुकीचा बागुलबुआ**

सनी लिओनचे नंगे पुंगे इंटरनेटवरचे फोटो, तिच्या कंडोमच्या जाहिराती आणि अशाच प्रकारच्या तत्सम इतरही जाहिराती तरूणांच्या कामवासना भडकवायला कारणीभूत आहेत. मोठी वृत्तपत्रे फ्रंटपेजवर निर्भया निर्भया गजर करीत वर्षात बलात्कार किती वाढलेत याचा आढावा सादर करतात तर सोबत असलेल्या रंगीत पुरवणीत देशी विदेशी नट–नट्यांचे नंगेपुंगे, अर्धवट कपडे असलेले मादक फोटो छापतात. स्वतःच्या स्वार्थासाठी ही लिडींग प्रसारमाध्यमे भारतीय तरूण पिढीला कसे मिसलिड करत आहेत याचे पुरावे सादर करतात. दही हांडी, शंकरपट, कोंबड्याच्या झुंजीवर बंदी आणण्यापेक्षा न्यायपालिकेने प्रसारमाध्यमांच्या अनापशनाप प्रसिद्धीवर बंधणे टाकावीत. अमेरिकेत दर हजार लोकसंख्ये मागे दर वर्षी नऊ बलात्कार वा तत्सम गुन्ह्यांची नोंद होते. आखाती अरब मुस्लीम राष्ट्रात जगाच्या तुलनेत सर्वात कमी बलात्कार वा तत्सम गुन्ह्यांची नोंद होते कारण ते सनी लिओन सारख्या ब्लू फिल्मच्या नायिकेला विजा नाकारतात.

**देशाचे वाटोळे !**

बारा–चवदा वर्षानंतर मुले मुली वयात यायला लागतात. काही प्रसार माध्यमांच्या नंग्या पुंग्या चित्राच्या प्रसारामुळे तरूणांच्या कामवासना भडकविल्या जातात. बालविवाहावर बंदी असल्याने मुलांना कामविकार शमविण्यासाठी पर्यायी व्यवस्था नाही. त्यामुळे गुंड प्रवृत्तीचे तरूण रात्री बेरात्री एकांतात फिरणाऱ्या मुली महिलांवर झडप घालतात. जे गुंड प्रवृत्तीचे नाहीत ते लपून छपून आव डाव पाहून दोन चार वर्षे वयाच्या लहान मुलींवर आपल्यापेक्षा कमजोर गरीब मुलींवर वा मतीमंद मुलींवर लगट करू शकतात. लपून छपून आक्रमण करणाऱ्या तरूणांमध्ये सामान्य निरागस मवाळ मुलांचा सुद्धा समावेश आहे. हातच्या काकणाला आरशा कशाला अशी पारदर्शी कारणे दिसत असतानाही भारतीय पालक द्विधा मानसिकतेत सापडला आहे. भारतातील कायदेकानून, प्रशासन पाश्चिमात्य सांस्कृतीच्या दबावाखाली येऊन देशाचे वाटोळे होत असल्याची जाणीव सर्वसामान्यांचे आहे की नाही ही शंकाच आहे.



# ३. तिळसंक्रांत की किट्टी पार्टी ?

आमचे पूर्वज खरोखरच बुद्धिमान आणि अभ्यासू होते. आई–वडील, म्हातारा–म्हातारी, मुले–मुली, गाय–बैल, प्राणीमात्र आणि सर्प सुद्धा सर्वांसाठी आवडी निवडी बघून विविध त्योहारांची माळ रचून ठेवली. खेड्यातील लहान मुले, महिलाव व नववधू ज्या सणाची उत्साहाने आवर्जून वाट पाहतात तो म्हणजे मकरसंक्रांत वा तीळसंक्रांत म्हणजे तीळगुळाचा गोळवा, सुवासिनीचे हळदकुंकू अन् पतंगाची भरारीही, वान वाटण्याचा प्रकारही लहान मुलांसाठी कुतूहलाचाच. आमच्या आईला वानात काय मिळे, वालाच्या शेंगा, बोरे काय हातात पडते म्हणून आम्हाला मोठी उत्सुकताच असायची. महिला नटून धटून एक दुसऱ्यांच्या घरी जातात, चर्चा करतात, विचारांची देवान घेवान करतात आणि खूप मजा लुटतात. अन् नाव घ्या, आपल्या पतीचे नाव घ्या म्हणून वाण देतात. पाश्चात्य देशातही असाच मकरसंक्रांती सारखा प्रकार काही वर्षापूर्वी उदयास आला. याला म्हणतात किटी पार्टी. नटून धटून या परदेशी बायका गप्पा मारण्यासाठी किटी पार्टीत जातात. ब्यूटी पार्लरच्या चकरा मारुन, मॅचींग ज्वेलरी, मॅचींग सँडल घालून स्टेटस सिंबाल मेंटेंन करुन हॉटेलात वगैरे या उच्चभ्रू बायका एकत्र येतात. नेहमी प्रमाणे या किटी पार्टी प्रकाराची हवा भारतातही येत आहे. पाश्चात्य देश अति विकसीत असल्याने आम्ही भारतीय त्यांचे अनुकरण करीत असतो पण आम्ही पाश्चात्यांच्या प्रगतीचे रहस्य काय याचा डिटेल अभ्यास न केल्याने त्यांच्या दुर्गुणांचे अनुकरण करीत आहेत. भारतीयांची किटी पार्टीचे अनुकरण केल्याने उद्या जाऊन आमच्या बायांना, मुलींना दारूचे व्यसन लागतील. आज जिल्हाभर दारूबंदीचा बडगा उघडणाऱ्या बाया उद्या जाऊन स्वतःच दारू पिऊन रस्त्यावर धिंगाना घालतील.

सर्वसामान्य आणि गावाच्या पालकांनी आपले संस्कार कसे टिकतील याची दिशा ठरविणे आवश्यक आहे. महिलेचा आईचा रोल बाळासाठी सर्वात महत्वाचा. या जगात मानव अवतरल्यानंतर आई हीच बाळाचा पहिला गुरू, पहिला देव आहे. बाळाचे बापापेक्षा आईवरच जास्त प्रेम असते. बापावर वैयक्तिक टिका आम्ही सहन करू शकतो पण आई–बहिणींवर वैयक्तिक टिका केली तर आम्ही त्याला धोपटल्याशिवाय सोडत नाही.

दारू पिणाऱ्या महिलेच्या पोटी आमचे भारतीय बाळ जन्माला यावेत, माझी आई दारू पिते असे इतरांकडून हिनविल्याने मुलांचे मानसिक खच्चीकरण व्हावे, यापेक्षा या देशात मोठा अनर्थ कोणता? स्त्री शिक्षणाचा अर्थ मुलींनी दारू पिऊन धिंगाना घालणे असा होऊ नये. ही काळजी आई-वडिलांनी घेणे आवश्यक आहे.

(दि. १ जानेवारी २०१५, अभयराज्य)



# ४. राजकीय पुढाऱ्यांनी कौटूंबिक वा व्यक्तीगत जीवनाला संबंधीत कायदे बनवावे काय?

इंदिरा गांधींनी कुतूबशाह गांधी त्यांच्यासोबत लग्न केले. कुतूबशाह गांधी मुळात धर्माने मुसलमान होते. इंदिराजींचे वडील पंडीत जवाहरलाल नेहरू आणि पंडीत जवाहरलाल यांचे वडील मोतीलाल नेहरू जे धर्माने कश्मीरी हिंदू ब्राह्मण होते, त्यांच्या मुळे नेहरू घराने प्रसिद्धी पावले, नेहरू घराण्याचा उदय झाला. मोतीलाल नेहरू एक प्रख्यात, दिल्लीतील हायस्ट पेड वकील होते. पंडीत जवाहरलाल नेहरूंचे (इंदिराजींचे वडील) यांचे कपडे प्रेस करण्यासाठी पॅरीसला जात होते असे म्हणतात. इंदिराजी पंडीत जवाहरलाल नेहरू मुळे प्रख्यात पावल्या. आम्हाला कोणत्या व्यक्तीगत जीवनात ढवळाढवळ करायची नाही, ना कोणाला दुखवायचे आहे. पण आम्ही मेहनत करणाऱ्या वडिलांच्या भूमिकेत बसून समजून घेत आहोत.

नेहरूजींचे राजकीय जीवन तर ठीक आहे. पण धर्माने हिंदू कश्मीरी ब्राह्मण मुलगी जेव्हा एका मुस्लीम युवकासोबत लग्न करते ते सामाजिक प्रतिष्ठेचे काय? पंडीत जवाहरलाल नेहरूंना काय मोठा आनंद झाला होता? एवढ्या मोठ्या पोस्टरवर असलेले जागतिक लिडर, अभिमानाने ताळ मानेने चालणारे त्यांचे कुटुंब, नातेवाईक इंदिराजींच्या करणीने पार मानसिकदृष्ट्या उद्ध्वस्त झाले होते. काश्मीरी पंडितांच्या उच्चवणीयांमये कौटुंबिक पातळीवर सामाजिक प्रतिष्ठा धूळीला मिळाली होती. इंदिराजी बद्दल प्रत्येकाला आदर आहे पण बाप म्हणून पंडित जवाहरलाल नेहरूंच्या मनाचा विचार केलात काय? त्यांना काय वाटत असेल? बरे झाले इंदिरा गांधीनी मुस्लीम युवकाशी लग्न करण्याचा आग्रह धरला तेव्हा इंदिराजींचे आजे मोतीलाल नेहरू हयात नव्हते. नाहीतर मोतीलालजी हाय खाउनच मेले असते. मोतीलाल नेहरूंच्या हुशारीने, बुद्धीमत्तेने, कौशल्याने, मेहनतीने त्यांचे कुटुंब नावाजलेले श्रीमंत कुटुंब गणले गेले होते. आमच्या सारख्या गरीब घराण्यात इंदिराजींचा जन्म झाला असता तर इंदिराजींचा भारतीयांना पत्ताही लागला नसता. ज्या मोतीलाल नेहरूंनी पाया रचला त्यांच्या सामाजिक व्यक्तीगत प्रतिष्ठेला आग लावून गेल्या होत्या.

बॅरिस्टर जिन्ना यांचेही तसेच. बॅरिस्टर जिन्ना म्हणजे पाकिस्तानचे राष्ट्रपिता! केवढे मोठे प्रख्यात वकील! काय काय महात्मा गांधींनी प्रयत्न केले भारत एकत्र ठेवण्याचे, पण जिन्ना साहेबांनी पाकिस्तान भारतापासून तोडलाच! आणि पाकिस्तानी मुसलमानाचे गळ्यातील ताईत बनले. बॅरिस्टर जिन्ना मुस्लीम समाजाचे. त्यांच्या मुलींनी दुसऱ्या धर्माच्या मुलाबरोबर लग्न केले! केवढे बरं वाटले असेल बॅरिस्टर जिन्ना साहेबांना?

काय काय पत्र लिहिलेत मुलीचे मन वळविण्यासाठी पण शेवटी मुलीने बापाच्या मनाविरूद्ध केलेच! पाकिस्तानचे राष्ट्रपिता, मुस्लीमांचा गळ्यातील ताईत पण कौटुंबिक वैयक्तीक व्यक्तीगत जीवनात अपयशी ठरले! अजूनही मुसलमान समाज मनातल्या मनात कूट कूट खात असतील. बॅरिस्टर जिन्नांची मुलगी तर पाकिस्तानी मुसलमानांचे नाकच कापून गेली. पाकिस्तानी मुस्लीम विसरणे शक्य नाही.असा एक माझा अमेरिकेतील वास्तव्यादरम्यान भेटलेला पाकिस्तान मित्र म्हणायचा.

असो. पण बापाच्या मनाचा विचार करा. मग तुम्हांला कळेल, काय बितते! आपण अमेरिकन नाही, प्रत्यक्षात अनुभव नसला तरी पुस्तक वाचून, विषयाचा फक्त अभ्यास करून नवीन पुस्तक अमेरिकन लेखक लिहतात. उदा. जरी आपण कधी मुलगी पैदा केली नाही पण मुलगा पैदा कसा करायचा म्हणून पुस्तक लिहायचे. आपण भारतीय, आपले संत लोक पाहिले प्रत्यक्ष अनुभव घेतात नंतर पुस्तक लिहतात आणि नंतरच ज्ञान वाटतात.

राजकीय पुढाऱ्यांना घरी लक्ष द्यायला वेळ नसतो. जास्त करून राजकीय पुढाऱ्यांचे कौटुंबिक वा वैयक्तिक जीवन हे डेंटेड आणि पेंटेड असते, असे लोक म्हणतात. राजकीय पुढाऱ्यांना घराबाहेरच्या सर्व जनतेची काळजी असते. जनसंपर्क वाढवायचा असतो. नेहमी आंदोलन, चळवळी लोकांच्या समस्या सोडविण्यात वेळ जातो. वरून विरोधक नवीन नवीन काड्या करीत असतात. रोज नवीन नवीन विरोधकही पेदा होत असतात. नवीन सकंटे, दुष्काळ, समस्या लिडर लोकांसमोर असतात आणि राजकीय नेत्यांना पुढे होऊन सर्व फेस करायचे असते. विरोधी पक्षवाले कोणताच इश्यू सत्ताधारी नेत्यांवरच फोडतात. स्वच्छ मनाने काही करायचे झाले तरी करता येत नाही. कारण पद, पोजीशन, राजकारणात वजन सांभाळायचे असते आणि सर्व सांभाळताना नाकी नऊ येते! एकंदरीत राजकीय पुढाऱ्यांना घरी लक्ष द्यायला वेळ मिळत नाही म्हणून कौटुंबिक



वैयक्तिक आयुष्यात ते अपयशी ठरू शकतात. आम्ही असे ऐकले आहे की काही बड्या नेत्यांच्या मुलामुलींना तर गांज्या, चरस, दारू, वेश्यागमन इ.चे शौक आहेत. किती खरे किती खोटे! पण हे जर खरे असेल, जर त्यांचे कौटुंबिक आयुष्य पूर्णपणे यशस्वी नसेल तर सामान्य जनतेचे तरी त्यांनी कौटुंबिक व्यक्तीगत आयुष्य खराब करू नये!

वरून आजकाल निवडणूकांना पैसे भरपूर लागतात. अवैध मार्गाने पैसा मिळवावा लागतो. असे म्हणतात की प्रत्येक प्रोजेक्ट कान्ट्रॅक्टमध्ये आमदार–खासदार मंत्र्यांचे कमीशन ठरले असते. म्हणजे काळा पैसा पांढरा करण्याचा पैशाचा व्यवहार वेगवेगळा. म्हणजे राजकीय पुढाऱ्यांना व्यवसाय करायचे म्हणजे जबरदस्त छान माकड करुन असा पैसा कमवणे वेगळे आणि त्यांचा हिशोब सांभाळणे हे त्यापेक्षा कठीण! म्हणजे त्यांना वेळ मिळणार कसा!

राजकीय जीवन, व्यवसाईक जीवन कौटुंबिक व्यक्तीगत जीवन हे सगळे जीवनाचे विषय वेगवेगळे आहेत. आपण राजकीय जीवनात वा व्यवसाईक जीवनात यशस्वी असलो तर त्यावरच मार्गदर्शन केलेले बरे. त्यावरतीच निर्णय घेतलेले बरे. कौटुंबिक वा व्यक्तीगत जीवनात यशस्वी असणारे व्यवसाईक जीवनात यशस्वी असतीलच असे नाही पण जे त्या विषयात यशस्वी असतील तर त्यांना अशा निर्णयात ओढणे महत्वाचे. कौटुंबिक वा वैयक्तिक जीवनात अयशस्वी लोकांनी जनतेसाठी कौटुंबिक वा वैयक्तिक कायदे बनवूच नये, यातच जनतेचे भले आहे. ज्या विषयात आपण नापास झालो त्या विषयावर आपण ज्ञान वाटावेच कशाला. जो विषय आपण उत्तीर्ण होऊ शकत नाही त्यावर त्यांनी अभ्यास करू नये आणि कायदे बनवू नये!

# ५. नवरा–बायकोच्या भांडणात किरकोळ मारहाण, शारीरिक हिंसाचार कायदेशीर?

क्रोध ही निसर्गनिर्मित भावना आहे. ती प्रत्येकाला थोड्या फार प्रमाणात असतेच. क्रोध हे आपल्या भावना व्यक्त करायचे साधन आहे. क्रोधाचा वापर होणे आवश्यक आहे. नाही तर कोणीही येईल, आपला अपमान करून जाईल आणि आपल्याला स्वाभिमानाने जगता येणार नाही. पण क्रोध नेमके प्रमाणात व्यक्त व्हावा, आकस्ताळेपणा नको. क्रोधाचा संयमीत वापर होणे आवश्यक आहे.

एका हातात कमविणे दुसऱ्या हातात खाणे असा श्रमजीवी वर्ग जास्त विचार करू शत नाही. स्वतःवर झालेल्या अन्याय अपमान मनात न ठेवता, किरकोड भांडण करुन भावना व्यक्त करू शकतो. त्यात किरकोळ मारहाण होऊ शकते. पश्चिमात्य देशात समाजात त्याच्या संस्कृतीत आईच्या अनैतिक संबंधांना मान्यता आहे. त्याची संस्कृती ही तलाख, काडीमोड, डिव्होर्स वाली आहे. मुले वयात येईपर्यंत त्याला माहीत असत, आपली आई लफडे करते, बाप असूनही आपली आई सतरा माणसांसोबत झोपते. पाश्चिमात्य संस्कृतीतील मुलांना आई वरुन काहीही शिवी दिली तरी फरक पडत नाही. भारतीय आई तशी नाही. भारतीयांना आई वरुन शिवी दिली की पुढच्या माणसाला झोडपल्याशिवाय तो सोडत नाही म्हणजे किरकोळ जास्त प्रमाणात मारहाण आलीच.

पाश्चिमात्य देशात शिवीला मान्यता आहे. शिव्या कितीही द्या पण मारायचे नाही. मारले किंवा मनाच्या इच्छेविरूद्ध स्पर्श जरी केला तरी तेथील कायद्यानुसारही आपण दोषी ठरतो, पोलीस लगेच अटक करतात. भारतातल्या राज्यकर्त्यांनी पाश्चिमात्य देशातल्या कायद्याचे अंधानुकरण चालविले आहे. हे खूप धोकादायक आहे. ''आपल्या मनात एक आणि आपण करतो वेगळेच'' अशी परिस्थिती झाली आहे.

कधी कधी माणसाला निर्दय होऊन वागण्याशिवाय पर्याय नसतो. मर्यादित का होईना, तात्पुरते का होईना, एक चांगले सोल्यूशन मिळून जाते. विद्यार्थ्याला समजविण्यासाठी, त्यांचेकडून हवे ते काम, अभ्यास पूर्ण करण्यासाठी शिक्षकाला छडी मारण्याची संस्कृती उगीचच बनली नाही. शिक्षकाच्या छडी मारण्यामागे एक प्रामाणिक भावना असते. विद्यार्थ्याचे भले झाले पाहिजे ही भावना असते आणि या परंपरांचा युगानुयुगे भारतीय विद्यार्थ्यांना आणि समाजाला खूप फायदा झालेला



आहे. मारहाण हे एक प्रकारचे शारीरिक हिंसाचार आहे. मारहाण करण्यामागे वाईट विचार असतात का? का म्हणून मारहाण केली? हे महत्वाचे असते. कुणाला का म्हणून मारावेत? मारहाण करुन कुणाचे भले झाले का? मारहाण कोणाच्या भल्यासाठी केली जात आहे का? मारहाण करणारा का म्हणून करतो? मारहाण चूकीच्या वृत्तीच्या माणसाला केली तर त्या माणसाच्या वाईट वृत्तीवर वचक बसते, दरारा बनतो. छोट्या मोठ्या गोष्टींसाठी माणूस किंवा गरीब वर्ग कोर्टात जाऊ शकत नाही. न्याय मिळविण्यासाठी त्याच्या जवळ पैसा नसतो. मग तो आपला क्रोध मारहाण करुन व्यक्त करतो. पण याचा अर्थ मूळीच नाही की, शक्तीमान माणसाने आपल्यापेक्षा दुर्बळ व्यक्तीवर जोरजबरदस्ती करावी.

**शिवसेनेची गुंडागर्दी**

मुंबईत दक्षिण भारतीय लोक बऱ्याच मोठ्या संस्थांमध्ये उच्चपदावर होते. दक्षिण भारतीय उच्चपदस्थ लोक मराठी लोकांना नोकरीमध्ये प्राधाण्य देण्यापेक्षा दक्षिण भारतीय लोकांना कामावर घ्यायचे. तक्रारी करुन, अर्ज करुन काम होत नव्हते. मराठी स्थानिक लोकांना नोकऱ्या मिळत नव्हत्या. बाळासाहेबांच्या शिवसेनेच्या लोकांनी मोर्चा काढून एका दोघांच्या कानशिलात भडकवल्यात. तेव्हा मराठी लोकांना नोकरीवर घेणे सुरू झाले. जे काम अर्जावर अर्ज करुन, ऑफीसच्या हेलपाट्या घालून होत नव्हते ते एका झापडीत झाले. भारतातील परिस्थिती जीवघेणी आहे. ऑफीस कर्मचाऱ्यामध्ये आपल्याला जेव्हा काम असते, कोणते प्रमाणपत्र किंवा दाखला घ्यावयाचा असतो तेव्हा खेटा घालण्याचा अनुभव बहुतेकांनाच येतो. काही मोजके कर्मचारी सोडले तर शासकीय यंत्रणा भ्रष्टाचार आणि कामचुकारपणामुळे बोकाळलेल्या आहेत. माणूस खेटा घासून, अर्ज करुन परेशान होतो. असे वाटते की ऑफीसमधील कर्मचाऱ्याचे कॉलर पकडावे आणि दोन–चार कानाखाली वाजवाव्या. सामान्य माणसाच्या मनातील ही घोंघावणारी निराशा आणि त्यातून बनलेला प्रखर राग हा बाळासाहेबांनी हेरला होता. सामान्य माणसाच्या अवहेलना, दुःख हे बाळासाहेबांच्या लक्षात आले होते.

तुम्ही स्वैर वागलात, तसेच तुमच्या कुटुंबातील प्रत्येक व्यक्ती स्वतःच्या इच्छेनुसार स्वैर वागू लागली तर घराची शांततात घरपण टिकेल की घरातच रणांगण होईल? कुटुंबाचा प्रमुख सहसा पुरुष असतो. त्यांची जबाबदारी पूर्ण करण्यासाठी त्याला कधी कधी किरकोळ मारहाणीसाठी परिस्थिती प्रवृत्त करू शकते. अशा छोट्या मोठ्या भांडणासाठी कोर्टात जायला कोणाला वेळ असतो,

आणि त्यांच्याकडे पैस असतो? काही कपटी, स्वार्थी, विकृत, विक्षिप्त वृत्तीच्या बायका हिंसाचार विरोधी कायद्याचा गैरफायदा घेऊन कुटुंब उद्ध्वस्त करीत आहेत. अशा बायका जेव्हा अनाप शनाप शिव्या देतात तेव्हा दखलपात्र गुन्हा होत नाही. पण नवऱ्याने किरकोळ मारहाण केली तर दखलपात्र गुन्हा समजल्या जातो. अशा कपटी, स्वार्थी, वृत्तीच्या बायका एकाचे दोन पोलीसांना सांगून परत त्यात आग ओकून कुटुंब उदध्वस्त करतात. किरकोळ मारहानीतून आपला क्रोध व्यक्त केला जातो. समोरच्यांच्या कानाखाली बसली नाही तर पुढचा माणूस अनापशनाप बकतच राहतो. किरकोड मारहाण किंवा शारीरिक हिंसा ही एक आदिम नैसर्गिक प्रेरणा आहे. कुत्रा, मांजर, कोंबडी, गाय, बैल, भैस, रेडे, बहुतांशी प्राणी कोणत्या ना कोणत्या कारणाने हिंसा करतांना आढळतात.

क्रोध हा अग्नी आहे त्याचा नियमीत उपयोग झाला तर उपयोग होतो. अग्नी जेव्हा मोठे रूप धारण करते तेव्हा गावे, जंगले नष्ट होतात. पण अग्नीचा नियंत्रित उपयोग केला तर अन्न शिजविण्यास मदत करते. बेशिस्त, बेलगाम, भ्रष्टाचारी अनियंत्रित लोकांच्या वृत्तीला लगाम घालण्यासाठी ग्रामीण पातळीवर अजूनही बरेच तरूण, बुजूर्ग कायदा हातात घेतात. पंधरा पंधरा वर्षे कोर्टातून न्याय मिळत नाही. स्थानिक पातळीवर लोकांना कायदा करण्याची गरज भासत आहे. किंवा ग्रामीण पातळीवर सुद्धा न्याय व्यवस्थेची कार्यप्रणाली उभी करणे आवश्यक दिसत आहे. वकील आणि साक्षीदार तालुक्याच्या न्यायालयात खोटी साक्ष देऊन, न्यायालयाची दिशाभूल करतात. पण स्थानिक पातळीवर ग्रामपंचायतीसमोर खोटे बोलून दिशाभूल करणे शक्य नसते.

संस्कृती आपली भारतीय आणि आपल्या देशात पाश्चिमात्य कायद्याचे अंधानुकरण होत आहे. अमेरिका किंवा पाश्चिमात्य देश हे आमच्यापेक्षा बलवान आहेत, विकसीत आहे. त्याला आमची संस्कृती कारणीभूत आहे. हे मुळीच नाही. अमेरिका किंवा पाश्चिमात्य देशातील कामगार, विद्यार्थी, शिक्षक, शासकीय, निमशासकीय, संस्थेचे अधिकारी, मंत्री, राज्यकर्ते, खाजगी काम करणारे, व्यापारी प्रत्येक नागरिक हा एकसंघ, प्रामाणिकपणे, एकनिष्ठ, एकदिलाने एक दुसऱ्याला अडथळे उभे न करता, स्वतःच्या एकट्याचा स्वार्थ न बघता, एकोप्याने, एक-दुसऱ्याच्या कामात ढवळाढवळ न करता, आपले अधिकार आणि आपले कर्तव्याचे पालन करतात म्हणून हे अमेरिका किंवा पाश्चिमात्य देश बलवत्तर आहेत.

(दि. २१ नोव्हेंबर २०१३, अभयराज्य)



# ६. पाश्चात्य संस्कृतीचा भारतात उभा धिंगाणा!

दक्षिण मुंबईत शुक्रवारी (२५ मे ची बातमी) पहाटे दोन दारूड्या महिलांनी भरधाव वगाने गाडी हाकत मोठा गोंधळ उडवून दिला.

आज स्वतःला ॲडव्हांस, उच्चभ्रू अती सुशिक्षीत समजणाऱ्या कुटूंबातील महिलांचा असा धिंगाना चालू आहे. उद्या जाऊन हीच संसकृती खेडेगावात येवू शकते. ग्रामीण भागातील सुख शांती चैन यावर गदा येऊ शकते.

अठराव्या शतकात ब्रिटीशांचे बघून बऱ्याच भारतीयांना कोट घालून फिरण्याची आणि इंग्रजी दारू पिण्याच्या सवई लागल्यात. ढवळ्या सोबत बगला पवळा गुण नाही पण वान लागला कशी परिस्थिती झाली आहे.

**नागपूरच्या हॉटेलमध्ये पब पार्टी**

दोन–तीन दिवसापूर्वी नागपूरच्या एका हॉटेलमध्ये पब पार्टी उधळून लावण्यात आली. कारण कोणतेही असो पब पार्टी सारखे कार्यक्रम भारतात बंदी घालण्यात यावेत. विरंगुळा या मनोरंजनाच्या नावाखाली चालणारे हे पाश्चात्य मनोवृत्तीचे नंगे नाच कायद्यानुसार बंदी घालणे आवश्यक आहे.

निसर्गाने महिलेला आईचे रूप दिले आहे. निसर्गात जन्मणारा प्रत्येक बाळ हा आईच्या पोटी जन्म घेतो, पुरुषाचे पोटी नाही! आई बाळाला पोटात वाढविते, जन्म झाल्यावर बाळ आईच्या दुधावर जगतो. कोणत्याही बाळाला आईचा खूप अभिमान असतो. कोणत्याही मुलाला आपल्या आईबद्दल अपशब्द बोललेले चिडविलेले आवडत नाही आणि कोणताही मुलगा आईबद्दल अपशब्द सहन करून घेत नाही. निसर्ग नियमांना डावलून पाश्चिमात्य लोकांनी कायदे बनविलेले आहे. त्याचे अंधानुकरण बदलणे आवश्यक आहे.

उद्या जाऊन आमच्या मुलांच्या नातवांच्या वाट्याला अपमान वा बेइज्जत यावी. आपली आई दारू पिवून धिंगाना घालत होती असे उद्या जाऊन आमच्या मुलांच्या वा नातवाच्या कानावर पडावे आणि त्यांना मानसिक त्रास व्हावा वा त्यांच्या अंगावर शहारे यावेत असे होण्यापेक्षा आपले कायदे आजच बदलणे

आवश्यक आहे.

युरोपीय वा पाश्चात्य देशाचा विकास आणि संस्कृती याचा संबंध नाही. विकास वा प्रगती हे पाश्चिमात्यांच्या नसानसात घुसलेले आहे. त्यांना विकास जनआंदोलन मध्ये परिवर्तीत करण्याची गरज नाही. पाश्चात्य देशात जन्मलेल्या बाळापासून ते म्हाताऱ्यापर्यंत एक जागरूक नागरिक म्हणून वागण्याची मानसिकता आहे. एकमेकांना अडथळे उभे न करता वेळेवर, संघटीतपणे प्रोजेक्टस एक्झीक्यूट करण्याची क्षमता असल्याने ते पुढे आहेत. पाश्चिमात्यांच्या बायका, माया, बहिणी, दारू पितात म्हणून त्यांचा विकास झाला हा चुकीचा गैरसमज आहे. नवीन सरकारने या गोष्टींची दखल घेणे आवश्यक आहे.

(दि. २९ मे २०१४, अभयराज्य)



# ७. बलात्कारांच्या घटनांना जबाबदार कोण?



भगवद्‌गीतेतील तिसरा अध्याय कर्मयोग मधील श्लोक क्रमांक ३८ आणि ३९ खालील प्रमाणे आहेत.

धूमेना व्रियते वहिलयंथादर्शो मलेन च ।

यथोल्वेनावृती गर्भस्थता तेनेदमावृत्‌म ।।३८।।

अर्थ – ज्याप्रमाणे धुराने अग्नी, धुळीने आरसा आणि वारेने गर्भ वेष्टिला जातो त्याचप्रमाणे जीवन, या कामाद्वारे विविध प्रमाणात आचछादिला जातो.

आवृत्त ज्ञानमेतेन ज्ञानिनो नित्यवैरिणा।

कामरूपेन कौस्तेय दुष्पूरेणा नलेन च ।।३९।।

अर्थ – या प्रमाणे ज्ञानी जीवनाची शुद्ध चेतना त्याच कामरूपी नित्य शत्रूद्वारा आच्छादिली जाते. काम कधीच संतुष्ट होत नाही आणि अग्नी प्रमाणे जळत असतो.

ज्यावेळी एखादा जीव भौतिक सृष्टीच्या संपर्कात येतो तेव्हा तमोगुण, रजोगुणाच्या संगतीमुळे त्याच्या शाश्वत प्रेमाचे रूपांतर हे कामविकारात होते. मनुष्यजीव जेव्हा या भूतलावर जन्माला येतो तेव्हा मानवी शरीराच्या अन्न, झोप या प्राथमिक गॉड गिफ्टेड गरजा आहेत, तसेच मैथून ही सुद्धा मानवी शरीराची गरज आहे. मैथून नावाची ही निसर्गनिर्मित गरज प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे, वयाच्या विविध टप्प्यामध्ये, कमी अधिक प्रमाणात मानवी शरीरावर आणि मनावर स्ट्रांगली आच्छादिलेली असते. हावी झालेली असते. ज्याप्रमाणे इंधनाच्या निरंतर पुरवठ्याने अग्नी विझली जात नाही, त्याप्रमाणे अमर्यादित इंद्रीयतृप्ती केली तरी काम तृप्त होऊ शकत नाही. इंद्रीये मन आणि बुद्धी ही या कामाची निवासस्थाने आहेत. असे श्लोक क्रमांक ४० मध्ये नमूद केलेले आहे.

भगवद्‌गीता हा प्राचीन ग्रंथ जगात अस्तित्वात असलेल्या सर्व आध्यात्मिक

चळवळीचा उगम आहे. खरं तर भगवान श्रीकृष्णानी अर्जुनाला केलेला उपदेश या भगवद्गीतेत नमूद केलेला आहे. मानवी मनाचा अनाकलनीय अगम्य गुंता गीतेत उलगडला आहे.

इंग्रजांनी भारतावर दिडशे वर्ष राज्य केले. महात्मा गांधीनी स्वातंत्र्याची चळवळ देशाच्या कानाकोपऱ्यात पोहचविली आणि भारत स्वतंत्र झाला. सुभाषबाबूंनी महात्मा गांधीना राष्ट्रपिता म्हणून संबोधले. आता स्वातंत्र्याला सदूसष्ट वर्षे झालीत. पण काही भारतीयांचे मन अजून पाश्चात्यांच्या प्रभावातून मुक्त झालेले नाही. एखाद्या बलात्काऱ्याने दिडशे वर्ष बलात्कार करावा आणि बलात्कारी जाऊन सत्तर वर्षे लोटलीत तरी पिडीतेने स्वतःचे अस्तित्व विसरून बलात्काऱ्याचेचे गुण गावे अशी परिस्थिती दिसत आहे. महात्मा गांधी युगपुरुष होते. खोकला झाल्यानंतर त्याच्यावर रोगनिवारक औषधी घेण्यापेक्षा खोकला का झाला, त्याचे मूळ कारण काय, खोकला व्हायला नको म्हणून काय करावे लागेल अशा पद्धतीने अंमलबजावणी कशी करता येईल अशा प्रकारचा सारासर अभ्यास करण्याची वृत्ती त्यांच्या चळवळीत आढळते. अर्थात बलात्कार झाल्यावर कायदे करण्यापेक्षा बलात्कारी प्रवृत्तीचा उगम कुठे होतो, त्याच्या कारणांचा अभ्यास करणे व नेशनवाईड अंमलबजावणी करणे! म्हणून मी सुद्धा गांधीजींचा परमभक्त आहो.

महात्मा गांधीनी देशासाठी तर जरूर भरपूर काही केले. पण आजकाल पुरूषांचे कोणी ऐकून घेत नाहीत. पुरूषांच्या भावनांचा, त्यांच्या मनोवृत्तीचा आणि त्यांच्या शारीरिक मानसिक नैसर्गिक उत्प्रेरणांचा विचार केला जात नाही. महात्मा गांधीनी खाली दिलेला उतारा त्यांच्या आत्मचरित्रात लिहिला नसता तर कदाचित आमची बाजू ऐकून घेतलीच नसती. महात्मा गांधीचे लग्न लहान वयात झाले होते. महात्मा गांधीचे वडील खूप बिमार होते, शेवटच्या घटका मोजत होते. महात्मा गांधीचे काका आणि महात्मा गांधी आळीपाळीने त्यांच्या वडिलांच्या बिछाण्याजवळ बसून होते. या घटनेच्या वेळेस महात्मा गांधी सोळा वर्षाचे तर त्यांची पत्नी कस्तूरबा ह्या तेरा वर्षे वयाच्या होत्या. हा उतारा वाचा.

'रात के साडे दस या ग्यारह बजे होंगे। मैं पैर दबा रहा था। चाचाजी ने मुझसे कहा जा अब मैं बैठूंगा। मैं खुश हुआ और सिधा शयनगृह में पहुंचा। पत्नी तो बेचारी गहरी नींद में थी पर मैं सोने कैसे देता? मैंने उसे जगाया। पाच सात मिनट बीते होंगे, इतने में नौकर ने आकर दरवाजा खटखटाया। मुझे धक्का–सा लगा। मैं



चौंका, नौकर ने कहा उठो बापू बहुत बिमार है। मैं जानता था कि बहुत बिमार थे ही, इसलिए यहाँ बहुत बिमार का अर्थ समझ गया। एकदम बिस्तर से कूद पड़ा।

कह तो सही बात क्या है?

जवाब मिला, बापू गुजर गये!'

वर दिलेल्या घटनेचा महात्मा गांधीना नेहमीच पश्चाताप होत राहिला. ही खूप दुःखद घटना आहे. पा यातील एक गोष्ट लक्षात घ्या. महात्मा गांधीसारखे महात्मा पुरूष सोळाव्या वर्षी इतके विषयान्ध होऊ शकतात तर सर्वसामान्य आपल्या तरूणांचे काय? आताच्या मुलांना मुलींना वयाच्या २०, २५, ३०, ३५ वर्षापर्यंत ताटकळत रहावे लागते. महात्मा गांधीचे लग्न लहानपणी झाले, छान झाले. त्यांनी स्वातंत्र्य मिळवून दिले आणि त्यांच्या चेल्यांनी चुकीचे कायदे बनविणे चालू केले. आम्हाला असे म्हणाचे नाही की कायदे बनवू नयेत. बनवावेत पण रूट कॉजचा विचार होऊ न देता मूळावर घाव घालणे आवश्यक आहे. त्यासाठी प्रतिबंधक उपाय योजना आवश्यक आहेत. विद्यमान कायद्यानुसार महात्मा गांधीवर जबरदस्तीने बळाचा वापर करून बलात्काराचा गुन्हा दाखल करता येतो. तसेच १३ वर्षाच्या बालिकेवर अल्पवयीन बलात्कार केल्याचा गुन्हा दाखल होऊ शकतो, असेही कायदे बनवू नयेत, याला अंधानुकरण म्हणावे, नाही तर काय?

आमचेकडे बालविवाह पद्धत होती. अकराव्या वर्षीच घरी आल्याने मुलगी सासर घरी रूळून जात होती, घराचा अविभाज्य भाग बनत होती. ब्रिटन अमेरिकेत १२–१३ वर्षापासून मुलामुलींचे गुटरगू चालू होते. चिपकाचिपकी, मुकाफुका झोपाझोपी चालू होते, आज याच्या बरोबर उद्या त्याबरोबर, मग आमची जुनी संस्कृती का वाईट? भारतातील मुले मुली वयात आल्यानंतर लटकून राहतात. त्यांचे सेक्चुअल स्टारवेशन होते. कॉलेजात असताना अर्धे लक्ष अभ्यासात आणि अर्धे लक्ष कामक्रिडेचे स्वप्न पाहण्यात अशी परिस्थिती आमच्या देशात का निर्माण व्हावी?

कोवळ्या कमी वयाच्या मुलींना मुलांना आपण काय करीत आहो हे लक्षात येत नसेल पण भारतीय पालकांनी आई–वडिलांनी आपल्या मुली–मुलांना लक्षात आणून देणे, निदर्शनास आणून देणे आवश्यक आहे. कामवासना उद्दीपीत करणारे कपडे, वेशभूषा, वागणे, बोलणे यावर मर्यादा येणे आवश्यक आहे. तसेच

शासनाने पाश्चात्यांचे त्यांच्या संस्कृतीचे अंधानुकरण करण्यापेक्षा कामवासना उद्दीपीत करणाऱ्या, प्रवृत्त करणाऱ्या जाहिराती, टिव्ही, चित्रपट, पेपरबाजी वा इंटरनेट सारख्या प्रसारमाध्यमांवरती मर्यादा टाकणे आवश्यक आहे.

नरेंद्र मोदी, राहुल गांधी, अटलबिहारी वाजपेयी, माजी राष्ट्रपती कलाम बिना लग्नाने राहतात आणि स्वतःच्या भावनांवरती नियंत्रण ठेवतात म्हणजे सर्व लोक तसे करू शकतात असे नाही. हे लोक फिजीकली शरीराने नियंत्रित आहेत म्हणजे मनाने असतीलहीअसे समजू या का?

काळ बदलला आहे, परिस्थिती बदलली आहे. पण मानवी शरीर, मन जसे आहे, तसेच आहे. हजारो वर्षापूर्वी माणसाला हातपाय फुटत होते आताही फुटतात. हजारो वर्षापूर्वी जे पुरूषाला अवयव होते तेच पुरूषाला आहेत. हजार वर्षापूर्वी स्त्रीला जे अवयव होते तेच आजही आहे. हजार वर्षापूर्वी मानवी शरीराच्या पेशींची सरवनी बायोकेमेस्ट्री, फिजीयोलॉजी जी होती तीच पेशींची संरचना आजही आहे. पाश्चात्य लोक ह्यूमन राईट्स, व्यक्ती स्वातंत्र्य, अभिव्यक्ती स्वातंत्र्य इत्यादी पिलूचा वापर करून आपल्या संस्कृतीची पोळी भाजतात आणि आमचे काही लोक अस्तीत्वहीन स्टेटस नसलेल्या मनोवृत्तीसारखे ते बदल स्वीकारत आहेत.

आज महात्मा गांधी आणि कस्तूरबा गांधी जिवंत असत्या तर विद्यमान कायद्यानुसार नारीशक्ती गजराने भावूक होऊन कस्तूरबाजींनी महात्मा गांधीजींवर कोर्टात गुन्हा दाखल केले असते. १३ वर्षाच्या बालिकेवर बलात्कार आणि जबरदस्तीने रेप असे डबल गुन्हे! आधी स्वातंत्र्यासाठी ब्रिटीशांनी जेलमध्ये टाकले. आता त्यांच्या चेल्यांनी निर्माण केलेल्या कायद्यांमुळे स्वातंत्र्य भारतात डबल जन्मठेपेची शिक्षा भोगत असते आणि महात्मा गांधींना पता चालला असता त्यांचे शिष्य काय करीत आहेत. झक मारली आणि स्वातंत्र्य मिळवून दिले असा पश्चाताप महात्माजींनी केला असता.

मैथून ही मानवी शरीराची गरज आहे. लंगडा लूला, अपंग, आंधळा, बहीरा, कुत्रा, मांजर, कोंबडी, पशू, पक्षी सर्वांना पण मैथून म्हणजे काय ते समजते. विजातीय जातींना एक दुसऱ्यांच्या अवयवांचे तीव्र आकर्षण असते. तारूण्यात आल्यानंतर आमच्या संस्कृतीप्रमाणे आम्ही लफडे करू शकत नाही. लफडे आमच्यासाठी नीच कर्म आहेत. वरून कामवासना उद्दीपीत करणारे काही स्त्रियांचे कपडे कामवासनेच्या तीव्रतेत भर घालतात. जसे हाताची पाच बोटे सारखी



नसतात तसा प्रत्येक मानवाच्या मनावरचा कंट्रोल हा कमी जास्त प्रमाणात असतो. भडक जाहीराती, चित्रपट पाहून कामवासनेची तीव्रता वाढत जाते. आमचे गृहमंत्री ही सर्वांना रजोगुणी समजून कायदे कडक करतात. कामवासनेची तीव्रता दिवसेंदिवस वाढतच राहते. रजोगुणी असो तमोगुणी भडक कपडे, भडक जाहिराती, इंटरनेट, टीव्ही इत्यादींच्या गर्दीगोंगाटात आपल्यासाठी पर्यायी व्यवसायही बघत असतो. कामवासनेची तीव्रतेची एक्ट्रीम पातळी गाठल्यावर अशा तरूणांकडून चुका होण्याची शक्यता टाळता येत नाही. वासना शांत करण्यासाठी पर्यायी व्यवस्था मिळाली नसल्याने कधी दोन–चार वर्षाच्या बालकेवर तर कधी मतीमंद मुलींवर वेळ काळ बघून, छूपे ठिकाण बघून हे कामांध व्यक्ती आक्रमण करू शकतात. बलात्काराची कारणे इथेच दडलेली आहेत. लोकसंख्येचा तुलनेत पाश्चीमात्य देशांपेक्षा अरब मुस्लीम देशांमध्ये बलात्काराचे प्रमाण खूप कमी आहे. अरब मुस्लीम देशात सनी लिओन सारख्या पोर्नोवाल्या नट्यांवर येण्यास बंदी आहे, भडक कामेच्छा उद्दीपीत करणाऱ्या कपड्यांवर मर्यादा आहेत, त्यांनी त्यांची संस्कृती कट्टरतेने सांभाळली आहे. आम्ही आमची संस्कृती का सोडावी? प्रगत समजल्या जाणाऱ्या अमेरिकेत दरवर्षी एक हजार लोकसंख्येत नऊ बलात्कार वा तत्सम गुन्हांची नोंद होते.

भारतीय संस्कृती आणि भारतीय भौतिक विकासाचा काहीही संबंध नाही. आमच्या लेखामधून बलात्कारी दोषी नसतात असे आम्हाला म्हणायचे नाही. मुंबईतील शक्ती मील परिसरात झालेल्या प्रकरणातील सराईत गुन्हेगारांना तोच तोच गुन्हा रिपीट करणाऱ्यांना फाशी ठीक आहे. पण बलात्कारी वृत्ती भडकविणाऱ्या मूलभूत कारणांवरती अंमलबजावणी करणे अती आवश्यक आहे. जेव्हा कामांध वासनांध व्यक्ती बलात्कार करतो तेव्हा ना भय ना लज्जा अशी त्याची मनस्थिति असते. बलात्काऱ्याला माहीत असते आपल्याला फाशी होऊ शकते पण कामवासनेची तीव्रता इतकी पोहचलेली असते की तो पशू बनलेला असतो. बलात्काऱ्याची ही मनस्थिति बनायला काही पाश्चात्य मनोवृत्तीच्या स्वतःच्या इंटलेक्ट, ॲडव्हांस, प्रगत समजणाऱ्या स्त्रियांचे ना भय ना लज्जावाले कपडे, भडक वेशभूषा, वागणे हे सुद्धा एक महत्वाचे कारण आहे.

(दि. २४ एप्रिल २०१४, अभयराज्य)

# ८. बालविवाह पद्धतीचा घोळ



हा देश माझा आहे, ही भावना आपसुकपणे मनात बिंबवली जाते याला म्हणतात राष्ट्रवाद! स्वातंत्र्याआधी इंग्रजांच्या अधिपत्याखाली, त्याआधी भारत विखुरलेला होता. पुण्याचे पेशवे, पंजाबचे शीख, हैदराबादचा निजाम, गोव्याचे पोर्तूगीज, दिल्लीत मोगल, ग्वाल्हेरचे शिंदे, इंदोरचे होळकर, नागपूरचे भोसले प्रत्येक प्रदेशातील जनतेची आस्था त्यांच्या संस्थानाला जुळलेली होती. टिळकांच्या काळात नदीचे रूप असलेल्या स्वातंत्र्य चळवळीला महात्मा गांधीनी खेड्यापाड्यात तळागळापर्यंत जनआंदोलन उभारून महानदीचे रूप दिले. जर हे राष्ट्रवादी आंदोलन तळागळातील नागरिकांपर्यंत पोहचले नसते तर लोकांचे भावनिक बंध वा आस्ता त्यांच्या प्रदेश वा संस्थान पर्यंतच जुळल्या असत्या. समजा जर महात्मा गांधी नसते तर आज एकसंघ दिसणारा भारत छोट्या छोट्या तुकड्यांमध्ये विभागला गेला असता हे मुळीच नाकारता येत नाही. भारत आपला देश आहे ही भावना त्यांनी तळागळापर्यंत पोहचविली हेच त्यांचे सर्वात मोठे अचिव्हमेंट असे मी मानतो. मी जरी कट्टर गांधीभक्त असलो तरी त्यांच्या शंभरपैकी शंभर गोष्टी खऱ्या आहेत असे मला वाटत नाही.

सर्वात मोठा घोळ महात्मा गांधीनी बालविवाह पद्धती बद्दल केला. प्राचीन भारतात पूर्वजांच्या काळापासून चालू असलेली बालविवाह पद्धती चुकीची होती



असे महात्माजी म्हणतात. महात्माजींचे लग्न लहाणपणी झाले. महात्माजी सतरा वर्षाचे आणि त्यांच्या अंर्धागिनी कस्तूरबाजी तेरा वर्षाच्या असताना महात्माजींचे वडील मृत्यू पावले. अन्न, झोप तसेच मैथून या मानवी शरीराच्या गरजा आहेत. महात्माजींचे वडील ज्या रात्री मृत्यू पावले त्या रात्री सतरा वर्षाच्या महात्माजींना मैथूनाची तीव्र इच्छा अनियंत्रीत होऊन त्यांनी गाढ झोपलेल्या तेरा वर्षाच्या कस्तूरबांना झोपेतून उठवून त्रास दिला हे त्यांच्या आत्मचरित्रात उल्लेखीलेले आहे. एका बाजूला मानवी शरीराच्या नैसर्गिक उत्प्रेरणा त्यांना स्वतःला वयाच्या सतराव्या वर्षी नियंत्रित करता आल्या नाहीत हे मान्य करतात तर दुसऱ्या बाजूला बालविवाह पद्धतीचा मुरजोर विरोध करतात.

आता अमेरिकेतील खाली दिलेले आकडे बघा.

१) दरवर्षी दहा लाखापेक्षा जास्त मुली बाल्यावस्थेत प्रेग्नंट राहतात. (वयाचे वीस वर्ष पूर्ण करण्याआधी)

२) सरासरी अमेरिकेतील दहा मुलींपैकी सहा मुली वयाचे वीस वर्ष पूर्ण व्हायचे आधीच एकदा तरी प्रेग्नंट राहतात.

३) वयाच्या १५ ते १९ वयोगटातील एक हजारातील अंदाजे शंभर मुली बाळाला जन्म देतात.

४) हायस्कूलमध्ये शिकणाऱ्या दहा पैकी पाच मुली प्रेग्नंट राहतात.

५) १४ ते २१ वयोगटातील मुलींपैकी एक तृतीयांश मुली सेक्स करताना दारू पिलेल्या असतात.

६) प्रेग्नंट राहणाऱ्या मुलींपैकी ६९ टक्के मुली (१४ ते १९ वर्षे वयोगटातील) अविवाहित असतात.

७) प्रेग्नंट राहणाऱ्या मुलींपैकी जवळपास ३५ टक्के मुलीच हायस्कूल शिक्षण पूर्ण करू शकतात.

८) बाळाला जन्म देणाऱ्या तीन मुलींपैकी फक्त वीस टक्के मुलींचे प्रियकर मुलींबरोबर लग्न करतात. बाकी बाळ बिनबापाचेच राहतात, त्यांना मानलेले बाप मिळतात.

९) टीन मदर्स (बाल्यावस्थेतील आई) जास्त करून प्रीमॅच्यूअर बेबींना जन्म देतात त्यामुळे कमी वजन, आंधळे, बहीरे, मेंदू अपरिपक्व विविध प्रकारच्या

अंपगत्वाने ग्रासलेले असतात.

खूप काही लिहिता येईल, तुम्हाला इंटरनेटवर भेटून जाईल, हा विषय गंमतीचा नाही गंभीर आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी द हिंदू कोड बील चा ड्राफ्ट बनविला तेव्हा वधूचे वय १४ वर्षे कमीत कमी असावे असे लिहिले होते. अमेरिकन संस्कृती म्हणजे लग्नाआधी प्रेग्नंसी ला वाव देणारी, प्रेग्नंट होणे म्हणजे पोट येणे! अशी पोट आणणाऱ्या मुलांची संस्कृती तुम्हांला हवी आहे का? भारतीय पालकांना मुलांच्या आईवडिलांना त्यांचे निर्णय घेवू द्या. भारतीय पालकांना लक्षात आले की त्यांच्या मुलांचे, मुलींचे लग्न कमी वयात करण्याची आवश्यकता आहे तर करू द्या. अमेरिका अतिविकसीत जरी असला तरी त्यांच्या सद्गुणांचे अनुकरण करा दुर्गूणांचे नाही! वय वाढल्यामुळे तुमच्या मुलामुलींचे उद्या जाऊन लग्न झाले नाही तर हे सरकार वा १७७४ मध्ये गोऱ्यांनी स्थापिलेली कोर्टाची सिस्टम तुमच्या मुलामुलींचे लग्न करून देणार आहे का? आपल्या मुलामुलींचे उद्या जाऊन लग्न झाले नाही तर त्यांच्या आईवडीलांचे टेंशन वाढणार आहे. कायदे बनविणाऱ्या राज्यकर्त्यांचे वा कोर्टातील न्यायाधीशांना काय फरक पडणार आहे? भारतीय आईवडीलांना कायदेशीर हक्क द्या! वयाच्या पस्तीशीनंतर डबल वोटींगचा अधिकार, वयाच्या पच्चावन वर्षानंतर तिप्पट मतदानाचा अधिकार द्या.

(दि. २ ऑक्टोबर २०१४, अभयराज्य)



# ९. देव मूर्ख असू शकतो का ?



१५ ते १८ वर्षामधील अल्पवयीन पत्नीशी संबंध ठेवणे म्हणजे बलात्कार आहे. नवरा शिक्षेस पात्र राहील असा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने दिला. अल्पवयीन पत्नीशी शारीरिक संबंध ठेवणे म्हणजे बलात्कार. १५ ते १८ वर्षामधील अल्पवयीन पत्नीशी संबंध ठेवणे असा अधिकार घटना देऊ शकत नाही आणि अल्वयीन मुलीशी संमतीने स्वेच्छेने लग्नाआधी शारीरिक संबंध ठेवणे म्हणजे घटनेने दिलेला अधिकार, हा अधिकार घटना देऊ शकते! या संविधानात होणारे असे अधिकार भारतीयांसाठी आहेत का? हा प्रश्नच आहे.

जेव्हा निसर्गनिर्मात्या ईश्वराने त्याच्या निसर्ग नियोजन मंडळाची सभा विश्व निर्मितीसाठी बोलावली असेल, तेव्हा, त्या सभेमध्ये प्रत्येक सदस्याने आपआपले जीवन निर्मिती अभ्यासप्रकल्प अहवाल सादर केले असतील. ईश्वराने त्यातील सर्वोत्कृष्ट जीव निर्मिती अभ्यास प्रकल्प अहवाल निवडून त्या अहवालावर तंतोतंत अंमलबजावणी केली असेल. जेव्हा, आपण या ब्रह्मांडाचा अभ्यास करतो तेव्हा आपल्याला दिसून येते की, हे ब्रह्मांड सुनियंत्रित, सुनियोजित व अत्यंत कुशलतेने साकारलेलं आहे की त्यात कोणतीही त्रुटी आपण काढू शकत नाही.

मुलगी साधारणतः वयाच्या अंदाजे १४व्या वर्षी मासिक पाळी येणे, रजस्वला बनणे सुरू होते. म्हणजे तिचे शरीर बाळाला जन्म घालण्यासाठी, बाळाला गर्भाशयात घडविण्यासाठी १४व्या वर्षी सक्षम बनते. आमचे जज, कायदे बनविणारे बुद्धीमान, देवापेक्षाही हुशार जे म्हणतात की, बाईचे बाळाला जन्म

घालणारे अंडे नाबालिग असते. बाईचे शरीर चौदाव्या वर्षी बाळ कन्सीव्ह करू शकते, म्हणजे देवाच्या म्हणण्यानुसार बाई बाळाला जन्म घालण्याची क्षमता ठेवते. देव/निसर्ग मुर्ख होता, त्यांनी मुलींची मासिक पाळी अठराव्या वर्षी सुरू करायला पाहिजे होती. असे आमच्या न्याय संस्थेचे अप्रत्यक्ष म्हणणे आहे. निसर्गाने घडविलेला कोणता अवयव कोणत्या कामासाठी आहे, कोणत्या कार्यासाठी आहे, कोणत्या वेळेस वापरात योग्य आहे हे ठरविण्यास कोण सक्षम आहे? देव की न्यायाधीश? बाळ वयाच्या ११व्या महिण्यात चालायला लागतो पण कोवळे वय असल्याने त्याला चालण्यावर बंदी घालायला हवी का? बाळ अजून चालण्यास योग्य नाही असा ठपका ठेवून?

वयाच्या ११, १२, १३ व १४व्या वर्षापासूनच्या मुलामुलींनी लफडे करू नये अशी तरतूद या न्यायपालिकेने केलेली आहे का? तुम्ही लफडे करा, बेवारस औलाद पैदा करा. आईवडीलांची बदनामी होऊ द्या पण लग्न करू नका असे म्हणणारे दिशाहीन बुद्धीचे नाही तर काय? अप्रत्यक्षपणे १४ वषाची मुलगी अनैतिक शारीरिक संबंध ठेवण्यासाठी सक्षम बनते पण लग्नविवाह करण्यासाठी नाही. १४ वर्षाची मुलगी अनैतिक संबंध ठेवून मुलबाळ पैदा करुन बदनामी झेलण्यास सक्षम असते पण नीतीशुद्ध लग्न करण्यासाठी नाबालिग असते. असे कोर्टाचे अप्रत्यक्ष म्हणणे आहे.

### आरूषी तलवार चे उदाहरण

आता आरूषी तलवार चे उदाहरण घ्या. सीबीआयने तिचे आईवडील राजेश तलवार आणि नुपूर तलवार यांना निर्दोष सोडले. १४ वर्षाची आरूषी आणि नोकर हेमराज. तिचे हेमराज बरोबर संबंध होते, हेच त्यांच्या हत्येचे कारण असावे. अशी प्रकरणे आई-वडिलांच्या अंगलट येण्यापेक्षा मुलींचे लग्न वयाच्या चौदाव्या वर्षी केलेले वाईट काय? पूर्ण आयुष्यासाठी सुख शांती समाधान महत्वाचे की आयुष्यभराची बदनामी आणि दुःख? आपली मुलगी एका नोकराबरोबर लग्न करुन आम्हाला आयुष्यभर तुटक तुटक दुःख सहण्यापेक्षा एकदाचे संपविलेले ठीक, अशी भावना बनते.

### कायदे हे लोकांसाठी असावेत, कायद्यांसाठी लोक नाही

अन्न, झोप, मैथून या मानवी शरीराच्या अतिआवश्यक गरजा आहेत. मैथून या गरजेची तीव्रता व्यक्तीनुसार कमी जास्त असू शकते. पालक आपल्या पाल्यांच्या गरजेची तीव्रता बघून कमी वयात लग्नाचा निर्णय घेण्यास काय हरकत



आहे? अडाणी अशिक्षित गरीब भासणारे पालक हेच खरे हुशार आणि समजदार पालक आहेत. त्यांना त्यांचे निर्णय स्वतः घेवू द्या. मान सन्मान मर्यादा सांभाळून, पारिवारिक सुख शांती समाधान हे ध्येय असणारा भारतीय समाज ४६ टक्के मुलींचे लग्न वयाच्या १८व्या वर्षाच्या आधी करत असेल तर तथाकथित उच्चशिक्षीत समाजाला काय अडचण आहे? ज्या मुलांना, त्यांच्या शरीराला मैथून गरजेची तीव्रता असह्य आहे, त्यांचे लग्न केले नाही तर लफडे करत फिरतील. ज्यांनी लग्नाआधी लफडे केलेत अशा तरूण तरूणींना कोणते माय-बाप आपले जावई वा सुना म्हणून स्विकारायला तयार असतात? समाजात लफडे करणाऱ्या युगलांची संख्या वाढविणे म्हणजे समाजात गंदगी फैलविण्यासारखी आहे. मुलांची लग्न कोणत्या वयात करायचे हे पालकांनाच ठरवू द्या. अडाणी दिसणाऱ्या पालकांना सुख समाधानाने कौटुंबिक आयुष्य हवे आहे. पाश्चिमात्य भरकटलेल्या धेंडासारखे असंतोषी कौटुंबिक जीवन नाही.

भारतीय पालकांच्या मानसिकतेनुसार कायदे बनायला पाहिजे. दुखणे, डोक्यात, पट्टी पायाला अशा प्रकारची आमची कायदे प्रणाली आहे. लोक, त्यांची मानसिकता, सामाजिक कौटुंबिक व्यवस्था आणि कायदेप्रणाली यांचा समन्वयच नाही. कायदे हे लोकांसाठी असावेत. कायद्यांसाठी लोक नाही. बुद्धीभ्रष्ट, नितीभ्रष्ट, अधर्मी हे शब्द एक स्पेसिफिक यंत्रणा नाही, जज नाही, मंत्रालय नाही तर अख्ख्या प्रणालीला लागू होतो. जी कायदे प्रणाली १४ वर्षाच्या मुलींना लफडे करा म्हणते पण पालकांना त्या मुलींचे लग्न करण्यास मनाई घालते अशा प्रणालीला बुद्धीभ्रष्ट, नितीभ्रष्ट, अधर्मी, दिशाहीन प्रणाली म्हणणार नाही तर काय? काही प्रगत देशात पालकांच्या संमतीने लग्न केल्यास वयाचे बंधन नाही. तसेच भारतीयांनी आपले कायदे बनविले तर काय अडचण आहे? कायदे प्रणाली संबंधीत स्वतःला सुशिक्षित समजणाऱ्या वर्गाला गरीब वर्ग अडाणी वाटतो. पण अडाणी गरीब वर्गच खरा समजदार आहे. त्यांना त्यांचे जीवन जगू द्या.

### गुलामगिरी आमचा देश पत्करत राहणार आहे?

पाश्चिमात्य इंग्रज लोकांचे ठीक आहे. त्यांना कौटुंबिक सुख समाधान नसतेच त्यांचे ठीक आहे पण आपण का म्हणून तसे करावे? गोरे इंग्रजांच्या घरात असेही कौटुंबिक सुख शांती समाधान नसते. याची बायको त्याचे सोबत आणि तिसऱ्या सोबत, आज एक बायको, उद्या वेगळी! मुले वाऱ्यावर!!! कौटुंबिक

सुख काय त्यांना माहीतच नाही. त्यांचे आपण का म्हणून अनुकरण करावे? आपण दुसऱ्यांचे अनुकरण करू शकत नाही. आपले पालक, समाजव्यवस्था कशी आहे त्यानुसार आपण आपले निर्णय घ्यायला पाहिजे.

आमचे संविधान हे पाश्चिमात्य संविधानाची कॉपी वाटते. आपल्या संविधानात बदल करणे आवश्यक आहे. इंग्रज गोरे जे काय त्यांच्या देशात काय कायदे कानून करतात, त्यांच्याच आयडिया आम्ही अनुकरण करतो, आमच्या मिडिया सुद्धा त्याचीच गुलामगिरी पत्करतात. ही मानसिक, आर्थिक, व्यापारिक गुलामगिरी आमचा देश पत्करत राहणार आहे? इंग्रज गोरे जे काय करतात, कसे वागतात ते म्हणजे शाश्वत! अशी भारतीयांची मानसिकता लहानपणापासून बनली आहे हेच मूळ कारण आहे.

पुरूष महिला समानता असा व्यक्तीगत अधिकार न बघता कुटूंब म्हणून अधिकाराचा विचार, समाज म्हणून, संस्कृती म्हणून अधिकाराचा विचार संविधानात का होऊ शकत नाही? कौटुंबिक सुख शांती समाधानाला संविधानात का प्राधान्य देऊ शकत नाही? म्हणे रूढी परंपरा काळानुसार बदला! भारतातल्या रूढी परंपरा या स्टॅंडर्ड ऑपरेटिंग प्रोसीजर आहेत. काळानुसार बाईचे अवयव पुरूषाला आणि पुरूषंचे अवयव बाईला फुटलेत का? आईच्या पोटात बाळ कंसीव्ह नऊ महिने नऊ दिवस आधीही लागत होते, आताही लागतात. तो कालावधी काळानुसार बदलला का? ईश्वराने, निसर्गाने जिथे असमानता ठेवली तिथे मानव आणि लोकशाही कायदे कानूनचे काय देणे घेणे?

**आमच्यात फर्मनेस, लिडरशीप क्वालिटीज, मार्केटिंगची क्षमता कधी येणार?**

पाण्याच्या प्लास्टिक बॉटलचा कन्सेप्ट १९७३ मधे अमेरिकेत इन्ट्रोड्युस झाला. पाण्याच्या प्लास्टिक बॉटल वापराचा कन्सेप्ट १९९८ च्या आसपास भारतात सुरू झाला. आज रोज २० रू. चे फिल्टर वाटर खेड्यापाड्यातही घेत आहेत. हे मानसिक गुलामगिरीचे लक्षण आहे. शेतकरी वर्गाला सल्फेट रसायनिक किटकनाशकाची सवय लावली. आता लक्षात येते की, ही रसायनयुक्त खाद्यान्ने आम्हाला आमच्या मुलाबाळाच्या शरीराला घातक आहेत.

आपणच प्रत्येक वेळी मानसिक गुलामगिरी का स्विकारावी? आम्ही इतरांवर मानसिक गुलामगिरी शोषविण्याची का क्षमता ठेवू नये? समजा जर ते फुकटचे मिळणारे पाणी २० रू. कॅन प्रमाणे विकत घेण्याची क्षमता आमच्यात निर्माण



करतात तर आणि विना रासायनिक सल्फेट किटकनाशके वापरलेली, शुद्ध गावठी ढोराचे शेण गोमुत्र वापरलेली नैसर्गिक शेती उत्पादने डबल किंमतीत आम्ही का विकू शकत नाही?

**क्रिकेट इंग्रजांचा खेळ**

लहानपणापासून टीव्ही, रेडीओ, वृत्तपत्र, इतरही मिडिया, पालक, शिक्षक क्रिकेटच्या बातम्यांचा मारा करतात. त्यामुळे क्रिकेटच्या मॅचेस असल्या की आमचे मन भरकटून जाते. आम्ही आमचे कामधाम टाकून क्रिकेट मॅच बघायला लागतो. आमच्या भारतीय खेळांचा कबड्डी, कुस्ती, खोखो, दहीहंडी आमच्या मिडियाने प्रचंड पो पो केला, तनामनात लहानपणापासून आमचे खेळ बिंबविलेत तर उद्या जाऊन आम्ही आमचे देशी खेळ इंग्रजांच्या मनावर बिंबवू शकतो. आमच्यात फर्मनेस, लिडरशीप क्वालिटीज कधी येणार?

उलट आम्ही कुस्ती वा पुरातन मल्लयुद्ध प्रमोट करायचे सोडा. इंग्रजांचा डब्ल्यू.डब्ल्यू.एफ. आम्हाला चांगला वाटतो. खरं तर डब्ल्यू.डब्ल्यू.एफ. हा कुस्ती/मल्ल युद्धाचा मॉडीफाईड वर्शन आहे. महाभारतातील भीम आणि जरासंघ यांचे मल्लयुद्ध आम्ही विसरून गेलो आणि ही इंग्रजाळलेली मिडीया आमचा आणि आमच्या लहान मुलांच्या नसानसात इंग्रजाचा खेळ घुसवित आहे. अशाच या इंग्रजाळलेल्या मानसिकतेचा मंतरलेला प्रभाव भारतीय जज न्यायाधीशांवरही पडला हे आमच्या लक्षात येतच नाही आहे.

**पुरूषांची मानसिक कुचंबना**

बलात्कार झाल्यानंतर शिक्षेची तरतूद यांना करता येते पण बलात्कार करण्यास प्रवृत्त करणाऱ्या वृत्तींवर या कायदेतज्ञांचे लक्षच नाही. जुने लोक म्हणतात की, विस्तवाजवळ तूप ठेवा वा तुपाजवळ विस्तव, तूप तो वितळणारच. बाई म्हणजे तो विस्तव आणि पुरूष म्हणजे तूप. खरं तर हीच खरी नैसर्गिक मानसिकता आहे. मुलीचे वागणे, बोलणे, त्यांचे हावभाव कपडे लत्ते यावर बंधणे घालायला या कायदेतज्ञांची अक्कल चालत नाही ना त्यांच्यात ते अंमलात आणण्याची क्षमता आहे वा धमक आहे. प्रत्येक वेळेस पुरूषच दोषी धरल्या जातो.

बलात्काराची व्याख्याही बदलून टाकली. एखाद्या निरागस निरपराध निर्दोष मूलीवर क्रूर नराधमाने केलेला बलात्कार शिक्षेस जरूर पात्र आहे. पण म्हणजे

लग्नाचे आमीष दाखवून केलेला बलात्कार! त्याच्यावरही कारवाई. हे हास्यास्पद नव्हे का? अशा प्रकारचे कायदे, कानून बनविणाऱ्यांना का बुद्धीभ्रष्ट, नितीभ्रष्ट, अधर्मी दिशाहीन का म्हणू नये?

११, १२, १३ वर्षाची मुलगी निरागस निरपराध निर्दोष असते यात काही शंका नाही पण तिचे हावभाव, वागणे कपडेलत्ते तिच्या नकळत पुरूषी भावनांना चेकाळवितात याला दोषी कोण? मुलीचे पालक, यावर दिशाहीन, दृष्टीहीन, बुद्धीहीन मिडीया की सामाजिक परिस्थिती? मिडीया, सामाजिक परिस्थिती, पालकांचे घटनेने सीमित केलेले अधिकार याला कारणीभूत का नाही? सरळ सरळ मुलांच्या शाळा, पुरूषांचे ऑफीसेस वेगळे ठेवण्याच्या तरतूदी आपल्या लोकांनी का म्हणून करू नये?



# १०. चुम्मा चुम्मी इन अमेरिका !




अमेरिकेत असतांना आमच्या जवळच्या एका मित्राच्या बायकोने बाळाला जन्म दिला. आम्ही हॉस्पीटलमध्ये भेटायला गेलो. आम्हा भारतीयांना लहान बाळाच्या गालाची लाडाने पप्पी घेण्याची सवय आहे. गावाकडे लहान बाळाची लाडाने पप्पी घेतात त्याला चुम्मा म्हणतात. आम्ही बाळाचा लाडीगोडीने चुम्मा घेणार तेवढ्यात दवाखान्यातील नर्सने अडविले. नर्सनी सांगितले की बाळाची अशी गालाची पप्पी घेऊ नये, तुम्ही बाळाच्या पायाची पप्पी घेऊ शकता. बाळाच्या आई–बाबानांही गालाची पप्पी वर्ज्य आहे! बाळाच्या गालाचा चुम्मा घेतल्याने तुमच्या नाका तोंडातील श्वासाद्वारे बाळाच्या नाकातोंडात चंतु संसर्ग वा रोग संसर्ग होऊ शकतो. आम्हाला ती गोष्टी पटली, वैज्ञानिकदृष्ट्या, आरोग्यसंबंधाने त्यांचे अगदी बरोबर होते.

पण भारतीय असल्याने ती गोष्ट डोक्यात मात्र घुटमळतच राहिली. आमच्या पूर्वजांना काही कळत नव्हते का? आम्हांला बाळाचा चुम्मा घ्यायची सवय लावली. आमच्या गावच्या आजीबाईना अमेरिकेतलया बाळाचा चुम्मा घ्यायची मनाई केली तर काय व्हायचे? पहिला चुम्मा घेणारी बाळंतपण करणारी सुईनबाई तर पूर्ण गावच डोक्यावर घ्यायची! आम्हा भारतीय पालकांना स्वतःच्या बाळाला प्रेमाने कवटाळून गालगुच्चा घेणार नाही तर शंभर टक्के बाळप्रेम, पुत्रसुख कसे एन्जॉय करणार? प्रश्नावर प्रश्न पिच्छा काही सोडत नव्हते!

तितक्यातच आम्ही अमेरिकेतील शाळा कॉलेजेसच्या कॅप्पसमध्ये फिरत होतो. बारा–चौदा वर्षाचे किंवा त्यापेक्षा मोठी मुले–मुली सर्रासपणे चुम्माचुम्मी करतांना आढळली. नववा आठवा वर्ग गाठला की पूरे! अमेरिकन मुलामुलींची चिपका चिपकी, चुम्माचुम्मी, झोपा–झोपी चालू! आज याच्या बरोबर उद्या

त्याच्याबरोबर! त्यावेळेस डायरेक्ट तोंडात तोंड, इतरही काही तोंडात टाकत असतील. त्यावेळेस त्यांना जंतूसंसर्ग वा रोगसंसर्गाची भिती नसते का म्हणून मनात विचार यायला लागले! आम्ही जेव्हा बाळाचा मनापासून चुम्मा घेऊन लाड करतो तेव्हा जंतूसंसर्ग! आणि ही मोठी मुले चुम्मा चुम्मी करतात ते रोग प्रतिबंधक!

**बिन बुडाचे निर्णय**

आमची कुटुंबपद्धती संस्कृती तशी एक नंबर आहे. आधी काळात बाराव्या वर्षी लग्न होत होते, त्याला आज बालविवाह म्हणतात. अमेरिकेत ब्रिटनमध्ये बाराव्या वर्षापासून मुलामुलींची लफडेबाजी चालू होते. मुलगी प्रौढ १८ वर्षे पूर्ण व्हायच्या आधीच बाळाला जन्म देतात. बिन बाप का बेटा वाली संख्याही भरपूर आहे. कमी वयात बाळाला जन्म दिल्याने डिफेक्टीव वा अपरिपक्व बाळांची संख्याही भरपूर असते. त्यामुळे अमेरिकन घरांमध्ये कौटुंबिक सुख शांती नांदत नाही. अमेरिकेसारखे देश युनो वा संयुक्त राष्ट्रसंघाच्या माध्यमातून भारत वाल्यांना बालविवाहावर बंदी प्रखर करायला लावत आहेत. आमचे भारतीय प्रशासनही आमच्या पूर्वजांना अक्कल नव्हती असे गृहीत धरून किंवा युनोसारख्या अमेरिकन बाहुल्यासमोर झुकून बालविवाह कायद्यासारखे कायदे अमलात आणतात. आमचे भारतीय कायदे बनविणारे ठाम नसल्याने कोणाची हिंमत होत नाही गोऱ्यांना सांगायला की, तुमचे विद्यार्थी अभ्यास टाकून वयाच्या बाराव्या–चौदाव्या वर्षापासून वासनांध प्रेमाच्या नावाखाली लफडे करतात, मॅच्यूअर व्हायच्या आधी बाळाला जन्म देतात, अनौरस बच्चे पैदा करतात ते थांबवा आणि नंतर आम्हाला शिकवा बालविवाह काय असे ते! कळत नकळत प्रत्यक्ष अप्रत्यक्ष हे गोरे लोक आपली गोरी संस्कृती भारतीयांवर लादून आमची संस्कृती नासवत आहेत. या भारतीय संस्कृती मुळेच आमचे भारतीय शिक्षक आणि भारतीय विद्यार्थी जगात अव्वल नंबरवर आहेत.

आयुष्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत काळजी करणाऱ्या मेहनती भारतीय पालकांच्या मुली लग्नाचे वय व्हायच्या आधी तारूण्याच्या ओघात चुकीने प्रेग्नंट राहिल्यात वा अनौरस बच्चे पैदा झालेत तर या मानसिक त्रासाला भारतात बालविवाह बंदीचा कायदा करणारे जबाबदार राहणार आहेत का? युनो वाल्यांना बालहक्क दिसते, महिला हक्क दिसतो, पालकांचा हक्क दिसत नाही काय?

(दि. ५ मार्च २०१५, अभयराज्य)



# ११. लव जिहाद? लव जिहाद म्हणजे काय?

भारतीय वंशाच्या मुलींनी अमेरिकन गैरहिंदू ख्रिश्चन मुलांसोबत लग्न केले हा लव जिहाद नाही आहे का? या जगात अंतराळवीर गिनेचुने आहेत. त्यापैकी या दोघी! भारतीय वंशाचे मूळ असलेल्या दोघी ही अमेरिकेच्या अंतराळवीर बनल्या. पण लव जिहादला संशयाच्या जाळ्या टाकून गेल्या याला अमेरिकन जिहाद म्हणायला हरकत नाही! काही धर्मीयांचे लोक मुलांना समजून उमजून जाणूनबुजून भडकवितात वा तशी परवरिश संस्कार करतात आणि परधर्मीयांच्या मुलींना प्रेमाच्या जाळ्यात ओढण्यासाठी प्रवृत्त करतात असा आरोप केला जातो. खरं तर गोरे लोक अशी कामे इतक्या हुशारीने करतात की पत्ताही चालत नाही आणि बाहेरून एकदम निर्दोष प्रतीत होतात, त्यामुळेच गोरे लोक आजही जगावर अप्रत्यक्षपणे राज्य करती आहे.

(दि. १८ सप्टेंबर २०१४, अभयराज्य)

# १२. काय आहे हा स्नूपगेट?

निवडणूकीच्या धुमाळीत स्नूपगेट प्रकरण खूप गाजत आहे. म्हणे वडिलांनी आपल्या मुलीवर पाळत ठेवण्यासाठी नरेंद्र मोदी यांच्या शासनाची मदत घेऊन मुलीचे फोन कॉल टॅप केलेत इत्यादी असे केल्याने मुलीची प्रायव्हेसी (खाजगी आयुष्य) वर गदा येत आहे. आपण भारतात जगत आहोत की अमेरिकेत हेच कळत नाही.

'स्नूप' हा इंग्रजी शब्द आहे. स्नूपींग करणे म्हणजे जासूसी करणे. भारतीय पालक हा नेहमीच अलर्ट असतो. आपल्या मुलाबाळांवर देखरेख ठेवणे हे त्यांचे आद्यकर्तव्य आहे. भारतीय समाजाला प्रतिष्ठी ही महत्वाची आहे. मानवाच्या मृत्यूनंतर त्याच्या अंत्ययात्रेला किती लोक येतात, किती लोक हळहळतात यावरून भारतीय समाज आपली संपत्ती वा अचिव्हमेंट मोजतो. हेच खरे सर्वोच्च सत्य आहे.

आमच्या प्रतिष्ठा ह्या खोट्या नसतात. प्रायव्हेसी, अभिव्यक्त स्वातंत्र्य, मानवाधिकार या गोष्टी पाश्चिमात्य लोकांनी आपल्या संस्कृतीची पोळी भाजण्यासाठी काढलेले हत्यार आहेत. स्वतःची बायको असून मोनीका लेव्हेन्की बरोबर लफडे करणारा अमेरिकेचा अध्यक्ष बील क्लिंटन हा अमेरिकेत चालतो. मुलींना फसवणूकीचा आरोपात सापडणारा आसाराम बापू भारत देशात निस्तनाबूत होऊ शकतो. ही आहे आमची संस्कृती!

भारतीय आई–बाप रक्ताचे पाणी करून मुलांना वाढवितात. भारतीय पालक आपल्या मिळकतीचा बहुतांश हिस्सा पाल्याच्या भविष्यासाठी वाचवितात. पाश्चात्य पालक आपल्या मिळकतीचे पूर्ण पैसे उडवितात. थोडेथोटके वाचविले तर आपल्या स्वतःच्या पेंशनसाठी वरून पाश्चात्य पालक स्वतःच्या ऐशीसाठी नवीन नवीन लग्न करतात. १६–१७ वर्षाची मुले झालीत की घरातून हाकलून देतात. मुलांची प्रायव्हेसी हा प्रकार पाश्चात्य देशासाठी आहे, भारतीयांसाठी हा प्रकार नाही. मुलांच्या चांगल्या भविष्यासाठी, मुलांच्या भल्यासाठी स्वतःच्या मुलांवर पाळत ठेवणे हा गुन्हा व्हावा हेच आमचे दुर्दैव आहे.

समजा जर राज्यकर्त्यांना कायदे बनविता येत नसतील तर बनवू नये. पण पाश्चात्य देशाच्या कायद्यांचे अंधानुकरण तरी करू नये. भारतीय कायदे भारतीय संस्कृतीला धरून सर्वसामान्यांच्या मनोवृत्तीला अनुसरून असावे. विकास वा मागासलेपणाचा संबंध हा संस्कृतीशी नाही.

(दि. १५ मे २०१४, अभयराज्य)



# १३. न्यायमूर्ती गांगुलीची अटक ही भारतीय पुरुषवर्गासाठी घातक!

सध्या मिडीयामध्ये न्यायमूर्ती गांगुली यांचे लैंगिक शोषण प्रकरण गाजत आहे. न्या. गांगुलीच्या हाताखाली काम करणाऱ्या मुलीने त्यांच्या विरूद्ध तक्रार केली. लक्ष्मण माने, आसाराम पुत्र साई, तरूण तेजपाल यांच्या पाठोपाठ सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती गांगुली हे रांगेत आहेत. आम्हाला हे म्हणायचे नाही की गुन्हेगारांना शिक्षा व्हायला नको! पण या घडणाऱ्या गुंतागुंतीचे मूळ कारण समूळ नष्ट व्हायला हवे. नेहमी नेहमी तेच–तेच मग जिथून ही अनैतिक प्रवृत्ती जन्म घेत आहे त्या झाडाची बीज पूर्णपणे उद्ध्वस्त होणे आवश्यक आहेत. आम्ही एका वृत्तपत्रात पिडीत मुलीचे तक्रारीचा प्रकाशित झालेला तपशील वाचला. पिडीत मुलीचे न्या. गांगुलीच्या आग्रहास्तव दोन–तीन घोट दारू पिणारी होती. भारतीय संस्कृतीतील भारतीय स्त्री असलेली पिडीत मुलगी पाश्चात्य संस्कृतीच्या आहारी गेलेली दिसते! तिच्यासाठी वृत्तपत्रातून, दूरदर्शनवर मोठा गाजावाजा! या भारतात मीडियावाल्यांना दुसरे कोणते खेड्यापाड्याच्या गरीबीपासून ते मंत्र्यांच्या भ्रष्टाचारापर्यंतचे प्रश्न आणि नियमीत घडणाऱ्या गंभीर घटना दिसत नाहीत काय?

काही शतकापूर्वी एक दुसऱ्यांमधील, आपआपसातील स्वार्थी क्षुल्लक कारणांसाठी भांडणारे भारतीय इंग्रजांनी बघितले आणि भारतावर कब्जा मिळविला. नंतर १९४७ मध्ये भारत स्वातंत्र्य झाला पण जाता जाता भारतीय आणि पाश्चिमात्य संस्कृतीचा हॅंडूक (गुंतागुत) लावून गेलेत. आजची भारतीय संस्कृती म्हणजे ना इकडची, ना तिकडची, ना पाश्चिमात्य ना पूर्वेकडची, ना आशियायी ना यूरोपातील! मध्येच लटकून! कधी ग्रहण सूटेल नक्की नाही!

मी केलीफोर्निया, अमेरिकेत ओरॅकल कंपनीत काम करत होतो. तिथे कंपनी एथीक्सवर परीक्षा द्यावी लागायची. कंपनीत व्यवहार करताना कसे वागायचे. व्यवहार कसा करावा, शिष्टाचार कसा पाळावा, आचारसंहिता कशी असावी याबाबत प्रशिक्षण म्हणून ती परीक्षा द्यावी लागायची. त्यांच्या देशात संस्कृती वेगळी आहे. पुरूषाचे मन जर विचलीत झाले, काही कारणास्तव (अर्धनग्न, अंतर्शरीर दिसणारे कपडे बघून), मन बहकून गेले तर शरीरसुखासाठी एकदा

विचारता येते. 'तू माझ्याबरोबर झोपशील का? वा तू माझ्याबरोबर शारीरिक संबंध ठेवशील का?' असे एकदा बिनदिक्कत विचारता येते. जबरदस्ती करता येत नाही. किंवा वारंवार विचारता येत नाही. त्याच्या पाश्चिमात्या संस्कृतीला बघून त्यांनी कायदे बनविले आहेत. तिथे वयाचा संबंध नसतो. मृत्यूशय्येचा शंभर वर्षाचा म्हातारा सोळा वर्षाच्या मुलीलाही शारीरिक संबंधासाठी विचारू शकतो वा विनंती करू शकतो. नातीनच्या वयाची की मुलीच्या वयाची इत्यादी वगैरे तेथे काही घेणे देणे नाही. आपला भारत तसा नाही. भारतात शरीर सुखासाठी मागणी करणे वा विनंती करणे हा दखलपात्र गुन्हा आहे, दंडसंहितेनुसार तीन वर्षापर्यंत कारावास होऊ शकतो.

आजकाल कपड्यांच्या फॅशन, पोषाक इतक्या हद्दपार पोहचलेत की देव जर आला तर त्याचेही मन विचलीत होईल. पुरूषांची गोष्ट सोडाच! पाश्चिमात्य संस्कृतीचा इतका पगडा पडला की बलात्कार वा अनैतिक वागण्याचे प्रकार वाढले आहेत. दारू पिणारी मुलगी म्हटली तर ॲडव्हांस वागणारी पाश्चिमात्य संस्कृतीचा पगडा असलेली मुलगी! दारू पिते हे आम्ही वृत्तपत्रात वाचले. न्यायमूर्तींना त्या व्यतीरिक्तही काही जाणविले असेल, त्यामुळे बुजूर्ग न्यायमूर्ती गांगुलीची विषयविकार जागृत झाले असावेत. असो पण पुरूष संघटना आणि महिला संघटनांची भाकित टक्करची वेळ जवळ येत आहे. पुरूषाने असभ्य वर्तन केले तो दखलपात्र गुन्हा आणि स्त्रीने कळत नकळत प्रत्यक्ष अप्रत्यक्ष वर्तन जे पुरूषाला आक्रमक बनविते तो गुन्हा नाही काय? कायदे बनविण्याची वेळ जवळ आलेली दिसतेय!

(दि. २६ डिसेंबर २०१४, अभयराज्य)



# १४. महिला न्यायाधीशावर झालेल्या बलात्काराचा निषेध

महिला न्यायाधिकार झालेल्या बलात्काराचा निषेध करतांना काही महिला आंदोलनकारी। गोऱ्या ब्रिटीशांनी १८०० च्या काळात १७७४ सुरू केलेल्या न्यायव्यवस्थेमध्ये गॅप्स असल्याने भारतात महिला न्यायाधीशही बलात्कारापासून सुटत नाहीत. ही न्यायव्यवस्था ज्या साक्षी पुराव्यांवर आधारित असते तेच तडजोडीने वा पैसे देऊन बदलले जातात. वकील लोकांना चुकीचे सल्ले देऊन, एकाचे तीन आरोप करून न्यायसंस्थेला मिसलिड करतात. ज्या इमारतीचा पायवा मजबूत नाही, तिथे वरवर कितीही डागडुगी केली तरी काय उपयोग? कितीतरी सर्वसामान्य गपचूप अन्याय सहन करता पण कोर्टाची पायरी ओलांडायला घाबरतात. ही गोऱ्या ब्रिटीशांनी सुरू केलेली न्यायव्यवस्था सक्षम आहे का?

(दि. १४ ऑगष्ट २०१४, अभयराज्य)

# १५. गर्भपातादरम्यान मृत्यू? आरोपी फरार!

साकोली जि. भंडारा तालुक्यातील पिंडकेपार येथील एका खाजगी दवाखान्यात १७ वर्षीय अल्पवयीन मुलीचा गर्भपातादरम्यान मृत्यू झाल्याची घटना उघडकीस आली. मुलीला उपचारासाठी आणणारे चार जण फरार झाले आणि चौकशी सुरू आहे. या प्रकरणात सापडलेले डॉ. बाळबुधे यांची तक्रार आधीही करण्यात आली होती.

गर्भपातादरम्यान मृत्यूची ही पहिलीच घटना नाही. किंवा या भारतात फक्त एकच डॉ. बाळबुधे नाही. लपून चोरून खेड्यापाड्यात बऱ्याच अशा घटना होतात. प्रश्न हा आहे की गर्भपाताच्या घटना लपून चोरून का व्हाव्यात? बऱ्याच घटना ह्या आजूबाजूचे शेजारी एकी करून बाहेर येऊ देत नाही आणि आपसाआपसात सोक्षमोक्ष लावतात. या ठिकाणी आपल्या देशात सिस्टम, कायदे, रूल्स रेग्यूलेशन गरीब लोकांचा विचार करून बनलेले नाहीत.

मुला–मुलींनी, पुरूष महिलांनी अनैतिक संबंध ठेवू नये हे सर्वांना मान्य आहे. पण तारूण्याच्या ओघात, कळत नकळत, जोशात जर चूक झाली तर ती निस्तारायला बनविलेले सरकारी कायदे वा नियम अनुसरण करणे गरीब लोकांना आणि कधी कधी श्रीमंतानाही खूप डोकेदुखी आहे. गर्भ जर दोन–तीन महिन्यापेक्षा मोठा झाला असेल तर दूर गावच्या वैद्यकीय अधिकाऱ्याकडून परवानगी घ्या आणि सरकारमान्य दवाखान्यातच गर्भपात करा अशी किचकट व्यवस्था बनवून ठेवली आहे. आधीच आई–वडील टेशंनमध्ये वरून ही किचकट सिस्टम! इंग्रजी लोकांनी पायाभूत केलेली ही सिस्टम गरीब भारतीयांसाठी आणि भारतीय संस्कृतीसाठी लागू होत नाही. ही उचकटून काढणे गरजेचे आहे.

महात्मा गांधींना जेव्हा माहीत झाले की दारूच्या नशेत त्यांच्या मुलाने बलात्कार केला तेव्हा महात्मा गांधी यांनी दारूच्या आहारी जाण्यापेक्षा तू मृत्यू स्विकारलेला बरा असा मजकूर असलेले पत्र त्यांचा मुलगा हरीलाल यांना लिहले होते. भगवद्‌गीतेत सुद्धा म्हटले आहे, बदनामी पेक्षा मृत्यू बरा! आपली कुटुंब व्यवस्था आणि भारतीय संस्कृती जगात सर्वश्रेष्ठ आहे. गरीबांच्या, सामान्य लोकांच्या नितीमत्तेला धरून कायदे बनविणे आवश्यक आहे.



गर्भपात हा सामान्य रोगाच्या ट्रीटमेंट सारखा गृहीत धरण्यात यावा. गरीबाला एखादा साधारण रोग झाला आणि त्याला मोठ्या हॉस्पीटलात जायची पाळी आली तर पैसे नसल्याने वा अशिक्षीत असल्याने वा हिंमत नसल्याने मोठ्या हॉस्पीटलात जात नाहीत, बिचारे तडफडून मरतात. तिथे तुमचे रूल रेग्यूलेशन काही चालत नाही आणि नाही सरकार काही करू शकत! अत्याधुनिक व्यवस्था असणारे हॉस्पीटल जीव वाचेल याची गॅरंटी घेत नाही. उलट पेशंट मेला तर आम्ही जिम्मेदार नाही असे पेशंटकडून लिहून घेतात. बदनामीला भिवून वा पैश्याअभावी सरकारी नीतीनियम पाळणे गर्भपातच्या केसमध्ये शक्य नसते. मग हे असले नीतीनियम गर्भपाताच्या केससाठीच का बनवावेत? उलट गर्भपाताच्या केसमध्ये नीतीनियम शिथील असतील तर आधीच टेंशनमध्ये असलेले आई–वडीलांना नातेवाईक थोडे रिलॅक्स होऊन चांगले निर्णय घेतील आणि वेळेवर यशस्वीपणे गर्भपात करू शकतील.

**कमी शिकलेले खासदार**

विद्यमान निवडणूकीत महाराष्ट्रातल्या निवडून आलेल्या २६ खासदारांचे शिक्षण बारावी किंवा त्यापेक्षाही कमी आहे, ४८ पैकी २१ खासदार हे पदवीधर वा त्यापेक्षा अधिक शिकलेले आहेत. या लोकांचा जनसंपर्क दांडगा असल्याने, कामचुकार वा कामाची टाळाटाळ करणाऱ्या अधिकाऱ्यांकडून काम करवून घेण्याची क्षमता असल्याने कधी कधी कायद्याच्या चौकटीबाहेर जाऊन रिस्क घेऊन काम करण्याची धमक असल्याने यांनी खासदारपद मिळविलेले आहे. हे खासदारपद तुमच्या हिंमतीने, हुशारीने मिळविले आहे आणि आपले अस्तित्व आणि संस्कृती जपणे हे आपले आद्यकर्तव्य आहे. हे आमच्या खासदारांनी समजणे आवश्यक आहे! ५४३ खासदारांच्या संख्येतला इंग्रजी बोलणारा किंवा ज्याने परदेशवारी केली आहे असा अर्धवट अभ्यास असलेला तुमच्यासमोर टपर टपर इंग्रजी बोलतो आणि तुम्ही लोक त्यांच्या झाकीत जात असावे! किंवा भारतातले परदेश वारी करणारे, टपर टपर इंग्रजी बोलणारे, स्वतःला उच्चभ्रू समजणारे स्वतःला ॲडव्हांस समजणारे, श्रीमंतपण कौटुंबिक मानसिक सुख शांती नसलेले लोक काही प्रस्ताव तुमच्या समोर आणत असावेत आणि तुम्ही इंप्रेस होऊन असले कायदे बनविता? कायदे असे बनवायला हवेत की गरीब, सामान्य लोकांची सुख, शांती, चैन हरवायला नको! तेव्हा तुम्ही आमचे खरे खासदार!

आपला देश पाश्चिमात्य, इंग्लंड वा अमेरिका देशांपेक्षा अविकसीत वा मागे

असल्याची कारणे वेगळी आहेत. विकास वा मागसलेपणा आणि भारतीय संस्कृती वा कुटुंबव्यवस्था याचा संबंध मुळीच नाही! या जगातील ऊन वारा पाऊस जीव जंतू मानवानेच निर्माण केले असं गृहीत धरून अमेरिकन लोकांनी लोकशाहीची व्याख्या आधीच लिहली होती. पाश्चिमात्यांच्या विकास आणि प्रगतीला भाळून जाऊन आम्ही आमचे अस्तित्व घालविण्याची आवश्यकता नाही.

भारतीयांच्या मागासलेपणाची कारणमिमांसा करतांना तुम्ही कमी शिकले असे समजून टपर टपर इंग्रजी बोलणाऱ्या अभ्यासकाने तुमच्यासमोर जास्तच बचबच केली आणि तुमच्यावर कायदे न बदलण्यासाठी दबाव आणला तर त्याला तुम्ही आमचेकडे पाठवा. आम्ही समोरासमोर बसून त्यांचेच भाषेत अभ्यासपूर्ण पुराव्यासहित त्यांना एबीसीडी शिकवायला सक्षम आहोत.

(दि. २२ मे २०१४, अभयराज्य)



# १६. महात्मा गांधींची घोर विटंबना !

महात्मा गांधीजी यांना कोणता भारतीय नागरिक ओळखत नाही? गांधीजींनी आपल्या आत्मचरित्रात त्यांच्या कौटुंबिक आणि व्यक्तीगत जीवनातील गोष्टी अगदी सत्य आणि उघडपणे लिहिल्या आहेत. पण आपण भारतीय दुर्दैवी आहोत की काय असे वाटते! जो खरे बोलतो त्याची टर उडविली जाते. त्या लोकांवर टिका केली जाते हेच आपल्या देशाचे दुर्दैव आहे. सत्य बोलणे हे पाप आहे असे भारतात सिद्ध होते. जे लोक खरं बोलणाऱ्यांची टर उडवितात अशांना तर मानगुट पकडून झोडपून काढले पाहिजे. अशा नीच वाईट वृत्ती ठेचून काढणे खूप महत्वाचे आहे.

महात्माजींनी भारताला स्वातंत्र्य मिळवून दिले ते हिमालय ते कन्याकुमारी, कच्छपासून नागालंड पर्यंतचा एकसंघ भारत दिसतो तो महात्माजींमुळे! स्वातंत्र्याची चळवळ त्यांनी जनआंदोलनात परिवर्तीत केली. इतके पावरफूल होते की त्यांच्या नावावर चालणारा कांग्रेस पक्ष तेवढा बहुमत मिळवित होता. इतर कोणत्याही पक्षाला बहुमत मिळत नव्हते. तब्बल सत्तर वर्षे लागलेत स्वातंत्र्यानंतर हेडगेवारांच्या आर.एस.एस. प्रणित भारतीय जनता पक्षाला बहुमत मिळायला! नरेंद्रभाई मोदींनी जेव्हा अहमदाबादचे विजयी भाषण केले तेव्हा महात्माजींचे नाव घ्यायला विसरले नाहीत. एकंदरीत महात्मा गांधी हे केवढे मोठे नेते! पण आमच्या मीडिया म्हणजे विचित्र डोक्याच्या! महात्मा गांधी यांचा मुलगा हरीलाल बलात्कारी आणि दारूड्या होता असा उल्लेख असलेले पत्राची बातमी वर्तमानपत्राच्या मुखपृष्ठावर छापली! कोणी सत्य बोलतो त्याचा गैरफायदा कसा घ्यायचा ही आमच्या वृत्तपत्रांची वृत्ती!

आम्ही अमेरिकेत असताना भारत आणि अमेरिका या देशातील ओव्हरआल फरक तसेच भारत आणि अमेरिकेतील वृत्तपत्रांचा तुलनात्मक फरक अभ्यासण्याचा प्रयत्न केला.

अमेरिकेतील फिल्मफेअर सारख्याच्या कार्यक्रमात एका नटीचे कपडे घसरलेत, अमेरिकेतल्या नटीने छाती डौलदार दिसण्यासाठी शस्त्रक्रिया केली. अमेरिकन नटीने कोणाबरोबर लफडे केले. याची बातमी भारतीय वृत्तपत्र हिरहिरीने

छापायचे! पण अमेरिकेतील वृत्तपत्रात अशा घटनांचा मूळी उल्लेखच दिसायचा नाही! अमेरिकेतील वृत्तपत्रांना स्वातंत्र्य आहे पण देशाच्या भल्यासाठी कोणत्या बातम्या महत्वाच्या याचे त्यांना भान असते आणि ते तसे वागतात. स्वातंत्र्य म्हणजे काय हे त्यांनीच उपभोगाचे!

आमच्या माध्यमांना स्वातंत्र्य आहे म्हणजे देशाच्या भल्याचा विचार करू नये. कसेही छापावे असा अर्थ होत नाही. दुसऱ्यांकडे बोट दाखवितांना चार बोटे आपल्याकडे निर्देश करतात. प्रत्येकाच्या आयुष्यात दिव्याखाली अंधार असतो. राजकीय नेत्यांच्या वा प्रोफेशनली एक्स्ट्रा ऑर्डीनरी लोकांचे कौटुंबिक आयुष्य उद्ध्वस्त असण्याची शक्यता जास्त असते कारण त्यांना घरी लक्ष द्यायला वेळ नसतो! महात्माजींच्या कौटुंबिक आयुष्यात असा अंधार असेल. पण अशा बातम्या मुळी छापू नयेत.

सत्य बातम्या किंवा कोणाची बदनामी होणाऱ्या बातम्या प्रसिद्ध करू शकता पण त्यामागील उद्देश चांगला असेल तर, त्या बातमीने देशाचे, समाजाचे आणि लोकांचे भले होत असेल वा चांगली शिकवण मिळत असेल तर! महात्मा गांधीजींचा मुलगा बलात्कारी होता, दारूड्या होता वा बातमीतून समाजाचे, देशाचे वा लोकांना काय साध्य होईल, उलट चुकीचा प्रभाव पडतो! पण महात्मा गांधीचा राजकीय प्रभाव इतका होता की त्यांच्या नावावर चालणाऱ्या कांग्रेस पक्षाव्यतीरिक्त इतर पक्षाला पूर्ण बहुमत मिळायला सत्तर वर्षे लागलीत ही बातमी त्यांना छापायला आठविले नाही!

(दि. २२ मे २०१४, अभयराज्य)



# १७. गोऱ्यांच्या संस्कृतीच्या रक्षणासाठी भाजपाकडून पोलीसांचा कडेकोट बंदोबस्त

व्हेलेंटाईन डे च्या निमित्ताने स्वतःला हिंदू संस्कृती रक्षक म्हणवून घेणाऱ्या भाजप सरकारने इंग्रजांच्या संस्कृतीच्या रक्षणासाठी कडेकोट पोलीसांचा बंदोबस्त लावला. हिंदू संस्कृतीच्या रक्षणासाठी डॉ. बळीराम हेडगेवार यांनी स्थापन केलेल्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे हेडक्वाटर असलेल्या नागपूर नगरीच्या सर्व उद्यानात संघप्रणीत भाजप सरकारने इंग्रज पुरस्कृत तथाकथित प्रेमदिवस साजरा करण्यासाठी लफडेबाजीला प्रोत्साहन देण्यासाठी पोलीसांचा कडेकोट बंदोबस्त लावला.

भारताला चार–पाच हजार वर्षाचा गौरवशाली इतिहास आहे. प्रेम म्हणजे काय हे भारतीयांना गोऱ्याच्या मानसिकतेवाल्यांनी शिकविण्याची गरज नाही. भारतीय संस्कृतीप्रमाणे प्रेमीयुगलांचे प्रेम आणि लग्न हे एकाच रेषेत असायला पाहिजे. पाश्चात्य देशात लहानपणापासून मुलांना माहित असते की आपली आई आपल्या बापाला सोडून दुसऱ्याबरोबर प्रेमदिवस साजरा करते. अशा गोऱ्या संस्कृतीची चटक लागलेल्या गेडांनी प्रेम म्हणजे काय हे भारतीयांना शिकवावे का?

**भारतीय विद्यार्थी जगात अव्वल!**

भारतीय विद्यार्थ्यानी मनाची एकाग्रता कशी करावी, चिमनीच्या डोळ्याचा वेध घेणाऱ्या अर्जुनाप्रमाणे अभ्यासावर कसे लक्ष असावे हे शिकविले जाते, माता सरस्वतीची कठोर उपासना कशी करावी हे शिकवितात. त्यामुळेच भारतीय विद्यार्थी आणि शिक्षक जगात अव्वल आहेत. इकडे तिकडे चिडीमारी करुन, लफडेबाजी करून मन भटकविण्यापेक्षा अभ्यासात लक्ष घाला हा सल्ला पालक आणि शिक्षक देतात. दुसऱ्या बाजूला ही शासन यंत्रणा आणि पोलीस यंत्रणा लफडेबाजांना प्रोटेक्शन देण्यासाठी अख्खी ताकद पणाला लावते. अभ्यासातील नियोजन, सातत्य, एकाग्रता, परिश्रम, बौद्धिक ज्ञान असे शब्द मग वापरतात कशाला? आताचे लफडे करणारे, गार्डनमध्ये मुले मुली फिरविणारे लफडेबाज विद्यार्थी पुढे जाऊन लग्नानंतर कठीण परिश्रम करून, लफडेबाजीला टाळून उच्च ठिकाणी नोकरी करणाऱ्या मेहनती विद्यार्थ्यांच्या गळ्यात पडतात. वेगवेगळ्या शरीराची चटक लागते, शिलभ्रष्ट मुलेमुली लग्नानंतर मेहनती विद्यार्थ्यांच्या नशीबी

येतात. जयभीम-मित्र बांधवांनो, उद्या जाऊन आपली अपत्य बाबासाहेब आंबेडकरांसारखी घडवायची असतील तर विद्यार्थ्यांच्या लफडेबाजीला प्रोत्साहन देऊन हे शक्य आहे कां?

**भारतीय पालकांना नम्र आवाहन**

भारतीय पालकांनो, आई–वडिलांनो, बंदोबस्तावरील पोलीस बंधूनो, या गार्डनमध्ये बसणाऱ्या तथाकथित प्रेमीयुगलांमध्ये तुमची बहीण वा मुलगी असेल तर तुम्हाला आवडेल का? तुम्हाला त्यांचा अभिमान वाटेल का? आपल्या लहान बाळाला उद्यानात घेऊन जा, तो विचारतो बाबा हे कोण इथे मुलगा–मुलगी अंधारात बसून आहेत? विचार करा माझ्या भारतीयांनो! टोपलीतल्या एका आंब्यासोबत अख्खी भारतीय संस्कृती सडवायला निघाली आपण! आजही साठ सत्तर टक्के भारतीय खेड्यात राहतात, त्यांच्या मानसिकतेनुसार कायदे बनवा. कायदे लोकांसाठी आहेत, कायद्यांसाठी लोक नाही. दोन चार शिकल्या पिकल्या लोकांनी ज्यांचे कौटुंबिक आयुष्य उद्‌ध्वस्त आहे, त्यांच्या मतानुसार कायदे बनवू नये.

**आपल्या मुलांचे नातवांचे आयुष्य दुःखाच्या गर्तेत?**

गोऱ्या लोकांमध्ये एक सोडून अनेक लग्न करतात. मुलाला माहीत असते विद्यमान बाप हा आपला तिसरा चौथा बाप आणि आपल्या आईला आजी माजी दोन–चार बॉयफ्रेंड आहेत. अशा संस्कृतीत अपत्यांना, नवऱ्यांना आणि बायकांना सुद्धा! भयंकर मानिकस त्रास होतो. आपल्या संस्कृतीत आपल्या अपत्यांचे सुख समाधान शांतीला सर्वात जास्त प्राधान्य आहे. तथाकथित प्रेमीयुगलांचे व्हेलेंटाईन प्रेमाला उर्फ लफडेबाजीला प्रोत्साहन देणे म्हणजे आपल्या येणाऱ्या पिढीतील मुलांना आणि नातवांना दुःखाच्या गर्तेत ढकलणे होय. भारतीयांनी विचारसरणी बदलली पाहिजे याचा अर्थ आपल्या भविष्यात येणाऱ्या पिढीतील मुलांना नातवांना, पळनातवांचे कौटुंबिक व्यक्तीगत आयुष्य मानसिक त्रासाच्या गर्तेत ढकलणे असा होतो का? घरात सुख शांती समाधान नसलेल्या इंग्रज गोऱ्यांच्या मानसिक त्रासाचे रोग आम्ही कशाला लाऊन घ्यावेत. आपला होणारा जावई वा सून कितीही सुंदर वा कर्तबगार असले तरी तुम्हाला ते उद्यानात फिरणारे पूर्वाश्रमी लफडेबाज होते, प्रेमवीर होते असे माहीत झाले तर तुम्ही स्वीकारणार का? भारताचा चार पाच हजार वर्षाचा इतिहास आहे. ग्रॅन्यूलर, डिटेल्ड असे हे लक्षात येते की गोरे ब्रिटीश भौतिकदृष्ट्या अती विकसीत असायला संस्कृती कारणीभूत नाही. ब्रिटीशांचा कट्टर राष्ट्रवाद, एकदुसऱ्यांचे पाय न ओढण्याच्या वृत्ती, झिरो



भ्रष्टाचार कर्मचारी नागरिकांचा झिरो कामचुकारपणा, संघटीतपणा कारणीभूत आहे.

**मीडियाच्या तालावर नाचणारे सरकार?**

ज्या लोकांना बोलून भावना व्यक्त करता येत नाही, कायद्याची साथ मिळत नाही त्यामुळे तळपायाची आग व्यक्त करण्यासाठी तुरळक हिंसेचा वापर करतात, त्यांचे ठीक आहे. बाळासाहेब ठाकरेंच्या मृत्यूनंतर त्यांच्या मनातील आग प्रखरपणे मांडणारा कोणी नाही. पण भाजप वाले तर उच्च दर्जाचे संवाद कौशल्य वाले आहेत ना? मग कायदे भारतीय संस्कृतीनुसार का बदलू नये? डॉ. बळीरामजी हेडगेवार यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना इंग्रजी संस्कृतीच्या रक्षणासाठी केली होती का? व्हेलेंटाईन डे च्या आदल्या दिवशी तथाकथित शिवसैनिकांनी त्यांच्या मनातील राग तुरळक गुंडागर्दी करून व्यक्त केला पण खरं तर हा प्रत्येक जबाबदार भारतीय पालकांच्या मनातील राग आहे. प्रेमीयुगलांच्या उद्यानातील हैदोस टोपलीतील सडक्या आंब्यासारखा येणाऱ्या पिढीला नासविण्याची शक्यता आहे. चोरून लपून नवऱ्याच्या पाठीमागे लफडे करणाऱ्या बायका आणि बायकोच्या पाठीमागे लफडे करणारे नवरे उद्यानात प्रामाणिकतेला फसवत असतात. भारतीय पालक पूर्ण जीव ओतून अपत्यांसाठी जीवन पणाला लावतो, त्यांच्या मनाविरूद्ध जवानीच्या ओघात तथाकथित प्रेमाचा आव आणून चुकीच्या स्थळी लग्न करून स्वतःच्या आणि पालकांच्या आयुष्याचे वाटोळे करतात. मुली फसविल्या जाऊन उद्या प्रेग्नंट राहिल्या तर झगडे होऊन पालकांना असह्य त्रास होतो. अशा व्यक्तीगत कौटुंबिक त्रासाचे मूळ कायद्यानुसार का पॅक करू नये? लिडींग वृत्तपत्रकारांनी कृपा करून पालक म्हणून विचार करा. प्रत्यक्ष अप्रत्यक्ष, कळत नकळत ब्रिटीश अमेरिकेच्या अदृश्य असणाऱ्या सांस्कृतिक नेतृत्वाखाली कृपाकरून वाहून जाऊ नका. पाश्चात्य अमेरिकन लोकांना लग्न म्हणजे काय, पालकांच्या अपत्यासाठी जबाबदाऱ्या कोणत्या, याबाबतीत ज्ञान अपरिपक्व कच्चे आहे. खऱ्या प्रेमीयुगलांना फिजीकली एकांतात येण्याची जरूरत नसते. आपला फिजीकल एकांत वा शारीरिक स्पर्श लग्नानंतरच प्रोत्साहित केले तरच येणाऱ्या काळात भारत प्रथम क्रमांकाचे देश बनण्यासाठी मदत होईल, कारण भारतीय विद्यार्थ्यांची गुणवत्ता टिकून राहील. भारतीय विद्यार्थ्यांची गुणवत्ता जगात प्रथम क्रमांकावर आहे. अमेरिकन युरोपीय देश बाह्य भौतिक प्राकृतिक अतीविकसीत दिसण्याला कारणे वेगळी आहेत, याचे भरमसाठ पुरावे उपलब्ध आहेत. (दि. १९ फेब्रुवारी २०१५, अभयराज्य)

# १८. स्त्रीयांनी जीन्स पँट का म्हणून घालू नये?

## भाग– १

**पुरूषांनों सोज्वळपणाचा आव कधीपर्यंत आणणार?**



या लेखातील भाषा थोडीफार अश्लील वाटू शकत, त्यासाठी आमही दिलगीर आहोत. मुद्दे इफेक्टीव्हली पटवून सांगण्यासाठी आम्हाला नाईलाजाने असे करावे लगात आहे. आमचे विचार प्रत्येकाला पटतीलच असे नाही पण सर्वसामान्यांच्या मनातील निदान सांगण्याचा प्रयत्न करीत आहोत.

पत्नीला जीन्स व कुर्ता घालण्यास मनाई करून केवळ साडी नेसण्यासाठी दबाव टाकणे ही एक प्रकारची क्रूरताच आहे असा निर्वाळा मुंबईचया एका कुटुंब न्यायालयाने दिला. पत्नीस जीन्स नाकारणे खरोखरच क्रूरता आहे का? पती लोकांनी वा पुरूषांनी स्त्रीने साडीच घालीवी असा आग्रह का करावा? आई–वडिलांनी सासू–सासऱ्यांनी मुलीने वा सुनेने जीन्स पॅन्ट या पेहरावात आणि साडी यात फरक का आहे? भारतात जास्त करून लोकसंख्या ग्रामीण आहे. ग्रामीण लोकांनी जीन्स पॅन्टचा विरोध स्त्रीयांनी घालू नये म्हणून का करावा? आमच्या डोक्यात हा विचार का यावा? मूळ कारणांचा अभ्यास होणे आवश्यक आहे. आमची आई, आईची आई, आमच्या आजीची आई त्या साडी, लुगड्यासारखा परिपूर्ण पोषाख घालत होत्या म्हणून आम्ही सुद्धा आमच्या बायकांना म्हणावे का? आमच्या आई–वडिलांनी, त्यांच्या आई–वडिलांनी आजा–आजीच्या आई–वडिलांनी सर्व वडीलधारी पूर्वजांनी साडी–लुगडी सारखा पेहराव का प्रिफर करावा? जीन्स पॅन्ट महिलांनी घालू नये असा आग्रह का करावा? आमच्या आई–वडिलांना, आई–वडिलांच्या आई–वडिलांना, त्यांच्या आई–वडिलांना काही कळत नव्हते का? हे शहाणे नव्हते का? यामागे खरोखर पुरूषी मानसिकता आहे का काही गंभीर कारण आहे?



पुरूष आणि स्त्री या देवाने निर्माण केलेल्या जाती आहेत. तर मादी या दोन विजातीयांमध्ये एकमेकांच्या अवयवांबद्दल तीव्र आकर्षण असते. पुरूष व स्त्री यांना सुद्धा मानव असले, बुद्धी विकसीत असली तरी त्यांना इतर प्राण्यांप्रमाणे भावना असतात. आपल्या इंद्रियांचे डोळे, कान, नाक, त्वचा इत्यादी बाह्य भौतिक जगाशी जे व्यवहार चालतात, त्यामुळे मानवी मेंदीत संवेदना उमटतात. साध्या शब्दात आपल्या डोळ्यांची नजर विजातीय जातींचा प्रायव्हेट भागावर पडली तर मनात संवेदना उमटतात, त्याच परत परत हव्याशा वाटतात, त्यातून आकर्षण निर्माण होते, ते आकर्षण तीव्र होऊन त्यांना रूपांतर कामवासनेत होते.

**साडी आणि जीन्स पॅन्टमधील फरक**

साडी ही कमरेच्या भोवताल लूजपणे गुंडाळली असते. जीन्स पॅन्ट हा फिट्टपणे शरीराला चिपकलेलाअसतो. तंग, घट्ट फिट्ट कपडे. त्यातून दिसणारा शरीराच्या अवयवांचा आकार हा पुरूषांच्या नजरेच्या आकर्षणाचा केंद्रबिंदू असतो. महिलांनी जीन्स पॅन्ट घातल्यावर पुरूषांची नजर बेंबी कमरेच्या खाली, जांघांवर, मांड्यावर अशा प्रायव्हेट भागांवर पडू शकते. त्यातून निर्माण होणाऱ्या संवेदनांची परिणती पुरूषांच्या भावना भडकविण्यात होऊ शकते. ही पुरूषी मानसिकता नाही, हे निसर्ग निर्मात्याने निर्माण केलेले, घडविलेले नैसर्गिक मस्तिष्क आहे. काही पुरूष सोज्वळपणाचा आव आणून बोलत नाहीत हा भाग वेगळा! गुंडाळलेल्या साडीतून कमरेखालचा मांड्या, जंघा यासारख्या प्रायव्हेट अवयवांचा आकार दिसत नाही. पूर्ण पदर घातलेली साडी सोज्वळ, शालीन, कामवासनेची तीव्रता नियंत्रित ठेवणारी परिपूर्ण पोषाख म्हणता येऊ शकतो. महिलांच्या पोषाखाच्या स्वातंत्र्य या मनमर्जीमुळे पुरूषांना भावनिक त्रास होतो याचा विचार न्यायसंस्थेने, राज्यकर्त्यांनी प्रखरपणे मांडणे आवश्यक आहे.

**महिलांची लग्नानंतरची जबाबदारी**

लग्नाआधी चिडीमारी, लफडेगिरी, इकडे तिकडे ओंखमारी चालू शकते (खरं तर तेही नसायला पाहिजे) पण लग्नानंतर नवऱ्याचे बायको सोडून इतरांबरोबर लफडे वा बायकोचे नवरा सोडून इतर पुरूषांबरोबर लफडे हे प्रत्येकाला बोचते. प्रेम काही सांगून होत नाही. आपण घातलेल्या जीन्स पॅन्टवर कोणाची छूपी नजर पडली, कुठे आकर्षणाच्या संवदेना तयार झाल्यात, आपला नवरा सोडून दुसऱ्यांच्या नवऱ्याच्या प्रेमात कधी पडलो हे पताच चालायचा नाही. जीन्स, टाईट टी शर्टस्, तोकडे कपडे लफडेबाजीची नीव बनवून देऊ शकतात.

लग्नानंतरची स्त्रीची वागणूक, पोषाख, राहणीमान याचा प्रत्यक्ष असर मुलांवर पडतो. लग्नानंतर महिला आणि पुरुषांच्या जगण्याची फेज बदलते, मातृत्वाची फेज चालू होते. लग्नानंतर दोघांनाही एक नैतिक जबाबदारी येते. मुलांचे प्रेम वडिलांपेक्षा आईवर जास्त असते, आईबद्दल अतीव आकर्षण असते. आईबद्दल कोणी टीका करणे म्हणजे मुलांना खूप मानसिक त्रास होतो. त्यामुळे आईवर जास्त जबाबदाऱ्या येतात.

**पाश्चिमात्यांच्या विकासाला भारावण्याची आवश्यकता नाही**

भारतीय कुटुंबव्यवस्था एक जगात आदर्श कुटुंबव्यवस्था आहे. या कुटुंबाचे स्वतःचे कायदेकानून व्यवस्था आहे. घरच्या कर्त्या माणसाला घराचा खर्च नाही तर घराची सुख शांती सुद्धा सांभाळायची असते. पाश्चात्य देश अती विकसीत असायला कारणे काही वेगळी आहे. विद्यमान प्रसारमाध्यमे पाश्चात्य देशांच्या विकासाला भारावून चुकीचा प्रचार करीतआहेत. अमेरिकेत भारतीय अमेरिकेच्या लोकसंख्येचा दिड टक्काही नाही पण नासामध्ये असलेल्या एकूण शास्त्रज्ञांपैकी अडतीस टक्के शास्त्रज्ञ भारतीय आहेत. शास्त्रज्ञांना लागणारी मानसिक एकाग्रता ही भारतीय संस्कृती देऊ शकते. चीन, जापान, कोरिया, लॅटीन, अमेरिका, कॅनडा इत्यादी देशांचे खूप सारे इमिग्रेटेडलोक अमेरिकेत आहेत पण भारतीय कुळाचे शास्त्रज्ञ नासामध्ये अडतीस टक्के! नवरा सोडून लुफडे करणाऱ्या बायका, अन् बायको सोडून इतरत्र लफडे करणारे त्यांचे नवरे, मुलांची वाताहत लावून ऐशीकरीता नवीन नवीन लग्न करणारे पाश्चात्य पालक! अमेरिका अती विकसीत असायला कारण वेगळे आहेत. त्यांची एकत्रितपणे काम करण्याची वृत्ती, एकमेकांना अडथळे उभे करण्याची वृत्ती, दुसऱ्यांकडून काम करवून घेण्याची वृत्ती, एकसंघपणे एकमेकांना विश्वास ठेवून जलदपणे प्रोजेक्ट्स एक्झीक्यूट करण्याच्या प्रवृत्तीमुळे अमेरिका पुढारलेला देश म्हणून मिरविते. अशा लफडेबाज दुनियेत मनाची एकाग्रता भारतीयांचे नासा अमेरिकामध्ये अडतीस टक्के शास्त्रज्ञ आहेत ना! मायक्रोसाफ्ट, ओरॅकल, सिसको, आयवीएमची तर टक्केवारी मी पकडतच नाही.

(दि. १० जुलै २०१४, अभयराज्य)



# १९. स्त्रीयांनी जीन्स पँट का म्हणून घालू नये?

## भाग– २

**पुरूषांनो सोज्वळपणाचा आव कधीपर्यंत आणणार?**

पत्नीला जिन्स पॅन्ट घालायला नाकारणे ही क्रूरता आहे असा निर्वाळा न्यायालयाने देणे ही भारतीय संस्कृतीसाठी दुर्दैवाची घटना आहे. ब्रिटीश नीव असलेली ही न्यायालयीन यंत्रणा भारतीय सर्वसामान्यांसाठी आहे की इंग्रजी मनोवृत्तीचया लोकांसाठी हा प्रश्न पडतो. ही शासनव्यवस्था, न्याययंत्रणा हे कायदेकानून भारतीय सर्वसामान्यांच्या भल्यासाठी आहेत की सर्वसामान्य लोक या इंग्रजी मूळ असलेल्या कायद्यांच्या भल्यासाठी बनले आहेत? जी न्यायालयीन व्यवस्था भारतीय संस्कृती टिकवू शकत नाही, ती कोणत्या कामाची?

भारतीय सर्वसामान्यांच्या विचारधारेला पोषक नसेल. महोदय माननीय न्यायालयीन यंत्रणनेने हा मुद्दा घ्यानात घ्यावा. या न्यायालयीन यंत्रणेत माखनचोर पकडता येतो, चितचोर नाही; ज्या साक्षी पुराव्यांवर ही यंत्रणा काम करते ते पैसे देऊन बदलले जातात. मॅनीपुलेट केले जातात म्हणजे ही विद्यमान न्यायालयीन यंत्रणा सध्याच्या परिस्थितीत, बाधाग्रस्त आहे.

**भारत माझा देश आहे?**

पहिल्या वर्गापासून भारत माझा देश आहे, परंपरांचा मला अभिमान आहे. पाईक होण्याचा प्रयत्न करीन असे कशाला शिकविता? पाईक होईल असे शिकविण्यापेक्षा आम्हाला भारतीय परंपरांचा अभिमान नाही, मी बेईमानीने वागेन असा बदल करा. प्रतिज्ञेत शिकविता पालकांचा, गुरूजनांचा, वडिलधाऱ्या माणसांचा मान ठेवीन! मान ठेवणार म्हणजे त्यांचे ऐकणार विश्वास ठेवणार! समजा वडीलधाऱ्या माणसांचे ऐकायचे नव्हते तर मग अशी प्रतिज्ञा ठेवली कशाला? भारताचे राष्ट्रगीत, प्रतिज्ञा बदलून टाका आणि दुसऱ्या कोणत्या पाश्चात्य देशाची प्रतिज्ञा, राष्ट्रगीत अभ्यासक्रमाच्या पुस्तकात लिहा! आम्ही वडीलधाऱ्या माणसांचा अपमान करू, ऐकणार नाही, म्हातारपणी त्यांना लबाडू असा बदल प्रतिज्ञेत करा. भारतीयांचे, भारतीयत्वाचे अस्तित्व, त्यांचे वजूद, प्रतिष्ठा विकून खा!

याला सर्वात जास्त कारणीभूत आहेत. आपली संस्कृती सोडून दुसऱ्यांच्या

संस्कृतीचा उदोउदो करणे, रूट कॉजचा अभ्यास करण्यापेक्षा टेंपरवारी उपायांचा उदोउदो करण्याचे कार्य काही मोठी प्रसारमाध्यमे करीत असतात. तरूणाईच्या नावाखाली ज्यांची दुधमिशी वाढली नाही, बापाच्या पैसावर उड्या मारणाऱ्या कौटुंबिक अनुभव जबाबदारी न सांभाळलेल्या मुलांची जीन्स पॅन्टबद्दलची प्रतिक्रिया छापायची आणि पाश्चात्य संस्कृतीचा उदोउदो करायचा हे काम प्रसारमाध्यम करीत आहेत. १८५७ पासूनचे इंग्रजी पेपर तर विचारू नका, पूर्ण इंग्रजी विचारसरणी! ऑनलाईन वृत्ती तर नंग्या पुंग्या चित्रांनी भरली असते. इंग्रजांनी जसे फितूर, त्यांना मदत करणारे भारतीय लोक हाताशी धरून राज्य केले तसेच काही इंग्रजी वृत्तपत्रवाल्यांनी इंग्रजी मनोवृत्तीला सपोर्ट करणारा स्टॉफ त्यांच्या कार्यकारणीत घेतला की काय असे वाटते? कृपया प्रसारमाध्यमांनी दया दाखवावी, जागृत व्हावे असे नम्र आवाहन आम्हाला करावेसे वाटते.

**आमच्या राज्यकर्त्यांचे काय?**

फक्त प्रसारमाध्यमांना दोष देण्यात तथ्य नाही. आपण सर्वच कारणीभूत आहोत. आमचे खासदार आमदार सर्वसामान्यामधून आहेत. पण मीडियावाले, राज्यकर्त्यांमधील थोडेफार शिकले पिकले लोक, चुकीच्या अभ्यासामुळे विरूद्ध दिशेने संस्कृतीचा गाडा हकलत आहेत, अशी शंका येते. या राज्यकर्त्यांमधील काही लोक, त्यांच्या भोवतालचे काही लोक जे स्वतःला उच्चभ्रू समजतात, सुशिक्षीत समजतात, पाश्चात्य विचारांनी भारावलेले, टपर टपर इंग्रजी बोलणारे, असा वर्ग जो कौटुंबिकदृष्ट्या सुख समाधानी नाही, ज्याचे घरी सुख नांदन नाही असे लोक प्रत्यक्ष अप्रत्यक्ष सर्वसामान्यांना दुःखात झोकत आहेत. आधुनिकता आणि स्वातंत्र्याचा नावाखाली नंगा नाच चालू होण्याची शक्यता नाकारता येत नाही. जो खूप शिकला म्हणजे सुखी असतो, जो खूप श्रीमंत असतो म्हणजे समाधानी असतो असे नाही. आयुष्यात सुख शांती समाधान अतिशय महत्वाचे आहे. ज्यांचे घरी कुटुंब अशांत, अतृप्त तनावयुक्त असते ते लोक कळत नकळत दुसऱ्यांनाही त्याच गर्तेत ढकलण्यासाठी प्रयत्नरत असतात आणि त्यांचे हातून तेच घडत असते. कौटुंबिक समाधान सुख नसेल तर उच्चभ्रूगिरी, श्रीमंती, उच्चशिक्षणाचा तुमच्या मुलांना, नातवांना उपयोग काय? तुमच्यानंतर, येणाऱ्या पिढीचे मुलाबाळांचे शांत, निर्भय, खंबीर मन हवं असेल, मानसिक विकार व विकारांपासून मुक्त हवं असेल तर आज आपल्या आमदार खासदारांना संस्कृतीची आठवण करून देणे आवश्यक आहे. आपली संस्कृती सोडून दुसऱ्यांच्या



संस्कृतीची अभिमान असलेली औलाद पैदा होणे, हेच भारतीयांचे दुर्दैव आहे. सर्वसामान्यांनो जागे व्हा, आवाज उठवा! राज्यकर्त्यांना कायदे बदलायला सांगा.

**महिलांचा महत्वाचा रोल**

स्त्रीयांचा रोल आमच्या संस्कृतीत खूप महत्वाचा आहे. त्यांनी पुरूषांच्या भावना समजून घेणे महत्वाचे आहे. एक पुरूषी मानसिकता म्हणून, वर्चस्व म्हणून स्त्रीयांनी जीन्स पॅन्ट घालू नये असे म्हणून आम्ही स्त्रीयांना दबाव आणत नाही. भावना, कामवासना भडकविणारे पोषाक, बलात्काराचे प्रमाण वाढविणारे पोषाक स्त्रीने घालू नये. आपल्या मुलाबाळांचे नातवांचे आयुष्य सुखी आणि निर्भय जावे म्हणून ही नम्र विनंती आहे. तूपाजवळ अग्नी ठेवा वा अग्नीजवळ तूप, वितळतो तो तूपच! पुरूष कसे सोज्वळ एकसारखे पोषाक घालतात, तुमचे बघा. नंगे पुंगे, तंग, घट्ट, शरीराला चिपकलेले, आजकाल निघालेली उतरल्या गळ्याचे ब्लाऊज तर महाखतरनाक! साडीसारखा कमरेखाली लूज, वरचे पर्ण अंग झाकलेला पोषाक घालायला काय प्राब्लेम आहे? त्यातल्या त्यात इंग्रजांनी बनविलेला, घडविलेला पोषाक का घालावा? नवीन कोणता सोपा सोज्वळ शोधून काढा जिथून शरीराचा आकार दिसणार नाही. इतका सुंदर पोषाक बनवा, गोऱ्यांनाही द्वेष वाटावा आणि त्यांनी आपला पोषाक घालणे चालू करावे. आम्ही सुद्धा अशा फॅशनचा उदोउदो करू. अशा ड्रेसची ग्लोबल मार्केटींग केली तर बाहेर देशात मागणी वाढले आणि आपल्या देशात पैसा येईल.

आमचे म्हणणे खोटे वाटत असेल तर आईवडिलांना विचारा, वृद्धापकाळीही इंद्रियांचा भोग घेण्याची लालसा सुटत नाही. इंद्रीये थकली, काम करेनाशी झाली तरी मनाने भोग घेणे चालूच असते. जीन्स पॅन्ट सारखे घट्ट, फिट्ट, तंग कपडे कामविकारी आग ओतण्याचे काम करतात, कामवासनेत भर टाकतात, वासनामय प्रेम उत्पन्न करतात, सतत तेच तेच विचार आणून मन बहकवू शकतात. वासनांध बनवून पुरूषांना नैराश्येच्या गर्तात झोकू शकतात. म्हणूनच आपल्या पूर्वजांनी, आई–वडिलांनी शालीन पोषाख पुरस्कृत करणारी समाजव्यवस्था बनविली, हे ध्यानात घ्या! कामवासनेची तीव्रता प्रत्येकात वेगळी असू शकते, थर्मामिटर सारखे यंत्र अस्तित्वात नाही की कामवासनेची तीव्रता मोजता येईल पण सर्वांचे मन गृहीत धरून, पूरेपूर अभ्यासानिशी भारतीय संस्कृती बनली आहे, या मूळ कारणांचा विचार व्हावा!

(दि. २४ जुलै २०१४, अभयराज्य)

# १. अम्माला जेलमध्ये टाकल्याच्या धक्क्याने चाहत्यांचा मृत्यू

पूर्वाश्रमीच चित्रपट अभिनेत्री जयललीता यांचा हा रडतानाचा चित्रपटामधील फोटो नाही, खरोखरचा आहे मुख्यमंत्री जयललीता यांना बेहिशोबी मालमत्ता म्हणजे भ्रष्टाचारी वा बेकायदेशीर मार्गाचा अवलंब करुन अशा पैशातून मिळविलेली मालमत्ता प्रकरणी जेल झाली. त्यांना जेल झाल्यामुळे त्यांच्या आठ समर्थकांनी आत्महत्या केली आणि अकरा लोक हार्ट अटॅकने मेले. ही केस कोर्टात सोळा वर्षापूर्वी दाखल करण्यात आली होती. माननीय कोर्टाने निर्णय दिल्यानंतर अम्माच्या समर्थकांनी कोर्टाच्या निर्णयावर विश्वास न ठेवता, समर्थकांनी जयललीता यांच्यावरच विश्वास का ठेवावा? सध्याच्या विद्यमान कोर्टाच्या सिस्टममध्ये सापडला तो चोर बाकी साव असे होत आहे का? जयललीता यांच्या समर्थक नवनिर्वाचित मंत्र्यांनी रडत रडत मंत्रीपदाची शपथ घेतली.

**छोटासा आशावाद**

बंगलोर येथील विशेष न्यायालयाचे न्यायाधीश श्री जॉन मायकस डिकूना यांनी श्रीमती जयललीता यांना ४ वर्षे जेल आणि शंभर कोटी रुपये दंडाची शिक्षा सुनावली. १७७४ मध्ये इंग्रजांनी सुरु केलेल्या न्यायपालिकेत लोकांना विश्वास नसल्याने जयललीता यांच्या वीस समर्थक आत्महत्या वा हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू पावलेत. न्यायाधीश श्री जॉन मायकल डिकूना यांनी एक धाडसी, ऐतिहासिक निर्णय दिला. विद्यमान न्यायपालिकेवर विश्वास ठेवावा असा आशावाद निर्माण केला. डिसेंबर २०१३ च्या सर्व्हेनुसार देशातील कोर्टाची एकूण संपूर्ण भारतभर तीन कोटी वीस लाख प्रकरणे पेंडींग आहेत. भारतातील सत्तर टक्के लोक, काही ग्रामीण आणि काही शहरी न्यायपालिकेपर्यंत जातच नाहीत, गुपचूप अन्याय सहन करतात. काही वर्षापूर्वी लालूप्रसाद यादव यांना जेल झाली होती. आता जयललीता यांना झाली. दोन–चार दिवसात जेलमधून सुटूनही जातात.

**गोऱ्यांनी चालू केलेली न्यायपालिका सक्षम?**

विद्यमान न्यायपालिका १७७४ मध्ये सुरु केल्यानंतर १८३३ च्या आसपास



ब्रिटीशांच्या लक्षात आले की ही न्यायपालिका भारतात यशस्वी होणे शक्यच नाही. १८३३ मध्ये एका ब्रिटीश बाईने लंडनमध्ये दिलेल्या निवेदनानुसार भारतातील लोक एक आना घेऊन खोटी साक्ष देतात, खोटी साक्ष देणाऱ्यांमध्ये शिकलेल्या लोकांचा समावेश आहे. वरून खोटी साक्ष दिल्यानंतर त्यांना समाजात शाबासकी मिळते. त्यामुळे गोऱ्यांनी सुरू केलेली न्यायपालिका भारतात यशस्वी होणे शक्य नाही. आजही परिस्थिती त्यापेक्षाही बत्तर आहे. गुन्हेगारी वृत्तीच्या लोकांना समाजात मान प्रतिष्ठा मिळते. सत्य घटनातील सत्य सिद्ध करण्यासाठी सतरा वर्षे लागतात, पूर्ण सिस्टम आणि न्यायपालिकेचा जॉन मायकल डिकूना सारख्या न्यायाधीशाला सतरा वर्षे पूर्ण ताकत ओतावी लागते. जयललीतांना झालेल्या शिक्षेमुळे भारतीयांचा न्यायपालिकेवरील विश्वास वाढणे कठीण आहे पण वकीलांचा धंदा मात्र जरूर वाढेल.

(दि. ९ ऑक्टोबर २०१४, अभयराज्य)

# २. हिंदूंनी किती पोर पैदा करावीत?

**जयभीम बांधवांची परिस्थिती**

जयभीमवाले बांधव बाबासाहेबांचे कट्टर भक्त आहेत. बाबासाहेबांनी आपल्या लिखानात आवर्जून उल्लेख केला की, अपत्य मर्यादीत प्रमाणात असावेत. रामजी आंबेडकर यांचे कुटूंब मोठे असल्याने बाबासाहेबांना विद्यार्थी दशेत पैशाची चणचण भासत होती. बाबासाहेबांना साहेबांचे साहेब बाबासाहे म्हणून नावलौकिक मिळण्यासाठी विद्यार्थीदशेतील पैशाची चणचण ही सुद्धा एक ढिगणी कारणीभूत होती. बाबासाहेबांवरील त्यांच्या शिष्यांची आगाढ श्रद्धा, एक्ट्रीम अटेचमेंट पाहून लोकांना वाटते माझा मुलगा बाबासाहेबांसारखा जगप्रसिद्ध व्हावा, उद्धारकर्ता व्हावा, गोरगरीबांचा कैवारी व्हावा. बाबासाहेब स्वतः रामजी आंबेडकरांचे चौदावे पुत्ररत्न होते. आम्ही मुलाला जन्म घालताना कोणत्या क्रमांकाचे पुत्ररत्न नावलौकिक होईल हे तर पालकांना माहीत नसते. त्या पुत्ररत्नाच्या शोधात बाबासाहेबांचे अतीकट्टर भक्त दोन चार मुले जास्त पैदा करण्यास मागेपुढे पाहत नाहीत. जयभीम बांधव बाबासाहेबांची शिकवण जरूर अनुकरण करतात पण बाप म्हणून अपत्य जन्माला घालायची वेळ येते तेव्हा रामजी आंबेडकरांचे उदाहरण त्यांना रास्त वाटायला लागत असावे.

**संघवाल्याची बोलायचीच कढी...?**

उच्चशिक्षीत, श्रीमंत ब्राह्मण वा तत्सम समाज बांधव म्हणजे अतिउच्चवर्णीय असे आपण गृहीत धरू! अमेरिकेत भारतीय बहुसंख्य असलेल्या भागात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शाखा नियमित होतात. आम्ही स्वतः भारतात असताना संघात जाण्याचा योग आला नाही. पण उत्सुकता म्हणून अमेरिकेत कॅलीफोर्नियात असताना संघात नियमित जायचो. आम्हाला संघाचे महत्व पटले, त्यांच्या शिकवणीचे महत्व पटले हे आम्ही मानव करतो. पण मुले पैदा करण्याच्या बाबतीत अती उच्चवर्णीय पालकांची भूमिका दुहेरी दुटप्पी वाटली. अमेरिकेत खायला प्यायला भरपूर आहे. कुपोषण तर स्वप्नातही नाही. पण खाऊन एवढी पोट फुगतात की पचवायला नियमीत जीममध्ये जावे लागते. अन्न, वस्त्र या प्राथमिक गरजा आणि इतर सुख सुविधा इतक्या मुबलक आहे की अमेरिकन लोक प्रचंड प्रमाणात वेस्ट करतात, फेकतात, माजून गेल्याचा आभास होतो.



खाऊन पिऊन सांडवून, हगवून भरवून सडा सारवण केल्यासारखे! खरं तर अमेरिकेत भारतीयांनी दहा–दहा पोर पैदा करायला पाहिजे. पण उलटेच आहे. काय तर संघातील मुख्य शिक्षण मुले किती तर एक किंवा दोन!

अमेरिकेत भारतीयांची लोकसंख्या वाढली तर उलट भारतीयांनाच फायदा! पण तसे होत नाही आहे. अमेरिकेत भारतीयांनी दहा–बारा पोर पैदा केलीत तर एखादा अपत्य नावालौकीक होऊन इथे येवून भारतीयांचा उद्धार करू शकतो. अमेरिकेतील बऱ्याच भारतीय अती उच्चवर्णीयांची मोठ्या मुष्कील ने दोन अपत्य जन्माला घातलीत! पण देवाचीही कृपा अशी की दोन्ही मुली! त्या मुलींनी उद्या जाऊन अमेरिकेत ख्रिश्चनांबरोबर लग्न केले तर? होईल तो एकंदरीत हिंदू समाजाचेच नुकसान! जास्त करून अमेरिकेतील भारतीयांना अमेरिकेत मुलीच जन्माला येतात. अमेरिकन लोक, डॉक्टर काही छूपे तंत्रज्ञान तर वापरत नाहीत अशी शंका येते.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघवाला असो वा मुस्लीम बांधव वा जयभीमवाला आमच्या बोलण्याचे कृपा करून वाईट वाटून घेऊ नका, आम्हाला माफ करा. आम्ही वस्तुस्थिती सांगत आहोत. या लोखात दिलेले हे आमचे व्यक्तीगत निष्कर्ष आहेत, आम्ही चुकू शकतो.

यात महिलांच्या सुरक्षेसाठी बनविलेले कायदेही कारणीभूत आहेत. बऱ्याच शिकल्या सवरल्या महिला कायद्यांचा दुरूपयोग करतात. पुरुषांनी जास्त अपत्यांचा विचार सुचविला तर महिला मानसिक छळाचा आरोप करून पुरुषांनाच आणि त्यांच्या नातेवाईकांनाच जेलमध्ये टाकायच्या! अति उच्चवर्णीय लोक मानसिक वा शारीरिक धोका पत्करण्याची रिस्क बहुशी घेवू शकत नाहीत, असे इतिहास सांगतो. बायकोने म्हटले एक अपत्याच्या वर जायचे नाही तर गूपचूप मान्य करावे लागते. कारण पर्याय नाही. म्हणून अति उच्चवर्णीय लोक उच्चस्तरीय राजनीती खेळून स्वतः व्यक्तीगतरित्या साध्य करता येत नाही म्हणून बहुजनांकडे फासे फेकतात, असा काही बहुजनांचा आरोप आहे. आता सत्ता ही अप्रत्यक्षपणे अती उच्चवणीयांकडेच आहे. विद्यमान कायद्यांची छानबीन वा मुलींवर होणाऱ्या संस्काराची छानबीन ही त्यांच्याच हातात आहे!

**मुस्लीम बांधवाचे काय बोलावे!**

जावेद मियांदाद हा प्रसिद्ध क्रिकेटपटू हा त्यांच्या आई वडिलांचे सहावे

अपत्य होते असे आम्ही ऐकले आहे. मुस्लीम बांधवांसाठी वेगळी उदाहरणे द्यायची जरूरत नाही. आखरी बॉलवर षटकार मारून मॅच जिंकणाऱ्या फलंदाजाच्या शोधात मुस्लीम पालक दोन–चार पोर जास्त पैदा करत असतात हे सांगायलाच नको.

**खरी जिम्मेदारी बहुजनांवर**

गेल्या तेराशे वर्षात भारतीयांवर बाहेरच्या आक्रमकांनी प्रचंड हल्ले केलेत. यातूनही हिंदू समाज टिकून राहिला आणि राहील ही यात शंकाच नाही. पण तेराशे वर्षापूर्वी इरान–इराक, अफगानिस्थान पासून श्रीलंका, थायलंड, सिंगापूर, मलेशिया पर्यंत दूरवर पसरलेल्या आमच्या भारतीयांचे, नंतरच्या काळात संख्याबळाच्या दृष्टीने प्रचंड नुकसान झाले. यात प्रामुख्याने हिंदू धर्मीय मारल्या गेलेत. मोगलांनी, बाहेरच्या आक्रमकांनी, पोर्तुगीजांनी, इंग्रजांनी जबरदस्तीने, घाबरवून वा आमीष दाखवून हिंदू धर्मीय लोकांची धर्मांतरे करवून घेतली.

आता शेवटी बहुजन समाजच्या पालकांनीच ठरवायचे आहे, अपत्य किती असावीत. बहुजन समाज हा प्रत्यक्षपणे हिंदू धर्मीयांचा तारणहार आहे. शिवाजी महाराजांचा आदर्श ठेवायचा की त्याचे वडिल शहाची राजांचा हे बघा. त्यांच्या काळात पुरुषांना, कर्त्यांना, कर्तबगारांना बायकाही खूप करता येत होत्या आणि मूलेही डझनभर केली तरी अडचण नव्हती. बिहारचे दिग्गज नेते लालूप्रसाद यादवजी सारखे सुमडीत डझनभर मुले पैदा करायचे आणि बाहेर पोपो करायचे नाही ही भूमिका बरेच लोक वठवीत असतात.

**उपाय**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने अमेरिका, इंग्लंड सारख्या अती प्रगत देशात आपल्या शाखेतर्फे आदेश द्यावेत की प्रत्येक पालकांनी जास्तीत जास्त अपत्य जन्माला घालावीत. यदा यदा ही धर्मस्य या श्लोकाची आठवण देऊन, देवकीचा जसा आठवा पुत्र श्रीकृष्ण भगवानाच्या रूपात जन्माला आला तसा अमेरिका वा इंग्लंड मधील हिंदू मातेच्या पोटी सातवा वा अकरावा पुत्ररत्न जन्माला येईल आणि जगातील सर्व अधर्माचा नाश करून अखिल भारतीयत्वाचा जगभर प्रचार करेल असा प्रोपोगंडा करण्यात यावा.

(दि. २९ जानेवारी २०१५, अभयराज्य)



# ३. पीएमओच्या परदेश दौऱ्यावर संघाने अंकुश घालावा!

लोकशाहीमध्ये सरकार हे कुटुंबासारखे असते. शासनाचा मुख्याधिकारी म्हणजे माननीय पंतप्रधान हे कुटुंबप्रमुखासारखे असतात. घरातल्या कर्त्या पुरुषाने व्यवसायाच्या दृष्टीने, आर्थिक सुबत्ता वाढविण्यासाठी प्रवास दौरे केलेत तर बायको मुलांची टिका टिपन्नी चालूच असते. पण आपण जो दौरा करतोय त्यातून खरोखर काही निष्पण्ण होते का हे खात्री करणे कुटुंब प्रमुखाचे वरिष्ठांचे काम असते. आपल्या बाबांनी प्रवास दौरा केला तर खरोखर जो प्रवासाचा खर्च झाला त्यापेक्षा दहा–पंधरा पटीपेक्षा जास्त त्यातून उलाढाल होऊन नफा खर्च जाऊन निघायला हवा असा व्यवहार गृहीत धरल्या जातो. आधीच एक अमेरिकन दौरा, भारतीय पंतप्रधानांना घ्यायला अमेरिकेचा शेंबडा अधिकारी विमानतळावर आला असेल. सभा फार मोठी दिसली टिव्हीवर पण सर्व शिष्टमंडळ आणि पंतप्रधानांचा परदेश दौऱ्याचा खर्च तरी निघाला का? आता सप्टेंबरमध्ये पुन्हा एकदा पंतप्रधान अमेरिकेचा दौरा वेस्ट कोस्टला करणार आहेत. मा. संघाने मा. पंतप्रधानांच्या दौऱ्याची शहनिशा करावी. आज विडीओ कॉन्फरसिंग, फोन इत्यादी दूरसंचार सुविधा उपलब्ध आहेत. पीएमओ आधी फोनवरून कॉन्फेरन्स करून सिलीकॉन व्हॅली वे एरियातील सर्व भारतीय पदाधिकाऱ्यांशी शहनिशा करू शकतात. हा दौरा आर्थिकदृष्ट्या संयुक्तपणे भारतासाठी खरोखर चार पैसे मिळवून देईल का हे चेकशुअर करणे आवश्यक आहे. शक्यतो फोनवरून कॉन्फेरन्स करूनच उलाढाली केलेल्या गरीब भारतीयांसाठी योग्य राहील.

**भारतीयांच्या मनातील संघाची इमेज**

काही इतिहासकारांच्या मते राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे संस्थापक माननीय बळीरामजी हेडगेवार हे काँग्रेसचे सर्वेसर्वा राष्ट्रपिता महात्मा गांधी चळवळीशी सुरवातीच्या काळात जुळले होते. पण महात्मा गांधी मुस्लीम समाजाचा आवश्यकतेपेक्षा जास्त अनुनय करतात. असे वाटल्याने मा. हेडगेवारांनी संघाची स्थापना केली. मुस्लीम समाजबांधवांना अनुनय करू नये म्हणजे फिरंग्यांचा अनुनय करावा असा अर्थ होत नाही. माननीय पंतप्रधानांना भूतकाळात अमेरिकेने विजा नाकारला होता. तरीही या आधी पंतप्रधान अमेरिका दौऱ्यावर गेलेत.

स्वाभिमानी हेडगेवारांचे अनुयायी असे करणार नाहीत पण पीएमओ ऑफीसच्या माध्यमातून चुकीचे प्लॅनिंग होतात की काय अशी शंका येते. जवळपास नव्वद वर्षाच्या प्रदीर्घ वाटचालीनंतर तावून सुलाखून निघालेल्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या हाती अप्रत्यक्षपणे सत्ता आली. महापुरूषांची थोरवी ही त्यांना मिळालेल्या यशस्वीतेवर अवलंबनू असते. नागपूर नगरीत जन्मलेले डॉ. बळीरामजी हेडगेवार हे भारतीय महापुरूषांच्या उच्चस्थानी पोहचले आहेत. आज भारत देश जगात प्रथम क्रमांकावर नेण्याची जबाबदारी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची आणि संघप्रणित पंतप्रधानांची आहे. पंतप्रधानांचे परदेश दौरे ऐकून सर्वसामान्यांच्या नाकीनऊ आले आहे, याची संघाने दखल घ्यावी. आमच्या निवेदनाबद्दल आम्ही दिलगीर आहोत. पीएमओने राग मानू नये.

**भारत जगात प्रथम क्रमांकावर जाईल?**

भारताला जगात पहिल्या नंबरवर जायचे असेल तर कंप्यूटर किंवा तत्सम मशीचे हार्डवेअर आणि साफ्टवेअर अती उच्च प्रतीचे प्रोग्रॅम्स भारतात बनणे आवश्यक आहे. आम्ही तंत्रज्ञानाच्या वरच्या पातळीवर ॲप्स प्रोग्रॅम्स प्रादेशिक भाषेत बनविण्यापेक्षा कंप्यूटरचे ओएस प्रोग्रॅम्स, विन्डोज, लिनक्स अँड्राईडचे तत्सम वर्जन प्रॉडक्स भारतीय प्रादेशिक भाषेमध्ये, हिंदीत बनणे अती आवश्यक आहे आणि भारतीयांनी प्रादेशिक भाषेत बनविलेले प्रॉडक्टसची उत्कृष्ठता इतकी उच्च दर्जाची असावी की परदेशातील लोक आमचे प्रॉडक्टस् वापरतील. म्हणजे इंग्रजीचा अप्रत्यक्षपणे भारतातून सुफडा साफ होण्यास मदत होईल आणि परदेशातील विद्यार्थी लोक इंग्रजी भाषा सोडून आमची भाषा लहानपणापासून अवगत करण्याचा प्रयत्न करतील.

बे-एरिया, वेस्ट कोस्ट अमेरिकेत असलेल्या अतीउच्च तंत्रज्ञान असलेल्या कंपनीत वीस टक्क्यांपेक्षा जास्त भारतीय वंशाचे मुळाचे आयटी प्रोफेशनल्स आहेत. या भागातील एकूण आयटी कंम्पनींपैकी पंधरा टक्के कंम्पनींमध्ये भारतीय वंशाचे लोक मुख्य अधिकारी आहेत. भारताची लोकशाही प्रणाली ही अडचणीची भासत असल्याने, स्वच्छ कारभार भारतात नसल्याने, पावलोपावली अडचणी येत असल्याने हा अमेरिकेतील वर्ग भारतात यायला बघत नाही पण पंतप्रधानांनी अमेरिकेतील भारतीय वंशाचे आयटी व इतर तंत्रज्ञान क्षेत्रातील पदाधिकारी आणि भारतातील लोकशाही यंत्रणेशी समरूप, एकरूप, समरस होऊन यशस्वी झालेले उद्योजक यांचा ताळमेळ करून आंतरराष्ट्रीय प्रतीचे प्रॉडक्ट बनविणे आवश्यक



आहे. माननीय राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पीएमओ ऑफीसच्या दौऱ्याची शहनिशा जातीने करावी असे नम्र निवेदन आम्ही करू इच्छितो. परदेश दौऱ्याची चटक लागलेले पीएमओ ऑफीस मधील अधिकारी शिष्टमंडळ सल्लागार प्रत्येक वेळेस बरोबरच असतील कशावरून?

(दि. ३० जुलै २०१५, अभयराज्य)

# ४. बाळासाहेब नसल्याची दरी, स्फोटात बदलेल का?



या जगात सर्वात बलवान, सर्वात बुद्धीमान, सर्वात मोठी न्यायदेवता, सर्वात मोठी श्रीमंत, सर्वात कुशल कारागीर कोणी असेल तर तो आहे निसर्ग निर्माता! हे अंतराळ, पृथ्वी, ब्रम्हांड, इथला प्रत्येक पशू, पक्षी, प्राणी, पंच महाभूते हे सर्व या निसर्ग निर्मात्याच्या अधिपत्याखाली आहेत. या निसर्ग निर्मात्याने सर्व सजीवांसाठी काम, क्रोध, लोभ, माया इत्यादी विकार आणि हिंसाचारी प्रवृत्ती सुद्धा निर्माण केली हे सर्व विकास आणि प्रवृत्ती सजीवांनी मर्यादीत आणि मोजक्या प्रमाणात आवश्यकतोनुसार वापरण्यासाठी निर्माण केल्या. इंग्रजांचे मूळ असलेल्या भारत देशाने स्विकारलेल्या लोकशाही प्रणालीतील केंद्र सरकार, राज्य सरकार, न्यायपालिका, पोलीस यंत्रणा, प्रसारमाध्यमे, शासकीय यंत्रणा यांची गुंतागुंत सर्वसामान्यांना एक मोठी डोकेदुखी ठरत आहेत. सर्वसामान्यांनी प्रामाणिकपणे काही करतो म्हटले तर ही लोकशाही प्रणालीची गुंतागूंत एक अडथळ्यांचे राज्य म्हणून सिद्ध होते. शासकीय, निमशासकीय, खाजगी यंत्रणेतील काही अधिकारी नियमावलीचा उपयोग ग्राहकांचे कामात अडथळे उभे करण्यासाठी करतात.

**मोजक आणि मर्यादित हिंसाचार आवश्यक ?**

असे विविध प्रकार बाळासाहेबांनी हेरले होते. बाळासाहेबांनी तरूणांच्या मनातील निराशा आणि खुमखूमी हेरली होती. त्यामुळे त्यांनी तुरळक हिंसाचाराचा हिरहिरीने पुरस्कार केला असे जानवते. साऊथ इंडीयन लोकांच्या प्रभावाखाली असलेल्या मुंबईतील कार्यालयांमध्ये मराठी तरूणांना नोकऱ्या मिळत नव्हत्या. साऊथ इंडीयन तरूणांना नोकरीवर आधी घेतले जात होते आणि नंतर बायोडेटा



रिझूमी मागविली जात होते. कार्यालयात अर्जावर अर्ज तक्रारीवर तक्रारी, सतरा हेलपाटा हे काही काम करीत नव्हते. अशा हेकड मनोवृत्तीवर तुरळक हिंसाचार म्हणजेच झुंडशाही वा गुंडशाही काम करू शकली.

**नवीन सरकारसमोरचे आव्हान**

परिस्थिती अजूनही बदललेली नाही समजा जर नवीन सरकारला खरोखर भारतात परिस्थिती बदलायची असेल तर कॅलकुलेटेड आणि कंट्रोल्ड पद्धतीने हिंसाचाराचा उपयोग कसा करावा याची नियमावली बनवून मर्यादित प्रमाणात तरूणांच्या हातात कायदे देणे आवश्यक आहे. तोंडाला काळे फासणे, उठबशा करायला लावणे, बहिष्कार टाळणे, तुरळक शारीरिक इजा झाल्या तरी ऑन द स्पॉट शीघ्रतेने प्रश्न सोडविले जाऊ शकतात. हे झाले टेंप्ररी उपाय दीर्घकालीन उपायांसाठी मग आपली १७७४ मध्ये ब्रिटीशांनी स्थापना केलेली न्यायपालिका आहेच. याशिवाय भारतीयांसाठी काही पर्याय दिसत नाहीत. नाहीतर भारताचा उद्धार याआधीच झाला असता. अल्पकालीन आणि दीर्घकालीन उपाय टप्प्याटप्प्याने अमलात आणणे जरूरी आहे.

विद्यमान न्यायपालिकेचे निर्णय, त्यांचे कामकाज हे पुरावे आणि साक्षींवर आधारले असते. हे पुरावे आणि साक्षी पैसे वा मोबदला देवून बदलेले जातात. त्यामुळे न्यायाधीश महोदय जरी प्रामाणिक असेल तरी न्यायपालिका आणि पोलीस यंत्रणेची गुंतागूंत न्यायपालिकेला पुरेशी यशस्वी होऊ देत नाही. पिक्चरमधील हिंसाचारामुळे हिंसाचार वाढतो असे म्हणण्यापेक्षा अंशतः निःष्प्रभ अपयशी ठरलेल्या न्यायपालिकेमुळे हिंसाचार असलेले पिक्चर सपाटून चालतात ही वस्तूस्थिती आहे. एकदा कोणी कोर्टाच्या पायरीवर पाय ठेवला की तो त्या चक्रातून सुटत नाही हे सर्वांनाच माहीत आहे. १८५० च्या काळात लिहिलेल्या पुस्तकांमध्ये पेशव्याच्या काळात खोटी साक्ष द्यायला लोक घाबरत होते पण इंग्रजी न्यायपालिकेत सर्रासपणे खोटी साक्ष दिली जाते असा उल्लेख आढळतो. सक्षम न्यायपालिकेसाठी न्यायपालिकेचे वार्ड पातळीवर विकेंद्रीकरण आवश्यक आहे. पूर्ण नव्याने वार्ड पातळीवर न्यायपालिकेची कायदेशीररित्या बांधणी केली तर गावकऱ्यांचे छोटे मोठे वाद सुद्धा तडकाफडकी तिथेच सोडविले जातील, गावकऱ्यांचा सलोखा वाढेल, सामंजस्य वाढेल त्यामुळे भारतीयांमध्ये गावकऱ्यांमध्ये संघटनात्मक वृत्तीला प्रोत्साहन मिळेल. भारतीयांच्या मनोवृत्तीनुसार जुन्या पारंपारिक सिस्टमचे सद्गुण आणि इंग्रजांनी चालू केलेल्या न्यायपालिकेचे

काही सूत्रांचा मिलाप आवश्यक आहे.

**बाळासाहेब हुकूमशाहीचे पुरस्कर्ते**

बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारातून हे हुकूमशाहीचे पुरस्कर्ते असल्याचा अभ्यास होतो. भारतीय लोकशाही प्रणालीतील गुंतातुंत, राज्य सरकार, केंद्र सरकार, न्यायपालिका, पोलीस यंत्रणा, यंत्रणेच्या शाखा आणि वरून अर्धवट अभ्यास असलेली पाश्चीमात्य मनोवृत्तीची प्रसारमाध्ये यांच्यातून असामंजस्य भारताला दिवसेंदिवस खोकली करत आहेत. त्यामुळेच काही सर्वसामान्यांपासून ते राजकीय पुढाऱ्यांपर्यंत भारताला प्रखर राष्ट्रवादी हुकूमशहाच तारू शकतोअसे सुमडीत मान्य करतील.

(दि. २० डिसेंबर २०१४, अभयराज्य)



# ५. राष्ट्रीय ग्रंथ भारतीय संविधान की भगवद्गीता?

भगवान श्रीकृष्णांनी अर्जुनाला भगवद्गीता सांगितली त्याला ५१५१ वर्ष पूर्ण झालीत! भारतवर्षामध्ये खूप काही ग्रंथ लिहिल्या गेले त्यात धर्मग्रंथांचा सुद्धा समावेश आहे. अंतीम राष्ट्रीय ग्रंथ कोणता हा वादाचा विषय! १९४७ मध्ये भारत स्वातंत्र्य झाल्यानंतर १९५० मध्ये भारतीय संविधान लिहिल्या गेले. भारत देश राष्ट्र म्हणून त्या आधीपासून (१९५० च्या आधी) अस्तित्वात होते की नाही? अमेरिका तथा युरोपीयन देशांचे अनुकरण करून लोकशाही प्रणाली तसेच संविधान अंमलात आणल्या गेले. या संविधानाच्या माध्यमातून कायद्याचे आदर्श राज्य भारतात येईल, भारतीयांची मानसिकता शिस्तबद्ध गोऱ्यांसारखी बदलेल आणि भारत जगात प्रथम क्रमांकाचे राष्ट्र होईल असे स्वप्न, आपल्या महापुरूषांनी बघितले. काही भारतीय लोकांची कामचुकार, भ्रष्टाचारी पाय खेचण्याची वृत्ती बदलणे शक्य नसल्याने, उद्या जाऊन भारतीय संविधानच बदलावे लागेल की काय अशी शंका उत्पन्न होते.

**शेतकऱ्यांच्या आत्महत्यांवर भगवद्गीतेचाच प्रभाव!**

सत्तारूढ पक्ष असो वा विरोधी पक्ष कोणीही सत्तेवर बसला, कितीही आदळ आपट केली तरी आर्थिक विषमता समूळ नष्ट करणे शक्य नाही. अमेरिकेतही भिकारी आढळतात. औद्योगीकरण, तंत्रज्ञान विकासातून स्पर्धा निर्माण झाल्यात जास्तीत जास्त सुख लोलुपतेसाठी मानव धडपडत आहे आणि स्वतःचे खरे अस्तित्व घालवून बसला आहे. कर्जामुळे माझी शेती जाईल, घर जाईल, माझे कर्ज वाढून मी रस्त्यावर येईल यातून निराशा येऊन शेतकरी आत्महत्या करीत आहे. दूध म्हणून पिठाचे पाणी बाळ अश्वत्थामाला देणारा द्रोणाचार्य, कंदमुळे खाऊन जगणारे ऋषीमुनी, कठीण परिस्थितीत फुले, फळे, झाडपाला, रानचारा खाऊन जगणारा सशक्त मानसिकता असणारा प्राचीन भारतीय मानव आत्महत्येचे विचार मनात आणणारे शेतकरी विसरुन गेले आहेत.

**आमदारांना आवाहन**

सत्ताधारी व विरोधी आमदारांनी ठरविले तर सहा महिने ते एका वर्षात पूर्ण आत्महत्या बंद होतील. आमदारांनी आपल्या क्षेत्रातील प्रत्येक प्रवचनकाराला, किर्तनकारांना, मंदिरवाल्यांना कलाकारांना विश्वासात घेवून दिशा ठरवून द्यावी. जे

आहे त्यात समाधान मानणे, जी परिस्थिती स्वतःवर भविष्यात येईल त्याला धैर्याने सामोरे जाणे, शेतीतून उत्पन्न झालेच पाहिजे अशा प्रबळ अपेक्षा न ठेवणे, मानसिकदृष्ट्या शेतकऱ्यांना सशक्त बनविणे अशी दिशा प्रवचनकार आणि किर्तनकार गोंधळी कलाकार यांना देऊन मानसिक सशक्तीकरणाचा माहोल मा. आमदार सहज निर्माण करू शकतात. प्रवचनकार, किर्तनकार, गोंधळी कलाकार सर्वांचा उद्देश हा शेतकऱ्यांना आत्महत्येपासून परावृत्त करावे हा असावा. स्वतःला हुशार समजणारे अर्धवट नॉलेज असलेले प्रसारमाध्यमे अडथळे आणू शकतात तिकडे दुर्लक्ष करावे.

(दि. १८ डिसेंबर २०१४, अभयराज्य)



# ६. ... आणि पंतप्रधान मोदी झाले कन्फ्यूज?

पंतप्रधान मोदी यांचे मिशन दिल्ली फेल व्हायला महत्वाचे एकच कारण म्हणजे मीडियामधून हा फिरणारा संदेश.

बीजेपी एक स्थापित पार्टी है, आप सभी संघर्षरत है. बीजेपी को वोट देने के तो बहुत मौके रहेंगे. अगर आप का शासन पसंद न आए तो पांच साल बाद फिर जिता देंगे बीजेपी या कांग्रेस को पर सीमित संसाधनों में केजरीवाल और उनकी टीम ने जो संघर्ष किया है, उन्हें इसका इनाम अभी मिलना चाहिए. मैं यह नहीं कहता कि आम आदमी पार्टी मेरे सपनों की पार्टी है, लेकिन मैं इस बात को लेकर सुनिश्चित हूं कि वह बीजेपी और कांग्रेस से कही बेहतर है. पूरे देश में एक ही पार्टी का राज होता है तो निरंकुश सत्ता की गुंजाइश बनने लगती है. इसलिए बीजेपी के विजय रथ को दिल्ली में रोकने की जरूरत है, ताकि चेक एंड बैलेंस बना रहे. गांधी के मुल्क में आंदोलनों के प्रति आशावाद को जिंदा रखने के लिए भी केजरीवाल को जितना चाहिए. अगर वह नहीं जीता तो हमारे सपनों का बोझ उठाने के लिए कोई सिरफिरा भी कभी इस देश में खड़ा नहीं होगा. तब चुनते रहना बारी–बारी से, बीजेपी और कांग्रेस को!!!

निवडणूकीच्या शेवटच्या टप्प्यात हा संदेश लोकांची मने पालटून गेला. ही वरून आप वाल्यांना विजय आणि मोदींचा पराभव दिसत असला तरी लोकशाही वरील विश्वासाचा पराभव आहे. कोणताही पक्ष सत्तेत येवो, कितीही ढुंगी आपटून काम केले तरी विशेष काहीच करू शकत नाही. (राज्यकर्ते आणि सामान्य लोक यामध्ये असलेली लोकशाही यंत्रणेचे दहा पंधरा स्तर तर बदलत नाहीत आणि या मधल्या स्तरांकडून काम करून घेणे म्हणजे महाकठीण काम.)

आज मोदी ने अपने रैली में मौजूद लोगों से पूछा मित्रों ७ तारीख को किसे वोट देना है???

वहाँ मौजूद जनसमूह ने कहा, आप को... मोदी कंफ्यूज...!!!

एखाद्या गोऱ्याने लोकशाहीची व्याख्या बनवायची, ज्या गोऱ्यांचा तिनशे चारशे वर्षाचा अनुभव नाही इतिहास नाही, त्यांची लोकशाही संकल्पना कॉपी करायची म्हणजे असेच व्हायचे! भारतात विद्वान होऊन गेलेतच कुठे?

गोऱ्यांची परिस्थिती आणि मानसिकता वेगळी आहे. भारताला जर बलाढ्य होऊन जागतिक नेतृत्व करायचे असेल तर बहुसंख्य भारतीयांच्या मनाचा वेध घेऊन नव्याने लोकशाही आणि संविधानाची फेररचना आवश्यक आहे. शासकीय यंत्रणा, मीडिया, राज्यसरकार, केंद्रसरकार, पोलीस यंत्रणा आणि १७७४ मध्ये इंग्रजांनी स्थापना केलेली न्यायपालिका यामधील सर्व अधिकाऱ्यांचा तंतोतंत समन्वय साधने सध्याच्या कायदेप्रणालीत अशक्य आहे. तोपर्यंत जनतेने दिल्लीच्या निवडणूकीसारखा जुगार खेळत रहावा हाच पर्याय आहे.

(दि. १२ फेब्रुवारी २०१५, अभयराज्य)



# ७. डॉ. दिलीप शिवरकर यांची अटक ही दुर्भाग्यपूर्ण!

ब्रिटीशांनी भारतावर दिडशे वर्ष राज्य केले. ब्रिटीशांनी भारतावर कब्जा घेण्यापूर्वी भारतीय लोक आपसात भांडण होते. आजही भारतीय लोक आपसातच भांडत आहेत. याच ब्रिटीशांचे पूर्वज अमेरिका खंडात गेले. त्यांनी तेथील आदिवासी लोकांना (रेड इंडीयन) संपविले आणि आपली सत्ता स्थापन केली हाच तो आजचा अमेरिका! अमेरिकन लोकांनी एकजूटीच्या भरोशावर, एकसंघपणे, पूर्णतः देशाच्या भल्यासाठी समरस होण्याच्या अमेरिकन नागरिकांच्या वृत्तीने प्रचंड प्रगती केली आणि अमेरिका हा महासत्ता बनला. अमेरिका आणि पाश्चिमात्याच्या प्रगतीमुळे भारतीय राज्यकर्ते इतके प्रभावित झाले की पाश्चिमात्यांच्या कायद्याचे अंधाधुंद अंधानुकरण करणे सुरू केले. त्यातले एक मोठे उदाहरण म्हणजे गर्भपाताचे कायदे.

भारतीय संस्कृती ही फार जूनी आहे. पाच–सहा हजार वर्षे जूनी असलेली संस्कृती! कितीतरी वैचारिक स्थित्यंतर सहन करून गेली आहे. आमची संस्कृती शतकानुशतके बरेच वैचारिक आणि बौद्धिक बदलातून, वैचारिक बौद्धिक चढउतार सहन करून गेली आहे. त्या काळात तर अमेरिकेत फक्त जंगल होते. लोक राहत होते की नाही याचा पत्ताही नाही. अशातच आयुर्वेद हा आमच्या पूर्वजांनी शोधलेला वैद्यकशास्त्र प्रगत झाला. विविध कालखंडात आयुर्वेदावर अभ्यास केला गेला.

बाळ जेव्हा जन्माला येतो तेव्हा त्याची टाळू (डोक्याचा मध्यभाग) हे नरम असते. आईच्या पोटात असताना बाळाचे डाके हे कडक होत जाते पण टाळूचा भाग हा पूर्ण भरत नाही. बाळाचा जन्म होऊन तो बाहेर आल्यानंतर टाळूचा भाग कडक व्हायला बरेच महिने जातात. कधी आपण याचा विचार केला की का असं होते? देवाने वा निसर्गाने हे असे का करावे? जसे तोंड अन्न खाण्यासाठी, नाक श्वसनासाठी, कान ऐकण्यासाठी, डोळे बघण्यासाठी मग बाळाचा डोक्याचा सर्व भाग कठीण पण टाळूचा किंचीतसा भाग देवाने नरम का ठेवावा? स्त्री प्रसूत होताना बाळ जेव्हा उदरातून बाहेर येतो ती क्रिया ही कठीण असते. जसे आपण एखाद्या पाईपमधून एका टोकातून घुसून दुसऱ्या टोकातून बाहेर निघतो इतकी सोपी नसते. बाळ पहिले एका बाजूवर होऊन अर्धा घुमतो नंतर बाळाला बाजू

पलटावी लागते (माणूस जसा उबड्या पोजीशन वरून उतान्या पोजीशन वर होतो तसा) आणि त्यानंतरचा तो बाळ पुढे सरकू शकतो आणि त्यानंतर तो बाहेर येतो. तो बाळ आहे, कधी त्याने बाजू पलटली, नाही पलटली तोपर्यंत बाळंतीन बाईला पूर्ण त्रास सहन करावा लागतो. कधी कधी बाळ अडकूनच राहिला तर बाळ आणि आईचा मृत्यू होऊ शकतो. सहसा बाळ डोक्याकडून बाहेर येतो. आयुर्वेदात उल्लेख केल्याप्रमाणे बाळ बाहेर यावयाला खूपच कठीण असेल, बाळंतीन स्त्रिया मृत्यू ओढवियाची शक्यता असेल, तर खूच कठीण असेल, तर हुकासारखा (काहीसा इंग्रजी एल आकाराचा) हत्यार बाळाच्या टाळूत खुपसतात आणि बाळाला मारून बाहेर काढतात. या क्रियेत कमीत कमी बाळंतीन बाईचे प्राण वाचते. दुर्गम भागात, जंगल खेड्यात, जिथे सिझरिंग (सी सेक्शन) ऑपरेशनची व्यवस्था नाही तिथे ही क्रिया अजूनही अवलंबली जाते. यात वावग काही नाही. बाळाची नरम टाळू ही निसर्गनिर्मित आहे आणि सिझरिंग ऑपरेशन हे मानवनिर्मित आहे. जेव्हा देवाने वा निसर्गाने टाळू नरम ठेवली म्हणजे निसर्गनियमानुसार जोपर्यंत बाळ बाहेर येत नाही तोपर्यंत आपला नाही. तुमच्याकडे पर्याय नसतील तर तुम्ही बाळाला पोटातच मारून टाकू शकता असे निसर्ग वा देव अप्रत्यक्षपणे सांगत आहे. देवानी बनविलेले नियम हा आयुर्वेदातील तज्ञांनी मान्य केले होते. अमेरिकन पाश्चिमात्यांनी नियम बनविलेत की तीन महिण्यानंतर जर गर्भपात केला तर ती हत्या. आमच्या राज्यकर्त्यांनी स्वतःच्या पूर्वजांचा त्यांनी बनविलेल्या संस्कृतीचा अभ्यास केला की नाही भगवान जाने!

अमेरिकन पाश्चिमात्य तर्क वितर्क काढण्यात हुशार आहेत. पण त्यांनी सांगितलेल्या सर्वच गोष्टी बरोबर असतील कशावरून? अमेरिकन पाश्चिमात्यांनी म्हटले गर्भ तीन महिण्यापेक्षा मोठा झाला तर ती हत्या, आमच्याही राज्यकर्त्यांनी त्याचे अनुकरण करायचे आणि कायदे बनवायचे. भारत, भारतीय, भारतीयांचे पूर्वज, त्यांची संस्कृती, आयुर्वेद त्याहून निसर्गाचे अस्तीत्व नसल्यासारखे! पाश्चिमात्यांनी, विज्ञानाने प्रचंड प्रगती केली. सिझरींग ऑपरेशन शोधून काढले. कितीतरी अतीआवश्यक औषध शोधून काढलीत, लसी शोधून काढल्यात इ. पण एवढी प्रगती नाही केली की मरण पावलेल्या व्यक्तीला जिवंत करतील किंवा असे औषध नाही काढले की मनुष्याला अमर करतील. असे औषध अजूनही नाही निघाले की मानवाच्या शारीरिक पेशी वृद्ध होणार नाहीत आणि मानवाला वृद्धत्व येणार नाही. मग हे अमेरिकन पाश्चात्य लोकांनी काढलेले तर्क देवापेक्षा



किंवा निसर्गाच्या नियमापेक्षा मोठे झाले का?

स्त्री पुरुष जेव्हा झोपतात, शारीरिक संबंध ठेवतात, स्त्री आणि पुरुषांचे शुक्राणु एकत्र येतात, त्यावेळेस जीव निर्मितीची प्रक्रिया चालू होते. जर अमेरिकेने ठरविले की जन्मतारीख बाळाची ही स्त्री पुरूष एकत्र झोपण्याची आहे तर भारतीय राज्यकर्ते, भारतीय मेडीकल कौन्सील आणि भारत सरकार त्याचेही अनुकरण करायला मागेपुढे पाहणार नाहीत. पाश्चिमात्य लोक वा मानव देवापेक्षा किंवा निसर्गापेक्षा मोठे झाले काय? जीवनाचा अर्थ हा भगवद्गीतेत सांगितला आहे. यात भगवद्गीतेच्या भरोशावर भारतीय आध्यात्मिक गुरू पाश्चिमात्य इंग्रजी मानसिकतेवर प्रभुत्व गाजवित असतात. मायक्रोसॉफ्टचे बील गेट्स, ओऱ्याकल कंपनीचे लॅरी एलीसन हे आध्यात्मिकरित्या झेन या आध्यात्मिक चळवळीला जुळले आहेत. मुळात झेन ही चळवळ जापानमधील जी बुद्धिष्ट संप्रदायाशी जुळली आहे. बौद्धाचे मूळ हे भारतात आहे. आयफोनवाल्या ॲपल कंपनीचा मूळ संस्थापक स्टिव जॉब्स हा त्याच्या तरूण वयात मनाच्या शांतीचा शोध घेत हिमालयात आला होता. अशा या भगवद्गीतेच्या साख्ययोग श्लोक क्र.३४ नुसार भगवान श्रीकृष्ण अर्जुनला सांगतात की सन्मान्य व्यक्तीसाठी दुःष्कीर्ती ही मृत्यूपेक्षाही भयंकर आहे. हेच अनुसरण आमचे पालक करीत असतात. तारूण्याच्या ओघात, वाढत्या वयात मुला–मुलीने चूकी केली, विवाहाच्या आधी जर मूल व्हायची पाळी आली तर गर्भपाताकडे वळतात. पाश्चिमात्यांच्या अंधानुकरणामुळे आपले कायदे चुकीचे आहेत, मनात एक आणि करतो एक अशी परिस्थिती झाली आहे. गर्भपाताची पाळी न्यायाधीशाच्या मुलीवर वा मंत्र्याच्याही मुलीवर येऊ शकते. आपल्याच पायावर कुऱ्हाड मारून ठेवली आहे. कायदे सांगत असले तरी भारतीय जनमानस हा भारतीय संस्कृतीला धरून एक दुसऱ्याला मदत करण्याचा प्रयत्न करतात. महाभारतातील कर्णाच्या आई कुंतीनं विवाहापूर्वी बाळ झाल्याने समाजाच्या भीतीपोटी नदीत फेकून दिले होते. आमचे लोक महाभारत आणि पांडव विसरलेत काय? बरेच डॉक्टरसुद्धा पैशासाठी नाही तर संस्कृतीला धरून मुलीची वा पालकाची बदनामी टाळण्याकरिता जिवावर उदार होऊन कायद्याविरूद्ध जाऊन मदत करतात.

**गर्भपातासाठीचे जाचक कायदे**

गर्भातील बाळ तीन महिण्यापेक्षा जास्त मोठे झाले असेल तर जिल्ह्याच्या सिव्हील सर्जनची परवानगी मिळवा आणि सरकारमान्य रूग्णालयात गर्भपात करा

असा सरकारी आदेश आहे. सिव्हील सर्जनची परवानगी मिळवायची असेल तर त्या ऑफीसमधील चपराशापासून, डॉक्टर इ. सर्वासमोर पोपो करावा लागतो. सरकारमान्य इस्पीतळात गर्भपात करतो म्हटले तर अख्ख्या दुनियेला माहीत होते. वाघ–बिबटे खेड्यात घुसून गरीब लोकांना जिवानीशी मारतात त्यांना तिथे सरकारला काही करता येत नाही पण त्यांना जिथे आवश्यक नाही तिथे हस्तक्षेप व्हावा असे कायदे केले आहेत. आधीच गर्भपिडीत मुलीचे आई–वडील नातेवाईक दुःखात असतात आणि त्यात कायद्याचा हा चुकीचा हस्तक्षेप, मुलीला, आई–वडीलांना त्यांची फिकीर असते, त्यांना त्यांचे करू द्यावे. काही पेटेंट आणि डेंटेड लोकांनी सरकारी खूर्चीत बसून चुकीचे कायदे, जे सर्वसामान्यांना दुःखात टाकतील असे करू नये. वरून भारतातील शासकीय यंत्रणा भ्रष्टाचाराने बोकाळलेली असल्याने अनौरस गर्भपातासाठी लागणारी कायदेशीर कार्यवाही गुपीत ठेवून पार पाडणे सर्वसामान्यांना शक्य आहे काय? गर्भधारणेच्या तीन महिण्यानंतर गर्भपात तर आईच्या जीवाला भीती असते. जसे जसे गर्भधारणेच्या कालावधी वाढतो तशी तशी आईच्या जिवाला भीती वाढत जाते. नवव्या महिण्यात तर परत जास्त भीती! मग जी प्रसुती वा प्रजननाची क्रिया आहे त्यावरच बंदी आना ना!

**डॉ. शिवरकर खरोखर दोषी आहेत का?**

डॉ. दिलीप शिवरक हे ढिवर समाजाचे! जेव्हा डॉ. दिलीप शिवरकर एमबीबीएस शिक्षण घेत होते. त्यावेळेपासून समाज चळवळीशी जुळलेले! ढिवर समाजाच्या भल्यासाठी, जागृतीसाठी ते नेहमीच पुढाकार घ्यायचे, अजूनही घेत आहेत.

खडसंगी चिमूर जवळ एका ढिवर समाजाच्या मुलीवर अन्याय झाला, तिला पळवून नेऊन मारून विहीरीत टाकण्यात आले. आपल्या समाजाच्या मुलींवर अन्याय झाला म्हणून ते पुढे आले. त्यांनी (डॉ. शिवरकर) मृत मुलींच्या पोस्टमार्टमचे डिटेल पोलीसांच्या मदतीने सापळा रचून डॉ. शिवरकर यांना आंधळ्या कायद्याच्या कचाट्यात पकडले. ही खूप दूर्भाग्यपूर्ण बाब आहे. एखाद्या मुलीला गर्भपातासाठी डॉ. शिवरकरकडे नेणे, त्यांच्यासमोर मदतीसाठी याचना करणे, पोलीसांची सेटींग करून ठेवणे, पत्रकारांची सेटींग करून ठेवणे आणि डॉ. शिवरकर यांना रंगेहाथ पकडणे हे पूर्वनियोजित कारस्थान होते हे सहज समजण्यासारखे आहे.



ढिवर आणि भोई लोकांनी एकत्र येऊन त्यांना पाठबळ देणे हे आमचे कर्तव्य ठरते. सर्वसामान्य जनतेने चुकीच्या कायद्याचा विचार करून आमची संस्कृती ध्यानात घेऊन डॉ. शिवरकर हे खरोखरच दोषी आहेत का हे समजून घेणे महत्वाचे आहे. भारतीय संस्कृतीप्रमाणे विवाहाच्या आधी शारीरिक संबंध ठेवणे वा कोणी अशा गोष्टींना प्रवृत्त करीत असेल तर त्यांना कायद्याने शिक्षा करणे उचित ठरेल. पण चुकीने गर्भधारणा झाली तर गर्भपात करणे गुन्हा ठरू नये, हे ठीक राहील. पाश्चात्य देशात अनौरस (बायलॉजीकल बाप माहित नसलेल्या) मुलांची संख्या खूप असते आणि आहे. त्यांच्या संस्कृतीत ते चालते. पण आमच्याकडे तसे बिलकूल चालायला नको. अमेरिकन वा पाश्चात्य देश आपली घानेरडी संस्कृती ते चालते पण आमच्याकडे तसे बिलकूल चालायला नको. अमेरिका वा पाश्चात्य देश आपली घानेरडी संस्कृती प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष भारतावर सोपविण्याचा प्रयत्न करतात आणि आमचे आपआपसात भांडणारे राज्यकर्ते स्वतःच्या व्यक्तीगत स्वार्थासाठी भारतीयांवर थोपवीत आहेत आणि भारताला चुकीच्या दिशेने नेत आहेत.

डॉ. शिवरकर हे स्वमेहनतीने, स्वकष्टाने पुढे आलेले व सामाजिक जाण असलेले डॉक्टर आहेत. केवळ त्यांना रोजगारापासून वंचित ठेवण्याचा नाही तर त्यांचे कुटूंब देशोधडीला लावून सामाजिक अत्याचार करण्याचा हा प्रकार आहे तो कुठेतरी बंद झाला पाहिजे अन्यथा ह्या बाबतीत आम्हांस सामाजिक आंदोलन करावे लागेल.

प. बंगाल किंवा बाहेर राज्यातून केवळ १०वा वर्ग शिकलेले तिकडे कंपाउंडरचे काम करणारे मुल आज ही चंद्रपूर आणि इतरही जिल्ह्यात खेडेगावात दवाखाने थाटून रूग्णांच्या जिवाशी खेळ करतात. त्यांचेवर मात्र पोलीस/शासन यंत्रणा काहीही करीत नाही. त्या डॉक्टरांना त्यांचे वैद्यकीय रजिस्ट्रेशनची सेवा देण्यापासून परावृत्त करण्यासारखे प्रकार योग्य वाटत नाही.

आमच्या समाजाचे वतीने प्रथम विनंती राहील की डॉ. शिवरकर यांचेवरील कार्यवाही मागे घेऊन त्यांना वैद्यकीय सेवा पूर्ववत जनसेवेकरीता सुरू ठेवण्यास परवानगी देण्यात यावी.

# ८. देशभक्ती गीताने भारत काय साध्य करेल?

मित्रांनों, १५ ऑगस्ट आपला स्वातंत्र्य दिन त्या निमित्त सर्व देशवासी व्हाट्सअपवर शुभेच्छा देत आहेत. देशभक्तीपूर्ण जोशीले गाण्यांच्या धून फोनवर रिंगटोन सेट करा म्हणून सांगत आहेत. जोशपूर्ण देशभक्तीवर गाणे ऐकून आपण काय साध्य करणार आहोत? फक्त अंगात जोश आणून काम भागणार नाही. आपल्याला स्वतःला, देश आणि देशाच्या लोकशाही प्राणालीत बदल केल्याशिवाय आपण जागतिक स्पर्धेत अग्रक्रमावर जाणे अशक्य आहे. काही ढोबळ मानाने आणि आपणा सर्वांसाठी अंमलबजावणीयुक्त उपाय सांगण्याचा प्रयत्न करीत आहोत.

**स्वदेशीचा वापर**

भारतीय उद्योजकांनी चांगल्या प्रतीचे, अती उत्कृष्टता असलेले प्रॉडक्टस् बनवावे. भारतीयांनी भारतीय, उपभोक्त्यांनी, शासकीय यंत्रणेने आपआपल्या परीने भारतीय उद्योजकांसोबत समन्वय साधावा आणि उत्कृष्ठता वाढविण्यास हातभार लावावा. उत्कृष्ठता इतकी असावी की परदेशी लोकांनी भारतीयांची प्रॉडक्टस् वापरावीत. पुरुषांचे शेविंग क्रीम असो स्त्रियांचे सौंदर्य प्रसाधने असो, मोबाईल असो वा कंप्यूटर स्वदेशी प्रॉडक्टस् उच्च प्रतीचे असणे आवश्यक आहे.

**कार्पोरेट संस्कृती समजणे आवश्यक**

समजा आपल्याकडे एक्स्ट्रा ऑडनरी आयडीया असली तरी त्यांच्या अंमलबजावणीसाठी लागणारे कौशल्य अती आवश्यक असते. गुंतवणूकदार शोधणे, पैसा उभा करणे, अती आवश्यक असते. स्कील्ड वर्कर शोधणे, एम्प्लाई लोकांना हाताळणे, काम करुन घेणे, उद्योग उभा करून जागतिक प्रतीची उत्कृष्ठता असलेल्या प्रॉडक्टस् बनविणे, अंतरराष्ट्रीय बाजारात यशस्वीपणे विकणे, गुंतवणूकदारांना व स्वतः नफा कमविणे, या सर्व गोष्टी आपल्याला जमणे आवश्यक आहे. तक्रार करणाऱ्यांना इथे वाव नाही.

**इंग्रजीचा सुफडा साफ करा**

न्यायपालिकेपासून शासकीय यंत्रणेतील सर्व व्यवहार प्रादेशिक भाषेत व्हावे,



कायद्याची तंत्रज्ञानाची, वैद्यकशात्राची पीएच.डी., पोस्ट ग्रॅज्यूएट लेवलची सर्व पुस्तके प्रादेशिक भाषेत, मराठीत, हिंदीत उपलब्ध व्हावी. फोनचे कंप्यूटरचे हार्डवेअर, साफ्टवेअर, आपरेटिंग सिस्टम प्रादेशिक भाषेत भारतीयांनी तयार करावेत. आपण इंग्रजी शिकण्यापेक्षा फिरंगी आपली भाषा कसे शिकतील हा प्रयत्न व्हावा.

**उच्चस्तरीय वैद्यकशास्त्राची पुनर्रचना**

एमबीबीएस वा अ‍ॅलोपॅथी ही युरोप अमेरिकेतील आहेत. जगात भारतीय एमबीबीएस डॉक्टरांची उत्कृष्ठता अग्रक्रमावर आहे. फिरंगी पॅथीचा अती अभिमान न बाळगता आयुर्वेद आणि अ‍ॅलोपॅथीचा समन्वय साधने आवश्यक आहे. आमच्या लहानपणात आम्ही वर्षा चार वर्षातून एखाद वेळी बिमार पडत होतो. आता आमची मुले महिन्या चार महिन्याला बीमार पडत आहे. अ‍ॅलोपॅथी औषधे, सल्फेटचे प्रॉडक्ट्स मानवी शरीराची क्षमता कमजोर करीत आहे. जगात अग्रक्रमी असलेल्या भारतीय एमबीबीएस डॉक्टरांनी, मेडीकल कंपन्यांची आयुर्वेदाचा ही अभ्यास करुन समन्वय साधून नवीन जागतिक दर्जाची संशोधने करावीत. अती उत्कृष्ठता असलेली झिरो टॉलरेन्स असलेली संशोधने आपल्या डॉक्टरांच्या हातातून घडली आणि जागतिक स्तरावर त्याची मार्केटींग करून परदेशातील गंगाजळी भारतात येऊ शकते.

**संविधानात बदल**

आपण संविधानाची कल्पना अमेरिका युरोपियन देशाकडून घेतली. तिथे प्रत्येक माणूस लोकसंख्येपैकी ९० टक्के लोक एक दुसऱ्याच्या कामात अडथळे आणत नाहीत. यंत्रणेतील प्रत्येक स्तरात समन्वय ताळमेळ चांगला आहे. सामान्य कामगारापासून, ठेकेदार, अधिकाऱ्यांपासून मंत्र्यांपर्यंत कामचुकारपणा नाही. आपआपल्या जबाबदाऱ्या स्वच्छ मनाने पार पाडतात. आपल्याकडे भारतात तसे होणे शक्य नाही. त्याला अनुसरुन संविधानात बदल आवश्यक आहे.

**न्यायपालिकेतील बदल**

आपली विद्यमान न्यायपालिका आपलया भूमीतील नाही, आपल्यासाठी गरीब सर्वसामान्यांसाठी उपयोगी नाही. विद्यमान न्यायपालिकेचे विकेंद्रीकरण करून जुन्या पत्रतीची न्यायपंचायत सिस्टम, सरपंच स्तरावर उभी करणे आवश्यक आहे. गावातील बुजूर्ग स्वच्छ प्रतिमेच्या लोकांना न्यायपालिकेत कायदेशीररित्या

सामावून घेतले तर कोणी खोट्या साक्षी देणार नाहीत, गाव स्तरावरच न्याय जलदगतीने तडकाफडकी मिळेल.

### शैक्षणिक बदल

शिक्षणाच्या व्याख्येचाही घोळ आहे. शालेय शिक्षण म्हणजे शिक्षण? नोकरी वा उद्योग करायला जातो तेव्हा येणारा अनुभव हा शिक्षण? कौटुंबिक जबाबदाऱ्या सांभाळण्याची कुशलता हे शिक्षण? शिक्षणाचा उद्देश काय? पैसा कमविणे वा सुख शांती समाधान! यातच मोठा घोळ आहे. कचऱ्यासारख्या इंजिनीअरच्या डिग्री घेवून विद्यार्थी बोंबलत आहेत. शैक्षणिक पीएचडी वाले, पोस्ट ग्रॅज्यूएट माशा मारत बसणार आहेत. ग्रॅज्यूएट युवकांची तर खैरच नाही. खरं बघितले तर लहानपणापासून शेत पिकविणारा शेतकरी ज्यांचा वर्षानुवर्षाचा अभ्यास आहे. जमीनीचे, पिकण्याच्या प्रोसेसचे बारकावे माहीत आहे तो पिएचडी म्हणता येईल? फक्त शालेय डिग्री मिळवायची म्हणून मिळवायची हे चूकीचे आहे. शालेय अकॅडेमिक शिक्षणाचा वापर नोकरी, धंद्यापाण्यासाठी कसा होईल त्यानुसारच आपण अकॅडेमिक शिक्षण घेतलेले ठीक. विनाकारण डिग्र्या मिळविण्यात तथ्य नाही. आता आंतरराष्ट्रीय प्रतीचे ज्ञान इंटरनेट व्हाट्सअप टिव्हीच्या माध्यमातून उपलब्ध आहे. एक्स्ट्रा आर्डीनरी टॅलेंटवाल्यांनी त्याचा उपयोग करून जागतिक प्रतीचे प्रॉडक्ट्स बनविण्यासाठी हातभार लावावा.

### शेतकऱ्यांच्या आत्महत्येचा प्रश्न

दिल्लीत आप पार्टीचे मेळाव्यात गजेंद्र सिंग या शेतकऱ्याने सर्वादेखत आत्महत्या केली. गजेंद्र सिंग ला त्याचेचे सोबतचे लोक, सभेत आलेले पार्टीचे लोकांनी भडकविले हे सर्वांनाच माहीत आह. अगदी तसेच शेतकऱ्यांना आत्महत्येसाठी प्रवृत्त करण्यास अप्रत्यक्षपणे त्यांचे आसपासचे भडकविणारे लोक, मीडियावाले, विरोधीपक्ष वाले असतात. आर्थिक विषमता कधीही संपवता येत नाही. आपल्याकडे पुरेसा पैसा नाही, कर्ज नाही, घरगुती अडचणी, कौटुंबिक अडचणी प्रत्येकालाच असतात. कांग्रेस असो, भाजपा असो, कोणतेही विरोधपक्ष मेलेल्या शेतकऱ्यांसोबत अश्रु ढाळण्यासाठी सज्ज असतो. सत्तेसाठी, पुढच्या खेपेस सत्ता मिळविण्यासाठी अप्रत्यक्षपणे शेतकऱ्यांना आत्महत्येसाठी भडकविण्याचे काम करतात. आमचे शब्द कटू वाटतील.



# ९. मग घाटावरचे शेतकरी आत्महत्या का करतात?

मा. नाना पाटेकर यांस...

शेतकऱ्यांच्या मदतीसाठी आपण व आपले सहकारी ज्या तळमळीने कार्य करीत आहात ते फारच चांगले आहे.

नाना आपणांस एक प्रश्न विचारतो. कोंकणातला शेतकरी घाटावरच्या शेतकऱ्यापेक्षा फारच गरीब आहे. कोकणातल्या शेतकऱ्याची जमीन गुंठ्यामध्ये असते. क्वचितच एखाद्याची जमीन एकरात असते. याचाच अर्थ अनेक कोकणी शेतकऱ्यांची जमीन मिळून एका घाटावरच्या शेतकऱ्याची जमीन होईल. कोकणातल्या जमीनीचे तुकडे मोठे व एकसारखे नसतात. एक इथे तर दुसरा काही अंतराच्या उंचीवर तर तिसरा आणखी काही उंचीवर. कोकणात पण दुष्काळ पडतो. तरी सुद्धा कोकणी माणूस कधी आत्महत्या करी नाही.

मग घाटावरचे शेतकरी आत्महत्या का करतात? याची कारण शोधून काढा व त्यावर उपाय करा मगच आत्महत्या थांबतील. कोकणी माणूस हुंडा देत नाही व घेत नाही. लग्नाचा खर्च आपआपला (अर्धा–अर्धा) करुन लग्न करतात. कितीही बीकट परिस्थिती आली तरी वर्षभर सुकट भाकर खाऊन राहील पण कोकणी शेतकरी आत्महत्या करणार नाही, कर्ज काढणार नाही. जमीन गहाण ठेवणार नाही. ऐपत नसताना कर्ज काढून गाडी घेणार नाही.

घाटावरच्या शेतकऱ्याच्या आत्महत्याची कदाचित वरील कारण असू शकतील.

१) कोकणी माणूस लाखाच्या बैल जोड्या घेत नाही, एका बाजूला रेडा दुसऱ्या बाजूला म्हातारा बैल बांधून आपली शेती उरकतो. ट्रॅक्टर काय असतो त्याला माहीत नाही. कारण ट्रॅक्टर वारण्यासारखी व वारण्याइतपत त्याच्याकडे जमीन नसते.

२) लाखो रुपए मोजून बैलांच्या शर्यती लावत नाही.

३) कोकणी माणूस फक्त सरकारी खतच वापरून शेती करतो. तो त्यासाठी लाखो रुपयाची कर्ज काढून कर्ज बाजारी होत नाही.

४) कोकणी माणूस दमला भागला तर कीर्तन भजनामध्ये आपलं मन रमवतो तो घरातल्या बायको पोरांना उपाशी ठेवून सावकाराचे कर्ज करून तमाशाच्या फडाला जात नाही.

५) कोंकणी माणूस मुलांच्या लग्नाच्या सुपारीमधे उधारी उसनी वारी करून बकरे बोकड कापत नाही व दारूचे पाटही वाहत नाही.

६) कोकणी माणूस दुष्काळ कितीही पडला तरी चातका सारखा सरकारच्या मदतीची वाट पाहात नाही किंवा आत्महत्या ही करीत नाही.

तो आनंदी जगतो व आपल्या कुटुंबालाही जगवतो.

तसेच

महाराष्ट्राच्या राजकारणातून ९० ते ९५ टक्के वर्चस्व पश्चिम महाराष्ट्र व विदर्भ मराठवाडा यांचे आहे. तरीही हा भाग कायम सरकारकडे मागणी करत असतो. कोकण राजकारणात कमी असूनही कधी सरकारकडे भीक मागत नाही.



# १०. अमेरिकेतील अनुभव, महात्मा गांधीची काठी गायब!

वर्ष सन २००४ किंवा २००५ चा कार्यकाळ असावा. आम्ही अमेरिकेत रेडवूड सिटी कॅलिफोर्निया मध्ये ओरॅकल कंपनीत नोकरी करीत होतो. आमच्या ओरॅकल कंपनीच्या माध्यमातून पाच दिवसाच्या प्रशिक्षणासाठी सॅन फ्रान्सीस्को ध्यमे गेलो होतो. दुपारीची वेळ होती. मध्यंतरामध्ये आम्हाला दुपारच्या जेवणासाठी सुट्टी मिळाली. प्रशिक्षण केंद्र सॅन फ्रान्सीस्कोच्या डाऊनटाऊन क्षेत्रात असल्याने मध्यवर्ती क्षेत्रातील एका मुख्य रस्त्याने समुद्राच्या दिशेने पायदळ भटकंतीला निघालो. रिलॅक्स होऊन डोक्यावर प्रेशर नसल्याने वेगवेगळे विचार डोक्यात फिरत होते. आमचा एक मित्र बोलत होता बाळासाहेब ठाकरे यांनी सॅन फ्रान्सीस्को येथे पत्रकारितेचा डिप्लोमा केला होता म्हणून! विचार आला, याच रस्त्यावर कुठेतरी ते कॉलेज असावे. रस्त्यावर बाजूला हे रेस्टारेन्ट्स, छोटे–मोठे इन्स्टीट्यूट्स, कार्यालये, कॉफी शॉप, छोट्या मोठ्या संस्थांची ऑफीसेसयाचे निरीक्षण करीत समुद्र किनाऱ्याच्या दिशेने निघालो होतो.

अशातच आम्ही एका रेस्टॉरेन्टमध्ये चिकन बर्गर घेण्यासाठी प्रवेश केला. आम्ही बाहेर निघताना एका तिथे बसलेल्या नागरिकाने मला मराठीत प्रश्न विचारला तुम्ही मराठी आहात का? मी अचानक आश्चर्यचकीत झालो. मी उत्तरलो हो मी मराठी आहे, मी नागपूरचा! गृहस्थानी सांगितले मी कामत. मुंबई दादरला इतरही भारतात जी कामत रेस्टॉरेंटची चेन आहे त्या रेस्टारेंटचा मी मालक. मनातल्या मनात मला खूप आनंद झाला. अचानकपणे सॅन फ्रान्सीस्कोच्या डाऊनटाऊन एरियात एक मराठी गृहस्थ भेटावा तो ही कामत रेस्टारंट चेनचा मालक! त्याची अमेरिकेतही रेस्टारंट होती. आमच्या आयुष्याच्या त्या टप्प्यापर्यंत मला कळून चुकले होते की नोकरी करणे सोपे असते. मोठा यशस्वी व्यवसाय करणे फार कठीण असते. माझ्या इंग्रजी बोलण्यातील लकब वा ॲसेट वरून कामत साहेबांनी हेरले असावे मी मराठी आहो म्हणून!

मी तिथून ठरल्याप्रमाणे जलद गतीने समुद्र किनाऱ्याकडे चालता झालो. शेवटी मी पॅसिफीक महासागराच्या पाण्याचे जवळपास पोहचतो. नेहमीप्रमाणे समुद्रालगत सिमेंट कॉंक्रीटचा कठडा आणि आजूबाजूला पर्यटकांना फिरण्यासाठी

सुंदर निटनेटकी मोकळी जागा होती. तितक्यात माझी नजर एका पुतळ्यावर पडली तो पुतळा महात्मा गांधींच्या पुतळ्यासारखा दिसत होता. मनात म्हणालो या अमेरिकन लोकांना महात्मा गांधींशी काय देणे घेणे, हा पुतळा महात्मा गांधी सारख्या दिसणाऱ्या दुसऱ्या कोणी अमेरिकन महापुरूषाचा असावा. पुतळ्याच्या जवळ गेलो, निरखून बघितले दिसत होते महात्मा गांधीसारखे पण हातात काठीच नव्हती! पुतळ्याचा हात काठी पकडाचे पोजीशनमध्ये होता पण काठी गायब होती. मला पक्के वाटायला लागले हा आमचा गांधी बुढ्ढा नाहीच. अमेरिकेत पुतळ्याची विटंबना वा नासधुस कशी शक्य आहे? आणि अमेरिकन लोक कशाला महात्मा गांधीचा पुतळा आपल्या देशात उभारतील तेही पर्यटनस्थळी?

मी पुतळ्याच्या एकदम जवळ जाऊन निरखून कुठे नाम लिहिले का म्हणून शोधायला लागलो. तिथे नावाची पाटी ही मिळेना! पुतळ्याच्या एका बाजूला काहीतरी इंग्रजीत कोरलेले दिसले शिलालोखा सारखे! पण त्या मजकूराखाली विलीअम सेक्सपिअरचे नाव लिहिले होते. पण असे कसे शक्य आहे, सेक्सपिअर नाटककार तर महात्मा गांधीसारखा दिसत नसावा? नेहमीच्य आमच्या सवयीप्रमाणे आम्ही शिलालेखावरील मजकूर पूर्ण वाचून काढला नव्हता. पुन्हा दुसरी चककर पुतळ्याभोवती आमची झाली होती! एकतर पुतळ्याच्या हातातील काठी गायब होती आणि पुतळ्या भोवताल नेमप्लेटही नव्हती. शेवटी मी परत शिलालेखाचया आमने सामने जवळ जाऊन वाचले. या पृथ्वीतलावर रक्त न सांडता लढाई जिंकणार माणूसही अस्तित्वात होता यावर कोणी विश्वास ठेवणार नाही असो त्या मजकूराचा ढोबळ मानाने अर्थ निघत होता आणि त्याखालील ओळीत स्पेश देवून बॉटमला प्रसिद्ध सेक्सपिअर लेखकाचे नाव होते.

आता मात्र आम्हाला कळून चुकले होते. हा पुतळा आमच्या गांधी बुढ्ढ्याचाच! हा आपला गांधी बुढ्ढा! भारताच्या महापुरूषाचा सॅन फ्रान्सीस्को मध्ये पॅसिफीक महासागराच्या किनाऱ्यावर अमेरिकेत पुतळा? छाती भरून आली, दीर्घ श्‍वास घेतला, मन भरून पुतळ्याकडे बघितले. राष्ट्रपिता महात्मा गांधीना मनातल्यया मनात हात जोडून नमस्कार केला. खरोखरचे हात जोडले असते तर आजूबाजूचे लोक हासती ही भीती होती!

पण महात्मा गांधीची काठी कशी गायब होणार? ते ही अमेरिकेत? आता मात्र नवीनच प्रश्न डोके खाऊ लागला. महात्मा गांधीचा तिरस्कार करणारे दोन प्रकारचे लोक मी भारतात ऐकले होते. एकतर जयभिमवाले जे बाबासाहेब



आंबेडकरांचे कट्टर समर्थक किंवा जमीनदार ब्राह्मण ज्यांच्या जमीनी मालगुजारी बंद केलयामुळे गेल्या होत्या. पण अमेरिकेत जयभिम बांधव मी खूप कमी बघितले आणि तेही स्वतःच्याच घरी बाबासाहेबांचा फोटो लावायला ओशाळत होते. मग हे लाजाळू जयभिमवाले महात्मा गांधीची काठी गायब करणे कठीणच होते! मग उरले ते ब्राह्मण समाजवर्ग हे ही काठी चोरणे शक्य नव्हते. कारण बहुंशी ब्राह्मण वर्ग स्वतः जातीने नासधूस करून मानसिक व शारीरिक धोका पत्करणे कठीणच समजले जाते. तर मग महात्मा गांधीची काठी चोरून पुतळ्याची विटंबना करणारा कोण असू शकतो? महात्मा गांधीना गोळ्या घालून मारल्यानंतर ज्या ब्राह्मणांची घरे लोकांनी पेटवून दिलीत, अशापैकी पिडीत ब्राह्मणाचा नातू असावा अशी शंका यायला लागली किंवा त्याने एखाद्या गर्दूल्याला पैसे देवून काठी चोरायला सांगितले असावे. तेही इतके सोपे नाही मग मला पक्की शंका पाकिस्तानच्या नागरिकांवर यायला लागली. दुसरे तिसरे कोणी नसून एक पाकिस्तानीच असे करू शकतो अशी शंका मनात चुळबुळायला लागली. तितक्यात गाढवाच्या ओरडण्याचा आवाज कानावर पडला आणि आम्ही भानावर आलो.

महात्मा गांधीच्या पुतळ्याची नासधूस करणारा अती अभिमानी जयभिमवाला असो वा पिडीत ब्राह्मण वा पाकिस्तानी, मी कशाला माझे डोके तापवू? कशाला माझी मी वैचारिक शक्ती युजलेस कामात घालवावी? मी भानावर आलो. समुद्र किनाऱ्यावर वास्तव्य करणारे सी लॉयन वा सील चा आवाज काहीसा गाढवासारखा वाटतो. त्या आवाजाने मी भानावर आलो आणि माझ्या प्रशिक्षणवर्ग केंद्राकडे शार्टकट मार्गाने जलद गतीने निघून गेलो.

(दि. ९ जुलै २०१५, अभयराज्य)

# ११. श्रेष्ठ काय? महात्माजींची धोती की मोदींजींचा कोट ?

भारताचे राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी भारतीय स्वातंत्र्यलढ्यात उतरल्यावर सहसा धोतर घालूनच असायचे. भारतीयांचे प्रतिनिधी म्हणून अंगावर शर्ट सुद्धा घालत नसायचे. भारतीय राष्ट्रवादाचे जनआंदोलन तळागळातील सर्वसामान्य लोकांपर्यंत महात्माजींनी पोहचविले. खरं तर इंग्रजांचा काळ वेगळा होता. महात्मा गांधीच्या धोतीला काय महत्व नव्हते पण त्याच पोषाखाची गरीब भारतीयांना, आज खूप आवश्यकता आहे. समजा जर पंतप्रधान मोदीजींनी महागडे कोट सोडून महात्माजींचा अर्धनग्न धोतीवाला स्वस्त पोषाक वापरला तर भारतातील शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे प्रमाण सपाटून कमी होईल. वाढत्या शेतकऱ्यांच्या आत्महत्यांना मुख्य कारण काय असेल तर आजचे स्पर्धात्मक युग, मनातील न्यूनगंड, आर्थिकदृष्ट्या कमीपणाचे शल्य आपल्या मुलांना कुटुंबाना आपण श्रीमंतासारख्या सुविधा ठेवू शकत नाही याचे शल्य, मीडिया, शेजारी मित्रांचे प्रत्यक्ष अप्रत्यक्ष गरीबीमुळे पडणारे भडकाऊ टोमणे, स्पर्धात्मक युगामुळे लवकर श्रीमंत बणण्यासाठी कर्ज घेऊन शेती करणे आणि कर्ज घेऊन डूबणे, साधे उदाहरण घ्या. शेजारच्या बाजूच्या घरी टिव्ही आहे, आमच्याकडे घरी नाही म्हणून मुले बायका बोंबलतात आणि ते पालकाला बोचते. पन्नास पंच्याहत्तर टक्के आत्महत्यांच्या विचारांच्या मूळ कारणांची सुरवात इथूनच होत आहे.

### ठिगळ लावलेली कपडे

मानवीप्राणी सहसा प्रत्यक्ष अप्रयत्क्ष कोणाचे तरी अनुकरण करतो. आपल्याकडे हे असावे, आपण असे दिसावे, आपल्याकडे इतका पैसा असावा, आपले असे घर असावे, गाडी असावी इत्यादी विचार मानव प्राण्याच्या मनात येतात; असे मनात का यावे? याच ठिकाणी रूट कॉज लपून आहेत. मोदीजींनी महागडा कोट घातला तर त्यांचे हाताखालील अधिकार महागडा कोट घालण्याची अपेक्षा ठेवतात. अधिकाऱ्यांनी गाडी घेतली तर त्यांच्या हाताखालचे कर्मचारी गाडी घेण्याचा प्रयत्न करतात. सरकारी कर्मचाऱ्यांनी घरी कंप्यूटर विकत घेतला तर त्यांचे शेजारी, नातेवाईक, कंप्यूटर विकत घेण्याचा धडपड करतात. बाजूचे



शेजाऱ्यांनी टिव्ही घेतला तर त्यांच्या बाजूचे त्यांचेपेक्षा गरीब शेजारी टिव्ही घेण्याचा प्रयत्न करतात. बाजूचे शेतकऱ्याने कर्ज घेऊन शेती केली म्हणून आपणही कर्ज घेतात. शेतीचा भरवसा, पावसाचा भरवसा, निसर्गाचा भरवसा कालही नव्हता आजही नाही हे विसरुन जातात. आपली मुले अनवानी शाळेत जातात, ठिगळ लावलेली कपडे घालतात, शाळेचा पोषाक आपण मुलांना घेवून देवू शकत नाही, वरून कर्जाचा डोंगर आणि मानसिकदृष्ट्या खचून गेल्याने आत्महत्येच्या विचारांना पूरक प्रोत्साहन मिळण्यास सुरवात होते. महात्मा गांधींचे धोतर घालण्यामागचे उद्देश विविध असू शकतात. त्यांचा नेता गरीबांना आपलासा वाटावा हा एक. महात्मा गांधी स्वच्छता निर्मूलनचा भाग म्हणून स्वतः भंगी वा मेहतरांच्या वस्तीत राहात होते असे आम्ही वाचले आहे. समजा पंतप्रधान मोदींनी कोट सोडून स्वस्त पोषाक घालणे सुरू केले तर देशाला प्रचंड फायदा होईल. शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे प्रमाण घटण्यास प्रचंड मदत होऊ शकते. महागड्या कोटापेक्षा गांधीजींची स्वस्तवाली धोती ही खरोखरच श्रेष्ठ आहे.

ज्या शाळेत स्वच्छ सुबक सुंदर संडासची व्यवस्था, ती शाळा म्हणजे एकदम उच्च दर्जाची! शाळेची ही बनलेली आधुनिक व्याख्या खोडणे आवश्यक आहे. भरमसाठ डोनेशनसाठी लो क्वालीटी टिचर घेऊन नकभर पैसा स्वच्छ सुंदर संडास बांधण्यासाठी वापरला की ती झाली उच्च गुणवत्तेची आधुनिक भपकेबाज शाळा!

### अमेरिकेतील किस्सा

१९९५–२००२ च्या काळात जे भारतीय विद्यार्थी अमेरिकेतील आयटी क्षेत्रातील कामाला गेले, त्यांच्यातील सत्तर टक्के हे गरीब बॅकग्राउंडचे होते. या भारतीय विद्यार्थ्यांनी रॉकेलच्या कंदील, दिव्याच्या प्रकाशात अभ्यास केला होता. घाणेरड्या अस्वच्छ वस्तीत वास्तव्य केलेले, बिना गाईडने अभ्यास, शाळेत घरी संडासची व्यवस्था नव्हती, अनवाती शाळेत जाणारे, ठिगडाचे कपडे वाले! आमच्या सोबत काम करणारे अमेरिकन विद्यार्थी कधी उघड्या पायाने रस्त्यावर चालले नसतील, नाली बोंदूडी म्हणजे काय माहीत नसलेले, प्रखर इलेक्ट्रीक बल्वच्या प्रकाशात अभ्यास केलेले! तरीही भारतीय एम्प्लाई अमेरिकन एम्प्लाईपेक्षा कितीतरी पटीने वरचढ होत आणि आहेत. कंपनीतील काम समजून घेण्याची कुवत, येणारे प्रॉब्लेम्स फिक्स करण्याची क्षमता कामातील आत्मविश्वास याबाबतीत यजमान एम्प्लाई भारतीय एम्प्लाईच्या तुलनेत एकदम फिके आहेत. वाचकांना खोटं वाटत असेल तर आपल्या अमेरिकेतील मित्रांना विचारुन घ्या.

भारतीयांना मिटींगला उशीरा येत असल्यामुळे अमेरिकन मॅनेजरला मिटींग उशीरा सुरू करावी लागत होती.

**भारतीय सीबीआय तसेच अमेरिकेत एफबीआय!**

ऑरॅकल कंपनीच्या डाटा सेंटरमध्ये खूप कंपण्यांच्या आयटी सर्वीसेस होस्ट केल्या जातात. डाटा सेंटर म्हणजे महासंगणकांचे आगारच म्हणता येईल. टेक्सास मधील ऑस्टीन शहरातील डाटा सेंटरमध्ये अमेरिकन शासनाचे एमबीआयचे सर्वर संगणक वेगळ्चया पिंजऱ्यात लॉकअप कोठडीत ठेवण्यात आले. जसे भारतीय सीबीआय तसेच अमेरिकेत एफबीआय! फक्त जे अमेरिकन बॉर्न एम्प्लाईज त्या सेक्शनला काम करू शकत होते. उपलब्ध असलेले अमेरिकन एम्प्लाई पुरेश स्किल्ड नसल्याने एफबीआय सर्वर संगणकच्या इश्यूवर काम करताना भारतीय एम्प्लाईकडूनच टेलीफोनीक सपोर्ट घ्यावा लागत होता. 'ये साले अमेरिकन धुम फिरकर इंडियन के पास में ही आएंगे. इनको कुछ चारा ही नाही!' असा डॉयलाग आमचा गोसावी नावाचा कलीग मारायचा. बऱ्याच श्रीमंताची मुले शेफारून वांगारतात. अशातील गत अमेरिकन विद्यार्थ्यांची आहे. फॅसीलिटी नसल्या म्हणजे आपले नागरिक मागासलेलेच राहतात अशातला भागच नाही. दिखावा असला म्हणजे टॅलेंटेडच असहे असाही अर्थ काढू नये. भारतीय धोतर हे परदेशी कोटापेक्षा कुठेच कमी नाही आहे.

(दि. १५ ऑक्टोबर २०१५, अभयराज्य)



# १२. भारतीय लोकशाहीचा गोंधळ

**सरकार आणि न्याय पालिकेचा नो समन्वय**

भारतीय लोकशाही म्हणजे सावळा गोंधळच असल्याचा भास सर्वसामान्यांना नवीन नाही. आधारकार्डची आयडीया ही कांग्रेसच्या काळातील! आयडीया मुळात अमेरिकेची असावी. अमेरिकेत प्रत्येक नागरिकाला सोशल सिक्युरिटी नंबर असतो. हा प्रत्येकाला युनिक आयडेनटीफिकेशन नंबर सारखा असतो. समजा कोणत्याही नागरिकाला नोकरी मिळवायची असेल, व्यवहार करायचा असेल तर त्याचा यु.आय.डी. चेक करून त्याची आर्थिक हिस्ट्री, क्रिमीनल हिस्ट्री चेक केल्या जाते. कोणी भूतकाळात चोरी चपाटी लबाडी केली असेल, त्याने कोणत्या संस्थेला फसविले असेल तर यु.आय.डी. नंबरने पकडला जातो. त्याच धर्तीवर भारतीय शासनाने आधारकार्डची आयडीया भारतात आणली असावी. पण नेहमीप्रमाणे भारतीय यंत्रणेत जसा प्रत्येक स्तरावर समन्वय नाही त्याचे हे ताजे उदाहरण आहे. भारतीय लोकशाहीचा रथ केंद्रशासन, राज्यशासन, न्यायपालिका, पोलीस यंत्रणा, प्रसारमाध्यमे म्हणजे मीडिया या घोड्यातर्फे ओढला जातो. हे रथ ओढणारे घोडे वेगवेगळे दिशेने रथ ओढतील तर काय होईल या सावळ्या गोंधळाचे उदाहरण आहे. बोलो तो भारतीय लोकशाही की जय!

**प्रायव्हेसीच्या नावाखाली नामंजुर**

प्रायव्हेसी सारखे शब्द सर्वसामान्य भारतीयांना शोभतच नाहीत. चोरी उचक्या, लबाड लोकांना प्रायव्हेसीची काळजी जास्त असते. आधार कार्ड प्रत्येकालाच कंपलसरी असावे, त्याचा डेटा सेंट्रलाइज्ड असावा. म्हणजे कोण चोर, कोण लबाड याचा पत्ता सहज लागायला मदत होईल.

नौकरदारांना, कोणत्याही संस्थांना, व्यवसाय करणाऱ्यांना चोर, लबाड, गुन्हेगार नागरिकांपासून सावधान राहण्यास मदत होईल. या चौकातील पाकीटमार दुसऱ्या चौकात शाव म्हणून जगणे कठीण जाईल. गोऱ्या लोकांच्या काही आयडीया भारतीयांच्या कामाच्याही असू शकतात. यामुळे थंब इंप्रेशन, बायोमेट्रीची माहिती असलेल्या आधारकार्ड प्रत्येक नागरिकांसाठी कंपलसरी

असावा असे आमचे मत आहे. फक्त आधारकार्डवरील माहिती पडताळणी करताना संबंधीत नागरिकांची लेखी परवानगी पूरे आहे.

कोर्टाच्या परिसरात चोर, लुच्चे, गुन्हेगार तथा आरोपी यांनाच जास्त भटकावे लागते. त्यामुळे वकील, न्यायाधीश आणि न्यायपालिकेतील लोक यांना चोर, लुच्चे, गुन्हेगार अथवा आरोपी यांच्या समस्या चांगल्या समजू शकतात. बायोमेट्रीक फिंगर इंप्रेशन व्हेरीफिकेशनमुळे गुन्हेगारीवर आळा बसेल हे आधारकार्डावरील माहितीमुळे शक्य होऊ शकते. याची पुरेपुर कल्पना आल्यामुळे गुन्हेगार, अतिरेकी वर्गाने न्यायपालिकेसोबत नकळत अप्रत्यक्षपणे फिल्डींग लावावी वा समझोता केला असावा अशी शंका येते.

(दि. २० ऑक्टोबर २०१५, अभयराज्य)



# १३. मी नाही त्यातली, कडी लावा आतली



भारतीय समाजाची मोठी द्विधा मनस्थिती झाली आहे. मनात एक असते आणि बाहेर एक बोलावे लागत आहे. मित्रासोबत फिरायला गेलेल्या तेही झाल पडल्यावर एका तरूणीवर पाच जणांनी पोलीस असल्याची बेतावणी करून जबरदस्तीने पळवून बलात्कार केला. प्रत्येक वृत्तपत्राने ही बातमी ठळक छापली आणि बलात्काराच्या घटना समाजात होतातच कशा. तरूणच जबाबदार असा अविर्भाव आणला.

वृत्तपत्र, प्रसारमाध्यमे इंग्रजी संस्कृतीच्या प्रभावाखाली आहेत की काय ही शंका येते. मर्डर झाल्यानंतर मर्डर करणारा गुन्हेगार म्हणून प्रपोगंडा करतात पण मर्डर का झाला आणि भविष्यात मर्डर कसे टाळता येतील, यासाठी कोणते प्रयत्न करायला पाहिजे, यावर शहानिशा करायला वेळच नसतो, अशी ही आपली प्रसारमाध्यमे होऊ शकते, त्यांचीही मजबूरी असावी, हा विषय वेगळा!

भारतीय समाजव्यवस्था या जगातील आदर्श कुटुंब व्यवस्था आहे. इंग्रज तर गेले पण त्यांचे अभ्यासक्रम, त्यांनी उभी केलेली कायदेकानून व्यवस्था इथे सोडून गेले. इंडस्ट्री अलायझेशन, औद्योगीकरण आणि डेव्हलपमेंटमध्ये इंग्रज अग्रेसर असल्याने त्यांचे भारतीयांनी अनुकरण जरूर करावे पण त्यांच्या सद्‌गुणांचे,

दुर्गुणांचे नाही. जग बदलत आहे, पंचवीसाव्या शतकाकडे चाललो असे म्हणून इंग्रजाळलेल्या मानसिकतेचे आम्ही प्रदर्शन घडवित असतो.

**भारतीय पालकांच्या मानसिकतेनुसार कायदे बदला**

आजही अर्ध्याअधिक पालकांना आपली मुलगी वा मुलगा लग्नाआधी एकांतस्थळी भेटावेत असे मुळीच आवडत नाही. कशासाठी भेटतात याचे घेणे–देणे नाही. नवरा–बायको, भाऊ–बहीण हे नाते ठीक आहे. मित्र–मैत्रीण हे इंग्रजी नाते अर्ध्याअधिक भारतीय पालकांना परेशान करून सोडत आहे. उद्या जाऊन आपल्या लोकसभा, विधानसभा, स्थानिक संस्था सर्व निवडणूकीत दुप्पट मतदानाचा अधिकार देणे आवश्यक आहे.

**महाराष्ट्र शासनाची नवीन बाटलीत जुनी दारू**

काही दिवसांपूर्वी महाराष्ट्र शासनाने जाहीरात छापली. जेष्ठ नागरिकांच्या कल्याण व सहाय्यासाठी शासनाचा कायदा. मोदीजी म्हणतात कायदे कमी करू आणि महाराष्ट्र शासनाने आल्याआल्या नवीन कायद्यांची घोषणा केली. बिचाऱ्या जेष्ठ नागरिकांना कोर्टाची पायरी घासणे शक्य आहे का? का आपल्या शासनाला त्यांच्या सल्लागारांना भारतीय न्यायपालिका सामान्यांसाठी किती किचकट आहे, हे माहीत नाही काय? त्यापेक्षा अधिकार द्या, वयाच्या पंच्चावन वर्ष वा तत्सम नागरिकांना लोकसभा, विधानसभा आणि स्थानिक संस्थांच्या निवडणूकीत तिप्पट मतदानाचा अधिकार देण्यात यावा. वयानुसार जेष्ठांचा अनुभव, मुलांसाठी नातवांसाठी, समाजासाठी, देशासाठी त्यांनी घेतलेली तिप्पट मेहनत हे त्यांच्या वयावरूनच लक्षात येते, वेगळे सांगायची जरूरत नाही.

(दि. ११ डिसेंबर २०१४, अभयराज्य)



# १४. दीक्षाभूमी स्मारक जागतिक दर्जाचे आणि हेडगेवार स्मारक गल्लीच्या दर्जाचे!



कोणत्याही महापुरूषाचे वजन त्यांच्या राजकीय प्रभाव, राजकीय ताकद, त्यांचे राजकीय वर्चस्व, त्यांनी मिळविलेल्या सत्तेवरूनच कॅलक्यूलेट होते. डॉक्टर केशवरावजी हेडगेवार यांनी नव्वद वर्षापूर्वी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना केली. इतक्या लांब दीर्घकालीन प्रयत्नानंतर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने या भारतभूमीवर निर्विवादपणे आपली सत्ता पंतप्रधान नरेंद्र मोदीच्या रूपात आसनाधिस्त केली.

**डॉ. हेडगेवार आणि डॉ. बाबासाहेब महात्माजींचे फालोअर?**

काही लेखकांच्या इतिहासकारांच्या म्हणण्यानुसार डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि डॉ. केशवराव बळीराम हेडगेवार हे त्यांच्या सुरवातीच्या राजकीय कारकिर्दीत महात्मा गांधी यांचे फालोअर होते. महात्मा गांधी हे मुस्लीम बांधवांना अनुनय करतात यामुळे हिंदूंना त्यांचे अधिकार मिळत नाहीत, हिंदू संस्कृतीला धोका आहे याचा अंदाज घेऊन डॉ. हेडगेवारांनी महात्माजींच्या काँग्रेसपासून फारकत घेतली. डॉ. केशवराव बळीराम हेडगेवार यांनी लावलेले रोपटे हाँ हाँ म्हणता २०१४ मध्ये दिल्लीच्या सत्तेवर बसले आणि नागपूरनगरीत गुडीपाडव्याच्या दिवशी जन्मलेले डॉ. केशव बळीराम हेडगेवार भारतीय महापुरूषांच्या अव्वल श्रेणीत एकदम टॉपच्या क्रमांकावर पोहचले. कोणी

ब्राह्मणवादी म्हणून टिका करो व मनुवादी म्हणून सत्ता सामर्थ्य यश हेच आधुनिक काळात वास्तविक वजन ठरवितात. भारताच्या इतिहासात नागपूर शहराला दुय्यम स्थान होते. आज नागपूरात येणारे पर्यटक राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे हेडक्वार्टर कुठे, हेडगेवार स्मारक कुठे आहेत म्हणून विचारतात. कालपर्यंत नागपूरकरांना अभिमान वाटावा असा टॉप क्लासचा महापुरूष नागपूरात जन्मलेला कुणी नव्हता. आज तसे नाही. वास्तविकता सर्वांना मान्य करावी लागते आवडो वा न आवडो. जिसकी लाठी उसकी भैस!

**आंबेडकरी समाजाचा अनुनय**

खरे तर आम्ही सुद्धा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचे खंदे समर्थक आहोत. डॉ. बाबासाहेबांनी कांग्रेसला, इंग्रजांना मागासवर्गीयांसाठी, वंचितांसाठी, गरीबांसाठी आरक्षणाची तरतूद करण्यास भाग पाडले. आरक्षणाचा आम्हाला सुद्धा फायदा झाला. पण इतक्यात आर.एस.एस. प्रणित सरकारने आंबेडकरी समाजाचा मतांसाठी अनुनयच चालविला की काय असे वाटायला लागले. ग्रेट ब्रिटनच्या लंडनमधील बाबासाहेब राहत होते ती वास्तू विकत घेणे, इंदू मिलची जागा बाबासाहेब आंबेडकरांच्या स्मारकासाठी अप्रूव्ह करणे, महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांनी जापानमध्ये बाबासाहेबांच्या पुतळ्याचे अनावरण करणे, नागपूर येथील दीक्षाभूमीच्या स्मारकासाठी मुख्यमंत्र्यांनी चारशे पन्नास कोटींची तरतूद करणे. एकामागोमाग एक डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कट्टर चाहत्यांसाठी मेजवानी! स्वातंत्र्यापासून गेल्या सत्तर वर्षात कांग्रेसच्या काळातही इतक्या कमी वेळात पाच पाच तरतुदी केल्या नसतील. डॉ. बाबासाहेबांच्या संबंधित स्मारकांच्या तरतूदी कराव्यात यात बहुजनांनाही आनंद आहे पण बहुजन समाजाला डावलले गेले की काय असे वाटायला लागते?

**बहुजन समाज दुर्लक्षित?**

खरे तर बाबासाहेब आंबेडकर बालपणापासून धार्मिक संस्कारात वाढले. पण काही आंबेडकरी समाज आणि हिंदुत्व यांचा छत्तीसचा आकडा भारतीय जनता पार्टी वा राष्ट्रीय स्वयंसेवक संघ यांचा आत्मा म्हणजेच हिंदुत्व दोन टोकाचे दोन विचार आणि यात दूर्लक्षित होत आहे, बहुजन समाजात असा संशय निर्माण होतो.

**संघाची अमेरिकेलाही धडकी!**

कधीतरी आम्हाला अमेरिकेत असताना राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शाखेत



जाण्याचा योग आला. बौद्धकी, शारीरिक, मानसिक विकास तळागळापर्यंत पोहचावा हा उद्देश! अमेरिकेत युरोपात उच्चवर्णीय समाजाचे लोक उच्चपदावर बघून, त्यांच्या नियमीत होणाऱ्या संघाच्या रूपातील शाखा बघून फिरंग्यांना सुद्धा धडकी भरली असावी. त्यामुळे अमेरिकेने भाजप आणि रा.स्व.संघ वर जासूसी करणे चालू केले.

ज्या डॉ. हेडगेवारांनी सुरू केलेल्या संघाच्या शाखा देशविदेशात नियमीत होतात त्या हेडगेवारांचे स्मारक प्रत्यक्ष अप्रत्यक्ष जागतिक दर्जाचेच झाले. नागपूरातील डॉ. हेडगेवारांचे स्मारक हे हिंदूत्वाचे शक्तीस्थळ, डॉ. हेडगेवारांचे जन्मस्थळ, संघाचे मुख्यालय ही स्थळे जागतिक आंतरराष्ट्रीय वजनी अव्वल प्रभावशाली म्हणायला वावगे ठरू नये. हिंदू धर्मातील तत्वज्ञान हे त्रिकाल सत्य, त्रिलोक सत्य शाश्वत ज्ञान असण्याची शक्यता नाकारता येत नाही. उच्च वर्णीयांमधील देशातील परदेशातील उच्चपदस्तांनी एकत्र येऊन फंड उभा करून भारतातील आध्यात्मिक, योगीक विद्योचे संशोधन नागपूर हेडगेवार स्मारक केंद्र, बौद्धीक, मानसिक, वैचारिक शक्ती संशोधनाचे ब्रह्मांडातील अव्वल दर्जाचे शक्तीस्थळ नगापूरातील हेडगेवार स्मारक मदत करावी.

**नागपूर हीच संयुक्त भारताची राजधानी**

दसऱ्याचे दिवशी धम्मचक्र प्रवर्तन दिनी नागपूरच्या दीक्षाभूमीवर जमणारा प्रचंड निळा जनसमुदाय या नागपूर शहराला जागतिक आंतरराष्ट्रीय किर्तीचे व जनी शक्तीशाली वर्चस्व प्रदान करते. उद्या जाऊन येणाऱ्या काळात नागपूर नगरी वेगळ्या विदर्भाची राजधानी बनण्यापेक्षा बौद्धकालीन भारत, अफगानिस्थान पासून श्रीलंकेपर्यंत पाकिस्तानपासून ब्रह्मदेश सिंगापूर पर्यंत विस्तारलेल्या संयुक्त भारत देशाची राजधानी बनण्यास काहीही गुंजाईश राहणार नाही.

(दि. २२ ऑक्टोबर २०१५, अभयराज्य)

# १५. ललित मोदींना भाजपची मदत योग्यच? विरोधकांची बोंबाबोंब



आपण आपल्या कुटुंबाचा विचार केला तर मुख्य पालक कसा असावा? आपल्या बाबांकडे कोणते कौशल्य असावे? ढोबळ मानाने आपल्या पालकाला घरातील शिस्त सांभाळता यावी, सर्वांना सांभाळून घ्यावे, सर्वांना सुखी समाधानी ठेवण्याची क्षमता असावी पण त्यातल्या त्यात म्हणजे आणि महत्वाचे म्हणजे त्यांची चांगली कमाई असावी, व्यवसाय करो वा नोकरी त्यांना दोन पैसे कमविता यावे! आपला देश म्हणजे आपले कुटुंबच असते. आपले पंतप्रधान म्हणजे आपले मुख्य पालक! आपल्या वडिलांप्रमाणे आपलया पंतप्रधानांना व्यवहार कुशलता ठेवून भारतातील निर्यात वाढवून, आयात कमी करण्याचे म्हणजे देशात आर्थिक सुबकता आणण्याचे कौशल्य अती आवश्यक असते. पंतप्रधान, त्यांचे मंत्रीमंडळ, त्यांच्या हाताखालची शासकीय यंत्रणा, आपल्या देशातील उद्योगपती, व्यवसाईक, नोकरदार वर्ग, शिक्षक आणि सामान्य नागरिक सर्वांचे सहकार्य असावे लागते.

**ललित मोदी आणि आय.पी.एल.**

बाबासाहेब आंबेडकरही त्यांच्या एका पुस्तकात अप्रत्यक्षपणे मान्य करतात की कोणत्याही देशाची प्रगतीची दिशा हे काही गिनेचुने टॅलेंटेड अतीकुशल अतीहुशार लोक ठरवित असतात. एखादे अशक्य प्राय काम व प्रोजेक्ट हातात घेऊन सर्व सिस्टमला सांभाळून घेऊन, जलदगतीने सर्व बारीकसारीक क्रिया प्रोसेसेस एक्झीक्यूट करून यशस्वीपणे पूर्ण करणारे आर्थिक व्यवहार चातुर्य लोक



खूप कमी आढळतात. आधी आय.पी.एल.ला कोणी ओळखत नव्हते. क्रिकेटमधील आयपीएल काय म्हणून जन्म झाला नव्हता. ज्यांनी प्रयत्न केलेत ते फेल झालेत. त्या काळात महान धुरंधर माननीय शरदरावजी पवार यांनी श्री ललित मोदी यांचेवर जबाबदारी दिली. मा. शरद पवार यांना अतीकुशल अती हुशार लोकांची परख आहे त्यांची परख श्री ललित मोदींनी रास्त ठरवून आयपीएल चे कमिश्नर म्हणून त्यांनी आयपीएलला सोनेरी दिवस आणून दिले आणि आयपीएल सोन्याची अंडी देणारी कोंबडी बनविली. छोट्या मोठ्या भारतातील क्रिकेटपटूंना चांगला प्लेटफार्म मिळाला. नागपूरचा गोलंदाज उमेश यादव ही त्यातलाच!

पण भारताचा इतिहास हा हजारो वर्षाचा असल्याने मत्सरघाताचे साम्राज्य पसरले आहे. ज्या लोकांनी काही होत नाही, मार्केटींग अकुशल आर्थिक व्यवहारात अकार्यक्षम असलेले लोक यशस्वी अती हुशार लोकांवर जळत असतात. स्वतः तर काही होत नाही पण इतरांचे पाय ओढत असतात. दिव्याखाली अंधार असण्याची शक्यता बरेचदा असते पण, अंधाराला गोरे लोक पद्धतशीरपणे दाबून टाकतात आणि टॅलेंटेड लोकांना प्रोत्साहन देतात म्हणून ते जगात पहिले आहेत.

**गुणवत्तेला प्रोत्साहन आणि अंधार झाकणे आवश्यक**

अमेरिकन सरकार आणि लोक, टॅलेंटेड, अती हुशार, अती कार्यक्षम लोकांच्या पाठीशी राहते, उद्योजक असो वा अधिकारी, त्यामुळे ते पूढे आहेत. भारतातील ओव्हरआल सिस्टममध्ये न्यायपालिका, मंत्रीमंडळ नेते, राज्यशासन, शासकीय नोकरदार वर्ग, गृहखाते यांच्यात समन्वय नसल्याने पाय ओढण्याची, भ्रष्टाचारी कामचुकार वृत्ती फोफावल्या आहेत. कोणताही प्रोजेक्ट जलद गतीने भारतात यशस्वीपणे पूर्ण करायच्या असतील तर छोटी मोठी चालूगिरी करावीच लागते. अशाच काही छोट्या मोठ्या पुराव्यांचा आधार घेऊन त्यांना अडचणी उभ्या केल्याने ललित मोदींना भारत सोडणे भाग पडले. स्वच्छ नीट व्यवहार करणारे अती हुशार अती कार्यक्षम लोक भारतात टिकत नाहीत म्हणून अमेरिकेतील कर्तृत्ववान भारतीय आपल्या देशात यायला बघत नाहीत. काही इंग्रजांनी चालू केलेले, इंग्रज काळापासून सुरू झालेले प्रसारमाध्यमे भारत देश मागे कसा राहील म्हणून प्रयत्नात आहेत. भारतात कशी असमन्वय असलेली करप्टेड सिस्टम आहे हे कर्त्या सवर्त्या मुलांपासून वृद्धापर्यंत सर्वांना माहीत आहे. राष्ट्रवादीचे शरदरावजी पवार सारखे महान हुशार लोक भारतीय सिस्टमने दोषी

ठरविलेल्या ललित मोदींच्या पाठीमागे का उभे राहतात? भारतीय परराष्ट्र व्यवहार मंत्री श्रीमती सुषमा स्वराज यांनी ललित मोदी यांना विजा दिल्याने मीडिया आणि विरोधकांचा गोंधळ चालू आहे तो चूकीचा आहे.

**भारतीय कबड्डी खेळाचे आयपीएल कधी होणार?**

विद्यमान सरकारने, सिस्टमला विचारात घेऊन ललित मोदी यांच्यावरील आरोपांची शहनिशा करून त्यांना प्रोटेक्शन देऊन परत आणणे भारतासाठी योग्य राहील. क्रिकेट नावाच्या परदेशी खेळाच्या आयपीएलला शून्यापासून आंतरराष्ट्रीय स्तरावर यशस्वीपणे नेऊन छोट्या मोठ्या भारतातील क्रिकेटपटूंना वाव देण्याची क्षमता ललित मोदींमध्ये आहे, आजही असू शकते. कबड्डी सारख्या मूळ भारतीय खेळाला आंतरराष्ट्रीय स्तरावर नेण्याची जबाबदारी ललित मोदींना देऊन भारताला जगात प्रथम क्रमांकाकडे वाटचाल करण्याची दिशा मिळण्यास मदत होऊ शकते.

दि. १८ जून २०१५, अभयराज्य)



# १६. चंद्रपूर जिल्हातील दारूबंदी गरीबांवर अन्याय ?

आम्ही तिथे सुद्धा त्यांना झुकून नमस्कार केला. ती भेट त्या इंग्रजी विषयांच्या संरासोबत शेवटची भेट ठरली. कमी वयात विद्यार्थी म्हणून आम्हांलाही वाटायचे की दारू पिणे वाईट सवय आहे.निरागस बालीश वयात प्रत्येकालाच वाटते दारू पिणे चुकीचे आहे. दारू पिणे म्हणजे गुन्हा! आज लग्न झाल्यानंतर बायको मुलांचे आणि इतर सर्व जवाबदाऱ्या झेलल्यानंतर आमच्या लक्षात आले, कळून चुकले की लोक दारू का पितात? महिला आपले दुःख इकडे तिकडे शेअर करून तर कधी अश्रूच्या रूपात मनातून दुःखाची मडगळ बाहेर काढून फेकतात आणि मन हलके करतात. पण पुरूष कोणासमोर रडून आपले दुःख सांगू शकत नाहीत तेव्हा दारू पिऊन पचविण्याचा प्रयत्न करतात. आज आमचे इंग्रजीचे सर नाहीत पण ते असते आणि त्यांनी मागणी केली असती की दारूबंदी हटवायला पाहिजे तर आम्ही त्यांना जरूर मदत केली असती. सर्व त्यांच्या विद्यार्थ्यांना एकत्र आणून दारूबंदी हटविण्यासाठी आंदोलन करण्यास मागेपुढे पाहिले नसते. लोकांनी मानसिकरित्या धैर्य खोवून दारू प्यावी हे आम्हालाही मान्य नाही. पण प्रत्येक व्यक्ती सारख्या नसतात. शान, शौकत, हौस, एन्जायमेंट म्हणून दारू पित असतील, तर त्यावर जरूर बंदी यायला पाहिजे.

**आपलेच दात, आपलेच ओठ?**

पण चंद्रपूर जिल्हाभर दारूबंदी जाहीर केल्याने त्यात गरीब लोकच भरडणार आहेत. आमदार, खासदार, त्यांचे कार्यकर्ते, कर्मचारी वर्ग, श्रीमंत वर्ग जिल्हाच्या सरहदी बाहेर चकरी मारून आपली दारू पिण्याची व्यवस्था करून टाकतील. पण कौटुंबिक वा इतर मानसिक त्रास झेलणारे ज्यांना दारूचा घोट औषध म्हणून काम करतो ते गरीब लोक, ते कुठे जातील?

**पिण्यावर वा पिणाऱ्यांवर नियंत्रण आवश्यक आहे पण पूर्णतः बंद ?**

ज्या मंत्र्यांनी दारूबंदी जाहीर केली ते आमदार, खासदार, त्यांचे कार्यकर्ते त्यांचे निवडणूकीसाठी मदत करणारे चेले चपाटे ते तरी स्वतः दारू घेणे बंद करू

शकतील का? जर आपण स्वतः घेणे बंद करू शकत नाही तर मग हे चुकीचे कायदे कशाला बनविता? आपले खायचे दात वेगळे आणि दाखवायचे वेगळे असे करून आपण काळा बाजार करण्यासाठी शासकीय यंत्रणेला, दुकानदारांना आणि दारू शौकीनांना का प्रवृत्त करावे?

(दि. ५ फेब्रु. २०१५, अभयराज्य)



विभाग-१६ : बेबंदशाही मधील निवडणूका

# १. जनता जिंकली... हे सफशेल खोटे.. पैसा जिंकला... हेच वास्तव खरे...

**रात्रभर धनदंडग्यांनी लोकशाही नागवी केली...**

महाभारतात सर्वांसमक्ष राजगृहात द्रौपदीचे वस्त्रहरण होतांना बघितले. तेच किंबहुना तसेच दृश्य मतदानाच्या आदल्या रात्री बघायला मिळाले. रात्रभर धनदांडग्यांनी लोकशाहीचे वस्त्रहरण केले. रात्रभर पैश्याचा पुर आला, घरोघरी नोटांचा वाटप सुरु झाला, मोहल्ला मोहल्यात राजनीतिक पक्षाचे पाळीव कुत्रे घराघरांचे वासे सुंघायला लागले, लाकडी दरवाजे खटकायला लागले, कुटुंबातील एकूण मतांची विचारणा व त्यानुसार नोटांचे बण्डल प्रमुखाच्या हातात कोंबायला लागले. यालाच मत गेलं पाहिजे अशी धमकी वजा सूचना देत पंटर दुसऱ्या घराकडे वळत होते. एक मताचा भाव कुणी २०० रुपये तर कुणी २००० रुपये लावला. प्रती स्पर्धक उमेदवारांनी वरचढ होत त्यापेक्षा जास्त भाव लावीत मते काबीज केली. कात्रित सापडलेला मतदार भांबावलेला होता. जणुकाही पैशाचा पुर आला. कार्यकर्त्याचा गल्लोगल्ली अक्षरशः धुडगुस! मात्र पैसा, दारू व गुंडाच्या धमक्या यात जो शिरजोर त्या उमेदवाराच्या झोळीत मत जाणार हेच पक्के! आणि निकाल नंतर दिसलेही तेच! व अखेर लोकशाही हारली व पैसा जिंकला!

निवडणुकीच्या काळात राजनीतिक पक्षातीलकार्यकर्त्याच्या बैठका, प्रचार सभा, कार्नर सभा, मोहल्ला सभा, निवडणुकीचे व्यवस्थापन, बूथ व्यवस्थापन, प्रचार कार्यालय, प्रचार यंत्रणा, प्रसार साहित्य व वितरा इत्यादी बाबतीत प्रत्यक्ष सहभाग घेत जे अनुभव घेतले, त्याचेच हे प्रत्यक्ष चित्रण! लोकशाहीचे खरे रुप पाहायला मिळाले. दबाव तंत्र, धमक्या, गुंडागर्दी, पैसा, दारू, प्रलोभने इत्यादीच्या दबाव व सम्मोहनात मतदाता मतोगुंग झालेला. अश्या स्थितीत लोकशाहीचे खरे स्वरुप कसे टिकावे? हाच मनाला भेडसावणारा प्रश्न. चंद्रपूर जिल्ह्यातील अनेक विधानसभा क्षेत्रातील स्वरुप एकाहून एक वेगळे. मतदारांना प्रलोभनाच्या नानाविध युक्त्या, कुणी साड्या तर कुण मिक्सर ग्राइंडर, रेनकोट, घड्याळ, मच्छरदाणी वाटले. लोकसभा निवडणूक झाल्यापासूनच वाटप सुरू

झाले. जूनमध्ये पावसाळा सुरु झाला तर रेनकोट वाटले. राखी आली तर बहिणींना भेटचे नाटक करीत मिक्सर आणि साड्या वाटल्या. आणि मतदानाच्या आदल्या रात्री एकूण मतदारांच्या ६०% लोकांना (म्हणजेच कमीत कमी १.५ लाख मतदार) प्रत्येकी रु. २०० प्रमाणे खुलेआम वाटण्यात आले. विधानसभा क्षेत्रातील पक्षाचे कार्यकर्ते, सरपंच, सामाजिक कार्यकर्ते, सहकारी संस्था, साखर कारखाने, दूध संस्था, मत्स्य संस्था, देवस्थान, भजन मंडल, क्रीडा मंडल, बचत गट, महिला मंडल इत्यादिंच्या प्रमुखांना त्यांच्या महत्तेनुसार रु. ५००० ते २५००० पर्यंत वाटप तर दुसरीकडे विरोधी पक्षातील कार्यकर्त्यांना चुप राहण्यासाठी मुहमांगी रक्कम. प्रिंट व इलेक्ट्रानिक मीडियाला एकतर्फी बातम्या लावण्यासाठी विमानसेवा द्वारा गोवा पर्यटन व हातात रोख रकमा. अंदाजे ३०० ते ३५० मतदान केंद्रावर काम करणारे कार्यकर्ते एजेंट यासाठी बुथनिहाय रु. १०,००० चे वाटप. गावोगावी मटन पार्ट्या, दारू पार्ट्या ह्या नित्याचाच! एकीकडे निवडणूक आयोगाने प्रत्येक उमेदवाराला प्रत्येकी रु. २८ लक्ष खर्च करण्याची मर्यादा असतांना एक एक उमेदवार रु. १० कोटी पेक्षा जास्त खर्च करतोय. याकडे आयोगाचे लक्ष कुठे आहे? करोडो रुपये गावागावात वाहून नेणाऱ्या निळ्या काचाच्या गाड्या कश्या तपासल्या जात नाही? मात्र मध्यमवर्गीय बसने प्रवास करतो, त्याचे थैले, पिशव्या पोलीसद्वारे तपासणे किती हास्यास्पद आहे? कित्येक मंत्र्यांच्या नातेवाईकांच्या गाड्यातून करोडोच्या रकमा पाठलाग करुन पोलीसांनी पकडल्या, कारवाई मात्र शून्य! हा एवढा खर्च करण्यासाठी पैसा येतो कुठून? कारण आमदार झाल्यावर दरवर्षीचा आमदार फंड रु. २ कोटी म्हणजेच ५ वर्षाकाठी एकूण रु. १० कोटी. ह्यातून प्रत्येक कामाचे २०% ते २५% कमीशन मिळाले तरी केलेला रु. १० कोटी हा खर्च वसूल होत नाही. ह्यामागील आर्थिक गणित काय? हा प्रश्न पडतो. तर सत्तेत गेल्यावर मोठे प्रकल्प आपल्याच मित्र वा नातेवाईक यांच्या नावे कंपनी बनवून ठेके घेणे व सत्तेत आल्यावर सरसकट जनतेच्या पैश्याची लूट करायची, हाच एकमेव उद्देश हा इलेक्शनचा दिसतोय.

मग ही निवडणूकच कश्याला हवी? बोलवा धनदंडग्यांना, लावा विधानसभानिहाय आमदारांची बोली, जो जास्त बोली बोलेल, त्यालाच आमदार बनवा व लुटू द्या जनतेचा खजीना! कोणत्या राजकीय पक्षाला प्रामाणिकपणे वाटतेय की लोकशाही मजबूत व्हावी? अश्या निवडणुकीमुळे बच्चू कडू, गणपतराव देशमुख सारखे सच्चे काम करणारे प्रामाणिक आमदार किती दिवस तग धरुन राहतील? हा प्रश्न आहे. जो व्यक्ती पैसा खर्च करुन विधानसभेत पोहोचतो, त्याला सर्वसामान्याच्या कल्याणाचे काय घेणे देणे? ब्रिटिश काळात १९३७ ला पहिल्यांदा निवडणूक झाली, तेव्हा २१ वर्षावरील प्रत्येक नागरिकाला मतदानाचा हक्क मिळाल्यामुळे गाव प्रमुख, देशमुख, पाटील, मामलेदार, किलेदार, राजे आदींनी गावखेड्यातील लोकांना व शहरातील झोपडपट्टीतील लोकांना मते मागण्यासाठी त्यांच्या घरापर्यंत पोहोचावे लागले. मात्र आता हे असेच चालले तर १९५२ च्या अगोदरची परिस्थिती आल्याशिवाय राहणार नाही. कारण या लोकशाहीत फक्त धनदांडगे, श्रीमंत, चोर, लुटारु, गुंडे, व्यापारी, कंपनी मालकच विधानसभा वा लोकसभेत दिसतील, मात्र सर्व सामान्यांचे प्रतिनिधी दिसणार नाहीत. हे जळजळीत सत्य आहे.



मग अशी लोकशाही आपल्याला हवी आहे कां? ज्या लोकशाहीची संकल्पना महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, जवाहरलाल नेहरू, सुभाषचंद्र बोस, सरदार पटेल यांनी मांडली होती, तीच का ही लोकशाही? मित्रांनो, विचार करा आणि आता उपाय शोधा, पर्याय शोधा!

सर्वसामान्य लोकांच्या डोक्यावर शासनाने कर्ज घ्यायचे पाच वर्षात १५०० ते २००० कोटी रुपये निधीची कामे मंजूर केली जातात आणि त्यापैकी कमीत कमी १० टक्के कमीशन जरी पकडले तरी १५० ते २०० कोटी रुपये वाममार्गाने छुप्या पद्धतीने जमा होतात. असा जनतेचा आरोप आहे! काँग्रेसच्या काळात दरडोई ७५००० रुपये कर्ज होते, भाजपच्या काळात वाढून दरडोई ११५००० रुपये कर्ज झाले आहे. उद्या देश गहाण राहिला तरी चालेल, पारतंत्र्यमध्ये गेला तरी चालेल. यांचे वके मात्र भरले पाहिजेत. कारण हे लबाड भ्रष्टाचारी आमदार खासदार कर्मचारी थोडी भरुन देणार आहेत? सर्वसामान्य लोकांनो, बंधु भगिनींनो जागे व्हा! इतरांना जागे करा!

(दि. २८ ऑक्टोबर २०१९)

# २. वोटची अपेक्षा ठेवून मिक्सर वाटणे हा स्वातंत्र्यवीरांचा अपमान!

हा देश, हे संविधान, ही लोकशाही, ही निवडणूक पद्धत आणि ही वोटिंग सिस्टीम ही लोकांसाठी, सर्वसामान्यांच्या भल्यासाठी आहे. भारताच्या स्वातंत्र्यासाठी कितीतरी क्रांतिकारी हुतात्मे झालेत, कितीतरी महापुरुषांनी सर्वस्व दिले, यासाठी की गोरगरीब वंचितांना न्याय आणि समान संधी मिळावी म्हणून! गरीबीचा, परिस्थितीचा फायदा घेऊन मतदारांना मिक्सर, साड्या, दुपट्टे, नोटबुक इत्यादी वाटून त्यांचे मत मिळविण्यासाठी भावनांशी खेळ करणे हा त्या स्वातंत्र्यवीरांचा अपमान आहे! जे सैनिक लोकशाही प्रणित भारत देशाच्या सुरक्षेसाठी सीमेवर लढतात त्यांचा अपमान आहे! आपल्या श्रीमंतीचा उन्माद दाखवून मतदारांना वस्तू वाटणे हा देशद्रोह आहे, असे वक्तव्य गजेंद्र दि. चाचरकर यांनी केले. ग्रामविश्व संघर्ष वाहिनीच्या भिसी येथील पहिल्या जाहीर सभाप्रसंगी ते बोलत होते. दान धर्म करायला काही कोणाची मनाई नाही. कोणतीही गोष्ट खरेदी विक्री करता येते. पण लोकशाहीतील मतदारांच्या मतांची खरेदी विक्री म्हणजे लोकशाहीची हत्या आहे. दीनदुबळ्या मतदारांची शुद्ध फसवणूक आहे. मतदारांसोबत केलेले कपट करीत आहेत. अशा उमेदवारांकडून झालेली मदत हे मतदारांवर उपकार नाहीत, शुद्ध फसवणूक आहे, अधर्म आहे. अधर्म वृत्तीने तुमच्या समोर फेकलेल्या तुकड्यांना त्यांच्याच पद्धतीने उत्तर देणे आवश्यक आहे. खाल्ल्या मिठाला जागण्याची आपली धर्मवृत्ती या ठिकाणी लागू होत नाही. फेकलेल्या तुकड्यांना कृतज्ञ न राहता मतदारांनी सुद्धा अशा उमेदवारांसोबत कपट करुन धडा शिकवावा आणि निवडून देऊ नये असे आवाहन गजेंद्र दि. चाचरकर यांनी केले.

ग्रामविश्व चा उद्देश हा कोणत्या उमेदवार वा पक्षाला विरोध नाही. सहसा उमेदवार लोकांकडे आलेला पैसा हा अप्रत्यक्षपणे जनतेचाच आहे आणि तो छुप्या पद्धतीने लुटलेला असतो, असा जनतेचा आरोप आहे. समजा शासकीय निधीतून एखादे दहा लाखाचे काम झाले आणि आपण सिमेंट रेती गिट्टी आणि लेबर मोजले तर प्रत्यक्ष काम पाच लाखाचे होते आणि पाच लाख ही व्यवस्था मंत्र्यापासून चपराशीपर्यंत वाटून खाल्ले जाते. उमेदवाराकडे आलेला पैसा हा



त्याचाच वाटा आहे, असा आरोप आहे. ग्रामविश्व ही संघटना ही लबाडरुपी व्यवस्था बदलण्यासाठी प्रयत्नरत आहे. जर ग्रामगीतेतील ग्रामव्यवस्थानुसार दिलेल्या गाईडलाईननुसार संविधानात अमेंडमेण्ट केले आणि टप्प्याने अंमलबजावणी केली तर काही काळात परिवर्तन शक्य आहे. यासाठी ग्रामविश्व संघर्ष वाहिनीने आपला लढा उभारला आहे.

जर मतदार जनता आमच्या विचारांशी सहमत असेल तर आमची चिमूर विधानसभा लढण्याची तयारी आहे. तसा मतदारांनी आम्हांला अभिप्राय द्यावा असे नम्र आवाहन गजेंद्र दि. चाचरकर यांनी केले.

प्रमुख पाहुणे म्हणून संघर्ष वाहिनीचे संघटक मा. श्री मुकुंद अडेवार नागपूरहून आले होते. त्यांनी चिमूर जिल्हा झाला पाहिजे आणि चिमूर क्रांतीवर प्रकाश टाकला. मुकुंद अडेवार यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे संविधान आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची ग्रामगीता व महात्मा गांधी यांच्यातील साम्य सांगितले. सर्व ग्रामपातळीवर कार्य व्हावे, गाव सुधरेल तर देश सुधरेल, गावचा विकास तर सर्व देशाचा विकास ही संकल्पना यांची होती. मात्र आज शहरात विकास झाला की त्यांची जाहिरात गावभर दाखवून मेट्रो, बुलेटट्रेन, हा विकास दाखविला जातो मात्र गावातला माणूस या विकासापासून दूरच दिसतो... भिसी गावात कोणालाही मुद्रा लोन मिळाले नाही, दरिद्ररेषेची गणना झाली नाही त्यामुळे ज्याला खरी गरज आहे त्याला योजनांचा लाभ मिळाला नाही असे चित्र आहे. मात्र निवडणुकीच्या तोंडावर मतदाराला प्रलोभन गिफ्ट देऊन आपल्याकडे करण्याचे जोरकस प्रयत्न होत आहे. ज्यामुळे उघड्या डोळ्याने लोकशाहीची हत्या होत आहे, खरे तर अश्या गिफ्ट वाटणाऱ्या लोकांवर प्रतिबंध लावून देशद्रोहचा गुन्हा नोंदविला जावा असे संघर्ष वाहिनीचे अडेवार म्हणाले.

वाढोना येथील शेतकरी श्री. रविंद्र ढोणे यांनी सुभाष पाळेकर नैसर्गिक शेतीबद्दल मार्गदर्शन केले. सर्वांनी विषमुक्त शेती केली पाहिजे असे आवाहन केले.

विठ्ठल रखुमाई मंदिरामध्ये पूजा करुन ग्रामविश्व संघर्ष वाहिनीची रॅली काढण्यात आली. महात्मा गांधी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला माल्यार्पण केल्यानंतर बाजार चौक भिसी येथे सभेला सुरवात झाली. सभास्थानी सर्वश्री दिलीप खोब्रागडे, वसंता शिवरकर, रामचंद्र दिघोरे, लक्ष्मण चाचरकर, आनंद भानारकर, दिवाकर दिघोरे, सखाराम दिघोरे आणि इतरही

मान्यवर उपस्थित होते. संचालन श्री सारंग भिमटे यांनी केले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता सर्वश्री मनोज दिघोरे, किशोर दिघोरे, आनंद भिमटे, नानाजी बुधाराम मोहिणकर, हरिदास मोहिणकर, शुभम सुरेश कुमले, लखन दिघोरे, रोशन मोहिणकर, नारायण मोहिणकर, प्रभुजी चाचेरे आणि इतरही कार्यकर्त्यांनी मेहनत घेतली.

(दि. १९ सप्टेंबर २०१९, विमुक भटकंती)



# ३. भाजपाच्या जेष्ठ नेते चिमूर विधानसभा क्षेत्रातील मिक्सर घटनेची गंभीर नोंद घेणार कां? हे तर लोकशाहीचे धिंडवडे!!!

१६ जानेवारी शहीद दिन निमित्ताने भाजपाने महिलांना रक्षाबंधन निमित्ताने मा. मुख्यमंत्रीच्या अर्धांगिनीच्या उपस्थितीत मिक्सर वाटण्याचा कार्यक्रम ठेवण्यात आला. प्रचंड गर्दीमुळे त्या दिवशी मिक्सर वाटले नाहीत. पण आता गावोगावी मिक्सर वाटणे सुरू आहे.

**पण मित्रांनो यामागील मुद्दे समजून घेण्यालायक आहेत.**

नाही निदान ६० हजार महिला चिमुरात कार्यक्रमात आल्या असतील असा अधिकृत आकडा सांगतो. एकेकीला एक मिक्र समजा दिला (घरपोच, भाजप कार्यकर्ते बोलले तसे). नाही निदान कमीत कमी रुपये १००० प्रति मिक्सरचे पकडले तर, ६०००० गुणीला १००० = ६०,००,००,००० रुपये म्हणजे सहा कोटी!! वाढोना येथील झाडे साहेबांनी सांगितली बॉक्सवर ३००० रुपये लिहिले आहे. कंपनीमधून १००० रुपयांचा पडला असेल असं गृहीत धरू. इतर गावोगावी गाड्या घोड्या पाठविल्या महिलांना आणण्यासाठी तो खर्च वेगळा. बॅनर पोस्टर होर्डिंग हा प्रचार वेगळा. समजा निवडणूक जिंकण्यासाठी इतका प्रचंड खर्च येतो मग सर्वसामान्य लोकांनी निवडणू लढायची कशी? ही लोकशाही सर्वसामान्य लोक निवडणूक लढू नये यासाठी आहे का?

हा इतका पैसा येतो कुठून? आपली व्यवस्थाच अशी बनली आहे की कागदी बॅलन्स शीट वेगळ्या आणि छुपा व्यवहार वेगळा!! कोणी राजकीय नेता छाती ठोकपणे सांगत असेल की मी भ्रष्टाचार केला नाही म्हणजे काय समजायचे? आमदार खासदार निवडणूकीसाठी मिक्सर, साड्या, नोटबुक इत्यादी भेटवस्तू गावोगावी वाटतात असे नागरिकशास्त्र विषयाच्या अभ्यासक्रम पाठ्यपुस्तकमध्ये शिकवायला पाहिजे ना? असे बदल अभ्यासक्रममध्ये का करु नये? आमदार खासदार कर्मचारी ऑफीसर जनसेवक असतात असे फक्त पुस्तकमध्ये शिकविण्यासाठीच असते का? १०० टक्के लोक चोरी लबाडी भ्रष्टाचारी करतात असे नाही. काही ईमानदार व्यवस्थेत असतीलही हा भाग

वेगळा. प्रामाणिकतेच्या आपण सदैव पाठीशी आहोत!! पुस्तकात खरं खरं लिहायला पाहिजे.

**तिसरा मुद्दा....**

काँग्रेसच्या काळात प्रत्येक भारतीय नागरिकांवर ८०००० कर्ज होते. भाजप सरकारने त्यांच्या पाच वर्षाच्या काळात अंदाजे ४५००० रुपये दरडोई कर्ज अधिकचे घेतले. आता एकूण १२५००० रुपये प्रत्येकावर सरकारने कर्ज घेऊन ठेवले आहे. भाजप, आर.एस.एस.च्या माननीय नेत्यांनी पहिले व्यवस्था फिक्स करायला पाहिजे त्यानंतर लोन घ्यायला पाहिजे होते. कृपया माननीय आर.एस.एस.च्या गंभीर नेत्यांनी ही नोंद घ्यावी.

१००० रुपयांचा जो काही मिक्सर भेट म्हणून मिळत असेल तो ठेवून द्यायचा आणि उरलेल्या रकमेची मागणी पक्षाच्या कार्यकर्त्यांना करायला काय हरकत आहे? जर मिक्सर पक्षाच्या कार्यकर्त्यांनी आणून दिला म्हणजे पक्ष त्यात आलाच! पक्षाची जबाबदारी आलीच!! बरोबर की चूक? या प्रश्नाचे उत्तर भाजपा वरिष्ठांनी जरूर द्यायला पाहिजे.

समजा पक्षवाल्यांची १००० रुपयाची वस्तू तुम्हाला भेट दिली तर ४५००० रुपये कर्ज जे भाजप सरकारने दरडोई घेतले आहे. त्यामधून १००० रुपये वजा करुन बाकी ४४००० रुपये सरकारला परत मागायला मिक्सर आणून देणाऱ्या मिक्सर घेणाऱ्या महिलेने भाजप कार्यकर्त्याला सांगायला काय हरकत आहे? कारण सरकारने आपल्याला न विचारता आपल्या डोक्यावर इतके कर्ज वाढवून ठेवले आहे. उद्या हे कर्ज परत करायची वेळ आली तर हे राजकीय नेते, भ्रष्ट कर्मचारी वा ऑफीसर करणार आहेत का? सर्वसामान्य जनतेच्या टाळूवरचे लोणीच काढतील ना? मित्रा सर्वसामान्य माणसा, जागा हो रे बाबा!!!

**लोकशाहीचे धिंडवडे**

हजार दीड हजार रुपयाच्या मिक्सरसाठी गरीब महिला तीनशे साडेतीनशे रुपयाची वन सोडून सभेला येते म्हणजे सर्वसामान्य लोकांना पै पै कमविण्यासाठी किती प्रचंड त्रास होतो हे सिद्ध होते. फुकटचे मिळालेले क्षणिक आनंद देऊन जाते. फुकटचे मिळते तर कशाला सोडायचे? यामुळे पण लोक गर्दीने जातात. हे सुद्धा नाकारता येत नाही. पण याचाच फायदा घेण्याचा राजकीय लबाड लोक घेत आहेत. यामागील मुद्दे लक्षात घ्या. फक्त श्रीमंत लोकच निवडणूक लढतील



अशासाठी लोकशाही नाही. मिक्सर सारख्या वस्तू किंवा कोणत्याही वस्तू राजकीय नेत्यांनी प्रचंड प्रमाणात वाटणे, हे लोकशाहीसाठी खूप धोकादायक आहे. अशा घटनेची पक्षाच्या मोठ्या जेष्ठ नेत्यांनी गंभीरपणे नोंद घेणे आवश्यक आहे.

इतक्या प्रमाणात हजार तीन हजारचा मिक्सर वाटणे म्हणजे हा पैशाचा उन्माद आहे. आपल्या लोकशाहीसाठी, गोरगरीब सर्वसामान्य जनतेसाठी धोक्याची घंटा आहे. गरीब सर्वसामान्य जनतेच्या भावनांशी खेळ आहे. याला चारपक बसायला पाहिजे.

असे घडण्याला आपण आपल्या नामदारांना किंवा एका व्यक्तीला दोषी पकडू शकतच नाही. ही पूर्ण लोकशाही यंत्रणा व्यवस्थाच त्या दिशेने गेली आहे. न्याय आणि सत्याचा मर्डर झालेला आहे. आणि आपण सर्वसामान्य जनतेने आता गंभीरपणे मनावर घेऊन दुरुस्त करण्यासाठी ग्रामविश्व संघटनेच्या चळवळीला हातभार लावला आहे.

# ४. पक्ष कार्यकर्त्यांनो तुम्ही पैशासाठी काम करता का?

५०० कोटी संपत्ती असणारे नेते एका रात्रीत पक्ष बदलतात अन् स्वतःचे घर ही नसणारे कार्यकर्ते राजकीय तत्वज्ञान सांगून भांडत बसतात...

पक्ष कार्यकर्त्यांनो तुम्ही पैशासाठी काम करता का? तुम्ही खरोखर तुमच्या विद्यमान राजकीय पक्षाशी मनापासून जुळले आहात का? तुमची मुलं बाळं, कुटुंब धारेवर टाकून तुम्ही कशासाठी एवढी मेहनत घेता? तुमच्यापैकी काही ३०-३५ वर्षांपासून काम करीत आहात? मित्रपरिवार, समाज, नातेवाईक तुम्हाला रिकामचोट म्हणून संबोधतो. इतके सारे तुम्ही कशासाठी सहन करता? अंगमेहनतची स्वतःसाठी, कुटुंबासाठी इतर सर्वच लोक काम करतात. पण आपण कार्यकर्ते लोक समाजासाठी देशासाठी काही वेगळे म्हणून मेहनत घेता ना? निवडणूकच्या काळात पाच दहा दिवस फिरायचे, पाच दहा हजार आपल्या नेत्यांकडून मिळाले ते घ्यायचे फक्त यासाठी आपण आणि आपल्या आईवडिलांनी मेहनत घेतली का? तुम्हांला हे असे काम मजबूरीने करावे लागत आहे का? आणि तुम्हाला अपेक्षित असलेला बदल हे पक्षवाले नेते निवडून आल्यानंतर करतात का?

भाजपा असो वा काँग्रेस सर्व एका माळेचे मनी? कुठेही जा सारखेच. असा तुमचा समज झाला आहे का? नाही काही तर पाच दहा हजारच सही, नाही हजार तर शे-पाचशेच सही. नाही पाचशे तर शे-दोनशेच सही. म्हणून तुम्हांला ही पाच दहा हजार वाली सवय लागली का?

मतांसाठी बदल्यात वाटला जाणारा पैसा, हा पैशाचा माहोल यासाठी आपण बांधील असायला पाहिजे? निवडणूकमध्ये खर्च होणारा पैसा हा तुमचा आहे की लोकप्रतिनिधीचा? निवडणूकमध्ये खर्च होणारा पैसा हा तुमचा आहे की पक्षाचा? आणि पक्षाकडे पैसे कुठून येतो? या लोकनिधीतून होणाऱ्या कामातील छुप्या पद्धतीने लोकप्रतिनिधींनी लुटलेल्या पैशाचा हा चहा चिवडा मटण पार्टी आहे का? पक्षासाठी खर्च होणारा पैसा हा त्यांच्या घामाचा आहे का?

आजी माजी सरपंच, ग्रामपंचायत सदस्यांनो तुम्हांला का वाटते?

पक्ष कार्यकर्त्यांनो तुम्ही पैशासाठी काम करता का?



पण ही भारतातील भ्रष्ट व्यवस्था फिक्स व्हावी असे तुम्हांला वाटते का? कार्यकर्ता म्हणजे काय? कार्यकर्त्यांनी काय करायला पाहिजे? कार्यकर्त्यांच्या जबाबदाऱ्या काय असाव्यात? येणाऱ्या पुढल्या अंकात वाचा, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांना अभिप्रेत असलेला कार्यकर्ता!!!

(दि. ऑगष्ट २०१९)

# ५. ज्या झाडाच्या फांदीवर पंतप्रधान मोदी बसून आहेत ते तोडणार का?

मा. पंतप्रधान मोदी मध्ये देश बदलण्याची क्षमता नाही!!?? भाजपा कार्यकर्त्यांनो?? भारतीय लोकशाही मधील खरे वास्तव प्रॉब्लेम्स फिक्स करण्याची पंतप्रधान मा. नरेंद्र मोदीजी ची क्षमता आहे का?

१. गरीबांकडे तालुक्यातील कोर्ट असलेल्या गावी जाण्यासाठी, कोर्ट केस लढण्यासाठी, वकिलाला देण्यासाठी पैसे असतात काय? गरीबांना न्याय मिळण्याचा हक्क नाही काय? कोर्टात गेल्यावर लगेच न्याय मिळतो काय? लगेच न्याय मिळण्याचा आपल्याला हक्क नाही का? कोर्टमध्ये गेल्यावर लगेच न्याय मिळेल, गरीबांना ही न्याय मिळेल, कोर्टमधून सत्याचाच विजय होईल याची मोदी साहेब हमी देऊ शकतात का?

२. निवडणूकीत पैसे वाटून मत मिळविली जातात. निवडणुकीच्या तोंडावर नेते लोक देणग्या देत फिरतात. म्हणजे फक्त पैशेवाले श्रीमंतच निवडणूक जिंकू शकतात. मग गरिबांनो, निवडणुका जिंकायच्या नाहीत का? ही लोकशाही गरीब लोकांसाठी नाही काय? येणाऱ्या काळात निवडणूक काळात देणग्या, पैशे, पार्ट्या वाटल्या जाणार नाहीत याची हमी मोदीजी देऊ शकतात का? भाजप कार्यकर्त्यांनो, मेळावे मोर्चाचे आयोजन करतांना लागणारे पैसे आणण्यासाठी तुमच्या नेत्यांकडे जाता ना? मग हे पैसे येतात कुठून?

३. आबू बाबू शिक्षक इतर शासकीय नोकरी मिळण्यासाठी १५-२० लाख रक्कम मागितली जाते. इतके पैसे गरीब लोकांकडे असतात का? मग गरिबांच्या मुलांनी नोकरी करू नये काय? मग ही लोकशाही कोणासाठी आहे? हा प्रॉब्लेम मोदीजी ना दिसत नाही का? की इलेक्शनसाठी, पार्टीसाठी, चेले चपाट्या मार्फत पैसे जमा करण्यासाठी अशी नीती वापरतात? हे कधी थांबणार आहे?

४. पोलीस आरोपी कडून पैसे घेऊन साक्षी पुरावे आरोपपत्र बदलतात. गुंड उचक्के कोर्टातून मोकाट सुटतात. झक मारून सर्वसामान्यांना चोर गुंडांनाच मान सन्मान द्यावा लागतो. ज्यांच्यावर अन्याय झाला त्या फिर्यादीला पैशासाठी पोलीस छळतात, त्यालाच निमूटपणे अन्याय सहन करावा लागतो. दोष नसताना पोलीस कायद्याचा दुरुपयोग करुन निरपराध नागरिकांकडून पैसे लुटतात. पोलीस



खोटे काम करणारच नाहीत, पैसे लुबाडणार नाहीत याची हमी मोदीजी देऊ शकतात का?

५. शासकीय अधिकारी पैशासाठी कामचुकारपणा करतात, त्रास देतात, पैसे लाच लुचपत हाच त्यांना जन्मसिद्ध अधिकार वाटतो. ठेकेदाराला हेलपाटे मारायला लावतात. ठेकेदार, बिल्डर, लेआऊटवाले यांचेकडून लाच लुचपत घेतल्याशिवाय काम करीत नाहीत. प्रत्येक सार्वजनिक कामात स्थानिक नेते, आमदार, खासदार यांचे ही कमिशन ठरले असते. हे सर्व छुप्या पद्धतीने चालते. माहीत असूनही सर्वसामान्य लोक काहीच करू शकत नाहीत? असे यांच्या काळात झाले नाही, यानंतर ही असे होणार नाही याची हमी मोदीजी देऊ शकतात का?

हे सर्व फिक्स करण्यासाठी मोदीजी कडे योजना तरी आहेत का ?

उलट भाजपाच्या काळात दरडोई कर्ज पंच्याहत्तर हजार वरुन सव्वा लाख वाढले आहे. त्यासाठी देशातला सोना गहान ठेवण्यात आला असा आरोप आहे.

मित्रांनो, विचार करा. आपल्याला आज सुद्धा अख्ख्या भ्रष्टाचारी सिस्टिमला टक्कर देणाऱ्या संघटन चळवळीची आवश्यकता नाही का?

नवीन विचार, नवीन दिशा... जॉईन करा ग्रामविश्व चळवळ...

(दि. ७ ऑगष्ट २०१९, विमुक भटकंती)

## ६. भारतीय व्यवस्थेच्या नसानसात भिनलेला भ्रष्टाचार!!!

प्रॉब्लेम हा व्यवस्थेचा आहे! सर्वांना माहीत आहे की भ्रष्टाचार हा व्यवस्थेच्या नसानसात भिनला आहे! सर्वांना वाटते की व्यवस्था फिक्स करणे अशक्य आहे! बहुतेक ऑफिसर, कर्मचारी, मंत्री एक दुसऱ्याला बांधले आहेत!! बांधील आहेत!!! आवाज उठवून काही फायदा नाही!!! आणि या भ्रष्टाचाराने बोकाळलेल्या यंत्रणेला टक्कर देणे म्हणजे आत्महत्या करणे! व्यवस्था अशीच चालणार! गरीबांना, वंचितांना वा कमजोरांना गपचूप अन्याय सहन करावाच लागणार! सर्वसामान्य लोकांच्या डोक्यावर कर्ज घ्या!!! त्यांचेकडून टॅक्स घ्या!! काम करण्याचा आव आणा!!! अर्ध्या पैशाचे काम करा आणि अर्धे पैसे व्यवस्थेतील लोक लुटून खा!!! जनतेने मात्र एक एक पैसा कमविण्यासाठी मरमर मेहनत करावी!!! जनतेला सुद्धा तशीच सहन करण्याची सवय झाली आहे! त्यामुळे सर्व लोक दुर्लक्ष करीत आहेत.

शिवाजी महाराज होण्याआधी सर्वांना वाटायचे की मुस्लिम राजेशाहीला हिंदू राजे आणि सरदार टक्कर देऊ शकत नाहीत!!! हिंदू एकत्र येऊ शकतच नाहीत!!! हे असेच चालणार!! बाहेर देशातून आलेल्या त्या काळातील मुस्लिमांना कुराण आणि तलवार शिवाय काही दिसत नव्हते!! हिंदूंच्या मुली पळविणे काय? बलात्कार करणे काय? मंदिरे तोडणे काय? काहीही करा!! त्या मुस्लिम आक्रमकांना टक्कर देणे म्हणजे आत्महत्या करणे!! हिंदू जनतेने मुस्लिम आक्रमक राजेशाही कडून होणारा अन्याय गपचूप सहन करावाच लागणार! हाल हाल करुन मारतील!! हिंदवी स्वराज्य स्थापन होणे अशक्य आहे!! शिवाजी महाराजांनी तसाच विचार केला असता तर?

बाबासाहेब आंबेडकर होण्याआधी, मागासवर्गीय लोकांना वाटायचे हे असंच चालणार! व्यवस्था बदलणे अशक्य आहे. राज्य आणि व्यवस्था ही उच्चवर्णीय लोकांचीच मक्तेदारी आहे! मागासवर्गीय लोकांच्या नशिबी लाचारीचे आयुष्य आहे! हे असंच चालू द्यावे लागणार? स्वतःहून कोण आत्महत्या करायला धजणार? बाबासाहेब आंबेडकर यांनी सुद्धा तसाच विचार केला असता तर?

मित्रांनो, विचार करा! अशक्यचे शक्य करण्याची क्षमता ठेवा आणि जर तुम्हाला वाटते की हा देश तुम्ही बदलू शकत नाही, अशक्यचे शक्य करू शकत नाही तर मग शिवाजी महाराज, बाबासाहेब आंबेडकर इत्यादी महात्म्यांच्या जयंती, पुण्यतिथी साजरे करणे सोडा!

(दि. ५ ऑक्टोबर २०१९, विमुक भटकंती)





## ७. कपटाला कपटानेच मारता येते का ?

**देश गहाण राहण्याची फिकीर नसणाऱ्या नेत्यांना धडा शिकवा!!!**

शहीदांनी कां म्हणून देशासाठी बलिदान केले? का म्हणून त्यांनी बलिदान करावे? हा देश स्वतंत्र होऊन या देशात लोकशाही उभी व्हावी, गोरगरीब वंचित सर्वांना समान हक्क मिळावा यासाठी! त्यातूनच संविधान, निवडणूक प्रणाली आणि मत अधिकाराचा जन्म झाला!!! तुम्ही काहीही विकत घेऊ शकता! पण मत नाही! मत विकत घेणे म्हणजे राष्ट्रद्रोह! मत विकत घेणे म्हणजे शहीदांचा अपमान! पैसा, वस्तूचे प्रलोभन देऊन मत विकत घेणे म्हणजे मतदारांसोबत कपट आहे! कपटाला कपटानेच संपविता येते! मतांच्या बदल्यात पैसे, वस्तु, पार्ट्या देणे म्हणजे कुत्र्यासमोर फेकलेला तुकडा आहे! आपल्या पुढ्यात फेकलेल्या तुकड्यांमधून, निवडून आल्यावर ते त्यांची स्वतःची उद्याची गलेलठ्ठ लुटमारीची व्यवस्था करीत आहेत!! हे लक्षात घ्या!! अशा उमेदवारांकडून झालेली मदत हे मतदारांवर उपकार नाहीत तर शुद्ध फसवणूक आहे! अधर्म आहे! अधर्म वृत्तीने तुमच्या समोर फेकलेल्या तुकड्यांना त्यांच्याच पद्धतीने उत्तर देणे आवश्यक आहे. खाल्ल्या मिठाला जागण्याची आपली धर्मवृत्ती या ठिकाणी लागू होत नाही! फेकलेल्या तुकड्याना कृतज्ञ न राहता मतदारांनी सुद्धा अशा उमेदवारांसोबत कपट करावे!!! उमेदवार आणि त्यांच्या कार्यकर्त्यासोबत गोडगोड बोलून जे काही लुबाडता येते ते लुबाडायचे आणि भलत्यालाच मत देणे आवश्यक आहे!!! तेव्हाच अशा कपटी वृत्तींना संपविता येतील!!! आणि आपला देश वाचविता येईल!!!

सर्वसामान्य लोकांनी क्रांतीवीर शहीदांचा त्याग आठवावा!! या देशात सर्वसामान्य लोकांच्या डोक्यावर कर्ज घेऊन किंवा त्यांनी दिलेल्या टॅक्समधून पैसा उभा केल्या जातो! प्रचंड काम केल्याचा आव आणल्या जातो. अर्ध्या पैशाचे काम केले जाते. अर्धे पैसे अधिकारी कर्मचारी आमदार खासदार मंत्री लुटून खातात असा त्यांचेवर जनतेचा आरोप आहे! अशा व्यवस्थेत हे शासन कर्ज फेडणे शक्य नाही! उद्या जाऊन देश गहाण राहिला का? की सर्वसामान्य गहाण राहिला का? कोणत्याही नेत्याला काही फिकीर नाही! त्यांच्या कपट वृत्तीला कपटानेच संपविणे अती गरजेचे आहे!!! कृपया जागृत व्हा! सजग व्हा!!! आपल्या येणाऱ्या पिढ्यांच्या सुख शांती समाधानाची व्यवस्था करा!

(दि. ६ ऑक्टोबर २०१९, विमुक भटकंती)

गजेंद्र दि. चाचरकर च्या मनातील धगधग – ३

## ८. देश गहाण राहिला तरी चालेल पण चोर उचक्क्या आमच्या नेत्यांनाच मतदारांनी निवडून द्यावे –– कट्टर प्रस्थापित कार्यकर्ते.

सुटबूट पांढऱ्या शुभ्र चकाचक पेहरावात सोबत लोकांचा लवाजमा घेऊन नेत्याने घरी भेट दिली की, सर्वसाधारण माणसाला सुद्धा फार बरं वाटते! बरेच लोक हुरळून सुद्धा जातात!! वरुन साहेबांनी पाया लागून नमस्कार केला की विचारूच नका!!! बाप्पा! अबे माझ्या त आमदारानेच पाया लागल्या!!! साहेबानी माझ्या घरी चहा पेल्ला!! अभिमानाने दुसऱ्या लोकांना वर्षानुवर्षे सांगत राहतात. साहेबाने मला झुकून नमस्कार केला! साहेब माझ्या घरी आले! सांगताना छाती कशी भरुन येते!! लबाड नेत्यांनी साध्याभोळ्या जनतेचा घेतलेला स्वार्थभेद आहे हा!! आपले वके भरण्यासाठी!! उद्या जाऊन पुन्हा कसा मी निवडून येईल, खूप सारे कामे मंजूर करीन आणि त्या कामातील कमिशन कसा वखरीन? असे मात्र नेत्यांचा डोक्यात फिरत असते! आजकालच्या नेते लेकांनी सर्वसाधारण लोकांच्या घरी दिलेली भेट, त्यांनी केलेला नमस्कार ही निस्वार्थ, निस्पृह, निरपेक्ष नाही तर त्यामागे कपट दडलेले असते!!! गोड गोड बोलून, मन भरुन स्तुती केल्याने कार्यकर्तेसुद्धा पार भाळून जातात!!! (चक्कर येऊन पडायचेच तेवढे बाकी राहतात!!) साहेबासाठी जीव द्यायला तयार!! पण या गोड बोलण्यामागे, तोंड भरुन केलेल्या स्तुती मागे नेत्यांचा स्वतःचा स्वार्थ दडला असतो!! कार्यकर्त्याला दिलेल्या दोन चार हजाराच्या मदतीमागे नेत्यांचा लाखो रुपयांचा स्वार्थ दडला असतो! त्यांच्या या मधुर बोलण्यातून, शब्दांच्या बाणातून, लवचिक शब्द फेकीतून कार्यकर्त्यांना वचनात बांधण्याची किमया या लबाड नेत्यांकडे असतेच असते!! गोड शब्दांच्या बाणातून, मृदुल वागण्यातून आमच्या कार्यकर्त्यांची छाती पार फुगून जाते! माझ्या एवढ्या मोठ्या नेत्याची माझ्या सारख्या गरीब क्षुल्लक कार्यकर्त्यांची एवढी काळजी? एवढा मोठा मान सन्मान? मान सन्मानासाठी उपाशी असलेल्या कार्यकर्त्यांच्या डोळ्यावर नेत्यांनी कशी पट्टी बांधली पत्ताच चालत नाही!!

मंदिराला बांधकामासाठी निधी मिळवून दिला! इतकी कामे मंजूर केली, तितका निधी मिळवून दिला!! असा ठासून प्रचार केला जातो. जसा काही त्यांनी आपल्या घरुन दिला!!! कोणत्या क्रीडा मंडळसाठी सुद्धा पैसे मंजूर केले की



मंडळ वाले खुश!!! पण तो कुठून आला? देश गहाण ठेवून आमच्या नेत्यांनी जरी आणला असेल तरी चालेल!! अशी धारणा आमच्या कार्यकर्त्यांची झाली आहे!!

सत्तर ऐंशी वर्षात जेवढ्या प्रमाणात भारत देशावर कर्ज घेण्यात आला नाही तो पाच वर्षात भाजपच्या काळात घेतला गेला असा त्यांचेवर आरोप आहे. जेवढी कामे काँग्रेसच्या काळात झाली नाही ती भाजपच्या काळात झाली! आमचा प्रत्येक आमदार खासदार म्हणजे कार्यसम्राट!!! हे कसे शक्य झाले? उद्या जाऊन ही कर्ज परतफेडची पाळी येईल तेव्हा हे आताचे भ्रष्ट लोकप्रतिनिधी, ऑफिसर, कर्मचारी स्वतःच्या खिशातून पैसे देणार आहेत का? देशाला गहाण ठेवा की जनतेला गहाण ठेवा! उद्या जाऊन परत पारतंत्र्य यायचे!!!

जाणाऱ्या–येणाऱ्या पाच वर्षात विधानसभा क्षेत्रात २००० कोटी खर्च केले, करणार? प्रत्येक शासकीय निधीतून मंजूर झालेल्या कामात ४०–५० टक्के रक्कम चपराशी, कर्मचारी ऑफिसर पासून मंत्रालय मधील सचिव, मंत्री पर्यंत कमिशन वाटले जाते असा जनतेचा आरोप आहे!!! त्या रकमेपैकी या सिस्टिममध्ये कमीत कमी १० टक्के कमिशन आमदाराच्या कोट्यात जमा होते (समजा आमदार चालू असेल तर) असा आरोप आहे!! ते १० टक्के होतात, २०० कोटी!!! जमा होतात आमदाराच्या खाजगी ट्रस्टच्या खात्यात? वरुन आमदार स्वतः ठेकेदार असेल किंवा डमी ठेकेदार असेल तर अधिकच २०–३० टक्के नफा कमिशन वेगळे!! हे क्षेत्रातील जनतेच्या कामासाठी नियोजित अंदाजे २००० कोटी येतील कुठून??? इतका टॅक्स क्षेत्रातला सरकारकडे जमा होतो का? हे सर्वसामान्य लोकांच्या डोक्यावर घेतलेले कर्ज आहे!! मग हे २००० कोटी कर्ज फेडणार कोण आहे?? मात्र दोन चार हजाराच्या होणाऱ्या मदतीसाठी, खोट्या स्वार्थासाठी केलेल्या कौतुकामुळे आमचा कट्टर कार्यकर्ता मात्र डोळ्यांवर पट्टी बांधून भाळून जातो!! देश गहाण राहिला तरी चालेल पण आमच्या चोर लबाड नेत्यालाच निवडून द्या असा प्रचार करीत तो फिरत असतो!!

(दि. ८ ऑक्टोबर २०१९, विमुक भटकंती)

## ९. मत मागायला आले तर मतदारांनी कट्टर कार्यकर्त्यांना जोड्याने का मारू नये?

मित्रा, कार्यकर्त्या, इतके वर्ष तू आमचेकडे मत मागत आहेस! तुला माहीत आहे आमच्यावर किती कर्ज आहे! देश गहाण ठेवल्यावर, पुन्हा पारतंत्र्यात गेल्यावर मग तू आम्हाला जागृत करणार का? उद्या आम्हाला हे नेते लोक गहाण ठेवू शकतात! देशाला गहाण ठेवू शकतात? एक तर तू तुझ्या नेत्याला जोड्याने मार नाही तर आम्ही तुला जोड्याने मारतो! इतके दिवस तुझ्या नेत्याने तुला अंधारात ठेवले! आणि वोट मागताना आम्ही तुझे ऐकले कारण तू आम्हाला अंधारात ठेवले!!!

आमच्या प्रत्येकावर आज एक ते सव्वा लाखाचे कर्ज आहे! काँग्रेसच्या काळात ७५ ते ऐंशी लाखाचे कर्ज होते! दोन्ही पक्ष माळेचे मनी! आणि मित्रा, कार्यकर्त्या तू पुन्हा मत मागायला आलास? हे काम केले, ते काम केले गवगवा करता!! काम करण्यासाठी फुकटचा पैसा येतो का? आमच्या डोक्यावर कर्ज घेतले, वाढविले ते का सांगत नाही? अख्ख्या जगात मंदी असतांना, सर्व व्यावसायिक डुबीत असूनही या नेत्यांच्या जमिनी, फॅक्टच्या, बंगले मालमत्ता अश्या कशा दिवसेंदिवस वाढत आहेत? त्यांचेकडे मतदारांना वाटायला पैसे काय आले? जे कोणते सरकारी काम करतात त्यातील ४०–५० टक्के रक्कम कर्मचारी, ऑफिसर, आमदार, खासदार, सचिव, मंत्री वाटून खातात असा आरोप आहे? अशी यंत्रणा असूनही आमच्या डोक्यावर सरकारने कर्ज कशाला घेतले? आम्ही कुणाचे एका पैशाचे डागील राहत नाही? आणि यांनी आमच्या डोक्यावर कर्ज कसे का घेतले? उद्या कर्जफेड करायची पाळी आली तर हे आताचे भ्रष्टाचारी नेते, ऑफिसर करणार आहेत का? मित्रा कार्यकर्त्या आम्ही तुम्हाला जोड्याने का मारू नये? कोणत्या तोंडाने आम्हाला तू मत मागत आहेस?

(दि. ११ ऑक्टोबर २०१९, विमुक भटकंती)



## १०. चराचरात वास करणारी भ्रष्टाचारी शक्ती?

लोकप्रतिनिधी पेपरमध्ये छापतात की, समाजाचे ऋण फेडतो! प्रत्यक्ष मात्र लोकप्रतिनिधी अट्टल लुटारुचे काम असतात. खासदार किंवा कोणत्याही लोकप्रतिनिधींनी म्हटले की, समाज ऋण फेडतो. म्हणजे समजायचे समाजाच्या डोक्यातील कर्ज वाढवितो आणि आपले वके भरतो!! त्यांनी म्हटले की, गावोगावी जाऊन कामाचा आढावा घेतला म्हणजे समजायचे की गावोगावी जाऊन जे काम चालू आहेत वा झालेत त्या कामासाठी झालेल्या रकमेपैकी किती रक्कम त्यांच्या खाजगी ट्रस्टच्या खात्यात जमा झाली त्याचा आढावा घेतला!!!

उदाहरण म्हणून समजा तुकडोजी महाराजांच्या तपोभूमी अड्याळ टेकडीसाठी ३० लाख मंजूर झालेत. समजा काम पूर्ण झाले आणि काम झाल्यावर एखाद्या खाजगी तांत्रिक लेखापरीक्षक कडून तपासलं तर माहीत होईल की प्रत्यक्ष काम १५ लाखाचे आहे! मग १५ लाख कुठे गेले तर मंत्री, संत्री, ऑफिसर, कर्मचारी, आमदार, खासदार सर्वांनी सुनियोजित सुनियंत्रितपणे वाटून खाल्ले!! असा जनतेचा आरोप आहे. मग यातील काही पैसा, हजार दोन हजार प्रत्येकी, कार्यकर्ते लोकांना मिळतो आणि कार्यकर्त्यांना सुद्धा आपले आमदार खासदार लोकप्रतिनिधी लाडके वाटायला लागतात.

साठ वर्षात जेवढ्या प्रमाणात कर्ज घेण्यात आला नाही तो पाच वर्षात भाजपच्या काळात घेतला गेला असा त्यांचेवर आरोप आहे. जेवढी कामे काँग्रेसच्या काळात झाली नाही ती भाजपच्या काळात झाली, हे कसे शक्य झाले?

उद्या जाऊन ही कर्ज परतफेडची पाळी येईल तेव्हा हे आताचे भ्रष्ट लोकप्रतिनिधी, ऑफिसर, कर्मचारी स्वतःच्या खिशातून पैसे देणार आहेत का? देशाला गहाण ठेवा की जनतेला गहाण ठेवा! फिकीर कोणाला आहे? उद्या जाऊन परत पारतंत्र्य यायचे!!!

लोकप्रतिनिधीतून भरमसाठ लुटा आणि थोडेसे जनतेसाठी स्वनिधी म्हणून वाटा! अशी नीती असलेले चोर उचक्के नेते आणि त्यांचे पैसे खाऊ चेले!! कार्यकर्त्यांना मात्र हेच पैसे खाऊ नेते चारित्र्यवान आणि दानशूर वाटतात. जय हो हमार अंधेर नगरी की!! बाप मेला तरी बेहत्तर पण नेत्याला लुटू दे!! असे हे आमचे कार्यकर्ते???

शाळेत जेव्हा अभ्यासक्रमात सुद्धा का बदल करू नये? नागरिकशास्त्र विषयात आमदार खासदार हे जनतेचे प्रतिनिधी म्हणून स्वनिधी शाळेत वह्या पुस्तके साड्या मिक्सर वाटतात हे शिकवायला पाहिजे. आणि हा स्वनिधी कुठून येतो हे सुद्धा शिकवायला पाहिजे. शाळेत शिकवितात एक आणि आमदार खासदार मंत्री करतात भलतेच अशी भारतातील अभ्यासक्रमची गत आहे. खरेखुरे सत्य अभ्यासक्रमामध्ये का शिकवू नये?

गेल्या साठ वर्षात चिमूर राष्ट्रीय महामार्गावर नव्हता या पाच वर्षात मात्र झाला. फक्त चिमूर नाही तर भारत भारतातील पूर्ण गावे राष्ट्रीय महामार्गावर येतील आणि येत आहे! कारण काँग्रेसच्या आठ वर्षात दरडोई अंदाजे पंच्याहत्तर हजार असणारे कर्ज भाजपाच्या पाच वर्षाचा काळात दरडोई सव्वा लाख झाल्याच आरोप आहे! एवढे पैसे कर्ज घेऊन तो वापरुन विकासाचा आव आणल्या जात आहे.

जर तुमच्या मा. आमदार खासदारच्या काळात दोन हजार कोटीची कामे मंजूर झाली असतील तर त्याची कमीत कमी दहा टक्के रक्कम आमदार खासदारच्या घशात गेली असेल आणि आमदार खासदार स्वतः ठेकेदार असेल किंवा त्यांच्या जवळच्या नातेवाईकाला काम दिले असेल तर आमदार खासदारचा टक्का पुन्हा दहा पंधरा टक्के वाढला असे समजावे. मंजूर झालेल्या दोन हजार कोटी पैकी वास्तविक काम फक्त एक ते दीड हजार कोटीचे होणार आणि पाचशे ते हजार कोटी मंत्री आमदार खासदार ऑफिसर कर्मचारी इत्यादीला छुप्या पद्धतीने जातो. दोन चार हजार प्रत्येक कार्यकर्ते लोकांना सुद्धा जात असेल!!! अशी आहे आपली व्यवस्था. हास्यास्पद!!! एका जाणकाराच्या मते! बरेच प्रोजेक्ट कागदावर असतात आणि मंजूर होऊन यंत्रणा पैसे खाऊन मोकळी होते. म्हणजे शून्य टक्के काम शंभर टक्के शासकीय निधीच्या बदल्यात!!

आपण सर्वसामान्य लोकांनी मरमर करुन पोटपाणी साठी पैसा कमवायचा आणि आपण दिलेल्या टॅक्सच्या रकमेतून किंवा आमच्या डोक्यावर कर्ज घेऊन, जमा झालेल्या विकासनिधीमधील लूटमार करणारे हे लोक!!! असा यांचेवर आरोप आहे.

साधक वर्ग जो सामाजिक धार्मिक कामे करतात, चालवितो, मंडळसाठी सर्वस्व अर्पण करीत आहे. त्यांच्या साधे भोळेपणाचा फायदा घेऊन ही सरकारी व्यवस्था आपले वके भरत आहे! तीस कोटी मधून पंधरा कोटी या व्यवस्थेच्या



वक्यात जातील. सर्व मंत्री, ऑफिसर, कर्मचारी, आमदार, खासदार ओरबाडून खातील आणि ३० कोटी सांकशन केले म्हणून तुम्ही या लोकप्रतिनिधी बाबत सकारात्मक भूमिका ठेवाल आणि हे लोकप्रतिनिधी आपल्या पुढल्या निवडणूकीची तजवीज लावतील. या विकास निधीमधील एक पैसा सुद्धा साधक वर्ग घेत नाही असे एका साधकांनी सांगितले.

(दि. ८ ऑक्टोबर २०१९, विमुक भटकंती)

## ११. आठवा तुम्ही राष्ट्रसंतांना!

आठवा तुम्ही राष्ट्रसंतांना!

आठवा तुम्ही राष्ट्रसंतांच्या शिकवणीला!

करा त्यांना विनम्र अभिवादन!!!

चिमूर ब्रम्हपूरी विधानसभा क्षेत्रात मिक्सर, साड्या वा इतरही वस्तू

आणि पैशाचं प्रलोभन देऊन वोट मागण्यात येत आहेत!!!

दाखवा त्यांना झटका!! घाला त्यांना खीळ !!!

जनतेची काम करतो असा आव आणायचा,

जनतेच्या डोक्यावर कर्ज घ्यायचे,

देश गहाण राहिला तरी चालेल,

प्रत्येक शासकीय कामात आपले कमीशन वखरायचे,

जनतेसाठी राबतो असा आव आणायचा, शिकवा यांना धडा!!!

राष्ट्राचा घात करणारे हे पैसा पिपासू, जनतेचा पैसा लुटणारे हे लूटमार!!!

दाखवा त्यांची त्यांना जागा!!!

१९ ऑक्टोबर राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचा मोझरी गुरुकुंज

येथील पुण्यतिथी सोहळा!!! करा एका चांगल्या कामाची सुरुवात !!!

आणि करा राष्ट्रसंतांना विनम्र अभिवादन !!!

जय गुरुदेव !!!

(दि. १९ ऑक्टोबर २०१९, विमुक भटकंती)



## १२. सांगा दादा, मी वोटिंगला का म्हणून जाऊ?

हा काँग्रेस पक्षाचा उमेदवार

या पक्षाने सर्वसामान्य जनतेवर ८० हजारचे कर्ज घेऊन ठेवले होते!!! मी त्याला वोट का म्हणून देऊ?

हा भाजपा पक्षाचा उमेदवार

या पक्षाने सर्वसामान्य जनतेवर जास्तीचे ३५ हजारचे कर्ज गेल्या ५ वर्षात वाढविले!!! मी त्याला वेट का म्हणून देऊ?

हे जाऊन उद्या शासकीय निधी मंजूर करतील! त्यापैकी ४०-५० टक्के रक्कम चपराशी, कर्मचारी, ऑफिसर, आमदार, खासदार, मंत्री वाटून खातील!! उद्या देशाला गहाण ठेवतील!!!

सांगा दादा, मी वोटिंगला का म्हणून जाऊ?

हा तिसरा पक्षवाला,

यांचेकडे वाटायला पैसे कुठून आले? याने कुठं डाका टाकला होता? यांचेकडून कुठून आले दोन नंबरचे पैसे? मी या चोर लबाड उमेदवाराला का म्हणून वोट देऊ?

सांगा दादा, मी वोटिंगला का म्हणून जाऊ?

हा माझा गरीब उमेदवार,

त्याच्याजवळ वाटायला पैसा नाही!!! वोटर विचारुन राहले दारू चिवड्याची सोय आहे का!!! सांगा तुम्ही, या पूर्ण शेकडो गावात, लाखो वोटरला आम्ही पैसा कुठून देऊ???

सांगा दादा, मी वोटिंगला का म्हणून जाऊ?

(दि. २२ ऑक्टोबर २०१९)

# १३. विधानसभा निवडणूक एक दृष्टिक्षेप

मतांच्या बदल्यात पैसे, दारू, मटण वाटणाऱ्या कार्यकर्त्यांनो तुम्ही पापाचे वाटेकरी आहात का?

तुमच्या नेत्याला मत मिळण्यासाठी पैसे, दारू, मटण वाटणाऱ्या कार्यकर्त्यांनो, तुम्ही चुकीच्या वृत्तीला साथ देत आहात??? डाकू लोकांपेक्षा हे असले लोकप्रतिनिधी खतरनाक आहेत!!! याची तुम्हाला कल्पना आहे का? कृपया हे पूर्ण वाचा.

जे आमदार वा उमेदवार शासकीय निधी, जनतेच्या कामातील कमिशन वकरण्यात एक नंबर एक्सपर्ट आहेत ते या देशाचे भले करू शकतो असे तुम्हाला वाटते का?

आताच्या परिस्थितीत पक्षाचे विचार म्हणजे चोर लबाड लुच्चे विचार? वस्तू पैसा दारू चिवडा वाटायचे आणि मत मिळवायचे या विचारांना चोर लबाड लुच्चे विचार नाही म्हणणार तर काय म्हणणार!! संघटनात्मक कार्य आणि त्यासाठी मेहनत यासाठीच केली जाते का? यासाठीच पक्षांची स्थापना महापुरुषांनी केली होती का? कार्यकर्ते बघून हजार दोन हजार, पाच, दहा हजार, वीस पंचवीस हजार रुपये कार्यकर्त्याच्या हातात मिळाले म्हणजे समजायचे की नेत्याने माझी दखल घेतली. आम्हाला सन्मानजनक वागणूक मिळाली, आम्हाला आमदाराने विचारले!! दुसऱ्या कार्यकर्त्याला जास्त मिळाले आणि आपल्याला अपेक्षेपेक्षा कमी मिळाले तर सन्मानजनक वागणूक मिळाली नाही!! या विचारधारेवर आधारलेले हे पक्ष आणि कार्यकर्ते!! यालाच म्हणतात कार्यकर्त्यांचा मानापमान?? पक्षाची ध्येयधोरणे आणि त्याची अंमलबजावणी म्हणजे मतदारांना पैसे दारू वस्तू वाटणे, त्यांची बरोबर अंमलबजावणी करणे आणि जे प्रामाणिकपणे वाटण्यासाठी कार्यकर्त्याचे प्रशिक्षण?

ब्रह्मपुरी चिमूर क्षेत्राच्या काही भागात दोनशे पाचशे हजार रुपये वाटल्याची खबर आहे. गरीब बिचारे अज्ञानी अडाणी लोकसुद्धा पैसे दारू घेऊन पाप करीत आहेत पण त्यांचा अपराध क्षम्य आहे. पण लबाड, कपटी, चतुर लोकप्रतिनिधीने अशी कामे हेतुपुरस्सर करणे म्हणजे त्यांचा हा गुन्हा अक्षम्य आहे. चोर लबाड लोकप्रतिनिधी लोकशाही मांडण्याचे काम करीत आहेत आणि तुम्ही त्यात सहभागी होत आहात!!



मतांची अपेक्षा ठेवून लोकांना दारू, वस्तू आणि पैशे वाटणे, मिक्सर, साड्या सारख्या वस्तू वाटणे म्हणजे पाप! अशा लोकप्रतिनिधींना खीळ बसणे फार आवश्यक आहे. तुम्ही लोक सुद्धा या पापात सामील होताय! म्हणजे लोकप्रतिनिधी जे पाप करीत आहेत, त्या पापात तुम्ही सुद्धा तीळभर का होईना भागीदार आहात. मात्र यानंतर तुमच्या हातून असे नको होवो अशी ईश्वरचरणी प्रार्थना!

(दि. २८ ऑक्टोबर २०१९)

# १४. डोळे उघड कार्यकर्त्या डोळे उघडे! अरे हे दुसऱ्या तिसऱ्या वर्गाचे गणित आहे रे मित्रा!!

पाच वर्षात २००० कोटीचा निधी! २००० कोटीची कामे मा. आमदारांनी खेचून आणली असा उल्लेख या पुरवणीत आहे. कुठून आला हा निधी? इतका निधी टॅक्स मधून जमा होणे शक्य नाही! मंत्रालयात काय झाड आहे का पैशाचे?

अंदाजे चिमूर विधानसभेची लोकसंख्या ४ लाख असेल तर २००० कोटी/४लाख= ५० हजार रुपये प्रत्येकी! म्हणजे गेल्या ५ वर्षात अंदाजे ४० ते ५० हजार रुपये कर्ज चिमूर विधानसभेतील प्रत्येक व्यक्तीवर घेतले आहे.

या पाच वर्षात २००० कोटी खर्च केले, करणार? प्रत्येक शासकीय निधीतून मंजूर झालेल्या कामात ४०-५० टक्के रक्कम चपराशी, कर्मचारी, ऑफिसर पासून मंत्रालय मधील सचिव, मंत्री पर्यंत कमिशन वाटले जाते असा जनतेचा आरोप आहे! त्या रकमेपैकी या सिस्टिममध्ये कमीत कमी १० टक्के कमिशन आमदाराच्या कोट्यात जमा होते (समजा आमदार चालू असेल तर) असा आरोप आहे. ते १० टक्के होतात, २०० कोटी! आणि हे अंदाजे २००० कोटी कर्ज फेडणार कोण आहे?

(दि. २ ऑक्टोबर २०१९)

## १५. भाजपा कार्यकर्त्यांनो, काँग्रेस कार्यकर्त्यांनो, कृपया लक्षात घ्या! तुम्ही मत मागून जनतेची फसवणूक करीत आहात!

काँग्रेसच्या काळात ७० वर्षातले अंदाजे ८० हजार दरडोई कर्ज होते. मोदी सरकारच्या काळात अंदाजे ३०-३५ हजार लोन जास्तीचे घेण्यात आले. सरकारी कागदावर जे काम १० लाखाचे ते प्रत्यक्षात ५ लाखाचे असते आणि उरलेली रक्कम चपराशी, कर्मचारी, ऑफिसर, सचिव ते मंत्री पर्यंत कमिशन रुपात खाल्ली जाते असा आरोप आहे. अमेरिकन लोकांवरही दरडोई कर्ज आहे पण शासन यंत्रणा व्यवस्था स्वच्छ असल्याने कर्ज परत करण्याची क्षमता त्यांच्या सरकारात असते. बहुतेक सर्व एशियन देशात पाक, नेपाळ, बांग्लादेश इत्यादी. या देशात शासकीय यंत्रणा भ्रष्ट असल्याने तेथे लोकशाही फेल होत आहे. उद्या जाऊन कर्जाच्या बदल्यात भारताचा भूभाग बळकावला जाऊ शकतो व परत पारतंत्र्य येऊ शकते आपल्यावर!

खूप सारे काम भाजपा आमदाराच्या काळात झाले जे ३५ वर्षात झाले नव्हते. त्याला कारण ३५ हजार दरडोई कर्ज! ते ही सर्वसामान्य लोकांच्या डोक्यावर! पण हा बजेट मधला पैसा हा लोकांच्या डोक्यावर घेतलेल्या कर्जाचा आहे किंवा लोकांनी कर स्वरुपात दिलेल्या पैशातून!

जनतेच्या डोक्यावर प्रचंड कर्ज वाढत आहे. समजा जर यंत्रणा व्यवस्था भ्रष्टाचारी आहे. १० लाखच्या प्रोजेक्टमधले अर्धे पैसे यंत्रणा खाते अशा परिस्थितीत सरकारने लोन घ्यायलाच नको होते.

सर्वसामान्य लोकांच्या डोक्यावर कर्ज घेऊन विकास दाखविणे आणि मत मागणे म्हणजे लोकांची फसवणूक आहे. मतदारांना मत मागून तुम्ही या पापाचा भागीदार होत आहात? मी कोणत्या पक्षाच्या विरोधात नाही. पण आपणास कार्यकर्ता म्हणून याबद्दल कल्पना आहे का? मतदारांना, सर्वसामान्य नागरिकांना तुम्ही अंधारात ठेवू नये! खरं खरं सांगावे आणि नंतरच मत मागावे!

(दि. २ ऑक्टोबर, २०१९)



**भाग-१७ : प्रॉब्लेम्स आणि उपाय**

# १. भारतीय लोकशाही मधील प्रॉब्लेम्स

१. निवडणुकीत पैसे वाटून मत मिळविली जातात. निवडणूकीच्या तोंडावर नेते लोक देणग्या देत फिरतात. म्हणजे फक्त पैसेवाले श्रीमंतच निवडणूक जिंकू शकतात. मग गरीबांनी निवडणूका जिंकायच्या नाहीत का? ही लोकशाही गरीब लोकांसाठी नाही काय? येणाऱ्या काळात निवडणूक काळात देणग्या, पैसे, पार्ट्या वाटल्या जाणार याची हमी भाजप, काँग्रेस इ. कोणताही पक्ष आमदार खासदार देऊ शकतो का?

२. आबू बाबू शिक्षकच्या नोकरी मिळण्यासाठी १५-२० लाख रक्कम मागितली जाते. इतके पैसे गरीब लोकांकडे असतात का? मग गरीबांच्या मुलांनी नोकरी करू नये काय? मग ही लोकशाही कोणासाठी आहे?

३. अन्याय झाल्यास कोर्टात जाण्यासाठी वकीलाची फी द्यावी लागते. गरीबांकडे कोर्ट केस लढण्यासाठी, वकीलाला देण्यासाठी पैसे असतात काय? गरीबांना न्याय मिळण्याचा हक्क नाही काय? कोर्टात गेल्यावर लगेच न्याय मिळतो काय? लगेच न्याय मिळण्याचा आपल्याला हक्क नाही का? कोर्टमधे गेल्यावर लगेच न्याय मिळेल, गरीबांना ही न्याय मिळेल, कोर्टमधून सत्याचाच विजय होईल याची हमी कोणता पक्ष, कोणता नेता देऊ शकतो?

४. पोलीस आरोपी कडून पैसे घेऊन साक्षी पुरावे आरोपत्र बदलतात, गुंड चोर उचक्के कोर्टातून मोकाट सुटतात. झक मारुन सर्वसामान्यांना चोर गुंडांनाच मान सन्मान द्यावा लागतो. ज्याच्यावर अन्याय झाला त्या फिर्यादीला पैशासाठी पोलीस छळतात, त्यालाच निमूटपणे अन्याय सहन करावा लागतो. दोष नसतांना पोलीस कायद्याचा दुरुपयोग करुन निरपराध नागरिकांकडून पैसे लुटतात. पोलीस खोटे काम करणारच नाहीत, पैसे लुबाडणार नाहीत याची हमी कोणता पक्ष, नेता देऊ शकतो का?

५. शासकीय अधिकारी पैशासाठी कामचुकारपणा करतात, त्रास देतात. पैसे लाच लुचपत हाच त्यांना जन्मसिद्ध अधिकार वाटतो. ठेकेदाराला हेलपाटे मारायला लावतात. ठेकेदार, बिल्डर, लेआऊटवाले कडून लाच लुचपत घेतल्याशिवाय काम करीत नाहीत. स्थानिक नेते, आमदार, खासदार यांचे ही कमिशन ठरले असते. माहीत असूनही सर्वसामान्य लोक काहीच करू शकत नाहीत? यानंतर ही

असे होणारच नाही याची हमी कोणता पक्ष व नेता देऊ शकतो?

**हे सर्व फिक्स करण्यासाठी कोणाकडे योजना तरी आहेत का ?**

मित्रांनो विचार करा, आपल्याला आज सुद्धा अख्ख्या भ्रष्टाचारी सिस्टिमला टक्कर देणाऱ्या संघटन चळवळीची आवश्यकता नाही का?

नवीन विचार, नवी दिशा... जॉईन करा... 'ग्रामविश्व'



# २. भारतातील लोकशाही फिक्स करण्यासाठी उपाय

**१. न्यायपालिका यंत्रणेचे विकेंद्रीकरण :**

न्यायपालिकेचे निर्णय साक्षी पुराव्यावर आधारित असतात. साक्षी पुरावेच बदलले जातात त्यामुळे न्यायपालिका फेल होत आहे. वकील सुद्धा स्वतःच आशिलाला खोटे बयान लिहायला सांगतो अशी वाईट परिस्थिती आहे.

गावागावात न्यायपंचायत म्हणजे कोर्ट असतील. अंदाजे पाच हजार लोकसंख्येसाठी कमीत कमी दोन न्यायाधीश, एक प्रथम आणि दुसरा पर्यायी. न्यायाधीश गावाचाच दिर्घ काळापासून राहणार जेष्ठ रहिवाशी असेल, गावातील अधिकार पूर्ण न्यायपंचायत असावी. गावातील न्यायपंचायतने दिलेले पुरावे सर्वोच्च न्यायालय पर्यंत ग्राह्य धरले जातील. गावातील जज ला मंत्री, सचिव, वरिष्ठ अधिकारी, कोणताही आरोपी हजर करण्याचा आणि शिक्षा करण्याचा अधिकार राहील. न्यायपालिका व्यक्तिकेंद्रित न होण्यासाठी प्रत्येक जज ला जास्तीत जास्त दोन टर्म मिळतील. त्यानंतर कधीच जज ची निवडणूक लढविता येणार नाही. न्यायदान करताना, साक्षी पुरावे कोणतीही चूक झाली तर संबंधित दोषीला दुप्पट शिक्षा होईल. आरोपी आणि फिर्यादी जज चे जवळचे संबंधी असतील तर गावातील दुसऱ्या जज कडे ती केस दिली जाईल. साक्षी पुरावे, मुळीच बदलता न येणे, परफेक्ट न्याय, गुन्हेगारी पूर्णपणे बंद हा या न्यायपालिकेचा उद्देश असेल. विद्यमान पोलिसांनी जर पुरावे साक्षी बदलले, ते चेक करण्याचा आणि त्यांना शिक्षा करण्याचा अधिकार या गावातील जज ला राहील. विद्यमान तालुका स्थरीय कोर्ट दुसऱ्या स्थरावर काम करतील.

**२. पोलीस यंत्रणेचा गाव पातळीवर स्थानिक नवीन स्तर :**

मुद्दा क्र. १ मध्ये उल्लेख केलेले, निवडून आलेले जज त्यांच्या मदतीसाठी गावातील प्रामाणिक कुस्ती कबड्डी वा इतर बलवान तरुणांची निवड करतील. हे तरुण पर्यायी पोलीस म्हणून आवश्यकतेनुसार जज ला मदत करतील. कारण विद्यमान पोलीस १०० टक्के विश्वासार्ह म्हणता येत नाही. विद्यमान पोलीस दुसऱ्या स्तरावर काम करतील.

**३. विद्यमान जेलची सिस्टम फेल आहे :**

जुन्या काळासारख्या भर पब्लीकमध्ये उठबस करायला लावणे, तात्पुरता बहिष्कार टाकणे, तोंडाला काळे फासणे, गावातून धिंड काढणे, हातपाय तोडणे सारख्या शिक्षा अंमलात आणाव्या लागतील. हिंसा ही निसर्ग निर्मित आहे हे ग्राह्य धरुन शिक्षा करताना शिक्षेच्या तीव्रतेवर नियंत्रण ठेवण्यासाठी शिक्षा करताना गावातील वैद्यकीय अधिकारी उपस्थित असतील. विद्यमान जेलची सिस्टीम दुसऱ्या स्तरावर काम करेल.

**महत्त्वाची नोट :**

वरील उपाय क्र. १, २, ३ हे उपाय टप्प्या टप्प्याने सुरवातीला एकदम छोटे गाव, नंतर तालुका नंतर जिल्हा अशी अंमलबजावणी करावी लागेल. प्रत्येक टप्प्यावर एकदम अक्युरेट आणि शंभर टक्के यशस्वी झाल्यानंतरच अंमलबजावणी क्षेत्र वाढविता येईल.

काळाच्या ओघात सारी यंत्रणा, अधिकारी, लोकप्रतिनिधी कळत नकळत तर कधी मजबूरीने भ्रष्टाचाराकडे वळले आहेत. जुने घडलेले सोडून, जुन्या केसेस, जुन्या व्यवहाराकडे दुर्लक्षित करुन, नवीन टाइमलाईन ठरवून त्या तारखेपासून ठरलेल्या क्षेत्रापासून टप्प्या टप्प्याने अंमलबजावणी करावी लागेल.

**४. सर्व निवडणूकच्या वोटिंग सिस्टममध्ये बदल**

**वयानुसार वोटचे मूल्य बदलणे :**

अमेरिका युरोपमध्ये पालक आपल्या मुलाला वयात आल्यावर सोडून देतात. नवरा बायको दोन्ही नवीन नवीन दुसरे तिसरे लग्न करीत राहतात. म्हातारपणात मुलगा बापाजवळ राहत नाही. भारतीय पालक मरेपर्यंत स्वतःच्या अपत्याच्या भल्यासाठी धडपड करतो. त्याच्यासाठी मालमत्ता जमवतो. या आधारावर....

१८ ते ३५ वर्षे वय असलेल्या मतदाराला एक मताचा अधिकार. ३६ ते ५४ वर्षे वय असलेल्या मतदाराला दुप्पट मताचा अधिकार. एक ब्यालॉट वोटमध्ये दोन इलेक्टरोल वोट. ५५ वर्षापेक्षा जास्त वय असलेल्या नागरिकाला तिप्पट मताचा अधिकार. एक ब्यालॉट वोटमध्ये तील इलेक्टेरोल वोट.

वडीलधाऱ्या नागरिकांचे समाजासाठी, कुटुंबासाठी आणि देशासाठी कॉन्ट्रीबुशन जास्त असल्याने हा बदल योग्य आहे. जसे वाढत्या अनुभवानुसार, सेवेनुसार नोकरीवाले जास्त पगाराची अपेक्षा ठेवतात. ही स्थिती गृहीत धरुन हा



बदल अपेक्षित आहे.

**५. मीडिया वर नियंत्रण :**

भडकाऊ, दिशाहीन बातम्यांवर नियंत्रण ठेवण्याचा अधिकार गावातील न्यायपंचायतला असेल. पत्रकार, संपादकाला गावातील कोर्टमध्ये आरोपी म्हणून उभा करण्याचा अधिकार गावातील जज ला असेल.

**६. भारतीय खेळ :**

उदा. शंकरपट, कबड्डी, भारतीय संस्कृती, भारतीय संशोधन, भारतीय शिक्षण, आयुर्वेदच्या बातम्यांचा प्रपोगंडा जास्त करणे. प्राधान्य देणे. सुभाष पाळेकर नैसर्गिक शेतीला प्राधान्य देणे. सुभाष पाळेकर नैसर्गिक शेतीचा अभ्यासक्रम पाचव्या वर्गापासून अभ्यासक्रमामध्ये सामील करणे.

७. भारतातील कायदे सर्वसामान्य लोकांच्या मताप्रमाणे, मनाप्रमाणे, त्यांच्या विचारसरणीनुसार बनविणे. उदा. मुली-मुलीचे लग्न मायबापांच्या संमतीनुसार. संयुक्त कुटुंब प्रणालीला प्राधान्य. पायाभूत भारतीय संस्कृतीला प्राधान्य आवश्यक.

विद्यमान लोकशाही ही एक बेबंदशाही बनली आहे. या लोकशाहीच्या फेल्युअर साठी कोणी एक व्यक्ती, कोणती एक यंत्रणा जबाबदार नाही. नवीन परिवर्तनाची चळवळ शून्यपासून सुरू होईल. सर्वसामान्य साक्षीदार पैशाखातर, स्वार्थासाठी किंवा दबावाखाली साक्षी पुरावे बदलतो. त्यामुळेच न्यायपालिकेचे निर्णय चुकतात. गावावरुन जग ओळखले जाते. मूळ सत्य साक्षी पुरावे बदलायला नको म्हणून न्यायपालिकेचे विकेंद्रीकरण आवश्यक आहे. दुसरे उपाय नाहीत.

साक्षी पुराव्या मधील पारदर्शकता ही ग्रामीण पातळीवर स्पष्ट असते. शक्यतो न्याय निवाडा गावपातळीवर व्हावा. तालुका, जिल्हा, उच्च व सर्वोच्च न्यायालयाकडे प्रकरणे जाऊ द्यायची नाहीत.

सुप्रीम कोर्टची एक खंडपीठ दक्षिण भारतात नागपूर किंवा हैद्राबाद येथे असावे. दिल्ली येथील वकील आणि जज ची मक्तेदारी कमी होईल.

मोठ्या मंदिराच्या मुख्य पोस्ट, पुजारीचे कामात मागासवर्गीयांना आरक्षण देण्यात यावे. त्यांना सामावून घेण्यात यावे.

'भारतीय लोकशाहीतील प्रॉब्लेम्स फिक्स करण्यासाठी उपाय' ही पोस्ट बऱ्याच ग्रुपवर टाकली पण फक्त २-३ लोकांनीच प्रतिक्रिया दिल्यात. कृपया माझी मूळ पोस्ट बारकाईने वाचा. मी अंमलबजावणीचा प्लॅन सुद्धा दिला आहे.

ज्यांनी स्वतः कोर्ट केस लढल्या त्यांनी सुद्धा कृपया उत्तर द्यावे. त्यांना विद्यमान कोर्टचा काय अनुभव आला? ज्यांच्यावर पोलीस केस झाल्या किंवा सामील झाले त्यांनी सुद्धा प्रतिक्रिया द्याव्या कृपया.

मुख्य म्हणजे ज्या आधारावर विद्यमान जज न्याय देते, ते साक्षी पुरावे बदलले जातात. त्यामुळे ही ब्रिटिश मूळ असलेली न्यायपालिका भारतात फेल होत आहे. गावातील जेष्ठ म्हणजे गावात कमीत कमी १५-२० वर्षापासून राहत आहे तो नागरिक जज बनेल? जज साठी निवडणूक होईल. गावातील नागरिक जज ला निवडून देतील. ज्या जेष्ठ नागरिकामध्ये न्यायनिवाडा करण्याची क्षमता आहे तो जज बनू शकतो. जेष्ठ म्हणजे वय ३५ वर्षे वरुन असावे. प्रकरण गावात घडले असल्याने खरं काय आणि खोटे काय त्याची जज शहानिशा करेल. आवश्यकतेनुसार त्याचे सोबतीला लिपिक असू शकतो. साक्षी पुरावेची नोंद करण्यात येईल. पडताळणी होईल. त्याशिवायच कसे होणार? वाद युक्तिवाद सुद्धा होतील. जज शिक्षित असला पाहिजे आवश्यक नाही. आवश्यकतेनुसार जज आपल्याला शिक्षित मदतनीस लिहायला वाचायला. दहावा वर्ग नापास आमदार बनू शकतो, चायवाला पंतप्रधान बनू शकतो तर जज साठीच डिग्रीची आवश्यकता कां म्हणून? गावात न्यायनिवाडा यशस्वीपणे होणे, गावातील गुन्हेगारी संपविण्याची पात्रता असणे महत्वाचे.

जे कधी लॉकअपमध्ये गेले नाहीत. कोर्टच्या पायऱ्या चढल्या नाहीत त्यांना कदाचित वस्तुस्थिती माहीत नसेल. कृपया समजून घ्या. आरोपी असो वा फिर्यादी, पोलीस जिकडून पैसे मिळाले त्याच्या बाजूने साक्षी पुरावे बदलतात, घटनाक्रम सुद्धा बदलतात. बरेचदा दोन्ही पार्टीकडून पैसे खातात आणि दोघांसोबत ही गोड गोड बोलतात. जे काय पैसे देणाऱ्यासाठी सुकर होईल ते करतात. त्यामुळे साक्षी पुरावे एकत्र करण्यासाठी गावातील जज गावचे बलवान, शिक्षित, कुशल तरुण आवश्यकतानुसार डेप्युट करू शकतो. कारण विद्यमान पोलीसमध्ये भ्रष्टाचार प्रचंड बोकाळला आहे.

मी जुनी न्यायपंचायत सांगतो पण पुनर्रचना असलेली आहे. आधी तशी नव्हती. Controlled आणि calculated way नी वापराची आहे. आधीची पुरातन



न्यायपालिका कां फेल झाली त्याचा अभ्यास गृहीत धरुन, त्या त्रुटी काढण्याचा पूर्ण प्रयत्न झाला आहे.

गावातील जज म्हणून कोणालाही फक्त दोनदा निवडून येता येईल. दोन पेक्षा जास्त टर्म मिळणार नाही. तिसऱ्या टर्म ला त्याच जज चा जवळचा नातेवाईक निवडणूक लढवू शकत नाही. गावात कमीत कमी दोन जज असतील. दोन्ही जज गावातल्या दोन भागातील असतील, एकदुसऱ्याचे नातेवाईक नसलेले, एकाच जातीचे नसलेले जज असतील. आरोपी फिर्यादी पैकी कोणीही जज च्या जवळचा असेल तर ती केस गावातील दुसऱ्या जज कडे जाईल. पर्याय नसला तरच मी ती केस विद्यमान तालुक्यातील कोर्टकडे जाईल.

ही ब्रिटिश मूळ असलेली न्यायपालिका पूर्णपणे फेल आहे कारण गरिबांना काही उपयोग नाही. गरीब लोकांना न्याय मिळूच शकत नाही? गरिबांना तालुक्यातील कोर्टमध्ये जायला पैसे नसतात, जर तालुक्यातील कोर्टमध्ये जायला पैसे असलेही तर चांगला वकील करायला पैसे नसतात, मोठ्या मुश्किलने वकील केला तर result लवकर पदरी पडत नाही. ज्यांनी अनुभव घेतला कृपया त्यांना विचारा.

न्यायपालिका ही एकदम सोपी, लवकर result देणारी हवी. गावाची न्यायपंचायत असेल तर गावातील आबू बाबू कर्मचारी, पोलीस कोणीही खोटे काम करणार नाही. भ्रष्टाचार करणार नाही. कामचुकारपणा करणार नाही कारण त्याला तडकाफडकी शिक्षा होईल. हे सर्व विद्यमान संविधानाच्या चाकोरी मधूनच करायचे आहे.

**विद्यमान संविधानात मोजक्याच दुरुस्ती :**

गावातील जज निवडणूक, role, responsibilities साठी एक नवीन प्रकरण संविधानात add होईल. काही थोडेफार संविधानात amendments होतील, इतकेच.

तुम्ही शिक्षेच्या प्रकाराबद्दल बोलले. याची सुद्धा नियमावली बनली जाईल. गावातल्या गावात शिक्षा पब्लीक समोर होते म्हटल्यावर गुन्ह्याचे प्रमाण असेच कमी होऊन जाईल. कोणत्या कोणत्या गुन्हेगाराला उठाबशा मारायला लावल्या तरी गुन्हेगार पूर्ण बदलू सुद्धा शकतो. छोटे मोठे प्रकरणे सहज निपटू शकतात. स्वच्छ आणि पारदर्शी न्याय मिळाल्यामुळे गावातील सुसंवाद वाढेल. कठोर

शिक्षा कठोर गुन्ह्यासाठी असतील. गुन्हेगार दुरुस्त झाला पाहिजे. त्यांनी तो गुन्हा परत करायला नको ही विवेकबुद्धी ठेवून अंमलबजावणी करण्यात येईल.

समजा साक्षी पुरावा मध्ये छेडछाड झाली, न्यायदानमध्ये जज कडून चूक झाली तर संबंधित व्यक्ती व जज ला दुप्पट शिक्षा होईल.



# लेखक परिचय

गजेंद्र दिलीप चाचरकर.

अवघड अशक्य सामाजिक प्रश्नांची उकल करण्याची अंतिम आवड असलेले जगावेगळे व्यक्तिमत्व. सध्या समाजकार्यात जुळले असले तरी मुळात शिक्षणाने इलेक्ट्रॉनिक्स पोस्ट ग्रॅज्युएट इंजीनिअर. गेली पंचवीस-तीस वर्षापासून विविध नोकऱ्या आणि माहिती तंत्रज्ञान क्षेत्राला जुळलेले. दहा वर्षे अमेरिकेत उच्च माहिती तंत्रज्ञान इंडस्ट्रीमध्ये नोकरी, अनुभव आणि वास्तव्य. आधुनिक विज्ञानाचे सर्वात जास्त यशस्वी संशोधन अमेरिकेत झाले. भौतिक दृष्टीने जगात सर्वोच्च विकसित देश अमेरिका! भारतात मात्र लोकशाहीचे फेलुअर! आपल्याच देशात आपल्याला शतप्रतिशत सत्य आणि प्रामाणिकताच्या आधारावर जगणे कठीण जाते. भारतातील लोकशाहीला बेबंदशाही, झोलशाही, चोरशाही कितीतरी विशेषणे फिट होतात. अमेरिकेतील वास्तव्याने प्रभावित होऊन आपला देश सुद्धा ती उंची कशी गाठू शकतो या हेतूने पुढची वाटचाल करताना या विषयाकडे वळले.

भटक्या विमुक्त, वंचित जनतेसाठी कार्यरत संघर्ष वाहिनीचे विविध मोर्चे, मेळावेमध्ये सहभाग. ग्रामगीतेमधील दिलेल्या गाईड लाईननुसार भारतीय संविधानामध्ये कसे बदल करता येतील, गुरुदेव सेवा मंडळाच्या माध्यमातून मोठी चळवळ कशी उभारता येईल यासाठी प्रयत्नशील, साप्ताहिक अभयराज्य, साप्ताहिक विमुक भटकंती चे माजी संपादक.

समाज जागृतीसाठी, भारतातील लोकशाही यशस्वी होण्यासाठी त्यांनी सामाजिक आर्थिक राजकीय अशा विविध विषयांवर लेख लिहिले. त्यापैकी हा पहिला लेख संग्रह.


राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या ग्राम स्वराज्य आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या ग्रामगीता संकल्पनेवर आधारित...
ग्रामविश्व
संघर्ष वाहिनी
गाव हाच विश्वाचा पाया
गावाचा प्रश्न गावात... गावाचा न्याय गावात... गावाचा पैसा गावात
गावाचा विकास तरच देशाचा विकास
राष्ट्रगीत
कदम कदम
बढ़ाये जा
वतन को नोच
खाये जा
संयोजक : गजेन्द्र दि. चाचरकर
ग्रामविश्व
संघर्ष वाहिनी
शहर कार्यालय : १२७, म्हाळगीनगर, नागपूर - ४४००३४
ग्रामीण कार्यालय : गजेंद्र दि. चाचरकर, राहणार पो. भिसी
ता. चिमूर जि. चंद्रपूर (डॉ. गायकवाड यांचे दवाखान्यासमोर)
M. : 7768825005, 9370772752, 9822120161